पोशिंद्यांची लोकशाही

शरद जोशी



पोशिंद्यांची
लोकशाही

शरद जोशी लिखित पुस्तके

अंगारमळा
स्वातंत्र्य का नासले?
खुल्या व्यवस्थेकडे खुल्या मनाने
शेतकरी संघटना विचार आणि कार्यपद्धती
प्रचलित अर्थव्यवस्थेवर नवा प्रकाश
शेतकऱ्यांचा राजा शिवाजी आणि इतर लेख
माझ्या शेतकरी भावांनो मायबहिणींनो
बळीचे राज्य येणार आहे
चांदवडची शिदोरी
अर्थ तो सांगतो पुन्हा
पोशिंद्यांची लोकशाही

पोशिंद्यांची लोकशाही

शरद जोशी

जनशक्ती वाचक चळवळ

जनशक्ती
वाचक
चळवळ

पोशिंद्यांची लोकशाही । शरद जोशी
Poshindhyanchi Lokshahi । Sharad Joshi

प्रकाशक
जनशक्ती वाचक चळवळ
पिनाक, २४४-समर्थनगर,
औरंगाबाद-४३१ ००१.
दूरभाष : (०२४०) २३४१००४.
janshakti.wachak@gmail.com

© शरद जोशी

अंगारमळा, आंबेठाण - ४१०५०१
ता. खेड, जि. पुणे.
sharadjoshi.mah@gmail.com

मुखपृष्ठावरील छायाचित्र
श्रीकृष्ण उमरीकर
मो. ९४२२६४६२८३

अक्षरजुळणी
जनशक्ती वाचक चळवळ,
औरंगाबाद.

प्रथमावृत्ती
१० नोव्हेंबर २०१०
(शेतकरी महामेळावा, शेगाव)

मुद्रक
बाबा प्रिंटर्स चिकलठाणा, औरंगाबाद.

मूल्य रु. ३००/-

प्रकाशकाचे मनोगत

शरद जोशी यांच्या अमृतमहोत्सवानिमित्त समग्र लिखाण प्रकाशित करण्याचा प्रकल्प जेव्हा हाती घेतला. त्यावेळी राजकीय लेखांची संख्या इतकी जास्त असेल असं वाटलं नव्हतं. शेतकरी संघटनेची राजकीय भूमिका सगळ्यांत जास्त टीकेची बळी पडली. त्यावर एक छोटीशी पुस्तिका (१९९४) अजित नरदे यांनी मोठी मेहनत घेऊन प्रकाशित केली होती. त्यामध्ये शेतकरी संघटनेच्या अधिवेशनांमधील राजकीय ठरावांचा समावेश होता. स्वत: शरद जोशी यांनी केलेलं लिखाण समाविष्ट नव्हते. स्वतंत्र भारत पक्षाच्या संदर्भात केलेले लिखाण आणि त्या त्या वेळच्या राजकीय परिस्थितीचं केलेलं विश्लेषण या सगळ्यांमधून एक अतिशय प्रगल्भ सर्वव्यापी आणि देशाचा मूलभूत विचार करणारी अशी मांडणी समोर येते. हे सर्व लेख एकत्र असणे आम्हाला आवश्यक वाटले. अभ्यासकांनी हे लिखाण डोळसपणे अभ्यासले, तर शेतकरी संघटनेच्या राजकीय भूमिकेबाबत जी अकारण आणि अप्रस्तुत टीका केल्या गेली, ती चूक आहे हे लक्षात येईल. आम्ही नियोजिलेला समग्र शरद जोशी प्रकाशनाचा प्रकल्प या ठिकाणी पूर्ण होत आहे. नजर चुकीने काही लेख राहून गेले असतील, तर ते पुढील आवृत्त्यांमध्ये समाविष्ट केले जातील. सर्वसामान्य वाचकांनी या आधीच्या चौदा पुस्तकांना अतिशय चांगला प्रतिसाद दिला त्याबद्दल सगळ्यांचे मन:पूर्वक आभार. वर्तमानपत्रांच्या पुरवण्यांमधून आणि विविध नियतकालिकांतून या पुस्तकांवर परीक्षणं प्रकाशित झाली त्या सर्व संपादकांचे आभार.

श्रीकांत अनंत उमरीकर

लेखानुक्रम

०१ आढावा दहा वर्षांच्या राजकारणाचा ०९
०२ लोकसभेची मध्यावधी निवडणूक आणि शेतकरी संघटना १७
०३ 'भारत' भूमीला वाफसा आला आहे २९
०४ पाटी पुसली, आता पुढे ३९
०५ मागणं लई नाही ४५
०६ मध्यममार्गी पंतप्रधान ४९
०७ स्वतंत्र भारताचे नैतिक दर्शन ५६
०८ काँग्रेसला पर्याय नाही ? ६३
०९ लोकसभा निवडणुका १९८९ ..... ७२
१० अपात्र नेत्यांनी मांडलेली जनतेची अग्निपरीक्षा ७८
११ पंचायत राज निवडणुका व शेतकरी महिला आघाडी ८४
१२ देशाला वाचविण्यासाठी ९२
१३ खाईच्या धारेवर असलेल्या देशातील जनतेला धोक्याचा इशारा १०५
१४ खाईच्या धारेवर, मतपेटीच्या समोर ! १११
१५ इति अटलबिहारी प्रकरणम् १२१
१६ नाही, पंतप्रधानसाहेब ! १२८
१७ कांदाफेकीचे मर्म १३१
१८ मेंढरे नव्हे, माणसे म्हणून जगा १४०
१९ संकटाची चाहूल देणारा जाहीरनामा
(स्व. भा. प. जाहीरनामा लेखांक : १) १४८
२० स्थिर सरकार चांगले की आघाडीचे ?
(स्व. भा. प. जाहीरनामा लेखांक : २) १५४
२१ राखीव जागांविषयी भ्रम (स्व. भा. प. जाहीरनामा लेखांक : ३) १६२
२२ स्त्रियांसाठी राखीव जागा (स्व. भा. प. जाहीरनामा लेखांक : ४) ... १७०

२३ समान नागरी कायदा (स्व. भा. प. जाहीरनामा लेखांक : ५) १७९
२४ समाजवादी संरचना (स्व. भा. प. जाहीरनामा लेखांक : ६) १८८
२५ स्वातंत्र्यलढ्याच्या फौजेची पुनर्बांधणी करताना... ..... १९१
२६ खरोखरी स्वातंत्र्याचा जाहीरनामा २०४
२७ बहुजन समाजाला क्रांतीची दुसरी संधी २११
२८ पोशिंद्यांच्या लोकशाहीसाठी स्वतंत्र भारत पक्ष २१९
२९ ग्यानबाचे मतदारांना मार्गदर्शन
(लोकसभा निवडणूक २००४) २३४
३० खुलेपणाचा दरवाजा उघणारे 'अटलजीं'चे बटण २४९
३१ २००४ निवडणुकीने काय शिकविले ? २५९
३२ देशाच्या स्वातंत्र्यास कोयता-पंजाचा धोका २७२
३३ निवडणूक धोरणाचा निर्णय लॉटरी तिकीट घेण्यासारखा होत नाही ... २७७
३४ होतकरू नव्हे, खचलेल्या मनांचा कौल
(म. रा. विधानसभा २००४ निकाल) २८८
३५ राजकीय भूमिकेचे चक्रव्यूह २९३
३६ राष्ट्रीय 'रालोआ' आणि राष्ट्र संपवणारी 'संपुआ' ३०६
३७ आता देश वाचविणे फक्त मतदारांच्या हाती ३२२
३८ गरिबांच्या खच्चीकरणाविरुद्ध आचारसंहिता कोणती ? ३३७
३९ देशपातळीवरील निकालाचा अर्थ
(लोकसभा निवडणूक २००९) ३४४

आढावा दहा वर्षांच्या राजकारणाचा

गेल्या दहा वर्षांतील राजकारणाचा आढावा घेण्यासाठी राजकारण म्हणजे शासनाशी संबंधित असलेली आणि शासन म्हणजे देशाची राजकीय व्यवस्था चालविणारी यंत्रणा अशी एक ढोबळ व्याख्या आपण धरूया.

हा आढावा घेताना गेल्या दहा वर्षांमध्ये केवळ आपल्या देशाच्याच नव्हे तर जगातील अन्य देशांच्याही राजकारणात किंवा राज्यकारणात म्हणा, ज्या काही प्रवृत्ती दिसतात त्यांचाही आढावा मांडला पाहिजे.

गेल्या दहा वर्षांमध्ये राष्ट्र ही संकल्पना फार झपाट्याने कालबाह्य झाली आहे. तसे अजूनही देशादेशांत राष्ट्राध्यक्ष आहेत, त्यांच्या निवडणुका होतात, ते शपथा घेतात, इतकेच नव्हे तर राष्ट्राध्यक्षांच्या भोवती असणाऱ्या पहारेकऱ्यांची संख्या वाढली आहे आणि कोणत्याही कारणाने होणाऱ्या फीत कापण्याच्या समारंभाच्या प्रसंगी होणारा डामडौलही वाढला आहे; पण प्रत्यक्षामध्ये राष्ट्राध्यक्ष आणि पंतप्रधान या दोघांच्याही हातातील सत्ता झपाट्याने निघून गेली आहे.

अमेरिकेसारख्या देशामध्ये राष्ट्राध्यक्ष हा कदाचित् टेलिव्हिजनवरून लढाई जाहीर करण्याचे काम करीत असेल; पण त्याच्या हाती सत्ता आहे असे म्हणणे कठीण आहे. आज अमेरिकेत 'अमेरिकेची राष्ट्रीय जाणीव' यापेक्षा अमेरिकेतल्या वेगवेगळ्या 'बहुराष्ट्रीय कंपन्यांची जाणीव' ही राजकीयदृष्ट्या जास्त मोठी आणि प्रभावशाली ताकद तयार होते आहे. राष्ट्राध्यक्ष रुझवेल्टनंतर पहिल्या श्रेणीचा मनुष्य अमेरिकेचा राष्ट्राध्यक्ष कधी बनला नाही, आज पहिल्या श्रेणीचा मनुष्य एखाद्या बहुराष्ट्रीय कंपनीचा उपाध्यक्ष बनेल; पण राष्ट्राध्यक्ष बनत नाही, हा या गोष्टीचा अत्यंत चांगला पुरावा आहे.

यात तसे आश्चर्य वाटण्यासारखे काही नाही. ही स्थिती म्हणजे मनुष्यजातीच्या इतिहासातील उत्क्रांतीची एक पायरी आहे. उत्क्रांतीमध्ये समाज तयार झाल्यानंतर

माणसांनी साधने गोळा करायला सुरवात केली आणि संघटना तयार करायला सुरवात केली. शेपटी लहान आहे का मोठी, याच्यावर काही तो उत्क्रांतीत टिकून राहील किंवा नाही, हे आता अवलंबून राहिलेले नाही. त्याच्या हाती साधन कोणते आहे आणि तो स्वत:ची संघटना कशी बांधतो याच्याने त्याचे उत्क्रांतीत टिकून राहणे ठरते. म्हणूनच कुटुंब, गाव, जाती, धर्म, राष्ट्र अशा स्वत:च्या जाणिवा असलेल्या संघटना इतिहासात तयार झालेल्या दिसतात. दोनतीनशे वर्षांपूर्वी राष्ट्र ही जाणीव काहीशी भव्य आणि उदात्त होती तशी जाणीव, राष्ट्राचा अहंकार आज कुठेच शिल्लक राहिलेला नाही, ही गेल्या दहा वर्षांत घडलेली महत्त्वाची घटना आहे. ज्यांची आर्थिक प्रगती झाली आहे, ती मंडळी बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या एका नवीन जाणिवेचा प्रयोग करीत असतीलही कदाचित्; पण आपल्यासारख्या आर्थिकदृष्ट्या अप्रगत (किंवा प्रगतिशील) देशांना ते परवडत नाही; म्हणून नवीन जाणिवा तयार करण्याऐवजी जुनी मढी उकरून त्यांच्या जाणिवा पुन्हा निर्माण करण्याचा प्रयत्न आपल्याकडे होत आहे.

राष्ट्र ही संकल्पना कमी महत्त्वाची झाली, राजकारणी कमी महत्त्वाचे झाले; त्यामुळे साहजिकच, हिमालयासारखे उत्तुंग व्यक्तिमत्व हे आता राजकारण्यांत सापडणे दुर्मिळ झाले आहे. ते जितके दुर्मिळ होईल, तितके आहेत त्याच दगडांना शेंदूर फासून, त्यांनाच एकदम मोठे म्हणण्याची पद्धतही वाढली आहे. हे आपल्या देशातही घडत आहे.

राजीव गांधी चांगले असतील, कर्तबगार असतील, त्यांच्यावर फार मोठी जबाबदारी पडली, हेही खरे असेल; पण महात्मा गांधी, मोतीलाल नेहरू किंवा जवाहरलाल नेहरू या सगळ्यांपेक्षा ते मोठे आहेत म्हणणे किंवा विश्वनाथ प्रताप सिंहांनी मंडल आयोगाविषयी घेतलेली भूमिका मोठी लोकप्रिय आहे म्हणून त्यांची एकदम गौतम बुद्धाशी तुलना करणे म्हणजे राजकारणातल्या व्यक्तीची गुणवत्ता जितकी कमी, तितकी जास्त स्तुती त्याच्या चमच्यांनी करावी अशी एक प्रवृत्ती आज राजकारणात निर्माण झाली आहे याचे उदाहरण आहे. ही गेल्या दहा वर्षांच्या राजकारणात घडत आलेली दुसरी महत्त्वाची गोष्ट आहे.

गेल्या दहा वर्षांत घडलेली तिसरी महत्त्वाची आणि सगळ्यांत मोठी क्रांतिकारक गोष्ट म्हणजे एका विशिष्ट विचाराच्या हुकूमशाहीचा अंत झाला. मी या हुकूमशाहीला मार्क्सवादी डाव्या विचाराची हुकूमशाही म्हणतो. तुम्हाला जर चार बुद्धिमान लोकांमध्ये गणले जायचे असेल, तर तुम्ही तुमचेच म्हणणे मार्क्सने मांडलेल्या सिद्धांतांच्या समीकरणांमध्ये बसवून मांडायला हवे; तरच तुम्हाला मान्यता

मिळेल, नाही तर तुम्ही बुद्धिवादीच नाही, तुम्ही सीआयएचे एजंटच आहात किंवा कोणत्या तरी, पुराण्या जातीचेच आहात अशी हाकाटी करून, तुमचे तोंड बंद केले जायचे! काही डावा विचार मानत आहात असे म्हणायचे असेल, लोकांचे भले करायचे आहे, त्यांचा उद्धार करायचा आहे, विकास करायचा आहे असे जर तुम्हाला म्हणायचे असेल, तर त्याकरिता हा विचार मार्क्सने सांगितला आहे किंवा दुसऱ्या कोणा विचारवंताने सांगितला आहे असे म्हणत असाल, तरच तुम्हाला मान्यता मिळत असे. राजकारणातील या प्रकारच्या भोंदूपणाचे उच्चाटन गेल्या दहा वर्षांमध्ये व्हायला लागले, ही अत्यंत क्रांतिकारी अशी घटना आहे आणि याचे फार मोठे श्रेय त्या मानाने साधारण अशा दोन व्यक्तींना द्यायला हवे. एक अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष रेगन आणि दुसऱ्या ब्रिटनच्या पंतप्रधान थॅचर.

करुणेने भारून, दुसऱ्यांचे भले करण्याकरिता आम्ही सार्वजनिक सेवेत आणि राजकारणात पडलो आहोत, सर्व लोकांना मदत करण्याकरिता सरकार आहे अशा धारणेला छेद देताना, त्यांनी असे म्हटले, की कुणीही असे समजायचे कारण नाही, की सरकार तुमच्या बारशाला हजर असेल, तुमच्या लग्नालाही येऊन, मदत करील आणि तुमच्या मर्तिकालाही हजर राहून, तुम्हाला मदत करील. 'The world owes you nothing' जग तुमचे काहीही देणे लागत नाही. ज्याने त्याने आपल्या पायांवर उभे राहण्याचे साध्य केले, तरच ही व्यवस्था टिक शकते. यामुळे एका अर्थाने ' Welfarism 'चा अंत झाला. त्याही पलीकडे, गेली शंभर वर्षे मार्क्सने एका हुकूमशाहीची– 'नाही रे'च्या हुकूमशाहीची कल्पना ठेवली होती. भांडवलशाही व्यवस्थेमध्ये वर्गपद्धती मांडून, 'नाही रे'ची हुकूमशाही जेव्हा तयार होईल, तेव्हाच ही सर्व कटकट संपेल असे मानणाऱ्यांना श्रीमती थॅचरनी उत्तर दिले, की भांडवलशाहीमध्ये नोकरदार आणि नोकरी देणारे असा फरक झाला आहे, हे खरे; पण हा प्रश्न नोकरदारांना सत्ता देऊन सुटणार नाही आणि नोकऱ्या देणाऱ्यांना नष्ट करूनही संपणारा नाही. हा प्रश्न सुटायचा असेल, तर मालमत्ता असणारांची लोकशाही असणे आवश्यक आहे, 'नाही रे'ची हुकूमशाही नव्हे.

या दोनही माणसांनी हा विचार अत्यंत विनम्रपणे मांडला आणि नजीकच्या इतिहासाचा अभ्यास केला, तर त्या विचाराची सार्थकता सिद्ध होते. गेल्या दहा वर्षांमध्ये राजकीय सैद्धांतिकदृष्ट्या 'वर्ग' ही कल्पना नामशेष झाली आहे. सर्व मानवजातीचा इतिहास हा मुळी वर्गसंघर्षाचा इतिहास आहे, असे म्हणणाऱ्या

मार्क्सला उत्तर मिळाले, की मानवजातीच्या इतिहासात वर्गसंघर्षाचे एकसुद्धाउदाहरण मिळत नाही आणि गेल्या दहा वर्षांमध्ये, अभंग वाटणारे सर्व समाजवादी डोलारे खाली कोसळत आहेत. हे होत असताना फार मोठा हिंसाचार झाला असेही नाही. पश्चिम जर्मनीने तर, ज्या तऱ्हेने पूर्व जर्मनीला आपल्यात सामावून घेतले त्याने सगळ्या जगाला एक धडा घालून दिला. आपल्या देशातील हिंदुत्वनिष्ठांनीही हा धडा घेण्यासारखा आहे. भारत का केवळ हिंदूंचाच देश आहे असे म्हणावयाचे आहे, तर मुसलमानांना किंवा अन्य धर्मीयांना नावे ठेवण्यापेक्षा हा देश आर्थिक संघ म्हणून असा ताकदवान करा, की पाकिस्तानच काय, त्या पलीकडचे देशसुद्धा आपणहून येऊन म्हणतील, की तुमच्या या आर्थिक संघामध्ये आम्हालाही सामावून घ्या!

राजकारणाचा दहा वर्षांचा आढावा घेताना आंतरराष्ट्रीय क्षेत्रात घडलेल्या आणखी एका महत्त्वाच्या गोष्टीची नोंद घेणे आवश्यक आहे. आज मोठी लष्करी ताकद ही एका अर्थाने निष्प्रभ ठरली आहे. पॅरिसच्या क्रांतीच्या वेळी शेतकऱ्यांच्या हातात जी शस्त्रे होती, तीच सैन्याच्या हातात होती. त्यामुळे दोघे समोरासमोर उभे राहून लढू शकत होते. नंतरच्या मधल्या काळात लष्कराच्या हातातली साधने अशी काही झाली, की सर्वसामान्य माणूस त्याच्यापुढे उभाही राहू शकत नव्हता अशी स्थिती झाली होती; पण व्हिएतनाममध्ये अमरिकेच्या प्रचंड ताकदीचा सामना करण्यासाठी पायात बूटसुद्धा नसलेले पाच फूट उंचीचे व्हिएतनामी उभे राहिले आणि त्यांनी अमेरिकेला माघार घ्यायला लावली. आज सगळ्या जगभर वेगवेगळ्या देशांमध्ये अतिरेकी म्हणा, आतंकवादी म्हणा किंवा खडकू म्हणा, यांनी असे दाखवून दिले आहे, की ते संघटित लष्करी सामर्थ्याचा फार प्रभावी रीतीने सामना करू शकतात. ज्यांना असे वाटते, की काश्मीरचा प्रश्न लष्कर पाठवून सोडविण्यासारखा आहे किंवा पंजाबमध्ये पुरेसे कडक राहिले, तर पंजाबचा प्रश्न सुटू शकेल, त्यांनी हे लक्षात घ्यायला हवे. हिटलरला मिळालेल्या धड्याचाच सारांश गेल्या दशकाने सांगितला, तो असा, की लहानशी जमातसुद्धा या पृथ्वीवरून नष्ट करण्याचे आजपर्यंत कुणालाही जमलेले नाही आणि कुणी लष्कर पाठवून, एक भाग नष्ट करू असे म्हणेल तर ते जमण्याची काही शक्यता नाही.

महात्मा जोतीबा फुले यांच्या स्मृतिशताब्दीचा काळ नुकताच संपला आहे. आज भारताच्या राजकारणात जे काही घडत आहे, ते जोतीबांच्या विचारांच्या अनुषंगाने समजावून घ्यायला पाहिजे, असे मला वाटते. शंभर वर्षांपूर्वी भारतामध्ये

राष्ट्रीय काँग्रेस जेव्हा तयार झाली, तेव्हा जोतीबांनी प्रश्न विचारला होता, की– 'अरे, अमेरिकेत नॅशनल काँग्रेस आहे, फ्रान्समध्ये नॅशनल काँग्रेस आहे म्हणून तुम्हीही इथे न्याशनल काँग्रेस काढता; पण तिथे 'Unified People' (एकमय लोक) या अर्थाने एक 'Nation' (राष्ट्र) आहे. तुमच्याकडे आहे का ? तुमचा सगळा इतिहास हा देशातल्या एका घटकाने दुसऱ्या घटकाला शोषायचा. तो काही केवळ जातीच्याच रूपात उभा राहिला आहे असे नाही. तो धर्माच्या रूपात उभा राहिला आहे, गावाच्या रूपात उभा राहिला आहे. प्रदेशाच्याही रूपात उभा राहिला आहे; मात्र जातीच्या सरहद्दीवरचे शोशण हा या देशातला सर्वांत सनातन इतिहास आहे, यात काही शंका नाही. जर तुम्ही आज स्वातंत्र्य मिळवाल आणि त्याआधी हे एकमय लोक म्हणजे एक राष्ट्र तयार झालेले नसेल, तर इंग्रज जाऊनसुद्धा राज्य कोणाचे येणार आहे ?

जोतीबांनी विचारलेला हा प्रश्न आपण बाजूला टाकला, इंग्रज गेले आणि आमचा देश एकमय लोकांचे एक राष्ट्र बनायच्या आधीच आण स्वतंत्र झालो. मग त्याचे परिणाम काय झाले ? राजकारणी नीतिमत्ता सोडून वागू लागले, राजकारणी व्यावसायिक बनले, राजकारणी गुन्हेगार बनले. याचा अर्थ असा नाही, की त्यांच्या शरीरातील रक्ताचा अंश बदलला म्हणून ते तसे वागू लागले. पूर्वी माणसांच्या अंगात जे रक्त असायचे, तसलेच आज आमच्या अंगात आहे. दोघांच्या नीतिमत्तेत, वर्तणुकीत काही फरक दिसत असेल, तर बाजूच्या परिस्थितीत काही बदल झाला का, हे तपासून पाहिले पाहिजे. इतिहास जाणून घ्यायला नुसत्या घटना समजून चालत नाही, त्याबरोबर त्या वेळची परिस्थितीही लक्षात घ्यायला हवी. नाही तर इतिहासाचा अन्वयार्थच चुकून जातो. माणसे परिस्थितीला अनुरूप अशीच वागत असतात. आज शरीयतला हात लावल्यावर मुसलमान ज्या पद्धतीने विरोध करतात, तितक्याच कडवेपणाने लोकमान्य टिळकांनी संमती वयाच्या बिलाला विरोध केलेला आहे आणि आज मुलसमान जशी कारणे सांगतात, तशीच कारणे देऊन! दोघांच्याही परिस्थितीमध्ये काहीही फरक नाही.

मग हे असे का घडते? जेव्हा वसाहतवादी किंवा एका घटकाने दुसऱ्या घटकाचे शोषण करायचे अशी पद्धती सुरू झाली, तेव्हा साहजिकच, पहिली गोष्ट घडली, ती म्हणजे सगळ्या सत्तेचे केंद्रीकरण व्हायला लागले, आज विधानसभांमध्ये सत्ता नाही, लोकसभेत सत्ता नाही, कॅबिनेटमध्ये नाही आणि नियोजनमंडळातही नाही. आज सत्ता आहे पंतप्रधानांच्या भोवती, ते जी माणसे गोळा करतील त्यांच्या हाती. राजीव गांधी गेले, त्यांच्या जागी व्ही. पी. सिंग

आले, ते गेले आणि चंद्रशेखर आले, तरीसुद्धा या परिस्थितीत काही बदल झालेला नाही. अजूनही, सत्ता आहे ती पंतप्रधानांच्या आसपासच्याच मंडळींच्या हातात. म्हणायला, एक फरक मात्र पडला. पूर्वी वाटायला लागले होते, की सगळी सत्ता एकाच घराण्याच्या हातात राहते की काय ? पण तेवढे बदलले. पण स्वच्छता अशी राजकारणात राहिली नाही. त्याबद्दलही तक्रार करण्यात अर्थ नाही, कारण स्वच्छता कुठेच राहिली नाही. जिथे न्यायालयात स्वच्छता नाही, भ्रष्टाचार माजला आहे, तिथे या देशामध्ये बाकीच्या क्षेत्रांत स्वच्छता सापडायची कुठे ?

मग एकएक सत्तांचे जसजसे केंद्रीकरण होऊ लागले, तसतसे त्या केंद्रीकरणामध्ये एक नवीनभाग दिसायला लागला. तो सहज तपासून घेण्यासारखा आहे. तुम्ही १९५१ च्या सगळ्या लोकसभा-विधानसभा सदस्यांची नावे काढून पाहा. या माणसाने देशाच्या स्वातंत्र्यासाठी काही त्याग केला आहे, याने इतके सोसले आहे, कष्ट केलेले आहेत, अशी सेवा केली आहे... अशा प्रकारची यादीच तयार होईल. आज लोकसभा-विधानसभांच्या सदस्यांची यादी समोर ठेवली, तर हा गुंड आहे, हा दादा आहे, याने मार्केट कमिटीचा प्लॉट खाल्ला, याने तिकडचा भूखंड गिळला, याने ही सोसायटी खाल्ली, याने तो कारखाना पचवला... अशी सर्व दादा-गुंडांनी ती भरलेली दिसून येईल. मंत्रिमंडळाची यादीसुद्धा याने एक खून केला आहे, याने दोन, त्याने तीन... अशानेच भरलेली. ही अशी परिस्थिती आहे असे जेव्हा मी एका फार मोठ्या राजकारण्यासमोर म्हटले, तेव्हा ते म्हणाले, 'एवढे तर असायचेच, त्याशिवाय का राजकारणी बनेल?' अशी ही सहजमान्य स्थिती आजच्या राजकारणाची बनली आहे.

याचा अर्थ, राजकारणामुळे कुणी गुन्हेगार बनले आहेत असा नाही, तर आज गुन्हेगारालाच राजकारण करता येते अशी परिस्थिती तयार झाली आहे. या सर्व परिस्थितीशी संबंधित प्रश्नांची आर्थिक उत्तरे देण्याचे आपण टाळतो; कारण ती उत्तरे मिळविण्याकरिता आपल्याला जोतीबा फुल्यांकडे जावे लागते. त्याऐवजी मग वेगवेगळ्या जाणिवा तयार केल्या जाऊ लागल्या. कुठे जातीच्या, कुठे धर्माच्या, प्रदेशाच्या तर कुठे भाषेच्या. कारण त्याच्यात एक फायदा असतो. आर्थिक मुद्दा मांडला, तर तो प्रत्येक माणसाला जाऊन समजावून, पटवून द्यावा लागतो. पण, उदाहरणार्थ, कोणी थोडा आवाज चढवून हिंदुत्वाविषयी बोलायला लागले, की त्यात एक फायदा असतो. अगदी मुंबईत बसून जरी हिंदुत्वाच्या ललकाऱ्या फेकायला लागले, की काही नाही तरी एक चतुर्थांश हिंदू त्याच्या

पाठीशी राहतात, त्यासाठी मुंबई सोडायची अजिबात जरुरी नाही. हा फायदा हिंदुत्ववाद्यांना आहे, इस्लामवाल्यांना आहे, दलितवाल्यांना आहे, यासिर अराफतला आहे, सगळ्यांना आहे. यांना कोणताही प्रश्न सोडविण्याची इच्छा नसते, त्यांना या प्रश्नांचे भांडवल करून, राजकारण कसे करता येईल, यात स्वारस्य असते. प्रश्न संपण्याची नाही, तर या प्रश्नाच्या आधाराने पुढे कसे जाता येईल इतकीच यांची भावना असते, राष्ट्रध्वज जाळणाराचे हात कापावे, हे ठीक आहे; पण मग पाकिस्तानला गुप्त रहस्य विकणारे जर शर्मा आणि वर्मा असतील, तर कुणाकुणाचे हात कापायचे असे विचारले, तर ते म्हणतात, की असा हिंदुत्ववाद आम्ही मानीतच नाही. जे राष्ट्रीय आहेत, ते आमचे आणि हिंदूंमध्ये अराष्ट्रीय असतील ते आमचे नाहीत; मग त्याला हिंदुत्व शब्द का वापरतात, सर्वसाधारणपणे राष्ट्रीयत्व असे म्हणून प्रश्न का मिटवत नाहीत? कारण त्यामुळे एक फायदा जातो. हिंदू शब्द वापरल्याने कमी कष्टांमध्ये लोकांच्या भावनांना आवाहन करण्याचे जे साधन आहे, ते हातचे निघून जाते.

आज काँगेसमध्येही महात्मा गांधी कोणी नाही. सगळेजण सुटावर टाय लावून बसलेले असताना, पंचा नेसून काँग्रेससमोर येण्याची हिंमत असलेले लोक गेले. लोकांना दिशा दाखविणारे नेते पूर्वीच गेले. हल्ली लोकांची दिशाभूल करूनच राजकारण करणारे नेते राहिले आहेत. परिस्थितीने अगतिक, लाचार बनलेले लोक सांगतात, की तुम्ही अमुक अमुक करणार असाल, तरच आम्ही तुमच्यामागे येतो. सरावलेले नेतेही लोकांच्या डोळ्यात बघून, कशाच्या आश्वासनावर हे आपल्या मागे येतील, याचा हिशेब करून, आपले सगळे राजकारण मांडतात.

माणसांची नीतिमत्ता लोप पावली आहे असे नाही, तर देशाच्या विकासाचा प्रवाहच थांबला आहे, पुढे काही आशादायक दिसत नाही, हे या परिस्थितीचे प्रमुख कारण आहे. एखादा प्रवाह चालू असता म्हणजे त्यात शेवाळ साठत नाही, किडे होत नाहीत आणि किड्यांची मारामारीही होत नाही. मग, गांधी आणि राजाजी असताना राष्ट्रभाषा म्हणून हिंदीचा प्रचार तामिळनाडूमध्ये सगळ्यांत जास्त होत होता. त्या गांधींच्याऐवजी सिंथेटिक गांधी आल्यानंतर त्याच तामिळनाडूमध्ये हिंदीला सगळ्यांत जास्त विरोध होऊ लागला आहे. आपल्याला जर का विकासाचा प्रवाह खुला करता आला, तर या अशा लहानसहान क्षुद्र जाणिवांना गोंजारून, नेतृत्व कमावणाऱ्या लोकांना या देशाच्या राजकारणात काही स्थान राहणार नाही.

मंडल आयोगाच्या शिफारशींच्या निमित्ताने देशात संघर्ष सुरू झाला, त्या

वेळी मी एका परिसंवादात विचारले होते, की जर का सर्व कारखानदार आणि नोकऱ्या देणारे आमच्याकडे या, नोकऱ्या घ्या म्हणून विद्यार्थ्यांच्या मागे लागले आहेत अशी परिस्थिती असती, तर मंडल आयोगावरचे हे आंदोलन झाले असते का ? या प्रश्नाचे उत्तर प्रामाणिकपणे शोधणारे राजकारणी सापडणे कठीण.

गेल्या दहा वर्षांतील राजकारणाकडे नजर टाकली, तर असे लक्षात येते, की आपली दिशा हरवली आहे. ती पुन्हा सापडेल किंवा नाही ? या परिस्थितीत तरी मी फारसा आशावादी नाही. आखाती प्रदेशात सुरू झालेल्या युद्धाचा परिणाम आपल्या राजकारणावर काय होईल, हे आजच सांगता येत नसल्याने पुढच्या दहा वर्षांचा अंदाज मांडणेही अशक्य आहे.

(६ फेब्रुवारी १९९१)

◆◆

लोकसभेची मध्यावधी निवडणूक आणि शेतकरी संघटना

लोकसभेच्या निवडणुकीच्या धावपळीला सुरवात झाली आहे. निवडणुकीची ही भाकड म्हैस मलिदा तर खूप खाऊनजाणारआहे; पण त्यातून काही निघण्याची आशा जवळजवळ शून्य. इतक्या निरर्थक निवडणुका आजपर्यंत कधी झाल्या नाहीत आणि यापुढे होऊ नयेत, अशी निदान प्रार्थना करायला हवी.

काश्मीर, पंजाब, तामिळनाडू आणि आसाम या राज्यांतील उग्रवादी आणि ठिकठिकाणचे नक्षलवादी आपापल्या प्रदेशांत जवळजवळ सार्वभौम सत्ता प्रस्थापित करून बसलेले आहेत. महागाईचा डोंब उसळला आहे. बेकारी वाढते आहे. इराकचे युद्ध आणि त्यामुळे निर्माण झालेली पेट्रोलटंचाईची परिस्थिती यामुळे दुष्काळात तेरावा महिना येऊन पडलेला आहे. सरकारी खजिना रिता आहे. एवढेच नव्हे, तर त्यात जे जे काही येऊन पडेल, ते नोकरशहाच हडप करून टाकताहेत.

या परिस्थितीला तोंड कसे द्यायचे, कुणी द्यायचे ? भारतीय जनतेने याचे एक उत्तर १९८९ च्या निवडणुकांत स्पष्ट दिले आहे. भारतीय जनतेचा अर्थशास्त्रज्ञांवर आणि तंत्रज्ञांवर फारसा विश्वास उरला नाही. त्यांचे बोलणे तिला समजतही नाही आणि आजपर्यंत सगळे तंत्रज्ञ आणि अर्थशास्त्रज्ञ नुसते वांझच ठरले असे नाही, तर त्यांच्या सल्ल्याप्रमाणे चालून देश अधिकाधिक खड्ड्यात चालला आहे. तज्ज्ञ नव्हे; पण निखळ सचोटीचा कुणी एक महात्मा सापडला, तर तो निदान देशाचे अध:पतन तरी थांबवील ही त्यांची भावना. भारतीय परंपरा माणसाला ओळखते, पुस्तकांना नाही.

१९८९ मध्ये याच कारणांनी मतदारांनी विश्वनाथ प्रताप सिंग यांच्याकडे कल दाखविला, ज्यांच्या प्रामाणिकतेबद्दलच शंका ठेवायला जागा होती, त्यांना थोड बाजूला करून, वर्षादीड वर्षांत कसेबसे स्वत:च्या पायावर उभे राहणाऱ्या

राष्ट्रीय मोर्चास सर्वांत जास्त जागा मिळवून दिल्या. विश्वनाथ प्रताप सिंगांच्या आसपास अनेक संशयास्पद मंडळी असतानाही लोकांनी, निदान व्यक्तिशः त्यांना आशास्थान मानले; पण त्याबरोबर इतर पक्षांना आणि नेत्यांना संपवून टाकले नाही. इंदिरा काँग्रेस, भाजप, दोन्ही अंगांचे कम्युनिस्ट पक्ष यांचेही काही स्थान टिकवून ठेवले. मतदारांचा कौल स्पष्ट होता. देशाची धुरा सांभाळायला समर्थ महापुरुष कोणीच नाही; पण नेता म्हणून मानल्या जाणाऱ्या सगळ्या आंधळ्यापांगळ्यांनी एकत्र येऊन काम केले, तर तेवढाच एक आशावादी पर्याय आहे; पण हे आंधळेपांगळे एकमेकांच्या आधाराने चालण्यापेक्षा एकमेकांच्या पायात पाय घालून, पाडापाडी कराण्यातच धन्यता मानू लागले. राष्ट्रीय मोर्चाचे सरकार पडले आणि चंद्रशेखर यांचे सरकार तर धड तीन महिनेही चालले नाही.

इंदिरा गांधींच्या काळात राष्ट्रपतींना रबरस्टँप बनविण्यात आले, त्याचा सर्वांत भयानक परिणाम या वेळी दिसून आला. चंद्रशेखर सरकार पडले, त्या वेळी निवडणुका नव्याने घेण्यात अर्थ काहीच नव्हता, फक्त एक हताशपणा होता. लोकसभेच्या सदस्यांची पुन्हा निवडणूक लढविण्याची इच्छा नव्हती, निवडणूक म्हणजे हजार पंधराशे कोटी रुपयांचा चुराडा, निवडणूक म्हणजे अतिबिकट काळात अधिकारहीन शासन खुर्चीवर ठेवणे, निवडणूक म्हणजे जातीयवादी कठमुल्लांना देशात धुमाकूळ घालण्याची खुलेआम संधी. असं असतानाही राष्ट्रपतींनी निवडणुका घेण्याचे ठरविले.

नव्याने निवडणुका घेतल्या म्हणजे लोकांचा कौल काही वेगळा येईल असे मानायला जागा नव्हती. १९८९ मध्येही लोक पुढाऱ्यांविषयी उदासीन होते. आज त्या सर्वांविषयी घृणा तयार झाली आहे, एवढाच काय तो फरक. काँग्रेस विरोधकांच्या नाकर्तेपणामुळे ४० वर्षे देशाचा अधःपात घडवून आणणारी काँग्रेससुद्धा बरी, अशी एक भावना आज आहे; पण काँग्रेसचे राज्य स्थापन झाले, तर ती भावना धड तीन महिनेसुद्धा टिकायची नाही.

एखादा पक्ष बहुमत घेऊन निवडून आला; तरी त्यामुळे काही देशाचे भले होणार आहे अशीही परिस्थिती नाही. सगळे पक्ष एकजुटीने कामाला लागले, तरीदेखील हे प्रश्न सोडवायला मोठे बिकट आहेत, कोण्या एका पक्षाच्या शासनाच्या तर ते आवाक्याबाहेरचेच आहेत. समजा इंदिरा काँग्रेस सत्तेवर आली आणि त्यांनी नोकरशाही आटोक्यात आणायचे ठरवले, अगदी चांगला कार्यक्रम बनवला, तरी अशा कार्यक्रमाला विरोधी पक्ष पाठिंबा देणार नाहीत;

कारण ती त्यांची राजकीय आवश्यकता आहे. राष्ट्रीय मोर्चाचे शासन दिल्लीला आले आणि त्यांनी असाच कार्यक्रम हाती घेतला, तर इंदिरा काँग्रेस त्याच कारणाने त्याच्या विरोधात उभी ठाकेल.

'कित्तावही' राष्ट्रपती ?

राष्ट्रपती ही संस्था समर्थ असती, तर त्यांनी सर्व पक्षांवर दडपण आणून, संयुक्त सरकारे चालविण्यास त्यांना भाग पाडले असते. प्रत्येक पक्षाच्या शिखरस्थ नेत्याने अहंकारापोटी संयुक्त प्रयत्नांत सामील होण्यास विरोध केला असता, तर त्या त्या पक्षांतील दुसऱ्या फळीच्या नेत्यांना बोलावूनसुद्धा राष्ट्रपतींना हे साधता आले असते; पण राष्ट्रपतींनी हे केले नाही. ते म्हणाले, की मी 'कित्तावही' राष्ट्राध्यक्ष आहे. कित्तावही अध्यक्ष म्हणजे घटनेतील तरतुदींच्या शब्दांवर बोट ठेवून चालणारे! कित्तावही अध्यक्षांनी निवडणूक घेण्याचा निर्णय दिला.

पण, कित्तावही अध्यक्षांचा निर्णय कित्तावही नव्हता. त्यात एक धूर्त राजकीय चाल आहे. अल्पमतधारी काँग्रस विरोधकतांतील फाटाफुटीचा फायदा घेऊन, देशभर जवळजवळ अविरतपणे सत्ता चालवत आली आहे. विरोधकांची फळी पार नेस्तनाबूत झाली आहे. त्यांच्यात दुफळी, तिफळीच नव्हे, तर अगदी बेबंदशाही माजली आहे आणि याचा अंकगणिती फायदा इंदिरा काँग्रेसला मिळणार आहे, हे न समजण्याइतके राजीव गांधीही भोळे नाहीत आणि राष्ट्रपतीही आंधळे नाहीत. किंबहुना, जनता दलातील फुटीर गटास शंभरेक दिवस सत्तेवर ठेवण्यात, जनता दलात नजीकच्या भविष्यकाळात भरून निघणार नाही अशी बेदिली माजावी एवढाच त्यांचा डाव होता.

आर्थिक कार्यक्रमांचे वावडे असलेले पक्ष

निवडणुकांच्या घोषणा झाल्या, वेगवेगळ्या पक्षांच्या उमेदवार याद्या जाहीर होऊ लागल्या, वेगवेगळ्या पक्षांचे जवजवळ एकाच तोंडवळ्याचे जाहीरनामे बाहेर पडू लागले. हे जाहीरनामे त्यांच्या लेखकांनी तरी पुन्हा एकदा तपासून पाहिले असावेत किंवा नाही याबद्दल शंका आहे. देशाला विकासाच्या मार्गाकडे समर्थपणे नेणारा विचारही कोणत्या पक्षाकडे नाही, असे काही ऐतिहासिक सामूहिक कर्तृत्व करण्याची इच्छासुद्धा कोणत्या पक्षाकडे नाही. देशापुढील सगळ्यांत मोठे संकट आहे– आर्थिक; पण कोणत्याच पक्षाच्या ठळक घोषणांत आर्थिक प्रश्नांचा उल्लेखही नाही. येत्या निवडणुकीत आर्थिक प्रश्नांना काही थाराच नाही.

इंदिरा गांधींनी निवडणुका जिंकण्यासाठी 'गरिबी हटाव'सारख्या अतिरेकी

घोषणा दिल्या; पण त्यांच्या अतिरेकात निदान अर्थवाद होता. आता सर्वच पक्ष निव्वळ राज्यकारणी बनले आहेत. इंदिरा काँग्रेस स्थैर्याचे तुणतुणे वाजवते आहे; पण स्वातंत्र्यानंतरच्या ३० वर्षांत तरी स्थैर्याला काही तोटा नव्हता! पण देशाची काही प्रगती झाली नाही. साठून राहिलेल्या शेवाळाने भरलेल्या दुर्गंधी तळ्याला ते स्थिर असले, तरी कोणी पिण्याकरिता वापरीत नाही. राखीव जागांसारख्या किरकोळ प्रश्नाला अवास्तव महत्त्व देऊन, आपण सामाजिक अन्याय दूर करीत असल्याची वल्गना हा आणखी एक नमुना. आर्थिक कार्यक्रमावर आता कुणाचाच विश्वास नाही याचा सर्वांत नागडावाघडा फायदा घेत आहेत, ते भाजप व शिवसेनेसारखे जातीयवादी पक्ष. आर्थिक आघाडीवर दिग्मूढ आणि हताश झालेल्या जनतेला राम मंदिरासारख्या किरकोळ प्रश्नावर पेटवून, सत्ता हाती घेण्याचा मनसुबा आणि डाव त्यांनी रचला आहे.

संसदेच्या निवडणुकीचे भोंगे लवकरच वाजू लागतील, प्रचाराचा गदारोळ उठेल. पूर्वी गडाचा बुरूज टिकेनासा झाला, की त्याच्या पायात एक तरुण जोडपे गाडत असत, त्यांच्या डोक्यावर शिळा ठेवत असताना त्यांनी मारलेल्या किंकाळ्या ऐकू येऊन नयेत, म्हणून ढोल-नगारे, तुताऱ्याभेऱ्यांचा एकच हल्लकल्लोळ उडवीत. या निवडणुकीच्या गोंगाटात भारतातील जनसामान्यांचाच नव्हे तर सगळ्या देशाचाच बळी जाण्याची खरी भीती आहे.

निवडणुकीबाबत उदासीनता

अशाही परिस्थितीत एकदा निवडणुका होणार म्हटल्यानंतर हौसे, गवसे आणि नवसे यांची धावपळ सुरू व्हायची राहिली नाही. कोणी उमेदवारी मिळावी म्हणून, तर कोणी निवडणुकीच्या या सगळ्या बाजारात हाती काही लागते का ते पाहावे म्हणून धावपळ करू लागले. निवडणुकीच्या निकालासंबंधीच्या आपापल्या आडाख्याप्रमाणे पुढारी मंडळी घाणीवरील माशांप्रमाणे एका ढिगावरून दुसऱ्या ढिगावर जाऊन बसू लागले. सगळ्यांत वाईट परिस्थिती समाजवादी जनता (दलाची) पार्टीची. पंतप्रधान त्यांचा, केंद्रीय मंत्रीमंडळ त्यांचे; पण मंत्रिमंडळातील कितीजण काँग्रेसमध्ये गेले, जनता दलात गेले किंवा अगदी भाजपातसुद्धा गेले याचा हिशेबसुद्धा सांगणे कठीण आहे.

याउलट, एक मोठी अभिमानाची गोष्ट. किरकोळ एकदोन अपवाद सोडता शेतकरी संघटनेच्या सर्वच कार्यकर्त्यांनी या निवडणुकीकडे फारसे लक्ष दिले नाही. आजही, संघटनेने कोणत्याही पक्षाकडे कल दाखविलेला नाही. जातीयवादी पक्षांचा कडवेपणाने विरोध हे खरे; पण इतर पक्षांपैकी कोणताही शेतकऱ्यांना

विशेष प्रेमाचा वाटावा अशी काही स्थिती नाही.

सर्वच पक्ष चोर

१९८० मध्ये चाकणला कांद्याचे पहिले आंदोलन उभे राहिले, त्या वेळी दिल्लीत जनता पक्ष सत्तेवर होता. त्याच काळात निपाणी भागातही तंबाखूचे पहिले आंदोलन झाले. महाराष्ट्रात तरी शेतकरी आंदोलनाची सुरवात ही काँग्रेस सत्तेवर नसताना झाली. सुरवातीच्या काळात, त्यामुळे, शेतकरी संघटना हे काँग्रेसचेच पिलू आहे असाही प्रचार चाले. जनता पक्षाच्या शासनाची वाताहत झाली, इंदिरा लाटेवर काँग्रेसचे शासन भरभक्कम शक्तीने सत्तेवर आरूढ झाले. त्या काळात चाकणचे आणि नाशिकचे आंदोलन पेटले. संघटनेच्या आंदोलनात सामील होणाऱ्यांत विरोधी पक्षांविषयी सहानुभूती बाळगणारी कार्यकर्ती मंडळी मोठ्या प्रमाणावर होती. त्यामुळे संघटनेची प्रवृत्ती साहजिकच इंदिरा काँग्रेसविरोधाकडे झुकणारी होती.

१९८४ च्या निषडणुकीत शेतकऱ्यांचा प्रश्न निवडणुकीतला सर्वप्रथम मुद्दा बनवण्याचा प्रयत्न संघटनेने गावबंदीच्या कार्यक्रमाने केला. पण, निवडणुकांच्या दोन महिने आधी इंदिरा गांधींची हत्या झाली आणि गावबंदीच्या कार्यक्रमाचा प्रभाव फिका पडला. वर्ध्यासारख्या एखाद्या जिल्ह्यातच तो कार्यक्रम अगदी ८४ च्या निवडणुकांतही प्रखरपणे राबविण्यात आला. १९८४ ची निवडणूक शेतकऱ्यांच्या प्रश्नावर झाली नाही, आर्थिक प्रश्नांवर झाली नाही, इंदिराजींच्या हत्येच्या दुःखाच्या पार्श्वभूमीवर झाली. त्यामुळे, इंदिरा काँग्रेसची सत्ता हटण्याचे किंवा कमजोर होण्याचे दूरच राहिले. राजीव गांधींच्या नेतृत्वाखाली काँग्रेसची सत्ता कधी नव्हे इतकी संख्याबळात मजबूत झाली, विरोधी पक्षांचा पार धुव्वा उडाला.

हाती आलेल्या बेबंद सत्तेचा उपयोग राजीव गांधींच्या शासनाने कोणताही धरबंध न ठेवता, शहरी सुखवस्तूंच्या ऐषारामासाठी वापरायला सुरवात केली. अशा कठीण काळात, राजीव गांधींविरुद्ध एक अक्षर उच्चारणे कठीण झाले असताना शेतकरी संघटनेने 'राजीवास्त्राची' होळी करण्याचे धारिष्ट्य दाखविले. नंतर, विश्वनाथ प्रताप सिंगांना राजकीय जीवनात स्थान मिळवून देण्याकरिता मोठे प्रयत्न केले. त्याचे फळ १९८९ च्या निवडणुकीत मिळाले. कोणीही बलदंड पक्ष राहिला नाही. राजकीय सत्तेचा समतोल तयार झाला. एवढेच नव्हे, तर, शेतीमालाला भाव आणि शेतकऱ्याची कर्जमुक्ती या कार्यक्रमाची ग्वाही देणारे विश्वनाथ प्रतापसिंग पंतप्रधान झाले.

त्यानंतर गेल्या १६ महिन्यांत काही सिद्ध झाले असेल, तर ते एवढेच, की कोणत्या राजकीय पक्षाच्या आधाराने काही किरकोळ फायदे पदरात पाडून घेता येतील; पण या फायद्यांच्या मर्यादा फारच तोटक्या असतील. शेतकऱ्यांच्या प्रश्नाचे शिवधनुष्य आपल्याला पेलत नाही, हे विश्वनाथ प्रताप सिंगांच्याही फार थोड्या काळात लक्षात आले. शेतीमालाचा भाव काय आणि कर्जमुक्ती काय, त्यांनी शक्य तितका अंगचोरपणा दाखवला. शेवटी, कर्जमुक्तीच्या बाबतीत शहरवासीयांकडून होणाऱ्या कोल्हेकुईला घाबरणारे पंतप्रधान आरक्षणासारख्या क्षुल्लक विषयावर युवक विद्यार्थ्यांचा प्रचंड प्रक्षोभ सोसायला तयार झाले.

नुसता समतोल पुरेसा नाही

या काळातला आणखी एक धडा घेण्यासारखा आहे. सत्तेचा समतोल शेतकरी आंदोलनास पोषक खरा; शेतकरी आंदोलन प्रभावी होण्यासाठी, किंबहुना, ती एक आवश्यक अट आहे; पण राजकीय सत्तेचा समतोल असला म्हणजे आंदोलनाच्या यशासाठी राजकीय भूमी तयार होतेच असे नाही. त्याकरिता निदान आणखी दोन अटी पुऱ्या होणे आवश्यक आहे. राजकीय समतोल असताना शासनाचे नेतृत्व जर एखाद्या प्रामाणिक आणि सज्जन अशी प्रतिमा असलेल्या नेत्याकडे असेल, तर आंदोलन उभे राहणे कठीण होते. मोरारजी देसाई, इंदिरा गांधी, शंकरराव चव्हाण यांच्यासारख्या उग्र मुखवट्याचे शासक आंदोलन उभे करण्याचे निम्मे काम स्वत:च करून टाकतात. याउलट, विश्वनाथ प्रताप सिंग किंवा शरद पवार अशा नेत्याची करणी कशीही असो, त्यांच्याविरुद्ध जनसामान्यांत संतापाचा वडवानल उफाळून येत नाही.

आंदोलनाची आणखीही एक आवश्यक अट आहे. राजकीय समतोलातील शासन सर्वार्थाने शेतकऱ्यांना परके वाटले पाहिजे. शासनाकडून शेतकऱ्यांच्या हिताकरिता काही होईल अशी आशासुद्धा शिल्लक राहता नये.

कार्यक्रमशून्य राजकारण

१९८९ मध्ये सत्तेचा समतोल निर्माण झाला; पण शेतकरी आंदोलनास आवश्यक अशा बाकीच्या अटी पुऱ्या झाल्या नाहीत. शेतकरी आंदोलनाने घाव घातला; पण जखमी सावज निसटून गेले.

येत्या निवडणुकांच्या राजकीय तारांगणात इंदिरा काँग्रेस, जनता दल, कम्युनिस्ट इत्यादी ओळखीच्याच चेहऱ्यामोहऱ्याचे पक्ष आहेत. निवडणुकीत तोंडाला येतील ती आश्वासने देणे, प्रलोभने दाखविणे, पैशाचा अफाट वापर करणे, आवश्यक तर जाती, धर्म भाषा इत्यादी भेदाभेदांचा कुशलतेने वापर

करून, निवडणुका खिशात टाकण्याचे तंत्र वाकबगारपणे हाताळणारी मंडळी या पक्षांत भरलेली आहेत. यांच्यापैकी कोणाकडेच ठाम विचार असा नाही आणि कार्यक्रम अमलात आणण्याची ताकद त्याहूनही नाही.

शेतकरी पंचायतीचा सूचक निर्णय

पुण्यातील शेतकरी पंचायत चालू असतानाच या निवडणुकांचे वारे वाहू लागले होते. त्यामुळेच पंचायत पुरी भरायच्याआधीच विसर्जित करावी लागली. पंचायतीने फक्त एकच निर्णय घेतला आणि तो म्हणजे, जातीयवादी पक्षांची निवडणुकीसाठी असलेली मान्यता रद्द करण्यात आली नाही, तर मतदान केंद्रे उघडू न देण्याचा सत्याग्रह करणे. निवडणूकप्रक्रियेमध्ये, प्रतीकात्मक का होईना, अडथळा आणण्याचा सत्याग्रहाचा निर्णय म्हणजे संघटना कोणत्याही पक्षाच्या बाजूने उभी राहणार नाही याचे सूचकच आहे.

निवडणूक आयोगापुढील अर्ज

पंचायत झाल्यानंतर त्या वेळेपर्यंत जमा झालेल्या ५३,००० सह्यांसहित राष्ट्रपतींना द्यावयाचे निवेदन १४ मार्च १९९१ रोजी राष्ट्रपतींपुढे ठेवण्यात आले. त्यांनी ते निवेदन पंतप्रधानांकडे आवश्यक त्या कार्यवाहीसाठी पाठविल्याचे औपचारिक उत्तरही दिले; पण त्यामुळे जातीयवादी पक्षांना निवडणुकीत भाग घेण्याची घटनेतील तरतुदींप्रमाणे परवानगी आहे वा नाही, हा प्रश्न तडीस लागण्याची काही शक्यता दिसली नाही. त्यामुळे हा प्रश्न धसास लावण्यासाठी निवडणूक आयोगापुढे एक अर्ज करण्यात आला. या अर्जातील युक्तिवाद साधा आणि सरळ आहे.

घटनेच्या प्राविधानातच, भारतीय गणराज्य हे समाजवादी, निधार्मिक आणि लोकशाही असल्याची ग्वाही आहे.

जातीजमातींमध्ये वंश, धर्म, जात, भाषा, प्रदेश यांच्या आधाराने वैरभावना निर्माण करणे, हे भारतीय दंडसंहितेनुसार गुन्हेगारी कृत्य आहे.

लोकप्रतिनिधी कायदा, १९५१ च्या कलम १२३ प्रमाणे धर्म, वंश, जात, समाज, भाषा यांच्या आधाराने मते मागणे, हा भ्रष्ट मार्ग ठरविण्यात आला आहे आणि त्यास शिक्षा सांगितली आहे.

शिवसेना सुमारे २५ वर्षांपूर्वी स्थापन झाली व तेव्हापासून प्रथमत: दाक्षिणात्य, मग गुजराथी, मग पुरभैय्ये, कानडी अशा समाजांविरुद्ध वैरभावना निर्माण करण्याचा कार्यक्रम त्यांनी कित्येक वर्षे राबविला.

अलीकडे अलीकडे त्यांनी हिंदुत्व मांडण्यास सुरवात केली आहे. व्यवहारात

त्यांच्या या हिंदुत्वाचा अर्थ असा, की लोकांच्या मनातील विद्वेषभावनांवर फुंकर घालणे, श्रीनगर किंवा इतर ठिकाणच्या काही मुसलमान व्यक्तींच्या कृत्याचे दाखले द्यायचे आणि त्यामुळे हिंदू तेवढे जात्याच राष्ट्रप्रेमी आणि मुसलमान तेवढे-विरुद्ध पुरावा नसेल तर राष्ट्रद्रोही; त्यांना सर्वांना पाकिस्तानात पाठविले पाहिजे, मशिदी पाडल्या पाहिजेत, हिंदू राष्ट्र तयार झाले पाहिजे... अशा तऱ्हेचा विचार म्हणजे शिवसेनेचे हिंदुत्व.

अशा तऱ्हेचा विचार करून, १९८७ मध्ये शिवसेनेने विलेपार्ले येथील एक पोटनिवडणूक जिंकली.

ऑगस्ट १९८९ मध्ये शिवसेनेने निवडणूक आयोगाकडे राज्यस्तरावील राजकीय पक्ष म्हणून मान्यता मिळविण्यासाठी अर्ज केला. त्यासाठी शिवसेनेची एक घटनाही त्यांनी निवडणूक आयोगापुढे ठेवली. आजपर्यंत ही घटना गुलदस्त्यात ठेवण्यात आली आहे. या घटनेत शिवसेना निधर्मी व लोकशाहीवादी पक्ष असल्याचे जाहीर केले आहे. या दस्तावेजाच्या आधाराने शिवसेनेस राजकीय पक्ष म्हणून मान्यता मिळाली.

७ एप्रिल १९८९ रोजी, विलेपार्ले येथील पोटनिवडणुकीत शिवसेनेचे रमेश प्रभू यांची झालेली निवडणूक मुंबई उच्च न्यायालयाने निवडणूक भ्रष्टाचाराचा आरोप सिद्ध झाल्याने रद्द ठरविली.

त्यानंतरही शिवसेना हिंदुत्वाचा प्रचार करणार, शिवसेनेचा लोकशाहीवर विश्वास नाही, निवडणूक आयोगापुढे सादर केलेला दस्तावेज म्हणजे निवडणूक चिन्ह मिळविण्यासाठी केलेले नाटक होते, असे खुलेआमपणे शिवसेनेचे नेते गुरकावीत होते.

१९८९ च्या लोकसभेच्या निवडणुकीत त्यांनी आपला विषारी प्रचार चालू ठेवला आणि विधानसभेवर भगवा झेंडा फडकावण्याच्या उन्मादात १९९० च्या विधानसभा निवडणुकीत तर शिवसेनेच्या नेत्यांनी अत्यंत बेताल आणि निरर्गल प्रचार केला.

शिवसेनेचा प्रचार हा संविधान-विरोधी होता असा पहिला निर्णय मुंबई उच्च न्यायालयाने वामनराव महाडिक यांची निवडणूक रद्द ठरवताना दिला. त्यानंतर गोरेगाव, केज, कुर्ला येथील शिवसेनेच्या उमेदवारांच्या निवडणुकाही मुंबई उच्च न्यायालयाने रद्द ठरविल्या आहेत, एवढेच नव्हे तर शिवसेनेचे नेते बाळ ठाकरे, मनोहर जोशी आणि छगन भुजबळ यांच्यावर गुन्हेगारीची व्यक्तिगत जबाबदारी ठेवण्याचे ठरविले आहे.

मान्यता मिळविण्यासाठी शिवसेनेने कपट नाटक केले, निवडणूक आयोगासमोर दिलेल्या वचनाचा खुलेआम भंग केला, अशा तऱ्हेने ते प्रचार करत राहिले, तर जातीवैमनस्याचा भडका उडण्याचा धोका आहे यासाठी निवडणूक आयोगाने शिवसेनेला बहाल केलेली मान्यता काढून घ्यावी या अर्जाविरुद्ध शिवसेनेच्या वकिलांनी वकिली डावपेचाचे युक्तिवाद केले. कोणत्याही राजकीय पक्षाला एकदा मान्यता दिली, की निवडणूक आयोगाला ती मान्यता रद्द करण्याचा काहीही आधिकार नाही असा त्यांचा युक्तिवाद होता. यापुढे जाऊन, त्यांनी असेही तर्कट मांडले, की निवडणूक आयोगाला मान्यता काढून घेण्याचा अधिकार असो वा नसो, कोणाही तिऱ्हाईत व्यक्तीस अशा तऱ्हेचा अर्ज करण्याचा कोणताही अधिकार नाही.

निवडणूक आयोगाने या विषयावर जो निर्णय दिला, त्याचे मराठी भाषांतर खालीलप्रमाणे होईल-

'अगदी टोकाचे उदाहरण घ्यायचे झाले, तर (समजा) एक राजकीय पक्ष आयोगाकडून महत्त्वाची माहिती लपवून किंवा खोटी माहिती पुरवून मान्यता मिळवितो आणि (त्या पक्षाने) असे केले नसते, तर त्याच्या मान्यतेचा प्रश्नच निर्माण झाला नसता. अशा लपवाछपवीकडे किंवा खोटी माहिती पुरविण्याकडे निवडणूक आयोगाचे लक्ष वेधण्यात आले, तर निवडणूक आयोग असहायपणे स्वस्थ राहील आणि तिऱ्हाईत व्यक्तींच्या म्हणण्याकडे दुर्लक्ष करील काय ? माझ्या मते, या प्रश्नाचे उत्तर निश्चितपणे 'नाही' असे आहे. असा पक्ष निवडणूक आयोगाला फसवू शकत नाही आणि निवडणूक आयोग त्या पक्षाच्या प्रतिनिधींखेरीज इतर कोणीही अशी माहिती घेऊन आला, तर आपले दरवाजे बंद ठेवू शकत नाही. अशा तिऱ्हाईत व्यक्तीने पुरविलेल्या सर्व माहिती आणि घटना यांची नोंद घेणे, आवश्यक वाटल्यास त्यांचे म्हणणे ऐकून घेणे हे निवडणूक आयोगाचे कर्तव्य आहे.'

थोडक्यात निवडणूक आयोगाने तिऱ्हाईत व्यक्तीचा हक्क मान्य केला आहे, एवढेच नाही, तर त्या पलीकडे जाऊन, पक्षांची मान्यता काढून घेण्याचा अधिकार आयोगास आहे, एवढेच नव्हे, तर लोकप्रतिनिधित्व कायदा, १९५१ चा भंग करण्याबद्दल व्यक्तिगत उमेदवारावरच नव्हे, तर सर्व पक्षावर कार्यवाही करण्याचा निवडणूक आयोगाचा हक्क असल्याचेही जाहीर केले आहे.

निवडणूक आयोगाने घेतलेल्या या भूमिकेमुळे इतका गदारोळ उठला, की पक्षांच्या मान्यतेविषयींच्या सर्वच प्रकरणाच्या सुनावण्या आगामी लोकसभा

निवडणुकाा पूर्ण होईपर्यंत स्थगित करण्यात आल्या.

खरे म्हणजे, निवडणूक आयोगासमोर सुनावणीस आलेली इतर प्रकरणे आणि शिवसेनेविरुद्धचा अर्ज यात फार मोठा फरक आहे. भारतीय जनता पक्षाने रामरथयात्रेत कमळ या निवडणूक चिन्हाचा वापर केल्यामुळे ते चिन्ह गोठविण्यात यावे, असे एक प्रकरण होते. म्हणजे भारतीय जनता पक्षाविरुद्ध त्यांच्या निवडणूक चिन्हाचा एका प्रसंगी गैरउपयोग केल्याचा आरोप होता. निवडणूक चिन्हाचा धार्मिक कारणासाठी उपयोग करू नये, हे भाजपला तत्त्वत: तरी मान्य आहे. मान्य नसल्यास, ते तसे जाहीरपणे बोलत तरी नाहीत. यात्रेतील रामरथावर कमळाचा उपयोग करणे हा धार्मिक वापर आहे किंवा नाही, याबद्दल त्यांचा मतभेद आहे.

पण शिवसेनेची गोष्ट अगदी वेगळी आहे. निवडणुकीत आणि राजकारणासाठी शिवसेना धर्माच्या नावाचा वापर करते, हे त्यांना मान्य आहे. एवढेच नव्हे तर त्याचा त्यांना अभिमान आहे, निधार्मिकतेची आपण खोटी शपथ घेतली आणि निवडणूक आयोगासमोर कपट नाटक करून, निवडणूक चिन्ह पदरी पाडून घेतले, असे ते खुलेआम जाहीररीत्या सांगतात. पाचपाच निवडणूक अर्जप्रकरणी उच्च न्यायालयाने स्पष्ट निर्णय देऊन, त्यांच्या उमेदवारांच्या निवडणुका रद्दबातल केल्या, तरीसुद्धा आपण धर्माच्या नावाचा असा गुन्हेगारी वापर चालूच ठेवणार आहोत, अशी त्यांची अरेरावी चालूच आहे.

वर उद्धृत केलेल्या निवडणूक आयोगाच्या निकालाकडे पाहिले, तर शिवसेनेची राजकीय पक्ष म्हणून मान्यता आताच सुनावणी झाली असती, तर तातडीने रद्द झाली असती, यात काही शंका नाही. किंबहुना, शिवसेना त्यांचा गुन्हेगारी मार्ग चोखाळीत राहिली, तर जेव्हा कधी सुनावणी होईल, त्यावेळी शिवसेनेची राजकीय पक्ष म्हणून मान्यता रद्द होणार, यात आता काही शंका राहिलेली नाही. शिवसेना सध्या पॅरोलवर सुटलेली आहे एवढेच!

खुनासारखा गंभीर आरोप हायकोर्टाच्या पातळीवर सिद्ध झाला म्हणजे केवळ सुप्रीम कोर्टात याचिका दाखल केली आहे किंवा राष्ट्रपतींपुढे दयेचा अर्ज सादर झाला आहे या सबबीखाली गुन्हेगाराला मोकळे सोडता येत नाही. गुन्हेगार सराईत असेल, तर त्याला सोडले जाण्याची शक्यताच नाही आणि गुन्हा सिद्ध झाल्यानंतर बाहेर पडता आले, तर आपली गुन्हेगारी बिनदिक्कतपणे पुढे चालवणार अशी शेखी मिरवणाऱ्या गुन्हेगाराला जामिनावरसुद्धा सोडत नाहीत.

निवडणूक कायद्याखाली अपराध हे गुन्हेगारी कायद्यात मोडतात. शिवसेनेला

अशा तऱ्हेने थोडोवेळसुद्धा मोकळे सोडणे तसे अयोग्यच आहे. अगदी अट्टल गुन्हेगार चुकून मोकाट सोडला गेला, तर दोनपाच माणसांचे मुडदे पाडील. शिवसेनेच्या उपद्व्यापांमुळे किती रक्तपात होईल आणि किती विद्वेष पसरेल याचा हिशेब सांगणेसुद्धा कठीण; पण असे असूनही शिवसेनेला पॅरोलवर सोडले आहे, हे खरे; पण या पॅरोलवरील कैद्यावर निवडणूक आयोगानेही काही बंधने घातली आहेत. आयोगाने आचारसंहिता सर्व पक्षांकडून मान्य करून घेतली आहे. या आचारसंहितेत धर्माच्या नावावर प्रचार करण्यावर बंदी आहे, एवढेच नव्हे, तर तो गुन्हा आहे, हे स्पष्ट करण्यात आले आहे. कोणताही पक्ष आचारसंहितेच्या या कलमाचा भंग करताना आढळला, तर त्या एकूण पक्षावरच निवडणूक आयोग कार्यवाही करेल. अशी कार्यवाही करण्यात जनहितेच्छू तिऱ्हाइतांची मदत झाली, तर ठीकच आहे. न झाल्यास आयोग स्वत:च्या प्रयत्नांनी आणि ताकदीने अशी कार्यवाही पार पाडेल असा निर्धारही प्रमुख निवडणूक आयुक्तांनी जाहीर केला आहे.

शेतकरी संघटनेचे देखरेख गट

येत्या लोकसभा निवडणुकीत शेतकरी संघटनेने पॅरोलवर सुटलेल्या या कैद्यावर आणि त्याच्या वृत्तीच्या इतर सर्वांवर देखरेख ठेवण्याचे निश्चित केले आहे. लोकसभा निवडणुका आटोपताच शिवसेनेविरुद्धचा अर्ज सुनावणीस निघेल त्या वेळी, या निवडणुकीत शिवसेनेची जी कृष्णकृत्ये नजरेस येतील, ती निवडणूक आयोगासमोर सज्जड पुराव्यानिशी मांडण्यात येतील. शेतकरी संघटना ही देखरेख काही फक्त शिवसेनेवरच ठेवणार आहे असे नाही. निवडणुकीत जातीच्या वा धर्माच्या नावाचा वापर करून, इतर पक्षांतर्फे प्रचार होत असेल, तर त्यांच्यावरही देखरेख ठेवून, त्यांच्याही कृष्णकृत्यांचे पुरावे जमा करण्यात येणार आहेत. लोकसभेच्या प्रत्येक मतदारसंघात कार्यकर्त्यांचा एक देखरेख गट स्थापन करण्यात येणार असून, निवडणूक प्रचारामध्ये निवडणूक आयोगाने जारी केलेल्या आचारसंहितेच्या दृष्टीने जे जे भ्रष्टाचारी प्रकार आढळतील, त्यांची पुराव्यानिधी नोदं करण्यात येईल. महाराष्ट्रभर जमा होत असलेल्या या माहितीचे केंद्रीय नियंत्रण कक्षामध्ये दररोज संकलन करण्यात येऊन, विशेष गंभीर प्रकरणे तातडीने निवडणूक आयोगाच्या दिल्लीतील मुख्य नियंत्रण कक्षास कळविण्यात येतील. जातीयवादाचा ब्रह्मराक्षस हा सर्वच अर्थवादी चळवळींचा, म्हणून शेतकरी आंदोलनाचाही गळा घोटणारा शत्रू असल्याने जातिधर्मासंबंधाने झालेल्या निवडणूक भ्रष्टाचाराची नोंद करणे, हा शेतकरी संघटनेच्या देखरेख

पथकांचा या निवडणूक काळातला अग्रक्रमाचा कार्यक्रम राहणार आहे. परिणामी, १९९१ च्या लोकसभा निवडणुका, महाराष्ट्रापुरत्या तरी जातीयवादी प्रचाराने डागाळलेल्या शेवटच्या निवडणुका ठरतील.

(६ मे १९९१)

◆◆

'भारत'भूमीला वाफसा आला आहे

(लोकसभा १९९१ निवडणुकांचे निकाल)

१९९१ सालच्या मध्यावधी निवडणुकांचे निकाल जाहीर झाले आहेत. उरलेले निकाल २० तारखेच्या सकाळपर्यंत लागतील. जे निकाल हाती लागले आहेत त्यावरून एक गोष्ट स्पष्ट होते, की निवडणुकीच्या निकालात कोणताही चमत्कार नाही. निवडणुका जाहीर झाल्या त्या वेळी, जे निर्णय लागतील असे वाटले होते जवळजवळ तसेच निर्णय थोड्याफार फरकाने लागले आहेत.

एवढा प्रचंड खर्च, दंगे, मारामाऱ्या, रक्तपात, माजी पंतप्रधानांची हत्या, निवडणुका पुढे ढकलणे एवढ्या सगळ्या घटना घडूनही निवडणुकांतून आश्चर्यजनक असे काहीच बाहेर पडले नाही. स्थिर सरकार मिळण्यासाठी लोकांकडे जाऊन पुन्हा एकदा आदेश मागण्याची कल्पना फोल ठरली आहे. मतदारांनी पुढाऱ्यांना पुन्हा एकदा निक्षून सांगितले आहे की तुमच्यापैकी स्पष्ट बहुमत प्राप्त करण्याच्या पात्रतेचा कुणीच नाही; तुम्ही सगळ्यांनी एकत्र बसून देशाचा कारभार चालवावा अशीच लोकांची इच्छा आहे.

भविष्यकाळामध्ये कोणी एखादा अद्वितीय, देदीप्यमान नेता पुरुष किंवा स्त्री अवतरल्यास पुन्हा कदाचित त्या नेत्याला किंवा त्याच्या पक्षाला स्पष्ट बहुमत मिळवता येईलही. अन्यथा, एकपक्षीय शासनाचा कालखंड संपला आहे, हे स्पष्ट आहे.

शेतकरी आंदोलनाने असा दिवस उगवावा यासाठी अट्टहास धरून प्रयत्न केला. जी भूमी तयार व्हावी यासाठी गेली दहाबारा वर्षे मेहनत घेतली, त्या भूमीला वाफसा आला आहे. आता सर्वच पुढारी जवळपास सारख्याच आकाराचे झाले आहेत. आता छोटा चोर मोठा चोर असा भेदभावसुद्धा करण्याचे कारण नाही. राजकीय संतुलन तयार झाल्यामुळे शेतकऱ्यांच्या आणि कष्टकऱ्यांच्या आंदोलनात यश मिळवणे जास्त सुलभ होणार आहे; पण या संधीचा फायदा

कष्टकरी घेतात की पुन्हा दुसरे उपटसुंभ 'जातीयवादी' इत्यादि उठून उभे राहतात, कोणास ठाऊक!

पक्षांमधील फोडाफोड करण्याचे प्रयत्न होतील. आयाराम गयाराम पुढारी संधी साधण्याचा प्रयत्न करणारच. भारतीय जनता पार्टी आणि डावे पक्ष दोघेही शिस्तबद्ध असल्याने त्यांच्यात फाटाफुटीची शक्यता कमी संभवते. जनता दल आणि राष्ट्रीय मोर्चात पक्ष बदलण्याची लागण होण्याची बरीच शक्यता आहे. फाटाफुटीमुळे कदाचित शासनास काही काळ लोकसभेत आपले बहुमत टिकवता येईल. मागचा अनुभव असे सांगतो, की हे असले बहुमत फार काळ टिकत नाही.

यापुढे सरकार अल्पमताच्या पक्षाचेच राहणार. एवढेच नाही तर त्याला बाहेरचा पाठिंबा, बांधील असा, मिळणार नाही. राष्ट्रपती भवनात जाऊन, आपल्याला पाठिंबा देणाऱ्या खासदारांचे प्रदर्शन मांडणे कोणाही पंतप्रधानास शक्य होणार नाही. शासनात नसलेल्या पक्षांचा पाठिंबा शासनास मिळेल; परंतु तो घाऊक किंवा ठोक पद्धतीने मिळणार नाही. प्रत्येक कार्यक्रम, प्रत्येक प्रस्ताव चर्चेचा घ्यावा लागेल आणि निदानपक्षी संसदेतील बहुमताचा पाठिंबा मिळण्याइतका विरोधी पक्षांच्या मतांचा आदर करावा लागेल. लोकशाही व्यवस्थेच्या दृष्टीने ही अत्यंत शुभ घटना म्हणावी लागेल.

लोकसभा, त्यातील पक्ष आणि खासदार गेली कित्येक वर्षे निव्वळ रबरी शिक्के बनले होते, नवीन व्यवस्थेत त्यांच्यात पुन्हा जीव आल्यासारखे होईल. लोकसभा ही पुन्हा विचार-विनिमयाचा मंच ठरू शकेल. कोणा एका पक्षाच्या किंवा पंतप्रधानांच्या अरेरावीला काही स्थान उरणार नाही.

एकपक्षीय शासनात भ्रष्टाचारालाही वाव मोठा असतो. कारण भ्रष्टाचाराची माहिती बाहेर फुटण्याची शक्यता कमी असते आणि अशी बातमी फोडण्यात कोणाला फारसे स्वारस्य नसते. एका पक्षाची पकड ढिली झाली, की भ्रष्टाचार चालवणे इतके सोपे राहत नाही.

ही सगळी शुभ लक्षणे आहेत; पण राजकारणातील पुढाऱ्यांच्या दृष्टीने यात आकर्षक काहीच नाही. राजकारण हा आतापारसा फायदेशीर धंदाराहणारनाही. शासन चावलणे अशक्य आहे असा कांगावा करून पुन्हा एकदा मध्यावधी निवडणका घडवून आणण्याचा दबाव ही मंडळी राष्ट्रपतींवर आणतील. अशा तऱ्हेच्या वारंवार निवडणुका लोकांना पसंत नाहीत हे ह्या मध्यावधी निवडणुकांतील मतदारांच्या उदासीनतेवरून स्पष्ट झाले आहे. मतदान केंद्रावर न जाता मतदाराने

वारंवार निवडणुका घेण्याविषयी आपले मत नोंदवले आहे. हाताने मतदान करण्याऐवजी बहुसंख्य मतदारांनी आपल्या पायाने मतदान केले आहे. यापुढेही जनतेने वारंवार निवडणुका न घेण्याबद्दल अधिक आग्रही बनले पाहिजे. या लोकसभेची मुदत पुरी होईपर्यंत नवीन निवडणुका होताकामा नयेत. पक्षाचे मान्यवर नेते अहंकारापोटी शासनाची जबाबदारी स्वीकारावयास तयार होत नसतील तर पक्षातील दुसऱ्या फळीच्या नेत्यांना पाचारण करण्याची मुभा राष्ट्रपतींना कोणी नाकारू शकत नाही. येती पाच वर्षे लोकसभेच्या निवडणुका नाहीत, आहेत त्या खासदारांत जे काय चालेल तेच शासन ही एकदा खूणगाठ बांधली म्हणजे लोकसभेचा संसार पाच वर्षे सुरळीत चालेल. सुरवातीपासूनच नव्या निवडणुका होतात की काय, असा चवचाल विचार मनात राहिला म्हणजे संसार धड होत नाही.

शेतकरी आणि कष्टकरी यांच्या संघटनांनी यासाठी विशेष आग्रह धरला पाहिजे. कारण लोकशाही शासनामध्ये हा जो बदल घडत आहे तो श्रमणाऱ्या आणि कष्टणाऱ्यांच्या हिताचा आहे. दुसऱ्याच्या श्रमावर जागणाऱ्यांना एकपक्षीय अनिर्बंध सत्ता अधिक सोईस्कर आणि आकर्षक वाटणारच. देशाच्या अखंडतेकरिता, सुरक्षिततेकरिता, आर्थिक समस्यांचा सामना करण्यासाठी मजबूत सरकार आवश्यक आहे असे कांगावे ही सर्व मंडळी करणार आहे. याविरुद्ध कष्टकऱ्यांच्या संघटनांनी आतापासून आवाज उठवला पाहिजे, की पुन्हा एकदा निवडणुका घेण्याचा प्रयत्न झाला तर त्याला फार मोठ्या प्रमाणावर विरोध होईल.

निवडणुकांच्या निकालाचा अर्थ काय समजायचा? या मध्यावधी निवडणुकांच्या वेळच्या सगळ्या घटनाच अशा आहेत, की निकालांचा एक सलग अर्थ लावणे कठीण आहे. निवडणुकीचा पहिला टप्पा २० मे रोजी पार पडला. दुसरा आणि तिसरा टप्पा २३ आणि २६ मे रोजी पार पडायचा होता. राजीव गांधींची हत्या झाल्यामुळे सर्व निवडणुका तीन आठवड्यांनी पुढे ढकलल्या गेल्या. निवडणुकांच्या प्रतिष्ठेला आयोगाच्या या निर्णयाने मोठा धक्का बसला. निवडणुकांची प्रक्रिया सुरू झाल्यानंतरही त्यापुढे अगदी विशेष परिस्थितीत का होईना, निवडणुकांचे वेळापत्रक बदलता येते, हे एकदा मान्य केले, की वेळापत्रकात बदल करण्यासाठी, ढवळाढवळ करण्यासाठी संधी शोधण्याचा आणि तयार करण्याचा मोह अनेक पुढाऱ्यांना होणार आहे. निवडणुका पुढे ढकलल्यामुळे नवीन तारखा अगदी पावसाळ्याच्या तोंडाशी आल्या. देशात अनेक ठिकाणी जून महिन्याच्या पहिल्याच भागात जोरदार पाऊस झाला. देशातील बहुसंख्य जनता शेतकरी आहे; त्यामुळे

पावसाळ्यात निवडणुका घेऊ नयेत असा आजपर्यंत पाळला गेलेला संकेत या निवडणुकांत दूर ठेवला गेला.

पंधरा सोळा महिन्यांच्या अवधीत निवडणुका आल्यामुळे मतदारांत आधीच उदासीनता होती. पावसाळ्यात मतदानाच्या तारखा आल्यामुळे अनेकांना मतदानास जाण्याची सवड होणे शक्य नव्हते. निवडणुकीत मतदान कमी झाले; कधी नव्हे इतके कमी झाले; पण त्यापलीकडे मतदानात शेतीवर अवलंबून असलेल्यांचा सहभाग विशेष कमी राहिला. या निवडणुकांसाठी वेगवेगळ्या पक्षांनी काढलेल्या जाहीरनाम्यांत शेतकरी आणि शेती हे दोन्ही विषय आधीच बाजूस टाकले गेले होते; मतदानातही शेती आणि शेतकरी बाजूस राहिले.

राजीव गांधींच्या हत्येच्या आधी झालेले मतदान आणि हत्येनंतर झालेले मतदान यांत मोठा फरक पडला. सहानुभूतीची लाट म्हणायची की आणखी काही दुसरे नाव वापरायचे; पण २० ते ते १२ जून या काळात इंदिरा काँग्रसेच्या उमेदवारांना १० % पर्यंत अधिक मते घेता आली, हे आकडेवारीने सिद्ध झाले आहे. आंध्र प्रदेशात २० मे रोजी झालेल्या निवडणुकीत तेलगू देशम् आघाडीवर राहिली आणि इंदिरा काँग्रसचा जवळजवळ सफाया झाला. या उलट १५ जून रोजी झालेल्या मतदानात इंदिरा काँग्रेसचे उमेदवार आघाडीवर राहिले. उत्तर प्रदेशात इंदिरा काँग्रसचा अगदी धुव्वा उडाला. भारतीय जनता पक्षाने तेथे एक तृतीयांशापेक्षा जास्त मते मिळवली. काँग्रेसला फक्त १८ % मते मिळाली; पण जून महिन्यातील मतदानात काँग्रेसला २४ % पर्यंत मिळाली. राजीव गांधींच्या हत्येचा आणि त्यामुळे निवडणुका पुढे ढकलल्या गेल्याचा फायदा काँग्रेसला मिळाला हे उघड आहे.

याच्या उलट, या परिस्थितीचा सगळ्यांत जास्त तोटा जनता दल आणि राष्ट्रीय मोर्चास झाला. राजीवजींच्या हत्येस जबाबदार कोण आणि द्र.मु.क.चा हात किती, याबद्दल बेजबाबदार विधाने करण्यात आली. राष्ट्रीय मोर्च्याच्या नेत्यांच्या घरांवर अनेक ठिकाणी हल्ले झाले. यापलीकडे जनता दल आणि राष्ट्रीय मोर्चा यांना मतदानाच्या तारखा पुढे ढकलणे फारच महाग पडले. त्यांच्याकडील पैसा आणि साधने आधीच अपुरी. प्रचाराचा कालखंड एकदम दुप्पट झाल्यावर त्यांच्या अनेक उमेदवारांना वाढलेल्या मुदतीत घरी बसून राहण्यापलीकडे गत्यंतर उरले नाही. याचा अप्रत्यक्ष फायदा भाजप आणि त्यांचे दोस्त पक्ष यांना झाला.

निवडणूक निकालामध्ये घडलेली एक आल्हाददायक गोष्ट समाजवादी जनता दलाचा सपशेल पराभव. पराभव होणार हे पहिल्यापासून स्पष्टच होते. महाराष्ट्रात

काही नेते नोटांनी भरलेल्या बॅगा घेऊन फिरले, तरी त्यांच्या एकाही उमेदवाराची अनामत रक्कम वाचण्याचीसुद्धा काही शक्यता नाही, हे पहिल्यापासूनच स्पष्ट होते. निकालात आश्चर्य वाटण्यासारखे काहीच घडले नाही. सर्व भारतात मिळून पाचाच्या वर सहावा उमेदवार निवडून येणे कठीण होते हेही स्पष्ट होते; पण निकालात आणखी एक आनंददायक भाग म्हणजे चौधरी देवीलाल यांचा रोहटक मतदारसंघात पराभव झाला. विधानसभा मतदारसंघातही एका सामान्य उमेदवाराने त्यांना धूळ चारली. शेतकरी आंदोलनाच्या दृष्टीने ही फार महत्त्वाची घटना आहे. गेली चार वर्षे देवीलालपद्धतीच्या विचारसरणीने शेतकरी आंदोलनाच्या मार्गात मोठी धोंड उभी केली होती. जातीचे राजकारण करायचे. त्याच्या आधाराने सत्ता हाती घ्यायची, आव मात्र शेतकऱ्यांच्या कैवाराचा आणायचा. प्रत्यक्षात करायचे काहीच नाही. पंचतारांकित हॉटेलात शेकऱ्यांना २०० रुपयांचे जेवण १०० रुपयांत मिळण्याची सवलत देणे... असले आचरट कार्यक्रम राबवले. असली माणसे आणि प्रवृत्ती क्षणभर तरी टिकून राहतात, हेच आश्चर्य! पण या प्रवृत्तीने गेली चार वर्षे शेतकरी आंदोलनात कठोर व्यत्यय आणला. या देवीलाल यांच्या उमाळ्यापोटीच महेंद्रसिंह टिकैत आणि इतर काही जणांनी वाढत्या ताकदीच्या शेतकरी चळवळीस मोडता घालायचा प्रयत्न केला. निवडणुकांच्या या निकालामुळे देवीलाल संपले. महेंद्रसिंह टिकैत आणि त्यांचे साथीदार खुलेआम भाजपला पाठिंबा देत आहेत. त्यांचा देव त्यांचे भले करो; पण शेतकरी आंदोलनाच्या दृष्टीने देवीलाल यांचे पानिपत, ही खरोखरच आल्हाददायक घटना आहे.

महाराष्ट्रातील इंदिरा काँग्रेस आणि शरद पवार हे तर विशेष भाग्याचे. महाराष्ट्रात मे महिन्यात मतदान झालेच नाही; सगळे मतदान जूनमध्येच. या मधल्या काळात राजीव गांधी दूर झाल्यामुळे शरद पवारांचे पक्षातील स्थान पक्के झाले, एवढेच नव्हे तर हिमालयाच्या मदतीला सह्याद्रीने जाण्याची भाषा पुन्हा चालू झाली. भारताच्या राजकारणात फारा वर्षांनी महाराष्ट्राला काही स्थान मिळेल या कल्पनेने अनेकांना बरे वाटले. त्याचाही फायदा इंदिरा काँग्रेसला निश्चित मिळाला.

निकालाची चर्चा करताना मे आणि जून महिन्यात झालेल्या मतदानाला एकाच मापाने कसे तोलता येईल? १९३५ सालच्या आसपास एका वर्षी मुंबई विद्यापीठाने घेतलेल्या बी.ए.च्या परीक्षेच्या एका विषयाच्या उत्तरपत्रिका आगीत जळून खाक झाल्या; त्याचा गवगवा नको म्हणून विद्यापीठाने सर्वच परीक्षार्थींना उत्तीर्ण करायचे ठरवले; पण ही बातमी बाहेर फुटलीच आणि त्या वर्षी बी.ए. पास झालेल्या विद्यार्थ्यांना कुचेष्टेने जळके बी.ए. म्हणतात. जून महिन्यातील

मतदानात निवडून आलेले इंदिरा काँग्रेसचे खासदार असल्याच प्रकारात मोडतात. 'जळके' बी.ए.च्या धर्तीवर त्यांना 'रडके' खासदार म्हणायला हरकत नाही.

हा फरक राजीव गांधी यांच्याविषयी किंवा त्यांच्या कुटुंबीयांविषयी वाटणाऱ्या अनुकंपेमुळे झाला की हत्येच्या आघातामुळे काँग्रेस कार्यकर्ते खडबडून जागे झाल्यामुळे झाला की लांबलेल्या मुदतीत साधने पुरवण्याची ताकद काँग्रेसमध्येच आहे म्हणून की या तिन्ही कारणांनी झाला ? आकडेवारीवरून असे दिसते, की इंदिरा काँग्रेस पक्षास मिळालेल्या मतांत स्त्रियांच्या मताचा वाटा पुरुषांच्या मतांच्या वाट्यापेक्षा जास्त आहे. यावरून अनुकंपा लाट काही प्रमाणात परिणामकारक ठरली, असा निष्कर्ष काढला तर तो वावगा ठरू नये.

हे लक्षात घेता, उरलेल्या निकालांचा अर्थ काय? इंदिरा काँग्रसने दक्षिणेत आपले स्थान मजबूत केले आहे. तामिळनाडू, केरळ, कर्नाटक या राज्यांत काँग्रेस आणि त्यांच्या मित्रपक्षांचे एकसंध नेतृत्व मानले गेले आहे. महाराष्ट्र आणि आंध्र प्रदेशातही काँग्रसचेच प्राबल्य आहे.

उत्तरेतही राजस्थान, हरियाना, हिमाचल प्रदेश आणि मध्य प्रदेश या राज्यांत काँग्रेसने लक्षणीय यश मिळविले आहे. उत्तर प्रदेश आणि गुजराथ येथे तर भाजपसमोर त्यांना हार खावी लागली आणि बिहारमध्ये जनता दलाने विजय मिळवला. पूर्व बंगालमध्ये मार्क्सवाद्यांनी आपले स्थान अढळ ठेवले. उत्तर प्रदेश, बिहार आणि गुजराथ ही तीन राज्ये सोडल्यास उत्तरेतही काँग्रेसने आपले वर्चस्व बसवले आहे; पण उत्तर प्रदेश आणि बिहार ही साधीसुधी राज्ये नाहीत. एकूण खासदारांच्या संख्येपैकी एक चतुर्थांश खासदार या दोन राज्यांतूनच निवडले जातात. मंदिराचा प्रश्न शिलगावून देताना अयोध्येची निवड का झाली, द्वारकेची का नाही, याचा उलगडा निवडणुकांच्या या अंकगणितात होतो.

भाजप आणि त्यांचे मित्र यांनी भारतीय राजकारणात प्रबळ स्थान मिळवले आहे. कदाचित् संख्येच्या दृष्टीने राष्ट्रीय मोर्चा भाजपपेक्षा वरचढ असेलही; पण राष्ट्रीय मोर्चा हा अठरा धान्यांचे कडबोळे आहे. भाजप हा एक शिस्तबद्ध पक्ष आहे. म्हणजे काँग्रेसच्या खालोखाल देशाच्या राजकारणात आता भाजपचे स्थान तयार झाले, एवढेच नव्हे तर काँग्रेसविरोधी आघाडी बाजूला सारून, भाजपविरोधी आघाडीची भाषा सुरू झाली आहे. यावरून भाजपचे स्थान किती महत्त्वाचे आहे, हे लक्षात यावे; पण भारतीय जनता पक्षास कोणकोणत्या राज्यांत यश मिळाले, हे पाहिले तर नवलच वाटते. अयोध्या उत्तर प्रदेशात आहे; पण खुद्द अयोध्या आणि अलाहाबाद येथे भाजपची डाळ शिजली नाही. त्यांचे जास्तीत

जास्त उमेदवार निवडून आले, ते पश्चिमी उत्तर प्रदेशमध्ये, म्हणजे महेंद्रसिंग टिकैत यांच्या भूमीते. त्यानंतर भाजपला यश मिळाले ते गुजराथमध्ये. महात्मा गांधींबद्दल आपुलकी, प्रेम, आदर आणि अभिमान बाळगणाऱ्या गुजरातने जातीयवादी भाजपच्या पाठीमागे उभे राहावे हे दुर्दैव तर खरेच; पण त्यात एक भीषण विनोदही आहे. पुण्याचे भाजपचे उमेदवार अण्णा जोशी निवडून आल्याचे जाहीर झाले आणि सगळीकडे तशी गुलालफेकीची मोठी मिरवणूक निघाली. त्यात अण्णा जोशींच्या जयजयकाराच्या घोषणा होत्याच; पण त्यचबरोबर मोठी ठळक घोषणा 'नथुराम गोडसे अमर रहे।' अशी होती. बापूंचा गुजराथ आणि नथुरामचे पुणे यांचा हा संगम मोठा विदारक आहे.

सुदैवाने महाराष्ट्रात भाजप-शिवसेनेच्या पसरत्या साथीला चांगला आवर बसला आहे. किंबहुना, निवडणुकीच्या निकालात त्यातल्या त्यात आनंदाची अशी एक बाब, की शिवसेनेचा माज उतरला आहे. महाराष्ट्रातील या घटनेस अनेक कारणे आहेत. जनता दल महाराष्ट्रात नगण्य असल्यामुळे विरोधी मतांची फारशी फाटाफूट झाली नाही आणि बहुतेक ठिकाणी इंदिरा काँग्रेसविरुद्ध युती असा सामना झाल्याने जातीयवादी तत्त्वांना आवर बसला; पण याहीपेक्षा एक कारण जास्त महत्त्वाचे असावे. मुंबई उच्च न्यायालयाने एकामागोमाग एक निर्णयात शिवसेना आमदार-खासदारांच्या निवडणुका रद्द ठरवल्या. एवढेच नव्हे, तर 'गर्व से कहो हम हिंदू हैं।' हे निवडणुकीतील प्रचारवाक्य अग्राह्य ठरवले. न्यायालयाच्या निर्णयांच्या आधाराने निवडणूक आयोगासमोरे शिवसेनेची मान्यताच रद्द करण्याचा प्रस्ताव सुनावणीसाठी घेण्यात आला आहे आणि या प्रकरणाची सुनावणी निवडणुकीनंतर लगेच होणार आहे. या दोन्ही घटनांमुळे युतीच्या प्रचाराची शैली बदलली. 'आम्ही' कोणाला मानीत नाही, कोर्टाचेही 'ऐकणार नाही' अशी गुर्मीची भाषा बंद पडून, अगदी बाळासाहेब ठाकरेंची भाषणेसुद्धा युक्तीयुक्तीने आणि मोजून मापून होऊ लागली. काही ठिकाणी काही मुद्द्यांवर बेताल विधाने केली गेली; पण एकूण सावधगिरीचा पवित्रा शिवसेनेस घेणे भाग पडले. त्यामुळे त्यांच्याभोवती तयार झालेले खोटे तेजोवलय गळून पडले. कुणाची भीडमुर्वत न ठेवता परखडपणे बोलणारे सेनापती काव्याकाव्यानेच हिंमत दाखवतात, हे अनेकांनी डोळ्यांनी पाहिले आणि कानांनी ऐकले. या वाघात मोहरमच्या वाघापेक्षा शौर्य नाही याची जाणीव लोकांस होऊ लागली आणि बेलगाम अफाट भाषणे करणाऱ्या साध्वी आणि संन्यासी यांच्या ताफ्यानेही फारसा फरक पडला नाही. पंचवीसतीस जागा मिळवण्याच्या वल्गना करणारे

आठ-दहा जागांवर येऊन ठेपले. लोकन्यायालयालाच मानण्याची भाषा करणाऱ्याला लोकांनी तर आपला निर्णय दिलाच; पण आता काही आठवड्यांतच न्यायालयाचा आणि निवडणूक आयोगाचा याबद्दलचा निर्णय लागेल आणि महाराष्ट्राला लागलेली ही कीड संपून जाईल अशी आशा करायला हरकत नाही.

देशपातळीवर भाजपही जास्त जबाबदारीने वागू लागेल अशी चिन्हे दिसत आहेत. अयोध्येचे राममंदिर प्रकरण कसे निकालात काढावे, यासंबंधी भाजपची नेतेमंडळी आता सौम्य भाषा वापरू लागली आहेत; सामंजस्याने किंवा न्यायालयाच्या निर्णयानुसार हा प्रश्न सोडवला पाहिजे असे म्हणू लागली आहेत. हीच भूमिका घेणाऱ्या विश्वनाथ प्रताप सिंग सरकारच्या भूमिकेविरुद्ध भाजपच्या याच नेतेमंडळींनी अकांडवतांडव केले होते. उत्तर प्रदेशचे शासन चालविण्याची जबाबदारी येऊन पडते आहे, हे पाहताच त्यांच्या अतिरेकीपणाला लगाम बसताना दिसतो. भाजप जातीय प्रश्नावर ऐतिहासिक कारणाने बदनाम आहे. ती दुष्कीर्ती दूर करणे त्यांना सहजपणे जमणार नाही; पण केन्द्रातील नवीन राजकीय परिस्थितीत भाजपचे परिवर्तन असंभव नाही. इंदिरा काँग्रेसने भाजपविरुद्ध कितीही हाकाटी केली तरी परिस्थितीत बदल घडणारच नाही असे नाही. संभाव्य पंतप्रधानांच्या यादीत माधवराव शिंदे यांचे नाव जवळजवळ अग्रक्रमाने आहे. शिंदे घराण्यातीलच दुसऱ्या दोन व्यक्ती भाजपच्या मान्यवर नेत्यांत आहेत. घरात पंतप्रधानपद येत असताना किरकोळ सैद्धांतिक वाद घालण्याची भारतीय पुढारी मंडळीत परंपरा नाही. यापूर्वीही काँग्रेसने सोईस्कर पडेल तेव्हा अगदी शिवसेनेशीही चुंबाचुंबी केली आहे; तर बदलत्या राजकीय परिस्थितीत नवीन भाजपशी सौहार्दाचे संबंध ठेवणे काही अशक्य नाही.

जनता दलाच्या आणि इतर पक्षांच्या मंडळींनीही भाजपशी अगदी जवळचे स्नेहसंबंध ठेवले आहेत. ३० ऑक्टोबरच्या खडाष्टकाचा विसर पडायला कदाचित् काही वेळ लागेल; परंतु आम्ही त्यांच्या पंक्तीला अजिबात बसणारच नाही, या घोषणांत तथ्यापेक्षा नाटकच जास्त! मग इंदिरा काँग्रेस आदी पक्ष आणि भाजप यांचे एकमेकांचे संबंध आहेत तरी कसे? इंदिरा काँग्रेसचे नवे अध्यक्ष श्री. नरसिंह राव यांनी अध्यक्षपदावर येतायेताच एक मोठी चांगली मुलाखत पत्रकारांना दिली. सर्वसाधारपणे काँगेस अध्यक्षांच्या मुलाखती इतक्या नीरस आणि रटाळ असतात, की त्या वाचवतसुद्धा नाहीत; पण रावसाहेबांची ही मुलाखत निदान वाचनीय होती, चुरचुरीत होती यात काही शंका नाही. या मुलाखतीत नव्या अध्यक्षांनी एक मुद्दा मांडला. 'काँग्रेसला पर्याय फक्त फॅसिझमच'. फॅसिझम या

शब्दास मराठी भाषेत पर्यायी शब्द नाही; पण राष्ट्राचे नाव घेणारी आणि सुस्थापितांचे रक्षण करणारी म्हणजे फॅसिझम. रावसाहेबांच्या म्हणण्याचा अर्थ असा, की काँग्रेस हरली तर देशावर भाजप- फॅसिझमचे राज्य सुरू होईल.

भाजपात काही उदारमतवादी सज्जनही आहेत; पण त्यांचीही भाषा आणि वर्तणूक पाहिली, तर काही काळातच शिवसेना, विश्व हिंदू परिषद, बजरंग दल असल्या खुलेआम झुंडशाही संघटना त्यांच्यावर ताबा मिळवतील हे स्पष्ट दिसते. लोकशाहीची उघडउघड चेष्टा करणारी मंडळी नेतेपदी आहेत. उघड उघड गुंड वापरण्याची भाषा आजही ते करतात. मुसलमान चांगला असला, तरी पारखून घेतला पाहिजे. कारण अवलाद कुणाची अशी भाषा वापरतात. अडवाणी, प्रमोद महाजन, बाळ ठाकरे ही फॅसिस्ट मंडळी आहेत यात काही शंका नाही; पण त्यांच्यावर टीका करण्याचा काँग्रेसला काय हक्क आहे? खोटा राष्ट्रवाद आणि हुकूमशाही हे फॅसिझमचेच दोन घटक. हुकूमशाहीत काँग्रेस काही कुठे कमी पडली नाही. जेव्हा जेव्हा जेथे जेथे बळाचा वापर आवश्यक किंवा सोईस्कर होता तेथे तेथे काँग्रेस शासनाने बळाचा वापर करून, जनआंदोलने मोडून काढली आहेत. आणीबाणी हे अशा हुकूमशाहीचे एक उदाहरण. इतर काही देशांतील हुकूमशाहीप्रमाणे काँग्रेसला बेबंद हुकूमशाहीचा दरारा तयार करावा लागला नाही, हे खरे; पण त्याचे श्रेय भारतातील लोकशाही परंपरेला आणि लोकांच्या समजूतदारणाला आहे. इतर काही हुकूमशहांप्रमाणे भर रस्त्यात शेकडो तरुणांना डोळे बांधून, उघडे करून, त्यांच्यावर गोळीबार करण्याचे प्रकार काँग्रेस राज्यांत फारसे घडले नसतील (तेलंगण, नक्षलवादी, पंजाब, काश्मीर, आसाम यांसारखे अपवाद सोडता.); पण विक्राळ विदेशी हुकूमशहांनाही न जमलेली गोष्ट काँग्रेसने सहज करून दाखवली. घराण्याची सत्ता तयार करणे अगदी स्टॅलिनलाही जमले नाही; पण राजीव गांधींच्या हत्येनंतर पंतप्रधानपदासाठी प्रियांकाच्या नावाची गंभीरपणे चर्चा व्हावी इतकी बेबंद घराणेशाही काँगेसने प्रत्यक्षात दाखवली. या बाबतीत काँग्रेस आणि भाजप यांत डावे-उजवे करण्यासारखे काही नाही. भाजपने हिंदुराष्ट्राची घोषणा देऊन, सर्वसामान्य जनतेचा आवाज बंद करण्याचा प्रयत्न केला. काँग्रेसनेही आजपर्यंत हेच केले. नाव राष्ट्राचे, राष्ट्रभक्तीचे, राष्ट्राला एकविसाव्या शतकात नेण्याचे, विज्ञान तंत्रज्ञानाचे युग आणण्याचे; पण या खोट्या घोषणांच्या आवरणाखाली काँग्रेसने वास्तवात फक्त 'इंडिया'चे हितसंबंध जपण्याचेच काम केले आहे. काँग्रेस आणि भाजप दोन्हीही फॅसिस्टच. 'इंडिया'- अर्थशास्त्राचा पराभव होतो आहे असे पाहिल्यानंतर अधिक मागसलेली; पण परंपरेच्या कारणाने

लोकांच्या मनास अधिक भिडणारी धर्मराष्ट्र संकल्पना भाजपने पुढे केली व त्यासाठी काँग्रेसपेक्षाही जास्त झुंडगिरी वापरण्याची तयारी केली. भाजप आणि काँग्रेस हे दोघे फॅसिस्टच. काँग्रेसला जे जमले नाही, ते वेगळ्या मार्गाने पुरे करण्यासाठी भाजप पुढे येत आहे.

निवडणुकांचे निकाल लागतानाची परिस्थिती ही अशी आहे. सर्व पक्ष 'इंडिया'वादी. सर्व पक्ष, आवश्यक तर सर्व ताकद वापरून, सध्याची शोषणव्यवस्था चालू ठेवण्यात स्वारस्य आसलेली हीमंडळी आता जवळजवळ सारख्याच ताकदीची झाली आहे. फारसा लोकक्षोभ होऊ देणे त्यांना कोणालाच परवडण्यासारखे नाही. इंडिया आणि हिंदू राष्ट्र या दोन्ही बेगडी राष्ट्रवादांना बाजूला करून, जोतीबा फुल्यांच्या एकमय लोक या अर्थाने भारताची स्थापना करण्याचे स्वप्न पाहणाऱ्यांना ही सुवर्णसंधी आहे, संधी हातात घेण्याची हिंमत त्यांनी दाखवली तर!

(२१ जून १९९१)

◆◆

पाटी पुसली, आता पुढे

३० डिसेंबर १९९३ रोजी महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष श्री. मधुकरराव चौधरी यांनी एक पत्र सभागृहात वाचून दाखवले. पत्रावर सर्वश्री मोरेश्वर टेमुर्डे, वसंतराव बोंडे, वामनराव चटप, शिवराज तोंडचिरकर व सौ. सरोज काशीकर या पाच आमदारांच्या सह्या होत्या. १९९० च्या निवडणुकीत शेतकरी संघटनेचे हे पाच पाईक जनता दलाच्या चिन्हावर निवडून आले होते. तेव्हापासून आतापर्यंत जनता दलाची शिस्त त्यांनी कसोशीने पाळली होती. अध्यक्षांना उद्देशून लिहिलेल्या पत्रामध्ये या पाच आमदारांनी जनता दल विधानसभा पक्षापासून फारकत घेऊन सभागृहात स्वतंत्र गट म्हणून बसण्याचा आपला निर्णय जाहीर केला.

सभागृहात जनता दलाचे एकूण सदस्य चौदा, त्यांपैकी पाच जणांनी म्हणजे एक तृतीयांशापेक्षा जास्त सदस्यांनी वेगळे होण्याचा निर्णय घेतला असल्यामुळे कायदेशीर अडचण काहीच नव्हती. अध्यक्षांनी शेतकरी संघटनेच्या आमदारांची ही विनंती मान्य केल्याचे लगेच जाहीर केले. शेतकरी आंदोलनाच्या इतिहासातील राजकीय आघाडीच्या एका कालखंडावर पडदा पडला.

महाराष्ट्रातील शेतकरी आंदोलन आता सर्व प्रस्थापित राजकीय पक्षांपासून दूर झाले आहे. काँग्रेस, भा. ज. प., शिवसेना आणि इतर चिल्लर पक्ष यांच्याशी संघटनेची जवळीक कधीच नव्हती. दगडापेक्षा वीट मऊ या न्यायाने १९९० मध्ये ज्या ज्या मतदारसंघात शिवसेना-भा. ज. प. विरुद्ध काँग्रेस असा सरळ सरळ सामना होता, त्या ठिकाणी काँग्रेस उमेदवाराला सिद्धांततः पाठिंबा संघटनेने जाहीर केला होता, एवढे सोडल्यास काँग्रेसबद्दल संघटनेने सहानुभूती अशी कधी दाखवलीच नव्हती. जातीयवादी पक्षांना सभ्य समाजात काही स्थानच असता कामा नये अशी संघटनेची भूमिका सतत राहिल्यामुळे शिवसेना आणि भा. ज. प. यांच्याशी जवळीक साधण्याचा प्रश्नच कधी उद्‌भवला नाही.

१९८७ सालापासून शेतकरी संघटना विश्वनाथ प्रतापसिंग यांचा विकल्प उभा करण्याच्या कामास हातभार लावू लागली. ८९ सालच्या लोकसभा निवडणुकीत संघटनेने जनता दलाच्या उमेदवारांना पाठिंबा दिला. ९० सालच्या विधानसभेच्या निवडणुकीच्या वेळी निवडणुक लढविण्यासाठी अनेक मतदारसंघात जनता दलाकडे उमेदवारदेखील नव्हते, अशा परिस्थितीत संघटनेने आपले कही कार्यकर्ते जनता दलास उपलब्ध करून दिले. राजीव गांधींच्या काँग्रेस शासनाला सज्जड पर्याय तयार करणे आणि त्यातून कर्जमुक्ती आंदोलन पुढे रेटणे अशी संघटनेची थोडक्यात रणनीती होती.

जनता दलाच्या युतीचा अनुभव पहिल्यापासून मोठा कष्टदायी राहिला. निवडणुका तोंडावर आल्या असतांना आणि खुद्द निवडणुकांच्या रणधुमाळीत पुरोगामी लोकशाही आघाडीतील राजकीय पक्षांच्या नेत्यांनी, एवढेच नव्हे तर परवा परवा काँग्रेसमधून फुटून आलेल्या किरकोळ कार्यकर्त्यांनी संघटनेचा दु:स्वास केला. तो सहन करूनही संघटनेने जनता दलाबरोबरचे संबंध कायम राखले, राजीव गांधींना ८९ मध्ये विश्वनाथ प्रतापसिंगांखेरीज जास्त प्रभावशाली पर्याय कोणी नाही या एकाच कारणाखातर.

शेतकरी संघटना आणि जनता दल यांचे वैचारिक एकमत कधी झालेच नाही. संघटना सर्व प्रश्न साकल्याने अभ्यासून विचाराचे एकसुती महावस्त्र घेऊन निघालेली. या उलट जनात दल म्हणजे अनेक विचारांचा आणि मतामतांचा निव्वळ गजबजाट. भिन्न भिन्न मते पुरोगामी लोकशाही आघाडीत असावीत हे साहजिकच होते. शेवटी ती एक आघाडी होती. पण, जनता दलाच्या नेत्यांत तर्कशुद्ध, वास्तवाचे भान राखणारा विचार ठेवणारा कोणीच नव्हता. प्रत्येकाची काही आवडती वाक्ये, काही लाडके छंद, त्यात पुष्कळसा राजकीय, आर्थिक लाभाचा विचार. जनता दलाच्या, चिंध्या कशाबशा शिवून तयार केलेल्या गोधडीचे संघटनेच्या महावस्त्राशी जमले असते तरच मोठे आश्यर्च.

कर्जमुक्तीच्या आंदोलनामुळे संघटनेचे हात अडकलेले होते. कर्जमुक्तीची शेतकरी संघटनेची संकल्पना दूर करून पंतप्रधान विश्वनाथ प्रतापसिंग यांच्या शासनाने देवीलाल-पुरस्कृत सरसकट कर्जमाफीची महागडी आणि तत्त्वहीन योजना स्वीकारली. या निर्णयासाठी जनता दलाच्या धुरीणांचा शेतकरी संघटनेविषयीचा विद्वेष कारण होता. अर्थमंत्री मधु दंडवते यांचे पुतळे जाळण्याचा कार्यक्रम संघटनेने हाती घ्यावा लागला त्याच दिवशी जनता दल आणि संघटना यांच्यातील फारकतीला सुरुवात झाली.

जनता दलाचे मी मी म्हणवणारे नेते अधिकाराच्या खुर्चीसाठी पक्ष सोडून गेले. संघटनेचे आमदार कोणत्याही मोहाला बळी न पडता, जनता दलातच राहिले; हरेक प्रश्नावर जनता दलाशी मतभिन्नता असून, त्यांनी आपली भूमिका बदलली नाही.

'सामाजिक न्याय' अशा गोंडस घोषणेखाली जनता दलाने सरकारी नोकरीतील राखीव जागांचा प्रश्न उभा केला. संघटनेने राखीव जागांचा प्रश्न गरिबी हटविण्याशी अप्रस्तुत असा मानला आहे. सर्वांना पुरतील इतके रोजगार उपलब्ध होणे शक्य नाही; त्यामुळे राखीव जागांनी मूठभर दलितांचेसुद्धा भले होणार नाही; मागासवर्गीय परंपरेने बलुतेदार आणि हुन्नरी आहेत, त्यांचा प्रश्न नोकऱ्या देऊन सुटणार नाही; स्वयंरोजगारी उद्योजकांना पोषक अशी अर्थव्यवस्था दलितांचे भले करू शकेल; सरकारी नियोजनाच्या व्यवस्थेत ब्राह्मण, इतर सवर्ण आणि 'ब्राह्मणी' दलित यांचेच काय ते भले होऊ शकेल, सर्वसामान्य दलितांचे नाही; सरकारी नोकऱ्यांतील सवर्णांची मक्तेदारी तोडण्यासाठी, सरकारी नोकरशाहीचा वरचष्मा संपवण्यासाठी राखीव जागांचा उपयोग होईल; पण त्यामुळे दलितांचा प्रश्न सुटेल ही कल्पना खोटी, अशी संघटनेची राखीव जागांविषयीची भूमिका आहे. संघटना मंडलवादी नव्हती, मंडलविरोधी नव्हती, मंडलविरोधकांना विरोध करणारी होती.

जनता दलातून चौधरी देवीलाल फुटून गेले आणि भा. ज. प. च्या राम मंदिराचा कार्यक्रम गाजू लागला, त्याला प्रत्युत्तर म्हणून विश्वनाथ प्रताप सिंग यांनी मंडल आयोगाची युगत काढली. त्यामागे अभ्यास नाही, निष्ठा नाही, दलितांविषयीची कळकळही नाही. या प्रश्नापासूनच जनता दलातील विचारांचा गोंधळ वाढत गेला. आर्थिक प्रश्नांऐवजी 'सामाजिक न्याया'चे राजकारण जनता दलाच्या अग्रणींना अधिक भावू लागले.

राष्ट्रीय कृषी नीतीचा मसुदा कृषी सल्लागार समितीने जनता दलाच्या शासनास सादर केला. खुल्या अर्थव्यवस्थेतील खुल्या शेतीचे धोरण त्यात विस्तृतपणे मांडण्यात आले होते. खुल्या बाजारपेठेवर आधारित अर्थकारणाचा हा आराखडा जनता दलाच्या शासनास मानवला नाही. त्यांनी तो बाजूस टाकला. मंडल प्रश्नावर जनता दलाने जी हिंमत दाखवली, ती शेतकऱ्यांच्या प्रश्नावर दाखविली असती, तर आजपावेतो शासन जनता दलाचेच असते, जुन्या-पुराण्या नेहरू – नियोजन-व्यवस्थेला मूठमाती देण्याचे श्रेय दलाला मिळाले असते आणि त्याची आर्थिक क्षेत्रातील ऐतिहासिक कामगिरी उज्ज्वल ठरली असती. जनता दलाने ही ऐतिहासिक संधी गमावली. अशी संधी गमावणाऱ्या राजकारण्यांना इतिहास

कधी क्षमा करत नाही.

जनता दल सत्तेवर असतानाच देशावरील परकीय चलनाच्या चणचणीचे अरिष्ट येऊ घातले होते. संकटाचे ढग समाजवादी जनता दलाच्या काळात अधिक गडद झाले. पी. व्ही. नरसिंह राव यांचे काँग्रेस शासन शपथ ग्रहण करेपर्यंत परिस्थिती इतकी बिकट झाली होती, की नेहरूपद्धतीची व्यवस्था सोडून खुल्या अर्थव्यवस्थेकडे वाटचाल करण्यापलीकडे कोणत्याही शासनाला गत्यंतरच राहिले नव्हते.

समाजवादी साम्राज्याचा पाडाव, नेहरू-व्यवस्थेचा नि:पात आणि आंतरराष्ट्रीय व्यापार खुला करणारा डंकेल प्रस्ताव या सर्व घटना शेतकरी संघटनेच्या दृष्टीने आनंदाच्या आणि भाग्याच्या; 'बळिराज्य येतसे आता, आनंदवन भुवनी' अशी घोषणा करून, चतुरंग-शेतीअस्त्रांनी शेतकऱ्यांना सन्मानाने आणि सुखाने जगण्याचा अधिकार हाती घेण्याची संधी. 'सरकार समस्या सोडवत नाही, सरकार हीच समस्या आहे,' ही संघटनेची सनातन भूमिका.

या आर्थिक प्रश्नांवर जनता दलाची मते संघटनेच्या बरोबर विरुद्ध टोकाची. नोकरदार, पुढारी आणि लायसन्स-परमिट राज्याचे लाभधारक यांनी नव्या धोरणाला विरोध करण्यासाठी मोर्चे बांधले. त्याला डाव्यांपासून उजव्यांपर्यंत सर्व पक्षांनी पाठिंबा दिला. आर्थिक सुधारणा आणि डंकेल प्रस्ताव या प्रश्नांवरील सार्वजनिक चर्चेत हे स्पष्ट झाले, की शेतकरी संघटनेच्या विचाराचे सर्वांत अग्रणी विरोधक जनता दलातच आहेत. एक मुद्दा असा राहिला नाही, की ज्यावर जनता दल आणि शेतकरी संघटना यांत काही समान सूत्र सापडावे.

चार राज्यांतील पोटनिवडणुका झाल्या, जातीयवाद्यांची पीछेहाट झाली, धार्मिक कठमुल्लांना तोंड देण्यासाठी बिगर काँग्रेसी पर्याय म्हणूनदेखील जनता दलाचे महत्त्व राहिले नाही.

ऑक्टोबर ९३ मध्ये भरलेल्या औरंगाबाद अधिवेशनात खुल्या अर्थव्यवस्थेसाठी प्रखर संघर्ष करण्याचा निर्णय संघटनेने घेतला. १९८० सालाप्रमाणे एका बाजूला शेतकरी संघटना आणि दुसऱ्या बाजूला सर्व 'इंडिया'वाले असे चित्र उभे राहिले. औरंगाबादच्या अधिवेशनात शेतकरी आंदोलनाची नवी मोर्चेबंदी ठरविण्यात आली. राजकीय रणनीती ठरविण्याकरिता एका समितीची नेमणूक करण्यात आली. संघटनेचे अध्यक्ष श्री. पाशा पटेल, महिला आघाडीच्या अध्यक्षा सौ. सरोज काशीकर आणि विधानसभेचे उपाध्यक्ष, कापूस आंदोलनाचे सेनापती आमदार श्री. मोरेश्वर टेमुर्डे हे या समितीचे सदस्य आहेत. ३० डिसेंबर १९९३

रोजी जनता दलापासून वेगळे होण्याचा निर्णय हा राजकीय समितीचा पहिला निर्णय आहे. या निर्णयाबद्दल समितीचे अभिनंदन केले पाहिजे.

शेतकरी संघटनेवर कोणत्याही राजकीय पक्षाची नाममात्रही सावली नाही. शेतकरी संघटना ही खुल्या अर्थव्यवस्थेकरिता झगडणारी, एकाकी खरी; पण सामर्थ्यशाली संघटना आहे. या निर्णयाने संघटनेच्या राजकीय धोरणाच्या पाटीवरील मागची सगळी गिचमीड पुसून टाकली गेली आहे आणि आता नव्याने सुरवात करायची आहे.

जवळजवळ सगळेच पक्ष खुल्या व्यवस्थेचा विरोध करणारे, सारेच 'इंडिया'वादी.

संघटनेच्या भविष्यातील राजकीय धोरणाची उद्दिष्टे वेगवेगळी असू शकतात. काही नाही तरी निदान, कोणताही एक पक्ष बलदंड बहुमताने सत्तेवर येणार नाही अशी काळजी घेणे शेतकऱ्यांच्या हिताचे आहे. शेतकरी कार्यकर्ते आता राजकीय पक्षांना उबगले आहेत. कोणाही पक्षाकरिता धावाधाव करण्याची त्यांची इच्छा नाही, हे औरंगाबाद अधिवेशनात अनेक वक्त्यांनी स्पष्ट केले आहे. खुल्या अर्थव्यवस्थेचा पुरस्कार करणारे काही समविचारी लोक आणि संघटना एकत्र आणण्याचा प्रयत्न झाला. त्यातून निष्पन्न एवढेच झाले, की देशातील कारखानदार आणि व्यापारी मंडळी खुली अर्थव्यवस्था यावी अशा बुद्धीची नाही; सरकारी संरक्षणाखाली बंदिस्त बाजारपेठेवर हात मारायला मिळत राहावा, ही त्यांची इच्छा आहे. खुल्या अर्थव्यवस्थेच्या लढाईला शेतकऱ्यांना एकाकी पुढे जावे लागेल. त्यांत काही सज्जन विचारवंतांचा त्यांना काय पाठिंबा मिळेल तेवढाच.

एवढ्या ताकदीवर पाच-पन्नास जागा लढवून, काही साध्य होईल असे दिसत नाही. मतदार मतं देतांना एखादा पक्ष सत्तेवर येण्याची कितपत शक्यता आहे याचा अंदाज घेतो. सत्तेवर येण्याची लवमात्र शक्यता नसलेल्या पक्षाला त्याचे कार्यकर्तेसुद्धा मत टाकत नाहीत. निवडणुकीच्या आखाड्यात उतरायचे असेल, तर पूर्ण तयारीने निकाली सामन्यासाठी उतरावे लागेल. १९८२ सालापासूनचे, सटाणा अधिवेशनात शिक्कामोर्तब झालेले शेतकरी संघटनेचे राजकीय धोरण दुरुस्त करून, आवश्यक तर संपूर्णपणे बदलून नवीन पर्यायी धोरणाचा विचार करावा लागेल. खुल्या अर्थव्यवस्थेचा पुरस्कार करणारा असा राजकीय मंच शोधावा लागेल, तयार करावा लागेल. जातीयवाद, धर्मवाद, भ्रष्टाचार, गुंडशाही, नोकरशाही यांच्याबद्दल जनतेत प्रचंड असंतोष आहे. या महाराक्षसांपासून सुटका करून घ्यायची असेल, तर शासनाच्या सर्वंकष मगरमिठीतून सुटून खुल्या

सामाजिक-आर्थिक-राजकीय व्यवस्थेची प्रतिष्ठापना करणे आवश्यक आहे, हे गावोगावी, शहराशहरांत घरोघरी जाऊन, लोकांपुढे मांडावे लागेल आणि निदान महाराष्ट्रातील तरी प्रत्येक जागा लढविण्याची सर्व तयारी करावी लागेल.

औरंगाबादचा 'करा किंवा मरा' ठराव प्राणपणाने अमलात आणत असताना ही राजकीय आखणी करावी लागेल. राजकीय समितीसमोर निर्णयाकरिता उभा असलेला प्रश्न मोठा जटिल आहे. त्यांचा निर्णय शेतकरी आंदोलनासाठीच नाही, तर माणसाच्या स्वतंत्र होण्याच्या इतिहासातील महत्त्वाचा टप्पा ठरेल.

(६ जानेवारी १९९४)

◆◆

मागणं लई नाही

मार्च १९९५ मध्ये महाराष्ट्र राज्याच्या विद्यमान विधानसभेची मुदत संपते. ९५ च्या सुरुवातीला कधीतरी राज्यातील निवडणुका होतील. मतदारांना ओळखपत्रे देण्याचा आग्रह मुख्य निवडणूक आयुक्तांनी धरला आहे. या किंवा अशा दुसऱ्या तांत्रिक अडचणी आल्या नाहीत, तर निवडणुका येत्या वर्षभरात पार पडतील.

निवडणुकीचे वारे खेळू लागले आहेत. उत्तर प्रदेशात आपण का जिंकलो, हे न समजल्यामुळे आता सगळ्या देशात कोणत्याही राज्यात बहुजन समाज पक्षाचा मुख्यमंत्री आपण आणू शकतो अशा थाटात कांशीराम मुंबईला आले. पहिल्यांदा आले, ते जाहिरात फडकावून गेले, १६ जानेवारी रोजी तीन लाखांची सभा करतो म्हणून शड्डू ठोकून गेले, प्रत्यक्षात सभेला तेरा हजार लोक हजर असल्याची पोलिसी नोंद आहे. मंचावर कांशीराम आले, एवढेच नव्हे तर विनानिमंत्रणाचे विश्वनाथ प्रताप सिंगही आले. मंचावर बसून, समोरच्या समुदायाने दिलेल्या 'देश का नेता कैसा हो। कांशीराम जैसा हो।' अशा घोषणा त्यांना ऐकाव्या लागल्या.

पुरोगामी लोकशाही आघाडी संपल्यात जमा आहे. त्यांना निवडणुकीची तयारी करणे आवश्यक नाही. याउलट, शरद पवार दोन वेगवेगळ्या निवडणुकांची तयारी करीत आहेत. आपण महाराष्ट्रात आलो, बाँबस्फोटांचा तपास केला, जातीय दंगली शमवल्या, भूकंपग्रस्तांच्या पुनर्वसनाकरिता काहीतरी अफलातून कामगिरी करून दाखविली, नामांतर घडवून आणले, केंद्र शासनाकडून विकास मंडळाची घोषणा आज-उद्या होईलच, पुण्यातील राष्ट्रीय खेळांच्या झगमगाटात मिरवत बेळगावच्या प्रश्नालाही हात घालतो म्हटले, की पुढची निवडणूक महाराष्ट्रात काँग्रेस, पूर्वी कधी नव्हे इतक्या मताधिक्याने जिंकेल आणि आपण वाजतगाजत दिल्लीला जाऊ अशी शरद पवारांची एक योजना आहे. मध्यंतरीच्या काळात

काँग्रेसमध्येच राहणे अशक्य झाले तर महाराष्ट्राचे 'मुलामयसिंग' आपणच बनू, दलित आणि मागासवर्गीयांचा भरघोस पाठिंबा नामांतराच्या पुण्याईवर मिळाला तर इतर समाजातील काही मते गमावली, तरी बिगर काँग्रेस मुख्यमंत्री म्हणून महाराष्ट्रात बस्तान बसविण्याचीही तयारी चालू आहे. मुलायमसिंग आणि कांशीराम जोडीची व्यूहरचना करणारे चंद्रशेखर बारामतीला येऊन गेले आणि दोनतीन दिवस महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांसोबत ते राहिले याचे इंगित हे आहे.

काँग्रेसमध्ये राहिलो तर पंतप्रधान, न राहिलो तर, गेलाबाजार महाराष्ट्राचा मुख्यमंत्री अशा डावपेचाकरिता शरद पवार नामांतराचा जुगार खेळले. तो त्यांच्या अंगावर उलटण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. मुंबईत जातीय दंगली झाल्या तेव्हा संरक्षणमंत्री असलेले शरद पवार मुंबईत तळ ठोकून बसले आणि पोलिसांच्या कामात ढवळाढवळ करू लागले. आज मराठवाडा पेटला आहे, पण तेच शरद पवार स्वत: मुख्यमंत्री असताना राष्ट्रीय खेळांच्या आसपास घिरट्या घालत आहेत, मराठवाड्यात फिरकले नाहीत. याचा फायदा शिवसेनेला मिळणार आहे. मध्यावधी निवडणुकीनंतर जवळजवळ संपत आलली ही सेना आणि तिचे वाघ पुन्हा एकदा डरकाळ्यासदृश आवाज काढीत फिरू लागले आहेत.

इस्लामपूरहून, महाराष्ट्रात मध्यावधी निवडणुका घेण्याची आणि या निवडणुका नातांतराच्या प्रश्नावर लढविण्याची तयारी मुख्यमंत्र्यांनी दाखविली. निवडणुकीच्या राजकारणापोटी साऱ्या राज्यभर जातीय दंगलींचा वणवा शिलगावण्याचा धोका हे सत्तातुर सर्व विधिनिषेध आणि संकोच सोडून करू लागले आहेत.

महाराष्ट्रातील पुढची निवडणूक नामांतराच्या प्रश्नावर व्हावी ही कल्पना कोणा जबाबदार माणसाच्या तोंडून बाहेर पडावी, हे चित्रच मोठे भयानक आहे. सगळ्या राष्ट्रात आणि महाराष्ट्रात इतक्या जटिल समस्या आणि बिकट प्रश्न आहेत, त्या सर्वांना बाजूस सारून नामांतराच्या प्रश्नावर निवडणुका घेणे म्हणजे निव्वळ जातीच्या मतांचे राजकारण करणे आहे. सर्वसामान्य लोकांच्या नजरेत नामांतर, विकास महामंडळे, सीमावाद हे सगळे किरकोळ प्रश्न आहेत. लोकांना दररोज जाळणाऱ्या चिंता वेगळ्या आहेत. लोकशाही आणि निवडणुका या कल्पनांना काही अर्थ उरला असेल, तर निवडणुकांच्या निमित्ताने विचारमंथन या महत्त्वाच्या समस्यांवर व्हायला पाहिजे.

लोकांच्या महत्त्वाच्या आशाआकांक्षा काय आहेत ? फार साध्या आणि सोप्या आहेत.

सगळ्यांत पहिल्यांदा, लोकांना एक सरकार हवे आहे; शहरात, गावात, वस्तीत, गल्लीत कायद्याचे राज्य आणि शांतता राखू शकणारे सरकार पाहिजे आहे. घरातली कर्ती माणसे, शाळा-कॉलेजात जाणाऱ्या मुली घरी परतून यायला जरा उशीर झाला, तर आता ती जिवंत दृष्टीला पडत नाहीत अशा भीतीने घरात पाहोचलेली माणसे चिंताग्रस्त होऊन जातात. सगळीकडे दादांचे, गुंडांचे, त्यांच्या हस्तकांचे साम्राज्य पसरले आहे. त्यांची पोच पोलिस स्टेशनपर्यंत नव्हे, तर मंत्रालयापर्यंत आहे. दादांनी पुरविलेल्या पैशांवर पुढारी मंत्री होतात आणि पुढाऱ्यांना पैसे पोहोचवून तरुण उमेदवार पोलिस खात्यात प्रवेश मिळवितात आणि जन्मभर वरपर्यंत हप्ते पोहोचवत राहतात आणि खालून हप्ते उकलत राहतात. सर्वसामान्य लोकांना विश्वास वाटेल असे पोलिस खाते हवे आहे. पोलिस स्टेशनात दादाचा रुबाब आणि सज्जन नागरिकांना दमदाटी हे चित्र बदलायला हवे आहे.

जीवित सुरक्षित झाले तर लोकांना प्रामाणिकपणे कष्ट करून कमावण्याची आणि आपल्या चिल्ल्यापिल्यांना चोचीत चारा घालण्याची इच्छा आहे. त्यांची मागणी रोजगाराची नाही किंवा सरकारी नोकरीचीही नाही. ते नोकऱ्यांकरिता धावपळ करताना दिसतात, कारण आजच्या व्यवस्थेत घाम गाळून, कष्ट करून हिमतीवर कोणताही व्यवसाय यशस्वी होत नाही असा त्यांचा अनुभव आहे. मिळकत भरपूर आणि काम काही नाही असे फक्त सरकारी नोकरीतच घडते म्हणून नाइलाजापोटी नीच कर्माच्या नोकरीत शिरण्याची धडपड चालू असते. विखारी गरिबीच्या स्थितीत घरातील तरुण मुलींनी देहविक्रय करायला तयार व्हावे, त्याप्रमाणे तरुण मुले निराशेपोटी सरकारी नोकरदार बनून, आरामात जगण्याची स्वप्ने पाहतात. कायदा, सुव्यवस्था राखण्याकरिता सरकार हवे, बलिष्ठ सरकार हवे. याउलट, आर्थिक क्षेत्रात सरकार अजिबात नको, तेथून त्याची हकालपट्टी झाली पाहिजे अशी लोकांची तळमळ आहे. लायसन्स-परमिटचा जाच नसावा. अशाळभूत इन्स्पेक्टरांचा काच नसावा. नोकरशहांची भरती करण्याकरिता करांचा बोजा नसावा. सरकार किमान कर लावणारे टाकटुकीने कारभार सांभाळणारे काटकसरी असावे. बहुतेक सरकारी खाती आणि त्यांवरील खर्च अनावश्यक आहेत, ती खाती बंद करावीत. त्या खात्यांत पंख्याखाली आरामात गप्पाटप्पा करणाऱ्या आणि स्वेटर बिणणाऱ्या सरकारी कर्मचाऱ्यांना धरणे, कालवे, पिण्याचे पाणी, रस्ते, लोहमार्ग असल्या कामांवर पाठवून त्यांच्याकडून उपयुक्त काम करून घ्यावे. सरकारी करांची पद्धत साधी सोपी असावी. करवसुली अधिकाऱ्यांना लोकांना जाच करण्याची शक्यता नसावी.

सरकारचे काम शासन असावे, पणन नाही.

लोकांची आणखी एक छोटीशी इच्छा आहे. राजकारण्यांनी सगळ्या समाजाला नासवून टाकले आहे. जेथे जावे तेथे पुढाऱ्यांचाच जोम. गल्लीपासून ते महारस्त्यांपर्यंत, बंदरापासून विमानतळापर्यंत, केशकर्तनालयापासून विद्यापीठांपर्यंत, खेळांच्या सामन्यांपासून क्रीडांगणापर्यंत जिकडेतिकडे पुढाऱ्यांचीच नावे. मुलांना शाळेत घालावे म्हटले तर शाळाही पुढाऱ्यांच्या हाती, कॉलेजेही पुढाऱ्यांच्या हाती. वर्तमानपत्रांवर दबाव पुढाऱ्यांचा आणि न्यायाधीशही सत्ताधाऱ्यांपुढे लाचार. जिवाची शाश्वती मिळाली, सन्मानाने पोट भरण्याची व्यवस्था झाली, तर मोकाट सुटलेल्या पुढाऱ्यांना कोंडवाड्यात घालून विद्वान, कलाकार, साहित्यिक, शास्त्रज्ञ, खेळाडू, तत्त्वज्ञानी आपापल्या क्षेत्रामध्ये पुढाऱ्यांना सलाम न घालता आनंदात रममाण होऊ शकतील असे जग झाले म्हणजे या पलीकडे सामान्यांना काही नको.

जनसामान्यांना प्रामाणिकपणे जगणे अशक्य करायचे आणि केवळ जगू देण्याकरिता त्यांना आपल्यासमोर वाकवायचे. झोपडपट्टीतले गुंडदादा जे करतात, तेच राज्याचे मुख्यमंत्री करतात आणि तेच पंतप्रधानही करतात. अशा परिस्थितीत स्वातंत्र्याची पन्नास वर्षे उलटून गेली. कल्याणकारी समाजवादी नेहरूवादी वल्गनांचे पितळ उघडे पडले. या पुढच्या निवडणुका तरी स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदा लोकांना स्वारस्य असलेल्या प्रश्नांवरच्या निवडणुका होतील अशी आशा वाटत होती, तीही विफल होते की काय अशी चिंता वाटत आहे. प्रदेशाच्या, जातीच्या प्रश्नांवर लोकांना भडकावून देऊन, सत्ता टिकवू पाहणारे बाळासाहेब ठाकरे यांच्याखेरीज तिसरा कोणी पर्याय लोकांच्या समोर येण्याची लक्षणे आजतरी दिसत नाहीत.

(२१ जानेवारी १९९४)

◆◆

मध्यममार्गी पंतप्रधान

दोन अधिक दोन

दिल्लीत सगळ्यांच्या तोंडी असलेला एक किस्सा चालू :

पंतप्रधान पी. व्ही. नरसिंह राव यांना त्यांच्या नातीने (का पणतीने) विचारले, "आजोबा, दोन अधिक दोन किती?" रावसाहेबांनी उत्तर दिले, "बाळ, हा प्रश्न मोठा महत्त्वाचा आणि गुंतागुंतीचा आहे. घाईघाईने त्याचे उत्तर देणे चुकीचे होईल. या प्रश्नाचा सर्वांगाने आणि साकल्याने विचार करावा लागेल. निर्णय घेताना विरोधी पक्षांनासुद्धा आपल्या बरोबर घेऊन चालले पाहिजे. त्यासाठी त्यांच्याशीही सल्लामसलत करून, याचे उत्तर द्यावे लागेल. उत्तर शेवटी सर्वमान्य असले पाहिजे. वेगवेगळी मते लक्षात घेऊन, मधला मार्ग स्वीकारणे श्रेयस्कर होईल."

पंतप्रधानांच्या नातीने (किंवा पणतीने) काय उत्तर दिले असेल कुणास ठाऊक! ती बिचारी निमूटपणे घरातील दुसऱ्या कोण्या कमी विद्वान माणसाकडे गृहपाठातील अडचण सोडवून घेण्यास गेली असेल. देशातील जनता तसे करू शकली असती, तर किती बरे झाले असते! दुर्दैवाने जनता तसे करू शकत नाही आणि आजोबांचे उत्तर शिक्षकांना देऊ शकत नाही.

गोलमाल भाषा की नवे धोरण?

दावोस येथील आपल्या भाषणात नव्या अर्थव्यवस्थेविषयी बोलताना पंतप्रधानांनी असाच गोलमाल सूर लावला आहे. समोर बसलेल्या जगातील हजारएक मोठ्या कंपन्यांच्या प्रमुखांना उद्देशून राव साहेब म्हणाले, "नियोजनाची अर्थव्यवस्था आम्ही टाकून दिली म्हणजे काही बाजाराची व्यवस्था पूर्णत: स्वीकारली असे नाही. जो बदल घडतो आहे त्याची नोंद आम्ही हिंदुस्थानात घेतली आहे, पण आम्ही संतुलन राखणार आहोत. याला आम्ही मध्यममार्ग म्हणतो."

प्रधानमंत्री पुढे म्हणाले, "सरकार जनतेतील मोठ्या वर्गांना संकटाच्या खाईत फेकू शकत नाही. आर्थिक सुधारांच्या योजनांत अशा गरीब माणसांचीदेखील तरतूद करणे आवश्यक आहे."

पंतप्रधानांचे हे भाषण म्हणजे त्यांच्या गोलगोल भाषणपद्धतीचा नमुना आहे की देशाच्या अर्थव्यवस्थेसंबंधीच्या सरकारी धोरणातील महत्त्वाच्या बदलाची नांदी आहे ? सांगणे कठीण आहे.

काही बहादर....

नियोजन व्यवस्थेच्या बंधनातून मुक्त झालेले देश काही काळापूर्वी खुल्या व्यवस्थेकडे वाटचाल करू लागले. सिंगापूर, तैवान, दक्षिण कोरिया, हाँगकाँग यांसारखी छोटी राष्ट्रे खुल्या अर्थव्यवस्थेच्या शर्यतीत आधीच पुढे होती. त्यांची प्रगती आजही झपाट्याने चालू आहे. सिंगापूरसारखे छोटे राष्ट्र भारताच्या तिप्पट निर्यात करते, केवळ आर्थिक भरभराटच नव्हे, तर सामाजिक शिस्त आणि स्वच्छता यांचे आदर्श घालून देते. सिंगापूरच्या पंतप्रधानांच्या अलीकडील भेटीत खुल्या अर्थव्यवस्थेसंबधीचा त्यांचा उत्साह सिंगापूरच्या पंतप्रधानांनी हिंदुस्थानात थोडातरी पोचवला. सिंगापुरी चमत्कारानेच देशी कारखानदार चकित झाले. झेकोस्लोव्हाकिया, पोलंड आणि काही अंशी चीन यांनीही खुली व्यवस्था आणण्यात भरघोस यश मिळवले आहे.

काही कमनशिबी

याच्या नेमके उलटे रशियात घडले. बाजारपेठेची व्यवस्था आणण्यात रशिया अपयशी ठरतो आहे. सबसिडी देण्यासाठी तेथील नोटांचे कारखाने धडधडत आहेत. चलनाचा महापूर वाहतो आहे. वर्षापूर्वी एक डॉलरला ५०० रुबल्स् असा विनिमयाचा दर होता. आता १ डॉलरला २००० वर रुबल मिळतात. एके काळी एका रुबलला १५ रुपये असा अधिकृत विनिमयाचा दर होता. आता रुपयास ७० रुबल असा बाजारात दर चालू आहे. रुबलची प्रचंड घसरण झाली आहे. रशियाची दमछाक होते आहे. बाहेरून मिळणारा मदतीचा हात अगदी अपुरा आहे. मोठे धाडस करून पोराने पोहायला उतरावे आणि काठापासून थोडे दूर गेल्यावर त्याचा धीर तुटावा आणि मागे फिरून काठापर्यंत परत पोचण्यासाठी त्याने धडपड चालू करावी असा काहीसा प्रकार रशियात घडतो आहे. नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकीत कम्युनिस्ट आणि झिरिनोव्स्कीचे माथेफिरू अनुयायी लोकसभेत ताकदीने विरोधात उभे राहिले आहेत. नवीन घटनेने अध्यक्ष येल्त्सिन यांना मोठी सत्ता दिल्यामुळे ते खुर्चीवर टिकून आहेत एवढेच. खुल्या अर्थव्यवस्थेवर

विश्वास असणाऱ्या जुन्या मंत्रिमंडळातील सर्व मंत्रिगण निघून गेले आहेत किंवा त्यांना काढून टाकण्यात आले आहे. येल्त्सिन स्वत: कधी कधी खुल्या अर्थव्यवस्थेकडे जाण्याचा निर्धार जाहीर करतात, तर कधी धीम्या गतीने वाटचाल करण्याची भाषा करतात. रशियाच्या नवीन राजमुद्रेवर दोन तोंडांच्या गरुडाचे चिन्ह आहे. या गरुडाप्रमाणे रशियन अध्यक्ष दुतोंडे झालेले आहेत अशी टीकाकारांनी मल्लिनाथी केली आहे.

चारतोंड्या सिंह

रशियन राजमुद्रेवरील गरुडाला दोन तोंडे आहेत; तर हिंदुस्थानच्या राजमुद्रेतील सिंहास चार तोंडे आहेत. त्यामुळे पंतप्रधान आणि वित्तमंत्री तीनचार वेगवेगळी मते वेगवेगळ्या वेळी आणि स्थळी मांडत असतात. ते सुधारणांचे श्रेयही घेतात, नेहरूंचा उदो उदोही करतात, लायसेन्स-परमिट-इन्स्पेक्टर राज चालूही ठेवतात.

गेल्या महिन्यापर्यंत सुधारांचा गाडा बरा चालला होता. निदान तो मोडून पडला नव्हता, एवढे तरी सर्वमान्य होते. सूर्याच्या सांकेतिक रथाचे वर्णन आहे:

"रथाला चाक एक, घोडी सात, लगाम सापांचा, रस्ता अधांतरी, सारथी बिनपायाचा."

डॉ. मनमोहन सिंगांच्या गाड्याची परिस्थिती इतकीच बिकट राहिली आहे. देश आर्थिक संकटात सापडलेला, नेतृत्व देण्यासाठी काँग्रेसखेरीज पक्ष नाही, त्या पक्षात सिंग साहेबांना स्थान नाही. पुढारी आणि नोकरदार यांनी सरकारचाच नव्हे तर, सगळ्या देशाचा गळा आवळलेला. बेकारी, महागाई, गुंडशाही, जातिवाद यांनी सगळा समाज ग्रासलेला. राज्यकर्त्या पक्षाचे बहुमत तुटपुंजे आणि तरीही मनमोहन सिंगांनी रथ बरा हाकला. नव्याने जुगार खेळणाऱ्या माणसाला सुरवाती सुरवातीस चांगला लाभ होतो म्हणतात. जन्मभर नेहरूव्यवस्थेच्या सेवेत काढल्यानंतर खुल्या व्यवस्थेच्या दरबारात हजर झालेल्या वित्तमंत्र्यांचे नशीब सुरवातीला तरी जोरावर दिसते. महागाई वाढण्याची गती आटोक्यात आली. परकीय चलनाची गंगाजळी झपाट्याने सुधारली; सहा महिन्यांच्या आयातीच्या रकमेइतकी ती बाळसेदार झाली आहे; पण खरी कसोटी पुढेच आहे.

अंदाजपत्रकातील तूट कमी करण्यात फारसे यश लाभले नव्हते. यंदाच्या वर्षी अंदाजपत्रकी तूट राष्ट्रीय उत्पादनाच्या ४% पर्यंत खाली आणता आली, तर मनमोहन सिंगांनी आणखी एक फेरी जिंकली असे झाले असते. वित्तमंत्र्यांची आणि खुली अर्थव्यवस्था राबवण्याच्या कार्यक्रमाची खरी कसोटी इथेच होती. या कसोटीत ते सपशेल अपेशी झाले. तूट ८% पेक्षा जास्त राहील असे स्पष्ट

दिसू लागले. तूट आटोक्यात आणून देशाची अर्थव्यवस्था सुदृढ आणि निरोगी राखायची असेल तर नेहरूजमान्याकडून वारसात मिळालेल्या नोकरशाहीच्या आणि तथाकथित 'गरिबी हटाओ' कार्यक्रमांच्या ओझाची वासलात लावणे अपरिहार्य आहे. यासाठी प्रचंड राजकीय इच्छाशक्ती हवी. "दोन अधिक दोन किती?" या प्रश्नाचे धड उत्तर एक शब्दात देऊ न शकणारे पंतप्रधान – त्यांच्या आवाक्याबाहेरची ही गोष्ट आहे.

नोकरशहांची खुली व्यवस्था

पंतप्रधानांनी 'दावोस' येथे केलेल्या भाषणाचा नेमका अर्थ काय ? या भाषणात वित्तमंत्र्यांना दिलेला आदेश थोडक्यात असा आहे. कर फारसे वाढवायचे नाहीत, नोकरदारांना दुखवायचे नाही आणि गरिबांच्या नावाखाली चाललेले कार्यक्रम कितीही वावदूक आणि खर्चीक असले, तरी त्यांना कात्री लावायची नाही. एवढी पथ्ये सांभाळा आणि मग तुम्हाला जे काही आर्थिक सुधार घडवून आणायचे असतील आणि खुली व्यवस्था आणायची असेल, ती खुशाल आणा. ते आर्थिक सुधार, तो आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि तुम्ही तुमचे पाहून घ्या अशी पंतप्रधानांची वित्तमंत्र्यांना समज असावी. वित्तमंत्र्यांचे काम काय, सोपे आहे! त्यांना काय, फक्त अर्थव्यवस्था सुधारायची आहे; पण पंतप्रधानांचे काम त्याहून बिकट आहे. त्यांना आणि त्यांच्या पक्षाला पुढील निवडणूक जिंकायची आहे.

देशात ९१ मध्ये सुरू झालेल्या आर्थिक सुधारांची दमछाक झालेली आहे. आर्थिक सुधारांचा कार्यक्रम शेतीक्षेत्राला फारसा लागू झालाच नाही. शेती निर्यात, प्रक्रियाउद्योग, व्यापार यांच्यावरची बंधने नेहरूजमान्याप्रमाणेच चालू राहिली. थोडीफार हिंमत करून दुधावरली प्रक्रिया, उसाच्या मळीवरील नियंत्रणे ढिली करण्याचा प्रयत्न झाला; पण स्वार्थ गुंतलेल्या हितैषींनी ते प्रयत्न हाणून पाडले. यंदा २० लाख गाठी कापसाची निर्यात बिनधास्त करता आली असती. शासनाने फक्त ५ लाख गाठींचा कोटा मोकळा केला आणि काहीही कारण नसताना अचानक निर्यातबंदी केली. मोकळ्या केलेल्या कोट्यापैकीसुद्धा दीड लाख गाठींचा परवाना रद्द केला. एवढेच नव्हे तर, ५ लाख गाठी आयात करण्याची परवानगी जवळजवळ देऊन टाकलीच आहे. काँग्रेसी खुल्या व्यवस्थेच्या आर्थिक सुधारांच्या कार्यक्रमांचा मृत्युलेख गव्हाच्या आयातीपासून कापसाच्या निर्यातीपर्यंत पूर्णपणे लिहून झालाच आहे.

मरता क्या नही करता?

एवढ्याने भागले नाही. तूट कमी करायची आहे, कर वाढवाचे नाहीत आणि

सरकारी नोकरदारांची खुशमिजाशी कमी करायची नाही अशा धर्मसंकटात सापडलेल्या वित्तमंत्र्यांनी जे काही करणे शक्य होते, ते केले आणि अंदाजपत्रक सादर करण्याच्या महिनाभर आधी प्रशासकीय किमती झपाट्याने वाढवण्याचा तडाखा सुरू केला. घरगुती गॅसच्या किमती वाढवल्या, त्यानंतर स्वस्त धान्याच्या दुकानातील साखर, गहू आणि तांदूळ यांच्या किमती वाढवल्य आणि शेवटी दरसालप्रमाणे पेट्रोल आणि डिझेलच्याही किमती वाढवल्या. चालू आर्थिक वर्षाचे दोन महिने अजून शिल्लक आहेत. जाहीर केलेल्या भाववाढीमुळे उरलेल्या कालावधीत ५५०० ते ६००० कोटी रुपयांनी उत्पन्न वाढेल आणि अंदाजपत्रकातील तुटीची टक्केवारी ठाकठीक असल्याची बतावणी करता येईल अशा हिशेबाने वित्तमंत्र्यांनी ही धडपड केली आहे; पण या खटाटोपात त्यांचे 'गाढवही गेले आणि ब्रह्मचर्यही गेले' अशी अवस्था होणार आहे.

आत्मघाताचा मार्ग

पेट्रोलियम पदार्थांच्या किमती वाढवणे हा सरकारी उत्पन्न वाढवण्याचा सोपा उपाय. म्हणून गेली कित्येक वर्षे प्रत्येक वित्तमंत्री सोन्याची अंडी घालणारी ही कोंबडी वापरू पाहतात. डिझेल सबसिडीच्या भावाने विकले जात असे. ती सबसिडी संपवणे खुल्या व्यवस्थेच्या सिद्धांताप्रमाणे योग्य असेलही; पण हिंदुस्थानातील पेट्रोलची किंमत अमेरिकेच्या तुलनेने आजही तिप्पट आहे. तेव्हा पेट्रोलच्या किमती वाढवणे बिलकूल असमर्थनीय आहे. जगभरच्या पेट्रोलियम पदार्थांच्या किमती झपाट्याने घसरत आहेत. अशा परिस्थितीत येथील पेट्रोल महाग करणे निव्वळ आत्मघाताचे लक्षण आहे. गेल्या निदान तीन पेट्रोलच्या किंमतवाढींचा अनुभव असा : पेट्रोलची किंमतवाढ नोटा सरळसरळ छापण्यापेक्षाही अधिक महागाई भडकवणारी आहे. पेट्रोलच्या किमती वाढताच ऑटोरिक्षापासून ते टॅक्सी, ट्रक, बसपर्यंत एकूण सगळीच वाहतूक महाग होते आणि सगळ्याच वस्तूंच्या किमती पेट्रोलच्या किंमतवाढीपेक्षा कितीतरी अधिक पटींनी वाढतात. त्याखेरीज आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत आधीच नाजूक असलेली भारतीय अवस्था अधिकच कठीण होऊन जाईल; तरीही वित्तमंत्र्यांनी पेट्रोलियम पदार्थांच्या किमती वाढवल्या आहेत. गेल्या दोन वर्षांत चलनवाढीची गती आटोक्यात आणण्याची जी कामगिरी त्यांनी करून दाखवली होती, त्यावर या कारवाईने सपशेल पाणी पडणार आहे.

सरकारला पैसे द्या आणि देश बुडवा

शेअर घोटाळाप्रकरणी राजीनामा देण्याची वेळ आली, तेव्हा वित्तमंत्र्यांनी

म्हटले होते, "माझ्या राजीनाम्याने आर्थिक सुधारांच्या कार्यक्रमावर काहीही विपरीत परिणाम घडणार नाही, कारण कार्यक्रमाचे खरे सूत्रधार पंतप्रधान स्वत: आहेत."

वित्तमंत्र्यांच्या या विधानाची सचोटी आता स्पष्ट होत आहे. आर्थिक सुधारणा महत्त्वाची खरी; पण नोकरदारांची ऐष चालू ठेवणे हे त्याहूनही महत्त्वाचे. ही पंतप्रधानांची आर्थिक नीती आहे. १५,४०० कोटी रुपये एकूण सरकारी खर्चांपैकी ७८,००० कोटी रुपये प्रशासकीय खर्चात जातात, २१,००० कोटी रुपये सबसिडीत जातात आणि कर्जावरील व्याजापोटी ३४,००० कोटी रु. जातात. असली अंदाधुंद परिस्थिती आटोक्यात आणायची असेल, तर सबसिडी आणि नोकरदारांवरील खर्च निदान निम्म्याने कमी करण्याची गरज आहे. ती पुरी करण्याची राजकीय इच्छाशक्ती आणि सामर्थ्य असणारे सरकार दिल्लीत आले पाहिजे. अन्यथा, घसरणीला लागलेला देश विनाशापर्यंत पोचेल हे निश्चित. सारे विरोधी पक्ष या भाववाढीविरुद्ध ओरड करीत आहेत, आंदोलन करण्याची भाषा करीत आहेत. सत्य परिस्थिती अशी आहे, की सध्याच्या राजकीय पक्षांपैकी कोणताही सत्तेवर आला, तरी त्याला दुसरा काही पर्याय असणार नाही. कारण सरकारी खर्च कमी करण्याची कोणत्याही पक्षाची इच्छा नाही.

दारुडे सरकार

सरकारची स्थिती दारुड्या नवऱ्यासारखी झाली आहे. बायकोचे दागिने, अगदी मंगळसूत्रसुद्धा काढून घेऊन, आपले व्यसन पुरे करणे त्याला महत्त्वाचे वाटते. सरकारी अंदाधुंद खर्च चालविण्यासाठी गॅस, अन्नधान्य आणि पेट्रोलियम पदार्थ यांच्यावरील भाववाढ करण्यात आली आहे. येत्या काही दिवसांत रेल्वे, टेलिफोन, टपाल यांच्यात भाववाढ होईल हे जवळजवळ नक्कीच आहे. लोकांनी निमूटपणे ही भाववाढ मान्य केली तर काय होईल ? नोकरशाही आणखी फोफावेल. उद्योजक आणि निर्यातदार यांच्या मार्गात अधिक अडचणी निर्माण होतील. परिणामी, देश अधिक संकटात सापडेल आणि समाजवादी रशियाच्या घसरगुंडीवर नेहरूवादी भारतही घरंगळत जाईल.

नोकरदारांवरील आणि सरकारी उधळपट्टीवरील खर्च तडाख्यात कमी करण्यांत आला नाही, तर सरकारला मिळणारा प्रत्येक पैसा देशाला विनाशाकडे नेणारा ठरेल. 'दारुड्या'शासनाला एक पैसाही देणे म्हणजे देशाचा घात करणे आहे. देशाला विनाशाकडे नेणे आहे. सर्व देशातील आम जनतेने राव सरकारची 'नशाबाजी' बंद करण्याचा निश्चय केला पाहिजे. त्यात यश येणे कठीण आहे

असे दिसल्यास देश वाचवण्यासाठी खुल्या अर्थव्यवस्थेवर खरीखुरी श्रद्धा असलेला व जातीयवाद, नोकरशाही आणि भ्रष्टाचार संपवून टाकण्याचा निर्धार असलेला राजकीय पर्याय उभा करण्याचा निर्धार केला पाहिजे.

गेल्या आठवड्यातील किंमतवाढ ही देशाला आग लागल्याच्या धोक्याची भयसूचक घंटा आहे. पंतप्रधान मुत्सद्दी असोत, राजकारणी असोत किंवा 'दोन अधिक दोन' याचेही उत्तर देण्याची टाळाटाळी करणारे 'मध्यमवर्गी' असोत, देशाचे भवितव्य त्यांच्या हाती सुरक्षित नाही. त्यांचा मध्यममार्ग म्हणजे नियंत्रण आणि खुलीव्यवस्था यांच्यातील चांगल्या गुणांचा समुच्चय नाही, त्यांचा मध्यममार्ग दोन्ही व्यवस्थांतील केवळ दुर्गुणांचा गंध आहे. पंतप्रधानांचा मध्यममार्ग स्त्री-पुरुषांच्या उत्तमोत्तम गुणांची मूर्ती-अर्धनारीनटेश्वर नाही. त्यांचा मध्यममार्ग ना – कर्त्यांचा, ना मर्दांचा, निष्क्रियतेचा 'अमंगल पंथ' आहे.

(६ फेब्रुवारी १९९४)

◆◆

स्वतंत्र भारताचे नैतिक दर्शन

बदलाचे वारे

भारताच्याच नव्हे, सर्व जगाच्या इतिहासात एक प्रचंड बदल घडून येतो आहे. समाजवादाचा जागतिक ऐतिहासिक पराभव झाला आहे. तिसऱ्या जगातील समाजवादाचे ताबूत घेऊन, हैदोस घालणारे नामोहरम झाले आणि श्रीमंत राष्ट्रांतही अर्थव्यवस्थेतून सरकारी हस्तक्षेप संपवण्याच्या दिशेने वाटचाल सुरू झाली. अर्थक्षेत्रातली या घटना जितक्या महत्त्वाच्या तितक्याच महत्त्वाच्या घटना राजकीय क्षेत्रातही घडत आहेत. दुसऱ्या महायुद्धानंतर दोन महासत्तांचे युग आले. दोघांच्या टकरीत काही किरकोळ सत्तांचे मोठे फावले होते. समाजवादी महासत्ता कोसळली आणि काही उनाड सत्तांवर शिस्तीचा बडगा उगारला जात आहे. इराक, लिबिया, उत्तर कोरिया, इथियोपिया, हैती, रुआंडा ही ठळक उदाहरणे.

'शहामृगी' विश्व

या सगळ्या, उलथापालथ करणाऱ्या घटना घडल्या; तरी त्यांचा नेमका अर्थ काय याबद्दल स्पष्ट चित्र नाही. जी ती व्यक्ती किंवा संघटना, जो तो समाज आणि देश नवीन वाऱ्यापुढे थोडेसे झुकून, शक्यतो जुन्या पद्धतीनेच मार्गक्रमणा चालू ठेवण्याच्या प्रयत्नात आहेत. आर्थिक अरिष्टे आली, त्यामुळे अर्थव्यवस्थेत काही बदल अपरिहार्य झाले, बाकी सगळे काही पहिल्यासारखेच आहे अशा थाटात जग चालले आहे. शहामृगावर शत्रूचा हल्ला झाला म्हणजे तो वाळूत डोके खुपसून स्तब्ध उभा राहतो, असे म्हणतात. आपल्याला जग दिसले नाही म्हणजे जगालाही आपण दिसत नाही अशी त्याची धारणा. नवीन घटनांचा अर्थ काय, याकडे आपण दुर्लक्ष केले तर त्यांचा आपल्यावर काही परिणामच होणार नाही अशा 'शहामृगी' विश्वात वावरणे आहे.

एकेका घटनेचा नेमका अर्थ काय, हे तपशीलवार सांगण्याची ही वेळ नाही

आणि जागाही नाही; पण जगातील उलथापालथींचे निष्कर्ष काय, हे थोडक्यात सारांशाने मांडले पाहिजे.

१ : अब्राहम लिंकनच्या काळापासून 'सर्व मानवप्राणी समान जन्माला आला आहे,' या फ्रेंच राज्यक्रांतीतील तत्त्वाला मान्यता मिळाली. विषमता निर्मूलनाच्या कार्यक्रमात 'माणसे समान आहेत,' म्हणजे एकसारखीच आहेत असे मानले गेले आणि माणसाकडे व्यक्ती म्हणून पाहण्याऐवजी समाजाच्या अनेक घटकांपैकी एक हे स्थान त्याला मिळाले. व्यक्ती हरपली, गर्दीत दडपली गेली. समानतेचे तत्त्व फ्रेंच राज्यक्रांतीच्या पहिल्या तत्त्वाचे शत्रू बनले. स्वातंत्र्य, समता, बंधुत्व या फ्रेंच राज्यक्रांतीच्या तत्त्वत्रयीतील स्वातंत्र्य आणि समता यांच्या क्रमाची उलटापालट झाली. स्वातंत्र्यापेक्षा समता महत्त्वाची ठरली. ही ऐतिहासिक चूक आता सुधारली जाणार आहे. माणसे समान आहेत हे खरे; पण त्याचा अर्थ 'ती एका मुशीतली, एकसारखी बाहुली आहेत,' असे नव्हे. एका माणसासारखा हुबेहूब दुसरा कोणी असतच नाही; अगदी जुळेभाऊसुद्धा नाहीत. प्रत्येक मनुष्य त्याच्या स्थलकालात अनन्यसाधारण असतो. प्रत्येक व्यक्ती अनन्यसाधारण असते, म्हणून मनुष्यप्राणी समान असतो. व्यक्तीची अनन्यसाधारणता हा समानतेचा पाया आहे.

कशासाठी जगणे

२ : प्रत्येक अनन्यसाधारण व्यक्ती त्याच्या त्याच्या प्रकृतीप्रमाणे आपले जाणिवांचे आणि अनुभवांचे विश्व व्यापक करण्याच्या धडपडीत असते. आयुष्य विविधतेने संपन्न व्हावे, निवड करण्याची संधी क्षणाक्षणाला मिळावी, प्रत्येक निवडीच्या वेळी जास्तीत जास्त विकल्प हात जोडून हजर असावेत आणि ते विकल्पही विविध पठडींतले असावेत, यासाठी मनुष्यप्राण्याची धडपड चालू असते. माणसाचा शोध स्वातंत्र्याच्या कक्षा रुंदावण्याचा आहे; सुखाचा नाही, शांतीचा नाही, समाधानाचा नाही, सत्याचा नाही, शिवाचा नाही, सुंदराचा नाही, संपत्तीचा नाही, सत्तेचा नाही, दु:खीजनांच्या सेवेचा नाही आणि मोक्षाचाही नाही. वेगवेगळ्या व्यक्तींच्या स्वातंत्र्याच्या कक्षा रुंदावण्याचे हे वेगळे वेगळे प्रकार आहेत.

स्वार्थ हेच उद्दिष्ट

३ : अनन्यसाधारण व्यक्तीची चालायची वाट रुळलेली नाही, मार्गदर्शक कोणी नाही, त्याच्या प्रेरणा हाच त्याच्या हातातील दिवा. प्रमुख प्रेरणा अहंकाराची. एका बाजूला मी आणि दुसऱ्या बाजूला सारे जग, ही जाणीव मुळी त्याच्या

अनन्यसाधारणपणाचा गाभा आहे. त्याचे उद्दिष्ट, स्वार्थ त्याला साधायचा आहे. कोणाला स्वार्थ पैशात दिसेल, कोणाला विद्येत, कोणाला शुद्ध आळशीपणे पडून राहण्यात. या व्यापक अर्थाने प्रत्येक व्यक्ती आपापला स्वार्थ साधण्याकरिता धडपडते. लक्षावधी- कोट्यवधी स्वार्थी व्यक्तींच्या धडपडीतून नकळत परमार्थ संपादिला जातो. शरीरातील एकेक पेशी तिच्या तिच्या स्वभावाप्रमाणे धडपडत असते. अशा धडपडीतूनच सबंध शरीराची एकात्मता बनते. स्वार्थ सत्य आहे, परमार्थ विपाक आहे.

व्यक्तीचा मंचप्रवेश

४ : एक व्यक्ती आणि विश्व यांचे हे एकात्मकतेचे निसर्गसिद्ध नाते आहे. हे अध्यात्मात जितके खरे तितकेच अर्थव्यवस्थेत किंवा इतर कोणत्याही क्षेत्रात. माणसाच्या अंतिम कल्याणाचा मार्ग दाखवणारे साधू, संत, अवतार, प्रेषित, बाबा, महाराज असत नाहीत. तसेच कोथिंबीर किती पिकवावी आणि आगगाडीची इंजिने किती बनवावीत याचा हिशेब मांडणारा कोणी 'नियोजन महात्मा'ही असत नाही. आर्थर क्लोसर यांचे शब्द वापरायचे तर या जगात 'कमीसारां'नाही स्थान नाही आणि योग्यांनाही नाही. योगी, कमीसार, बाकी सारे मध्यस्थ, अडते व्यक्ती आणि विश्व यांची एकात्मता बिघडवण्याचेच काम करतात आणि आपल्या सिद्धांतांच्या अतिरेकी हट्टापायी रक्ताचे पाट वाहवतात. अनन्यसाधारण व्यक्ती मंचावर येत आहे, 'मध्यस्थ महात्म्यां'ची उचलबांगडी होत आहे.

समाजव्यवस्थेचे फोल प्रयत्न

५ : व्यक्ती कितीही अनन्यसाधारण असली, तरी तिला समाजात राहावे लागते, साधने संपादन करावी लागतात, वस्तूंची आणि सेवांची देवघेव करावी लागते, देखरेखीसाठी विविध प्रकारची सत्तास्थाने आवश्यक असतात. सोईस्कर वाटतात; पण, सत्ता आली, की भ्रष्टाचार आला. कारण, सत्ता निगर्सविपरीत आहे. सत्तेशिवाय चालत नाही आणि सत्तेने सगळे काही बिघडते, हा मनुष्यजातीला पुरातन कालापासून पडलेला पेच आहे. सत्ता-भ्रष्टाचार, सत्तास्पर्धा हे सगळे टाळण्याकरिता इतिहासात अनेक प्रयोग झाले. माणसाची कामे जन्माच्या आधारानेच ठरावीत आणि त्यात प्रत्येकाने संतोष मानावा अशी व्यवस्था उभारण्याचा प्रयत्न झाला. समाजाला स्वत:च्या सामर्थ्याप्रमाणे देणारा आणि केवळ आपल्या गरजेपुरतेच घेणारा उदात्त समाजवादी माणूस तयार करण्याचेही प्रयत्न झाले. हातातील सत्ता, संपत्ती विश्वस्ताच्या निरिच्छेने हाताळली जावी अशा गांधीवादी नैतिक माणसाची कल्पना पुढे मांडण्यात आली; पण हे सगळे प्रयत्न फसले.

माणसाची गुणवत्ता सुधारण्याचे महात्म्यांनी सांगितलेले मार्ग निसर्गाला रुचत नाहीत असे दिसते. श्रेष्ठत्व आणि गुणवत्ता म्हणजे काही एक ठराविक प्रकारची भूमिका हे निसर्गाला मान्य नाही. मनुष्य अनुभवसंपन्न आणि परिपूर्ण असावा. ठोकळेबाज पुरुषार्थाच्या कल्पना निसर्गाला मान्य नाहीत. सत्तेची दुष्टता टाळण्याचे गुणात्मक उपाय सारे फसले. सत्तेची दुष्टता संपवण्याचा एकच मार्ग म्हणजे सत्ताकेंद्राची विविधता आणि त्यांच्यातील स्पर्धा. सत्ताकेंद्र म्हणजे काही फक्त राजधानीतील केंद्र नाही. प्रत्येक माणूस आपापल्या जागी, आपापल्या काळी काही प्रमाणाततरी सत्ता गाजवतच असतो. कोणाचीही सत्ता निरंकुश नको, त्याला स्पर्धा पाहिजे, तरच दुष्टता आटोक्यात राहण्याची काही आशा.

स्पर्धा

६ : स्पर्धा ही जगातील चैतन्याचे रहस्य आहे. ती काही फक्त बलदंडांची टक्कर नाही. स्पर्धा हा प्रशिक्षणाचा सगळ्यांत प्रभावी आराखडा आहे. स्पर्धेत उतरल्याने स्पर्धा करण्याची शक्ती वाढते; जसे, पाण्यात उतरल्याने पोहता येते, मूल पडतापडता चालायला शिकते.

जोपासना दुर्बलांसाठी

७ : याउलट संरक्षणाने देणाऱ्याचे भले होत नाही, ना घेणाऱ्याचे. व्यक्तींच्या विविधतेत काही दुर्बल घटक असणारच. लहान मुले, मतिमंद, दुर्बल, अपंग हेदेखील समाजाचे घटकच आहेत. स्पर्धेशिवाय दुर्बलांच्या जोपासनेचे सूत्रही महत्त्वाचे आहे; पण जोपासणी अपंगपणा वाढवणारी, विकासाची इच्छा खुंटवणारी नको. हातपाय नसलेल्यांना जागतिक खेळांच्या स्पर्धेत भाग घेता येणार नाही; पण त्यांची त्यांची स्वतंत्र खेळांची स्पर्धा असू शकते. लंगडे आणि सुदृढ यांचे सगळ्यांचे मिळून एकत्रच खेळ झाले पाहिजेत, असा कोणी आग्रह धरला, तर ते कोणाच्याच भल्याचे नाही; ना सुदृढांच्या, ना अपंगांच्या.

व्यक्तिविकास हाच समाजविकास

८ : व्यक्तीच्या विकासाच्या धडपडीतून समाजाचा, राष्ट्राचा विकास होतो, विकास कोठे थटला असेल तर समजावे, व्यक्तीच्या विकासाच्या स्वातंत्र्यावर कोणीतरी कोठेतरी बंधन घातले आहे. विकास निसर्गसिद्ध आहे, गरिबी निसर्गविपरीत आहे. व्यक्ती आणि विश्वाच्या एकात्मतेला तडा देऊ पाहणाऱ्यांनी गरिबी तयार केली आहे. गरिबांच्या छातीवरून उठणे यासारखा परिणामकारक 'गरिबी हटाव' कार्यक्रम नाही.

शासन विकासातील आडकाठी

९ : शासन जितके अधिक तितका विकास कमी. फार फार तर कायदा, सुव्यवस्था इत्यादी गोष्टी शासनाने पाहाव्यात. अर्थकारण, शिक्षण, अध्यात्म, न्याय, प्रसार माध्यमे या क्षेत्रातील सत्तास्थाने स्वतंत्र आणि सार्वभौम असली पाहिजेत.

सगळ्या जगात जे खुलेपणाचे वारे वाहत आहे त्याचा अर्थ हा असा आहे. स्वराज्याची तहान सुराज्याने भागणार नाही, असे लोकमान्य म्हणाले. वर्तमान घटनांचा निष्कर्ष असा, की खरे स्वराज्य आपोआपच सुराज्य असते. 'सुराज्य' नाही, तेथे 'स्वराज्य' नाही असे नि:शंकपणे समजावे. 'इंडिया-भारत' द्वैत तयार झाले, की गरिबीने ठाण मांडलेच म्हणून समजा.

'समाज'वाद्यांची टीका

स्वातंत्र्याच्या पाइकांची ही अशी भूमिका आहे. स्वातंत्र्य, स्पर्धा, खुली व्यवस्था असे शब्द वापरले, की व्यक्तीपेक्षा समाज महत्त्वाचा मानणाऱ्या विचारांच्या वेगवेगळ्या रंगछटा असलेल्या 'समाज'वाद्यांचा व्यक्तिवाद्यांवर टीकेचा भडिमार सुरू होतो. तुमचा समानतेवर विश्वास नाही, तुम्ही विषमतावादी आहात, तुम्ही डार्विनवादी आहात, समर्थांनी तेवढे जगावे, दुर्बलांनी नष्ट व्हावे अशी तुमची धारणा आहे, तुम्ही अराजकवादी आहात, समाजात सत्तास्थाने म्हणून तुम्हाला नकोत, तुम्ही राष्ट्रवादी नाहीत, तुम्हाला स्वदेशाचा अभिमान नाही, असा आरोपांचा भडिमार होतो. या टीकांतील निरर्थकता दाखवणे महत्त्वाचे आहे.

स्वतंत्रतावादी भूमिका

स्वतंत्रतावादी व्यक्तीला केंद्रस्थानी मानतात. व्यक्तीची अनन्यसाधारणता पवित्र मानतात; पण याचा अर्थ, मनुष्यप्राण्यांत श्रेष्ठ-कनिष्ठता मानतात असे नाही. कोणी श्रेष्ठ नाही, कोणी कनिष्ठ नाही. जो तो अनन्यसाधारण आहे आणि ज्याच्या त्याच्या फूटपट्टीने श्रेष्ठ आहे. मनुष्यप्राणी समान आहे. त्याचे समानत्व त्याच्या अनन्यसाधारणपणात आहे. जन्मजात आळशी माणूससुद्धा कनिष्ठ नाही. स्वस्थ आरामात पडून राहावे, त्यामुळे, पोटाला थोडे कमी मिळाले तरी चालेल, संसार नासला तरी चालेल. इतक्या खंबीरपणे आळशी असलेला मनुष्यदेखील उद्योगी पुरुषसिंहापेक्षा कनिष्ठ नाही. त्याच्या वैशिष्ट्याचे पारितोषिक त्याच्या क्षेत्रातील चलनातच मिळणार, उद्योजकांच्या चलनात नाही, एवढाच काय तो फरक.

स्वतंत्रतावादी अराजक मानत नाहीत. सत्तास्थाने लागतात, उपयोगी असतात

हे, दुर्दैवी का होईना, वास्तव आहे. सत्तेतील भ्रष्टता टाळण्याकरिता सत्तास्थाने बहुविध असावीत, अनेक असावीत, सार्वभौम असावीत ही मांडणी अराजकाची नाही, बहुराजकाची आहे.

डार्विनवादाचा आरोप असाच खोटा आहे. जगून राहण्याची धडपड विनाशकारीच असते हे खरे नाही. संघर्षात माणसाचे यच्चयावत ऊर्जास्रोत संपूर्णपणे पणाला लागतात. त्या स्पर्धासंघर्षात जे टिकणार नाहीत त्यांना 'जोपासना वर्गा'त जाता येईल. खुल्या स्पर्धेत कच्चे लिंबू म्हणून भाग घेण्याचा आग्रह त्यांना सोडावा लागेल किंवा वरच्या वर्गात बरोबरीला येण्याची क्षमता सिद्ध करावी लागेल.

'खुली व्यवस्था'वादी राष्ट्रवादी नाहीत, आंतरराष्ट्रवादी आहेत हा आरोपही चुकीचा आहे. व्यक्तीच्या विकासाच्या धडपडीत विविध प्रकारच्या संघटना उदयाला येतात, नष्टही होतात. कुटुंब, गाव, जाती, धर्म, राष्ट्र अशा चढत्या श्रेणीच्या संघटना उत्क्रांतीच्या प्रवाहात माणसाने तयार केल्या. या सगळ्या संघटनांचे आणि सामुदायिक जाणिवांचे अलग अलगपणे आणि एकत्र मोठे महत्त्व आहे. आजपर्यंत माणसाची वाहतुकीची, संचाराची, देवघेवीची साधने मर्यादित राहिली. त्यामुळे त्याचे सारे संपर्क भूगोलाने मर्यादित केले. तंत्रज्ञानाची प्रगती वाढेल, तासाभरात पृथ्वीप्रदक्षिणा करता येईल किंवा आपल्या जागी बसून, जगातील दुसऱ्या कोणत्याही माणसाशी बोलता येईल, तिला पाहता येईल, कदाचित् स्पर्शही करता येईल अशी प्रगती झाली, तर भौगोलिक राष्ट्र या संकल्पनेचे फारसे महत्त्व राहणार नाही, हे उघड आहे.

कांगावखोर 'स्वदेशी'वाले

पण, आज तशी स्थिती नाही. प्रादेशिक सरहद्दीत शेजारी म्हणून राहणाऱ्या लोकांमध्ये विविध प्रकारांनी आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, भाषिक जवळिकीची भावना आहे. आपापल्या समाजात वावरताना घरी असल्यासारखे वाटते, ही जाणीवही मोठी मौल्यवान गोष्ट आहे. त्यासाठी शेकडो भगतसिंग फाशी चढायला तयार होतात. खरे तर, राष्ट्रवादाचा आणि स्वदेशीचा उदे उदे, उद्घोष करणाऱ्या लोकांनी राष्ट्रकल्पनेचा बाजार मांडला आहे. 'स्वदेशी'च्या नावाखाली आपला खत्रूड माल आपल्याच देशबांधवांच्या गळी महागड्या किमतीने बांधता आला म्हणजे देशभक्ती आणि कातडीचा रंग थोडा वेगळा असणाऱ्या लोकांनी सर्वसामान्य जनतेला उत्कृष्ट माल कमी भावात आणून दिला तर मात्र देश बुडाला अशी हाकाटी करणाऱ्यांचा 'स्वदेशी' हा कांगावा आहे.

'स्वदेशी'वाल्यांनी देशाला काय दिले? महान परंपरांचा, उज्ज्वल इतिहासाचा

हा देश. आजही इथली माणसे परदेशांत गेली तर सर्वांना अचंबा वाटावा अशी कर्तबगारी दाखवतात. समाजवाद्यांनी, सरकारवाद्यांनी, 'स्वदेशी'वाद्यांनी स्वार्थासाठी देशाभोवती कुंपणे घातली आणि एक महान राष्ट्र जगातील कंगाल आणि दळभद्री राष्ट्र बनवून टाकले. देशातील 'खऱ्या राष्ट्रवाद्यां'ची इच्छा ही कुंपणे तुटावीत, इथल्या कर्तबगार जनतेच्या हातापायांतील सरकारशाहीच्या दंडबेड्या तुटाव्यात आणि जगातील राष्ट्रांच्या बैठकीत भारताला त्याचे इतिहाससिद्ध, निसर्गसिद्ध स्थान पुन्हा एकदा लाभावे अशी आहे. स्वतंत्रतावाद्यांची भूमिका राष्ट्र जोपासण्याची आहे, राष्ट्र खाण्याची नाही.

'स्वतंत्र भारत'च्या पाइकांचे स्वप्न

जगात भारताचे स्थान पुन्हा एकदा उंचावण्याचा कार्यक्रम फारसा कठीण नाही. एकविसावे शतक उगवण्याआधी त्याची अंमलबजावणी सहजशक्य आहे. या देशाचे लोक प्रेरणा घेऊन उठले, तर तीन वर्षांत हे होऊ शकेल. कार्यक्रम सोपा आहे. सरकारी हस्तक्षेप कमी करा, सरकारशाहीचे ओझे उतरवा, गेल्या पन्नास वर्षांत सरकारशाहीने देशाचे जे नुकसान केले, ते नुकसान संपवावे आणि राष्ट्राच्या जिव्हारी लागलेल्या जखमा भरून काढा.

बेकारी, गरिबी, भ्रष्टाचार, गुन्हेगारी यांनी जर्जर झालेल्या या देशाचा आज जगात मान नाही. इथेल भाईबंददेखील देशातून निघून वेगळी चूल मागत आहेत. भारत स्वतंत्र झाला, तर आज त्याची हेटाळणी करणारे, दुष्टावा करणारे, त्यापासून फुटून जाऊ पाहणारे उद्या त्याच्याशी संपर्क असावा, जमले तर त्याने आपणास सामावून घ्यावे असे प्रतिपादू लागतील आणि त्यासाठी जुन्या इतिहासातील, पुराणातील नकाशांचे दाखले देऊन अखंड भारताचा आग्रह धरू लागतील. हे स्वातंत्र्याच्या पाइकांचे स्वप्न आहे.

यासाठी 'स्वतंत्र भारत' चळवळीचे तोरण बांधायला घेतले आहे.

(२१ जून १९९४)

◆◆

काँग्रेसला पर्याय नाही?

आपल्या सरकारच्या कारकिर्दीची तीन वर्षे पुरी झाल्यानिमित्ताने पंतप्रधान पी. व्ही. नरसिंह राव यांनी लाल किल्ल्याच्या समोरील मैदानावर एकपक्षीय मेळावा घेतला. पंतप्रधान एरव्ही मोठे सौजन्यशील आणि विनम्र व्यक्तिमत्त्वाचे; पण त्यांनाही एका गोष्टीची बढाई मारल्याखेरीज राहवले नाही. बहुमताचा पाठिंबा नसलेले सरकार तीन वर्षे चालवले आणि आजमितीस त्यांचे सरकार बहुमतात आहे; पुरी पाच वर्षांची मुदत संपेपर्यंत त्याच्या अस्तित्वाला आज तरी काही धोका दिसत नाही. याचा त्यांनी मोठ्या अभिमानाने उल्लेख केला.

जनता पक्षाचे सरकार पूर्ण बहुमत घेऊन, १९७७ मध्ये सत्तेवर आले आणि अठरा महिन्यांत कोसळले. १९८९ मध्ये जनता दलाच्या नावाखाली विरोधी पक्षांचे आघाडीचे सरकार पुन्हा एकदा सत्तेवर आले. जनता पक्षाच्या वेळी झालेल्या चुका यावेळी होऊ द्यायच्या नाहीत. कोणत्याही परिस्थितीत सरकार पडू द्यायचे नाही असा मनाशी निश्चय करत, विश्वनाथ प्रताप सिंगांचे मंत्रिमंडळ अधिकारावर आले आणि वर्षभराच्या आतच ते कोसळले.

राज्यपातळीवर, एवढेच काय, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या, साखर कारखाने, सहकारी सोसायट्या या सगळ्या पातळ्यांवर येणारा अनुभव असा, की काँग्रेसवाले सत्ता सांभाळून ठेवतात आणि विरोधक एकमेकांत लाथाळी सुरू करून सगळेच आपटी खातात. केवळ विरोधी राजकीय पक्षांना याबाबत जबाबदार ठरवून, दोष देता येणार नाही. अगदी शेतकरी संघटनेची कार्यकर्ते मंडळी ज्या काही थोड्या ठिकाणी सत्तेवर आली, तेथे तेथे साखर कारखाने, जिल्हा बँका, कृषी उत्पन्न बाजार समित्या, पंचायत समिती इत्यादी संस्थांत पुष्कळदा असेच घडले. निवडणूक जिंकली; पण

सत्ता राखता आली नाही, हा अनुभव काँग्रेसेतर सगळ्याच पक्षांचा आहे.

नरसिंह राव साहेबांच्या बढाईने काँग्रेसबाहेरील सर्वांनाच अंतर्मुख होऊन काही विचारचिंतन करण्याची संधी मिळाली आहे. या देशावर काँग्रेसचीच सत्ता राहणे अपरिहार्य आहे काय ? काँग्रेसखेरीज देशाला पर्याय नाही काय ? असे असेल तर त्याची कारणे काय ? या सर्व पक्षांचा विचार आवश्यक आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. शरद पवार यांनी मागे एकदा जाहीररीत्या म्हटल्याचे वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झाले होते, की काँग्रेसच्या ग्रामपंचायतीच्या सदस्यांना सत्ता टिकवण्याची जेवढी जाणबूज असते तेवढी विरोधी पक्षाच्या पंतप्रधानांनादेखील नसते. तात्पर्य, काँग्रेसला पर्याय नाही. त्यांनी कितीही गलथानपणे राज्य केले, भ्रष्टाचार केला, लूटमार केली; तरी काँग्रेसच सत्तेवर राहणार. कारण, विरोधकांत सरकार चालवण्याची क्षमताच नाही. शरद पवारांच्या या मग्रुरीमागे काही तथ्य आहे काय?

योगायोग असा, की याच वेळी मधू लिमये यांचे जनता पक्षाच्या राजवटीच्या अनुभवांसंबंधी एक पुस्तक प्रसिद्ध झाले आहे. जनता पक्षाच्या काळात समाजवादी आणि जनसंघवादी एकमेकांच्या कुरापती काढत राहिले, एवढेच नाही तर, जाहीररीत्या भांडततंडत राहिले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या दुहेरी निष्ठेचा मोठा कडाक्याचा वाद झाला आणि जनता पक्षाचे राज्य कोसळले. या सगळ्या प्रकरणात मधू लिमये यांचा मोठा हात होता. किंबहुना, जनता पक्षाचे सरकार पाडण्याचा बहुतांश दोष मधू लिमये यांचाच आहे असे मानले जाई. त्यामुळे मधू लिमयेंचे आत्मकथन महत्त्वाचे आहे.

त्यांनी अर्थात, आपल्या अंगावरचा दोषारोप झटकून टाकला आहे. जनता पक्षाची स्थापनाच मुळी चुकीच्या पायावर झाली. इंदिरा गांधी आणि आणीबाणी यांच्यविषयीच्या दाहक अनुभवांमुळे विरोधक तात्पुरते एकत्र आले. त्यांत चौधरी चरणसिंग, मोरारजी देसाई, जे. बी. कृपलानी यांचे व्यक्तिगत संघर्ष याचे मोठे चित्तवेधक वर्णन मधू लिमये यांनी केले आहे. ते स्वतः, जॉर्ज फर्नांडिस आदींनी सत्तेच्या अल्पकाळात उतामाताला येऊन, काही मर्कटलीला केल्या. त्याचे अर्थात, तपशीलवार विश्लेषण लिमयांच्या पुस्तकात विस्ताराने नाही; पण त्यांचाही निष्कर्ष असा, की जे घडले ते अपरिहार्य होते. मधू लिमयांच्या या पुस्तकाच्या निमित्तानेही पुन्हा प्रश्न उभा राहतो, की काँग्रेसला खरोखर पर्याय नाही काय ?

१९८९-९० सालच्या विश्वनाथ प्रताप सिंग यांच्या नेतृत्वाखालील जनता दलाच्या सत्ताग्रहणाच्या अनुभवाबद्दल अजून कोणी काही पुस्तक लिहिलेले नाही. त्या काळच्या घटना हताशपणे पाहण्याचे दुर्भाग्य ज्यांना लाभले, त्या सगळ्यांची धारणा स्पष्ट आहे, की वैयक्तिक हेवेदावे, पंतप्रधानांच्या खुर्चीला क्षणमात्र का होईना आपले बूड एकदा टेकावे अशी अगदी किरकोळ कार्यकर्त्यांच्या मनातील वासना यामुळे जनता दलाचे सरकार कोसळले; मंडल, कमंडल केवळ निमित्तमात्र.

काँग्रेसच्या बाहेर जो जो म्हणून पडतो, तो संपून जातो. नेताजी सुभाषचंद्र बोस काँग्रेसशी भांडून बाहेर पडले, फॉरवर्ड ब्लॉक नावाचा पक्ष त्यांनी स्थापन केला. नेताजींच्या आझाद हिंद फौजेच्या हौतात्म्याने ते अजरामर झाले; पण फॉरवर्ड ब्लॉक हा त्यांचा पक्ष बंगालच्या एका कोपऱ्यातून पुढेसुद्धा सरकला नाही. स्वातंत्र्याच्या चळवळीचा इतिहास लिहिताना नेताजींचा, झाला तर कोठे, अस्पष्ट उल्लेख होतो. एवढेच नाही तर, स्वातंत्र्याची चळवळ म्हणजे महात्मा गांधी, जवाहरलाल नेहरू आणि इंदिरा गांधींनी उभी केलेली वानरसेना असा अधिकृत काँग्रेसी इतिहास मांडला जातो.

१९४२ सालच्या आंदोलनानंतर क्रांतिकारी नेतृत्व म्हणून झळाळीने पुढे आले ते जयप्रकाश नारायण, अच्युतराव पटवर्धन, अरुणा असफ अली, नरेंद्र देव याचे. स्वातंत्र्य पाचदहा वर्षे उशिरा आले असते, तर काँग्रेसचे प्रस्थापित नेतृत्व बाजूला फेकले गेले असते आणि नवे उमेदीचे नेतृत्व पुढे आले असते, हे सर्वमान्य आहे. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर वर्षभरात समाजवादी काँग्रेसपासून फुटून निघाले. त्यांनी वेगळा समाजवादी पक्ष स्थापन केला. जमाना समाजवादाचा होता. सर्वत्र समाजवादाचा उद्घोष चालू होता. देदीप्यमान नेतृत्व उपलब्ध होते आणि तरीही १९५१ च्या सार्वत्रिक निवडणुकांपर्यंत म्हणजे अवघ्या तीन वर्षांत समाजवादी पक्षाचे तीनतेरा वाजले. काँग्रेसच्या बाहेर पडतो, तो संपतो. काँग्रेस पक्षातील कण्यांना सोन्याचे मोल आहे, विरोधातील बासमती कोंड्याच्या भावाने जातो, हा अनुभव अनेकांना आला. चंद्रशेखर, मोहन धारिया आणि कृष्णकांत हे तिघे काँग्रेसमध्ये तरुण तुर्क म्हणून गाजलेले. काँग्रेसमध्ये राहिले असते, तर नरसिंह राव, शंकर राव यांच्या कितीतरी वर असते; पण पक्ष सोडून बाहेर जाण्याची दुर्बुद्धी त्यांना झाली आणि ते संपले.

यशवंतराव चव्हाणांचा हाच अनुभव, विश्वनाथ प्रताप सिंगांचाही अनुभव तोच. शरद पवारांनाही हा अनुभव येऊन चुकला होता; पण गडी अस्सल बारामतीचा पैलवान! अंगाला तेल लावून, विरोधकांच्या पेचातून सटकावे कसे यात पारंगत. (काँग्रेस) संस्कृतीच्या गोष्टी बोलत ते अलगद परत गेले. पंतप्रधान होवोत, ना होवोत, त्या पक्षातील ज्येष्ठ नेत्यांत आज त्यांची गणना आहे. इंदिराजींच्या काळी महाराष्ट्रात पक्षाशी निष्ठा राखून राहिले, एवढाच ज्यांचा गुण असे अनेक गणंग अजूनही त्यांच्यावर खार खाऊन आहेत. काँग्रेस पक्षाचा सत्तेवर एकाधिकार नाही; पण ताबा आहे याचा संबंध त्यांच्या शासनाच्या कार्यक्षमतेशी, गुणवत्तेशी किंवा स्वच्छतेशी आहे असे महान पक्षाभिमानीदेखील म्हणणार नाहीत. नरसिंह रावांचे सरकार आल्यापासून शेअर घोटाळा, हर्षद मेहतांची सूटकेस, बोफोर्स प्रकरणातील माधव सिंह सोळंकींचा हस्तक्षेप अशी एकामागून एक प्रकरणे दर दोनचार महिन्यांनी निघतच असतात. काँग्रेस पक्षात सत्तेचा फायदा निग्रहाने न घेतलेले आणि सार्वजनिक आयुष्य वैराग्याने निभावून नेणारे, एक पैशाचाही गैरफायदा न घेतलेले असे कोणीही औषधापुरतेही शिल्लक नाहीत. जनता पक्ष किंवा जनता दल यांच्या राजवटीत मंत्रिमंडळात असे थोडेफार तरी लोक होते. आपल्या पक्षाच्या कार्यकर्त्यांचे विनंताअर्ज नि:स्पृहपणे फेटाळून लावणारे मंत्रीही होते. त्यांच्यावर कार्यकर्ते भयानक नाराज झाले. काँग्रेस मंत्र्यांपेक्षाही स्वत:च्या पक्षाच्या नि:स्पृह लोकांवर त्यांचा रोष अधिक. भ्रष्टाचारात लडबडलेली काँग्रेसची मंडळी सत्तेवर टिकून राहिली, भ्रष्टाचार धुऊन काढण्याच्या निश्चयाने जे सत्तेवर आले, ते टिकले नाहीत. काँग्रेसी भ्रष्टाचार विरोधकांच्या स्वच्छतेपेक्षा अंततोगत्वा लोकांना अधिक भावतो, याचा अर्थ काय?

काँग्रेस पक्षाकडे काही मोठा विचार, तत्त्वज्ञान किंवा कार्यक्रम होता असे नाही. याबाबतीत, म्हटले तर, विरोधकांची बाजूच सरस होती. जेथे जेथे म्हणून चूक करणे शक्य होते तेथे तेथे काँग्रेसने चुका केल्या. त्या काँग्रेसच्या चुकांमुळे चीनपुढे मानहानी स्वीकारावी लागली. काँग्रेसच्या चुकीमुळे जातीयवाद फोफावला, धर्मवाद माजला. स्वातंत्र्यानंतर सत्तेवर काँग्रेसचा अबाधित ताबा राहिल्याने देशात आज जे जे काही अमंगल, भयानक घडत आहे त्या सगळ्यांचीच जबाबदारी काँग्रेसच्याच शिरावर पडते आणि तरीही काँग्रेसचा सत्तेवर ताबा टिकून आहे.

अर्थकारणात तर काँग्रेसने घातलेले गोंधळ अवर्णनीय आहेत. राजकुमारी अमृत कौर यांच्या संकोचाची मर्यादा तुटू नये म्हणून लोकसंख्या नियंत्रण आणि कुटुंब नियोजन स्वातंत्र्यानंतर कित्येक वर्षे दुर्लक्षित राहिले. अन्नधान्याचा तुटवडा दूर करण्यासाठी परदेशांतून आयात करून साऱ्या शेतीक्षेत्राला संकटात टाकण्याचे काम काँग्रेसने आज या घटकेपर्यंत सातत्याने चालवले आहे. 'समाजवादी' शब्दाचादेखील वल्लभभाई पटेल आदी अनेकांना राग होता. समाजवादी पक्ष काँग्रेसमधून फुटून निघाला, ते काँग्रेसच्या समाजवादविरोधी भूमिकेमुळे. आवाडी काँग्रेसपर्यंत 'समाजवादी' असा शब्द वापरण्याची हिंमत पंडित नेहरूंचीही झाली नव्हती; समाजवादी धाटणीची समाजव्यवस्था असा अवडंबरी शब्दप्रयोग करावा लागला होता. त्यानंतर, इंदिरा गांधींनी ४२ व्या घटना दुरुस्तीने सारे गणराज्य समाजवादी असल्याची तरतूद करून टाकली, एवढेच नव्हे तर, समाजवादी विचाराच्या निष्ठेची शपथ घेतल्याखेरीज कोणालाच निवडणूक लढवता येणार नाही असा कायदा केला. त्यानंतर, दोन दशके उलटण्याच्या आधी त्याच काँग्रेस पक्षाने चुकतमाकत का होईना किंवा आपद्धर्म म्हणून का होईना, उलटे तोंड फिरवून, खुल्या बाजारपेठ व्यवस्थेकडे वाटचाल चालू केली. चक्रवर्ती राज गोपालाचारींच्या स्वतंत्र पक्षाचा काँग्रेसने धुव्वा उडवला आणि त्याच पक्षाची विचारधारा आणि कार्यक्रम घेऊन, काँग्रेस आज आगेकूच करत आहे, विजयी होत आहे आणि वाहव्वाही मिळवत आहे. हा काय चमत्कार आहे? याचा सखोल विचार करण्याची संधी रावसाहेबांच्या लाल किल्ल्यासमोरील शेखीने आणि मधू लिमयेंच्या पुस्तकाच्या प्रकाशनाच्या निमित्ताने मिळाली आहे.

काँग्रेसची सत्तेवर मजबूत पकड राहिली आहे हे खरे; पण याचा अर्थ निवडणुकीत काँग्रेसला फार प्रचंड प्रमाणावर मते मिळतात, असे नाही. आजपर्यंतच्या सगळ्या निवडणुकांत निम्म्याच्या वर मते मिळाली असे एकदाच घडले. १९८४ मध्ये राजीव गांधी ५१.५२ % मते मिळवून, जवळजवळ तीन चतुर्थांश जागा जिंकून गेले. विरोधकांची एकजूट झाली तर काँग्रेसला जिंकणे कठीण जाते, हे सर्वमान्य आहे. निवडणुकांच्या निकालांचा अंदाज घेणारे संख्याशास्त्रज्ञ विरोधी पक्षांच्या ऐक्याचा निर्देशांक काढतात. अशा तऱ्हेने केलेले अंदाज खूपसे बरोबर ठरतात असा अनुभव आहे. अनेक पक्ष असणारा भारत काही एकमेव देश नाही. फ्रान्ससारख्या

देशातही अनेक पक्ष आहेत; पण तेथे एका पक्षाची सत्तेवर अशी पकड दिसत नाही. याचे एक साधे तांत्रिक कारण लक्षात घेणे आवश्यक आहे. आपल्याकडे कोणत्याही मतदारसंघात सर्वांत जास्त मते मिळवणारा उमेदवार विषयी घोषित होतो, त्याला मिळालेली मतांची संख्या किती का कमी असेना, इतर कोणत्याही उमेदवारापेक्षा जास्त मते मिळाली, की तो निवडून आला. मतदारसंघातील बहुसंख्य लोकांनी ज्याला मत दिलेले नाही असाच उमेदवार बहुसंख्य ठिकाणी निवडून येतो आणि कायदेमंडळात जाऊन बसतो. भारतातील निवडणुकीचा तराजू दीड दांडीचा आहे. तीसपस्तीस लोकांचा एक गट पक्का असला, की तो मतांचे नाही तरी जागांचे वारेमाप पीक घेतो. याउलट त्याच्या खालोखालच्या लहान गटाच्या तोंडाला अगदीच पाने पुसली जाण्याची शक्यता असते.

यावर उपाय म्हणून फ्रान्समध्ये उमेदवारास निम्म्याहून अधिक मते मिळाल्याखेरीज विजयी घोषित केले जात नाही. कोणाही उमेदवाराला अशी मते मिळाली नाहीत, तर आठ दिवसांच्या अंतराने पुन्हा मतदान होते. त्यांत दोन उमेदवार उरतात आणि कोणी तरी एक, अर्ध्यापेक्षा जस्त मते मिळवतो तेव्हाच विजयी घोषित होतो. जर्मनीमध्ये पद्धत थोडी वेगळी आहे. तेथील मतदार कोणा उमेदवार व्यक्तीला मत टाकतच नाही. मते पक्षाला किंवा पॅनेलला दिली जातात. पक्षाला मते ज्या प्रमाणात मिळतील नेमक्या त्याच प्रमाणात त्यांना जागा दिल्या जातात. पक्षाच्या यादीतील तितके उमेदवार निवडले जातात. भारतातील निवडणुकींची पद्धत इंग्लंडमधील पद्धतीवरून उचलली गेली आहे. या पद्धतीत दोष आहेत, हे घटनाकारांना चांगले ठाऊक होते, तरीदेखील जाणीवपूर्वक अल्पसंख्येतील सर्वांत मोठ्या गटाला फायदा मिळावा आणि सरकार स्थिर राहावे अशा बुद्धीने जाणूनबुजून एक अशास्त्रीय, अन्यायकारक, दीड दांडीच्या तराजूची पद्धत आपल्याकडे लागू करण्यात आली. ही पद्धत हिंदुस्थानात नसती, तर काँग्रेस हरली असती, असे नाही. काँग्रेस उमेदवार इतर कोणत्याही पक्षापेक्षा जास्त जागा घेऊन निवडून आले असते; पण त्यांना इतर पक्षांशी समझोता करून आघाडीचे सरकार स्थापावे लागले असते. मनमानीचे एकपक्षीय, एकतंत्री आणि एक व्यक्तिमाहात्म्याचे सरकार शक्य झाले नसते. भारतातील निवडणुकीची अशास्त्रीय पद्धत काँग्रेसच्या पथ्यावर पडली आहे, हे निःसंशय.

पण, अशा तांत्रिक युक्तिवादाने काँग्रेसची सत्तेवरील पकड पूर्णपणे

समजत नाही. काँग्रेस जिंकते म्हणजे नेमके कोण जिंकते? महाराष्ट्रात सहकारी चळवळीतून पुढे झालेले धनदांडगे, शहरातील बांधकाम व्यावसायिक, लायसेंस-परमिट राज्यात चोरीमारी, तस्करी करणारे, हातभट्टी चालवणारे, सरकारी योजनांचा लाभ लाटणारे अशा अनेकांची युती काँग्रेसच्या झेंड्याखाली झाली आहे; पण हे विधानही तसे सगळ्या महाराष्ट्राला लागू नाही. प्रत्येक जिल्ह्यात काँग्रेसवर ताबा असणाऱ्या गटाचे स्वरूप एकसारखे आहे, असे मुळीच नाही. मुंबईतील काँग्रेसवाला वेगळा, चंद्रपूरमधील वेगळा, रत्नागिरी जिल्ह्यातील त्याहूनही वेगळा. केरळ राज्यात काँग्रेस मुसलमानांना जी आश्वासने देते त्याच्या नेमकी उलटी ईशान्येतील राज्यांत देते. काँग्रेस शहरांत वेगळी, गावांत वेगळी. काँग्रेसचा रंग काय? पाण्याचा रंग काय ? ज्यात मिळवाल तो पाण्याचा रंग. विचार नसणे, दिशा नसणे आणि परिस्थितीप्रमाणे सत्ता काबीज करण्यासाठी आणि टिकविण्यासाठी वाट्टेल ते करण्याची तयारी असणे हे काँग्रेसचे मोठे सामर्थ्य आहे.

दक्षिण महाराष्ट्रात सहकारी संस्था काँग्रेसला आर्थिक ताकद पुरवतात. मध्य प्रदेश, बिहारच्या मागास भागात सरकारी कंत्राटदार काँग्रेसचे मोठे समर्थक आहेत. मुंबईत कारखानदार काँग्रेसला खूष ठेवू पाहतात, गुजराथेत व्यापारी, तर हरियानामध्ये जाट शेतकरी; पण असा एकही प्रदेश नाही, की जेथे काँग्रेसच्या मागे आर्थिक प्रबळ सामर्थ्य नाही. याउलट, विरोधी पक्ष निवडणुकीपुरते निधी जेमतेम जमा करतात; पण काही कायमस्वरूपी आर्थिक संस्था विरोधकांच्या मागे असल्याचे उदाहरण कोठेच नाही.

काँग्रेसवाले एकमेकांना सांभाळून घेतात. एकमेकांत शंभर आणि पाच; पण दुसऱ्याशी विरोध करण्याचा प्रसंग आला तर मात्र एकशेपाच अशी एकी व्यवहारचतुर माणसांत सापडते. काही पदरी पाडून घेण्याकरिता निघालेली माणसे असा समजूतदारपणा दाखवतात. गाडगीळ शंकरराव चव्हाण, शरद पवारांवर काय वाटेल ते तोंड सोडोत आणि शरद पवार खासगीत नरसिंह राव यांच्याविरुद्ध काहीही बोलोत; पण शेवटी आपल्याबरोबर सगळा पक्ष खाली नेण्याची चरणसिंगी आणि देवीलाली खेळी ते कधीच खेळत नाहीत. याउलट, विरोधकांचे आहे त्यांचे एकमेकांत फाटले, की काँग्रेसपेक्षा आपला जुना साथीदार त्यांना अधिक भयानक शत्रू वाटू लागतो. कम्युनिस्ट आणि मार्क्सवादी यांत वितंड माजले, तर

कोलकत्त्यातील रस्त्यांत त्यांनी एकमेकांचे जितके रक्ताचे पाट वाहवले तितके साऱ्या नक्षलवादी चळवळीत वर्गशत्रूंचेसुद्धा वाहवले नाहीत. जनता दलाच्या काळात सुब्रह्मण्यम् स्वामी व्ही. पी. सिंगांवर मोठे नाराज झाले. माझ्यासमक्ष ते म्हणाले होते, 'काँग्रेस शत्रू खरा, राजीव गांधीला सत्तेवर पुन्हा येऊ देता कामा नये, हे खरे; पण पहिल्यांदा विश्वनाथ प्रताप सिंगांना संपले पाहिजे. इतका सुशिक्षित, सुसंस्कृत माणूस; पण अतिअभद्र शब्दांचा वापर करत त्यांनी जाहीर केले, 'विश्वनाथ प्रताप सिंगांना संपवल्याखेरीज माझ्या आत्म्याला समाधान वाटणार नाही.' विरोधकांना काँग्रेस विरोधापेक्षा आपापसांतील विरोध अधिक भयानक वाटतात. या उलट, काँग्रेसवाले मात्र सत्तेबाहेर राहण्यापेक्षा अगदी किरकोळ जागीपण सत्तेशी जोडून राहावे अशा चातुर्याचे. काँग्रेसच्या ताकदीचे हे एक रहस्य आहे.

काँग्रेसची तुलना हिंदू धर्माशी करता येईल. हिंदू धर्माची व्याख्या कोण करू शकेल ? नरबळी देणारेही हिंदू आणि कोणाही प्राणिमात्राच्या हिंसेच्या केवळ कल्पनेने कासावीस होणारेही हिंदू. हिंदू धर्माने माणसाला जितके नीच केले, त्यावर अन्याय केले तितके दुसऱ्या कोणत्याच संस्थेने केले नाही. हिंदू धर्मीयांच्या इतिहासात जागोजागी पराभव झाला आणि तरीही आज 'महापुरे झाडे जाती तेथे लव्हाळी वाचती,' तसा हिंदू धर्मही टिकून आहे. काँग्रेसही टिकून आहे.

या सर्वांहूनही काँग्रेसची ताकद ऐतिहासिक वडीलकीत आहे; इंग्रज आल्यानंतर स्थापन झालेला पहिला पक्ष. त्यानंतर काही थोडेथोडके पक्ष तयार झाले काय ? पण जहालवादी लोकमान्य टिळक काँग्रेसमध्ये जाऊन सूरतच्या अधिवेशनात दंगल पाहायला तयार झाले; पण त्यांनी स्वतंत्र पक्ष काढला नाही. महात्मा गांधी दक्षिण आफ्रिकेतून आले, त्यांनीही काँग्रेसचाच आधार घेतला. बूट-पाटलोणवाल्या काँग्रेसला पंचा नेसणाऱ्या महात्म्याने नखशिखान्त बदलून टाकले. या इतिहासामुळे काँग्रेसचे नाव देशाच्या कानाकोपऱ्यात आहे. बहुसंख्य निरक्षर लोक, वाहतुकीची साधने दुर्मिळ, संचार-व्यवस्था कठीण अशा देशात दुसरा कोणता पक्ष निघाला, तर त्याचं नाव सर्व देशभर पसरण्याच्या आधी निवडणुकीत त्याचा नि:पात होऊन, निकालसुद्धा लागून जातो. देशाचा प्रचंड विस्तार, लोकांची निरक्षरता आणि आर्थिक दारिद्र्य; यांमुळे तुकडे-तुकडे झालेल्या देशात केवळ ऐतिहासिक वडीलकीच्या आधारावर काँग्रेस बाजी मारून जाते.

काँग्रेसची स्थिती भारतीय गायीसारखी आहे. दुधाच्या कामी नाही, शेणाच्या कामी नाही; पण दुष्काळ पडला तरी टिकून राहते, मरत नाही आणि धन्याला कधी अपरंपार श्रीमंतही करत नाही; तरीही ती ज्या कारणाने पूज्य ठरते, त्याच कारणाने काँग्रेसही लोकमान्य ठरते.

तुकडे तुकडे झालेला हा देश पुन्हा एकसंध होईल, आधुनिक तंत्रज्ञानाच्या आणि जागतिक अर्थव्यवस्थेच्या वाऱ्याच्या संपर्काने लोक अगतिकता सोडून देतील, त्या वेळी कदाचित दुसरा कोणी पक्ष काँग्रेसशी तुल्यबळ पकड सत्तेवर मिळवू शकेल. तोपर्यंत सर्व देशभर सर्वंकष सत्ता कोणी विरोधी पक्ष मिळवू शकेल अशी चिन्हे आज तरी नाहीत.

पंतप्रधान नरसिंह रावांची आणि शरद पवारांची काँग्रेसबद्दलची बढाई वास्तवाला सोडून नाही. त्यांत काँग्रेसवाल्यांना कदाचित अभिमानही वाटेल, सगळ्या देशाच्या दृष्टीने काँग्रेसला पर्याय नसणे, ही मोठी दुर्दैवी घटना आहे.

(६ ऑगस्ट १९९४)

◆◆

लोकसभा निवडणुका १९८९

१७ नोव्हेंबर रोजी शेतकरी संघटनेच्या उच्चाधिकार समितीची विशेष बैठक बोलाविण्यात आली. अगदी तातडीने बोलावण्यात आली. केवळ फोनवरती निरोप देऊन, समितीचे सगळे सदस्य, त्याखेरीज संघटनेचे तीनही उपाध्यक्ष आणि चौघेपाचजण विशेष निमंत्रित अशा सगळ्यांना केवळ सांगोवांगी निरोप पोहोचला आणि तरीसुद्धा जवळजवळ सगळे निमंत्रित उपस्थित राहिले.

माझ्या उपोषणाचा सहावा दिवस होता. बोलायला थोडाफार त्रास होत होता; तरीदेखील मी बैठकीच्या कामकाजात सगळा वेळ भाग घातला. मधून मधून डॉक्टर लोक तंबी देत होते. आता बसू नका, बोलू नका, तरीदेखील मी सगळा वेळ बैठकीत राहिलो.

अमरावतीला कार्यकारिणीची बैठक झाली होती. निवडणुका, उपोषण आणि चक्का जाम आंदोलन यांच्या आधाराने शेतकऱ्यांच्या स्वातंत्र्याचा लढा लवकरात लवकर कसा यशस्वी करता येईल याची तपशीलवार चर्चा अमरावतीला झाली होती. अमरावतीलाच भरलेल्या किसान समन्वय समितीच्या बैठकीत देशभरच्या शेतकरी संघटनांनी निवडणुका आणि आंदोलन यासंबंधित निर्णय घेण्याचे सर्व अधिकार माझ्याकडे सोपवले होते. देशातील बहुतेक राज्यांत मतदान बहुतेक २२ तारखेलाच सुरू व्हायचे असल्याने उशिरात उशिरा १७ तारखेला यासंबंधी निर्णय जाहीर करणे आवश्यकच होते; एरव्ही ते निर्णय देशाच्या कानाकोपऱ्यात पोचणे शक्य झाले नसते.

१७ तारखेच्या बैठकीत व्हायचे निर्णय तातडीचे आणि ऐतिहासिक महत्त्वाचे हे खरे; पण निर्णय तसे काही कठीण नव्हते. शेतकरी संघटनेची राजकारणाविषयीची गेल्या आठ वर्षांत सुसूत्रपणे मांडलेली भूमिका लक्षात

घेतली, तर उच्चाधिकार समितीने जो निर्णय घेतला, त्या निर्णयाला काही पर्यायच नव्हता.

आजची सर्व आर्थिक, सामाजिक व्यवस्था शेतकऱ्याच्या शोषणावर अवलंबून आहे. सर्वच राजकीय पक्ष 'इंडिया'चे आहेत, भारताचा कुणीच नाही; निवडणुका म्हणजे शेतकऱ्यांना लुटण्याचा ठेका पाच वर्षे कुणी घ्यायचा याचाच निर्णय आहे; निवडून कुणीही आले, निवडून कोणताही पक्ष आला आणि निवडून आलेला उमेदवार कितीही धीरोदात्त नायक असला, तरी चालू व्यवस्थेत त्यामुळे शेतकऱ्यांच्या शोषणाचा प्रश्न सुटायला काहीसुद्धा मदत होणार नाही, ही शेतकरी संघटनेने सातत्याने घेतलेली भूमिका आहे.

निवडणुकीच्या निकालाविषयी ही उदासीनता म्हणजे काही निवडणूक प्रक्रियेविषयीची उदासीनता नाही. निवडणुकांविषयी संघटनेचे कार्यकर्ते उदासीन राहिले, तर मग राजकारणी चोरांचे चांगलेच फावेल. संघटनेने निवडणुकांचा उपयोग करायचा आहे; पण तो उपयोग संघटनेचे आंदोलन सामर्थ्य वाढविण्यासाठी करावयाचा आहे. अगदी मतदान केंद्रे उघडू न देण्यापासून ते मतदानावर बहिष्कार, वेगवेगळ्या पक्षांना वेगळ्या तऱ्हेने पाठिंबा किंवा विरोध किंवा अगदी टोकाला जायचे म्हटले, तर प्रत्यक्षपणे निवडणुकांसाठी उमेदवारही उभे येथपर्यंत वेगळे वेगळे मार्ग आहेत; पण त्या सगळ्यांचा उद्देश निवडणुकीत कुणाला जिंकवून त्याच्याकडून शेतीमालाच्या भावाचा प्रश्न सुटेल अशी आशा करणे नाही. जो मार्ग स्वीकारला जाईल, त्याचा उद्देश एक-शेतीमालाला भाव मिळविण्याकरिता संघटनेचे आंदोलनाचे सामर्थ्य वाढवणे.

पक्षोपपक्षांत आवडते-नावडते करायला जाणे म्हणजे उडदामाजी काळेगोरे निवडू पाहण्यासारखे आहे. आज जे या पक्षात ते उद्या उडी मारून दुसऱ्या पक्षात जातात. कोणाही पक्षाकडे देशाला नवीन दिशा देणारा विचार नाही, चारित्र्यही नाही, कर्तबगारीही नाही आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे तळमळही नाही. एक एक पक्ष म्हणजे एकाएका बलदंड व्यक्तीच्या महत्त्वाकांक्षेचे साधन. कोणाही एका पक्षावर गुणवत्तेच्या आधाराने जीव लावावा असे काही नाही; पण संघटनेच्या आंदोलनांना यश मिळायचे असेल, तर त्याकरिता एक महत्त्वाची शर्त पुरी झाली पाहिजे. यातला कोणताही एक पक्ष फार बलदंड होता कामा नये. पक्ष फार सामर्थ्यवान

झाला तर त्याचा उपयोग देशाचे आणि देशाबाहेरचे प्रश्न सोडविण्याकरिता होत नाही; त्याचा उपयोग, सगळ्यांत जास्त, शेतकऱ्यांना लुटण्याकरिताच होतो. त्यामुळे सत्तेचा समतोल राखणे हे संघटनेच्या राजकारणातील धोरणाचे महत्त्वाचे सूत्र. १९८४ च्या निवडणुकांत, इंदिरा गांधींच्या हत्येनंतर विरोधी पक्ष अजिबात नष्ट होऊन जातील अशी परिस्थिती तयार झाली तेव्हा संघटना राजकीय समतोल ढळू नये यासाठी त्यांच्यामागे उभी राहिली.

सगळे पक्ष सारखेच असे म्हटले, तरी वेगवेगळ्या कारणांनी नेहरू घराण्याचा अंमल स्वातंत्र्याच्या ४२ वर्षांपैकी ४० वर्षे चालला. स्वातंत्र्यानंतर शेतकऱ्यांवर जी अवकळा आली, त्या पापाचे बहुतेक सगळे रांजण इंदिरा काँग्रेसच्या घरातच भरले; म्हणून इंदिरा काँग्रेस शेतकऱ्यांची शत्रू नंबर एक ही कल्पना संघटनेने अनेक वेळा मांडली आहे व नांदेडच्या अधिवेशनाच्या ठरावात त्याचा पुनरुच्चार करण्यात आला; पण त्याबरोबर विरोधी पक्षांपैकी कुणासही सर्व शक्तीने मदत करावी अशीही कार्यकर्त्यांत भावना नाही, हेही त्याच ठरावात स्पष्ट करण्यात आले.

शत्रू नंबर १ आणि शत्रू नंबर २ हा हिशेब मांडत असताना गेल्या काही वर्षांत एक नवा महाराक्षस राजकीय मंचावर आला आणि त्याचे नाव जातीयवादाचा भस्मासुर. लोकांच्या दररोजच्या पोटापाण्याचा प्रश्न असतो. पोटापाण्याच्या आणि मीठभाकरीच्या या असंतोषातून काही एक प्रबळ लढा उभा राहतो असे दिसले, की नेमके जातिधर्माची एक वावटळ येते आणि कष्टकरी शोषित स्त्री-पुरुषांचे प्रश्न मागे पडतात, हा इतिहासाचा सतत मिळालेला अनुभव आहे. हा लढा मोपल्यांच्या बंडाने शिकवला. देशाच्या फाळणीने शिकवला आणि पंजाबातील आतंकवादानेही शिकवला.

राजकीय सत्ता काबीज करायची, तर त्याकरिता संघटना बांधायची दगदग करण्याची काय आवश्यकता ? ज्यांच्या हातात सत्ता आहे ते लोकांना आकर्षित करण्यासाठी वेगळे वेगळे उत्सवमहोत्सव साजरे करतात आणि हाती सत्ता नसलेले फटीचर आपापल्या धर्मांच्या नावाने बांग देतात.

आपले पूर्वज, आपला धर्म, आपली जात, आपली भाषा आणि त्याबरोबर काही अभद्र वाक्प्रचार वापरले, की विनाकारणच आपल्या पौरुषाला आव्हान होते आहे असे, अगदी आयुष्याची धूळधाण झालेल्या सुदाम्यालापण वाटू लागते. असे वातावरण तयार झाले, की कोणत्या न् कोणत्या गावी, कोठे ना कोठे, काही ना काही निमित्ताने एखादी ठिणगी

उडते आणि जातीय दंगलींचा कल्लोळ उठतो; पण जातीय दंगली म्हणजे आता एकदोन डोकी फुटणे, चारपाच सुरामारीचे प्रकार, काही घरांना आगी अशा मर्यादित स्वरूपाच्या राहिल्या नाहीत. १९४७-४८ च्या कत्तलींनासुद्धा लाजवतील असे प्रकार हरहमेश श्रीनगर, गुरुदासपूर, मीरत, भागलपूर अशा अनेक ठिकाणी घडत आहेत. जातीयवादी समाजाचे समाज गुन्हेगार बनविण्याचे प्रयत्न करीत आहेत. असे दंगे पेटले म्हणजे जे ते मेंढरू आपापल्या कळपात जाते, जातीयवादी विद्वेष वाढत जातात म्हणजे जातिविद्वेषाचे राजकारण करणाऱ्या सर्वांचे फावते.

इंदिरा काँग्रेस हा शत्रू नंबर १ खरा; तोही काही जातीयवादापासून फार दूर आहे असे नाही. चोरूनछपून तेही जातीयवादाला खतपाणी घालतच असतात; पण खुलेआम क्षुद्रवादाला प्रतिष्ठा प्राप्त करून देण्याचे पाप तरी ते करीत नाहीत.

इंदिरा काँग्रेस शत्रू नंबर १ तर जातीयवादाचा भस्मासुर त्याहीपेक्षा मोठा शत्रू हा विचारही नांदेडच्या अधिवेशनातील ठरावात अगदी स्पष्टपणे मांडण्यात आला होता.

उच्चाधिकार समितीच्या बैठकीत घ्यायचा निर्णय या पार्श्वभूमीवर तसा खूप सोपा होता. शत्रू नंबर १ ला विरोध करणारी जी जी काही समर्थ ताकद असेल, तिला पाठिंबा द्यायचा; पण शत्रू नंबर १ ला विरोध करायला फक्त जातीयवादी भस्मासुरच उभा असेल, तर अशा प्रसंगी शत्रू नंबर १ च्याही मदतीस धावून जाणे आवश्यकच नव्हे, अपरिहार्य होते. लोकसभेच्या निवडणुकीत महाराष्ट्र राज्यात जातीयवाद्यांचे उच्चाटन होणे सर्वप्रथम उद्दिष्ट झाले. निवडणुकीनंतर केंद्रात येणारे शासन कशा प्रकारचे असेल, त्याचे आसन कितपत स्थिर असेल यासंबंधी ज्या ज्या काही शक्यता दिसतात, त्या सर्वच्या सर्व शेतकऱ्यांच्या निर्णायक लढ्यास अधिक सोईस्कर असणार आहेत आणि त्यामुळे आंदोलन निडणुकीपर्यंत स्थगित करावे, हेही अपरिहार्यच होते. आंदोलनाचा बडगा निवडणुकीच्या उंबरठ्यावर दाखवण्याचा जो काही हेतू होता, तो बव्हंशी साध्य झालेलाच आहे.

निवडणूक धोरण, उपोषण आणि आंदोलन या तीन सूत्रांनी बांधलेली रणनीती कार्यकारिणीने तयार केली, त्याची सर्व पूर्वपीठिका अशी आहे.

दरवेळी अशा प्रकारचा निर्णय झाला, की त्याला काही कुठे ना कुठे विरोध होतोच. नगर जिल्ह्यातील कोणा एका तालुकाप्रमुखाने विरोध जाहीर

केला; नाशिक जिल्ह्यातील एका वर्तमानपत्रात खोट्या सह्यांनी संघटनेचा आदेश धुडकावून लावावा अशा जाहिराती छापल्या गेल्या; पण काही व्यक्तिगत स्नेह्यांनीसुद्धा या धोरणाविषयी शंका व्यक्त करणारी पत्रे लिहिली. शिवीगाळ करणारी अनामिक पत्रेही आली. शेतकरी संघटनेचा १७ नोव्हेंबरचा निर्णय इतका तर्कशुद्ध आणि सुसंगत असताना त्यासंबंधी इतपतही खळखळ होण्याचे खरे म्हणजे काही कारण नव्हते; मग असे का घडले ? मला वाटते अशा विरोधाचे पहिले कारण स्थानिक सोयगैरसोय आहे. ज्या मतदारसंघात, विशेषत: काँग्रेस आयच्या उमेदवारांना पाठिंबा देण्याचे ठरले होते, तेथील कार्यकर्त्यांमध्ये थोडी नाराजी यावी, हे समजण्यासारखे आहे; पण अशी परिस्थिती एकूण ९ मतदारसंघांत होती. त्यांपैकी दोन मतदारसंघांत थोडीफार खळबळ झाली. ज्यांनी तक्रार केली, ती त्यांची जातीयवादी पक्ष व संघटना यांच्याशी संबंधाची आहे. शेतकरी संघटना कोणत्याही पक्षाची कैवारी नाही, हा विचार अजून अनेकांच्या मनात खराखुरा मुरलेला नाही. शेतकरी संघटना विरोधात उभी राहते म्हणजे राज्यकर्त्या पक्षाविरुद्ध वापरण्यास चांगले हत्यार आहे अशा हिशेबाने जी मंडळी संघटनेजवळ आली, त्यांची १७ नोव्हेंबरच्या निर्णयाने मोठीच कुचंबणा झाली.

या खेरीज निवडून आलेला उमेदवार लोकसभेत गेला, तरी तो शेतीमालाच्या भावाकरिता काहीही करू शकत नाही, ही कल्पनाही अजून कार्यकर्त्यांच्या मनात पाहिजे तितकी रुजली नाही. कोणताही पक्ष येवो किंवा निवडून आलेला उमेदवार कितीही थोर असो, लोकसभेच्या सभागृहात शेतकऱ्यांची निर्णायक लढाई होऊ शकत नाही. याबद्दल आवश्यक ती स्पष्टता कार्यकर्त्यांच्या मनात नाही.

अमक्या अमक्या उमेदवाराने शेतकरी संघटनेस फार त्रास दिला, शरद जोशींना व्यक्तिश: शिव्या दिल्या. अशा माणसांना तरी मते द्यायला सांगू नका; पण उमेदवाराची वैयक्तिक गुणवत्ता हा मुळीच मुद्द्याचा विषय होऊच शकत नाही. हे सूत्र एकदम समजले म्हणजे अशा तऱ्हेच्या आक्षेपांना जागाच राहत नाही आणि शेतकरी संघटनेला कहार आणि शरद जोशींना शिव्या देणारे नेते काय फक्त राज्यकर्त्या पक्षातच आहेत ? ते सगळ्याच पक्षांत, जवळजवळ सारख्याच प्रमाणात आहेत.

अशा तऱ्हेचे आक्षेप घेतले जावेत, शंका विचारल्या जाव्यात, अगदी

परखडपणे विचारल्या जाव्यात, हे योग्यच आहे. १९८० मध्ये मी म्हटले होते, की आंदोलनांच्या डावपेचासंबंधी तुमच्या मनात येतील ते प्रश्न अवश्य विचारा; पण काही प्रश्नांना मी लगेच उत्तरे दिली नाहीत, तर राग मानू नका. लढाईतील डावपेचासंबंधी सगळीच रहस्ये खुली करण्यासारखी नसतात. याचा फायदा घेऊन, जातीयवादी शरद जोशी विकले गेले अशा हाकाट्या मारू लागतील. संघटनेने ठरवलेले धोरण जातीयवादाला रोखणारे आहे याचा हा पुरावा आहे. शेतकऱ्यांच्या स्वातंत्र्यवर्षाच्या लढाईचा अंतिम चरण अगदी नजीक आला आहे. लढाई जिंकल्यानंतर विजयोत्सवानंतर या रणनीतीचे सगळे अर्थ सांगता येतील आणि समजूही शकतील. तोपर्यंत "सौराज्य मिळवायचं औंदा" एवढा एकच विचार मनात बाणवून ठेवावा.

(६ नोव्हेंबर ९४)

◆◆

अपात्र नेत्यांनी मांडलेली जनतेची अग्निपरीक्षा

(लोकसभा निवडणूक १९९१)

१९९१ सालची लोकसभेची मध्यावधी निवडणूक आजपर्यंतच्या सर्व निवडणुकांपेक्षा वेगळीच दिसते आहे.

निवडणूक प्रचारासाठी साधारणत: तीन आठवड्यांचा अवधी मिळतो. सर्वच पक्ष आणि सगळेच उमेदवार या तीन आठवड्यांतल्या दिवसान् दिवसाचा, प्रत्येक तासाचा, अगदी मिनिटाचासुद्धा दिवस रात्र न पाहता; थंडी, वारा, ऊस, पाऊस यांना न जुमानता, मतदारांशी संपर्क साधण्याच्या प्रयत्नासाठी वापर करण्यास धडपडतात. यंदाच्या निवडणूक प्रचारात असा उत्साह उमेदवारांतही दिसत नाही आणि मतदार जनतेत तर त्याहूनही नाही.

जास्तीत जास्त भर महागड्या प्रचंड फलकांवर, झेंडे आणि कापडी फलकांच्या वापरावर आणि श्राव्य व दृक्श्राव्य कॅसेटवर आहे. सर्व पक्षांचे राष्ट्रीय नेते विमानाचा वापर करून, इकडेतिकडे धावत आहेत. त्यांच्या भाषणांना दहावीस हजारांवर माणसे कोठेच जमत नाहीत. अनेकांच्या सभांना तर काही ठिकाणी दोनपाचशे माणसे जमा करणेसुद्धा मुश्किल झाले आहे.

औटघटकेचे पंतप्रधान चंद्रशेखर यांना आपल्याला भवितव्य नाही, याची स्पष्ट कल्पना येऊन गेली आहे. त्यांच्या आसपास अगदी किमान गुणवत्तेचासुद्धा एकही माणूस नाही; पण चंद्रशेखर यांची पंतप्रधान म्हणून स्वत:ची प्रतिमा मात्र चांगली उजळ राहिली आहे. चंद्रशेखरांच्या हाती जमेची बाजू त्यांची व्यक्तिगत प्रतिमा एवढीच आहे. 'सर्वांत गचाळ पक्षाचे सर्वोत्तम नेते,' असे एका व्यंगचित्रकाराने त्यांचे वर्णन केले आहे. त्यांच्या वैयक्तिक प्रतिमेतून काही चमत्कार घडवून आणता येईल अशा आशेने त्यांची धडपड चालू आहे. काळजीवाहू शासनाने धोरणात्मक बदल काही

करू नयेत, हा संकेत त्यांनी पार उधळून लावला. पंजाबमध्ये निवडणुका घेण्या न घेण्याचे ठरवणे, हा मोठा जटिल प्रश्न. अगदी सुस्थिर शासनाच्या पंतप्रधानांनाही याविषयी निर्णय घेणे शक्य झाले नाही; पण देवदूतसुद्धा जे करायला कचरतात, त्याबद्दल पागल माणसाला भीती वाटत नाही. पंजाबमध्ये निवडणुका जाहीर झाल्या, उमेदवारांनी अर्ज भरले, त्यांतील विधानसभेच्या सहा मतदारसंघांत आणि लोकसभेच्या एका मतदारसंघात स्वतंत्र उमेदवारांचे खून आतापर्यंत पडले आहेत. त्यामुळे तेथील निवडणुका आधीच स्थगित झाल्या आहेत. निवडणुकीच्या तारखेपर्यंत आणखी काय काय होईल, ते पाहत राहणे, या पलीकडे सर्वसामान्य जनांच्या हाती काहीच नाही.

अशी भयानक परिस्थिती पंजाब, आसामपुरतीच मर्यादित आहे असे नाही. लोकसभेत प्रभुत्व गाजविणारी दोन राज्ये म्हणजे उत्तर प्रदेश आणि बिहार. खासदारांची सर्वांत मोठी संख्या या दोन राज्यांत आहे. दोन्ही राज्यांत सर्वच पक्षांनी हाताशी गुंड धरून, हैदोस सुरू केल्याचे दिसत आहे. गया येथील लोकसभेच्या एका उमेदवाराचा खून झाला आहे. शेवटपर्यंत किती लोकांचे जीव धोक्यात येतात, किती रक्तपात होतो, मतदान केंद्रांवर किती ठिकाणी छापे घालण्यात येतात आणि खोटे मतदान किती होते याची कल्पनासुद्धा करणे आज कठीण आहे. दिल्लीवर राज्य कोणत्याही पक्षाचे येवो, त्या पक्षाच्या खासदारांचे बोलविते धनी बिहार आणि उत्तर प्रदेशचे गुंडच राहणार अशी ही भयानक परिस्थिती आहे.

थोडक्यात, या निवडणुकीच्या निमित्ताने भारतीय घटनेतील शेवटची संस्था कोसळून पडत आहे. राज्यांची स्वायत्तता कधीच संपली. मुख्यमंत्री निर्माल्य झाले. लोकसभा दंग्याधोप्यांचा आखाडा झाला, मंत्रिमंडळ नामधारी झाले. न्यायसत्ता प्रतिष्ठा गमावून बसली, पत्रकारितेतील प्रामाणिकतेची विक्री झाली. ४४ वर्षांच्या या अधोगतीत भर पडली, ती निवडणूक आयोगाच्या सर्वाधिकाराबद्दल जबरदस्त शंका निर्माण होऊन.

पक्षांजवळ सांगण्यासारखेसुद्धा काही राहिले नाही. सर्व पक्षांचे जाहीरनामे म्हणजे या किंवा त्या गटाला खुश करण्यासाठी करावयाच्या कामांची जंत्री आहे. आर्थिक-सामाजिक दृष्ट्या त्यांत काही सूत्रबद्धता शोधायला जाणेसुद्धा निरर्थक आहे. अगदी एकही अपवाद न करता, सर्वच जाहीरनामे कचऱ्याच्या पेटीत टाकून देण्याच्या लायकीचे आहेत.

४० वर्षे देशाच्या अध:पतनास जबाबदार असलेली काँग्रेस सगळ्या दोषांचे खापर दोनचार वर्षेच सत्ता हाताळलेल्या विरोधी पक्षांवर टाकू पाहत आहे. बिकट आर्थिक परिस्थितीस आणि राजकीय परिस्थितीस तोडगा काढणे आपल्यालाही शक्य नाही, हे काँग्रेस नेत्यांनाही माहीत आहे. किंबहुना, पंजाब काय, काश्मीर काय, आसाम काय या सर्व समस्यांचा जनकच काँग्रेस पक्ष. देशातील बेकारी, महागाई, चलनवृद्धी, भ्रष्टाचार, कर्जबाजारीपणा हे पातक कोणाचे ? खरे म्हटले तर इंदिरा काँग्रेस शहाजोगपणाचा आव आणून, हे प्रश्न सोडवू न शकण्याचा दावा करते, हे हास्यास्पद आहे आणि लोक असे दावे ऐकून घेतात, हे चित्र एकाच वेळी करुण आणि विनोदी आहे.

मग, लोकांना आकर्षित करण्यासाठी इंदिरा काँग्रेस पक्षाकडे कार्यक्रम कोणता ? सगळी काही घोषवाक्ये वापरून झाली. 'गरिबी हटाव' या घोषावर एक निवडणूक जिंकली. त्यानंतर गरिबी वाढतच गेली. 'राष्ट्रीय एकात्मते'वर दुसरी निवडणूक जिंकली. त्यानंतर देशाच्या चिरफळ्या पडल्या. 'काम करणारं शासन' म्हणून आरोळी ठोकून तिसरी निवडणूक जिंकली आणि सर्व शासनच ठप्प झाले. आता देण्यासारखे घोषवाक्य एकच राहिले. इंदिरा काँग्रेस स्थैर्य देऊ शकते. कारण, पक्ष घराणेशाहीला बांधलेला आहे. निदान, पंतप्रधान कोणी व्हावे याबद्दल तरी या पक्षात वाद नाही. जनतेने पुरेसे बहुमत काँग्रेसच्या पदरात टाकले, तर पंतप्रधानांची खुर्ची स्थिर राहील यात बरेचसे तथ्य आहे; पण एक पंतप्रधानांची खुर्ची सोडली तर स्थिर काहीच राहत नाही. केंद्रीय मंत्रिमंडळ नाही, मुख्यमंत्री तर त्याहूनही नाही. पुण्यातील इंदिरा काँग्रेसच्या उमेदवारांनी आपल्या जाहिरातीत एक व्यंगचित्र वापरले आहे. एक मध्यमवयीन जोडपे. त्यातील पत्नी म्हणते, 'आपले तरी कुठे पटत होते ? पंधरा वर्षे आपण केलाच ना संसार ? विरोधी पक्षाच्या लोकांना एवढेसुद्धा जमत नाही.' थोडक्यात, सुखी, संपन्न, कृतकृत्य करणाऱ्या संसाराची आता आशासुद्धा राहिली नाही. देवाने गाठी बांधल्या आहेत, मग एक दिवस मरण येईपर्यंत संसार कसाबसा निभावून न्यायचा आहे, हीच आता सर्वोच्च आकांक्षा!

भारतात तसा स्थिरतेचा तुटवडा कधी पडला नाही. इंग्रजांनी, काठीला सोने बांधून काशीपर्यंत बिनधास्त जाता येईल अशी व्यवस्था केली, तेव्हापासून इंग्रजांच्या राज्यात अगदी छान स्थिरताच होती ! स्वातंत्र्यानंतर काँग्रेसच्या ४० वर्षांच्या राज्यात दोन पंतप्रधान अगदी यमुनाकाठी नेईपर्यंत

स्थिरच राहिले; पण या स्थिरतेचा लाभ सर्वसामान्य जनांना झाला नाही. अस्थिरतेचा बागुलबुवा दाखवून, सर्वसामान्यांना लुटून मूठभर लोकांचीच धन करण्यात आली. पंजाब, काश्मीरसारखे प्रश्न अगदी सज्जड स्थिर शासनाच्या कालावधीतच तयार झाले. अस्थिरतेतुळे देशापुढे प्रमुख समस्यांपैकी कोणतीही एक निर्माण झाली असे तर नाहीच, उलट देशापुढील सर्वांत मोठी समस्या म्हणजे अपात्र नेत्यांच्या हाती आलेले स्थिर शासन. सैरभैर झालेल्या लोकांनी मोठ्या आशेने कोणा एक नेत्याच्या पदरी भरघोस मतदान टाकावे आणि त्या नेत्याने मिळालेल्या सामर्थ्याचा उपयोग स्वत:चे आसन स्थिर करण्यात आणि आर्थिक मनमानी करण्यात करावा असे वारंवार झाले. आणखी एक स्थिर शासन देशाला मिळाले तर या देशाला वाचविणे अशक्य होईल.

सर्वसमर्थ बहुमत ज्याला मिळावे अशा पात्रतेचा एकही नेता देशात नाही. अशा अपात्र नेत्यांपैकी एकाच्या हाती स्थिर बहुमत आले, तर सत्तामदाने त्या नेत्याचे डोके फिरेल यापलीकडे काही व्हायचे नाही. सगळेच किरकोळ प्रकृतीचे काडीपैलवान आहेत. त्यांपैकी कोणा एकाला बदामाची खीर पाजली म्हणजे तो काही 'हिंदकेसरी' होणार नाही. हे सगळे किरकोळ पैलवान एकत्र आले आणि निष्ठेने देशापुढील प्रश्न सोडवण्याच्या कामास लागले, तरच देशाला काही आशा आहे. स्थिर शासन, मख्ख शासन! लोकांच्या समस्यांबद्दल संवेदनशील राहण्याची मख्ख शासनाला काही गरजच नसते. नोकरशाही मोठी स्थिर आहे, पेन्शन मिळेपर्यंत त्यांना अस्थिरतेचा धोका काहीच नाही. पण, स्थैर्याने नोकरशाहीची गुणवत्ता वाढली नाही. ती अधिक मग्रूर, बेजबाबदार आणि उदंभरी झाली, मख्ख झाली.

स्वातंत्र्यानंतरच्या सुरुवातीच्या काळात लहानशा दु:खाबद्दल किंवा छोट्याशा अन्यायाबद्दलसुद्धा पार लोकसभेपर्यंत प्रतिसाद आणि प्रतिक्रिया उमटत असत. आज सर्व व्यवस्था अशी मख्ख बनली आहे, की एखाद्या आईच्या समोरून तिची मुलगी किंवा पत्नीच्या समोरून तिचा पती गुंडांनी किंवा पोलिसांनी दरादरा ओढत नेऊन, मारून टाकला तरी त्याबद्दल कोठे अवाक्षरही उमटत नाही. लहानशा अन्यायानेसुद्धा सत्ताधीशांच्या खुर्च्या डळमळण्याचा धोका तयार होत नसेल, तर ते शासन लोकांच्या कामी कधीच लागणार नाही. शासन स्थिर असण्यात काय फायदा ? शासन संवेदनशील पाहिजे; पण वादळात सापडलेल्या आणि बावरलेल्या जनतेला

स्थिरतेचे आकर्षण दाखवून, पुन्हा एकदा गटविणे हा इंदिरा काँग्रेसच्या जाहीरनाम्याचा मध्यवर्ती कार्यक्रम.

राष्ट्रीय मोर्चाचे स्वरूपच गेल्या आठनऊ महिन्यांत बदलून गेले आहे. भ्रष्टाचाराच्या विरोधी आघाडी म्हणून राष्ट्रीय मोर्चाचा उदय झाला. ग्रामीण भारतातील जनतेचे प्रतिनिधित्व करणारी ही आघाडी सत्तेवर आली आणि राष्ट्रीय मोर्चाचे स्वरूप बदलून गेले. मागासवर्गावर आणि जातींवर सहस्रावधी वर्षे प्रचंड अन्याय झाले. यात काहीच वाद नाही. समाजाने लादलेले मागसलेपण दूर करण्याकरिता विशेष प्रयत्नांची आवश्यकता आहे, यातही काही शंका नाही; पण जातिव्यवस्थेचा महाराक्षस गाडण्याकरिता जातीयवादाचाच झेंडा उभारण्याचा मार्ग राष्ट्रीय मोर्चाने स्वीकारला. देशाच्या विकासाची गती आणि गुणवत्ता अशी असू शकते, की ज्यामुळे पिढ्यान् पिढ्या रुजलेली जातीयता संपूनच जाईल; पण अशा पुरुषार्थाची महत्त्वाकांक्षा राष्ट्रीय मोर्चात राहिलेली नाही. नोकऱ्यांच्या भुलावणीने मागासवर्गाची गठ्ठा मते घेण्यातच त्यांना आज धन्यता वाटत आहे. मंडल आयोगाच्या अहवालाला मार्क्सच्या कॅपिटल सारग्रंथापेक्षाही जास्त महत्त्व असल्यासारखे बोलत आहेत, केवळ राष्ट्रीय मोर्चाचे नेतेच नव्हेत, तर डावे-उजवे कम्युनिस्ट पक्षसुद्धा!

देशापुढच्या जटिल आणि घोरगंभीर समस्या सोडविण्याची कोणाही पक्षात ताकद नाही. इच्छाही नाही. त्यामुळे कसबी जादूगाराप्रमाणे लोकांची नजर दूसरीकडे वळवून, हातचलाखी करण्याची सर्वच पक्षांची हुन्नर चालू आहे.

या सगळ्या धडपडीत भारतीय जनता पार्टी आणि शिवसेनेसारखे, मुळात आर्थिक कार्यक्रम किंवा दृष्टिकोनच नसलेले पक्ष मागे थोडेच राहणार आहेत? राममंदिराच्या एका प्रश्नाने, १९८४ मध्ये संपुष्टात आलेला भारतीय जनता पार्टी हा पक्ष एकदम राष्ट्रीय महत्त्वाचा ठरला आणि आता सत्ता काबीज करण्याची स्वप्ने पाहू लागला. शिवसेनेचे उद्दिष्ट मर्यादित आहे. मुंबईतील भूखंड आणि तस्करी म्हणजे सोन्याची खाण आहे ! त्या खाणीवर ताबा मिळविण्याकरिता मते पाहिजेत. मते मिळविण्याकरिता आज मराठी तरुणांना भडकवा, उद्या हिंदू माथेफिरूपणाला आवाहन करा, हा शिवसेनेचा कार्यक्रम राहिला आहे. या जातीयवाद्यांनी सर्वच नियम धाब्यावर बसवले आणि सत्ता जणू आता आपल्या हाती येणार आहे, अशा कैफात ते बोलू

लागले आहेत. सुदैवाने न्यायव्यवस्थेचे काही निर्णय आणि शेतकरी संघटनेने निवडणूक आयोगाकडे दाखल केलेले अर्ज याचा काहीसा परिणाम या पक्षांच्या प्रचारावर झाला आहे.

शिवसेनेचे बाळ ठाकरे अजूनही काही ऐतिहासिक नाटकांतील वीरश्रीपूर्ण भाषणांप्रमाणे भाषणे करतात; पण बाकीचे नेते दबून दबूनच बोलत आहेत. निवडणूक आयोगासमोरील कार्यवाहीमुळे शिवसेनेच्या खोकडाची शेपटी बरोबर सापळ्यात अडकल्यासारखी झाली आहे.

येत्या तीन दिवसांत प्रत्यक्ष मतदानाला सुरुवात होईल आणि त्यानंतर आठवड्याभरात निवडणुकीचे निर्णय हाती येतील. तोपर्यंत सर्व काही, फार रक्तपात न होता, पार पडो अशी इच्छा. सर्वांनी मते द्यावीत, निर्भयपणे द्यावीत. आपल्याला योग्य वाटेल अशा उमेदवारास द्यावीत. निवडणूक प्रक्रियेत कोणताही अडथळा आणू नये. सध्याची गंभीर परिस्थिती लक्षात घेता पुण्याच्या शेतकरी पंचायतीने जाहीर केलेला सत्याग्रहाचा कार्यक्रमसुद्धा स्थगित ठेवण्यात आला आहे. देश घायाळ झालेला आहे; पण इतिहासात अनेक वेळा अशा प्रसंगी महात्मे उदयास आणण्याचे सामर्थ्य या देशाने दाखविले आहे. हे पुन्हा घडेल याबाबत माझ्या मनात शंका नाही. तोपर्यंत, आज तातडीने या निवडणुकांच्या काळात एकच खबरदारी आपण घेऊ शकतो. देशाच्या जखमा बऱ्या करणारा धन्वंतरी येईपर्यंत जखमांमध्ये जातीयवादाच्या जंतूंचा शिरकाव होणार नाही एवढी खबरदारी प्रत्येक मतदाराने घेतली पाहिजे. काही नाही तरी, जातीयवादाला दूर ठेवण्याइतकी सुबुद्धता भारतातील मतदारांत आणि विशेषत: शेतकरी समाजात आहे असे सिद्ध झाले तर संकट टळेल आणि विकासाची वाट मोकळी झाली असे होईल.

(६ नोव्हेंबर १९९४)

◆◆

पंचायत राज निवडणुका व शेतकरी महिला आघाडी

पुऱ्या तेरा वर्षांनी महाराष्ट्रात जिल्हा परिषद आणि पंचायत समिती यांच्यात निवडणुका होऊ घातल्या आहेत. मध्यंतरीच्या काळात लोकसभेच्या चार निवडणुका झाल्या, राज्य विधानसभेच्या निवडणुका तीनदा झाल्या. पंचायत राज्याच्या निवडणुका घ्यायला मात्र शासनाला सवड होत नव्हती.

जुन्या जिल्हा परिषदांचे आणि पंचायत समित्यांचे सदस्य त्यांच्या जागी कंटाळून गेले. एक काँग्रेसी सदस्य तर म्हणाला, "आता खाऊन खाऊन कंटाळा आला," तरी शासनाला या निवडणुका घ्यायची हिंमत होत नव्हती.

शेतकरी महिला आघाडीने नवीन निवडणुका घडवून आणण्याची मागणी नेटाने चालवली होती. राजीव गांधी पंतप्रधान असताना "१९८९ मध्ये या निवडणुका होतील," अशी त्यांनी ग्वाही दिली होती. त्यांचा शब्द पाळण्याचीसुद्धा महाराष्ट्र शासनाची इच्छा नव्हती.

शेतकरी महिला आघाडीने या दिरंगाईचा निषेध केला. शेतकरी महिलांनी हा प्रश्न वेशीवर टांगण्यासाठी एक दिवस मोठा सत्याग्रहाचा कार्यक्रम केला. प्रत्येक जिल्ह्यात या परिषदांच्या कार्यालयांना घेराव घातला. अध्यक्षांच्या कार्यालयांत जाऊन त्यांची मानाची खुर्ची कब्जात घेण्याचा कार्यक्रम केला; तरीही शासन ढिम्म हलायला तयार नव्हते.

तशा या निवडणुका मार्च १९८७ मध्ये व्हावयाचे ठरले होते. सगळ्या तयाऱ्या झाल्या होत्या; पण नोव्हेंबर ८६ मध्ये चांदवड येथे शेतकरी महिला अधिवेशन झाले. लाखांच्या संख्येने महिला उपस्थित राहिल्या. स्त्रीशक्तीच्या त्या भव्य आणि समर्थ दर्शनाने सगळेच दिपून गेले.

चांदवड अधिवेशनाचा एक महत्त्वाचा ठराव जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या यांच्या निडणुकांसंबंधी होता. होऊ घातलेल्या सर्वच्या सर्व

जागा महिलांनी लढवण्याचा निर्धार या ठरावात जाहीर करण्यात आला होता. या घोषणेने तर गावगन्ना पुढाऱ्यांचे धाबेच दणाणले. लगेच निवडणुका पुढे ढकलण्याची घोषणा झाली. एकदा, दोनदा, तीनदा, पांच... वेळा निवडणुकांची अशी कुत्तरओढ झाली.

स्त्रीशक्तीच्या सामर्थ्याला तोंड कसे द्यायचे, हे शासनाला समजेना; मग शासनाने एक युक्ती काढली. "जीवावर बेतलेले शेपटावर निभवावे," अशा हिशेबाने पंचायत राज्यातील ३० % जागा महिलांकरिता राखीव ठेवण्यात आल्या. गणित असे, की निदान उरलेल्या ७० % जागा तरी सुरक्षित राहाव्यात.

१९८९ च्या निवडणुकांत काँग्रेस शासन बुडता बुडता वाचले. राज्य शासन स्थिर नाही. जिल्हा परिषदांच्या उचापती कोठे करत बसता ? अशा धास्तीने निवडणुका आणखी पुढे ढकलण्यात आल्या. कोर्टाच्या आदेशाचे केवळ निमित्त शासनाने वापरले. कोर्टाचा आदेश इच्छा असली, तर कसा पटकन बाजूला करता येतो, हे सुधाकरराव नाईकांनी आता दाखवून दिलेच आहे!

तेवढ्यांत, महाराष्ट्रात आयाराम गयारामांचे पीक आले. केंद्रातही काँग्रेसचे राज्य आले. विरोधी पक्ष खिळखिळे होऊ घातले. आता सामन्याला कोणीच नाही असे वाटू लागल्यावर पळपुट्या शासनाला निवडणुका जाहीर करायची तेरा वर्षांनी हिंमत झाली आहे.

महिलांकरिता जागा राखीव ठेवणे ही कल्पना मुळातच हास्यास्पद आहे. महिला म्हणजे काही मागास जातीजमातींच्या नव्हेत, की त्यांच्याकरिता जागा राखीव ठेवाव्यात. अशा तऱ्हेने राखीव जागा ठेवणे म्हणजे समग्र महिला समाजाचा अपमान आहे; पण ७० % जागा पुढाऱ्यांना सुरक्षित करण्यासाठी शासनाने ही चालबाजी केली आहे.

बरे, ३० % जागा राखीव ठेवायचे तर ठरवले; पण कोणते मतदारसंघ राखीव ठेवायचे? अनुसूचित जातीजमातींकरिता मतदारसंघ राखीव ठेवण्यात येतात. ज्या मतदारसंघात अशा जातीजमातींची लोकसंख्या मोठी असेल अशांपैकी काही मतदासंघ निवडले जातात.

ही पद्धत महिलांच्या बाबतीत कशी लागू करणार ? महिलांचे प्रमाण सगळ्या मतदारसंघांत सारखेच. निम्म्याला निम्मे; मग राखीव मतदारसंघ निवडायचे कसे? शासनाने चिठ्ठ्या टाकून, राखीव मतदारसंघ ठरवले.

पुढच्या निवडणुकांच्या वेळी या वेळच्या सर्वसाधारण मतदारसंघाच्या नावांच्या चिठ्ठ्या पुन्हा टाकणार आहेत. म्हणजे या वेळच्या सर्व राखीव जागा पुढच्या वेळी बिगरराखीव होणार आणि यंदाच्या साधारण जागांपैकी निम्म्या जागा पुढच्या वेळी राखीव होणार. असा पोरखेळ शासनाने मांडला आहे. पंचायत राज्य व्यवस्थेची ही क्रूर चेष्टा आहे.

महिलांना सामाजिक जीवनात स्थान मिळवून द्यायचे, तर निवडणुकांतील त्यांच्या सहभागाचा परिणाम एकूण एक मतदारसंघांत जाणवला पाहिजे. सध्याच्या पद्धतीत काय होणार आहे ? ७० % मतदारांना महिला उमेदवारांना मते द्यायची संधीही मिळणार नाही. महिलांचे जणू वेगळे महिलास्थान तयार करायला सरकार निघाले आहे!

चिठ्ठ्यांच्या पद्धतीचा आणखी एक मोठा गंभीर परिणाम होणार आहे. काही होतकरू कार्यकर्ते परिश्रमाने एखाद्या मतदारसंघात काम करून, तयारी करतात. निवडणुका तोंडावर आल्यावर सरकार जाहीर करणार, की ही जागा राखीव आहे. म्हणजे त्या उमेदवाराने केलेले सगळे कार्य वाया जाणार आणि चांगले उमेदवार नाउमेद होणार. चिठ्ठी पद्धतीचा याहूनही सर्वांत भयंकर असा एक परिणाम आहे. या वेळी निवडून आलेल्या ३० % महिला सदस्यांना पक्के ठाऊक असणार, की पुढच्या निवडणुकीत त्यांचा संघ सर्वसाधारण ठरणार. म्हणजे त्यांच्या मतदारसंघात उमेदीने काम करण्याची त्यांची इच्छाच संपणार. ७० % पुरुष सदस्यांची परिस्थिती तशीच. पुढच्या निवडणुकांत त्याच मतदारसंघातून पुन्हा उभे राहण्याची शक्यता त्यांच्यापैकी फक्त निम्म्या सदस्यांच्या वाट्याला हे भाग्य येणार, हे माहिती नसल्याने सगळेच्या सगळे गळबटून जाणार, हे उघड आहे. चिठ्ठ्यांच्या पद्धतीने महिलांसाठी ३० % राखीव जागांची निवड ही शासनाने पंचायत राज्य नेस्तनाबूत करण्याची आखलेली योजना आहे.

महिला आघाडीने खूप प्रयत्न केले. शासनाला पर्यायी योजना दिली. एक मंडलात एक जिल्हा परिषदेची आणि दोन पंचायत समित्यांच्या अशा तीन जागा असतात. या तीनांपैकी एक जागा क्रमाक्रमाने राखीव ठरवल्यास चिठ्ठी पद्धतीतील सर्व दोष दूर होतात, हे सविस्तरपणे सांगितले; पण शासन जरासुद्धा ऐकायला तयार नाही.

राज्यकर्त्यांचा डावपेच स्पष्ट आहे. महिलांकरिता जागा राखीव ठेवण्याची त्यांची भावनाच खोटी आहे. कोणता मतदारसंघ राखीव आहे

अथवा बिगरराखीव याचे त्यांना काहीच भलेबुरे सोयरसुतक नाही. मतदारसंघ बिगरराखीव असला, तर टग्या पुढारी उभा राहणार, महिलांकरिता राखीव असला, तर त्याच पुढाऱ्याची, घरांतील एखादी मायबहिणी कळसूत्री बाहुलीसारखी उभी करणार. कामकाजात काही फरक नाही. खाबूगिरीत बाधा नाही. महिला आंदोलनाचा असा बोजवारा करण्याचा शासनाचा इरादा आहे.

भरीत भर म्हणून शासनाने आणखी एक मनाचा कोतेपणा दाखवला. शेतकरी महिला आघाडीला राखीव चिन्ह द्यायला नकार दिला. डाव असा, की महिला आघाडीची काही मते तरी बाद होऊन जावीत.

पुऱ्या तेरा वर्षांनी निवडणूक होते आहे; पण ही काही खुली लोकशाही लढत नाही. आपल्या पैलवानाला सोयीचा होईल असा तयार केलेला हा आखाडा आहे.

असल्या बनावट सामन्यांच्या मैदानांतही उतरायचे शेतकरी महिला आघाडीने ठरवले आहे. महिलांसाठी राखीव असलेल्या सगळ्या जागा, म्हणजे ३० % जागा महिला आघाडीच्या क्रियाशील कार्यकर्त्या लढवणार आहेत. काही थोड्या सर्वसाधारण जागासुद्धा आघाडी लढवेल. निर्णय मोठा धाडसाचा आहे. शेतकरी महिला आघाडी हा काही पक्ष नव्हे. तिच्यामागे ना सत्तेचे पाठबळ, ना पैशाचे. महिलांच्या जागृतीच्या आणि असंख्य शेतकरी पुरुषांच्या पाठबळाच्या भरवशावर महिला आघाडीने हा निर्णय घेतला आहे.

खरे म्हटले, तर शेतकरी महिला आघाडीखेरीज कोणा इतर संघटनेला किंवा पक्षाला महिलांच्या राखीव जागा लढवण्याचा काही अधिकारच नाही. या निवडणुकांसाठी आघाडीने आपला तपशीलवार जाहीरनामा प्रसिद्ध लगेच करून टाकला. त्यात काहीच अडचण आली नाही. कारण आघाडीचा महिलांसंबंधीचा विचार आणि कार्यक्रम सुस्पष्ट आहे. इतरांना जाहीरनाम्यांत काय लिहावे याचीच पंचाईत पडली आहे.

गेली सहा वर्षे सातत्याने आघाडीने ग्रामीण महाराष्ट्रांतील महिलांत अभूतपूर्व जागृती घडवून आणली आहे.

महिलांच्या प्रश्नावर विचार करण्यासाठी चांदवड आणि अमरावती येथे अतिप्रचंड उपस्थितीची अधिवेशने भरवली. जिल्ह्याजिल्ह्यांत संमेलने केली.

ज्यांनी सूर्य पाहू नये आणि ज्यांना सूर्याने पाहू नये अशा भल्या घरच्या

महिला गावोगाव, राज्यभर आणि इतर राज्यांतही जाऊन आघाडीची बांधणी करू लागल्या.

दारू म्हणजे सगळ्या स्त्रियांच्या संसारात माती कालवणारी अवदसा. आणि गावांतील दारूचे दुकान म्हणजे पुढाऱ्यांचा अड्डा. या दुकानांना बंद करण्याचे आंदोलन आघाडीने प्रखरपणे चालवले. शासन नमले. ज्या गावांतील पंचायत दारूचे दुकान बंद करण्याचा ठराव करील, तेथे त्याचा अंमल होईल असे सरकारने मान्य केले; पण प्रत्यक्षात अंमजबजावणी मात्र शून्य. अंमलबजावणी होईल कशी ? दारूची दुकाने बंद झाली, तर पुढाऱ्यांचे प्राणच जातील ना!

आघाडीचा सर्वांत क्रांतिकारी कार्यक्रम म्हणजे लक्ष्मीमुक्तीचा. सीतामाईच्या काळापासून स्त्रियांच्या नावाने कधी मालमत्ता झाली नाही. घरांतल्या पाळीव जनावरांप्रमाणे स्त्रिया राहिल्या. मालकाने लाथ मारून हाकलले, तर त्यांची स्थिती बेवारशीच; सीतामाईसारखी. गेल्या १५ महिन्यांत महाराष्ट्रांतील २ लाख स्त्रियांच्या नावाने जमिनी लक्ष्मीमुक्ती कार्यक्रमामुळे झाल्या.

१० नोव्हेंबर ९१ ला शेगाव येथे शेतकरी मेळावा झाला. चतुरंग शेतीच्या कार्यक्रमांत स्त्रियांना अग्रमानाचे स्थान देण्यात आले आहे. नव्या शेतीचे जिवंत तंत्रज्ञान प्रयोगांनी तयार करण्याची जबाबदारी 'सीता शेती' कार्यक्रमाने शेतकरी महिलांकडे दिली आहे.

शेतमालावर प्रक्रिया करून, चढता भाव मिळवण्याचा माजघर शेतीचा कार्यक्रम. त्याचीही जबाबदारी शेतकरी महिला आघाडीने स्वीकारली आहे.

महिलांची, महिलांसाठी झटणारी ग्रामीण महाराष्ट्रात आज एकच एक संघटना आहे, ती म्हणजे शेतकरी महिला आघाडी. निवडणुकांपासून ती दूर राहिली, तर महिलांच्या प्रश्नाची ज्यांना समज नाही, कळकळ नाही अशा कळसूत्री बाहुल्या राखीव जागांवर जाऊन पडतील आणि त्यामुळे महिला आंदोलनाचे प्रचंड नुकसान होईल. महिला आघाडीला जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांच्या निवडणुका लढवण्या पलीकडे पर्यायच नव्हता. महिलांशी आघाडीचे अतूट नाते आहे. निवडणुकांमुळे हे नाते तुटणार नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे.

कोणी विचारेल, मग महिला आघाडी ३० % जागाच का लढवत आहे? चांदवड अधिवेशनात ठरल्याप्रमाणे सगळ्या १०० % जागा का लढवत

नाही ? या प्रश्नाचे उत्तर उघड आहे. जेव्हा राखीव जागा नव्हत्या, तेव्हा सर्वच्या सर्व जागा लढवायला काही प्रत्यवाय नव्हता; पण ३० % जागा राखीव झाल्याने परिस्थिती बदलते. बिगरराखीव जागाही महिला आघाडीने लढवल्या असत्या तर पुरुषांच्या मनात विनाकारण विरोध आला असता. अशा विरोधाने कोणाची हौस भागत असेल तर गोष्ट वेगळी; पण महिलांचे व आंदोलनाचे त्याने काहीच भले होणार नाही; नुकसानच होईल. शिवाय ज्या बिगरराखीव मतदारसंघात विशेष कर्तृत्ववान समर्थ महिला उमेदवार उपलब्ध असेल तेथेही आघाडी निवडणुका लढवणार आहेच.

या निवडणुका लढवून आघाडीला साध्य काय करायचे आहे ? महिला आघाडीच्या जाहीरनाम्यांत या प्रश्नाची व्यापक चर्चा आहे. त्याचा सारांश येथे सांगतो.

दारू दुकानबंदी आणि स्त्रियांच्या मालमत्तेवरील हक्काचा प्रश्न महिला आघाडीने आजपर्यंत हिरीरीने मांडला आहे. तामिळनाडूप्रमाणे महाराष्ट्रातही सर्व दारूची दुकाने बंद व्हावीत, हा आघाडीचा आग्रह आहे.

शेतकरी महिलांना व्यापक मालमत्तेचा अधिकार असणारा महाराष्ट्र हा सर्व जगात पहिला प्रदेश व्हावा, ही आघाडीची महत्त्वाकांक्षा आहे.

'सीता शेती', 'माजघर शेती' या स्वयंभू कार्यक्रमांतून महिलांना स्वयंसिद्धा बनवावे हा महिला आघाडीचा निश्चय आहे.

स्वयंसिद्ध बनलेल्या महिलांनी यवतमाळ जिल्ह्यातील रावेरी गावी 'स्वयंसिद्धा सीतेचे' मंदिर बांधून, जगभरच्या स्त्रियांना एक प्रेरणास्थान तयार करावे असा महिला आघाडीचा संकल्प आहे; पण यापलीकडे जाऊन पंचायत राज्य व्यवस्थेमार्फत विकासाचा एक अगदी वेगळा कार्यक्रम राबवण्याचे महिला आघाडीने ठरवले आहे.

महात्मा गांधींनी सर्व आर्थिक, सामाजिक धोरणांसाठी एक महत्त्वाचे सूत्र सांगितले. कोणतेही धोरण चांगले का वाईट, कसे ठरवावे ? समाजातील जो सर्वांत दुर्बल पीडित मनुष्य असेल, त्याच्यावर त्या धोरणाचा परिणाम काय होईल, असा प्रश्न विचारावा. जर त्या शेवटच्या पायरीवरील मनुष्याच्या आयुष्यात काही सुधारणा होणार असेल, तर ते धोरण योग्य; अन्यथा अयोग्य, असा हा महात्माजींचा मंत्र. दीनदुबळ्यांच्या डोळ्यांनी पाहायला शिका, दांडग्यांच्या नाही असा त्याचा थोडक्यात अर्थ.

महिला आघाडीच्या जाहीरनाम्यात हेच तत्त्व स्वीकारले आहे. थोड्या

फरकाने सर्वांत दीन पीडित स्त्रीच्या दृष्टिकोनातून विकासाचा कार्यक्रम तपासला गेला पाहिजे, असे हे नवे सूत्र आहे.

या सूत्राचा व्यवहारात काय अर्थ लागतो?

उदा. पिण्याच्या पाण्याचा प्रश्न घ्या. स्वातंत्र्यानंतर ४५ वर्षांनी लाखो गावांना आज पिण्याचे पाणी नाही. डोक्यावर हंड्यांच्या उतरंडी वाहत मैलच्या मैल बाया दिवसामागून दिवस पाणी भरत आहेत.

पाण्याचे नियोजन करणारी मंडळी, त्यांना कधी अशी उतरंड उचलावी लागली नाही. त्यांना पाणी वाहणाऱ्या स्त्रीच्या काबाडकष्टांचे काय ? त्यांच्या योजना भव्य दिव्य. धरणे, कालवे, तळी, टाक्या, नोकरशहांच्या फायद्याच्या, कंत्राटदारांच्या लाभाच्या आणि पुढाऱ्यांच्या सोयीच्या. पाण्याच्या नियोजनाचे काम पाणी वाहणाऱ्या एखाद्या बाईकडे असते, तर ती म्हणाली असती, "गावांत एवढ्या उंच खर्चीक टाक्या बांधायची काय गरज आहे. जेथून बाया पाणी भरतात तिथून मोटर इंजिन लावा, गावांतल्या दोनचार नळांच्या कोंडाळ्यांना तास दोन तास पाणी आले म्हणजे बायांच्या डोळ्यांतलं पाणी खळेल. बस. बाकीच्या बांधकामांची काही घाई नाही."

स्त्रियांचा दृष्टिकोन असा अनेक बाबतींत वेगळा असू शकतो.

प्राथमिक आरोग्य केंद्रात बाईला आणतात, आणली तर, बाळंतपणासाठी किंवा अगदीच मरणासन्न झाली म्हणजे. काय उपयोग बाईमाणसांना तिथल्या डॉक्टरांचा आणि बाकी सर्व साधनांचा ? त्यांच्यापेक्षा गावांतील सुईण थोडे प्रशिक्षण देऊन अधिक कुशल केली असती, तर बायांना केवढा आधार झाला असता !

मुलींना आधीच शाळेत पाठवायला शेतकरी आईबाप तयार नसतात. गावात जितकी शाळा असेल, तितकी पुरी झाली असेल तरी मोठी नवलाची गोष्ट. गावाची शाळा संपली म्हणजे दूरच्या गावी पुढच्या शिक्षणासाठी मुलांना पाठवतात. मुलींना क्वचितच. गावाच्या छोट्याशा शाळेत गुरुजी येतातच. त्यांच्याकडून मुलींच्या शिकवण्याची सोय गावातल्या गावात सहज करता येईल.

... पण लक्षात कोण घेतो?

महिलांच्या प्रश्नाकडे जगाचे लक्ष वेधून घ्यावे, स्त्रीला माणूस म्हणून जगण्याचा मान मिळवून द्यावा, हेच शेतकरी महिला आघाडीचे उद्दिष्ट आहे. म्हणूनच शेतकरी महिला आघाडी महिलांच्या राखीव जागा लढवत आहे.

सर्व महिलांकडून आणि शेतकरी भावांकडून अपेक्षा काय?

राखीव जागांवर शेतकरी महिला आघाडीच्या उमेदवारांना भरघोस मतांनी निवडून आणा.

पुढाऱ्यांच्या बाहुल्यांना मते देऊ नका.

शेतकरी महिला आघाडीच्या उमेदवारांना राखीव चिन्ह दिलेले नाही. आपल्या मतदारसंघांतील शेतकरी महिला आघाडीच्या उमेदवारांची खूण नीट माहीत करून घ्या.

शेतकरी महिला आघाडीच्या उमेदवारांच्या साहाय्यासाठी शेतकरी संघटनेचे कार्यकर्तेही बिगरराखीव जागी उभे आहेत. त्यांनाही विजयी करा.

(६ नोव्हेंबर १९९४)

◆◆

देशाला वाचविण्यासाठी

(महाराष्ट्र विधानसभा निवडणुका १९९५)

महाराष्ट्राचा दौरा करायला लागलो, की एक नेहमी जाणवते, आता निवडणुकीच्या हंगामात तर ते विशेषत्वाने जाणवते. या वेळी पुण्याहून दौरा सुरू केला. पुणे म्हणजे पवारांचे राज्य. पुण्याहून कोल्हापूरला आलो, तिथं वसंतदादा आणि त्यांच्या कंपनीचं राज्य. तिथून सोलापूरला आलो तिथं शिंद्यांचं-मोहिते पाटलांचं राज्य. तिथून लातूरमध्ये आले तर तिथं कोणा एका शिवराज पाटलांचं किंवा विलासरावांचं राज्य. पुढे नांदेडला आलो, तर तिथं शंकररावांचं राज्य. विदर्भात यवतमाळमध्ये शिरावं, तर नाईकांचं राज्य. नाशकात जावं तर हिऱ्यांचं. जळगावात जैनांचं, तर धुळ्यात आणखी कोणाचं राज्य! महाराष्ट्रात कोणत्याही जिल्ह्यात किंवा विभागात पाहावं तर कोणाचं ना कोणाचं तरी राज्य असल्याची जाणीव होते.

एकेकाळी संपूर्ण देशामध्ये संस्थानंच संस्थानं झाली होती, ती संस्थानं विलीन करून सरदार वल्लभभाई पटेलांनी एक देश तयार केला. जुनी संस्थानं गेली आणि गेल्या सत्तेचाळीस वर्षांत नवी संस्थानं तयार झाली. अजून तरी या नवीन संस्थानांमध्ये नव्या संस्थानिकांना जुन्या संस्थानिकांइतकं प्रेम लाभलेलं दिसत नाही आणि प्रत्येक संस्थानांचं वैशिष्ट्य असं, की तिथले लोक स्वतंत्र आहेत असंही नाही. जिथं शेतकरी संघटनेसारख्या संघटनेच्या सभेला लोक समोर येऊन बसायलासुद्धा घाबरतात. ऐकायचं तर असतं, मग कठंतरी दूर कोपऱ्यात बसून ऐकतात. शरद जोशींच्या सभेला आपण पुढे जाऊन बसलो, असं जर का कुणा भाऊसाहेबांना, काकासाहेबांना, मामासाहेबांना कळलं, तर ते आपल्याला बोलावून काय प्रश्न विचारतील याच्या धास्तीने लोक सभेला समोर येत नाहीत, असं या प्रत्येक संस्थानातलं वातावरण आहे.

देश स्वतंत्र होऊन, सत्तेचाळीस वर्षे झाली, तरी हे वातावरण आहे; तेव्हा प्रश्न असा पडतो, की स्वातंत्र्यानंतर आपण मिळवलं काय? पंधरा वर्षांपूर्वी शेतकरी संघटनेच्या मंचावरून मी पहिल्यांदा हा प्रश्न विचारला होता. त्या वेळी हा जो प्रश्न विचारला, त्याकडे अजून काही या देशाच्या नेत्याचं लक्ष गेलेलं आहे, असं मला दिसत नाही.

नेमका प्रश्न काय आहे ? स्वातंत्र्यचळवळीच्या वेळी महात्मा गांधींनी आपल्याला सांगितलं होतं, की गोरा इंग्रज इथून गेला म्हणजे आपले शोषण थांबेल, देशाची लूट थांबेल आणि देशातला अगदी दरिद्रीनारायणसुद्धा सुखी होईल. त्याच्याकरिता कित्येक तरुणांनी हसत हसत बलिदान केलं. स्वातंत्र्य मिळालं. पहिली पाच-दहा वर्षे गडबडीत, धावपळीत गेली. पाकिस्तानचा प्रश्न, काश्मीरचा प्रश्न असे काही प्रश्न समोर आहेत म्हणता म्हणता तीसपस्तीस वर्षे गेली, आज सत्तेचाळीस वर्षे गेली.

१९८० मध्ये मी प्रश्न विचारला, स्वातंत्र्य मिळून तीसपस्तीस वर्षे झाली, तरी शेतकऱ्याच्या घरातली गरिबी संपली का नाही ? उलट, स्वातंत्र्याच्या वेळी शेतकऱ्याच्या घरी जितकी बरी परिस्थिती होती, तितकीसुद्धा चांगली राहिलेली नाही.

'१९४७ मध्ये तुमच्या घरातील लहान मुलाच्या ताटामध्ये ताक, दूध, तूप काय वाढलं जात होतं आणि आज तुम्ही तुमच्या पोराला, नातवाला काय देता, त्याची तुम्ही तुलना करा म्हणजे प्रश्नाचं गांभीर्य लक्षात येईल. आकडेवारी आणि पांडित्याची काही आवश्यकता नाही.

शेतकऱ्याच्या डोक्यावरचं कर्ज तसंच वाढत गेलं. आम्हाला सांगण्यात आलं, की सावकार गेला, जमीनदार गेला म्हणजे सगळं काही नीट होईल; सावकार गेला, त्याऐवजी सहकारी सोसायटी आली, बँका आल्या, भू-विकास बँका आल्या; तरी आमच्या डोक्यावरचं कर्ज काही संपायचं लक्षण नाही. हे असं का होतं ?

हा प्रश्न मी १९८० मध्ये मांडला आणि त्याचं उत्तर त्याच वेळी शेतकऱ्यांसमोर दिलं. उत्तर असं, की शेतकरी गरीब आहे; कारण शेती तोट्यात आहे; शेतीमालाला भाव मिळत नाही; म्हणून शेती तोट्यात आहे आणि शेतीमालाला भाव मिळत नाही, कारण सराकारचं असं धोरण आहे, की शेतकऱ्याच्या मालाला भाव मिळता कामा नये; शेतकऱ्याच्या मालाला भाव मिळत नाही; याला कारण व्यापारी नाही, अडत्या नाही, सावकार

नाही, नशीब नाही, ग्रह नाही, अस्मानी नाही, त्याचं कारण आहे सुलतानी. सरकार शेतकऱ्याला भाव मिळू देत नाही.

त्या वेळी मी असं म्हटलं आणि देशातले सर्व विद्वान, अर्थशास्त्री, पुढारी माझ्यावर तुटून पडले. 'हे काय शेतकऱ्याच्या घरचे नाहीत. शेतकऱ्याच्या जातीचे नाहीत. यांना काय समतजंय ?' कुणी म्हणाले, अमेरिकेचे एजंट आहेत. कुणी म्हणाले आर.एस.एस.चे एजंट आहेत. त्याहून त्यांचा राग असा, की हिंदुस्थानचं दिल्लीचं सरकार, पंडित नेहरूंचं सरकार, इंदिरा गांधींचं सरकार आपल्याच देशाच्या शेतकऱ्याला भाव मिळू देणार नाही, हे कसं शक्य आहे ? हे इतके लोकप्रिय नेते ! लोक इंदिरा गांधींना दुर्गामाता म्हणत आणि जवाहरलाल नेहरू म्हणजे तर रयतेच्या गळ्यातला ताईत, रुबाबदार व्यक्तिमत्त्व. असा माणूस आपल्या देशातल्या शेतकऱ्यांचे गळे कापतो, हे कसं शक्य आहे ?

हे सर्व पंधरा वर्षांपूर्वी झालं. आता या विषयावर काही वाद घालण्याची गरज उरली नाही. पंधरा वर्षांपूर्वी आम्ही जे सांगितलं, ते आज कागदोपत्री सिद्ध झालं आहे. डंकेल प्रस्तावावर सही करताना भारत सरकारचे व्यापारमंत्री प्रणव मुखर्जी यांच्या सहीने सरकारने कबुलीजबाब दिला आहे.

कबुलीजबाब काय आहे ? डंकेल प्रस्तावामध्ये, शेतकऱ्यांची सबसिडी कमी केली पाहिजे असा प्रस्ताव आहे. त्यासाठी 'गॅट'मध्ये सहभागी प्रत्येक देशाच्या सरकारने आपल्या देशातील शेतकऱ्यांना सबसिडी किती दिली जाते, हे सांगितलं पाहिजे. जपानच्या सरकारने सांगितलं, की आमच्या देशात शेतकऱ्याला ९० % सबसिडी आहे. म्हणजे खुल्या बाजारामध्ये शेतकऱ्याला १०० रुपये मिळाले असते, तर आम्ही धोरण असं चालवतो, की शेतकऱ्याला १९० रुपये मिळावेत. यूरोपीय देशांनी लिहून दिलं, की आम्ही शेतकऱ्यांना ६५ % सबसिडी देतो, तर अमेरिकेने लिहून दिलं, की आम्ही ३५ % सबसिडी देतो. हिंदुस्थान सरकारवर जेव्हा असं लिहून देण्याची पाळी आली, तेव्हा त्यांनी लेखी निवेदन दिलं, की आमचं धोरण असं आहे, की खुल्या बाजारात जर शेतकऱ्याला १०० रुपये मिळाले असते, तर त्याला फक्त २८ रुपयेच मिळावेत. म्हणे हिंदुस्थानात शेतकऱ्यांना ७२ % उणे सबसिडी म्हणजे उलटी पट्टी आहे. याचा लेखी कबुलीजबाब हिंदुस्थान सरकारकडून आपल्या हाती आला आहे.

मला आश्चर्य वाटतं, की इतकी मोठी गोष्ट बाहेर आली; तरी देशामध्ये

काही हालचाल झाली नाही. खरं तर, हे कटकारस्थान उघड झाल्याबरोबर देशामध्ये मोठं तुफान उठायलं हवं होतं. सगळ्या देशातल्या शेतकऱ्यांना समजायला कदाचित अडचण आली असेल. कारण उलटी पट्टी, उणे सबसिडी हे शब्द समजायला कठीण आहेत.

प्रणव मुखर्जींनी लोकसभेमध्ये निवेदन केलं, की आम्ही शेतकऱ्याला दरवर्षी चोवीस हजार कोटी रुपयांना लुटतो आणि तरीदेखील त्यांच्या पक्षाची माणसं जणू काय आपणच देश चालवतो, जणू काय आपणच देशाचं भलं करू शकतो अशा थाटात अजून चालताहेत.

१९८० मध्ये ही मंडळी काय म्हणायची ? शेतीमालाच्या रास्त भावाची मागणी ही सामान्य शेतकऱ्याची नाही; गरीब शेतकऱ्याची नाही; ही मोठ्या शेतकऱ्याची, धनाढ्य बागायतदार शेतकऱ्यांची मागणी आहे. आम्ही समाजवादाच्या नावाखाली गरिबांचं भलं करतो; म्हणून आम्ही शेतकऱ्यांना लुटतो ! म्हणजे समाजवादाचा झेंडा आणि लुटायचं ते देशातले सगळ्यांत गरीब म्हणजे जे शेतकरी आणि शेतमजूर, त्यांनाच!

स्वातंत्र्यानंतर चाळीस-पंचेचाळीस वर्षे हे असंच चालत राहिलं. नंतर दोन महत्त्वाच्या घटना घडल्या. एक घडली १९९१ मध्ये आणि दुसरी डंकेल प्रस्तावावर सही करताना.

१९९१ मध्ये सगळ्या जगाला हादरविणारी गोष्ट घडली. गेली कित्येक वर्षे आपल्या देशातले नेते, कार्यकर्ते सांगायचे, की समाजवाद देशाचं भलं करतो. नेहरूंनी म्हटलं, की समाजवादी नियोजन व्यवस्थेने आपण देशातील गरिबांची गरिबी हटवू. सगळे त्यासाठी रशियाचं उदाहरण समोर ठेवायचे. म्हणायचे, समाजवादी रशियात गरीब राहिले नाहीत, गुरीब राहिले नाहीत; रशिया म्हणजे कामगारांचा स्वर्ग, रशिया म्हणजे शेतकऱ्यांचा स्वर्ग ! पण असं नाटकच चाललं होतं. १९९१ मध्ये ते नाटक संपलं आणि रशियामधील प्रमुखांनीच जाहीर केलं, की आमची चूक झाली; ऐंशी वर्षे आम्ही समाजवादाचा प्रयोग केला. विकास झाला नाही अन् काही नाही. रशियासारखा थंड प्रदेश, प्रचंड बर्फ पडतं; पण अशा बर्फातसुद्धा हिवाळ्याच्या रात्री कुडकुडत पावाचा एखादा तुकडा मिळावा म्हणून लोकांना फूटपाथावर रांगा लावून उभं राहायला लागलं, तेव्हा त्यांना कबूल करावं लागलं, की हे नाटक होतं. समाजवाद हे औषध नाही, समाजवाद हे विष आहे, हे ९१ मध्ये जगभर जाहीर झालं आणि रशियाने 'बळिराज्या'च्या दिशेने वाटचाल

सुरू केली.

या निवडणुकीच्या निमित्ताने वेगवेगळ्या जिल्ह्यांतील या संस्थानिकांच्या संस्थानांमधून जाताना मला एक प्रश्न पडतो, की ९५ सालच्या निवडणुका आणि ९० सालच्या निवडणुका यांतील भाषणांमध्ये काहीतरी फरक असायला हवा की नको? ९० सालच्या निवडणुका झाल्या. त्यानंतर ९१ मध्ये जगामध्ये समाजवादाचा पराभव झाला. हिंदुस्थानामध्ये काँग्रेसचे पंतप्रधान राव यांनी स्वत: कबूल केलं, की नेहरूवादानं देशाचं नुकसान झालं. आता आम्ही खुली व्यवस्था स्वीकारणार आहोत आणि गेल्या वर्षी, १९९४ मध्ये सरकार नावाचा खिसेकापू आपल्या हाती 'रंगेहाथ' सापडला. त्यांनी स्वत: कबूल केलं, की आम्ही शेतकऱ्यांना लुटतो. दरवर्षी चोवीस हजार कोटी रुपयांना लुटतो. या दोन घटना घडल्यानंतर निवडणुकांच्या भाषणांत काही फरक पडावा की नाही ?

१९९१ मध्ये देशाची हालत इतकी वाईट झाली, की देशातलं सोनंसुद्धा बाहेर नेऊन गहाण ठेवावं लागलं; मग आता १९८० मध्ये मी जो प्रश्न शेतकऱ्यांना विचारला, तो प्रश्न पुन्हा कोणी तरी सर्वच भारतीयांना विचारला पाहिजे की नाही ? आता स्वातंत्र्य मिळून सत्तेचाळीस वर्षे झाली आणि अजून स्वातंत्र्यानंतर देशाची प्रगती व्हायची लक्षणं दिसत नाहीत. उलट अधोगती होते आहे. १९४७ मध्ये आपला देश जेव्हा स्वतंत्र झाला तेव्हा जगात चाळीस देश होते आणि त्यांत आपल्या देशाचा क्रमांक वरून तेरावा होता. आज जगात एकशे ऐंशी देश आहेत आणि त्यांत आपल्या क्रमांक खालून पाचवा म्हणून वरून एकशे शहात्तरावा आहे.

असं का झालं ? स्वातंत्र्यानंतर देशामध्ये जे स्वप्न उभं राहील असं गांधींनी सांगितलं होतं, ते खोटं का ठरलं ? या प्रश्नाचं उत्तर द्यायला, या निवडणुकीच्या भाषणात कुणी तयार नाही.

शेतकरी संघटनेने एक नवीन धोरण १९८० सालापासून चालवलं. आम्हाला राजकारण नको, सरकारात जायचं नाही, सत्तेत जायचं नाही आम्हाला फक्त आमच्या घामाचा दाम पाहिजे, शेतीमालाचा भाव पाहिजे; ते मिळविण्यात आडकाठी आणू नका म्हणजे झालं. आमची मागणी कशी होती?

एका आंधळ्या भिकाऱ्याची गोष्ट सांगतो. एकदा त्या भिकाऱ्याला देव प्रसन्न झाला आणि म्हणाला, 'एकच वर माग.' भिकारी म्हणाला, की

'माझा नातू सोन्याच्या चमच्याने दूध पिताना पाहून दे.' म्हणजे एका वरात त्यानं काय काय मागितलं? लग्न झालं पाहिजे, मुलगा झाला पाहिजे, त्याचं लग्न होऊन त्याला मुलगा झाला पाहिजे, त्याला दूध पिताना पाहायचे म्हणजे धनसंपत्ती हवी आणि दृष्टीही असली पाहिजे. एका वरात किती गोष्टी मागितल्या !

तसंच, नेहरूवादी समाजवादाच्या काळात आपण फक्त एकच गोष्ट, साधी गोष्ट मागितली. शेतीमालाचा भाव. भीक म्हणून नव्हे, हक्क म्हणून. कारण आम्हाला माहीत होतं, की शेतीमालाचा भाव शेतकऱ्यांना मिळाला म्हणजे समाजवादी नेहरूव्यवस्थेच्या गळ्याला हूक लागलाच, त्यानंतर ती व्यवस्था टिकूच शकत नव्हती. हे ती व्यवस्था चालवणारेही जाणून होते; म्हणूनच त्यांनी हर प्रयत्नाने शेतकरी आंदोलन मोडून काढण्याचा प्रयत्न केला; पण शेतकऱ्यांना आणि उद्योजकांना लुटून उभी राहिलेली ही समाजवादी नेहरूव्यवस्था टिकूच शकत नाही याची आम्हाला खात्री होती आणि आमचं म्हणणं आता खरं ठरलं आहे.

आज आपल्यापुढे प्रश्न काय आहे ? सध्या चालू आहे ती निवडणूक आहे का ? मी तरी आज जे चाललं आहे त्याला निवडणूक म्हणायला तयार नाही. स्वातंत्र्यानंतर निवडणुकांच्या नावाने जे काही झालं, त्या निवडणुका नव्हत्या; मग ते काय होतं ?

विदर्भातले एक कवी विठ्ठल वाघ यांची एक फार प्रसिद्ध कवित्र आहे. जनता-गरीबगुरीब शेतकरी माणसं त्यांच्या कवितेत म्हणतात,

'आमी मेंढरं मेंढरं, यावं त्यानं हाकलावं
पाच वर्सांच्या बोलीनं, होतो आमचा लिलाव'

आतापर्यंत ज्या आठ निवडणुका झाल्या, त्या निवडणुका नव्हत्या, ते लिलाव होते; शेतकऱ्यांच्या भाग्याचे लिलाव. निवडून यायचं म्हणजे काय करायचं ? मुंबईला जायचं, दिल्लीला जायचं आणि शेतकऱ्यांना लुटायचा गुत्ता घ्यायचा. शेतकऱ्यांना, उद्योजकांना, कष्टकऱ्यांना लुटायचं कोणी, त्यांना लुटायच्या व्यवस्थेवर बसायचं कुणी याचा गुत्ता मिळविणारे लिलाव म्हणजे या निवडणुका झाल्या.

आता या निवडणुकीमध्ये पहिल्यांदा अशी शक्यता तयार झाली, की लिलाव टाळून लोकांना खऱ्या अर्थानं स्वतंत्र होता येईल. गांधींच्या अंत:करणामध्ये ज्या स्वतंत्र देशाची कल्पना होती, तो स्वतंत्र भारत तयार

होईल अशी शक्यता पहिल्यांदा तयार झाली आहे.

आपण ज्याला बळिराज्य म्हणतो, ते तयार व्हायची शक्यता पहिल्यांदा तयार झाली आहे. या बळिराज्यामध्ये प्रत्येक उद्योजकाला आपल्या इच्छेप्रमाणे व्यवसाय करता येतो. त्याला 'सरकार' नावाची कोणी शक्ती सांगत नाही, की हे पिकव, ते पिकवू नको, धाना (भाता)चे तांदूळ करू नको, तांदूळ दुसऱ्या जिल्ह्यात नेऊ नको, परदेशांत नेऊ नको. असं राज्य म्हणजे बळिराज्य आणि असं बळिराज्य तयार होण्याची शक्यता स्वातंत्र्यानंतर प्रथमच तयार झाली आहे.

तरीही या निवडणुकीमध्ये, सगळे लोक येऊन, मतदारांना काय सांगताहेत? सगळे म्हणतात, आमच्या पक्षाला मतं द्या. काहीही बोला; पण मतं आम्हाला द्या.

काँग्रेसवाले म्हणतात, "गेली सत्तेचाळीस वर्षे आम्ही देशाला बुडवलं, हे खरं असलं, तरी आम्हाला मतं द्या. पुढच्या वेळी आम्ही देश सुधारू."

भाजपवाले येतात अन् सांगतात, "आम्हाला मंदिर बांधायचे आहे," म्हणून आम्हाला मतं द्या, दुसरे लोक येतात आणि "आम्ही नोकरीमध्ये कोणत्या जातीला किती जागांचे आरक्षण द्यायचे ते ठरवतो," म्हणून आम्हाला मतं द्या म्हणतात. आंध्र प्रदेशात एन. टी. रामारावांनी म्हटलं, "आम्ही दोन रुपये किलो तांदूळ देऊ..." आणि ते निवडून आले, मुख्यमंत्री झाले; मग महाराष्ट्रातले 'विद्वान' पुढारीसुद्धा बोलायला लागले–

दोन रुपये किलो तांदूळ देतो म्हटल्यावर मुख्यमंत्री बनता येते, ही नामी युक्ती सापडली. आम्ही काय कमी आहोत का ? आम्ही दीड रुपये किलोने ज्वारी देतो.

आपल्यातले बरेचजण ज्वारी पिकवतात. ज्वारी जर का दीड रुपया किलोने बाजारात विकली, तर ज्वारी पिकवणाऱ्या शेतकऱ्यांनी आणि शेतमजुरांनी काय खायचं, माती ? मतांच्या जोरावर खुर्ची मिळते ना, मग काहीही बोला!

आणि त्याच्या पलीकडे जाऊन लोक म्हणतात, "तुम्हाला ज्वारी विकत घ्यायची, ती दळायची, त्याच्या भाकऱ्या करायच्या असा तरी त्रास कशाला ? आमच्या पक्षाचा कार्यक्रम असा, की आम्ही तयारच भाकरी–पिठलं तुम्हाला रुपयात देतो!"

पाहा. देश गहाण पडतो आहे, गरिबी संपत नाही, कर्ज संपत नाही, जगामध्ये देश आपला शेवटच्या क्रमांकाला चाललाय आणि यांचा कार्यक्रम काय तर

भाकरी–पिठल्याची दुकानं काढायची! खा आणि मजा करा, स्वस्त भाकरी – पिठलं!

या निवडणुकीत सगळे पक्ष समोर येऊन जातात – काँग्रेसचा झेंडा घेऊन येतात, जनता दलाचा झेंडा घेऊन येतात, भाजपचा घेऊन येतात, शिवसेनेचा घेऊन येतात; पण या सर्व पक्षांचे खरंच एकमेकांत वैर आहे का ? वेगवेगळ्या ठिकाणांहून वर्तमानपत्रांत आलेल्या बातम्या पाहा. वर्धा जिल्ह्यामध्ये हिंगणघाट मतदारसंघात मी निवडणुकीचा फॉर्म टाकला आहे. निवडून द्यायचं किंवा नाही, ते मी तेथील जनतेवर सोपवलं आहे.

मी निवडणुकीला उभा आहे म्हटल्यावर भाजपचं रक्त खवळलं आणि त्यांच्या नेत्यांनी सांगितलं, की काही झालं तरी शरद जोशींना पाडलं पाहिजे. एक वेळ आम्ही शरद पवारांशी दोस्ती करू; पण शरद जोशी आम्हाला परवडणार नाहीत. म्हणजे हिंगणघाटमध्ये भाजप काँग्रेसबरोबर दोस्ती करायला तयार आणि मराठवाड्यात गोपीनाथ मुंडे काय म्हणतात ? ते उघड उघड म्हणतात, की शरद पवार गुंडांना सामील आहेत, त्यांनी हजारो कोटी रुपये कमावले आहेत, हा भामटा आहे; पण इकडे हिंगणघाटमध्ये मात्र भाजपवाले म्हणतात, शरद पवार परवडला; पण शरद जोशी नको; कारण तो कापसाला भाव मागतो. पुणे जिल्ह्यात जनता दलाचे लोक शिवसेनेशी दोस्ती करताहेत. म्हणजे काँग्रेस, भाजप, शिवसेना, जनतादल हे सगळे एक आहेत. कारण हे सगळे लोक म्हणजे आतापर्यंत निवडणुकीत 'शेतकऱ्यांना लुटण्याचा गुत्ता आपल्यालाच मिळावा,' म्हणून सतत धडपडणारे पक्ष आहेत.

आता त्यांच्या लक्षात आलं आहे, की शेतकरी जागा झाला आहे, शेतकऱ्याची चोरी होते, ती पकडली गेली आहे. आता काही आपली धडगत नाही. आज जरी दिसत नसलं, तरी पुढच्या निवडणुकीत स्वतंत्र भारत पक्ष एका बाजूला आणि दुसऱ्या बाजूला हिंदुस्थानातले बाकीचे सगळे पक्ष असं चित्र उभं राहणार आहे. एका बाजूला हे छोटं देवकीचं बाळ आणि दुसऱ्या बाजूला सगळे कंसमामा एकत्र झालेले दिसणार आहेत.

आमचं म्हणणं काय आहे ? आमचं म्हणणं असं आहे, की स्वातंत्र्यानंतर सत्तेचाळीस वर्षे देश खाली जात राहिला, याचं कारण इंग्रजांनी आपल्या – शेतकऱ्यांच्या आणि उद्योजकांच्या हातात घातलेल्या बेड्या हातातून निघायच्या आधी समाजवादाच्या बेड्या आमच्या हाती आल्या आणि त्यामुळे हिंदुस्थानात कोणीच सुखी झालं नाही. शेतकरी दुःखी आहे, व्यापारीसुद्धा दुःखी आहे,

कारखानदार दु:खी आहे. आपल्यातले तरुण व्यापार करायला शहरात जातात, ते काय सांगतात ? ते म्हणतात, "व्यापार करणंसुद्धा तितकं सोपं नाही. तुम्ही पुढाऱ्यांशी संबंध ठेवले, पुढाऱ्याच्या छत्रीखाली असलात, तर तुम्हाला लायसेंस-परमिट मिळतं; एरव्ही, व्यापारी प्रामाणिकपणे काम करायला गेला, तर त्याचं आयुष्यसुद्धा फार कठीण आहे." डॉक्टर तेच म्हणतात, वकील तेच म्हणतात, उद्योजक तेच म्हणतात, लेखक तेच म्हणतात, कवी तेच म्हणतात, खेळाडू तेच म्हणतात.

स्वातंत्र्यानंतर देश सुधारला असं कोणीच म्हणत नाही, तीन लोक सोडून. स्वातंत्र्यानंतर देश सुधारला असं म्हणणारे हे तीन लोक कोण ?

पहिला म्हणजे, पुढारी. स्वातंत्र्य मिळालं तेव्हा, १९४७ मध्ये पुढारी मंडळी खादीचे धुवट कपडे घालत होती आणि त्यांच्या चपलेला निदान तीन-चार ठिगळं लावलेली असायची आणि जर का जिल्ह्याच्या गावी जायचं, तर गावातल्या लोकांना वर्गणी जमवून, त्यांच्या प्रवासाची सोय करावी लागायची. असा पुढारी होता ४७ मध्ये; त्यागी, कष्ट करणारा, सेवा देणारा आणि आज ९५ सालचं चित्र काय ? पुढाऱ्याचं वजन निदान अर्ध्या टनाचं, पांढरे शुभ्र कपडे, कित्येक गाड्यांचा ताफा, त्यांच्यामागे लाचारांची फौज, जिल्ह्याच्या ठिकाणी किती बंगले, किती जमिनी, राज्याच्या राजधानीत किती आणि दिल्लीत किती ! पैशाचा हिशेब आता हजारांत नाही, लाखांत नाही, कोट्यवधी रुपयांत असतो. असा पुढारी खुश आहे. तो म्हणतो, समाजवाद चालू द्या, लायसेंस-परमिट राज चालू द्या, आमचं उखळ पांढरं होऊ द्या.

दुसरा खुश नोकरदार. ४७ मध्ये म्हण होती 'उत्तम शेती, मध्यम व्यापार आणि कनिष्ठ नोकरी !' आता उत्तमच नव्हे तर नोकरी म्हणजे स्वर्गच आणि शेती म्हणजे नरकच. ४७ वर्षांपूर्वी मुलीचा बाप म्हणायचा, पंधरावीस एकरवाल्यांच्या घरी मुलगी दिली, तर सुखाने नांदेल; नोकरमान्या नको. आज काय स्थिती आहे? आता मुलीचा बाप पंचेवीस एकरांच्या मालकालासुद्धा मुलगी द्यायला तयार होत नाही; म्हणतो, "दुष्काळ पडला तर खडी फोडायला जायला लागेल पोरीला, त्यापेक्षा एसटी कंडक्टर जावई परवडला." ही सगळी नेहरूनीतीची कृपा.

सत्तेचाळीस वर्षांच्या नेहरू अमलाने आणखी कोण खुश झाले ? खुश झाले गुंड. राज्य चालू कुणाचं झालं ? 'दाऊद इब्राहिम', 'अरुण गवळी' आणि प्रत्येक जिल्ह्यातले गुंड नेहरूराज्यावर खुश आहेत.

पुढारी, नोकरदार आणि गुंड हे देशबुडवे. शेतकरी संघटनेच्या नागपूर अधिवेशनाची घोषणा – "नेता, तस्कर, गुंडा, अफसर, मंडल, मंदिर, मस्जिदवादी, देश के दुष्मन." देश बुडायला आला आहे; पण त्यांना त्याची पर्वा नाही.

मग, या निवडणुकीमध्ये स्वतंत्र भारत पक्ष नावाचा मंच शेतकरी संघटनेने का तयार केला ?

१९८० मध्ये मी शेतकऱ्यांना सांगितलं, की स्वातंत्र्य मिळालं, तरी तुमची गरिबी हटली नाही; कारण हे सरकार. 'शेतकऱ्याचं मरण, हे सरकारचं धोरण,' हे मी १९८० मध्ये सांगितलं. आज केवळ शेतकऱ्यांची संघटना बांधून चालणार नाही. आज, मी हिंदुस्थानातल्या सगळ्या लोकांना – पुढारी, नोकरदार आणि गुंड सोडून, सगळ्यांना सांगतो आहे, की सरकारचं धोरण फक्त शेतकऱ्याचे मरण नाही; सरकारचं धोरण म्हणजे देशाचं मरण आहे. देश वाचविण्यासाठी सगळ्यांनीच उठलं पाहिजे.

देश कसा काय वाचवायचा ? हे कठीण काम आहे का ? मुळीच नाही. शेतकरी संघटनेच्या कार्यक्रमाचा विस्तार करून, स्वतंत्र भारत पक्षाने एक तीसकलमी कार्यक्रम आखला आहे. देशाचा रोग काय आहे ? नेहरूंचा समाजवाद. स्वातंत्र्याच्या आधी आपण समाजवादाविषयी कधी बोललो नव्हतो. गांधीवाद हा स्वातंत्र्यचळवळीचा पाया होता आणि तोच उद्देश होता. थोडक्यात सांगायचे तर गाधींवाद म्हणजे 'गाव मोठं, शेती मोठी, सरकार छोटं.' गांधीजी गेले आणि दिवाणजी म्हणून नेहरूंच्या हाती किल्ल्या आल्या आणि त्यांनी मालकांची पोरं देशोधडीला लावली आणि ते म्हणू लागले, "शहर मोठं, कारखाना मोठा आणि सरकार त्याहूनही मोठं." देशाचा रोग हा आहे; मग त्यावर औषध काय ?

या रोगावर औषधयोजना करायला हवी, झपाट्यानं करायला हवी. हा रोग झाला आहे, हे मनमोहन सिंगही मानतात. पी. व्ही. नरसिंह रावसुद्धा म्हणतात, की नेहरूंनी देशाचं वाटोळं केलं. या शब्दांत म्हणत नसले, तरी ते म्हणतात त्याचा अर्थ हाच होतो; पण औषधोपचार करायचा म्हटला, की मात्र काँग्रेसचे हातपाय लटपटतात. काहीजण म्हणतात, औषधोपचार हळूहळू केला पाहिजे.

औषधोपचार काय आहे ? गेल्या सत्तेचाळीस वर्षांमध्ये देशामधील उत्पादक घटकांवर जी काही बंधन घातली – लेव्ही, जीवनावश्यक वस्तूंचा कायदा, मालमत्तेसंबंधी हक्कांवरील बंधने, व्यवसाय-व्यापार उदीमावरील बंधने इत्यादी – झटकन काढून टाकली पाहिजेत. काँग्रेस सरकारचे म्हणणे ती हळूहळू काढावीत. म्हणजे कसं होणार? कुत्र्याचं शेपूट तोडायचे असेल, ते झटकन

बुडख्यापासून तोडलं, तर कुत्रं एकदाच ओरडेल, थोडा वेळ विव्हळेल आणि मग शांत होईल. त्याऐवजी रोज थोडं थोडं कापलं, तर कुत्रं रोज केकाटणार आणि एखाद्या दिवशी संधी साधून चावणार. नेहरूनीतीनं देशाचं वाटोळं झालं, हे सर्वमान्य झाल्यानंतर ती टाकून द्यायची म्हणजे कुत्र्याच्या शेपटाप्रमाणे एका झटक्यातच तोडायला हवी.

देशामधील नेहरूव्यवस्था टाकून, खुली व्यवस्था आणून, देशाचं भलं व्हायला मनमोहन सिंगांमुळे सुरुवात झाली; जगाशी व्यापार करू, आयात करू, निर्यात करू, गुंतवणूक करू असं ठरवलं; पण त्यानंतर दोनतीन गोष्टी घडल्या; त्यामुळे त्यांचा संकल्प पुढे जाऊ शकला नाही. तुम्ही जगाशी व्यापार करायला तयार झालात, तरी जग काही तुमच्याशी व्यापार करायला धजत नाही.

अयोध्येची मशीद पाडली आणि सगळ्या हिंदुस्थानात दंगे झाले. वाहतूक ठप्प झाली. सगळा व्यवहार बंद पडला. जळगावची केळी, नाशिकची द्राक्षे जागच्या जागी खलास झाली. जगभरचे लोक म्हणाले, 'यांना पोरांना खायला भाकरी देता येत नाही आणि तेराव्या शतकात तिथं मशीद होती का मंदिर, यावर भांडण करून हे सगळे व्यवहार ठप्प करतात. यांच्याशी व्यापार करू नये. उद्या हे कशावर भांडण काढतील कोण जाणे आणि आपलं कंत्राट पुरं करतील, की नाही याचीही शंका.

त्यानंतर मुंबईत बाँबस्फोट झाले. त्या वेळी व्यापारी करार करायला आलेली शिष्टमंडळे करार न करता परत गेली. ज्यांना कायदा आणि सुव्यवस्था पाहता येत नाही, जिथं गुंडांचं अधिराज्य आहे त्यांच्याशी व्यापार करून धोका कोण पत्करणार ?

चारपाच महिन्यांपूर्वी हिंदुस्थानात प्लेग झाला. साऱ्या जगात प्लेग नावाची गोष्ट शिल्लक नाही. फक्त हिंदुस्थानातच सापडला. प्लेग कुठून आला ? नेहरूंनी शहरं वाढवली, कारखाने वाढवले, शेती उजाड केली; मग आमची पोरं शहरात जगायला गेली, झोडपट्ट्यांमध्ये, गलीच्छ वस्त्यांमध्ये राहायला लागली. सगळीकडे गटारं तुंबलेली, चिखल साठलेला, उंदीरघुशींचा सुळसुळाट, प्लेग होईल नाही तर काय ? प्लेग झाला तो नेहरूंच्या धोरणामुळे झाला. या प्लेगला नाव द्यायचं तर 'नेहरू प्लेग'च म्हणायला पाहिजे. या प्लेगने देशाची बदनामी किती झाली? आपली माणसं परदेशांत गेली तर त्यांच्यावर औषध मारल्याशिवाय त्यांना आत घेत नाहीत. इथून गेलेलं विमानसुद्धा परदेशात धुऊन घेतात. मग व्यापार कोण

करणार आपल्याशी ? ते विचार करतात, यांच्या मालातून काय रोगजंतू येतील सांगता येईल ? त्यापेक्षा दुसऱ्या देशातून आणलेलं बरं.

आणि आणखी एक महत्त्वाची धोक्याची गोष्ट. आज मनमोहन सिंग आणि पी. व्ही. नरसिंह राव सगळ्या जगाला सांगताहेत, की आमच्यावरचं परकीय चलनाचं संकट टळलं आहे. परकीय चलनाचा आता तुटवडा नाही. आमच्याकडे भरपूर साठा आहे. हे खरं नाही. मनमोहन सिंग खोटं बोलताहेत. हिंदुस्थानात आज डॉलर आहे. याचं कारण असं, की हिंदुस्थानामध्ये सध्या व्याजाचा दर जास्त आहे आणि त्यामुळे परदेशांतील बँकांनी इथं पैसे ठेवले आहेत. दुसऱ्या एखाद्या देशांमध्ये जास्त चांगली गुंतवणूक होते आहे, असं दिसलं, की या बँका अत्यंत तातडीने आपले पैसे काढून घ्यायला लागतील. हे अशक्य नाही, मेक्सिकोत हे नुकतेच घडले आहे. हिंदुस्थानात हे झाले, तर रुपयाची किंमत पाच पैसेसुद्धा राहणार नाही.

देश इतक्या गंभीर अवस्थेत असतानासुद्धा प्रत्येकाच्या मनात एकच अभिलाषा – मला खुर्ची कशी मिळणार? देशाच्या या गंभीर अवस्थेवर उपाययोजना स्वतंत्र भारत पक्षाने ठरवली आहे. स्वतंत्र भारत पक्षाचं राज्य आलं, तर पहिल्या तीन महिन्यांची औषधयोजना अशी असेल –

१) १२ तारखेला मतमोजणी झाली, की १३ तारखेला सरकारचा शपथविधी होईल आणि १५ तारखेला नेहरूव्यवस्थेचे शेतकऱ्यांवर आणि शेतमजुरांवर लादलेलं कर्ज एका निर्णयाने रद्द केले जाईल.

२) सर्व नागरिकांना सुरक्षिततेत जगता आलं पाहिजे. आज गुंडांचा बंदोबस्त होत नाही; कारण गुंडांना पुढाऱ्यांचं संरक्षण आहे. पुढाऱ्यांचं सरंक्षण संपलं, तर सर्व गुंड ३० दिवसांच्या आत गजाआड होतील. मग देशातील कायदा व सुव्यवस्था सुरळीत होऊन, पुन्हा एकदा 'काठीच्या टोकाला सोनं बांधून निर्धास्तपणे काशीला जावं,' अशी स्थिती येईल.

३) बळिराज्याची स्थापना करण्यात येईल.

बळिराज्यामागचा विचार लक्षात घ्या. सरकार काहीही भलं करीत नाही. सरकारनं काम केलं आणि ते चांगलं झालं, असं एकसुद्धा उदाहरण नाही. सरकार कोणतीही समस्या सोडवत नाही. सरकार हीच समस्या आहे. हिंदुस्थानातला माणूस बुद्धिमान आहे, कर्तबगार आहे, कष्टाळू आहे. अमेरिकेसारख्या देशात गेलेल्या हिंदुस्थानी लोकांच्या या गुणांबद्दल तेथील सरकारला कौतुक आहे; पण हीच माणसं हिंदुस्थानात राहिली, तर त्यांची माती होते. कारण?

कारण, लायसन्स-परमिट-कोटा इन्स्पेक्टर राज... ही सगळी बंधनं काढून सर्व उद्योजकांना, शेतकऱ्यांना, कारखानदारांना, व्यावसायिकांना मोकळं करण्याचं काम स्वतंत्र भारत करणार आहे. १९८० मध्ये मी म्हटलं, गरिबी हटवण्यासाठी २० कलमी कार्यक्रम नको की ३० कलमी नको. शेतीमालाच्या भावाचा एककलमी कार्यक्रम घ्या; म्हणजे गरिबी हटेल. महात्मा गांधींनी गरिबी हटविण्यासाठी काय कार्यक्रम सांगितला होता ? IRDP सांगितला नव्हता, नियोजन सांगितलं नव्हतं, एकात्मिक ग्रामीण विकासाचा कार्यक्रम करा असं सांगितलं नव्हतं, भाकरी-पिठल्याची दुकानं घाला म्हणूनही सांगितलं नव्हतं. गरिबी हटवायची असली, तर गरिबाच्या छातीवर बसला आहात, तिथून उठायची तेवढी मेहेरबानी करा म्हणजे तो आपला आपण चालायला लागेल.

स्वतंत्र भारत पक्षाचा कार्यक्रम हा देशातल्या माणसाला, ज्याचे बुद्धिमत्ता, कर्तबगारी आणि कष्टाळूपणा हे गुण परदेशांत अगदी पुढारलेल्या राष्ट्रांतसुद्धा कौतुकाचे आणि आदराचे विषय आहेत, त्या माणसाच्या छातीवरून 'सरकार'ला उतरविणे आणि माणसाला त्याचे स्वातंत्र्य देणे.

(२१ फेब्रुवारी १९९५)

◆◆

खाईच्या धारेवर असलेल्या देशातील जनतेला धोक्याचा इशारा

निवडणुकीसंबंधीच्या नियमानुसार हे निवडणुकीचे भाषण आहे; पण खरे, तर मतदाराशी बोलण्याची ही संधी मी घेत आहे, ती निवडणूक प्रचारासाठी नाही; एक धोक्याची सूचना देण्यासाठी आहे. सर्व राष्ट्रावर एक महाभयंकर आर्थिक अरिष्ट येऊ घातले आहे. या संकटाची सूचना जास्तीत जास्त लोकांच्या कानी जावी म्हणून मी बोलत आहे.

कर्तबगार, बुद्धिमान, प्रतिभावान, कष्टाळू आणि शिस्तप्रिय राष्ट्रे शिखरावर पोचतात. भारतीयांत हे सर्व गुण आहेत; परंतु समाजवादाच्या नावाखाली ऐतखाऊ, गुंड, पुढारी यांना प्रतिष्ठा देणारी आणि उद्योजकांची कुचेष्टा करणारी व्यवस्था येथे उभी राहिली; पन्नास वर्षे चालली. आता हिशेब चुकता करण्याची वेळ आली आहे. निवडणुकांच्या गलबल्यांतही ही सूचना आपल्यापर्यंत पोचवण्याचा माझा प्रयत्न आहे.

निवडणुकीचे भाषण म्हटले, की त्याचा एक साचा ठरलेला आहे. पक्षाने किंवा उमेदवाराने आजपर्यंत किती गौरवास्पद कामगिरी बजावली आहे याचे रसभरित रंगतदार वर्णन; सत्तेवर आल्यास, आपण या देशात कसा स्वर्ग उतरवू याची मनमोहक चित्रे; सर्वांत जास्त महत्त्वाचे, विरुद्ध पक्षाचे सारे कसे दुष्ट आणि भ्रष्ट आहे आणि आपले ते सारे कसे धुतल्या तांदळासारखे स्वच्छ आहे, याची गुरांच्या बाजारातील दलालांच्या उत्साहाने केलेली वर्णने. या मिसळीत रामायण-महाभारतातील काही कथा आणि आजच्या युगातील काही आंबटशौकी विनोद मिसळले, की झाले निवडणुकीचे भाषण.

स्वातंत्र्यानंतरच्या पहिल्या काही निवडणुकांच्या प्रचारात असल्या चेष्टितांनी लोकांची भरपूर करमणूक झाली, नंतर काही काळ त्यांच्या संवेदना बोथट झाल्या आणि ते असल्या प्रकारांकडे दुर्लक्ष करू लागले. गेल्या काही निवडणुकांत

मात्र असल्या भाषणांचा लोकांना संताप येऊ लागला आहे. देशात ढीगभर पक्ष, सगळेच स्वत:ची वाखाणणी करणारे, असे असताना देशाची अशी दैना का ? स्वातंत्र्याच्या पन्नास वर्षांनंतर देशात गरिबी, बेकारी, महागाई थैमान का घालत आहेत ? रस्ते, रेल्वे, पाणी, वीज, दूरसंचार अशा प्राथमिक वस्तूंची आणि सेवांचीही चणचण का आहे ? भ्रष्टाचार, राजकीय गुन्हेगारी, तस्करी आणि गुंडशाही कायदा आणि सुव्यवस्था मोडून टाकण्याइतके प्रबळ कसे झाले ? ठगांचा बंदोबस्त दिडशे वर्षांपूर्वी इंग्रजांनी केला होता. ते ठग आता पुन्हा सत्ता कशी गाजवू लागले ? स्वातंत्र्यानंतरच्या भारताचे स्वप्न का नासले ? एकाही पक्षाला भारताची ही घसरगुंडी थांबवता का आली नाही ? निवडणुकीच्या निमित्ताने या प्रश्नांची चर्चा व्हायला पाहिजे होती. कोणताही पक्ष या विषयांवर बोलत का नाही?

आपल्या चुकांचा कबुलीजबाब देणे राज्यकर्त्या पक्षांना सोयीचे वाटत नाही, हे समजण्यासारखे आहे; पण विरोधी पक्षांनी तरी देशाचा नेमका आजार काय आणि त्यावर उपाययोजना कोणती याबद्दल स्पष्टपणे बोलायचे का टाळावे? "आपल्या पक्षाची माणसे सत्तेवर आली म्हणजे सगळे सुरळीत होईल, भ्रष्टाचार संपेल व देशाची भरभराट होईल," असली आश्वासने अनेकांनी दिली. सगळ्या पक्षांचा एकसूत्री कार्यक्रम सत्ता मिळवणे आणि ती मिळाल्यावर टिकवणे एवढाच. पक्षापक्षांत मतभेद असले, तरी ते अणुबाँब, काश्मीर अशा प्रश्नांवर. महत्त्वाच्या आर्थिक प्रश्नावर कोणत्याच पक्षाचे काही स्पष्ट विचार किंवा कार्यक्रम दिसत नाहीत. राज्यकर्त्या पक्षाचे एक तोंड खुलीकरणाची भाषा बोलते. प्रत्यक्षात खुलीकरणाचा कार्यक्रम जुन्या नेहरू व्यवस्थेचेच पुनरुज्जीवन करण्याचा आहे. समाजवादाचा अमल चालू असता, हे विरोधक त्यावर टीका करीत; सरकारने खुलीकरणाची घोषणा करून, विरोधकांना चकवले आणि विरोधक आता तोंड फिरवून नेहरूंची भाषा बोलत आहेत. समाजवाद शब्दाऐवजी 'स्वदेशी', 'हिंदुत्व' असले शब्द ते वापरतात, एवढाच काय तो फरक! 'स्वदेशी' एवढी गुणकारी असती, तर गेल्या पन्नास वर्षांत आयातीवर हर प्रकारची बंधने घालूनही देश स्वयंपूर्ण का झाला नाही ? याचे उत्तर त्यांच्याकडे नाही. याहूनही मोठा विनोद म्हणजे खुलीकरणाला विरोध करणारे विरोधी पक्ष हाती सत्ता आली, की अर्ध्या रात्रीत खुलीकरणाची भाषा बोलू लागतात आणि आपल्या राज्यात परदेशी गुंतवणूक यावी यासाठी विलायतेच्या वाऱ्या करून, धडपडू लागतात.

पन्नास वर्षांत साकार झाले ते गांधींचे स्वप्न नाही; खरी ठरली ती चर्चिलची

अभद्रवाणी. अर्थशतकभर समाजवाद, औद्योगिकीकरण, सार्वजनिक क्षेत्राचे आधिपत्य, स्वावलंबन इत्यादी तत्त्वांच्या गोंडस मुलाम्याखाली नोकरशाही, लाल फीत, भ्रष्टाचार माजला. पंचाहत्तर पैसे शेतीमालाची सरकारी लूट झाली, कष्टकरी कंगाल झाले, ऐतखाऊंची संस्कृती उभी राहिली. सत्तेशी संबंधित सगळे अमीर बनले. यांपैकी कोणत्याही प्रश्नाविषयी चिंता निवडणुकीच्या कोलाहलात कोठे दिसत नाही.

माझा पक्ष लहान आहे. लोकशाही म्हणवणाऱ्या या देशात आमच्या पक्षाला मान्यताही मिळू शकत नाही; कारण काय ? समाजवादाच्या निष्ठेची खोटी शपथ घेण्यास आम्ही नकार दिला, एवढेच. प्रामाणिकपणाबद्दल आम्हाला शिक्षा झाली. माझ्या पक्षाला मान्यताही नाही, निवडणूक चिन्ह तर दूर राहिले. 'स्वतंत्र भारत पक्ष,' वय वर्षे फक्त तीन; पण आमच्या स्वतंत्रतावादी विचारांची परंपरा फार मोठी आहे.

प्रत्येक व्यक्ती ब्रह्मस्वरूप मानण्याची येथील परंपरा आहे. धर्मगुरू, राजसत्ता यांचा बडेजाव न वाढवता, बहुकेंद्रित समाज हा भारतीय आदर्श 'बळिराज्या'चा म्हणजे खुल्या व्यवस्थेचा पाया आहे. स्वराज्य आंदोलन म्हणजे सर्वच राज्यसत्ता संपुष्टात आणण्याच्या दिशेने पहिले पाऊल असे गांधीजी म्हणत. नेहरू-जमान्याच्या ऐन भरात लायसेन्स-पटमिट-इन्स्पेक्टर राजचा धोका ओळखणाऱ्या दूरदर्शी चक्रवर्ती राजगोपालाचारींच्या 'स्वतंत्र पक्षा'च्या आर्थिक विचारांचा वारसा 'स्वतंत्र भारत' पक्ष सांगतो. 'भीक नको, हवे घामाचे दाम,' या मागणीसाठी चाललेले शेतकरी आंदोलन ही आमची प्रेरणा आहे. १९७९ मध्ये काँग्रेसचे पानिपत करणारा 'जनता पक्ष' आमचा साथी आहे. त्यांच्याच 'चक्र हलधर' या चिन्हावर आम्ही महाराष्ट्रात निवडणुका लढवत आहोत.

मंदिर, मशीद, मंडल, राखीव जागा, हिंदुत्व, दलितत्व असले लोकांच्या प्राथमिक भावनांना हात घालणारे प्रश्न इतर पक्ष पुढे रेटीत आहेत. स्वस्त तांदूळ, स्वस्त झुणका-भाकर, फुकट घरे, सर्वांना नोकऱ्या, शाळेत फुकट जेवणे असल्या आश्वासनांची आतषबाजी चालू आहे. अशांशी सामना असतानाही आम्ही तुमच्या जातिधर्माला आवाहन करीत नाही, की प्रलोभने दाखवीत नाही. तुमच्या अनन्य व्यक्तिमत्वाला आमचे आवाहन आहे. तुम्हाला दानधर्म करून भीक घालण्याचा आमचा कार्यक्रम नाही. अशी भीक देऊ करणे भारतीय नागरिकाचा अपमान आहे, असे आम्ही मानतो. भारतीय नागरिक आणि समाज कर्तबगार आहे. परदेशांत गेलेले भारतीय नाव कमावतात; धन कमावतात.

भारतात राहिलेल्यांचीमात्र माती होते. त्याचे कारण स्वातंत्र्योत्तर काळत येथे उभी राहिलेली सरकारशाही व्यवस्था आणि उद्योजकांना स्वार्थी आणि ऐतखाऊंना परोपकारी समजणारी समाजवादी व्यवस्था. भारतातील नागरिकांच्या पायातील समाजवादी बेड्या तुटल्या, तर ते प्रगती करू शकतात. त्यांना सरकारशाहीच्या बेड्यांतून मुक्त करण्याचा कार्यक्रम मी व माझे सहकारी घेऊन उभे आहोत.

ही सर्व भाषा आपल्याला अनोखी वाटेल. बहुतेक मतदारांना आमच्या कार्यक्रमात रस वाटणार नाही. मंडल, मंदिरांचा कैफ चढल्याने देशाची अवस्था काय आहे, याची स्पष्ट जाणीव कोणाला होत नाही. आम्ही झुणका-भाकर घालत नाही; परंतु आम्ही देश संकटातून सोडवू शकतो.

अत्यंत सावधानपणे, सखोल अभ्यासांती आमची अशी खातरी पटली आहे, की 'कधी कोणी न ऐकले, ना पाहिले,' असे संकट भारतावर कोसळू पाहत आहे. जुन्या सोव्हियत युनियनच्या प्रदेशांत आज आर्थिक अराजक माजले आहे. तसेच आपल्याही देशात अगदी नजीकच्या भविष्यकाळात होण्याची शक्यता आहे. रशियन लोकांना समाजवादी व्यवस्थेची पापे आणि दुष्कृत्ये समजली आणि ते खुलीकरणाच्या कामाला गंभीरपणे लागले. मार्क्स, एंगल्स, लेनिन, स्टॅलिन यांचे पुतळे उखडू लागले. आमच्या देशात समाजवादी प्रयोगाचे भीषण परिणाम लक्षात आले; पण सरकारी संरक्षणाची ऊब आणि शासकीय खैरातींचा मोह सुटत नाही. म्हणून नेता, तस्कर, गुंडा, अफसर, डावे, उजवे, मंडलवाले, मंदिरवाले समाजवादाच्या चिखलात लोळत राहण्याचा आग्रह धरीत आहेत. परिणाम अटळ आहे. येत्या दोन किंवा तीन वर्षांत प्रचंड आर्थिक अरिष्ट येणार आहे. रस्ते, रेल्वे संचार व्यवस्था आजच खिळखिळ्या झाल्या आहेत, त्या कोलमडून पडतील. ऊर्जा साधने दुर्मिळ होतील, वीज कधी काळी येईल, उद्योगधंद्यांत प्रचंड मंदी येईल. बेकारी वाढेल, भूकमार वाढेल आणि रुपया घसरत घसरत डॉलरमागे ६० रुपयांपर्यंत पडेल. उद्योजकांना वाव देणारी व्यवस्था तयार होईपर्यंत रुपया घसरतच राहील. एकेकाळी डॉलरला वरचढ समजला जाणारा रशियन रुबल साडेसहा हजार रुबल प्रतिडॉलर इतका घसरला. रुपयाची परिस्थिती वेगळी नाही. ऐतखाऊंचे नाणे घसरतच राहणार.

निवडणुकीच्या तोंडावर, मतपेटीला सामोरे जाताना या धोक्याची सूचना देण्याचे अप्रिय; पण पथ्यकर काम मी करत आहे; अशासाठी, की जेव्हा हे अरिष्ट कोसळेल, तेव्हा, "या संकटाची सूचना आम्हाला कोणी दिलीच नव्हती हो!" अशी तक्रार करायला तुमच्यापैकी कोणाही नागरिकास जागा राहू नये.

हे अरिष्ट कोसळले, की आज आकर्षक, मनमोहक, उत्तेजक वाटणाऱ्या सर्व कार्यक्रमांचे रंग उडून जाऊन, त्यांची विद्रूप भीषणता देशासमोर येईल. सत्तेच्या हव्यासापोटी जातिवाद, धर्मवाद, समाजवाद यांचे झेंडे उभारणाऱ्या नेत्यांचे देशद्रोहीपण स्पष्ट होईल. अशा संकटात सापडलेले देश हुकूमशाहीकडे वळतात. जर्मनीत हिटलरचा भस्मासुर उभा राहिला. काही काळ देशाला त्याने संकटातून वाचवले असे वाटले. आर्य वंशाच्या आणि जर्मन राष्ट्राच्या श्रेष्ठत्वाच्या जाणिवेने जर्मनांना काही काळ गुदगुल्याही झाल्या; पण अखेरीस सर्व बेचिराख झाले. दुसऱ्या महायुद्धाच्या राखेतून खुली व्यवस्था मानणारा जर्मनी उभा राहिला. त्यांच्या प्रगतीचा असा चमत्कार, की जर्मनीची फाळणी संपून, अखंड जर्मनी तयार झाला.

माझ्या मतदार भावांनो, बहिणींनो, हिटलरचे प्रतिअवतार आजच उपटू लागले आहेत. त्यांच्या हाती तुम्ही देश सोपवलात, तरी काही काळात देश अधिकच हलाखीत जाईल आणि शेवटी 'बळिराज्या'कडे आपणास जावेच लागेल. अरिष्ट प्रत्यक्षात पुढे येऊन ठाकल्यानंतर, खातरी पटल्यानंतर आपण खुल्या व्यवस्थेकडे जाण्याचे ठरवू शकता; पण देशावर असा दुर्धर प्रसंग येऊ द्यायचाच नसेल, तर आपणास आजच मताचा योग्य वापर करावा लागेल. देशाचे पतन थांबवून, २१ व्या शतकाच्या सुरुवातीला संपन्न भारत साकार करण्याचा आम्हाला आत्मविश्वास आहे. आम्ही आपणास सस्त्या कार्यक्रमाची लाच देऊ इच्छीत नाही. 'रक्त, घाम आणि अश्रू' यांची मागणी तुमच्याकडे करत आहोत. पन्नास वर्षांची समाजवादी पापे धुण्यासाठी त्यांची गरज आहे. नेहरू-व्यवस्थेचे देशाच्या सर्वांगांत भिनलेले विष तीन वर्षांच्या आत उतरवण्यासाठी तपशीलवार तीसकलमी योजना आमच्या पक्षाच्या जाहीरनाम्यात दिलेली आहे. शेतकरी, कष्टकरी, उद्योजक, ग्राहक यांच्या पाठिंब्याने ऐतखाऊंचे मनसुबे उधळून लावून, नवा भारत उभा करण्याचा आम्हाला विश्वास आहे.

अगदी तातडीने म्हणजे नवीन संसद भरण्याच्या पहिल्या दिवसापासून काही उपाय केले, तरच आर्थिक अराजकाचे अरिष्ट टळू शकते.

एक- सरकारी करआकारणी आणि वसुली कमी करावी, सरकारी- प्रशासकीय खर्च त्याहून कमी करून, तुटीच्या अंदाजपत्रकाची पद्धत बंद करावी.

दोन- उत्पादन, व्यापार, वित्तपुरवठा या सर्व क्षेत्रांत कायदेकानूंचा बुजबुजाट झाला आहे. हे सर्व कायदेकानू एका दिवसात रद्द करावेत. उद्योगधंदे, व्यापार, शेती, आयात-निर्यात यासंबंधीची सर्व बंधने काढून टाकण्यात यावीत, आवश्यक

तर काही ग्राह्य नियम नव्याने लागू करता येतील. यामुळे निदान नियम आणि बंधने काय आहेत, हे तरी स्पष्ट होईल. उद्योजकांना यामुळे मोठे प्रोत्साहन मिळणार आहे.

तिसरा महत्त्वाचा कार्यक्रम, समाजवादाच्या काळात संघटित कामगारांनी संघशक्तीचा दुरुपयोग करून, औद्योगिक शिस्त संपवून टाकली आहे. सर्व सच्छील नोकरांनाही याचे दु:ख आहे. आपल्या सेवांचा योग्य उपयोग सरकारने करावा अशी त्यांची तळमळ आहे. संघटित नोकरवर्गाला वारेमाप पगार आणि भत्ते आणि बाकीच्यांना भाकरीही नाही असे कसे चालेल ? बाजारातील किमतींप्रमाणेच पगारमानही मागणी-पुरवठ्याप्रमाणे ठरले पाहिजे आणि खट्याळ नोकरदाराला वळण लावण्यासाठी तो कायम असला, तरी घटस्फोटापेक्षा जास्त खटाटोप करावा लागू नये, अशीही उद्योजकांची अपेक्षा आहे.

एवढे तीन बदल जरी तातडीने केले, तरी अर्थव्यवस्था भरभराटीस लागेल आणि रुपया वाचू शकेल; पण त्याआधी एक महत्त्वाचे काम. समाजवादाने अर्थव्यवस्था मोडकळीस आणली, एवढेच नाही तर नवे ठगांचे राज्य उभे केले. या ठगांचा बंदोबस्त करून, "काठीच्या टोकाला सोने बांधून काशीस जावे," अशी परिस्थिती तयार झाल्याखेरीज उद्योजकांचे नवे युग येऊ शकणार नाही, हे उघड आहे.

मतामतांच्या गलबल्यात आमच्या क्षीण आवाजात आम्ही मतदारांना देशापुढील अरिष्टांची भयसूचना आकांताने देत आहोत. आमच्या मार्गाखेरीज देशास गत्यंतर नाही, याबद्दल आमचा विश्वास आहे. या निवडणुकीत मतदारांनी सरकारशाही आणि समाजवादास अव्हेरले, तर अरिष्टकाळात देशाच्या यातना थोड्यातरी कमी होतील.

आमचे काम आम्ही केले, देशाचे भवितव्य आता तुमच्या हाती आहे.

(६ एप्रिल १९९६)

◆◆

खाईच्या धारेवर, मतपेटीच्या समोर!

लोकसभा निवडणुकीची प्रक्रिया २७ मार्च रोजी सुरू झाली आहे. मे महिन्याच्या अखेरपर्यंत निवडणुकांचे निकाल हाती येतील. जून महिन्यात नव्या लोकसभेचे पहिले सत्र भरेल. त्याआधी पंतप्रधानांची नियुक्ती व्हायला पाहिजे; पण टांगत्ते बहुमत राहिले, तर पंतप्रधानांच्या नियुक्तीबाबत निर्णय घेण्यास राष्ट्रपतींना विलंब होण्याची शक्यता आहे.

देशाला भेडसावणाऱ्या प्रश्नांसंबंधी काही धाडसी निर्णय घेणे नव्या पंतप्रधानांना शक्य होणार नाही. आपले बहुमत सांभाळत, चालूबाजार खासदारांच्या खरेदी-विक्रीच्या भावांवर नजर ठेवत, त्यांना दिवस कंठावे लागणार आहेत. त्यातच, जातीय किंवा इतर दंगली पेटल्या, भ्रष्टाचाराची बोफोर्स-हवालासारखी काही प्रकरणे निघाली, शेजारील देशांशी संघर्ष निर्माण झाले अथवा अणुनियंत्रण, तैवान अशा प्रश्नांवर गरमागरमी झाली, तर नवीन पंतप्रधानांना देशापुढील खऱ्याखुऱ्या प्रश्नांकडे लक्ष देण्याइतकी सवड मिळण्याची शक्यता फार कमी. सवड झाली, तरी खऱ्या प्रश्नांचा सामना करणारा पंतप्रधान देशाला मिळण्याची काही शक्यता आजतरी दिसत नाही.

कोणाही पक्षाकडे आर्थिक कार्यक्रम नाही. अर्थमंत्री मनमोहन सिंग यांनी काहीही आव आणला, तरी खरी गोष्ट अशी, की काँग्रेसची प्रकृती राज्यवादी बनलेली आहे. राजकीय शासनाकडे सर्वंकष सत्ता असावी; अर्थव्यवस्था, धर्मसंस्था, प्रसारमाध्यमे, शिक्षण, आरोग्य, न्याय या सर्वच क्षेत्रांत पुढाऱ्यांचा वरचष्मा असावा; सर्वसामान्य जनतेला सरकारी परवान्याखेरीज काहीच करता येऊ नये; परंतु पुढाऱ्यांना वश केले, तर काहीही करण्यास आडकाठी नसावी अशी व्यवस्था काँग्रेसच्या स्वभावाला भावते. येनकेनप्रकारेण सत्ता टिकविणे, हे त्यांचे उद्दिष्ट. आंतरराष्ट्रीय अर्थसंस्थांच्या दडपणामुळे, त्यांना मनमोहन सिंग

यांना नाइलाजाने सामावून घ्यावे लागले, एवढेच काय ते. आता फॅशनेबल झालेल्या खुल्या व्यवस्थेच्या बाता कराव्यात आणि प्रत्यक्षात लायसेन्स-परमिट-इंस्पेक्टर, सबसिडी राज जमेल तितके पुढे रेटावे, हा त्यांचा खरा कार्यक्रम.

पी. जी. वूडहाऊसच्या कादंबऱ्यांत कर्जात पार बुडालेल्या जमीनदारांच्या वाड्यात सर्व हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी सावकार आपला माणूस 'बटलर' म्हणून ठेवतात. असे बऱ्याच वेळा दाखवलेले असते. कर्जात बुडालेल्या हिंदुस्थानच्या सगळ्या कारभारावर लक्ष ठेवण्यासाठी आंतरराष्ट्रीय अर्थसंस्थांनी भारतात एक असा 'बटलर' ठेवला आहे. त्याचे नाव मनमोहन सिंग. काँगेसऐवजी भारतीय जनता पार्टी किंवा राष्ट्रीय मोर्चाचे सरकार आले, तरी असाच कोणी तरी 'बटलर' त्याही सरकारात राहणारच आहे. अशा काँग्रेसेतर सरकारांची धोरणेदेखील काही फार वेगळी असणार नाहीत. पश्चिम बंगालचे डावे मुख्यमंत्री ज्योती बसू, कर्नाटकच्या जनता दलाचे देवेगौडा निवडून आल्यानंतर 'स्वदेशी'च्या वल्गना सोडून, सरळ खुल्या अर्थव्यवस्थेचा पुरस्कार करू लागतात, याचे रहस्य मनोरंजक आहे. एन्रॉन प्रकरणी थोडीफार खळखळ करून, 'अगं म्हशी, मला कुठे नेशी,' असे म्हणत युती शासनाला जुन्याच शरद पवार शासनाची कार्यवाही पुढे चालवावी लागली, ही गोष्टही अर्थपूर्ण आहे.

खुलीकरणाची गरज

दिल्लीला काँग्रेसेतर सरकार आले, तर तेही मूँह में 'खुली व्यवस्था' आणि बगल में 'जुनीच विटी' असे धोरण चालवणार आहे. याला पर्यायही नाही. गांधींच्या स्वप्नातील स्वयंपूर्ण ग्रामराज्याकडे जाण्यास कोणी तयार नाही. खुलीकरणाची गरज निकडीची आहे. समाजवादाच्या अर्धशतकात गुंतवणुकीचा तुटवडा पडला आणि केलेली गुंतवणूक आतबट्ट्याची झाली. त्यामुळे सर्वसामान्यपणे जगण्यासाठी लागणाऱ्या व्यवस्थाही मोडकळीस आल्या आहेत. जुन्या सोविएत रशियाच्या भूप्रदेशात, समाजवादी काळात टाकलेल्या पेट्रोलवाहिका गंजून गेल्या आहेत आणि जागोजाग त्या फुटतात, आगी लागतात अशी परिस्थिती आहे. हिंदुस्थानात पाणी, ऊर्जा, आरोग्य, शिक्षण, रस्ते, लोहमार्ग, वाहतूक संचाराची साधने यासंबंधी साऱ्याच व्यवस्था झपाट्याने कोसळत आहेत. पिण्यासाठी स्वच्छ सुरक्षित पाणी नाही, वीज कधी तरी नवसासायासाने यायची, आगगाड्या वेळापत्रकाऐवजी दिनदर्शिकेने येणार-जाणार अशी परिस्थिती अगदी नजीकच्या भविष्यकाळात उभी राहणे अटळ आहे. या सर्व क्षेत्रांत परदेशी गुंतवणूक आणि तंत्रज्ञान स्वीकारल्याखेरीज काही पर्याय नाही. स्वातंत्र्यानंतरच्या नेहरूजमान्यात

दुष्काळ टाळण्यासाठी पीएल-४८० गव्हाच्या बोटी साऱ्या राजकीय सार्वभौमत्वाच्या आणि तटस्थपणाच्या गप्पा बाजूला ठेवून, बोलवाव्या लागल्या. तशीच परिस्थिती आज आहे. अन्नधान्याऐवजी व्यवस्थांचा दुष्काळ होऊ घातला आहे, एवढीच काय ती पन्नास वर्षांच्या नियोजन राजवटीची करामत!

परकीय गुंतवणूक आणि तंत्रज्ञान यांशिवाय विकास तर सोडाच, संरक्षणही अशक्य अशी परिस्थिती आहे. गुंतवणूकदारांना हिंदुस्थानाविषयी खास प्रेम किंवा सहानुभूती असण्याची काही शक्यता नाही. आपली गुंतवणूक सुरक्षित राहील किंवा नाही आणि त्या गुंतवणुकीवर मिळकत किती मिळेल यावर देशी-विदेशी गुंतवणूकदारांची नजर असणार. त्यांच्या दृष्टीने हिंदुस्थानातील परिस्थिती आजही काही फारशी आकर्षक नाही. कायदा-सुव्यवस्था ढासळली आहे. मंदिर-मशिदीसारखे मध्ययुगीन प्रश्न येथील नागरिकांच्या भावना कडेलोटापर्यंत नेऊ शकतात. नोकरशाहीच्या ओझाखाली गुदमरलेल्या देशात राखीव जागांच्या प्रश्नावर शेकडोंनी लोक जाळून घेण्यास तयार होतात. धर्म-जातींचा उपयोग स्वार्थासाठी करणारे आगलावे मोठी प्रतिष्ठा मिळवतात आणि काही तरी आचरट युक्तिवाद करून, परदेशी गुंतवणूकदारांवर हल्ले केले जातात. गुंतवणूक आणि उद्योगधंदे यासंबंधी कायदेकानूं आणि नियम यांचे प्रचंड जंगल माजले आहे. जागोजागी हात ओले केल्याखेरीज पुढे एक पाऊल सरकता येत नाही. अशा परिस्थितीत येथे गुंतवणूक करण्यास कोणी धजावे ? कालपरवापर्यंत निदान राजकीय स्थैर्य होते, आज सुरू झालेल्या निवडणुकीची प्रक्रिया संपेल, त्या वेळेस, कदाचित ते स्थैर्यही संपलेले असेल; मग गुंतवणूकदारांनी येथे यावे कशासाठी ? क्षेत्रस्थानातील मग्रूर भिकाऱ्याप्रमाणे हिंदुस्थानची स्थिती आहे. आम्हाला त्याची गरज नाही, अशी आमची एकूण भाषा आणि प्रवृत्ती!

पुरे झाली मग्रुरी!

गुंतवणूक वाढावी यासाठी राजकीय, सामाजिक आणि आर्थिक व्यवस्था आमूलाग्र बदलून, स्वच्छ कराव्या लागतील. आंतरराष्ट्रीय सहकाराची देवाण-घेवाणीची भाषा तोंडी रुळावी लागेल. श्रीमंत राष्ट्रांनी आपणास मदत करणे हे त्यांचे कामच आहे असली मग्रुरी आणि हरघडी त्यांना शिवीगाळ करणे यापुढे कोणी खपवून घेणार नाही. सध्याची धोरणे सुरूच राहिली, तर दोन वर्षांत सर्व नागरी व्यवस्था कोसळलेल्या दिसतील. रशियाचा रुबल कोसळला, तशीच अवस्था रुपयांचीही होणे अपरिहार्य आहे. परकीय चलनाच्या साठ्याविषयी अर्थमंत्री आणि पंतप्रधान देशाला फसवीत आहेत. सोने गहाण टाकणाऱ्या

देशाकडे आज परकीय चलनाचा बऱ्यापैकी साठा जमला आहे, हे खरे; पण त्या आधाराने आर्थिक व्यवस्थेत मोठी सुधारणा झाली आहे, असा अर्थ कोणी लावला, तर त्याला राजकारणी म्हणावे लागेल, अर्थशास्त्री नाही.

अनिवासी भारतीय आणि इतर गुंतवणूकदार यांना येथे मोकळेपणाने पैसे पाठविण्याची संधी बऱ्याच काळाने उपलब्ध झाली आणि त्यामुळे परकीय चलनाचे लोंढे येथे आले. भारतातील व्याजदर चढते असल्याने, येथे पैसे ठेवणे किफायतशीर आहे. त्यामुळे गंगाजळी फुगली आहे. परकीय चलनाच्या साठ्यात आंतरराष्ट्रीय व्यापारातील शिलकीने काही भर घातलेली नाही. निर्यात वाढली हे खरे; पण आयात त्याहीपेक्षा जास्त वाढली. कारखानदारी मालाची निर्यात करणे इथल्या उद्योजकाला कठीण जाते. बेकार व महागडा माल येथील मक्तेदारी बाजारपेठेत खपवता येतो, परदेशांत त्याला कोण विचारतो ? ५० वर्षांच्या समाजवादानंतर भारत आजही कच्चा माल पिकवणाराच देश आहे. समाजवादी नियोजनाच्या काळापासून कच्च्या मालाच्या सर्व निर्यातीवर बंधने आहेत. थोडक्यात, जो माल आपण जगाला विकू शकतो, तो विकायची परवानगी नाही. परिणामत: रुपयाची परकीय चलनातील किंमत कितीही घटली, तरी आयातीपेक्षा निर्यात जास्त होण्याची शक्यता नाही. म्हणजे, सरकारी धोरण सावरले नाही, तर रुपयाची घसरण चालूच राहणार. डॉलरची बरोबरी सांगणारा रशियन रुबल अक्षरश: कवडीमोल झाला, त्याप्रमाणेच रुपयाची गती सुरू आहे. निवडणूक संपेपर्यंत रुपयाची घसगुंडी तात्पुरती थांबविण्यात आली आहे. आज ३५ रुपयांना एक डॉलर हा भाव कसाबसा टिकवून ठेवण्यात आला आहे. निवडणुकीनंतर राजकीय अस्थैर्य तयार झाले आणि खंबीर धोरण अवलंबिले गेले नाही, तर ६० रुपयांना डॉलर किंवा दीड सेंट म्हणजे एक रुपया, अशी परिस्थिती तयार होणे अटळ आहे. निवडणुकींना सामोरा जाणारा देश अशा प्रकारच्या संकटाच्या सावलीत आहे. दुर्दैवाने याची जाणीव पुढाऱ्यांनाही नाही आणि मतदारालाही नाही.

शाळकरी मुलांना फुकट जेवणे, झुणका-भाकर फुकट, घरे फुकट, रोजगार-बेरोजगार भत्ता असल्या आचरट आश्वासनांची खैरात सगळेच पक्ष करत आहेत. समाजवादाच्या पतनाने भांबावून गेलेल्या मतदारालाही काय करावे, हे समजेनासे झाले आहे. 'समाजवादा'ची जागा 'हिंदुत्व' घेत आहे. विकासाचे आणि समाजवादाचे नाव घेऊन, सरकारशाही माजवावी, हा नेहरू कार्यक्रम फसला आहे. तो पुढे चालू ठेवणे शक्य नाही; पण म्हणून काही समाजवादाचे लाभधारक

सरकारी साम्राज्य विसर्जन करायला थोडेच तयार होणार ? ते पर्याय शोधत आहेत. समाजवादात काही किमान आर्थिक जबाबदारी शासनाला घ्यावीच लागते. हिंदुत्वामध्ये अशी कोणतीच जबाबदारी नाही. धर्म-राष्ट्राच्या आवाहनाखाली समाजवादी सरकारांनादेखील जे अधिकार गाजवता आले नाहीत, ते गाजवता यावेत ही हिंदुत्वाची प्रेरणा आहे. 'हिंदुत्व' हा भारतीय समाजवादी व्यवस्थेचाच नवा अवतार आहे. या कारणाने भा.ज.प. नेहरूनीतीची भलावण करत आहे आणि खुलीकरणाला विरोध करीत आहे. डाव्या आणि उजव्यांच्या युतीचे हे रहस्य आहे.

दळणवळण, वाहतूक, पाणी, ऊर्जा, व्यापारी सेवा या सर्व संरचना विस्कळीत होण्याचा आणि रुपया कोसळण्याचा धोका देशाच्या डोक्यावर, केसाने बांधलेल्या टांगत्या तलवारीप्रमाणे लटकत आहे. गेली पाच दशके समाजवादाच्या नावाखाली फुकटखाऊंची संस्कृती जोपासली गेली, त्याचा हा अपरिहार्य परिणाम आहे. अशा परिस्थितीला टक्कर देण्याचे सामर्थ्य आणि प्रतिभा मंदिरवाल्यांकडे नाही, मंडलवाल्यांकडे नाही; डाव्यांकडे नाही, उजव्यांकडे नाही आणि तरीही ते आता निवडणुकीचे ढोलनगारे, कडकडाट सुरू करणार आहेत.

हे संकट केव्हा कोसळेल? त्याच्या लक्षणाची पूर्वचाहूल आजसुद्धा जाणकारांना लागली आहे. प्रत्यक्ष अरिष्ट दोन वर्षांत येईल; फार तर तीन. त्यापेक्षा जास्त काळ आपली अर्थव्यवस्था तग धरू शकणार नाही. संरचना आणि रुपया कोसळला, तर देशभर मंदीची लाट येईल, बेरोजगारांच्या फौजा फिरू लागतील, नोटांच्या गठ्ठ्यांना रद्दीची किंमत येईल क्षुद्रवादी त्याचा फायदा घेतील आणि यादवी तयार होऊ शकेल. दुर्दैव असे, की या बेकारांच्या फौजा अजाणपणे सरकारकडेच आशेने पाहतील. ज्यांच्यामुळे विनाश ओढविला, त्या सरकारच्या हातीच अधिक आर्थिक सत्ता द्या, असा धोशा लावतील. राष्ट्रवाद, स्वदेशी, समानता अशा शब्दांचे फवारे उडतील. ज्यांच्याकडे थोडी मालमत्ता आहे, तिचेही राष्ट्रीयीकरण करावे, अशा घोषणा होतील आणि समाजवादामुळे पोळलेला देश एका विपरीत हिंदुवादी, राष्ट्रवादी नात्सीवादाकडे ढकलला जाण्याचा धोका तयार होईल.

हे सगळे अरिष्ट टाळणे अशक्य आहे, असे नाही. बांडगुळी अर्थव्यवस्था धि:कारून क्षणाक्षणाने कष्ट करणारी आणि कणाकणाने संचय करणारी संस्कृती उभी करणे सोपेही नाही. त्यासाठी लागणारी दूरदृष्टी, संयम आणि प्रतिभा चालू बाजारात तयार मिळत नाहीत. मंडई भरली आहे राखीव जागा, झुणका-भाकर,

फुकट घरे, राममंदिर, राष्ट्रीयीकरण अशा स्वस्त मालाने. असल्या मालाची दुकानदार विक्री करत आहेत.

हिटलरचा भस्मासुर

समाजव्यवस्थांना जेव्हा-जेव्हा ग्लानी येते, तेव्हा त्याला वाचविणारे युगपुरुषही निर्माण होतात आणि अनेकवेळा खलपुरुषही. पहिल्या महायुद्धातील पराभवानंतर जर्मन व्यवस्था अशीच कोसळली. त्या संकटात हिटलरचा भस्मासुर उभा राहिला. तसे हिटलरी खलपुरुष रशियात आणि आपल्याकडेही डोके वर काढू पाहत आहेत. अगदी खराखुरा युगपुरुष अवतरला, तरी त्यालाही मोठा वनवास भोगावा लागेल आणि एकामागोमाग एक चमत्कार घडवावे लागतील.

प्रथम दुष्टांचे निर्दालन. समाजवादाच्या कालखंडाने केवळ आर्थिक अरिष्ट आणले असे नाही, तर काळाबाजारी, गुंड, तस्कर, गुन्हेगार, पुढारी इत्यादी यांना पोषक वातावरण तयार करून, साधी कायदा-सुव्यवस्थाही मोडून-तोडून टाकली. इंग्रज हिंदुस्थान आले, तेव्हा जसे ठगांचे राज्य चालू होते. तसेच आज नव्या ठगांचा अंमल सर्वत्र चालू आहे. या ठगांचा बंदोबस्त करणे अधिक कठीण आहे. नवे ठग जंगलात लपलेले नाहीत. खुलेआम समाजात वावरत आहेत. त्यांच्याकडे प्रतिष्ठा, सत्ता, संपत्ती आहे, आधुनिक शस्त्रास्त्रे आहेत. निम्मे पोलिस त्यांच्या अंकित आहेत. कायदेकानूंचे असे जंगल माजले आहे, की न्यायालयात एका पिढीत न्याय मिळणे दुरापास्त झाले आहे. 'काठीला सोने बांधून काशीला बिनधास्त जाता यावे' यासाठी कठोरपणे गुंडांच्या टोळ्या आणि त्यांना सामील असलेले पुढारी मोडून काढावे लागतील. या टोळ्या म्हणजे प्रतिसरकारेच आहेत; देशापासून अलग होण्याची मागणी ते उघडपणे करत नाहीत, एवढेच! त्यांना सर्व फुटीर अतिरेक्यांप्रमाणेच वागवले गेले पाहिजे.

पण, एवढ्याने कायदा-सुव्यवस्था प्रस्थापित होणार नाही. कायद्याला पुन्हा प्रतिष्ठा प्राप्त झाली पाहिजे. समाजवादाच्या काळात नागरिकांचे मूलभूत हक्क, विशेषत: मालमत्तेसंबंधीचे हक्क संपविण्यात आले आहेत. कायद्यांचे जंगल माजले आहे. सर्व अनावश्यक कायदे रद्द, नाही तर निदान काही काळापुरते स्थगित करून, पोलिसांवरील कामाचा बोजा कमी करावा लागेल. जमीनजुमला, किरकोळ गुन्हे इत्यादीबद्दलची प्रकरणे सोडविण्याचा अधिकार ग्रामपंचायतीला देऊन, न्यायव्यवस्थेवरील ओझे कमी करावे लागले. कायदा म्हणजे थट्टा नाही; कायदा कोणत्याही परिस्थितीत पाळला जाईलच, अशी जरब तयार झाली पाहिजे. सौदे आणि करार कोणी मोडू पाहील, तर त्यावर कायदेशीर कारवाई

तातडीने होऊ शकते, असा विश्वास निर्माण झाला, तरच देशातील उद्योजकांना आवश्यक ती जमीन तयार होईल. गुंडराज्य ही समाजवादाची दुसरी बाजू आहे. उद्योजकतावादी व्यवस्थेत शांतता आणि सुव्यवस्था प्राणवायूइतकीच आवश्यक असते.

उद्योजकांना अवहेलना

सज्जनांचे संरक्षण आणि दुष्टांचे निर्दालन झाल्यानंतर एका एका नवीन व्यवस्थेची संस्थापना करावी लागेल. हे काम गंभीरपणे करायचे ठरले, तर ते दोन-तीन वर्षांत सहज आटोपता येईल. प्रश्न नवीन व्यवस्था निर्माण करण्याचा नाही; ज्या व्यवस्था निसर्गक्रमाने सहज फुलल्या-फळल्या असत्या, त्यांचे कोंबसुद्धा फुटू नयेत, अशी बंदिस्ती मोडून काढण्याचा हा सवाल आहे. गेल्या अर्धशतकात सर्व उत्पादक, कष्टकरी, उद्योजक यांची 'फायद्यामागे धावणारे निव्वळ स्वार्थी लोक,' अशी अवहेलना झाली. उलट, भरपूर भत्ते खाऊन देशाचे नुकसान करणारे 'मोठे देशहितेच्छु' अशी वाखाणणी झाली!

महात्माजींनी 'तस्लिमान' सांगितला, "जे धोरण सर्वांत हीन-दीन माणसाचे भले करते, ते चांगले." बापूजींच्या 'तस्लिमाना'त बदल करून, "निदान एका माणसाला रोजगार देणाऱ्या इसमाचे जे भले करेल, ते देशासाठी भले," अशी दुरुस्ती आता करावी लागेल. सर्वसाधारण उद्योजकांच्या अडचणी अगदी स्पष्ट आहेत. सरकारी करांचे ओझे आणि अधिकाऱ्यांना द्याव्या लागणाऱ्या बक्षिसांचे ओझे असह्य झाले आहे. एकूण अंदाजपत्रकातील दोन तृतीयांश रक्कम नोकरदारांवर खर्च होते आणि हे नोकरदार जनतेला सतावण्याचे व लुटण्याचेच काम पूर्णवेळ करत असतात. अशा सुलतानीत उद्योजक बाजारपेठेतील स्पर्धेस कसे तोंड देऊ शकतील ? डॉ. मनमोहन सिंग म्हणतात त्याप्रमाणे, हा काही केवळ वित्तीय तूट दूर करण्याचा प्रश्न नाही. डॉक्टरसाहेब वित्तीय तूट दूर करण्यासाठी करवसुली वाढविण्याचा आग्रह धरत आहेत. कराचा बोजा वाढला, तर उद्योजक अधिकच खचून जाईल आणि नोकरशाहीचा बोजा आणखीच वाढेल. करवसुली कमी करणे आणि नोकरांवरील खर्च त्याहीपेक्षा कमी ठेवणे, शिलकीची अंदाजपत्रके, रिझर्व्ह बँकेकडून उचल घेण्यास बंदी... अशा मार्गांनी बेफाम उधळलेल्या सरकारी खर्चाचा वारू लगाम घालून, आटोक्यात आणावा लागेल. सर्व सरकारी यंत्रणेचे 'पराकाष्ठेची काटकसर' हे मुख्य सूत्र मानले पाहिजे. निम्म्या-अधिक नोकरवर्गाला काम नाही. त्यांना घरी पाठवण्यात काही अनैतिक आहे, असे कोणी म्हणू शकणार नाही; पण तसे करण्याची आवश्यकता नाही. चहा पिण्यात,

चकाट्या पिटण्यात आणि स्वेटर विणण्यात गर्क असणाऱ्या नोकरदारांना तातडीने संरचना सुधारण्यासाठी; रस्ते, कालवे, लोहमार्ग या कामांवर पाठविले, तर मोठा बदल घडवून आणता येईल.

नियमांचे जंगल

उत्पादन, व्यापार, आयात-निर्यात, पतपुरवठा या सर्व क्षेत्रांत लायसेन्स-परमिट कायदेकानूं व नियमावलीचे जंगल माजले आहे. आपल्या मालाला परदेशांत मागणी आहे; पण निर्यात करण्याची कटकट मोठी आणि नेमके काय करायचे, कोणीच सांगू शकत नाही... अशी परिस्थिती. त्यामुळे निर्यात मंदावते. नेमके कायदेकानूं काय, हे कोणीच सांगत नाही; पण जरा काही केले, की हात पुढे फैलावून बक्षिसी मागणाऱ्या किंवा धमकी देणाऱ्या अधिकाऱ्यांच्या झुंडीच्या झुंडी तुटून पडतात. याला एकच उपाय आहे. एका शुभदिनी हे सारे आर्थिक कायदेकानूं आणि नियम रद्द झाले असे जाहीर करण्यात येईल. जे थोडेफार नियम आवश्यक आहेत असे शासनाला वाटेल, ते पुन्हा एकदा नव्याने जारी करावेत. म्हणजे अंमल असलेल्या नियमांची नेमकी सूची तरी सर्वांना मिळू शकेल.

समाजवादाच्या कालखंडात आणखी एक भयानक गोष्ट घडली. शासनाने आपल्या दोस्तान्याला लायसेन्स-परमिट मेहेरबान करून, मक्तेदारी सुपूर्द केली. मक्तेदारीच्या धंद्यात ग्राहकाला लुटून, उद्योगधंदेवाल्यांनी प्रचंड नफे कमावले. यातूनच मेहता, दत्ता सामंत पद्धतीची कामगार चळवळ फोफावली. "हे वाटेल तितके नफे कमावतात, कामगारांचा वाटा द्यायला काय हरकत आहे ?" अशी भाषा सुरू झाली. फायदे चढते असल्याने, या कारखानदारांना संप परवडत नव्हते. म्हणून ते कामगारांच्या मागण्या मान्य करू लागले आणि कामगार चळवळ इतकी मजबूत झाली, की आता अगदी कमालीची बेशिस्त दाखवणाऱ्या कामगारादेखील, तो कायम असेल, तर कामावरून दूर करणे अशक्य आहे. थोड्या संघटित कामगारांनी भरपूर पगार, भत्ते मिळवून ठेवले आहेत. साहजिकच कंत्राटी मजूर घेण्याकडे कल वाढतो आहे. कामगाराला काम जितक्या सहजतेने मिळावे, तशाच सहजतेने त्याला कामावरून दूर करण्याची व्यवस्था नसेल, तर कारखान्यात कार्यक्षमता उपजूच शकत नाही. बायकोला काडीमोड देऊन दूर करणे सोपे; पण कायमस्वरूपी नोकर काढता येत नाही, अशा परिस्थितीत उत्पादकता आणि कार्यक्षमता येऊच शकत नाही. तेजीच्या काळात ठरलेले पगार मंदीच्या काळातही चालू राहिले पाहिजेत, असे म्हटले तर बेकारी वाढणार.

बेकारीस बऱ्याच अंशी संघटित कामगार जबाबदार आहेत. पगारमानही उत्पादनाशी, तसेच मागणी-पुरवठ्याशी जोडण्याची आवश्यकता आहे. एवढ्या तीनच गोष्टी नवीन सरकारने केल्या, तरी ९८-९९ सालचे अरिष्ट टळू शकेल.

समाजवादी आभास

त्यानंतर, नवीन व्यवस्था संस्थापनाला सुरुवात होईल. राजकीय शासनाचा पसारा किमान असावा. कायदा-सुव्यवस्था संरक्षण या क्षेत्रात जोपर्यंत शासन परिपूर्ण कार्यक्षमता दाखवत नाही, तोपर्यंत त्याला इतर कामात नाक खुपसण्याची काय आवश्यकता ? सारे अर्थकारण स्पर्धेवर आधारलेले असावे हे खरे; पण कमजोर वर्ग, दीनदुबळे, अपंग यांनी स्पर्धेत कसे यावे ? अशा वर्गाच्या नावाखाली सुरू झालेले सगळे सरकारी कार्यक्रम पुढाऱ्यांच्या आणि कंत्राटदारांच्या खिशात पोचतात. गरिबी निवारणाचा एकमेव यशस्वी कार्यक्रम म्हणजे गुरुद्वारातील लंगर! अहल्याबाई होळकर आणि गाडगे महाराज यांनी या प्रश्नाचे उत्तर दाखविले आहे. या संस्थांचा स्वभाव मदर टेरेसांचा असला पाहिजे; हवालावाल्यांचा नाही. तसेच शिक्षण, आरोग्य, न्याय, प्रसारमाध्यमे अशा मनुष्यप्राण्याच्या वेगवेगळ्या प्रज्ञांसाठी वेगळ्या वेगळ्या सार्वभौम व स्वयंभू शासनसंस्था तयार होतील. समाजवादाने सर्व सत्ता आणि शहाणपणा पुढाऱ्यात असल्याचा आभास तयार केला. आता राजाच्या दरबारात उभे राहून, त्याला आव्हान देण्याऱ्या भर्तृहरीच्या कवींचा जमाना येऊ दिला पाहिजे.

'स्वतंत्र भारत' पक्षाने जाहीर केलेल्या ३० कलमी कार्यक्रमात नेहरू-समाजवादाचे विष थांबविण्याचा आणि उतरविण्याचा कार्यक्रम मांडला आहे. त्यात मोठ्या तपशिलाने ही उपाययोजना सांगितली आहे. समाजवादी व्यवस्थेमुळे पंगू बनलेल्या, हिंमत खचलेल्या 'नाही रे'ची हुकूमशाही संपवून, त्या जागी खासगी व्यक्तित्व प्राणपणाने जपणाऱ्या 'आहे रे'चे लोकतंत्र उभारण्याचा हा कार्यक्रम आहे; पण आजारी माणूस औषध घ्यायलाच तयार नसेल, तर काय करावे ? रोगी कुपथ्याचाच आग्रह धरू लागला, तर कोणा वैद्याची काय मात्रा चालणार! 'मायबाप' सरकारच आपले काय ते करील, अशा विश्वासाने धडाडी, कर्तबगारी विसरलेली आणि स्वस्त झुणका-भाकरीच्या मागे लागलेली जनता अशी कर्तबगारी अंगावर घ्यायला तयार होईल ?

इतिहास आणि अनुभव असे सांगतात, की गुलामीत जडलेल्या सवयी सोडणे कठीण असते. फार थोडे गुलाम सुटण्याची धडपड करतात किंवा पळून जातात. कोरभर भाकरी घालणारा मालक असे तोपर्यंत, उपाशीपोटी ते स्वतंत्र

राहतात. मालक राहिलाच नाही, म्हणजे गुलामीच्या बेड्या तोडण्याची खटपट चालू होते. झुणका-भाकरही मिळत नाही असे दिसले म्हणजे गुलाम बेड्या आपटू लागतात. या निवडणुकीत देशाला 'रक्त, घाम आणि अश्रू' असा पर्याय देण्याच्या कुवतीचा कोणी 'चर्चिल' नाही; पण असा कोणी असेल, तर केवळ दोनचार वर्षांच्या काळातच आर्थिक कडेलोट झाल्यानंतर अशा 'चर्चिल'च्या शोधात देशाला जावे लागेल. तेव्हा शांतिदूत म्हणून गाजलेले 'चेंबर्लेन' हास्यास्पद ठरलेले असतील आणि जिद्दीने देशाची मान उंचावू पाहणाऱ्याचे श्वास मोकळे होतील!

(२१ एप्रिल १९९६)

◆◆

इति अटलबिहारी प्रकरणम्

लोकसभेत भारतीय जनता पक्षाच्या अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखालील सरकारच्या विश्वासदर्शक ठरावावरील चर्चा दूरदर्शनच्या माध्यमामुळे लक्षावधी लोकांनी पुरे नऊ तास पाहिली. एवदिवसीय क्रिकेटचा सामना पाहताना प्रेक्षक जागा सोडून बऱ्याच वेळा उठतात. पहिले सलामीचे खेळाडू बाद होऊन परतले, की शेवटच्या दहा षटकांतील आतषबाजी सुरू होईपर्यंत खेळ काहीसा कंटाळवाणा होतो. लोकसभेतील खेळ त्याहीपेक्षा चित्तवेधक ठरला. कदाचित, नव्या नवलाईमुळे हे घडले असेल. विश्वासाच्या ठरावावरील चर्चा दूरदर्शनवर एवढी व्यवस्थित दाखवली जाण्याची ही पहिलीच वेळ. नव्याने निवडून पाठवलेले खासदार काय करतात, यासंबंधीचेही थोडेसे कुतूहल. यामुळे लोकसभेतील चर्चेने लोकांना दूरदर्शन संचासमोर खिळवून ठेवले. दहा जून रोजी देवेगौडा सरकारच्या विश्वासदर्शक ठरावावर होणारी चर्चा दूरदर्शनवर पाहण्यासाठी लोक तितक्याच उत्कंठेने बसतील किंवा नाही, याबद्दल शंका आहे. सरकार पुन्हा बदलले आणि वर्षा-दोन वर्षांत पुन्हा तिसऱ्या सरकारने विश्वासदर्शक ठराव मांडला, तर दूरदर्शनसमोर, कदाचित्, कोणी बसायलाही तयार होणार नाही.

लोकसभेत कोणत्याही पक्षाचे किंवा आघाडीचे बहुमत नाही, तरीही त्यातले त्यात मोठ्या पक्षांचे नेते म्हणून श्री. अटलबिहारी वाजपेयी यांना राष्ट्रपतींनी निमंत्रण दिले आणि ३१ मेपूर्वी लोकसभेत आपले बहुमत सिद्ध करण्याचा आदेश दिला. ज्या पक्षाकडे तोंडदेखलेदेखील बहुमत नाही, त्या पक्षाच्या नेत्यास पंतप्रधान म्हणून कार्यभार सांभाळण्याचे निमंत्रण देणे, हा प्रकार स्वातंत्र्यानंतरच्या काळात आजपावेतो कधी घडला नव्हता, या वेळी तो घडला.

चौधरी चरणसिंगांनी फुटक्या जनता पक्षाचा एक तुकडा घेऊन, पंतप्रधानकीच्या

खुर्चीस आपले बूड लावण्याचा घाट घातला, त्या वेळी इंदिरा गांधींच्या काँग्रेस पक्षाने पाठिंब्याचे जुजबी आणि तोंडदेखले आश्वासन दिले होते. ते आश्वासन परत फिरवल्यावर लोकसभेत न जाताच, चौधरीजींचे सरकार कोसळले; तरीही ज्या क्षणी राष्ट्रपतींनी चौधरीजींना निमंत्रण दिले, त्या क्षणी किती का डळमळीत असेना, किती का जुजबी असेना, लोकसभेत बहुमताचा पाठिंबा मिळण्याची शक्यता स्पष्ट होती. चंद्रशेखर यांच्या शासनाच्या वेळीही असेच घडले. राजीव गांधींनी त्यांना पूर्ण पाठिंबा जाहीर केलेला होता. समाजवादी जनता दलाची ताकद अगदी किरकोळ; पण काँग्रेसचा पाठिंबा हिशेबात धरला, तर चंद्रशेखर यांना बहुमताचा आधार मिळण्याची शक्यता अगदीच नगण्य नव्हती. थोडक्यात, ज्याला पंतप्रधान नेमायचे, तो लोकसभेत बहुमत मिळवण्याची चांगली संभावना असल्याखेरीज आजपर्यंत पंतप्रधानकीची शपथ घेण्यासाठी कोणाला निमंत्रण देण्यात आले नव्हते.

राष्ट्रपतींनी वाजपेयींना निमंत्रण दिले; समान कार्यक्रमाच्या आधाराने बहुमत प्रस्थापित करण्यास सांगितले. हे चूक का बरोबर ? एकूण दिसते असे, की राष्ट्रपतींनी सर्वांत मोठा पक्ष असलेल्या भाजपच्या नेत्यांना पहिली संधी देण्याचे मनाशी सुरुवातीपासूनच ठरवून टाकले होते. स्पष्ट बहुमत आम्ही मिळवणार असा गलका भाजप आणि मित्रपक्षांनी मोठ्या जोराने केला होता. पंतप्रधान म्हणून अटलबिहारींना पाहावे अशी मोठी व्यापक लोकेच्छा होती. दुसऱ्या कोणास सरकार स्थापन करण्यासाठी निमंत्रण दिले, तर भारतीय जनता पक्षातील 'उग्रवादी' आणि बजरंग दल, शिवसेना यांसारख्या 'दंडेलवादी' घटकांना देशभर अशांतता निर्माण करण्याची संधी मिळाली असती. या भीतीमुळे कदाचित् राष्ट्रपतींनी असा निर्णय घेतला असावा. आठ-पंधरा दिवस भाजपचे सरकार खुर्चीवर बसवून, हिंदुत्वातील वाफ काढून टाकावी अशी त्यांची अटकळ असू शकेल.

काँग्रेसने संयुक्त मोर्चास पाठिंबा द्यायचे ठरवले आहे, हे वर्तमानपत्रांत केव्हाच जाहीर झाले होते. काँग्रेस कार्यालयातून त्यासंबंधीचे पत्र पाठवण्यात दिरंगाई झाली; त्यामुळे राष्ट्रपतींनी संयुक्त मोर्चाच्या विकल्पाकडे दुर्लक्ष केले, हा युक्तिवाद राष्ट्रपतींना अगदीच 'कारकून बाबू' ठरवणारा आहे. इतका महत्त्वाचा निर्णय घेण्यापूर्वी राष्ट्रपतींनी काँग्रेस अध्यक्षांना बोलावून, त्यांचा इरादा काय आहे, याची खातरजमा करून घेऊन, पंतप्रधानपदाबद्दलचा निर्णय घेतला असता; पत्र दोन तास उशिरा आले म्हणून इतका मोठा निर्णय राष्ट्रपतींनी अपुऱ्या

माहितीच्या आधाराने घेतला असेल, हे सभंवत नाही.

संयुक्त मोर्चाचे लोक सोडल्यास राष्ट्रपतींच्या निर्णयाविरुद्ध फारसा आवाज उठला नाही. भाजप बहुमत मिळवू शकणार नाही, हे स्पष्ट होते; तरीही, अटलबिहारींनाच पंतप्रधान बनण्याचा पहिला मान मिळाला, याबद्दल जनसामान्यांना समाधान होते. अपेक्षेप्रमाणे घडले.

भाजप सरकार तेरा दिवस टिकले आणि कोसळले, आता या तेरा दिवसांच्या अनुभवाने काही नवे मुद्दे आणि प्रश्न उपस्थित झाले आहेत. लोकसभेत बहुमत मिळवण्याची त्यातल्या त्यात जास्त शक्यता ज्यांना असेल, त्यांनी ती शक्यता अजमावून पाहावी; काही निश्चित मोर्चेबांधणी करावी; कागदोपत्री तरी सरकार लोकसभेचा विश्वास मिळवू शकते किंवा नाही, याची परीक्षा कोठे आणि केव्हा झाली पाहिजे ? ही परीक्षा राष्ट्रपतींनी पंतप्रधानकीचे निमंत्रण देण्याआधी केली पाहिजे की ही परीक्षा लोकसभेच्या दालनातच झाली तरी चालेल ? कोणालाही पंतप्रधानपद बहाल करावे आणि पंधरा दिवसांत बहुमत प्राप्त करण्यास त्याला सांगावे अशी प्रथा पडली; तरी ती मोठी अवघड आणि प्रसंगी घातकही ठरू शकेल. पंधरा दिवसांपर्यंत राष्ट्रपतींच्या मर्जीने कोणीही पंतप्रधान होऊ शकतो आणि पाचपन्नास साथीदारांचे मंत्रिमंडळ बनवू शकतो; त्यांना मंत्रिपदाची शपथ देववू शकतो. मंत्रालयातील अगदी महत्त्वाच्या गोपनीय अशा प्रकरणांचे दस्तऐवज त्यांना पाहता, तपासता येतील अशी मुभा मिळवून देऊ शकतो. हे सर्व मोठे विचित्र वाटते. पंतप्रधानांना, गृहमंत्र्यांना, संरक्षणमंत्र्यांना, वित्तमंत्र्यांना पदभार सांभाळताच राष्ट्राच्या हिताशी आणि संरक्षणाशी संबंध असलेली काही माहिती घ्यावी लागते. लोकसभेचे बहुमत प्राप्त झाल्याखेरीज कोणत्याही पदावर प्रत्यक्ष कामकाजात ढवळाढवळ करणे, ही कल्पनाच असह्य होते. तेरा दिवसांच्या काळात अनेक गोपनीय प्रकरणांच्या झेरॉक्स प्रती काढण्यात आल्या असा उघड आरोप भाजप शासनाविरुद्ध करण्यात आला.

सगळ्यांत विचित्र म्हणजे लोकसभेत बहुमत सिद्ध न केलेल्या मंत्रिमंडळाच्या सल्ल्याने राष्ट्रपतींच्या अभिभाषणाचा मसुदा तयार झाला. राष्ट्रपतींनी ते भाषण दोन्ही सभागृहांच्या संयुक्त सत्रासमोर वाचूनही दाखवले. मोठमोठे भडक, वादविवादाचे विषय टाळण्याचा सुज्ञपणा वाजपेयींनी दाखवला. उदाहरणार्थ- अयोध्या, घटनेचे कलम ३७०, समान नागरी कायदा या विषयांवर कोणतेही निवेदन राष्ट्रपतींनी केले नाही; पण गोहत्याबंदीचा उल्लेख राष्ट्रपतींनी केलाच. राष्ट्रपतींच्या अभिभाषणाबद्दल आभार मांडणारा ठराव लोकसभेत चर्चेला येण्यापूर्वीच

अभिभाषणाचे लेखक सरकारच परागंदा झाले, आता पुढे काय होणार ? आभारदर्शक ठराव मांडला जाणार किंवा नाही ? का राष्ट्रपतींनी अभिभाषण केले; पण संसदेने त्याची नोंदही घेतली नाही अशी विचित्र परिस्थिती राहणार ? यापलीकडे जाऊन, राष्ट्रपतींच्या भाषणात काही दुरुस्त्या सुचवणारा ठराव कोणत्याही सदनाने संमत केला किंवा विचारार्थ घेतला, तर केवढी अवघड परिस्थिती तयार होऊन बसेल!

स्पष्ट बहुमत असलेले पक्ष संसदेत असण्याचा जमाना आता संपला. यापुढे सरकारच्या स्थापनेबद्दल अवघड आणि नाजूक प्रश्न वारंवार समोर येतील. यासंबंधी स्पष्ट विचार झाला नाही, तर कोणाचेही स्पष्ट बहुमत नसलेली लोकसभा म्हणजे देशावर कोसळलेले काही भयानक संकट आहे, अशी एक भावना सर्वत्र रूढ होईल. लोकसभेच्या सभागृहात काही खासदारांनी जी वर्तणूक दाखवली, ती चालू राहिली तर संसदीय लोकशाहीविषयी जनतेच्या मनात अनादर तयार होईल आणि असल्या लोकशाहीपेक्षा ठोकशाहीच बरी असे चांगले भले सज्जन लोकसुद्धा म्हणू लागतील. हा मोठा गंभीर असो किंवा नसो, लोकशाहीपेक्षा जास्त चांगली राजकीय प्रणाली नाही, याबद्दल यत्किंचितही शंका निर्माण होता कामा नये. अन्यथा, हिटलरच्या उदयकाळात लोकशाही संस्थांविषयी जशी घृणा जर्मन मानसात तयार झाली, त्याच इतिहासाची पुनरावृत्ती येथे होण्याचा धोका स्पष्ट आहे.

ज्याला 'त्रिशंकू' म्हणतात तशी लोकसभा संकट नाही, फार फार तर ती इष्टापत्ती आहे अणि सर्व संबंधितांनी जबाबदारीची पुरेशी जाणीव दाखवली, तर 'त्रिशंकू' म्हणून अवहेलना केली जाणारी संसद, ही खरीखुरी लोकसभा असेल; जिवंत मंच असेल; चर्चा करण्याचा, एकमेकांना आपले म्हणणे पटवण्याचा प्रयत्न करण्याची ती जागा होऊ शकेल. विल्यम पीट, बॅरिस्टर नाथ पै यांच्यासारख्या अभ्यासू विचारवंत संसदपटूंना आपल्या वक्तृत्वाच्या प्रभावाने संसदेवर, खासदारांवर आणि जनमानसावर प्रभाव पाडण्याची संधी मिळवून देणारी 'त्रिशंकू' लोकसभा ही खरीखुरी लोकसभा असेल; पंतप्रधानांच्या आदेशाने शिक्का मारणारे ते यंत्र नसेल. स्वतंत्र भारत पक्षाच्या निवडणूक प्रचारात ही भूमिका आग्रहाने मांडण्यात आली होती. विश्वासदर्शक ठरावाच्या चर्चेत अशी काही लक्षणे दिसली नाहीत. लोकसभेतील भाषणांमुळे, युक्तिवादामुळे एकाही बिगर भाजप सदस्याचे मतपरिवर्तन झाले नाही. तेरा दिवसांच्या या काळात सर्वमान्य कार्यक्रमाच्या आधाराने सहमती करण्याचा प्रयत्न आम्ही केला, असे

वाजपेयी म्हणाले; काय नेमका प्रयत्न केला, हे काही स्पष्ट झाले नाही. नोटांनी भरलेल्या सूटकेसचा प्रयोग झाला नाही, हे मात्र सर्वमान्य आहे.

मतपरिवर्तनाच्या कल्पनेची अनेक विरोधक वक्त्यांनी खिल्ली उडवली.

"भाजपचे सरकार सत्तेवर राहावे हे पाहणे आमची जबाबदारी नाही."

"आपल्या अमोघ वक्तृत्वाने आमचे मतपरिवर्तन होईल अशी भाबडी आशा पंतप्रधानांना वाटत होती काय?"

"आमची मते ही आयुष्यभराच्या तपस्येतून तयार झालेली आहेत, ती सात-आठ तासांच्या चर्चेत अटलबिहारीजी बदलू पाहत होते काय?" इ. इ.

मूलभूत विश्वास मिळवण्यासाठी लोकसभेतील चर्चेचा फारसा उपयोग नाही; या विषयावरील मतपरिवर्तन संसदेच्या बाहेरच होऊ शकते, हे आता स्पष्ट झाले.

पण याचा अर्थ 'त्रिशंकू' लोकसभा आपल्या जिवंतपणाची उभारी दाखवणार नाही असा नाही. अटलबिहारी वाजपेयींनी भाजपच्या अत्यंत महत्त्वाच्या प्रश्नांवरील भूमिकांत तात्पुरत्या का होईना, तडजोडी स्वीकारल्या होत्या. नव्याने शासनावर आलेल्या देवेगौडा सरकारात व्यवस्थेला टोकाचा विरोध करणारेही आहेत. तरीही, त्यांच्या सल्लामसलतीने खुल्या व्यवस्थेची वाटचाल चालू राहील असे स्पष्ट आश्वासन श्री. देवेगौडा यांनी दिले आहे. अर्थव्यवस्था किंवा इतर कोणताही प्रश्न, त्यावरील चर्चा सभागृहात चालू असताना प्रत्येक तपशिलाच्या मुद्द्यावर देवाणघेवाणीला, तडजोड करण्यास, फेरविचार करण्यास वाव राहतोच. ती शक्यता जास्तीत जास्त उपयोगात आणण्याची कला नव्या लोकसभेत सदस्यांना शिकावी लागेल. थोडक्यात, सत्तेवर येणाऱ्या कोणत्याही शासनाने मूलभूत विश्वास दाखवणारा पाठिंबा शपथविधीपूर्वीच मिळवला पाहिजे. याबद्दल मतपरिवर्तन लोकसभागृहात करणे योग्य नाही आणि फारसे शक्यही नाही. याउलट, प्राथमिक विश्वास मिळालेले सरकार कामकाज पाहू लागले, की संसदेपुढे येणाऱ्या प्रत्येक प्रश्नावर, एकमेकांच्या विचारांवर प्रभाव पाडून, मतपरिवर्तन घडवून आणण्याची शक्यता राहतेच. पुरेशा बहुमताचा पाठिंबा मिळेल अशा तऱ्हेचा प्रस्ताव आकार घेऊ लागला, तरच निर्णय घ्यायचा, अन्यथा सहमती मिळवण्याचा प्रयत्न चालू ठेवायचा अशी नवी कार्यपद्धती अवगत करावी लागेल.

यासाठी, घटना दुरुस्तीची तशी आवश्यकता नाही. इस्त्रायलसारख्या युद्धग्रस्त देशाने लोकशाही व्यवस्था ही आघाडीच्या शासनामार्फतच चालवली आहे.

अरबांशी तडजोड घडवून आणण्याचे कठीण आणि नाजूक काम करणाऱ्या इस्त्रायली संसदेत शासन आणि विरोधक यांच्याकडे सारखीच म्हणजे एकोणसाठ-एकोणसाठ मते आहेत. अरब लोकतंत्र पक्षाच्या दोन सदस्यांवर सरकारपक्षाचे बहुमत अवलंबून होते आणि तरीही अगदी महत्त्वाचे, जीवनमरणाच्या प्रश्नासंबंधीचे निर्णय घेण्यात काही अडचण आली नाही. इटलीतील परिस्थितीही अशीच आहे.

भाजप शासनाने राज्यसभेतील स्वतंत्र खासदार राम जेठमलानी यांना कायदामंत्री म्हणून स्वीकारले आणि देवेगौडा सरकारने तर कोणत्याच पक्षाच्या नसलेल्या आणि कोणत्याही सभागृहाचे सदस्य नसलेल्या सरदार बलवंतसिंग रामूवालिया यांचा मंत्रिमंडळात समावेश केला आहे. जिवंत लोकसभेच्या व्यवस्थेत मंत्र्यांच्या अभ्यासूपणाची, कर्तबगारीची मोठी कठीण कसोटी लागणार आहे. या कसोट्यांना उतरणारे खासदार पुरेशा संख्येने निवडून येतीलच याची खातरी देणे कठीण आहे. त्यामुळे संसदेबाहेरच्याही सत्पात्र लोकांना मंत्रिमंडळात सामावून घेण्याची प्रवृत्ती वाढेल. अध्यक्षीय पद्धतीत मंत्री बनण्यासाठी संसदेत निवडून येण्याची आवश्यकता नसतेच. ब्रिटिश संसदेच्या धर्तीवर आधारलेली आपली व्यवस्था अध्यक्षीय व्यवस्थेतील काही प्रथा आत्मसात करेल अशी लक्षणे दिसतात. दर महिन्याला एका नव्या पंतप्रधानाला शपथ द्यायची, हे फार काळ कसे चालेल ? अरबी सुरस कथेत सुलतान दररोज संध्याकाळी निकाह लावे आणि सकाळ उजाडताच रात्रीच्या बेगमच्या शिरच्छेद करून टाके, तसा हा प्रकार होईल!

काही किमान स्थिरता आणण्यास काही पावले उचलावी लागतील. इस्त्रायलमधील व्यवस्थेसंबंधी उल्लेख वर आला आहे. तेथेही यंदापासूनच एक नवी व्यवस्था लागू झाली आहे. खासदारांच्या निवडणुका होतात, त्याचप्रमाणे पंतप्रधानपदासाठी मत देण्याची संधी आता सर्व नागरिकांना देण्यात आली आहे. संसदेत बहुमत असो किंवा नसो. पंतप्रधान पूर्ण मुदत संपेपर्यंत कायम राहतो अशी पद्धत आपल्याकडे आणण्याची कल्पना बरीच वर्षे मांडली जात आहे. ती मागणी जोर धरण्याची शक्यता आहे. प्रमाणबद्ध मतदानाच्या पद्धतीतूनही परिस्थितीत पुष्कळ सुधारणा घडवून आणता येईल; पण घटनेतील तरतुदींनी प्रश्न संपूर्ण कधीच सुटत नाहीत; काही प्रश्न सुटतात, काही नव्याने तयार होतात. संसदेतील सर्वांनीच जबाबदारीची पुरेशी जाणीव दाखवली, तर कोणत्याही पुरेशा घटनाबदलाखेरीजदेखील प्रश्न सुटू शकेल. कोणत्याही पक्षाचे बहुमत

नसताना शासन सुरळीत चालू शकेल, एवढेच नव्हे तर 'ठप्पेबाज' लोकसभेची जागा 'जिवंत' लोकसभा घेईल. १९९६ मध्ये तयार झालेली 'त्रिशंकू' लोकसभा आणि भाजप शासनाच्या तेरा दिवसांच्या अनुभवातून निघालेला निष्कर्ष तो एवढाच!

(६ जून १९९६)

◆◆

नाही, पंतप्रधानसाहेब!

विश्वासदर्शक ठरावावरील चर्चेच्या गदारोळात आणि गोलमालीत, नवीन पंतप्रधानांचे एक विधान दुर्लक्षिले जाण्याची शक्यता आहे; त्यात काही फारसे गंभीर किंवा महत्त्वाचे आहे असे न समजले जाण्याचीच शक्यता जास्त आहे.

चर्चेतच मुळी काही गांभीर्य नव्हते. चर्चेअंती व्हायचा निर्णय आधीच संसदेबाहेरील दालनांत पक्का झालेला होता; पण घंटोगणती चर्चेचं गुऱ्हाळ पार पडणे आवश्यकच होते. हे सर्व चर्वितचर्वण अर्थहीन का असेना, बहुसंख्य खासदारांना त्यात रस होता. एक कारण असे, की विश्वासदर्शक ठराव आणि राष्ट्रपतींचे भाषण यावरील चर्चा म्हणजे मनसोक्त आणि अर्थहीन बरळण्याची संधी असते. फारच थोडे खासदार विवक्षित मुद्दे घेऊन, प्रतिभाशाली मांडणी करतात. चर्चेच्या या खासदारप्रियतेचे आणखी कारण म्हणजे ही चर्चा दूरदर्शनवरून जशीच्या तशी थेट प्रसारित करण्यात येते, अगदी बातम्यांना दुसऱ्या वाहिनीच्या वाटे लावून.

जेव्हा इंद्रकुमार गुजराल चर्चेला उत्तर देण्यासाठी काही उरलेच नव्हते. ३० मार्च रोजी सीताराम केसरींनी केलेला गदारोळ निरर्थक होता. केवळ अकरा दिवसांपूर्वी ज्या मंत्रिमंडळाला डच्चू दिला होता, त्याच मंत्रीमंडळावर विश्वास दर्शविण्याची जय्यत तयारी लोकसभेने केली होती; पंतप्रधानाच्या खुर्चीवर बसणारात बदल झाला, एवढेच.

नवीन पंतप्रधानांना फक्त मनधरणी करणारे आवाज आणि हातवारे व मानेची हालचाल करावयाची होती आणि त्यांनी ते अत्यंत यशस्वीपणे केले. शेजारी बसलेल्या पास्वानांकडे सहेतुक दृष्टिक्षेप टाकून, त्यांनी बाबासाहेब आंबेडकरांना स्तुतिसुमने वाहिली; नेहरू, इंदिरा गांधी आणि लालबहादूर शास्त्रींचे गोडवे गाऊन, काँग्रेसवाल्यांची करुणा भाकली. त्यांनी अटलबिहारी यांची केलेली

मनधरणी तर इतकी उघड होती, की तो वृद्ध ब्रह्मचारीसुद्धा लाजून चूर झाला.

सार्वमत प्राप्त करणे ही साहजिकच 'अंदरुनी' खुबी आहे. नरसिंह रावांना ती चांगली जमली होती. देवेगौडांनी आपल्या पक्षाच्या योजना पुढे आणण्याचा जरा जास्तच प्रयत्न केला, त्याची किंमत त्यांना मोजावी लागली. गुजरालांनी त्यावरून योग्य तो धडा घेतला.

सार्वमत हे चांगले राजकारण असू शकेल. कार्यक्रम आणि शिफारशी, 'काही दिले, काही घेतले' स्वरूपाच्या तडजोडींनीच गळी उतरवायच्या असतात. अर्थात, पाठिंब्याच्या राजकारणाचा परिणाम बंधिलकी धूसर होण्यात आणि मूल्ये संदिग्ध होण्यात होऊ नये.

नव्या पंतप्रधानांनी आपल्या भाषणात शक्तिशाली रशियाच्या पतनाचा ऊहापोह विस्ताराने केला. रशियाचे पतन का झाले ? गुजराल रशियात एकदा पूर्ण कार्यकालासाठी भारताचे राजदूत होते. त्या काळात, रशियाचा कधी काळी पाडाव होईल असे क़ाही लक्षण त्यांना दिसले नाही. ते म्हणाले, ही फारच अस्वस्थ करणारी बाब आहे; कारण रशियातील आणि रशियाबाहेरीलही अनेकांना रशियाच्या पतनाची चाहूल फार पूर्वीच लागली होती. भारतीय राजदूत गुलाबी पत्रकारितेच्या चष्म्यामुळे आंधळे झाले नव्हते का ? राष्ट्राच्या परराष्ट्रसंबंधांबाबत कामकाजात भाग घेणाऱ्या दीर्घानुभवी परराष्ट्रव्यवहारचतुरास हे शोभा देणारे खासच नाही!

अगदी आजसुद्धा, रशियाचा डोलारा कोसळल्याबद्दल त्यांना दु:ख आणि अचंबा वाटतो आहे. रशियाच्या सध्याच्या सरकारमधील एका वरिष्ठ सदस्याने टिप्पणी केली आहे, "आजपर्यंत रशियामध्ये सरकारच नव्हते, फक्त पार्टी होती." पंतप्रधानांचे मतप्रदर्शन या एवढ्या टिप्पणीवरच अवलंबून आहे. श्री. गुजराल या खुलाशावर समाधानी आहेत असे दिसते.

श्री. गुजराल हे परराष्ट्रसंबंधी व्यवहारातील इतके मुरब्बी आहेत, की अशा प्रकारची टिप्पणी ते भोळेपणाने स्वीकारतील यावर विश्वास ठेवणे कठीण आहे. रशियाच्या अर्थव्यवस्थेत आणि समाजव्यवस्थेत काहीच चुकीचे नव्हते आणि तिथे बहुपक्षीय संसद असती, तर रशियाचा पाडाव झाला नसता असा खरेच त्यांचा विश्वास आहे का ?

श्री. गुजरालांनी एक मुद्दा मात्र स्पष्टपणे मांडला, की बहुपक्षीय सार्वमत ही त्यांची त्या घडीची गरज होती; पण पक्षाची एकाधिकारशाही नसली, तर रशियन पद्धतीची सरकारशाही आणि नियोजन ठीक आहे असे त्यांना म्हणायचे असेल

तर मात्र देश मोठ्या अडचणीत आहे.

आर्थिक सुधारांच्या कार्यक्रमातून हळूहळू गोडीगुलाबीने काढता पाय घ्यायचा विचार आहे, असा तर याचा अर्थ नाही ना ? केंद्रीय नियोजन आणि अर्थव्यवस्थेत सरकारी हस्तक्षेप देशाच्या दृष्टीने एकूणच वाईट आहे, याची जाणीव झाल्यामुळेच आपल्याला आर्थिक सुधारांच्या दिशेने पाऊल टाकावे लागले. नेहरू आणि इंदिरा गांधींबद्दलची गुजरालांची आत्मीयता सर्वज्ञात आहे; पण या दोघांच्या कारकिर्दीतील आर्थिक धोरणात काही चुकीचे नव्हतेच, असे त्यांना गंभीरपणे वाटते का ? तसे असेल तर, गुजराल सरकार हे फारच डावीकडे झुकले आहे आणि डाव्यांनी आर्थिक सुधारांना माघारी हाकलले आहे अशी जी सार्वत्रिक धारणा आहे, त्याला पुष्टीच मिळते.

रशियन साम्राज्याचा पाडाव कोण्या बाह्य दबावामुळे झाला नाही, हे आपल्याच भाराने कोसळले. सत्तेची साठमारी झाली नाही, काही कारस्थाने रचली गेली नाहीत का खून पडले नाहीत. रशियन साम्राज्याच्या पाडावात राजकीय काही नव्हते. बऱ्याच समजदार लोकांना शतकानुशतके जे सत्य ठाऊक होते, त्याचे हे पतन प्रत्यंतर होते. जे सरकार अर्थव्यवस्थेत ढवळाढवळ करते, ते अपरिहार्यपणे साधनसंपत्तीचे चुकीचे वाटप, अकार्यक्षमता, भ्रष्टाचार आणि जनसामान्यांच्या अधोगतीला कारणीभूत ठरते. रशियन साम्राज्याचे पतन म्हणजे केंद्र सरकारी नियोजनाच्या वांझपणाचा पुरावा आहे.

इंद्रकुमार गुजराल हे सुशिक्षित गृहस्थ आहेत. त्यांची व्ही. पी. सिंग सरकार आणि देवेगौडा सरकार दोन्हींमधील कर्तबगारी उत्कृष्ट होती. रशियन साम्राज्याच्या आणि समाजवादाच्या पतनामागील कारणांबद्दल ते अनभिज्ञ असूच शकत नाहीत. आशा करूया, पंतप्रधान विश्वासदर्शक ठरावाच्या वेळी जे काही बोलले, ते केवळ जाता जाता केलेली टिप्पणी होती; पण खरं तर, पंतप्रधानासारख्या अधिकाऱ्याबाबत असं असूनही चालणार नाही.

धुरीण मौन अनेक प्रकारे व्यक्त करतो. एक पंतप्रधान शब्दांची आतषबाजी करून ते करतो. खरोखरी अवघड जुळणी आहे!

(२१ मे १९९७)

◆◆

कांदाफेकीचे मर्म

विधानसभा आणि लोकसभा कुस्तीचे आखाडे बनले, ही काही नवी गोष्ट नाही; पण महाराष्ट्र विधानसभेच्या चालू अधिवेशनात विरोधी पक्षीयांनी सभागृहात कांदे नेले, त्यांची फेकाफेक केली. तेव्हापासून विधानसभेचे कामकाज हा पुन्हा एकदा चर्चेचा विषय झाला आहे.

सभागृहांची घसरती प्रतिष्ठा

विधानसभा, लोकसभा या चर्चा करायच्या जागा आहेत. तेथे बोलता आले पाहिजे. पार्लमेंट या शब्दाची व्युत्पत्तीच बोलणे या अर्थी लॅटिन शब्दातून झाली आहे. ब्रिटिश राजवटीतील कायदेमंडळांचे काम वेगळे होते. त्यावरून विधानसभा शब्द आला; पण परस्परचर्चेचे महत्त्व नावात प्रगटले नाही तरी, सभेमध्ये सभ्यांनी सभेच्या नियमाप्रमाणे म्हणजे सभ्यपणे वागावे, हे उघडच अपेक्षित आहे.

पूर्वी सभेसमोर ठेवलेल्या बिलांची सदस्य शब्दाशब्दाने, वाक्यावाक्याने छाननी करत; एकेका शब्दप्रयोगाबद्दल तासन् तास विवाद घडत. प्रस्तावित कायद्याचा हेतू योग्य आहे काय ? या कायद्याने तो हेतू साध्य होईल काय ? त्यातून काही दुष्परिणाम संभवतील काय ? याबद्दल चर्चा होत असे. वर्तमानपत्रांतही अमुक एक बिलाचे पहिले वाचन झाले; दुसऱ्या वाचनाच्या वेळी काय होईल, तिसऱ्या वाचनाच्या वेळी काही महत्त्वाचे बदल घडतील काय, अशी चर्चा होत असे. प्रश्नोत्तरांच्या तासांची मंत्रिगणांना धास्ती वाटे. सभागृहात एखादा प्रश्न विचारला गेला, तर देशभरासंबंधित प्रशासनात मोठी धावपळ होईल. सभागृहासमोर जायची माहिती अचूक असली पाहिजे; नाहीतर सभागृहाचा अवमान होईल, मंत्र्यांची राजकीय कारकीर्द संपून जाईल आणि प्रमादी अधिकाऱ्यांची तर कोणीच गय करणार नाही, हे स्पष्ट असे. सभागृहात

'Point of order' उभा करणे म्हणजे सभापतींच्या प्रतिष्ठेला आव्हान देण्यासारखेच होते. बाहेर काही दंगाधोपा घडला, तर त्याची चर्चा सभागृहात मोठ्या गांभीर्याने होत असे. थोडक्यात, सभागृहाचे कामकाज निवडणुकीतील फडांचा पुढील अंक नाही; निवडणूक झाली. आता शासनाची जबाबदारी राज्यकर्त्या आणि विरोधी दोन्ही पक्षांच्या सदस्यांनी निभावण्याची आहे अशी भावना होती.

सभागृहात बोललेल्या प्रत्येक शब्दाला काही वजन असे. महत्त्वाच्या चर्चांच्या वेळी काही विशेष सदस्य बोलणार असतील, तर पंतप्रधान सर्व कामे बाजूला सोडून, सभागृहात येऊन बसत. आता प्रत्येक मंत्र्याच्या चेंबरमध्ये अंतर्गत टेलिव्हिजनवर सभागृहाचे कामकाज पाहता येते, ऐकता येते. टीव्हीसमोर बसून, मुले आजकाल अभ्यास फायली काढणे, लोकांना भेटणे, बैठका घेणे इत्यादी कामे चालू ठेवतात; पण त्यामुळे सभागृहाच्या प्रतिष्ठेला धक्का बसतोच. सभागृहात पूर्वी छायाचित्रे काढण्याचीही बंदी होती, ध्वनिमुद्रणही करता येत नसे. मंत्रालयातील कुशल लघुलेखक पंधरा मिनिटांच्या पाळीपाळीने कामकाजातील शब्दन् शब्द उतरून घेत. लघुलेखनाची पद्धती आजही चालू आहे. ध्वनिफितींची व्यवस्था आली, तरी भाषणाचे मसुदे तपासण्यासाठी सर्व संबंधितांकडे पाठवले जातात. प्रत्यक्षात भाषण काय झाले, याचा सज्जड पुरावा असताना सदस्य सोईस्कर असे मोठेमोठे फेरफारही करून घेतात. कामकाजासंबंधीचे अहवाल म्हणजे प्रत्यक्षात घडलेल्या कार्यवाहीचे चित्रण राहिलेले नाही. सदस्यांना, विशेषत: राज्यकर्त्या पक्षाला, कार्यवाही जशी व्हायला पाहिजे होती असे वाटते त्याचे चित्रण अहवालात अधिक सापडते.

जनलज्जाही नुरली

अंतर्गत प्रक्षेपणामुळे सभागृहाची गेलेली प्रतिष्ठा राष्ट्रीय प्रसारणामुळे सावरली जाईल अशी आशा होती. आपण काय बोलतो, कसे बोलतो एवढेच नव्हे तर, कसे बसतो हेदेखील सारे राष्ट्र पाहणार आहे. या जाणिवेने सदस्य सभ्यपणे वागतील अशी आशा होती; पण ती लवकरच फोल ठरली. एवढेच नव्हे तर, आपण आवाज चढवून प्रतिपक्षाच्या सदस्यांच्या भाषणात कसा व्यत्यय आणला याचीच फुशारकी दंडेल सदस्य दृक्श्राव्य फितींच्या पुराव्याने मारू लागले. नव्या सदस्यांना कामकाजाच्या पद्धतीबद्दल प्रशिक्षण देण्याची व्यवस्था सर्वत्र झाली आहे; तरीही सभागृहांचे आखाडीकरण मंदावलेच नाही. हा प्रश्न प्रशिक्षणाने सुटणार नाही, जनलज्जेनेही काही फरक पडणार नाही. विधानसभेच्या घसरगुंडीची कारणे अधिक खोल आणि व्यापक आहेत, हे स्पष्ट आहे.

सभापतीची प्रतिष्ठा

पूर्वी सभापती राज्यकर्त्या पक्षातील वरिष्ठ वयस्क सदस्य असे. एकदा सभापती म्हणून निवड झाली, की आपल्या पक्षाशी औपचारिक संबंधही तो ठेवत नसे. सभेच्या कामकाजासंबंधी सर्व निर्णय तो स्वत:च्या कार्यालयातील सल्लागारांच्या मदतीने घेई. सभापतींचे निर्णय सभागृहासमोर येत, तेव्हाच विरोधी पक्ष आणि राज्यकर्त्या पक्ष या दोघांनाही ते कळत. या निर्णयांमुळे काही वेळा विरोधक नाराज होत, तर काही वेळा राज्यकर्त्या पक्षाचीही पंचाईत होई. सभापतीला काही प्रतिष्ठा होती. त्या प्रतिष्ठेचा उगम सभापतींच्या आगमनाची ललकारी देणाऱ्या पट्टेवाल्यात नव्हता, सभापतींच्या वर्तणुकीत होता. त्यामुळे सभापती सार्वत्रिक निवडणुकीत पुन्हा उभे राहिले, तर त्यांना अविरोध निवडून देण्याचा संकेत सर्वमान्य होता.

सभापतींनी दिलेला निर्णय अमान्य झाला, तर असंतुष्ट विरोधक सभागृहाबाहेर निघून जात. दोन मिनिटांत परत येऊन बसत आणि कामकाज पुन्हा चालू राही. सभागृहातून 'Walk out' म्हणजे कँटीनमध्ये जाऊन बसण्याची संधी, असे नव्हे. सभागृहावर बहिष्कार, ही तर कल्पनाच असह्य वाटली असती. विरोधक असे सभागृहातून निघून गेले म्हणजे काही विलक्षण गंभीर घटना घडली असे सर्वांना वाटे आणि अशा प्रसंगांची चर्चा वर्तमानपत्रांतूनही दीर्घकाळ चाले.

हळूहळू सभात्यागाचे प्रसंग वाढू लागले. सभागृहात गलका करणे, आरडाओरड करणे, प्रसंगी मारामारी करणे, सभापतींच्या अंगणात उतरणे, राजदंड पळवणे, पेपरवेट फेकणे, सामानाची नासधूस करणे, कागद उधळून देणे, कांदे फेकणे, सदस्यांची प्रेतयात्रा काढणे असे प्रकार चालू झाले. सभागृहे सभागृहे राहिली नाहीत, आखाडे बनले.

अशा परिस्थितीचा सगळा दोष सभागृहातील आमदार-खासदारांचा आहे असे म्हणून भागणार नाही. राजकारणी नेत्यांना सर्व गोष्टींबद्दल दोष देणे हा सोपा आणि लोकप्रिय प्रकार आहे; पण म्हणजे तो खरा आहे किंवा अशा निदानाने उपाययोजना शोधण्यास काही मदत होते असे नाही. काही नाही तरी अशा उनाड सदस्यांना लोकांनी निवडून का दिले, हा प्रश्न राहतोच. निवडणुकीत मते देताना आपली बाजू, आपले प्रश्न सभागृहात प्रभावीपणे कोण मांडेल, याचा विचार करून, लोकांनी मते दिली असती, तर सभागृहात सभ्य दाखल झाले असते. मते टाकताना 'येनकेन प्रकारेण' का होईना, माझा वशिला कोण लावेल, माझे काम कोण करून देईल, आपल्या शहरात किंवा मतदारसंघात

इतरांच्या तुलनेने अधिक सरकारी प्रकल्प आणि पैसा कोण ओढून आणील, हा आपल्या जातीचा आहे का, याच्याकडून आपणास काही घबाड मिळणार आहे का ? याऐवजी हा निदान गुन्हेगार तर नाही ना, अशा विचाराने मतदान होत असते, तरी लोकशाहीतील सर्वश्रेष्ठ सार्वभौम संस्थांची अशी अवस्था ना होती.

सभापतींनीही आपली शान आपल्या हातांनी घालवली. क्रमाक्रमाने सभापती राज्यकर्त्या पक्षाचा असावा, सभागृहाचे कामकाज त्याने आपल्या पक्षाच्या सोयीसोयीने चालवावे, निदान राज्यकर्त्या पक्षाला अडचणीत आणतील असे निर्णय देऊ नयेत असाच पायंडा पडला. त्यामुळे सभापती आणि शासन यांत काही भेदच राहिला नाही. सभापती सदस्यांच्या भाषणस्वातंत्र्याच्या नियमावलींचे यांत्रिकपणे पालन करणारा बाहुले बनला. सभेच्या अध्यक्षांचीच प्रतिष्ठा धुळीस मिळाली.

समाजवादात 'कुछ भी चलता है!'

समाजवादी व्यवस्था आणि सभागृहांची प्रतिष्ठा एकत्र नांदूच शकत नाहीत. रशियन पद्धतीच्या हुकूमशाही समाजवादी व्यवस्थेत सभागृहाचे आखाडे बनत नाहीत हे खरे, कारण तेथे आवाज चढवण्याचेही स्वातंत्र्य नसते.

देशाच्या आर्थिक विकासासंबंधी व व्यवहारासंबंधी महत्त्वपूर्ण जबाबदारी स्वीकारणाऱ्या कोणत्याही शासन व्यवस्थेत सभागृहाची प्रतिष्ठा टिकू शकत नाही. साम्यवाद्यांनी, विशेषत: बोल्शेविकांनी सत्तेची सर्वंकषता मानली आणि निरंकुश राजकीय सत्तेच्या बळावर समाजवादी स्वप्ने साकारण्याच्या वल्गना केल्या. 'सत्ता टिकवणे हे सर्वांत महत्त्वाचे,' या मानसिकतेला प्रतिष्ठा मिळाली. लोकशाही व्यवस्थेत सहिष्णुता आणि खिलाडूपणा, जनादेश स्वीकारण्याचा दिलदारपणा यांना मोठे महत्त्व असते. समाजवादाच्या चढत्या काळात या मूल्यांचे काही महत्त्वच राहिले नाही. भारतात कोणी स्टॅलिन अवतरला नाही; पण इंदिरा गांधींच्या काळापासून 'कुछ भी चलता है!' संस्कृती जन्माला आली. सत्ता हातात टिकविण्यासाठी काहीही केले तरी चालते, हजारो-लाखोंना तुरुंगात डांबले तरी त्याला काही वावगे नाही, नियम आणि संकेत हे पोरखेळ आहेत, या भयानक कल्पनांना इंदिराबाईंनी प्रतिष्ठा मिळवून दिली. आजकाल लालूप्रसाद यादवांच्या चेष्टितांवर सरेआम टीका होत आहे. त्यांच्यावर आरोपपत्र दाखल झाले त्याबरोबर, त्यांनी मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा द्यायलाच पाहिजे होता, असे सारेजण म्हणतात. इंदिरा गांधींवर तर आरोप सिद्ध झाले होते. उच्च न्यायालयाने तर त्यांना दोषी ठरवले होते, त्यांची निवडणूक रद्द ठरवली होती; तरीही त्यांनी

राजीनामा दिला नाही, देशावर आणीबाणी लादली. त्यांना ज्या कायद्यांन्वये दोषी ठरवण्यात आले, ते कायदेच त्यांनी पूर्वलक्ष्यी बदलून टाकले. इंदिरा गांधी म्हणजे सुपर सुपर लालू होत्या. लालूंची कुचेष्टा ते मागासवर्गीय असल्याने होते. सोनिया गांधींनी असाच काही प्रकार केला, तर त्याविरुद्ध तोंड उघडण्याची कोणाची हिंमत होणार नाही, हे तितकेच खरे.

संसदेतून सत्तेचे बहिर्गमन

इंदिरा गांधींच्या काळात लोकसभेची सत्ता संपुष्टात आली, राष्ट्रपती बाहुले बनले. न्यायव्यवस्था गुडघे टेकू लागली; प्रशासन तर 'जी जी' करत मुजरे घालू लागले आणि सर्व सत्ता पंतप्रधान यांच्या खुर्चीत एकवटली. लोकसभेत कोण काय बोलतो, याच्यापेक्षा पंतप्रधानांच्या आसपासचा कोणी धवन आणि कोणी फोतेदार फोनवर काय सूचना देतो, याला महत्त्व आहे. सभागृह असे 'नपुंसक' बनले. तेथे शिष्टाचार, सभ्याचार, सन्मान आणि प्रतिष्ठा या शब्दांना बुडबुड्यापेक्षा अधिक महत्त्व कसे राहावे ?

अर्थव्यवस्थेची जबाबदारी घेणाऱ्या कोणत्याही शासनात महत्त्वाचे निर्णय सभागृहाच्या बाहेरच होणार. नियोजन मंडळाने तयार केलेले आराखडे आणि वित्तमंत्रालयाने तयार केलेले अंदाजपत्रक, वेगवेगळ्या तज्ज्ञांच्या समित्यांनी तयार केलेले अहवाल यासंबंधी 'जाणती चर्चा' आता कोणत्याही संसदेत होऊच शकत नाही. राष्ट्रीय उत्पादनाच्या वाढीची गती काय असावी, बचतीचा दर काय असावा, उत्पादनतंत्रज्ञानाची पातळी काय असावी हे काही संसदेतील चर्चेचे विषय राहिले नाहीत. असे विषय सभागृहासमोर आले म्हणजे राज्यकर्त्या पक्षाच्या सदस्यांनी 'आह, आह'चा कल्लोळ माजवायचा, एवढाच काय तो विचारविनिमय आता होऊ शकतो! राजकीय सत्ता पंतप्रधानांच्या हाती आणि अर्थकारण पंतप्रधानांच्या मर्जीतील इन्यागिन्याच्या हाती, मग लोकसभेला काम काय उरले ? पन्नास वर्षे शेतीमालाचे भाव पाडण्याचे शासनाचे अधिकृत धोरण आहे, हे ज्या लोकसभेला सांगण्याची शासनाला गरज वाटली नाही, त्या लोकसभेच्या प्रतिष्ठेचे हत्यारे समाजवादी शासन होते. राजदंड पळवणारे आणि कांदे फेकणारे हे फक्त सभागृहांच्या प्रतिष्ठेच्या अंत्यविधीतील बीभत्स उत्सव साजरा करत आहेत.

उत्साह मालविणारी प्रक्रिया

एवढ्या सगळ्या गदारोळातदेखील काही सभ्य, काही अभ्यासू, कुशल वक्ते नाहीत असे नाही. अशी मंडळी नव्याने निवडून गेली, की उत्साहाने

कामाला लागतात. प्रश्नांची लांबलांब भेंडोळी पाठवतात. सभागृहासमोर येणाऱ्या विषयासंबंधी दररोज दहावीस किलो कागदपत्रे येऊन पडतात. ती सगळी अभ्यासण्याचा नाही तर निदान नजरेखालून घालण्याचा प्रयत्न करतात. हे अशक्य आहे, हे लक्षात आले तरी त्याद्दल कोणी तक्रार करत नाही. लोकप्रतिनिधी म्हणून सभागृहासमोर येणाऱ्या प्रत्येक विषयाच्या प्रत्येक अंगाचा बारकाईने अभ्यास करणे, हे माझे कर्तव्य आहे, एवढेच नव्हे तर ती माझी जबाबदारी आहे, असा आग्रह कोणी धरत नाही. कामकाजाचे कागदपत्र नजरेखालून घालणेही अशक्य होत असेल, तर या शासनव्यवस्थेत काही भयानक दोष आहेत, त्यात आमूलाग्र बदल करावा लागेल अशी तक्रार कोणी केली नाही. सर्वचजण हळूहळू कागदपत्र पाहण्याचा नाद सोडून देतात. आपण काही अभ्यास करतो असे भासवण्यासाठी जी नाटकीय तंत्रे भावतात, ती हळूहळू आत्मसात होतात.

प्रश्न विचारण्याबद्दलचा उत्साहही लवकरच मावळतो. हजारो प्रश्नांच्या भाऊगर्दीत लॉटरीने काढलेले प्रश्न सभागृहासमोर येणार, त्यातल्या एखाद-दुसऱ्यावर चर्चा होणार. त्या चर्चेतही ज्ञानाच्या उजेडापेक्षा राजकीय गरमागरमीच जास्त होणार. याचा अनुभव घेतल्यावर प्रश्नांचा उत्साहही संपतो.

कोणत्या विषयावर बोलण्याची इच्छा असली आणि त्याप्रमाणे तयारी केली, तरी सभगृहासमोरील तालिकेप्रमाणे चर्चेसाठी दिलेला अवधी ठरलेला असतो. सभागृहातील सदस्यांच्या प्रमाणानुसार त्या वेळेची पक्षनिहाय वाटणी होते. कोणाच्या वाट्याला दोन मिनिटे, कोणाच्या वाट्याला पाच. प्रत्येक पक्षातील बुजुर्गांना भरपूर वेळ मिळतो. त्यांच्याकडे बोलण्यासाठी काही नसते; मग राजकीय आतषबाजी करत, ते वेळ काढतात. ज्यांच्याकडे बोलण्यासारखे काही असते, त्यांना बहुधा वेळ मिळत नाही.

पेरले तसे उगवते

भाषणबाजी झाली, प्रस्तावांची छाननी झाली नाही, की पसार झालेल्या कायदेकानूंत प्रचंड दोष राहून जातात. महाराष्ट्र विधानसभेतील काही उदाहरणे देता येतील. महिलांच्या मालमत्तेच्या हक्कांसंबंधीच्या कायद्यात स्त्रियांना माहेरच्या आणि सासरच्या दोन्हींकडच्या मालमत्तेवर कोणतीही चर्चा न होता समान हक्क देण्यात आला. कृषी उत्पन्न बाजार समिती कायद्यात कायद्यापेक्षा कायद्याखालील अधिनियम श्रेष्ठ ठरवण्यात आले. पंचायत राज्यातील स्त्रियांच्या राखीव जागांसंबंधी लॉटरीची अजागळ पद्धतही अशीच संमत झाली. अशी

उदाहरणे शेकडोंनी देता येतील.

आयाराम-गयारामांचा जन्म

समाजवादी व्यवस्थेत लोकप्रतिनिधी आणि त्यांची सभागृहे यांची प्रतिष्ठा राहू शकतच नाही. राजकीय, तसेच आर्थिक अधिकार सभागृहाच्या हाती राहतच नाहीत. कारभाराचा डोलारा इतका वाढतो, की सदस्यांना वरवरचा अभ्यास करणेही अशक्य होते. एवढे असूनही सभागृहाचा थोडा सन्मान आणि थोडी प्रतिष्ठा शिल्लक होती; कारण सर्वाधिकार हाती घेतलेल्या पंतप्रधानाला निदान खुर्चीवरून खाली खेचण्याचे सामर्थ्य या सभागृहात शिल्लक होते. निवडणूक जिंकली याचा अर्थ पाच वर्षे निरंकुशपणे सत्ता चालवण्याचा हक्क मिळाला असे नाही; निरनिराळ्या भूमिकांतून शासनाच्या जगन्नाथाच्या रथाला ओढण्याच्या कामी हात लावण्याची संधी मिळाली, ही जाणीव आता संपुष्टात आली. राज्यकर्त्या पक्षाला आणि विशेषत: पंतप्रधानांना दोन निवडणुकांमधील पाच वर्षांच्या काळात आपल्याला कोणी आव्हान द्यावे, ही कल्पनाही सहन होईनाशी झाली. पाच वर्षे आता राजकीय सत्ता वापरून, सत्ता सातत्याने आपल्याच हाती राहील, हे पाहणे हे राजकारणाचे सूत्र झाले; पण चोरांत नाही म्हटले तरी भांडणे लागतातच; लुटीच्या वाटपातून तर भांडणे हमखास होतात.

यातून आयाराम-गयारामांचा एक कालखंड आला. पक्ष फुटू लागले. सदस्य आज या पक्षात, उद्या त्या पक्षात बागडू लागले. पंतप्रधानांना बहुमताची शाश्वती राहिली नाही. गुरांच्या बाजाराप्रमाणे सदस्यांची मते आणि अनेकवेळा सदस्यही ठोक किंवा किरकोळ भावाने विकत घेतले जाऊ लागले आणि विचित्र गोष्ट अशा, की आयाराम-गयारामांच्या या कारवायांमुळे सभागृहांना थोडे महत्त्व परत मिळाले; शासनातील निर्णय करणारी सार्वभौम सभा म्हणून नव्हे, तर सार्वभौम निर्णय करणाऱ्या पंतप्रधानांना पदच्युत करणारी सैद्धांतिक सामर्थ्य असलेली संस्था म्हणून!

घटनेत सोयीस्कर बदल

साहजिकच, या घडामोडींनी पंतप्रधान चिंतित झाले आणि सभागृहांचे महत्त्व खच्ची करून टाकणारी, पक्षबदलासंबंधीची घटनादुरुस्ती राजीव गांधींच्या पंतप्रधानकीच्या पहिल्या उमेदीत सर्व पक्षांनी सर्वसंमतीने झटकन पसार करून टाकली. हुंडारणाऱ्या गुरांना आता वेसण बसली. पक्षबदलासंबंधीच्या तरतुदींमुळे पक्षनेत्यांची अरेरावी वाढेल, व्यक्ति-माहात्म्य वाढेल, प्रामाणिक मतभेदांनाही वाचा फोडण्याची शक्यता राहणार नाही... या सगळ्या परिणामांची सूचना मधू

लिमयेंसारख्या अभ्यासकाने दिली होती; पण आयाराम-गयारामांविषयींची चीड इतकी सार्वत्रिक होती, की पक्षबदलासंबंधीचा कायदा म्हणजे प्रागतिक सुधारणा असेच शंभरातील नव्याण्णव लोकांना वाटत होते.

प्रतिष्ठेचा अंत्यविधी

पक्षबदलविरोधी कायद्यामुळे सभागृहांची उरलीसुरली सर्व प्रतिष्ठा संपुष्टात आली आहे. मोठ्या उमेदीने निवडून आलेल्या प्रतिनिधींना थोड्याच वेळात लक्षात येते, की एवढ्या मेटाकुटीने या सभागृहात आपण निवडून आलो, तेथे निर्णयाची सत्ता तर नाहीच नाही; पण विचारांच्या देवघेवीचीसुद्धा शक्यता नाही, अभ्यासाची आवश्यकता नाही. पक्षाचा आदेश असेल, त्याप्रमाणे काही आवेशपूर्ण वाक्ये बोलली, की चर्चा झाली. विषय कोणताही असो, मतदान पक्षनिहायच व्हायचे. मुख्यमंत्री गुन्हेगार ठरला, तरी विधानसभेतील त्याचे बहुमत ढळत नाही आणि राज्यकर्त्यांचे 'रिमोटाचार्य' उघडउघड हिंसाचारास प्रोत्साहन देत असले, तरी त्याकडे पाहत बसण्यापलीकडे विधानसभा काही करू शकत नाही.

जोपर्यंत एका एका पक्षाचे बहुमत असे आणि म्हणून एका पक्षाचे शासन असे, तोपर्यंत संसद काय आणि विधानसभा काय, इतरत्र घेतलेल्या निर्णयावर शिक्कामोर्तब करण्याची यंत्रे बनली होती. आता एकगठ्ठा बहुमतांच्या शासनांचा काळ संपला. कोणाही शासनास किंवा पंतप्रधानास हुकुमी स्थिर बहुमत मिळण्याची शक्यता नजीकच्या भविष्यकाळात दिसत नाही. ही परिस्थिती दुर्दैवी खरी; पण त्यातही एक चांगला भाग आहे. हुकुमी बहुमत संपले म्हटल्यावर सभागृहातील चर्चेला, विचारविनिमयाला पुन्हा काही महत्त्व येईल आणि एखादा फिरोज गांधी, नाथ पै सभागृहातील वादविवादांना पुन्हा एकदा प्रतिष्ठा प्राप्त करून देईल, शब्दांच्या फेकी खुर्च्यांच्या फेकींची जागा घेतील अशी आशा वाटत होती. पंतप्रधान आणि त्यांचे मंत्रिमंडळ एक एक विषयावर सभागृहातील विविध विचारांचा अंदाज घेत, त्यांतल्या त्यात बहुमान्य तोडगे काढीत काढीत, एक एक दिवस शासन चालवतील आणि तसे झाले, तर लोकशाही पुन:प्रस्थापित होऊ शकेल असे वाटले होते; पण ते खोटे ठरले. एका पक्षाचे शिक्कामोर्तबयंत्र बनण्याऐवजी सभागृह युतींच्या आणि आखाड्यांच्या गठबंधनांचे ठप्पा-यंत्र बनले. बाकी सगळे 'जैसे थे!'

छाटणीला पर्याय नाही

विधानसभेतील हुल्लडबाजी हा समाजवाद नावाच्या रोगाचे एक लक्षण

आहे. शासन सुटसुटीत आटोपशीर बनत नाही. सभागृहातील सदस्यांना कामकाजात परिणामककारकरीत्या भाग घेता येत नाही. सभागृहात प्रवेश करण्यासाठी प्रचंड पैसा असल्याशिवाय चालत नाही आणि गुन्हेगारी इतिहास निवडणुकीत अडचण होत नाही. हे सर्व समाजवादी व्यवस्थेत अपरिहार्य आहे. सभागृहातील हा गोंधळ चालू राहिला, की लोकशाहीविषयी कुत्सित उद्‌गार काढणारे, हुकूमशाहीचा पुरस्कार करणारे जंतू वळवळू लागतात. लोकशाहीत अनेक दोष आहेत; पण लोकशाहीपेक्षा अधिक चांगली व्यवस्था कोणतीही नाही, असे सांगण्याऐवजी ठोकशाहीतून लोकांचे प्रश्न सोडवण्याची भाषा सुरू होते. हिटलरपूर्व जर्मनीत झालेल्या घडामोडींची पुनरावृत्ती नको असेल, तर अनेक तऱ्हांनी अनेक आघाड्यांवर प्रयत्न करावे लागतील; पण त्यांतील सर्वांत महत्त्वाचा कार्यक्रम म्हणजे, 'न पेलणाऱ्या आर्थिक जबाबदाऱ्या बाळगणाऱ्या शासनाची छाटणी,' यात काही संशय नाही.

(६ ऑगस्ट १९९७)

◆◆

मेंढरे नव्हे, माणसे म्हणून जगा

फार दिवसांनी मला बरं वाटलं. कारण, माझा मूळचा पेशा शिक्षकाचा आहे आणि मी हाडाचा शिक्षक आहे. त्या शिक्षकाला या शिबिरात आनंद मिळाला. शेतकरी संघटनेचे प्रणेते, शेतकऱ्यांचे पंचप्राण, आंदोलनाचे नेते वगैरे वगैरे विशेषणे चिकटली, की मी संकोचून जातो. आयुष्याची सुरुवात मी शिक्षक म्हणून केली आणि शेतकरी संघटनेचे काम सुरू केले, तेव्हा, "मधला एक पंधरा वर्षांचा काळ विसरून, मी पुन्हा शिक्षक झालो," असे मी आग्रहाने मांडतो.

पहिल्यांदा मी शिक्षक झालो, तेव्हा पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयात अर्थशास्त्र शिकवायला गेलो. उच्च पदवी मिळालेली, पहिला वर्ग मिळालेला, सुवर्णपदक मिळालेले आणि मोठ्या आत्मविश्वासाने महाविद्यालयात शिक्षक म्हणून उभा राहिलो, तेव्हा 'हेच ते बरं का, गेल्या वर्षीचे गोल्ड मेडॅलिस्ट!' असे अभिमानाने पाहणारे विद्यार्थी सभोवार होते. त्या काळी माझी अशी ख्याती होती, की आमच्या कॉलेजामधले विद्यार्थीतर 'मी आल्यानंतर वर्गात कुणी यायचे नाही,' असा मी आग्रह धरीत असल्यामुळे वर्गात वेळेवर आत येऊन बसणारच; पण दुसऱ्या कॉलेजातले विद्यार्थी, अर्थशास्त्राचा अभ्यास न करणारेसुद्धा, इंग्रजी ऐकण्याकरिता म्हणून आधीच येऊन बसत. इतक्या तयारीने मी पहिल्यांदा शिक्षक झालो आणि समोर बसलेल्या विद्यार्थ्यांना आपले जे काही ज्ञान आहे, ते जास्तीत फुलोऱ्याने पसरवून, जास्तीत जास्त चांगल्या भाषेत सांगण्याचा प्रयत्न केला.

दोनतीन महिन्यांमध्ये माझ्या असे लक्षात आले, "ज्या पिलांना उडायला शिकवायचा मी प्रयत्न करतो आहे, त्यांचे पंख आधीच कुणीतरी छाटलेले आहेत आणि कितीही, कोणत्याही भाषेत शिकवायचा प्रयत्न केला, तरी मी जे

काही अर्थशास्त्र त्यांना शिकवायचा प्रयत्न करतो आहे, ते त्यांच्यापर्यंत पोहोचत नाही. त्यांच्या मनातला विचार वेगळा आहे. आज कसेतरी करून अभ्यासक्रम संपवावा, पेपरात पास व्हावे, पदवीचा शिक्का घ्यावा, नोकरी लागावी म्हणजे मोकळे झालो, अशा तयारीने ते आलेले..." आणि त्यामुळे, सर्वोच्च पदव्या, सर्वोच्च पात्रता असूनही माझ्या पहिल्या शिक्षकाच्या व्यवसायामध्ये मी संपूर्णत: अपयशी आणि अपात्र ठरलो.

मग मध्ये पंधरा वर्षे गेली. आयएएसमध्ये गेलो, संयुक्त राष्ट्रसंघात गेलो. परत आलो, शेतकरी बनलो.

आणि शेतकरी बनल्यानंतर शेतकीच्या अनुभवातून लक्षात यायला लागले, की अरे, हे पूर्वी आपल्याला माहीत नव्हते. हे काहीतरी वेगळे आहे. शेतकरी म्हणून जन्मभर जरी राबलो, तरी त्यातून वर यायची काही शक्यता नाही. त्यातील मर्म लक्षात यायला लागले; मग वाटायला लागले, की हे लोकांना सांगायला पाहिजे. म्हणजे, एका तऱ्हेने पुन्हा एकदा मी शिक्षक बनायला लागलो आणि या वेळी जेव्हा शिक्षक बनलो, तेव्हा पहिल्या वेळी शिक्षक बनण्याच्या नेमकी उलटी परिस्थिती होती. म्हणजे, या क्षेत्रात माझ्याइतका अपात्र, ना-लायक शिक्षक शोधून मिळणे अशक्य. मी जन्माने शेतकरी नाही, शेतकीचा माझा अनुभव फक्त चारपाच वर्षांचाच; मी शेतकरी जातीचा नाही, एवढेच नव्हे तर, ज्या जातीच्या लोकांनी शेतकऱ्यांना हजारो वर्षे पिळले आणि छळले त्या जातीचा आणि तरीदेखील, आपल्याला काही नवीन समजले आहे आणि ते शेतकऱ्यांपुढे मांडावे म्हणून मी आलो. ज्या भाषेत मांडायचे, त्या भाषेचा मी पंधरा वर्षे उच्चार केला नव्हता; परदेशी भाषा बोलत होतो; पण शेतकऱ्यांसमोर मी उभा राहिल्यानंतर तार अशी जुळली, की सर्व तऱ्हांनी अपात्र असूनसुद्धा मी जे सांगितले, ते त्या 'विद्यार्थ्यां'ना समजले. समजले म्हणजे नुसते परीक्षेत पास होण्याइतपतच नाही, तर पोलिसांची लाठी, पोलिसांची गोळी खाण्याची तयारी दाखवून, त्यांनी आपल्याला विषय समजल्याची पावती दिली. माझ्या दुसऱ्या शिक्षकीला इतके प्रचंड यश मिळाले.

आज पुन्हा फार दिवसांनी शिक्षक व्हायची संधी मिळाली. पाचसहा वर्षे आंबेठाणच्या प्रशिक्षण शिबिरामध्ये अभ्यासक्रमात ज्ञानाचा सिद्धांत वगैरेसारखे तत्त्वज्ञानाचे विषय शिकवीत असे. दिवसातून फार तर चाळीसपंचेचाळीस मिनिटे बोलायची संधी मिळे. त्यापेक्षा जास्त वेळ बोलले, तर विद्यार्थ्यांच्या डोक्याला मुंग्या येतात; पंचेचाळीस मिनिटे म्हणजे फार झाले. त्यात प्राध्यापक

मंडळींना सवयच अशी लागते, की कोणत्याही विषयावर बोलायचे झाले तर, पंचेचाळीस मिनिटे बोलायचे. महिनोन् महिने बोलले तरी त्यावर आम्हा प्राध्यापकांना पंचेचाळीस मिनिटांच्यावर बोलता येत नाही, हे जितके खरे तितकेच जो विषय पाच मिनिटांत सहज सांगण्यासारखा आहे, त्याही विषयाला पंचेचाळीस मिनिटे लावायचीच, हीही आमची सवय!

या शिबिरात आपण तीन दिवस बोललो; माझी अपेक्षा अशी होती, की समारोपाच्या समारंभाला तुम्ही म्हणाल, की आता पुरे, तीन दिवस पुष्कळ ऐकले; पण ती चुकली. मी या शिबिरात तीन दिवस बोललो, एवढेच नव्हे तर, जो विषय बोललो, तो विषय पदव्युत्तर वर्षांच्या वर्गातच शिकवला जातो; त्याआधी नाही. आपल्या शिबिरामध्ये या दीडशेदोनशे विद्यार्थ्यांपैकी बी. ए. एम. ए. झालेले फारसे कोणी असतील असे वाटत नाही; पण मी बोलत असताना हे विद्यार्थी एका कानातून ऐकून, दुसऱ्या कानातून सोडून देत आहेत असे कधी वाटले नाही. उलट, आश्चर्यजनक अनुभव आले. शिबिर दोनच दिवसांत आटोपायचे असे ठरले होते; पण तिसरा दिवस लागेल असे म्हटल्यावर सगळ्यांनी आनंदाने टाळ्या वाजवल्या. इथल्या व्यवस्थापिका भगिनींनासुद्धा मोठे आश्चर्य वाटले. कारण, आजवरचा त्यांचा अनुभव असा आहे, की शिबिराचे उद्घाटन झाले, की लोक इथून जायचाच विषय काढतात; पण शिबिराचा कालावधी वाढला आणि प्रशिक्षणार्थींना त्याचा आनंद झाला, हे पाहून त्यासुद्धा कुतूहलाने या शिबिरात आवर्जून बसू लागल्या.

आपण ठरवले, की प्रशिक्षण शिबिर घ्यायचे. मुळात, निवडणुकीच्या जाहीरनाम्याकरिता प्रशिक्षण शिबिर ही हिंदुस्थानात मोठी अद्भुतच गोष्ट आहे. जाहीरनामा म्हणजे नुसती यादी बनवायची – कुणाला काय पाहिजे आणि कुणाकुणाला काय काय पाहिजे याची – असे आजकाल स्वरूप झाले आहे. मग त्याला प्रशिक्षण कशाला हवे ? त्यामुळे जाहीरनाम्यावर शिबिर आणि तेही तीन दिवसांचे ही मोठी अद्भुत गोष्ट.

जाहीरनाम्यावर बोलायला लागल्यानंतर जी काही मांडणी झाली, तिची सुरुवात आम्ही अक्षरश: विश्वाच्या उत्पत्तीपासून केली आणि गंमत म्हणजे शेतकरी संघटनेचा जो एककलमी विषय आहे – शेतीमालाला भाव – तेवढा सोडून या शिबिरात आम्ही जगातल्या सर्व विषयांवर बोललो. सबंध शिबिरात कांद्याचा विषय निघाला नाही आणि साहजिकच आहे, कारण शिबिरात आपण स्वतंत्र भारत पक्षाच्या जाहीरनाम्याविषयी बोलत होतो.

शिबिराच्या संयोजकांनी एक मोठी चांगली गोष्ट केली. आपण प्रशिक्षण शिबिर घ्यायचे ठरवले. शिबिर आंबेठाणला भरलं, तर त्याला एक स्वतंत्र वातावरण असते. दुसरीकडे जर कुठे एखाद्या मंगल कार्यालयात, एखाद्या शहराच्या ठिकाणी, व्यवस्था चांगली व्हावी या उद्देशाने भरवले असते, तरी या शिबिराला जितकी रंगत चढली, तितकी चढली असती किंवा नाही, याबद्दल मला शंका आहे. अपघाताने असो की योजनेने असो; पण महात्मा गांधींच्या नावाशी जोडल्या गेलेल्या आश्रमात हे शिबिर भरविण्यात संयोजकांनी समयोचितपणा दाखवला आहे. कारण, या जाहीरनाम्याच्या सुरुवातीलाच म्हटले आहे, की स्वातंत्र्यानंतर गांधीवाद बाजूला टाकून, समाजवादाच्या नावाखाली देशाला ओढले गेले आणि साऱ्या देशाचे वाटोळं झाले; आता या नुकसानीतून देशाला वर कसे काढायचे आणि देशाला पुढे विकासाकडे कसे न्यायचे, हे ठरविण्याचा हा कार्यक्रम आहे. १९८० मध्ये एका पत्रकार बाईंनी माझी मुलाखत घेतली होती, त्या वेळी त्यांनी माझे वर्णन 'Gandhi in dennims' असे केले होते. याच्यापेक्षा मोठा सन्मान काही होऊ शकत नाही, असे मला त्या वेळी वाटले. इतिहासातील एक महत्त्वाचा नियम आहे. इतिहासामध्ये एकच काम पुढे चालविणारे गुरू म्हणा, शिष्य म्हणा किंवा पिढ्यांच्या अंतराने जन्मणारी दोन वेगवेगळी माणसे एकच वेशभूषा घालून कधी येत नाहीत. शिवाजीने जिरेटोप आणि चिलखत घालून, घोड्यावर बसून, जे काम केले ते करणारा शिवाजीचा जो वारस येईल, तो घोड्यावर बसणारा आणि जिरेटोप-चिलखत घालणारा असण्याची शक्यता काहीही नाही. तसेच, एक पंचा नेसून, बापूंनी देशासाठी जे काम सुरू केले, ते काम पुढे चालविणारा मनुष्य पंचा नेसणारा असण्याची शक्यता फार कमी आहे. मी प्रामाणिकपणे मानतो, की गांधीजी ते असताना ते जे काही बोलले, त्याच्याशी मी सांगतो आहे ते सुसंगत आहे किंवा नाही, हे सांगणे कठीण आहे; पण गांधीजी आज जिवंत असते तर ते जी भाषा बोलले असते, ते मी बोलतो आहे. माझ्या या विश्वासावर, स्व. रविशंकर महाराज या निदान एका गांधीवाद्याने शिक्कामोर्तब केले आहे. आमच्या दोघांच्या कार्यपद्धतीत एक साम्य आहे. गांधींनी कोणताही मार्ग ठरविताना, दिशा ठरविताना, कार्यक्रम ठरविताना, विचार पुढे मांडताना जग काय म्हणते आहे, याचा कधी विचार केला नाही. ते उत्तरदायित्व मानीत स्वत:च स्वत:शीच. ते अध्यात्मवादी होते, धार्मिक होते, आत्म्यावर विश्वास ठेवत होते; म्हणून ते आतल्या आवाजाबद्दल बोलत होते. मी धार्मिक नाही, आध्यात्मिक नाही आणि त्यामुळे मी आतल्या

आवाजाविषयी बोलत नाही; पण माझी निष्ठा ही फक्त माझ्या स्वत:शी आहे.

गेले तीन दिवस आपण ज्या विचारांची मांडणी करीत आहोत, तो मोठा कठीण विचार आहे. चांदवडच्या महिला अधिवेशनात जमलेल्या लाख लाख स्त्रियांनी जाहीर केले, की 'आम्ही माणूस आहोत,' हे म्हणण्याची हिंमत स्त्रियांनी केली; पण मला चिंता ही आहे, की मिशा वाढविणाऱ्या पुरुषांमध्ये माणसे किती आणि मेंढरे किती याची गणना करू गेलो, तर माणसे मिळणे कठीण आहे. 'आम्हाला कोणी मेंढपाळ मिळतो का?' याच्या शोधात ही सगळी माणसे हिंडत आहेत. मेंढपाळसुद्धा मेंढरे गोळा करायला येत नाहीत; पण 'आम्हाला तुमच्या कळपात घ्या हो,' म्हणून सगळी माणसे धावत सुटलेली आहेत. अशी सगळी देशभर अवस्था असताना, मी तीन दिवस लावून निवडणुकीचा जाहीरनामा म्हणजे एका कागदावर लिहून काढलेली 'आमच्याकडून मिळेल'ची यादी; ती मतदारांना दाखवून, मते मिळवायची अशी आजची पद्धत आणि आमचा जाहीरनामा अठ्ठेचाळीस पानांचा. मलाही समजते, की या अठ्ठेचाळीस पानांतील 'अर्थज्ञान' त्या मतदारापर्यंत पोहोचणार नाही, त्याला समजणार नाही. 'एकच प्याला'मधील तळीराम जसा 'दारू पी' असे सांगणाऱ्या वैदूची निवड करतो, तसे आपले मतदार 'दारू पी' सांगणाऱ्या उमेदवाराला निवडणार आहेत आणि 'कडक पथ्य पाळावी लागतील, व्यवस्थित औषधे घ्यावी लागतील,' असे सांगणाऱ्या आपल्या उमेदवाराला बाजूला सारतील हे मलाही माहीत आहे; मग, या यज्ञाचा, या शिबिराचा खटाटोप मी का केला ? हा खटाटोप मी तुमच्याकडे पाहून केला. आपले उमेदवार आणि त्यांचे प्रचारक यांच्याकडे साधने नाहीत, पैसे नाहीत, गाड्या नाहीत; पण या निवडणुकीच्या निमित्ताने सगळ्या हिंदुस्थानच्या लोकांना सांगायचे आहे, "अरे, समोर संकट 'आ' वासून उभे आहे." नदीचा एखादा प्रवाह शांतपणे वाहत असतो; पण जरा पुढे गेल्यानंतर एका प्रचंड कड्यावरून धबधब्याच्या रूपाने ते पाणी पडणार असते; पण पुढे कडा आहे याची जाणीव त्या नदीच्या प्रवाहाला नसते. तसाच, सगळा देश पुढे येणाऱ्या संकटाची जाणीव न ठेवता, चाललेला दिसतो. त्यांना त्या संकटाची जाणीव करून देण्याकरिता तुम्ही जायचे आहे, येते सहा आठवडे धावपळ करायची आहे. कोणी उमेदवार तुम्हाला पिठलं-भाकरीसुद्धा देऊ शकणार नाही; घरची भाकरी खाऊन, कदाचित घरचीच सायकल वापरून, चाक पंक्चर झाले, तर आपले आपण दुरुस्त करून फिरायचे आहे. ते काम करताना तुमच्या मनात जाणीव तयार व्हावी, की मी आता जो फिरती आहे तो कोणी उमेदवार निवडून यावा

म्हणून नाही, कोणी पंतप्रधान ठरावा म्हणून नाही, कोण्या पक्षाला बहुमत मिळावे म्हणून नाही; तर सगळा इतिहासाचा हेतू पुढे नेण्याकरिता मी फिरतो आहे. एवढी जाणीव जर तुमच्या अंगी तयार झाली, तर तुमच्या अंगात फिरण्याची थोडी ताकद राहील, या उद्देशाने तीन दिवस तुमच्यापर्यंत हा विषय पोहोचविला. निवडणुकीच्या जाहीरनाम्याची वेगवेगळी मांडणी मी तुमच्यापुढे केली. त्यातले सगळेच्या सगळे विषय तुम्ही शेवटपर्यंत पोहोचवू शकणार नाही, हे मला माहीत आहे; पण मग या तीन दिवसांच्या प्रशिक्षणातून तुम्ही काय घ्यावे, अशी अपेक्षा आहे?

या तीन दिवसांत सर्व मिळून मी काय सांगितले ? मी जी काही वाक्ये वापरली, अर्थशास्त्र मांडले, ते काही फार महत्त्वाचे नाही. कोणी म्हणाले, रुपयाच्या अवमूल्यनासंबंधी मी केलेले विश्लेषण सर्वांत चांगले झाले. दुसरे कोणी दुसरा कोणता भाग चांगला झाला म्हणाले. मी जे बोललो, त्यातले एकही वाक्य पाठ करून बोलायचा प्रयत्न तुम्ही करू नका. या तीन दिवसांच्या प्रशिक्षणात मी गांधींचा संदेश तुमच्यापर्यंत पोहोचवला. मी स्वत: तो पाळतो अशी माझी खातरी आहे. कोणी म्हणतात, "तुम्ही नेहमीच जगाच्याविरुद्ध बोलता!" खरे आहे. कारण, "भेकड माणसांना सोबत लागते. आपल्याबरोबर एकदोन माणसेसुद्धा नाहीत, तेव्हा त्यांना भीती वाटायला लागते. त्यांना वाटू लागते, आपले काही चुकले तर नाही ना, आपल्याबरोबर कोणीच कसे येत नाहीत." माझ्या मनाचा विपरीतपणा असा आहे, की एखाद्या विषयावर विचार करताना माझ्या बरोबरीने तोच विचार दुसरा कोणी करतो आहे असे दिसले, की मला शंका वाटू लागते, की आपले काही चुकत तर नाही ना ? मी एकटा आहे, तोपर्यंत मी चुकत नाही याची मला खातरी असते, लोक जमायला लगले, की माझ्या मनात शंका तयार होते, की काही तरी गोंधळ असला पाहिजे.

आजकाल माणसाचे मोजमाप करण्याच्या अनेक फूटपट्ट्या आहेत – पैसा गोळा किती केला ? पदे किती मिळवली ? खासदारकी मिळवली का ? वगैरे, वगैरे. या सर्व फूटपट्ट्यांपेक्षा एक चांगली महत्त्वाची फूटपट्टी आहे. स्वत:चे मूल्यमापन करायचे झाले, तर फक्त एका प्रश्नाचे उत्तर शोधा. या आयुष्यामध्ये स्वत:शी निष्ठा जास्तीत जास्त तुम्ही बाळगली का आणि त्यातला आनंद तुम्ही मिळवला का ? आपला जाहीरनामा म्हणजे, 'आजादी अभियान' आहे; स्वातंत्र्याचा कार्यक्रम आहे. त्यात आपण काय म्हणतो ? "स्वतंत्र भारत पक्षाचे दर्शन सर्व स्त्रीपुरुष समान आहेत हे मानते; पण त्या समानतेचा पाया 'प्रत्येक व्यक्ती

अनन्यसाधारण आहे म्हणून समान आहे,' हा आहे," हे अनन्यसाधारणत्व कायम टिकवून, "आपल्या आपल्या बुद्धीप्रमाणे काम करीत क्रियाप्रक्रिया करीत," स्वत:बरोबरच सर्व समाजाचे भले करण्याचा त्यांचा त्यांचा मार्ग खुला राहावा हे स्वतंत्र भारत पक्षाचे उद्दिष्ट आहे; पण तुम्ही ते अनन्यसाधारणत्व पुसून, जर का स्वत:ला शाडूच्या मूर्तीसारखे एखाद्या ठशामध्ये घालून, चारचौघांसारखे करून टाकीत असला, तर तुम्ही स्वत:च्या जन्माच्या हेतूचाच मुळी पराभव करता आहात. मी जन्माला आलो हा असा आहे, मी असा आहे, याबद्दल मला अभिमान आहे असे तुम्ही म्हटले पाहिजे. एका कळपाचा घटक म्हणून 'हिंदू' असल्याचा अभिमान कसला बाळगता, तुम्ही 'मी आहे याच्याबद्दल मला अभिमान आहे,' असे म्हणा आणि त्या व्यक्तित्वाचा परिपोष करताना फायदा होणार आहे का तोटा होणार आहे याचा विचार न करता, 'माझ्या व्यक्तित्वाचा परिपोष करणे' या यात्रेपरता दुसरा आनंद नाही आणि ही यात्रा करताना मी जरी खड्ड्यात पडलो, अत्यंत वेदनामय परिस्थितीत पडलो, नरकात पडलो तरीसुद्धा त्याची जी काही वेदना असेल ती माझी स्वत:ची आहे आणि ती सहन करण्यातही मला आनंदच वाटतो, असे म्हणण्याची हिंमत ठेवली पाहिजे. एका इंग्रजी विचारवंताचे वाक्य आहे, "This is my private hell and I am proud of it." स्वत:शी निष्ठा बाळगताना संकटांचा वर्षाव झाला, तरी 'हा जो काही नरक आहे तो माझा स्वत:चा नरक आहे आणि त्याचा मला अभिमान आहे.' दुसऱ्या माणसांच्या मदतीने स्वर्ग मिळाला, तरी तो मला नको; पण माझ्या व्यक्तित्वाचा परिपोष करताना होणाऱ्या दु:खातही जो काही आनंद आहे, त्याच्या पलीकडे दुसरा आनंद असूच शकत नाही. या शिबिरात मी तीन दिवसांत एकच गोष्ट सांगितली, "स्वत:च्या व्यक्तित्वाला जपा."

हे सांगण्यासाठी मी तुम्हा शेतकऱ्यांसमोरच का आलो ? मी काही शेतकरी नाही. कापसाला भाव मिळाला तर मला काही जादा पैसे येणार नाहीत; मी वातीपुरतासुद्धा कापूस पिकवीत नाही. मी ऊस पिकवीत नाही... तुमच्या जातीचा नसताना, तुमच्या व्यवसायातला नसताना मी तुमच्याकडे का आलो ? हे काम करताना माझा सगळा संसार पेटला, तरी मी तिकडे लक्ष का दिले नाही ? मला स्वतंत्र व्यक्ती म्हणून जगायचे असेल तर त्यासाठी उभ्या करावयाच्या स्वातंत्र्यलढ्यात सोबतीने लढायला तयार झालेली माणसे भेटलीच, तर ती फक्त या शेतकरी समाजातच भेटतील, अशा आशेने मी तुमच्याकडे आलो आहे. गेल्या सतरा वर्षांत तुम्हा शेतकऱ्यांना काहीही दिले नाही आणि तरीसुद्धा आजच्या

या निवडणुकीच्या वातावरणामध्ये, मोठमोठी राष्ट्रभक्त म्हणणारी मंडळी देशभर वाटेल त्याच्याशी साटेलोटे करून, सत्ता हस्तगत करण्याच्या धावपळीत असताना महाराष्ट्राच्या या माधानसारख्या कोपऱ्यातील गावात तुम्ही दीडदोनशे माणसे तरी 'व्यक्तिस्वातंत्र्या'च्या या विचाराने भारावून जाता आणि शिबिर लांबले, तर जांभई देण्याऐवजी टाळ्या वाजवून आनंद व्यक्त करता. गेली वीस वर्षे तुम्ही मला 'आयुष्याचे सार्थक झाल्याचे' आनंदाचे क्षण अनेकदा दिले, आज असाच आणखी एक क्षण दिला, याबद्दल तुम्हाला धन्यवाद देतो.

निवडणुकीचे निकाल उद्या काय लागतील, ते लागोत ? आपण जिंकूच याची खातरी नाही. लोक म्हणतात आपण हरणार असलो, तरी तसे म्हणू नका, आम्ही जिंकणारच आहोत असे म्हणा!

मी जिंकणार आहे; त्याबद्दल माझ्या मनात शंका नाही. आजची चकमक जिंकेन किंवा नाही याची मला खातरी नाही आणि त्याची मला पर्वाही नाही; पण मी युद्ध जिंकणार आहे याबद्दल माझ्या मनात तीळमात्रही शंका नाही. आज मोठे वाटणारे, आज सिंहासनावर बसणारे, आज हत्तीवर बसणारे उद्या पायउतार झाले, की त्याचे इतिहासात नावसुद्धा राहत नाही. औरंगजेबानंतर दिल्लीच्या तख्त्यावर किती शहाजादे बादशहा बनून बसले; ते बादशहा होते तेव्हा सगळे त्यांना वाकून वाकून मुजरे करीत असणार, दरबारातले कवी, शायर त्यांच्या पराक्रमाची स्तुतिस्तोत्रे गात असणार. आज इतिहासामध्ये त्या बादशहांपैकी एकाचेही नाव लक्षात येत नाही. म. जोतीबा फुले खांद्यावर घोंगडे टाकून कोणत्या गव्हार्नर जनरलच्या दरबारात गेले असे विचारले, तर त्याचे नाव कोणाला माहीत असत नाही; पण जोतीबांचे नाव मात्र सर्वतोमुखी आहे. इतिहासात कोण जिंकले ते पाहा. आज जी टिनपाट माणसे सत्तेच्या खुर्चीवर बसून, मोठी झालेली दिसतात, त्यांची नावे ज्या वेळी इतिहासाच्या पटलावरून पुसली गेलेली असतील, त्या दिवशी 'व्यक्तिस्वातंत्र्याच्या लढाई'करिता धडपडणारे लोक म्हणून तुमचे नाव त्या इतिहासात राहणार आहे.

(२१ फेब्रुवारी १९९८)

◆◆

संकटाची चाहूल देणारा जाहीरनामा
(स्वतंत्र भारत पक्ष जाहीरनामा लेखांक : १)

बहुधा कोणत्याही पक्षाचा जाहीरनामा तयार करताना एक यादी बनवली जाते. आमच्या हाती जर सत्ता आली – शासन आलं, तर आम्ही काय काय करू, ते जाहीरनाम्यात सांगितलेलं असतं. जाहीरनाम्यामधली काही कलमं ही लिहिणाऱ्या माणसांच्या मनामधील स्वप्नं पूर्ण झाल्याच्या कल्पना असतात. संपत्तीची समान वाटणी असावी, गरिबी नसावी, बेकारी नसावी, महागाई कमी व्हावी, शिक्षण मोफत असावं वगैरे, वगैरे. त्यापलीकडं जाऊन, लोकांना खुश करण्यासाठी काही योजना असतात. एक रुपयाला झुणका-भाकर, बेरोजगारांना दर महिन्याला भत्ता, म्हाताऱ्या लोकांना पेन्शन, शेतमजुरांना पासष्ट वर्षे वय झाल्यानंतर पेन्शन वगैरे, वगैरे.

या योजना तीन प्रकारच्या असतात. एक म्हणजे ज्याबद्दल सर्वसाधारणपणे सर्वांचे एकमत असतं, अशा योजना जाहीरनाम्यात असतात. आपण म्हटलं, नाही असं व्हायला नको. म्हणजे दुसरे म्हणणार, की बेकारी गेली पाहिजे, तर ते आपल्या जाहीरनाम्यात नाही, असं व्हायला नको. दुसरी गोष्ट म्हणजे जाहीरनामा लिहिणारांची काही स्वप्नं असतात. सगळ्या पक्षांची स्वप्नं काही तीच असतात, सारखीच असतात, असं नाही. अमुक-अमुक जातीसाठी राखीव जागा असतील, स्त्रियांकरिता राखीव जागा असतील, अशा तऱ्हेची ही स्वप्नं असतात आणि तिसरी गोष्ट म्हणजे वेगवेगळ्या जनसमुदायांना, वेगवेगळ्या वर्गांना खुश करण्याकरिता केलेल्या काही कल्पना असतात. सर्वसाधारणपणे जाहीरनाम्यांचं स्वरूप असं असतं.

या सर्व गोष्टींचा कुणी फार अभ्यास वगैरे केलेला असतो असं नाही. जाहीरनामा तयार करण्याकरिता जी मंडळी बसलेली असतात, त्यतिं समजा एकजण भटके व विमुक्तांत काम करणारा माणूस आहे. तो पटकन् म्हणतो, की या जाहीरनाम्यात

भटक्या व विमुक्त जमातींसाठी काहीच नाही! मग सगळे त्याला विचारतात, 'तू त्यातला तज्ज्ञ आहेस, तूच सांग, काय असावं बाबा?' मग तो सांगतो, 'भटक्या व विमुक्त जमातींची पुनःस्थापना करण्याची योजना असावी, त्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी योजना असावी, त्यांच्याकरिता राखीव जागा असाव्यात,' वगैरे, वगैरे. तो माणूस सांगत असतो आणि दुसरा एकजण ती कलमं लिहून घेत असतो. दुसऱ्या बाजूला कदाचित याच्या नेमकं उलटं कलमसुद्धा येऊ शकतं. उदाहरणार्थ, कधी-कधी असं होतं, की गुन्हेगारी फार वाढलेली आहे आणि पोलिस फिरत्या टोळ्यांकडे फारसं लक्ष देत नाहीत, असं कुणीतरी म्हणतं आणि तसं कलमही जाहीरनाम्यात येतं.

हे जाहीरनामे का तयार व्हायला लागले? राजेशाही संपून जेव्हा सत्ता लोकसभेकडं जाऊ लागली, लोकप्रतिनिधींच्या बैठकीकडे जाऊ लागली तेव्हा निवडणुका होऊ लागल्या आणि निवडणुका होणार म्हटल्यानंतर तुमचा पक्ष आणि इतर पक्ष यांत काय फरक आहे, ते सांगितलं पाहिजे. त्यासाठी मग जाहीरनामे तयार व्हायला लागले.

लोकशाही ही सर्वांत श्रेष्ठ राज्यपद्धती आहे, असं समजलं जातं. तशी ती फारशी चांगली नाही. लोकशाहीमध्ये गोंधळ होतो, भ्रष्टाचार होतो, गुंड माजतात – सगळं काही खरं आहे; पण लोकशाहीपेक्षा जास्त चांगली पद्धत अजून तरी कुणी शोधून काढलेली नाही. कारण लोकशाहीत मोकळेपणा आहे. फुकुयामा नावाचा एक जपानी तत्त्वज्ञ आहे. त्याचं एक पुस्तक दहा वर्षांपूर्वी प्रसिद्ध झालं. त्या पुस्तकाचा विषय असा आहे, की जेव्हा लोकशाही-स्वातंत्र्य ही कल्पना मान्य झाली, तेव्हाच मनुष्य जातीचा इतिहास थांबला. आता यापुढं काही प्रगती होणार नाही. लोकशाही-स्वातंत्र्य ही मनुष्याच्या सामाजिक संस्थांतली शेवटची पायरी आहे.

प्रत्यक्षात काय झालं ? लोकशाही आली, लोकशाहीबरोब निवडणुका आल्या आणि निवडणुका जिंकण्याकरिता जे मतं देतात, त्यांना खुश करणं आलं. त्यासाठी जाहीरनामे आले. त्याचा परिणाम काय झाला ? जगात संपत्ती निर्माण करणारे, उत्पादन करणारे, कारखानदार, नोकऱ्या देणारे यांची संख्या नेहमीच जास्त असते. उत्पादनाचा उपभोग घेणारे आणि नोकरी मागणारे यांची संख्या नेहमीच जास्त असते आणि म्हणून मग निवडणूक लढवायची-जिंकायची असेल, तर ज्यांची संख्या जास्त, ते खुश होतील, असं काहीतरी करावं लागतं. कुणी जर असा जाहीरनामा काढला, की आमचं सरकार असा प्रयत्न करील,

की जे नवीन कारखाने काढतात, उत्पादन करतात, ज्यांच्यामुळं देशाचं वैभव वाढतं, जे लोकांना नोकऱ्या-रोजगार देतात, त्यांना आम्ही भरपूर उत्तेजन देऊ, ते अधिक कारखाने काढून अधिक रोजगार निर्माण करतील असं बघू; तर लोक काय म्हणतील ? लोक म्हणतील हे भांडवलशहा आहेत, हे फक्त श्रीमंतांचे कैवारी आहेत!

खरं म्हणजे रोजगार देणारा माणूस सगळ्या देशाचं कल्याण करीत असतो. डेट्रॉईट हे अमेरिकेतलं सर्वांत मोठं कारखानदारीचं शहर आहे. तिथं जगात सर्वांत जास्त मोटारींचं उत्पादन होतं. या शहराबद्दल बोलताना प्रेसिडेंट रुझवेल्टनं असं म्हटलेलं आहे, की जे डेट्रॉईटकरिता चांगलं आहे, ते अमेरिकेकरिता चांगलं आहे. आपण काही वेळा असं म्हणतो, की जे शेतकऱ्यांकरता चांगलं आहे, ते देशाकरिता चांगलं असलंच पाहिजे. तसंच विकसित देशांमध्ये जे कारखानदारांकरिता चांगलं आहे, जे रोजगार देणारांकरिता चांगलं असलंच पाहिजे; पण तुम्ही जर अशा तऱ्हेचं राजकारण केलं आणि जाहीरनामा तयार केला, तर लोक तुम्हाला भांडवलशहा म्हणतील, श्रीमंतांचे प्रतिनिधी म्हणतील.

याउलट, आमचं सरकार लोकांना रोजगार मिळवून देईल, रोजगार मिळालेल्या लोकांना काहीही काम करावं लागणार नाही, आम्ही लोकांना एक तारखेला फुकट पगार देण्याची व्यवस्था करू, असं जर एखाद्या पक्षानं म्हटलं, तर त्याचे दूरगामी परिणाम जर लोकांना समजले नाहीत, तर त्या पक्षाला जास्त मते मिळतील. हा इतिहासातला एक महत्त्वाचा कल आहे. जास्त लोकांना जे काही भावेल, ते चांगलं आहे, असं म्हणायचा प्रयोग धार्मिकांनीसुद्धा केला. The weak shall servive हे बायबलमधलं एक महत्त्वाचं वाक्य आहे. आपल्याकडंही 'महापुरें झाडे जातीं, तेथे लव्हाळी वाचती,' असं म्हटलेलं आहे; पण लव्हाळ्यालाही एक मत आणि वडाच्या झाडालाही एक मत असं असलं, तर लव्हाळ्यालाच खुश करायचा प्रयत्न होणार, हे स्वाभाविक आहे. कारण लव्हाळी जास्त आहेत. याला इंग्रजीमध्ये पॉप्युलिझम असा शब्द आहे. आपल्याकडंही,

'यद्यपि शुद्धम् लोकविरुद्धम्
नाचरणीयम् ना करणीयम्'

असं सुभाषित आहे. म्हणजे तुमचं म्हणणं कितीही खरं असलं; पण ते लोकांच्याविरुद्ध असलं, तर ते खरं करायला जाऊ नये!

लोकशाहीमध्ये दर पाच वर्षांनी निवडणुकीच्या निमित्ताने तुम्हाला लोकांकडे जावं लागतं; म्हणून लोक खुश होतील असं काहीतरी करीत राहावं लागतं.

पूर्वीच्या काळी राजांचं काम काय होतं? त्यांच्याकडं काय सत्ता होती? कुणी गुन्हा केला, तर त्याला शिक्षा करायची किंवा मग कुठं दुष्काळ पडला, पूर आला, आग लागली, अपघात झाला, तर लोकांच्या मदतीला जायचं. त्यामुळं लोकांना उपकृत करण्याची संधी वारंवार मिळत नसे. मग लोकांना वारंवार उपकृत करण्याची संधी मिळवण्याकरिता काय केलं पाहिजे? उपकार करण्याची सरकारची शक्ती हळूहळू वाढवत नेली पाहिजे. लोकशाहीमध्ये तेच झालं. म्हणजे सरकारमध्ये गेलो, तर संकटकाळी मदत करण्याबरोबरच मी तुमची अनेक कामं करीन; मोटारगाडी मिळत नसेल, तर मी तुमचा नंबर थोडा वर लावून देईन, टेलिफोन मिळत नसेल तर तो मिळवून देईन, कारखान्याचं लायसन्स मिळवून देईन वगैरे वगैरे. अशी सरकारची सत्ता जितकी वाढत जाते तितकी लोकांवर उपकार करण्याची संधी लोकप्रतिनिधींना वारंवार मिळत जाते. त्यामुळे लोकशाही-स्वातंत्र्याची व्यवस्था आली, त्याच दिवशी एका अर्थाने लोकशाहीला ग्रहण लागलं. लोकांचे प्रतिनिधी निवडण्याऐवजी मतदारांचा लिलाव करण्याचा हा कालखंड आहे.

सर्वसाधारणपणे कोणत्याही पक्षाच्या जाहीरनाम्यामध्ये वेगवेगळ्या आश्वासनांची जंत्री असते. आमची माणसं फार थोर, आमची माणसं फार सज्जन, आमची माणसं फार कर्तबगार, बाकीची माणसं नालायक, बाकीची माणसं भ्रष्ट, आम्ही आलो म्हणजे स्वच्छ सरकार देऊ, आम्ही आलो म्हणजे स्वर्गच निर्माण करू, अशा तऱ्हेने जाहीरनामे निवडणुकीच्या आधी तयार केले जातात. अटलबिहारी वाजपेयी यांनी एके ठिकाणी असं म्हटलेलं आहे, की कोणत्याही पक्षामध्ये जे लोक जाहीरनामा तयार करतात, ते लोक तरी तो वाचतात की नाही, याबद्दल शंका आहे. कारण पुष्कळदा त्याचा कुणी एक लेखक नसतोच. तुम्ही एक कलम सुचवलं - त्यात घातलं, त्यांनी एक कल्पना सुचवली - त्यात घातली, असं सगळं ते चालू असतं. पाच-पन्नास जुळारी एकत्र बसून, शेवटी ते पुस्तक तयार करतात.

आणि म्हणूनच 'स्वतंत्र भारत पक्षा'चा जाहीरनामा समजावून सांगण्याची गरज पडते. त्याच्यासाठी प्रशिक्षण शिबिर घ्यावं वाटतं, हीच मोठी अद्‌भुत गोष्ट आहे. या जाहीरनाम्यामध्ये आश्वासनांची यादी नाही, कोणत्याही तऱ्हेची लोकप्रियता मिळवण्याचा प्रयत्न नाही किंवा मतदारांना विकत घेण्याचाही प्रयत्न नाही. हा जाहीरनामा म्हणजे आश्वासनांची यादी नाही, तर तो एक प्रबंध आहे. सबंध जाहीरनाम्यात एक सिद्धांत, एक सूत्र आहे. ही वेगवेगळ्या चिंध्यांपासून

तयार केलेली गोधडी नाही; एका सुतानं विणलेलं महावस्त्र आहे. पहिल्यापासून शेवटपर्यंत एक तर्क, एक विचार, सुसंगत मांडणी असलेला हा एक प्रबंध आहे.

दुसरी गोष्ट म्हणजे या जाहीरनाम्यात एक अत्यंत कठोर आत्मपरीक्षण आहे. लोकांना खुश करण्याऐवजी त्यांना भीती दाखवणारा हा जाहीरनामा आहे. यात असं म्हटलेलं आहे, की लोकहो, तुम्हाला असं वाटतं, की तुम्ही योग्य दिशेनं चालला आहात; पण स्वातंत्र्यानंतर पन्नास वर्षे झाली, तुम्ही चुकीच्या दिशेनं चालला आहात. ज्या देशाच्या इतिहासाबद्दल, संस्कृतीबद्दल तुम्ही इतके दिवस अभिमान बाळगला, तो देश लवकरच संकटांच्या खाईत पडणार आहे आणि त्याला तुम्ही जबाबदार आहात. आता जर तुम्ही काही धडाडी दाखवली नाही, काही कर्तबगारी दाखवली नाही, तर हा देश वाचणार नाही. कोणत्याही देशातल्या लोकांना असं सांगणं अवघड असतं.

दुसऱ्या महायुद्धाच्या सुरुवातीला इंग्लंडचे पंतप्रधान चेंबरलेन यांनी अशी भूमिका मांडली, की पहिल्या महायुद्धात हिटलरवर, जर्मनीवर खूप अन्याय झाला. त्यामुळे आता आपण हिटलरविरुद्ध कडक भूमिका न घेता, त्यांच्या कलानं घेतलं, तर युरोपमध्ये शांतता नांदू शकते. लोक खुश झाले; कारण युद्ध कुणालाही नको असतं. चेंबरलेननं अशी घोषणा केली, की मी एका पिढीमध्ये शांतता आणतो. निवडणूक झाली. चेंबरलेन निवडून आला. त्याचा पक्ष विजयी झाला. तो पंतप्रधान झाला. चर्चिल निवडून आला; पण त्याला मंत्रिमंडळात घेतलं नाही. त्यामुळं तो त्याच्या गावी गेला; पण नंतर जेव्हा हिटलरनं प्रत्यक्ष युद्ध चालू केलं, तेव्हा इंग्लंडच्या राजानं चर्चिलला बोलावून घेऊन, पंतप्रधान केलं. पंतप्रधान झाल्यानंतर पहिल्यांदाच, रेडिओवर केलेल्या भाषणात चर्चिल म्हणाला, "मी आज तुम्हाला काहीही देऊ शकत नाही. रक्त, घाम आणि अश्रू याशिवाय देशाला देण्याकरिता माझ्याकडं काहीही नाही." अशा तऱ्हेचं वक्तव्य युद्ध तोंडावर आलेलं असताना करणं शक्य आहे. लोकांनाही जाणीव होती, की हे युद्ध आहे, ही काही साधी गोष्ट नाही.

पण जेव्हा लोकांना युद्धाची जाणीव नाही, संकटाची जाणीव नाही, अशा वेळी त्यांना आश्वासनं देण्याऐवजी पुढं काळ बिकट आहे, कष्ट करायची तयारी ठेवा, असं सांगणारा हा स्वतंत्र भारत पक्षाचा जाहीरनामा आहे. आम्ही लोकांना फक्त एकच गोष्ट देऊ शकतो. गेल्या ५० वर्षांमध्ये झालेली देशाची अधोगती पाहून, ज्यांना दुःख होत असेल, हजारो हुताम्यांनी केलेलं बलिदान फुकट

चाललल्याचं पाहून, ज्यांना मनातून वेदना होत असतील, त्यांना हा देश पुन्हा एकदा वैभवाच्या आणि कीर्तीच्या शिखरांकडं जाताना पाहाण्याचं सौभाग्य आम्ही देऊ शकतो. आम्ही बाकी काहीही देऊ शकत नाही. अगदी जगाच्या उलटा जाहीरनामा आहे हा.

या जाहीरनाम्याचं आणखी एक वैशिष्ट्य आहे. सर्वसाधारणपणे कोणत्याही जाहीरनाम्यामध्ये येणारी पाच वर्षे गेलेल्या पाच वर्षांसारखीच असतील असं गृहीत धरून मांडणी केलेली असते; पण हा जाहीरनामा वेगळा आहे. येणारा काळ हा गेल्या पाच वर्षांपेक्षा वेगळा असून, देशापुढं एक संकट येतं आहे, अशा एका अर्थशास्त्रीय अंदाजावर हा जाहीरनामा आधारित आहे. हे संकट अगामी पाच वर्षांत जरी कोसळलं नाही, तरी ते पुढच्या काळात लवकरच कोसळणार आहे, एवढं निश्चित. हे संकट इतक्या झपाट्यानं जवळ येतं आहे, की त्याचा मुकाबला करण्यासाठी काहीतरी तयारी करणं अवश्यक आहे. म्हणजेच एका आगामी संकटाची चाहूल देणारा आणि त्याला तोंड देण्याची तयारी करा, असं सांगणारा हा जाहीरनामा आहे.

(शब्दांकन : श्री. रमेश राऊत, औरंगाबाद.)

(२१ जून २०००)

◆◆

स्थिर सरकार चांगले की आघाडीचे?

(स्वतंत्र भारत पक्ष जाहीरनामा लेखांक : २)

स्थिर सरकार फायद्याचे ?

गेल्या दोन वर्षांत तीन पंतप्रधान झाले. तीन वेगवेगळी सरकारं झाली. लोकांना असं वाटू लागलं, की बहुमत नसल्यामुळं सरकार अनेक महत्त्वाच्या किमती वाढवायला पाहिजेत, वाढवायला पाहिजेत असं म्हणता म्हणता चार महिने गेले. दुसऱ्या एका प्रश्नाबद्दल निर्णय घेतला गेला; पण सरकार अल्पमतात असल्यामुळं एकदम चुकीचा निर्णय घेतला गेला. शासकीय नोकरदारांचं वेतन काय असावं, यासाठी पाचवा वेतन आयोग नेमण्यात आला होता. त्यानं काही शिफारशी केल्या होत्या. त्यासाठी लागणारा खर्च दहा हजार कोटी रुपयांच्या आसपास असेल; पण त्याचबरोबर सरकारी नोकरदारांची संख्या तीस हजारानं कमी करावी, सुट्या कमी कराव्यात, कामाचे तास वाढवावेत, काही सोयी-सवलती कमी कराव्यात, असंही वेतन आयोगानं म्हटलेलं होतं. एका बाजूनं दहा हजार कोटी रुपये वाढवा; पण दुसऱ्या बाजूनं एकूण खर्च कमी होईल असंही बघा, अशा तऱ्हेची शिफारस या आयोगानं केली होती; पण प्रत्यक्षात काय झालं ? सरकार अल्पमतात गेलं. त्यानंतर नोकरदार आणि नोकरशहा यांच्याविरुद्ध बोलण्याची कोण हिंमत करणार ? सरकारतर्फे रामविलास पास्वान नोकरदारांच्या युनियनशी चर्चा करायला बसले. रामविलास पास्वान हेही एकेकाळचे युनियन लीडर आहेत. त्यामुळं निर्णय असा झाला, की १० हजार कोटींच्या ऐवजी १८ हजार कोटी पगारवाढ देण्यात यावी! आणि ३० लाख नोकऱ्या कमी करण्यात याव्यात, कामाचे तास वाढवण्यात यावेत वगैरे, वगैरे जे काही होतं, ते सगळं रद्द करण्यात आलं. हे का झालं ? तर म्हणे सरकारकडं ताकद नव्हती, सरकार अल्पमतात होतं म्हणून झालं. त्यामुळं काँग्रेस, भाजप, संयुक्त आघाडीवाले- सगळेच म्हणतात, की स्थिर सरकार ही गोष्ट अत्यंत

महत्त्वाची आहे; पण स्थिर सरकार ही गोष्ट खरंच चांगली आहे का ? आपण नेहमी म्हणतो, शेतकऱ्याचं मरण हे सरकारचं धोरण! शेतकऱ्याचं मरण, म्हणजे देशाचं मरण, असं ज्या सरकारचं धोरण असतं, ते सरकार स्थिर असणं, ते सरकार सामर्थ्यवान असणं हे शेतकऱ्यांच्यासाठी भलं सरकार आहे का ? आपलं घर लुटायला येणाऱ्या दरोडेखोराच्या हातात मोठमोठी शस्त्रे असावीत, तो चांगला तगडा असावा, असं म्हणण्यासारखंच झालं हे!

दुसरा एक प्रश्न असा, की स्वातंत्र्यानंतरच्या पन्नास वर्षांत अल्पमतातलं, अस्थिर सरकार असं किती दिवस होतं ? पी. व्ही. नरसिंह राव सरकारची पाच वर्षे अस्थिर धरू. ते सरकार वर्षे पाच स्थिर राहिलं, तरी अल्पमतातलं सरकार होतं. त्या दहाव्या पार्लमेंटची पाच वर्षे, अकराव्या पार्लमेंटची दोन वर्षे आणि त्याच्याआधी जनता दलाची अडीच वर्षे असं सगळं धरून साडेनऊ किंवा जास्तीत जास्त दहा वर्षे अस्थिर सरकार होतं. हिंदुस्थानात तब्बल चाळीस वर्षे भरभक्कम बहुमत असलेलं सरकार होतं. म्हणजे पंतप्रधानानं किंवा कॅबिनेटनं सांगायचं आणि लोकसभेनं त्याच्यावर शिक्कामोर्तब करायचं; चर्चा, विरोध असा काहीही प्रश्न नव्हता. असं स्थिर सरकार चाळीस वर्षे होतं आणि स्थिर सरकार ही जर चांगली गोष्ट असेल, तर पन्नास वर्षांपैकी चाळीस वर्षे सरकार स्थिर असूनही, देशाचं वाटोळं का झालं ? स्थिर सरकार ही जर चांगली गोष्ट असेल तर चाळीस वर्षांत देशाचं भलंच भलं व्हायला पाहिजे होतं!

जवाहरलाल नेहरू पंतप्रधान असताना त्यांच्या हातात भरपूर बहुमत होतं. त्यांनी बहुमताचा उपयोग कशासाठी केला ? तर गांधीवाद बाजूला टाकून, समाजवाद देशाच्या डोक्यावर लादण्याकरिता. इंदिरा गांधी बांगलादेशच्या युद्धानंतर लोकप्रिय झाल्या. त्यांनी त्या लोकप्रियतेचा उपयोग कशासाठी केला ? तर श्रीलंकेमध्ये अतिरेकी पाठवणं, सिक्कीम काबीज करणं किंवा 'गरिबी हटाव'च्या नावाखाली आपल्या पक्षाच्या लोकांना भरपूर पैसे खाता येतील अशा योजना आखणं अशा कामांसाठी केला. राजीव गांधी सहानुभूतीच्या लाटेवर तीनचतुर्थांशी बहुमत घेऊन निवडून आले आणि त्यांनी काय केलं ? राजीवस्त्रांची आयात, बोफोर्सवर कमिशन खाणं, श्रीलंकेमध्ये सैन्य पाठवणं वगैरे, वगैरे. इतक्या मूर्खपणाच्या गोष्टी केवळ तीनचतुर्थांश बहुमत होतं; म्हणूनच घडू शकल्या! जेव्हा जेव्हा पंतप्रधानांच्या हाती निरंकुश सत्ता येते तेव्हा तेव्हा त्या सत्तेचा गैरवापरच होतो!

हिंदुस्थान हा विविधतेने नटलेला देश आहे. इथं अनेक तऱ्हांचे लोक आहेत,

अनेक धर्म आहेत. अनेक संस्कृती आहेत. या सगळ्या विविधतेमध्ये एकता असली, तरी त्याबरोबरच संघर्षही आहे. इतकी विविधता असलेल्या देशामध्ये स्थिर, संपूर्ण बहुमत असलेलं सरकार आलंच कसं? तुमच्याकडं समजा एका पोत्यामध्ये वेगवेगळ्या गोष्टी भरलेल्या आहेत. तुम्ही त्या पोत्यात हात घालून सँपल काढलं आणि वर आलेल्या सँपलमध्ये सगळेच गव्हाचे दाणे आले, तर काय समजायचं ? त्याचा अर्थ असा, की नमुना काढायची पद्धत कुठेतरी चुकत असली पाहिजे; बाकीच्या सगळ्या गोष्टी टाकून, नेमके गहूच वर येतील अशी काहीतरी योजना असली पाहिजे.

विविधतेनं नटलेल्या या देशामधील लोकसभासुद्धा विविधतेनं नटलेली असली पाहिजे. तिथं अनेक प्रकारची मतं, अनेक प्रकारचे विषय, अनेक प्रकारची स्वारस्यं, अनेक प्रकारचे हितसंबंध असले पाहिजेत. लोकसभा ही जर प्रातिनिधिक असेल, लोकसभा हे सँपल असेल आणि ते सँपल जर हिंदुस्थानसारख्या देशामध्ये एका ठशाचं, संपूर्ण बहुमत असलेलं स्थिर सरकार देणारं असेल तर काहीतरी चुकत आहे, असं म्हटलं पाहिजे. एकाच मताचं सरकार आलं, तर त्याचा अर्थ असा, की इथं काहीतरी गडबड आहे, काहीतरी भामटेपणा आहे. हा भामटेपणा काय आहे ? ते समजून घेण्यासाठी आपल्याला काही गोष्टी समजून घ्याव्या लागतील.

आपल्या निवडणुकांमध्ये भौगोलिक मतदारसंघ असतात. साधारणतः एक जिल्हा किंवा याचा एक तुकडा, त्याचा एक तुकडा मिळून, लोकसभेचा मतदारसंघ तयार होतो. विधानसभेचा मतदारसंघ म्हणजे साधारणतः एक तालुका किंवा एक ब्लॉक असतो. तुम्ही कोणत्याही उमेदवाराला विचारा, तो म्हणतो, माझ्या मतदारसंघाइतका विचित्र मतदारसंघ दुसरा नसेल! एक तुकडा इकडं, एक तुकडा तिकडं वगैरे वगैरे. तरीसुद्धा सलग भूप्रदेश असलेला मतदारसंघ हा भौगोलिकच असतो. विधान परिषद किंवा राज्यसभेसाठी काही निवडणुका शिक्षक मतदारसंघ, स्थानिक स्वराज्य संस्था किंवा वेगवेगळ्या व्यवसायांतून होऊ शकतात. काही लोक निवडून येण्याची शक्यताच नसते. त्यामुळे राष्ट्रपतीला एक अँग्लोइंडियन खासदार नेमण्याचा अधिकार घटनेनं दिलेला आहे; पण असे काही अपवाद सोडले तर लोकसभेमध्ये निवडून येणारे खासदार हे लोकांनी भौगोलिक मतदारसंघांतून निवडून दिलेले असतात.

आपल्याकडं आणखी एक पद्धत आहे. सर्वांत जास्त मतं मिळवणारा उमेदवार निवडून येतो आणि सगळ्या मतदारसंघाचं प्रतिनिधित्व करतो. निवडून

आलेला हा उमेदवार; कदाचित त्याला पस्तीस टक्के मतं मिळालेली असतील; पण ती सगळ्यांत जास्त मतं असतील, तर तो उमेदवार निवडून येतो आणि सगळ्या मतदारसंघाचं प्रतिनिधित्व करतो. याचा काय परिणाम होतो ते पाहू. मी काही आकडेवारी पाहिलेली नाही; पण ब्राह्मण साडेतीन टक्के आहेत, मराठा तीस टक्के आहेत, मुसलमान अठरा टक्के आहेत, दलित पंधरा टक्के आहेत वगैरे वगैरे, त्यामुळं असं होतं, की जी सर्वांत मोठी जात आहे, ती अल्पसंख्याक असली, तरी तिला निवडणूक जिंकणं सहज शक्य होतं. दुसऱ्या एखाद्या जातीचा प्रभाव जास्त असला, की त्या जातीचा एक खोटा (डमी) उमेदवार उभा करण्यात येतो. उदाहरणार्थ, लिंगायतांमुळे मराठा निवडून येणार नाही असं वाटलं, की लिंगायतांतला एक खोटा उमेदवार उभा करायचा. त्यामुळं लिंगायतांची मतं फुटतात आणि तीस-बत्तीस टक्क्यांवर मराठा उमेदवार निवडून येतो. निवडणुकीचं राजकारण, निवडणुकीचं राजकारण म्हणतात ते हेच! बाकीचेही हेच करीत असतात. याला इंग्रजीमध्ये 'फर्स्ट पास्ट द पोस्ट' असा शब्द आहे. धावण्याच्या शर्यतीत ज्याच्या छातीला पहिल्यांदा दोरी लागली, तो जिंकला. म्हणजे शर्यतीत जो पहिल्यांदा धावत पुढे जातो तो जिंकतो. किती वेळात जिंकला, कसा जिंकला ते बघायचं नसतं.

समजा, भौगोलिक मतदारसंघांऐवजी जातिनिहाय मतदारसंघ असते, तर काय झालं असतं ? तर लोकसभेमध्ये ब्राह्मण, मराठा, दलित, मुसलमान यांची संख्या त्यांच्या-त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणातच राहिली असती. लोकसभेत कुणाही एका पक्षाला, एका जातीला बहुमत मिळू शकलं नसतं; पण आपण जी सँपल काढण्याची पद्धत स्वीकारली आहे, त्या पद्धतीमध्ये ज्या जमातीला पन्नास टक्क्यांपेक्षा कमी मतं आहेत, त्या जमातीला लोकसभेमध्ये, विधानसभेमध्ये ५० ते ७० टक्क्यांपर्यंत जागा मिळू शकतात. ही मोठी युक्तीची गोष्ट आहे. भौगोलिक मतदारसंघ आणि 'फर्स्ट पास्ट द पोस्ट' या तऱ्हेची निवडणुकीची रचना असली, की सर्वांत मोठ्या अल्पसंख्याक गटाला प्रमाणाच्या बाहेर प्रतिनिधित्व मिळतं. ही पद्धत आपण इंग्रजांकडून घेतली; पण एक गोष्ट आपण लक्षात घेतली पाहिजे, की इंग्लंडमध्ये काही वेगवेगळ्या जाती नाहीत. दुसरी गोष्ट म्हणजे तिथं दोन पक्षांची पद्धत रूढ झालेली आहे आणि म्हणूनच तिथं भौगोलिक मतदारसंघ असूनही आपल्याकडच्यासारख्या युक्त्या प्रयुक्त्या करता येत नाहीत.

विभक्त मतदारसंघ आणि आघाड्यांची सरकारं

स्वातंत्र्यापूर्वी हिंदुस्थानातील मुसलमानांच्या मनात एक फार मोठी भीती

होती. त्यांना वाटायचं, की आपण अल्पसंख्य आहोत आणि हिंदू बहुसंख्य आहेत. प्रत्येक ठिकाणी निवडणुकीमध्ये हिंदूच निवडून येणार. मुसलमान जास्तीत जास्त पंचेवीस टक्के होते; पण तरीसुद्धा मुस्लिमबहुल मतदारसंघ फार थोडे होते. त्यामुळे हिंदू त्यांच्या बहुमताच्या जोरावर आपल्याला आपल्या धर्मानुसार वागू देणार नाहीत अशी भीती मुसलमानांच्या मनामध्ये तयार झाली किंवा इंग्रजांनी तयार केली; काय म्हणायचं ते म्हणा; पण त्यांना असं वाटत होतं, की हिंदू मुसलमानांवर अन्याय करतील. राजकीय बहुमत कायम त्यांचंच राहील, हिंदूंमधल्या दलितांनाही हीच चिंता वाटत होती. त्यावेळी त्यांना अस्पृश्य किंवा हरिजन म्हणत. मग, आम्हाला आमचे मतदारसंघ वेगळे पाहिजेत, अशी मागणी मुसलमानांनी केली आणि ती मागणी मान्य झाली. या मागणीला महात्मा गांधींनी विरोध केला नाही. मुसलमानांचे वेगळे मतदारसंघ झाल्याबरोबर पाकिस्तानचा पाया घातला गेला. जर का हिंदू समाजाला त्यावेळी मुसलमानांना असं पटवून देता आलं असतं, की आपण निवडणुकीची अशी पद्धत काढू, की तुम्ही अल्पसंख्य असला तरीसुद्धा तुमच्या संमतीशिवाय तुमच्यासंबंधीचा कायदा केला जाणार नाही अशी काहीतरी व्यवस्था आणता येईल, तर विभक्त मतदारसंघ झाले नसते आणि कदाचित, पाकिस्तानही झालं नसतं.

त्यानंतर दलितांसाठी विभक्त मतदारसंघांची मागणी पुढे आली आणि त्याला मात्र गांधीजींनी प्राणपणानं विरोध केला. ते उपोषणाला बसले. त्या वेळी सर्व जनतेच्या मनात त्यांच्याबद्दल प्रचंड आदर होता आणि त्या मानानं आंबेडकरांचा हरिजनांमधील संपर्क फारसा मोठा नव्हता. हे गावोगाव जे बाबासाहेबांचे पुतळे दिसतात ते आता आता झाले. त्या वेळी आंबेडकरांनी विभक्त मतदारसंघ मागितला म्हणजे नेमकं काय केलं तेसुद्धा बहुसंख्य हरिजनांना, अस्पृश्यांना एवढंच काय त्यांच्या जातीला, म्हणजे त्यावेळच्या महार जातीलासुद्धा माहीत नव्हते. नाही तर आंबेडकरांनी गांधींजीच्या उपोषणाविरुद्ध सहज निदर्शनं घडवून आणली असती. ती आंबेडकरांना घडवून आणता आली नाहीत. उलट, गांधींचं उपोषण सुटावं म्हणून त्यांना विभक्त मतदारसंघांची मागणी सोडून देऊन, राखीव मतदारसंघांवर तडजोड करावी लागली.

राखीव मतदारसंघ म्हणजे काय ? तोही भौगोलिक मतदारसंघच; पण त्या मतदारसंघातून निवडून येणारा कोणत्या जातीमधला असावा ते ठरलेलं असतं. त्या वेळी आंबेडकरांनी दलितांसाठी राखीव मतदारसंघ ठेवण्याची कल्पना मान्य केली. येरवड्याला गांधींच्या वतीनं काही लोकांनी सह्या केल्या. करार

झाला. त्यात आंबेडकरांनी एक लहानसं कलम घातलं होतं. त्यांचं म्हणणं असं होतं, की राखीव मतदारसंघातून ज्या उमेदवारांना उभं राहायचं तिथं त्यांची आधी एक प्राथमिक निवडणूक घ्यावी. ज्या उमेदवारांना राखीव मतदारसंघातून उभं राहायचं असेल, त्यांची या प्राथमिक निवडणुकीमध्ये निवड करण्याचा अधिकार फक्त त्या राखीव जातींच्या मतदारांनाच असावा. म्हणजे काय ? समजा, अमरावती हा मतदारसंघ राखीव झाला. तिथं जागा फक्त दलितांना आहे. दलितांतर्फे कुणी उभं राहायचं ? कुणाही दलितानं उभं राहून चालणार नाही. तर ज्यांना उभं राहायचं असेल त्यांनी पहिल्यांदा अर्ज भरावेत. एक निवडणूक अशी होईल, की त्यात फक्त दलितच मतं देतील. या पहिल्या निवडणुकीत दलितांनी निवडून दिलेले चार किंवा पाच उमेदवार दुसऱ्या निवडणुकीकरिता उभे राहतील. या दुसऱ्या निवडणुकीमध्ये मतं देण्याचा अधिकार मात्र सर्वांना राहील. मग जे निवडून येतील, त्यांना खऱ्या अर्थानं दलितांचे प्रतिनिधी म्हणता येईल. नाहीतर दलितांसाठी राखून ठेवलेल्या मतदारसंघातून सवर्णांचे चमचे निवडून येतील ही त्यांची भीती बरोबर होती. आज तसंच होतंय. महिलांच्याही बाबतीत व्हायला लागलं. स्वातंत्र्यानंतर या सगळ्या प्रश्नांची चर्चा सुरू झाली. आंबेडकरांकडे घटना लिहिण्याची सगळी जबाबदारी नसली, तरी ते त्या समितीचे अध्यक्ष होते. त्यांनी आपल्या या मागणीचा फारसा आग्रह धरला नाही. त्यांनी ही मागणी आपोआपण सोडून दिली. का कुणास ठाऊक ? पण अरुण शौरींसारख्या लोकांकडून असा आरोप केला जातो, की नेहरूंनी आंबेडकरांना घटना समितीत घेतलं, मान-सन्मान दिला म्हणून ते असल्या किरकोळ गोष्टीकडे दुर्लक्ष करायला तयार झाले. हा आरोप आहे; पण त्यांनी आग्रह धरला नाही, ही गोष्ट खरी आहे. मग प्रश्न आला, की मतदारसंघ कसा असावा ? आणि त्यावेळी पुन्हा एकदा 'फर्स्ट पास्ट द पोस्ट' आणि भौगोलिक मतदारसंघाला मंजुरी मिळाली.

या विषयावर घटना समितीत झालेली चर्चा फार चांगली आहे. त्या वेळी घटना समितीत वेगळी मांडणी करणारा एक सदस्य होता. त्याचं नाव मिनू मसानी. मिनू मसानी म्हणजे एका अर्थानं स्वतंत्र भारत पक्षाचं प्रेरणास्थान आहे. त्यांचं असं म्हणणं होतं, की जर तुम्ही या पद्धतीनं निवडणुका घेतल्या तर सर्वांत मोठ्या अल्पसंख्याक गटाची हुकूमशाही तयार होईल. नेहरूंनी त्यांचं म्हणणं ऐकलं नाही. कारण नेहरूंच्या डोक्यात त्या वेळी असं होतं, की जे इंग्लंडमध्ये चांगलं आहे, ते इथं वाईट कसं होईल? मिनू मसानी यांनी

सरदार वल्लभभाई पटेल हे जास्त व्यवहारी आणि मुत्सद्दी होते असं आपण गृहीत धरतो. ते म्हणाले, या व्यवस्थेनं सर्वांत मोठ्या अल्पसंख्याक गटाला प्रमाणाबाहेर प्रतिनिधित्व मिळेल, हे मला माहीत आहे; पण ती गोष्ट चांगली आहे, असं मला वाटतं; कारण त्याबेळी स्वातंत्र्यानंतरची एक विशेष परिस्थिती होती. देशाची फाळणी झालेली होती, सर्वत्र दंगे माजलेले होते, काश्मीरमध्ये युद्ध चालू होतं, फुटीर चळवळी उभ्या राहत होत्या वगैरे वगैरे. तेव्हा मजबूत आणि स्थिर केंद्र सरकार असलं, तरच स्वातंत्र्य वाचेल, नाहीतर ते पुन्हा जाईल, अशी भीती लोकांच्या मनात होती. ही भीती इतकी तीव्र होती, की घटना मंजूर करणाऱ्यांनी जाणीवपूर्वक निवडून येणारी लोकसभा ही खऱ्या अर्थानं लोकप्रतिनिधींची नसावी. अशी व्यवस्था केली आणि केवळ अशी व्यवस्था केल्यामुळं पन्नास वर्षांपैकी चाळीस वर्षांमध्ये तुम्हाला स्थिर सरकार मिळालं. आता तोही काळ संपला.

आता जातींचे किंवा अशा तऱ्हेच्या गटांचं बंधन कमी झालेलं आहे. आता ज्या निवडणुका होतील, त्या साहजिकच विविध प्रकारचे हितसंबंध लोकसभेत आणतील. पूर्वी काही समाजघटकांना अस्मितेची जाणीव नव्हती. अमुक अमुक उमेदवाराला मतं द्या म्हटलं, की ते त्याला मतं द्यायचे. आता ते म्हणतात, 'नाही, आम्ही आमच्याच माणसांना मतं देणार.' काही जातींचा प्रश्न करणारे 'बसप'सारखे पक्ष आले. मंडल आयोगाच्या आधारानं वेगवेगळे पक्ष आले. त्यामुळे यापुढं संसदेत विविधता येणं अपरिहार्य आहे. आता संसद खऱ्या अर्थानं लोकप्रतिनिधित्व करू लागली आहे. एके काळी संसद फार चांगली होती, ती आता खराब होऊ लागली आहे आणि आम्ही आता स्थैर्य आणणार आहोत, ही कल्पना चुकीची आहे. वास्तविक पाहता इतके दिवस संसद खऱ्या अर्थानं देशाचं प्रतिनिधित्व करीत नव्हती, ती आता देशाचं दिवसेंदिवस अधिकाधिक प्रतिनिधित्व करायला लागली आहे आणि म्हणूनच आघाड्यांची सरकारं अपरिहार्य आहेत. स्थिरता ही कृत्रिमरीत्या आणलेली होती. त्यानं देशाचं भलं झालेलं नाही. आता लोकसभा खऱ्या अर्थानं प्रातिनिधिक होऊ लागलेली आहे. त्यामुळं यापुढं आघाड्यांच्या सरकारांचा काळ येणार आहे आणि त्यात वाईट काही नाही. जगातल्या अनेक देशांमध्ये कित्येक वर्षे नव्हे, कित्येक शतकं आघाड्यांची सरकारं चाललेली आहेत. जगातला सर्वांतश्रीमंत देश म्हणून ओळखल्या जाणाऱ्या स्वित्झर्लंडमध्ये गेली साडेतीनशे वर्षे आघाड्यांची सरकारं चालू आहेत. स्थिर सरकार असताना जर्मनीचं वाटोळं झालं. दुसऱ्या महायुद्धानंतर पश्चिम जर्मनीमध्ये

आघाड्यांचीच सरकारं आहेत आणि आघाड्यांची सरकारं असूनसुद्धा त्यांनी प्रगती करून दाखवली. जपानमध्येही आघाड्यांची सरकारं आहेत. इटलीमध्ये आघाडीचं सरकार आहे. फ्रान्समध्ये आघाड्यांची सरकारं आहेत. आघाड्यांची सरकारं असली आणि परस्परांशी विचारविनिमय करून मार्ग काढण्याची बुद्धी असली तर देशाची प्रगती होते.

१९९७ मध्ये आपलं संयुक्त आघाडीचं सरकार कोसळलं, ते संयुक्त होतं म्हणून नाही; त्याचं कारण असं, की ती आघाडीच नव्हती. त्या सरकारमध्ये एका टोकाला आर्थिक सुधारणा घडवून आणल्या पाहिजेत असं म्हणणारे पी. चिदंबरम होते आणि दुसऱ्या टोकाला अजिबात आर्थिक सुधारणा होता कामा नयेत, असं म्हणणारे ज्योती बसू आणि कम्युनिस्ट होते. अशी सगळी मंडळी एकत्र आली आणि डाव्यांनी त्याचा फायदा घेतला. बदल होऊ दिले नाहीत आणि म्हणूनच सरकार कोसळलं, संयुक्त आघाडीचं सरकार कोसळलं याचा अर्थ असा नाही, की आघाडी सरकारचा प्रयोग फसला. याचा अर्थ असाही नाही, की कोणत्यातरी एका पक्षाचं जबरदस्त बहुमत आणून, एकगठ्ठा बहुमताचं सरकार तयार केलं, की देशाचं भलं होतं. ही कल्पना काही खरी नाही.

(६ जुलै २०००)

◆◆

राखीव जागांविषयी भ्रम

(स्वतंत्र भारत पक्ष जाहीरनामा लेखांक : ३)

मंडल आयोगाच्या शिफारशी स्वीकारल्यापासून राखीव जागा हा निवडणुकीमध्ये मोठा वादाचा विषय झालेला आहे. 'स्वतंत्र भारत पार्टी'च्या जाहीरनाम्यामध्ये जातींकरिता केलेल्या नोकऱ्यांमधील राखीव जागांबद्दल काहीही लिहिलेलं नाही. तसेच जातींकरिता केलेल्या लोकप्रतिनिधींच्या जागांबद्दलही काही म्हटलेलं नाही. लोकप्रतिनिधींकरिता राखीव जागा ठेवण्याच्या पद्धतीमुळे मागासवर्गीयांचे प्रतिनिधी निवडून येण्याऐवजी सवर्णांचे चमचे निवडून येण्याची सोय झालेली आहे. जे कोणी चमचे निवडून येतात ते त्या त्या वर्गामधला वरचा थर बनून जातात. दलितांच्या खालच्या वर्गापर्यंत राखीव जागांचा फायदा पोहोचला, असं कधी दिसत नाही. फक्त काही जणांना नोकरीतल्या राखीव जागांचा फायदा मिळतो. काहीजण आमदार-खासदार होतात आणि दुधावर जशी साय तयार होते तशी सबंध मागासलेल्या समाजाच्या भांड्यामध्ये एक वेगळी साय तयार होते. त्या सायीचा फायदा खालच्या वर्गाला मिळतोच असं नाही. मागासवर्गीयांकरिता ठेवलेल्या राखीव जागा आणि सोयीसवलतींचा ज्यांना फायदा मिळाला, ती मंडळी बाकीच्यांकडे जाऊन काही करतात, असं दिसत नाही. उलट, आपण या मागासपणातून सुटलो, आपण जणू काही पहिल्यापासूनच सुधारलेल्या वर्गातच आहोत, असं गृहीत धरून ते वागतात. सुधारलेल्या वर्गामध्ये किंवा सवर्णांमध्ये आपलं काही स्थान असावं म्हणून लहानपणातल्या कष्टमय दिवसांचं, दुःखाचं, त्या जखमांचं प्रदर्शन करणारं आत्मचरित्र किंवा साहित्य लिहून आणखी मोठेपणा मिळवतात; पण या सोयीसवलती घेऊन जे मोठे झाले त्यांच्यामुळे सबंध समाजाचा फायदा झाला असा काही पुरावा दिसत नाही.

दुसरी गोष्ट म्हणजे, राखीव जागा नोकऱ्यांत आणि राजकारणातच कशासाठी ठेवायच्या? म्हणजे फक्त नोकरी आणि राजकारण याच करण्यालायक गोष्टी

आहेत का ? जी मंडळी गावामध्ये राहून वेगवेगळ्या प्रकारचे हुन्नर करीत होती; बलुतेदारी करीत होती, हातानं काम करीत होती, उत्पादन करीत होती, त्यांना – चांभार, लोहार, सुतार, तांबट – यांना या सगळ्या कामातनं काढून टेबलामागं बसणारे बाबू किंवा कायदेमंडळात बसणारे आमदार-खासदार बनवणं म्हणजे काही त्यांना सामाजिक न्याय देणं नाही आणि बाबूगिरी आणि लोकप्रतिनिधींच्या जागांवर किती जणांची सोय होईल ? फार तर दोन-चार टक्क्यांची सोय होईल आणि मुळात गावोगाव उत्पादक कामं करणाऱ्या लोकांना शहरांकडे चला आणि नोकऱ्या करा, असं सांगणं हे सुबुद्ध दलित चळवळीचं लक्षण असू शकतं का ? त्याऐवजी हुन्नरीला काही उत्तेजन मिळालं असतं आणि ते फायदेशीर ठरू लागलं असतं, तर समाजाची दलितांकडे पाहण्याची दृष्टीच बदलून गेली असती. पूर्वी गावात चांभाराला हीन मानण्यात येत असे, त्याला चावडीसमोरून जाण्याची बंदी असे. आता तसं कुठं होतं का ? चांभार जर श्रीमंत होऊन गावात आला तर त्याला कुणी हीनपणानं वागवण्याचा प्रयत्न करीत नाही आणि म्हणूनच शहरांकडं चला आणि नोकऱ्यात-राजकारणात राखीव जागा मिळवा हा काही खऱ्याखुऱ्या दलित चळवळीमधील कार्यक्रम दिसतात. म्हणजे नाव दलित चळवळीचं घ्यायचं; पण हेतू मात्र आपल्याला व्हॉईसरॉयच्या मंत्रिमंडळात स्थान मिळावं असा. अशा रीतीने दलित चळवळीला एका चुकीच्या दिशेने वळवण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न झाल्यामुळे एक मोठा वाईट परिणाम घडून आला. जे लोक उद्योगधंदे करीत होते त्यांनी आपल्या उद्योजकत्वाचा अभिमान सोडून दिला आणि आपण अनुत्पादक सवर्णांप्रमाणे वागायला लागलो, की आपले सगळे प्रश्न सुटतील असं मानायला सुरुवात केली. एवढंच नव्हे, तर हे हुन्नर करणारे लोक नोकरवर्गीय गेल्यामुळं त्यांना समाजवादात स्वारस्य निर्माण झालं; जितक्यात नोकऱ्या जास्त तितकं बरं असं त्यांना वाटू लागलं.

दलित समाजातून वर आलेल्या लोकांची आत्मचरित्रं बऱ्यापैकी खपतात. निदान त्यांना सरकारी पारितोषिकं भरपूर मिळतात. या आत्मचरित्रांचा पॅटर्न ठरलेला असतो. सर्वसाधारणपणे आई-वडिलांविषयी ज्या काही पवित्र, आदरांच्या कल्पनाअसतात त्यानुसार त्या दलित घरात जन्मलेल्या मुलाला त्याचे आई-वडील सांभाळू शकत नाहीत. मग ते पोरगं एखाद्या गुरुजीच्या मदतीनं, मोठ्या कष्टानं थोडी विद्या संपादित करतं. सातवी-आठवी पास होतं आणि शेवटी मास्तर किंवा तत्सम नोकरी मिळाल्यानंतर त्याचा प्रश्न आपोआपच सुटतो. सर्वसाधारणपणे सर्व दलित आत्मचरित्रांचा पॅटर्न असाच असतो. आता सगळ्या

दलितांना नोकऱ्या मिळणं तर शक्य नाही. मग ते म्हणणार, की नोकऱ्या वाढल्या पाहिजेत, आम्हाला रोजगाराचा हक्क मिळाला पाहिजे. आम्ही फक्त सातवीपर्यंत शिकलेलो असलो तरी, आम्हाला दोन ओळीही नीट लिहिता येत नाहीत, हे खरं असलं तरी आम्हाला नोकऱ्या मिळाल्या पाहिजेत आणि अशा नोकऱ्या फक्त सरकारच तयार करू शकतं.

दलित चळवळ ही शहरअपेक्षी झाली. आंबेडकरांनी दलितांना सांगितलं, "शहरांकडे चला, संघटित व्हा, सुशिक्षित व्हा आणि नोकऱ्या मिळवा," असा त्याचा अर्थ झाल्याबरोबर दलित चळवळीचा पहिला संबंध यांची गाठ घालून द्यायला सुरुवात झाली. त्याचं कारण असं, की गेल्या शंभर वर्षांमध्ये शोषितांचा प्रश्न कुणीही मांडायचा झाला तरी त्याचा सिद्धांत घेण्याकरिता मार्क्सकडे नजर टाकल्याखेरीज काही गत्यंतर आहे, असे कुणाला वाटत नाही. अशा तऱ्हेनं दलित चळवळ ही समाजवादी चळवळीचा एक भाग बनली आणि ती पुढे "खुल्या व्यवस्थेमुळं गरिबांचे-लहान शेतकऱ्यांचे काय होईल?" यापेक्षा "जर सरकारच्या हातातील सत्ता जाऊन नोकऱ्या कमी होतील आणि मागासवर्गीय समाजाच्या 'सोयी'चे प्रश्नही सुटेनासे होतील," या चिंतेत पडली. परिणाम असा झाला, की वर आलेल्या या समाजानं खालच्या समाजापर्यंत राखीव जागांचे फायदे पोहोचू दिले नाहीत. शिवाय, तो खुलेपणाचा विरोधक बनला. खुलेपणामुळं खालच्या समाजातला जो उत्पादक वर्ग आहे त्याच्या उत्पादनांना योग्य किंमत मिळून त्याच्या उन्नतीचा मार्ग खुला झाला असता. ते होण्याऐवजी ठराविक लोकांनाच राखीव जागांचा फायदा मिळून सवर्णांचे चमचे तयार झाले. वीस वर्षांकरिता ठेवलेल्या राखीव जागा चाळीस वर्षांकरिता झाल्या, साठ वर्षांकरिता झाल्या. आता हे कायमचंच आहे, असं सगळे लोक धरून चाललेले आहेत. त्याला काही अंत दिसत नाही. उलट, त्यांच्या नावानं राजकारण करण्याचा प्रयत्न केला, त्यातून जी सर्व दलित समाजाची मागणी असायला पाहिजे होती, त्या मागणीला विरोध करणारे नेते तयार झाले. अशा रीतीने दलित समाजाचं अर्थकारण अस्ताव्यस्त झालं.

सर्व दलित समाजाच्या, गरिबांच्या, पीडितांच्या चळवळी खुलीकरणाच्या विरुद्ध जाताहेत. आदिवासींकरिता काम करणारे-मग त्या मेधा पाटकर असोत, की आणखी कुणी असो खुलेपणाला विरोध करणारेच आहेत. स्त्रियांच्या चळवळीचाही खुलीकरणाला विरोध आहे. बीजिंग परिषदेमध्ये त्यांनी जाहीरच केलं, की आम्हाला हे स्वातंत्र्य-बिंतत्र्य काही नको. आमचा त्याला विरोध

आहे, ही मोठी गमतीची गोष्ट आहे! आता आपण साधं तर्कशास्त्र बघूया. जे आळशी नुसतेच बसून राहतात म्हणून उपाशी राहतात, त्यांना काही आपण शोषित-पीडित म्हणू शकत नाहीत, तर ज्यांना कष्ट करून, उत्पादन करूनही श्रमाचं फळ मिळत नाही ते खरे शोषित-पिडीत. "आम्ही जे उत्पादन करतो, ते आमच्याकडून हिसकावून घेण्याची पद्धत बंद झाली पाहिजे." अशी या वर्गाची मागणी असली पाहिजे. म्हणजे, म्हणजेच खुली व्यवस्था आली पाहिजे. सर्व दलितांची मागणी स्वातंत्र्याची असली पाहिजे. गांधींनी असं म्हटलेलं आहे, की आम्ही गरिबांकरिता अमुक करू, तमुक करू असं पुष्कळ जण म्हणतात; पण त्यांच्या छातीवरून उठायला काही कुणी तयार होत नाही. दलितांचीही हीच मागणी असली पाहिजे.

मी ज्यांना गुरू मानतो असे आमचे एक मित्र आहेत. ते एकदा म्हणाले, की १९४७ ते १९५० या काळात डॉ. आंबेडकरांची घटना तयार झाली. त्या जाती मानणं हे कायदाबाह्य ठरलं. ते म्हणाले, "मी जर आंबेडकरांच्या जागी असतो तर असं कलम घटनेत घातलं नसतं. त्याऐवजी असं कलम घातलं असतं, की जातिव्यवस्था हा या देशाच्या परंपरेचा भाग असून ती चालूच राहिली पाहिजे. याचा अर्थ असा, की धातुशास्त्राच्या कॉलेजेसमध्ये फक्त तांबट, लोहार यांच्याच पोरांना प्रवेश मिळेल, ब्राह्मणांच्या पोरांना मिळणार नाही. त्यांनी त्यांचे परंपरेनुसार चालू असलेले वैद्यकी, ज्योतिषशास्त्र वगैरे व्यवसाय करावेत." माझ्या त्या मित्राचं म्हणणं असं की, "आंबेडकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी चळवळ केली त्यामुळे जातिव्यवस्था नष्ट झाली नाही. तर परंपरेने अब्राह्मणी असलेले व्यवसाय हे किफायतशीर होऊ लागल्यामुळं ब्राह्मणांनी आपले जातिव्यवाय सोडले. आता कत्तलखान्याचे प्रमुख ब्राह्मण आहेत. सवर्णांनी जातिभेद दूर करून बाकीच्यांचे व्यावसाय आपल्याकडे घेतले. आपण असं म्हणायला पाहिजे होते, की आणखी काही काळ लोकांना जातीप्रमाणेच शिक्षण व व्यवसाय संधी मिळेल." तसं झालं असतं तर, कदाचित हा विचार तुम्हाला थोडा अतिरेकी वाटेल; आहेही थोडा अतिरेकी, मला असं वाटतं, की दलितांना शिकवून, नोकऱ्या देऊन, गव्हर्नर जनरलच्या कौन्सिलमध्ये आणि विधिमंडळात जागा देऊन त्यांच्या चळवळीची धार कमी करण्यात आली. गोविंद तळवलकरांनी शरद पवारांना कोर्ड फाऊंडेशनची स्कॉलरशिप देऊन संपवून टाकलं. अशी मागं एकदा चर्चा झाली होती. दलित चळवळीमध्ये एक 'सायी'चा वर्ग तयार करून त्याला आपलंसं केलं, की सवर्णांच्या हिताचं अर्थकारण त्यांच्यावर लादता

येतं. शेतकऱ्यांच्या बाबतीतही हेच झालं. सूट-सबसडी देऊन त्यांच्यादेखील एक 'सायी'चा वर्ग तयार करण्यात आला. या 'सायी'च्या वर्गाला खुष केल्यानंतर हा वर्ग शेतकऱ्यांना विकायला तयार झाला! स्त्रियांच्या बाबतीतही हेच झालं. ज्या थोड्या स्त्रिया शिकल्या, ज्यांना नोकऱ्या मिळाल्या, ज्यांच्याकडं बोलण्याचं कौशल्य होतं, ज्यांना परिषदा किंवा परिसंवाद आयोजित करण्यासाठी निधी मिळाला त्या पुरुषवर्गाला फितून बनल्या!

राखीव जागा उपयोगी आहेत, की नाहीत याबद्दल आमच्या मनात मोठा संशय आहे. राखीव जागांच्या सवलतीनं एखाद्या गटास सामाजिक न्याय मिळण्यास मदत होते किंवा नाही याबद्दल आमच्या मनात जबरदस्त शंका आहे; तरीही आम्ही त्याला विरोध करीत नाही. मला कुणीतरी विचारलं, की तुम्ही मंडल, शिफारसींना विरोध करता का ? मी म्हणालो. मी मंडल शिफारसींना कधीही विरोध केला नाही. कारण मंडल शिफारसींना विरोध करणं हे माझ्या अभिरुचीला सोडून आहे. माझ्या नैतिकतेच्या सौंदर्याच्या कल्पनेला ते सोडून आहे. म्हणून मी विरोध करीत नाही. मंडल शिफारशींचा काहीही उपयोग नाही, हे मला माहीत आहे, तरीसुद्धा मी त्याला विरोध करीत नाही. त्याचं कारण मी एका लहानशा गोष्टीतून समजावून सांगतो.

एका आईला दोन मुले आहेत. त्यापैकी एक लंगडं आहे. पोलिओ झाल्यामुळं त्याला एक पायाने चालता येत नाही. दुसरा मुलगा सशक्त आहे. तो सगळा कारभार बघतो,आईला मदत करतो, त्याला असं वाटतं, की आपली आई अपंग मुलास नेहमी जवळ घेऊन बसते, त्याचंच कौतुक करते. त्याच्या पायाला औषध लावल्यानं तो काही बरा होणार नाही. तरीही तो मुलगा तळमळू लागला, कण्हू लागला, की आई त्याच्या पायाला अमृतांजन किंवा काहीतरी बाम वगैरे लावत बसते. त्यानं काही त्याचा पाय बरा होणार नाही; पण तरीदेखील, "आई, बाम कशाला त्याच्या पायाला लावत बसलीस ?" असं सशक्त भावानं म्हणणं हे सदूअभिरुचीला कारणामुळं मी मंडल आयोगाला विरोध करायचं टाळलेलं आहे.

बऱ्याच जणांना कदाचित माहीत नसेल; पण माझे वडील कोल्हापूरमध्ये वार लावून, माधुकरी मागून शिकले. इतक्या गरीब घरात जन्माला येऊनही मला शिक्षण करण्यात जातीचा फायदा मिळाला. जातीचा फायदा म्हणजे माझ्याला काही जीन्स वगैरे आले असा नाही; पण मी घरात लहानपणापासून काय पाहत होतो ? माझी आई सोमवारी किंवा एकादशीच्या दिवशी शिवलीलामृताचा

काहीतरी पाठ वाचताना दिसत होती. त्यामुळं अभ्यास, वाचन, पाठांतर करणं यात काहीतरी फायद्याचे आहे, अशी जाणीव एक ब्राह्मण मुलगा म्हणून माझ्या मनामध्ये तयार झाली. त्याचा मला जो फायदा मिळाला, तो मागासवर्गातल्या श्रीमंत विद्यार्थ्यालासुद्धा मिळणं शक्य नव्हतं. बाप जे करतो तेच मुलगा करायचा प्रयत्न करतो आणि आई जे करते तेच करायचा प्रयत्न मुलगी करते.

तसं करण्यात काही वाईटही नाही. सुतारीचा धंदा तोट्याचा नसता तर बापाकडनं लहानपणापासून रंधा मारण्याचं, सुतारीचं काम शिकलेला मुलगा कुटुंबपरंपरेनं कदाचित, अधिक कुशल सुतार बनला असता; पण सुतारकामातून काही सुटत नाही, शेतीतून काही सुटत नाही. फक्त नोकरीतच अर्थ आहे, असं लक्षात आल्यानंतर सगळे नोकऱ्यांच्या मागे लागले आणि त्यासाठी आलेल्या शिक्षणपद्धतीत ब्राह्मणेतर मागे पडले. जर शाळेतला पहिला धडा 'ग गणेशाचा' ऐवजी एक लाकूड घ्या आणि रंधा मारून ते सरळ करून दाखवा. असा असता तर मी मागे पडलो असतो आणि बाकीच्या व्यवसायातली मुलं पुढं गेली असती. इथं वापरण्यात आलेली शिक्षणाची पद्धत केवळ सवर्णांच्या सोयीची होती. काहीही झालं तरी ब्राह्मणी विद्येमध्ये वेगळं सामर्थ्य आहे. तर्कशास्त्र, गणित यासाठी लागणारी बौद्धिक तयारी त्यांच्याकडे होती. मी काही शिक्षणशास्त्रात जात नाही; पण ब्राह्मण घरात जन्मल्यामुळं मला मोठा फायदा मिळाला एवढं निश्चित. तो फायदा इतरांना मिळाला नाही. म्हणून त्यांना कृत्रिमरीत्या काही दुसरे फायदे देण्याचा प्रयत्न करण्यात आला, तर ते फायदे नाहीत हे माहीत असूनसुद्धा अपंग नसलेला मोठा भाऊ म्हणून त्यांच्यावर टीका करणं हे सद्अभिरुचीला सोडून आहे, असे मी मानतो.

भटाच्या जागी जर कुणब्याचं पोरगं कारकून म्हणून आलं तर ते चांगलं वागेल, असं महात्मा फुले यांचं म्हणणं होतं; पण आमचा अनुभव असा आहे, की कुणब्याचं पोरगं कारकून झाल्यानंतर भट कारकून परवडला; कुणी नको असं म्हणायची वेळ आली. अशा तऱ्हेनं आपण एखाद्याला खुर्चीवर आणून बसवतो तेव्हा त्या माणसाचं महत्त्व वाढवण्याऐवजी खुर्चीचंच महत्त्व कमी होत जातं.

पूर्वी अमेरिकेमध्ये डाऊनटाऊनमध्ये म्हणजे, शहराच्या मध्यभागी राहाणं प्रतिष्ठेचं मानलं जात असे. वॉशिंग्टनमध्ये सत्तेची स्थानं राहत असतं. वॉशिग्टनच्या मध्यभागी राहणं मोठ्या सन्मानाचं समजलं जात असे. म्हणून मग सरकारनं तिथल्या निग्रो लोकांना शिकवून, अधिकार देऊन, मदत करून, नोकऱ्या देऊन

ते प्रतिष्ठितांच्या वस्तीत, डाऊनटाऊनमध्ये जाऊन राहतील अशी व्यवस्था केली. निग्रो मंडळी प्रतिष्ठेसाठी डाऊनटाऊनमध्ये सोडून सबर्बमध्ये जाऊन राहू लागली. आज अमेरिकेमध्ये असं चित्र आहे, की डाऊनटाऊन म्हणजे निग्रो वस्तीचा-बेकार वस्तीचा भाग आणि सगळी मोठी माणसे सबर्बमध्ये राहताहेत. याचा अर्थ असा, की अशा तऱ्हेनं कृत्रिमता तयार केली तर त्यातून खुर्चीचं महत्त्व कमी होत जातं, त्या जागेचं महत्त्व कमी होत जातं.

ज्या दिवसांपासून सरकारी नोकऱ्यांचे महत्त्व कमी होण्यास सुरुवात झाली, सरकारचं महत्त्व कमी होण्यास सुरुवात झाली, तेव्हापासून सवर्णांनी तिथून बाहेर पडण्यास सुरुवात केली. आता मागासवर्गीय तिथे जाताहेत. आता खरी आर्थिक सत्ता जिथे तयार होते आहे, तिथं सवर्ण जाताहेत. आज परदेशामध्ये जाऊन राहिलेल्यांमध्ये सवर्णांची संख्या सर्वांत जास्त आहे. ते पुन्हा एकदा सत्ता चालवायला येणार आहेत. दिल्लीला मंत्रालयामध्ये राहून आपल्या हाती सत्ता येईल असं जर दलितांना, मागासवर्गीयांना वाटत असेल, तर तो त्यांचा भ्रम आहे. हीच गोष्ट महिला आणि शेतकऱ्यांनाही लागू आहे. आर्थिक प्रश्नाला हात न घालता, कुणाचीही परिस्थिती सुधारण्याचा प्रयत्न केला, तर सुधारणेचा फक्त भास तयार होतो. त्याचा फायदा एकाच वर्गाला मिळतो. काही वेळा तर ते विपर्यस्त होतं. एक इंदिरा गांधी पंतप्रधान झाल्या की नाही ? हा युक्तिवाद काही स्त्रियांच्या दृष्टीनं मला योग्य वाटत नाही. हेच जर तुमचं उद्दिष्ट असेल, तर मला काही म्हणायचं नाही. काही बायका आमदार-खासदार झाल्यामुळे समस्त स्त्रीवर्गाचं भलं झालं, त्यांनी आपल्या मागं असलेल्या बायकांसाठी काही केलं, अशी जर काही संगती तुम्ही दाखवून दिली, तर ते मानणे शक्य आहे. वर गेलेले शेतकरी बाकीच्या शेतकऱ्यांना योग्य भाव मिळू नये म्हणून प्रयत्न करतात, नोकरीत गेलेले दलित खालच्या वर्गाला मदत करण्याऐवजी त्यांचे धंदे सुधारू नयेत म्हणून प्रयत्न करतात... अशा परिस्थितीत 'काही लोक तरी वर गेले की नाही?' हा युक्तिवाद मला योग्य वाटत नाही.

काँग्रेसची स्थापना पहिल्यांदा कुणी केली? हिंदुस्थानातील शहरांमध्ये उद्योगधंदे करणाऱ्या एतद्देशीय लोकांनी पहिल्यांदा अशी मागणी केली, की आयसीएसमध्ये आमच्या जास्त लोकांची सोय असली पाहिजे, आयसीएसमधल्या अधिकाराच्या जागा हिंदुस्थानातल्या लोकांना मिळाल्या पाहिजेत. तुम्ही कार्यक्षम असला, तरी शेवटी तुम्हाला राज्य आमचं चालवायचंय आणि त्यासाठी तुम्ही आमच्या काही लोकांना घेतलं पाहिजे. या एतद्देशीय लोकांचा हेतू काही राज्य चांगलं

चालवावं आणि देशाचं भलं व्हावं, असा नव्हता; आपल्यातल्या काही लोकांना उड्या मारून, सत्ताधाऱ्यांच्या बरोबरीनं बसता यावं, एवढाच हेतूनं त्यामागं होता.

आजसुद्धा राखीव जागांचं भांडवल करून, आरडाओरड करणाऱ्यांचा हेतू यापेक्षा काही वेगळा असू शकत नाही.

(शब्दांकन : श्री. रमेश राऊत, औरंगाबाद.)

(६ सप्टेंबर १९९९)

◆◆

स्त्रियांसाठी राखीव जागा

(स्वतंत्र भारत पक्ष जाहीरनामा लेखांक : ४)

स्त्रियांचं जे काही शोषण होतं, त्याची एक वेगळी रचना आहे. ब्राह्मण हा हरिजनांवर अत्याचार करतो; पण त्याबरोबरच आपल्या घरात ब्राह्मणीवरही अत्याचार करतो आणि ब्राह्मण हरिजनांवर जो अत्याचार करतो, त्या अत्याचारात ब्राह्मणीचाही थोडाफार हात असतो. हरिजन पुन्हा आपल्या घरामधल्या दलित स्त्रीवर म्हणजे बायकोवर अत्याचार करतो. अशी ही विचित्र रचना आहे. त्यामुळं राखीव जागांची कल्पना स्त्रियांच्या बाबतीत विशेष अप्रस्तुत आहे. कारण इतिहासामध्ये सर्व स्त्रिया एका बाजूला आणि सर्व पुरुष दुसऱ्या बाजूला असा कुठलाही संघर्ष झालेला नाही. १९२० ते १९४० या काळातील स्त्रीमुक्तीवादी अमेरिकन महिला पुढाऱ्यांनी एका बाजूला सगळ्या शोषित स्त्रिया आणि दुसऱ्या बाजूला पुरुषसत्ताक व्यवस्था अशी मांडणी केलेली आहे. सगळे पुरुष मिळून सगळ्या स्त्रियांना पायदळी तुडवतात, त्यांना गुलाम बनवतात, अशी त्यांची मांडणी आहे. त्यांचा आधार मार्क्स, एंगल्स होता. एकदा सगळ्या स्त्रियांना वर्ग म्हटलं, की मग भांडवलदारांच्या ऐवजी पुरुष आणि मजुरांच्या ऐवजी स्त्रिया म्हटलं, की झालं शास्त्र तयार! प्रत्यक्षात इतिहासामध्ये स्त्रिया विरुद्ध पुरुष असा संघर्ष कधी झाला नाही. कारण सगळा इतिहास नाही, तर जीवशास्त्राचाही इतिहास आहे. अर्थशास्त्रीय संबंधांपेक्षा स्त्री-पुरुषांतील जीवशास्त्रीय संबंध अधिक प्रभावी असल्यामुळे समाजामध्ये त्या संबंधांना जास्त महत्त्व मिळतं. जेव्हा-जेव्हा स्त्रियांचे हितसंबंध आणि पुरुषांचे हितसंबंध यांच्यामध्ये संघर्ष झाला, तेव्हा तेव्हा स्त्रीप्रधान व्यवस्था विरुद्ध पुरुषप्रधान व्यवस्था असं त्याचं स्वरूप होतं.

कॉ. शरद पाटील यांनी असं म्हटलेलं आहे, की 'रावण' ही श्रीलंकेतील स्त्रीप्रधान व्यवस्था होती आणि 'राम' ही भारतातील पुरुषप्रधान व्यवस्था होती.

म्हणून तर रामाचं एवढं कौतुक! आणि सीतेनं त्याच्यापुढे हात जोडून उभं राहायचं! पण जर असं गृहीत धरलं, तर या दोघांच्या राज्यातल्या स्त्रिया एकत्र झाल्या आणि राम-रावण एकत्र येऊन, त्यांच्याशी लढले, असं कधी झालं नाही. राम हा सीतेवर अन्याय करीत असला, तरी सीता त्याच्या बाजूलाच राहते. युद्ध राम व रावण यांचंच होतं. चांदवडच्या शेतकरी महिला अधिवेशनामध्ये आपण अशी मांडणी केली, "जितांच्या व जेत्यांच्या - दोघांच्याही स्त्रिया सारख्याच दु:खी असतात. म्हणून 'इंडिया' व 'भारत' यांच्यात जरी संघर्ष असला, तरी इंडिया व भारतामधल्या स्त्रिया या एकमेकांच्या सख्या असू शकतात." अशी आपण मांडणी केली; पण ती चुकीची ठरली. जे जिंकलेले असतात, तेही आपल्या बायांना भरडतात; मग दोन्हीकडच्या दु:खी बायकांनी एकत्र यायला काय हरकत आहे ? यात चूक अशी आहे, की जीवशास्त्रीय संबंध हे अधिक महत्त्वाचे असतात. स्त्री ही वेगळी जात नाही हे लक्षात घेतलं तर मग स्त्रियांसाठी मांडलेल्या राखीव जागांच्या तर्कशास्त्राला काहीच अर्थ उरत नाही; तरीही आपण चांदवडच्या अधिवेशनामध्ये स्त्रियांनी पंचायत राजच्या शंभर टक्के जागांवर उभे राहावे असा ठराव संमत केला; वीस टक्के राखीव जागांची मागणी नाही केली. याचं कारण असं, की स्त्रियांनी वीस टक्के राखीव जागा मागण्याऐवजी शंभर टक्के जागा लढवणं, हे अधिक क्रांतिकारी पाऊल ठरतं. चांदवडची मागणी अशी आहे, की स्त्रियांना पुरुषांपेक्षा श्रेष्ठ व्हायचं नाही. त्यांना माणसासारखं वागवलं गेलं पाहिजे, अशी आपली मागणी आहे. मुलगी म्हणून जन्माला आली म्हणून तिच्यावर काही विशिष्ट जीवनशैली लादली जाऊ नये, अशी आपली मागणी आहे.

स्त्रियांमध्ये हजारो वर्षांपासून नसलेलं धाडस कसं आणता येईल, हा प्रश्न आहे. फक्त महिला आघाडीच्या नेत्या व कार्यकर्त्यांकरिता आंबेठाणला एक शिबिर घ्यायचा माझा विचार आहे. या शिबिरामध्ये काय-काय विषय असणार आहेत? पहिली गोष्ट अशी, की सगळ्यांना महिनाभरात कामचलाऊ का होईना; पण इंग्रजी बोलता आलं पाहिजे. दुसरी गोष्ट अशी, की सर्वांना मोटारगाडी चालवता आली पाहिजे. या दोन्ही गोष्टींचा माणसाच्या आत्मविश्वासावर मोठा परिणाम होतो. तिसरी गोष्ट म्हणजे मी सर्वांकडून सॉमरसेट मॉमच्या किमान दहा कथा वाचून घेईन. शेतकरी महिला आघाडीची महिला चळवळ ही जनआंदोलनाची चळवळ आहे. कुणाला सासूनं मारलं, कुणी आत्महत्या केली, कुणी जळाली असे वैयक्तिक प्रश्न सोडवण्यात शक्ती वाया जाते आणि आंदोलनावर

त्याचा वाईट परिणाम होतो. त्यापेक्षा, महिलांना संघटित करणे जास्त महत्त्वाचे आहे. दारूबंदीवर माझा विश्वास नाही. माणसाची काय नैतिकता असेल, ती त्याची त्यानं बघावी. दारूबंदी करणं हे काही सरकारचं काम नाही; पण त्या रागाचा उपयोग करून, त्यांना बाहेर येऊन दारूदुकानाला कुलूप लावण्याचं काम करू द्या. काही येत नसलं, तरी तुम्ही लाऊडस्पीकरसमोर उभं राहून, चार ओळी बोला. निवडणुकीला उभं राहा. जिंकणं-हारणं ही गोष्ट महत्त्वाची नाही, उभं राहणं ही गोष्ट महत्त्वाची आहे.

स्त्रियांना निवडणुकांमध्ये तीस टक्के राखीव जागा दिल्या, की जो प्रश्न दलितांच्या बाबतीत निर्माण झाला, तोच प्रश्न स्त्रियांच्या बाबतीतही निर्माण होईल. पाणी भरायचं काम पुरुष करीत नसल्यामुळे गावातल्या पाणीपुरवठा योजना मागे राहतात. धुरानं भरलेल्या स्वयंपाकघरात डोळे झोंबत असताना स्वयंपाक करावा लागत नसल्यामुळं पुरुषांना इंधनाचा प्रश्न सोडवण्यात स्वारस्य नसतं. आपण या ज्या तीस टक्के राखीव जागांमधून महिला निवडून देत आहोत, त्या या प्रश्नांकडे स्त्रियांच्या दृष्टिकोनातून पाहतील अशी माझी अपेक्षा होती; मी अजूनही तो नाद सोडलेला नाही. अलीकडेच मी महाराष्ट्राच्या जिल्ह्याजिल्ह्यामध्ये जाऊन, स्वातंत्र्याच्या ५० वर्षांबद्दल स्त्रियांचा काही वेगळा दृष्टिकोन आहे का, ते विचारीत फिरलो. तसा काही वेगळा दृष्टिकोन असावा, असं मला वाटतं. मी अजून त्याचा शोध घेत आहे. माझ्या असं लक्षात आलं, की स्त्रियांच्या चळवळीमध्ये काम केलेल्यांचे काही किरकोळ अपवाद वगळता निवडून गेलेल्या स्त्रिया 'सासू' बनतात; अगदी पैसे खाण्यातसुद्धा कमी नाहीत, भ्रष्टाचारातही मागं नाहीत.

थोडक्यात, राखीव जागा ही काही महत्त्वाची गोष्ट नाही. त्याऐवजी, स्त्रियांना शंभर टक्के जागांवर निवडणूक लढवायला लावणं महत्त्वाचं आहे. राखीव जागांचा परिणाम असा झाला, की पुढारी आपल्याच घरातल्या स्त्रियांना निवडणुकीमध्ये उभे करू लागले. दुर्दैवानं, अनेक ठिकाणी असं झालं, की स्त्रिया अध्यक्ष-सभापती झाल्या, तरी त्यांचे नवरे शेजारी बसतात आणि कारभार चालवतात. त्या स्त्रिया फक्त बसलेल्या असतात. याबाबतीत आपण राबडीदेवींना अगदी वाकून नमस्कार केला पाहिजे! राबडीदेवी ही सबंध हिंदुस्थानातली सर्वाधिक कर्तबगार बाई आहे! या बाईनं संसारातून बाहेर पडून, बिहारचं राज्य जितकं व्यवस्थित चालवलं, तितकं लालूप्रसाद यादव यांनासुद्धा चालवता आलं नाही. ही गोष्ट सगळेजण मान्य करतात. म्हणजे सत्तेकडं जाताना मुळातली

स्त्री ही पुरुष बनून जाते आणि त्यामुळं तिचा स्त्रियांसाठी काही उपयोग राहत नाही. दलित हा सत्तेच्या खुर्चीवर पोहोचेपर्यंत 'ब्राह्मण' बनत असेल, तर त्याचा दलितांसाठी काही उपयोग होत नाही. राखीव जागांमुळं, कदाचित, दलितांचं थोडंफार भलं होत असेल; ज्यांच्या घरात कधीच सत्ता आली नाही, त्यांना कदाचित सत्तेचा स्पर्श होत असेल; पण स्त्रियांचा तेवढाही फायदा होत नाही. कारण ज्यांच्या हाती सत्ता येते, त्यांच्या कुटुंबाला आधीच सत्तेचा संपर्क झालेला असतो. त्याचा परिणाम असा होतो, की सत्तेचं विकेंद्रीकरण होत नाही. हे सगळं खरं असलं, तरी 'स्वतंत्र भारत पक्ष' दलितांच्या राखीव जागांप्रमाणेच स्त्रियांच्याही राखीव जागांना विरोध करू इच्छीत नाही.

जे दलितांच्या बाबतीत झालं, तेच स्त्रियांच्याही बाबतीत. ज्या शिकल्या, ज्यांना नोकऱ्या मिळाल्या, ज्यांना परिसंवाद-परिषद घेण्यासाठी निधी मिळाले त्या नेत्या बनल्या आणि स्त्रियांना स्वातंत्र्य मिळणं महत्त्वाचं नाही असं म्हणू लागल्या किंवा एकूणच स्वातंत्र्य येणं महत्त्वाचं नाही, असं म्हणू लागल्या. कृत्रिमरीत्या वर चढवलेली महिला शेवटी सुनेपासून सासू होते आणि सासू झाल्यानंतर काही तिला सुनेचे दिवस आठवत नाहीत.

स्वतंत्र भारत पक्षानं स्त्रियांच्या राखीव जागांबद्दल एक भूमिका घेतली. त्यासंदर्भात निवेदनं केली, पंचवीस-तीस पानांचा एक दस्तऐवज तयार केला आणि गीता मुखर्जींपासून प्रमिला दंडवतेंपर्यंत सर्व मोठमोठ्या नेत्यांपर्यंत पोचवला. आमच्या असं लक्षात आलं, की या सर्व भारतीय पातळीवरच्या नेत्यांना ज्या तऱ्हेनं राखीव जागांची अंमलबजावणी होणार आहे, त्याच्या भयानक परिणामांची कल्पनासुद्धा नाही. गीता मुखर्जींना मी स्वत: समजावून सांगितलं आणि मला असं वाटलं, की त्यांना ते समजलं; पण त्या म्हणाल्या, की चिठ्ठ्या टाकून राखीव जागा ठरवण्याची तरतूदच त्या बिलामध्ये नाही. जिथं एकूण मतदारसंघांना तिनानं भाग जात नसल्यामुळं काही अवशेष उरतो, त्या जागांसाठीच फक्त चिठ्ठ्या टाकण्यात येणार आहेत. सुदैवाने, त्या समितीचे सदस्य असलेले दुसरे खासदार जयंत मल्होत्रा शेजारीच बसले होते. ते म्हणाले, "नाही, तशी तरतूद आहे. सर्वच राखीव जागा चिठ्ठ्या टाकून ठरवण्यात येणार आहेत."

दलितांकरिता राखीव मतदारसंघ ठरवताना कोणत्या मतदारसंघात जास्तीत जास्त दलित, आदिवासी आहेत ते पाहून निर्णय घेण्यात आला; पण बायकांचं तसं काही नाही. सर्वच मतदारसंघांमध्ये बायका ४८-४९ टक्के आहेत. हिंदुस्थानसारख्या देशात पन्नास टक्क्यांपेक्षा कमी असतात. काही मतदारसंघात

स्त्रिया कमी आहेत अशी काही परिस्थिती नाही; मग स्त्रियांसाठी कोणते मतदारसंघ राखीव करायचे, असा प्रश्न निर्माण झाला. तेव्हा महाराष्ट्राचे (तत्कालीन) मुख्यमंत्री शरद पवार यांनी एक युक्ती काढली. त्यांच्या कल्पनेला तेव्हाही आम्ही विरोध केला होता. त्यांनी अशी कल्पना काढली, की १/३ जागा येणाऱ्या निवडणुकीमध्ये राखीव ठेवल्या जातील, उरलेल्या २/३ जागांपैकी निम्म्या जागा पुढच्या निवडणुकीमध्ये आणि उरलेल्या जागा त्याच्या पुढील निवडणुकीमध्ये राखीव राहतील. अशा तऱ्हेनं हे चक्र चालू राहील.

या पद्धतीला स्वतंत्र भारत पक्षानं कडाडून विरोध केला. ज्यांना निवडणुकीचा अनुभव आहे, त्यांना फार काही सांगायची गरज नाही. या पद्धतीमुळे ज्या ठिकाणी लायक स्त्रिया आहेत, ते मतदारसंघ राखीव नाहीत असं होऊ शकतं आणि जे मतदारसंघ राखीव आहेत त्या मतदारसंघात लायक स्त्रिया नाहीत, असंही होऊ शकतं. मतदारसंघ राखीव झाला, की पुरुष पुढारी आपल्याच घरातील स्त्रियांना तिथं नेमतात, असाही आपला अनुभव आहेच; पण त्याहीपेक्षा महत्त्वाची एक गोष्ट आहे- समजा, एका मतदारसंघात एक चांगला पुरुष कार्यकर्ता आहे. त्यानं पाच-दहा वर्षे चांगलं काम केलं आणि नेमका त्याचाच मतदारसंघ स्त्रियांसाठी राखीव झाला, तर त्याची उमेदीची पाच-दहा वर्षे फुकट जाणार. कारण तो काही दुसऱ्या मतदारसंघातून उभा राहू शकणार नाही. आम्ही अलीकडेच मुलताईला गेलो होतो. तिथं शेतकरी आंदोलन करणारे डॉ. सुनीलम् म्हणाले, की त्यांनी निवडणुकीची तयारी करण्यासाठी २०२ शेतकरी संघर्ष समित्या तयार केल्या. आंदोलन चालवलं. मी त्यांना म्हणालो, तुम्ही एवढं सगळं केल्यानंतर पुढच्या वर्षी तुमचा मतदारसंघ राखीव केला तर ? ते काही निवडणूक लढवू शकले नसते. या गोष्टीमुळे स्त्रियांविषयी, त्यांच्या चळवळीविषयी सहानुभूती बाळगणारे पुरुषसुद्धा त्यांचा द्वेष करू लागले आहेत. शरद यादव असं म्हणाले, "स्त्रियांसाठी राखीव जागा ठेवण्याचं काही कारण नाही. कारण आजही लांडे केस कापणाऱ्या स्त्रियांचं लोकसभेतलं प्रमाण त्यांच्या जनसंख्येच्या प्रमाणात जास्त आहे." म्हणजे लांडे केस कापणाऱ्या स्त्रिया हा सायीच्या थराचाच भाग झाला. बरं, मुळात आपल्या देशात पुरुषांच्या मनात स्त्रियांबद्दल राग आहे अशातलाही काही भाग नाही. अटलबिहारी वाजपेयी कित्येक वर्षांपासून राजकारणात आहेत आणि त्यांच्या मते, जी काही देशसेवा आहे, ते ती करताहेत; तरीही सोनिया गांधी यांच्या सभेला जेवढी गर्दी होते, तेवढी अटलबिहारी वाजपेयी यांच्या सभेला जमत नाही. यावरून, राजकारणामध्ये लोकांच्या मनात

स्त्रियांच्या विरुद्ध फार मोठा राग आहे, असं दिसत नाही.

आणखी एक गोष्ट अशी, की समजा एका राखीव मतदारसंघातून एक बाई निवडून आली, तर तिला माहीत असेल, की आपला मतदारसंघ पुढच्या वेळी राखीव असणार नाही. मग कशाला लोकांची कामं करायची? कशीतरी पाच वर्षे काढायची आणि त्यातल्या त्यात काही कमाई करता आली, तर करायची असाच तिचा दृष्टिकोन असणार. दुसऱ्या मतदारसंघातून निवडणूक लढवायची म्हटलं, तर कोणता मतदारसंघ राखीव होईल ते सांगता येत नाही! पुरुष लोकप्रतिनिधींचीही मनःस्थिती अशीच असणार. तोही विचार करणार, की पुढच्या वेळी या मतदारसंघातून निवडणूक लढवता येण्याची शक्यता फक्त पन्नास टक्के आहे. पन्नास टक्के तर राखीव होण्याची शक्यता आहे. मग मी कशासाठी काम करू? जुन्या आमदार आणि खासदारांपैकी फक्त १/३ लोकच पूर्वीच्या मतदारसंघातून निवडणूक लढवू शकतील. त्यांच्यातले निम्मे लोक विजयी झाले असं गृहीत धरलं; तरी कोणत्याही लोकसभेमध्ये फक्त १/६ म्हणजे १६% खासदार जुने असतील. म्हणजे अनुभवी, अभ्यासू खासदार ही गोष्टच संपुष्टात येणार. गीता मुखर्जी या कम्युनिस्ट आहेत. त्यांनी एक पत्रक काढलंय. त्यात त्यांनी असं म्हटलेलं आहे, की चिठ्ठ्या टाकून मतदारसंघ निवडण्याच्या पद्धतीमुळे आपल्या मतदारसंघात कुणी काम करणार नाही आणि जुने १/६ लोकच पुन्हा निवडून येतील. हा युक्तिवाद वावदूक आहे. त्या पुढे असं म्हणतात, "लोकप्रतिनिधी आपापल्या मतदारसंघाची सेवा काही पुन्हा निवडून येण्यासाठी करीत नाहीत; तर आपल्या देशाकरिता, कर्तव्याच्या भावनेपोटी ते आपापल्या मतदारसंघाची सेवा करतात." असला बाष्कळ युक्तिवाद करणाराला उत्तर देण्याचं काही कारण आहे, असं मला वाटत नाही. याच्यापलीकडे जाऊन गीताबाई म्हणतात, "लोक फक्त आपल्याच मतदारसंघातून निवडून येतात असं थोडंच आहे; दुसऱ्या मतदारसंघातून निवडून येणारे काय थोडे आहेत? इंदिरा गांधी कर्नाटकात जाऊन चिक्कमंगळूर मतदारसंघातून निवडून आल्याच ना?"

मला असं वाटतं, की अशा तऱ्हेचा युक्तिवाद करणाऱ्या स्त्रिया या स्त्रीचळवळीच्या शत्रू आहेत. स्त्रियांसाठी आपण काही बोलत नाही; पण चिठ्ठ्या टाकून राखीव जागा ठरणार असतील, तर ते केवळ स्त्रीचळवळीलाच नव्हे, तर सबंध देशाला आणि लोकशाहीलाच विनाशक ठरणार आहे. त्यामुळे मला चिठ्ठ्या टाकून राखीव जागा ठरवण्याची पद्धत मान्य नाही. यावर ते असा युक्तिवाद करतात, "तुमचा स्त्रियांना राखीव जागा द्यायलाच विरोध आहे; पण

तुम्ही सरळ सरळ तसं न करता, वेगळ्या मार्गानं विरोध करता; पण खरंच यातून काही मार्ग निघू शकतो का?"

आम्ही एक मार्ग सुचवला. तो असा, की प्रत्येक मतदारसंघातून तीन प्रतिनिधी निवडले जावेत. प्रत्येक मतदाराला तीन मतांचा अधिकार असावा. मतदारांनं एक मत स्त्री उमेदवारालाच द्यावं. बाकीची दोन मतं कुणाला द्यायची ती द्यावीत; पण एक मत स्त्री उमेदवाराला दिलंच पाहिजे. मतमोजणीत ज्यांना सर्वांत जास्त मतं मिळतील ते पहिले दोघे पुरुष असोत, स्त्री असोत जनरल सीटवर निवडून आलेत असं समजावं. त्यानंतर महिला उमेदवारांमध्ये सर्वांत जास्त मतं ज्या महिलेला मिळाली असतील, ती राखीव जागेवर निवडून आली असं समजावं.

याचा फायदा बराच होईल. १/३ मतदारसंघ राखीव केले, की स्त्रियांना मतं मिळण्याची शक्यताही १/३ च निर्माण होईल. संयुक्त मतदारसंघ तयार केले तर स्त्रियांना ५० टक्क्यांपर्यंत जागा मिळण्याची शक्यता निर्माण होईल. ही अत्यंत शास्त्रीय पद्धतीची वैकल्पिक मांडणी आहे. पाळीपाळीने राखीव जागा ठरवण्याच्या पद्धतीतील साऱ्या दोषांपासून ही पद्धत मुक्त आहे. या पद्धतीत मतदारसंघ फारच मोठ्या आकाराचे होतील हे खरे; पण विस्तृत मतदारसंघ हा अप्रत्यक्षपणे फायद्याचा ठरण्याची शक्यता आहे. उमेदवाराचे आजपर्यंतचे काम व गुणवत्ता, त्याने ऐनवेळी उठवलेल्या प्रचाराच्या धुमाळीपेक्षा जास्त महत्त्वाचे ठरतील. एका मतदारसंघातून अनेक प्रतिनिधी निवडून देण्याच्या पद्धतीमुळे मतदारांना आपल्या मताचा अधिकार अधिक चांगल्या तऱ्हेने वापरता येईल. सध्याच्या पद्धतीत मतदारांना उमेदवार किंवा पक्ष स्वीकारणे किंवा नाकारणे यापलीकडे काही मार्ग राहत नाही. नव्या पद्धतीत तो आपली तीन मते वेगळे पक्ष आणि वेगवेगळे उमेदवार यांत वाटून देऊ शकेल.

स्त्रियांसाठी राखीव जागांची मागणी आहे ना? मग, केंद्रानेही, शरद पवारांनी पंचायत राज्यसाठी वापरलेलं 'मॉडेल' उचललं!

तीन उमेदवार निवडून येतील असे संयुक्त मतदारसंघ तयार करावयाच्या शेतकरी महिला आघाडीच्या सूचनेच्या संदर्भात एक आक्षेप असा घेण्यात आला, की लोकसभेचे तीन मतदारसंघ एकत्र केले, तर तो फार मोठा मतदारसंघ होईल. अवाढव्य मतदारसंघ होईल. प्रचार करायला सर्व गावांमध्ये जाता येणार नाही. खरं आहे; पण मला काही हा तोटा आहे असे वाटत नाही. उलट त्यामुळं निवडणुकीवर होणारा खर्च कमी होईल.

किंबहुना स्वतंत्र भारत पक्षाच्या जाहीरनाम्यातील 'निवडणुकीच्या सुधारणा' या भागात निवडणुकीच्या खर्चासंबंधी आपली सूचना अशी आहे, की निवडणूक जाहीर झाली आणि उमेदवारांनी अर्ज भरले, की प्रचार बंद. मग त्यानंतर १४ दिवसांच्या ऐवजी ८ दिवसांत तुम्ही जाहीर करा, की अमुक उमेदवार आहेत, वैयक्तिक भेटीगाठी घ्या; पण सार्वजनिक प्रचारसभा, लाऊडस्पीकर हे सगळं बंद करायचं. म्हणजे ५ वर्षे तुम्ही काय काय करता, या आधाराने निवडणूक होईल आणि दुसरे म्हणजे निवडणुकीला पैसे लागतात म्हणून होणारा भ्रष्टाचार थांबेल. तेव्हा, जर मोठा मतदारसंघ झाला, तर सगळ्या गावांना जाण्याचा प्रयत्नही कुणी करणार नाही.

तीन मतदारसंघ एकत्र झाल्यामुळे मतदारसंघ मोठा होतो; म्हणून अडचण होणार असेल तर त्यावरही पर्याय आहे.

१९७१ मध्ये इंदिरा गांधी पंतप्रधान असताना घटनेमध्ये एक दुरुस्ती करण्यात आली. चर्चा अशी झाली, की लोकसंख्या वाढते आहे, काही राज्यांची जास्त जोरात तर काही राज्यांची कमी. लोकसंख्येच्या प्रमाणात जर खासदारांची संख्या ठेवली गेली, तर काही राज्यांच्या खासदारांचे लोकसभेत प्रमाण वाढेल आणि जे बेजबाबादारीने लोकसंख्या वाढू देतात, त्यांचेच प्रभुत्व राजकारणात वाढेल. तेव्हा इंदिरा गांधींनी घटना दुरुस्ती सुचवली, ती अशी, की २००१ सालापर्यंत लोकसंख्या कितीही आणि कशीही वाढो सध्याची जी खासदारांची संख्या आहे, ती कायम राहील. आता २००१ साल जवळ आलं, तेव्हा आता काय करता? त्या वेळी ३-४ लाखांचे जे मतदारसंघ असायचे, ते आता १४-१५ लाखांपर्यंत गेलेले आहेत. तेव्हा २००१ साली ५४२ च्या ऐवजी त्यावेळच्या लोकसंख्येच्या प्रमाणात निदान १२०० खासदारांची लोकसभा तयार करायला लागणार आहे. सध्या अडचण करायला लागणार आहे. सध्या अडचण अशी आहे, की दिल्लीच्या सभागृहात ५४८ पेक्षा जास्त सभासद बसू शकत नाहीत. हे तिथल्या लोकांनी सांगितल्यामुळे इंदिरा गांधींनी हे बंधन आणलंय, नाहीतर नवीन पार्लमेंट बांधावं लागेल! १२०० हा काही फार मोठा आकडा नाही; चीनमध्ये २४०० खासदार बसतील असं सभागृह आहे. तेव्हा, जर मतदारसंघ वाढणार अशी भीती वाटत असेल, तर सध्याचे मतदारसंघ कायम ठेवून त्याच्यात तीन जागा देता येतील. म्हणजे मतदारसंघाची भौगोलिक व्याप्ती न वाढवता, चिठ्ठ्या न टाकता स्त्रियांना राखीव जागा देण्याची व्यवस्था करता येते.

महत्त्वाचं म्हणजे, लोकसभा व विधानसभांमये प्रतिनिधित्व मिळाले यासाठी स्त्रियांना राखीव जागा देण्याचा प्रश्न आहे, मतदारसंघ देण्याचा नाही. प्रत्येक मतदारसंघातल्या तीन जागांपैकी एक जागा ही महिलांकरिता राखीव; पण बाकीच्या दोन जनरल जागांवर त्या निवडून येऊ शकतात.

संयुक्त मतदारसंघात प्रत्येक मतदार तीन, ट्रान्स्फरेबल मतांचा अधिकार देऊन या प्रश्नावर अशा तऱ्हेने समाधानकारक तोडगा निघू शकतो.

(शब्दांकन : श्री. रमेश राऊत, औरंगाबाद.)

(२१ ऑगस्ट २०००)

◆◆

समान नागरी कायदा

(स्वतंत्र भारत पक्ष जाहीरनामा लेखांक : ५)

इस्लाम हा आंतरराष्ट्रीय धर्म आहे; तर हिंदू हा एकराष्ट्रीय धर्म आहे. नेपाळ आणि अनिवासी भारतीय सोडल्यास, हिंदू हा एका राष्ट्राचा धर्म आहे. मुसलमान समाजामध्ये ज्या काही चालीरीती आहेत, त्या त्यांच्या धर्मग्रंथात सांगितल्यानुसार आहेत. मुसलमान समाजात मुलगी कन्यादान किंवा संस्कार म्हणून दिली जात नाही, तर लग्न हा करार आहे. त्या करारामध्ये लग्नाच्या अटी ठरतात. मुलाला काय द्यायचं, बायकोला टाकून दिलं तर तिला काय द्यायचं, अशी कराराची पद्धत आहे. मुलीला वारसाचा हक्क जास्त स्पष्टपणे दिलेला आहे. राष्ट्रीय मुसलमान असं म्हणतात, "राजकीय प्रश्नांच्या बाबतीत आम्ही भारतीय आहोत, या राष्ट्राशी आमची निष्ठा आहे; पण जे प्रश्न राजकीय नाहीत, ज्या प्रश्नांचा सरकारशी संबंध नाही, ज्या प्रश्नांचा संबंध अल्लाशी आहे, त्या संदर्भात तुम्ही नियम करू नका. आम्हाला जे ग्रंथ पवित्र वाटतात त्या ग्रंथांप्रमाणे वागण्याची मुभा आम्हाला असली पाहिजे." आणि हिंदुत्ववाद्यांना या कल्पनेचा मोठा राग आहे. ते असं म्हणतात, "मुसलमान आमचे कायदे का मानत नाहीत? एका राष्ट्रातल्या सगळ्या लोकांचा समान नागरी कायदा असायला काय हरकत आहे?" याला मुसलमानांचं उत्तर असं आहे, "आम्ही तुमचे बाकीचे सगळे कायदे मानतो; पण नैतिकतेच्या प्रश्नावर आम्हाला अल्लाच्या दरबारात उत्तर द्यायचं आहे. तेव्हा त्याच्या शब्दाप्रमाणे जी काही नीतिमत्ता ठरलेली असेल, त्यानुसार आम्ही वागू."

या याच्यात थोडा भामटेपणा आहे. भामटेपणा असा, की कुराणामध्ये काही फक्त नागरी कायदा सांगितलेला नाही. गुन्हेगारी कायदाही सांगितलेला आहे. गुन्हेगारी कायदा असा आहे, "कुणी जर चोरी करताना पहिल्यांदा सापडलं, तर त्याच्या उजव्या हाताची बोटं तोडावीत, मग हात तोडावेत." असं बरंच काही आहे. कुणी म्हणेल, 'हा किती रानटी धर्म आहे बघा!' पण फक्त पुराणातच अशा शिक्षा

सांगितलेल्या आहेत असं काही नाही. 'मनुस्मृती'मध्येही चोरीकरिता नेमक्या अशाच शिक्षा सांगितलेल्या आहेत. शेतकऱ्याच्या घरात तांब्याचा एक पैसा जरी सापडला तरी त्याचे हात कापण्यात यावेत, असं सांगितलेलं आहे. हे सगळे रानटी काळात तयार झालेले धर्मग्रंथ. त्यांचे काय करावे? इंग्रज आल्यापासून हिंदू समाजसुधारकांच्या मनाला एक टोचणी लागलेली होती. ती अशी, की हिंदू समाज एकसंध नाही आणि आम्हाला सामुदायिक प्रार्थना नाही. त्यामुळे आम्ही मुसलमानांच्या हल्ल्यापुढे टिकत नाही आणि इंग्रजांनीही आमचा त्याच कारणाने पराभव केला. त्यामुळे मग सर्वप्रथम, सामुदायिक प्रार्थना सुरू करण्याचा निर्णय समाजसुधारकांनी घेतला. त्यातूनच प्रार्थना समाज उदयाला आला. नंतर गांधींनीही सामुदायिक प्रार्थना सुरू केली. 'भगववद्गीता' हा हिंदूंचा मध्यवर्ती ग्रंथ आहे, अशी जाहिरात करण्यात आली. आर्य समाज, प्रार्थना समाज, विवेकानंद, हेडगेवार या सर्व हिंदू राष्ट्राची बांधणी करण्याचा प्रयत्न करणाऱ्या मंडळींचा प्रयत्न असा होता, की हिंदू धर्मांतील विविधता संपवून, तो ख्रिश्चन किंवा इस्लाम धर्मांप्रमाणे एकसंध, एकग्रंथ आणि सामुदायिक प्रार्थना करणारा धर्म बनवावा. आपल्या चालीरीतीसुद्धा सर्वसाधारणपणे एकच असाव्यात, हिंदू धर्म फक्त एकाच राष्ट्रामध्ये असल्यामुळे राष्ट्राने केलेले कायदे मानायला आम्ही तयार आहोत. असं म्हणणं हिंदूंना काही कठीण नाही; पण ज्यांचा धर्म आंतरराष्ट्रीय आहे, ज्यांचे प्रमाणभूत ग्रंथ दुसऱ्या देशात तयार झालेले आहेत, त्यांना जर तुम्ही शरीयतचा कायदा बदलायला सांगितलं, तर ते काही त्यांना सहजच मान्य होणार नाही आणि आम्ही त्यांना असं सांगतो, की तुम्ही या राष्ट्राचे नागरिक आहात ना? मग तुम्हाला हा कायदा मानावाच लागेल, घटनेमध्ये एक मार्गदर्शक तत्त्व असं आहे, की या देशामधल्या सर्व नागरिकांना एकसंध (Uniform) नागरी कायद्याचा लाभ मिळावा यासाठी प्रयत्नशील राहावे. घटनेच्या ४थ्या कलमात एक मार्गदर्शक तत्त्व म्हणून अशी तरतूद आहे. समान नागरी कायदा प्रस्थापित केला पाहिजे, असं काही तत्त्व नाही. प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे, असं म्हटलेलं आहे. यासंदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनीसुद्धा बरेच प्रयत्न केले. तेव्हा असं ठरलं, की समान नागरी कायदा तयार करण्याच्या आधी वेगवेगळ्या धर्मांचे आणि जातीजमातींचे जे काही कायदे आहेत, रीतीरिवाज आहेत त्यांचा अभ्यास करावा; मग सर्वप्रथम हिंदू समाजाचा अभ्यास त्यांनी सुरू केला. हिंदू कोड बिल तयार करण्याची आंबेडकरांची फार इच्छा होती. सगळ्या सर्व हिंदूंना लागू करणारा कायदा करावा, असं त्यांना वाटायचं. कायदेपंडितांना नेहमी असं वाटत असतं. तुम्ही कोणत्याही वकिलाशी जाऊन बोला, तो सांगेल,

घटनेमध्ये अमुक-अमुक दोष आहे. चंडीगडच्या एका मोठ्या वकिलाशी मी चर्चा करीत होतो. ते म्हणाले, 'मुळात घटनेनुसार सरकारला कोणत्याही व्यवसायात हस्तक्षेप करण्याचा अधिकार नव्हता. तशी तरतूद घटनेत करण्यात आलेली होती; पण पहिल्या घटना दुरुस्तीत ती तरतूद रद्द करण्यात आली. त्यामुळे सरकारला आज कोणत्याही व्यवसायात हस्तक्षेप करण्याचा काहीही अधिकार नव्हता. तशी तरतूद घटनेत करण्यात आलेली होती; पण पहिल्या घटना दुरुस्तीत ती तरतूद रद्द करण्यात आली. त्यामुळे त्यामुळे सरकारला आज कोणत्याही व्यवसायात हस्तक्षेप करता येतो. ते वकील म्हणाले, 'तुम्ही बाकी काहीही करू नका, फक्त ॲमेंडमेंट घटना रद्द करून घ्या! फार भयानक ॲमेंडमेंट आहे. त्याचा आर्टीकल ३१ शी म्हणजे प्रॉपर्टी राइटस्शीसुद्धा संबंध आहे.' गोष्ट खरी आहे; पण मी त्यांना म्हणालो, 'ॲमेंडमेंट झाली नसती म्हणजे गोंधळ झाला नसता असं थोडंच आहे? घटनेत तरतूद नसतानाही प्लॉनिंग कमीशन झालं की नाही? घटनेत तरतूद नसतानाही प्लॉनिंग कमीशन झालं की नाही? घटनेत नसलेल्या अशा कितीतरी गोष्टी आज झालेल्या आहेत.' लोकांची समजूत असते; पण कायद्याने सुधारणा होत नाहीत. अशी स्वतंत्र भारत पक्षाची स्पष्ट भूमिका आहे. समाजसुधारणा करणे हे कायद्याचे काम नसते. संमतिवयाचा कायदा करणे कायद्याचे काम नसते. संमतिवयाचा कायदा होऊन किती वर्षे झाली? पण तरीही आजही माझ्या गावात लग्न करणाऱ्या मुलीचं वय अठरा वर्षांपेक्षा कमीच असतं. हुंडाबंदीचा कायदा झाला, तरीही कुठंही हुंडा थांबलेला नाही. कायद्याने समाजसुधारणा घडून येत नाही. समाजातील पद्धती इतिहासाप्रमाणे, कालमानाप्रमाणे, भौगोलिक गरजांप्रमाणे, सामाजिक गरजांप्रमाणे तयार होत असतात. कोण्या मनूनं सांगितलं म्हणून त्यानुसार समाजरचना ठरत असते. बाप मोठा जमीनदार असला, हजार-पाचशे एकर जमीन मिळणार असली, तर पोरं बापाच्या समोर बसतसुद्धा नाहीत! बापाविषयी जी पूज्य भावना दाखवली जाते, त्याचा सरळ संबंध बापाकडून अपेक्षित जमीनजुमल्याशी असतो. तेच जर का बापाकडनं काही मिळणार नसेल, तर पोरं बापाला अक्कल शिकवायला मागे पाहत नाहीत. नवराबायकोंचे संबंध काय असावेत तेसुद्धा काळाप्रमाणं ठरत असतं; तर हिंदू धर्माचे रूढ कायदे, रीतीरिवाज पाहून, त्याआधारे हिंदू कोड बिल तयार करण्यात आलं. त्याच्यावर प्रचंड वादविवाद झाला आणि शेवटी आंबेडकरांना हिंदू कोड बिलाचा फक्त छोटासा तुकडा मान्य करून घेता आला आणि त्यानंतर ते राजीनामा देऊन बाहेर पडले.

हिंदू कोड बिलामध्ये ज्या समान नागरी तरतुदी हिंदू समाजावर लादण्याचा

प्रयत्न झाला, त्या सर्व तरतुदी भद्र, सवर्ण, ब्राह्मण समाजजातींच्या आधारावर करण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे मागासवर्गीयांना, विशेषत: आदिवासी स्त्रियांना असलेले हक्क काढून घेण्यात आले. उदा. परंपरेनं आदिवासी स्त्रियांना दत्तक घेण्याचा अधिकार होता. एकट्या बाईलासुद्धा दत्तक घेता येत असे. आता तो राहिलेला नाही; त्यामुळे आदिवासींनी हिंदू कोड बिलाला विरोध केला. तेव्हा हिंदू समाजामध्येही समान नागरी कायदा करणं किती कठीण झालं, याचा अनुभव आपण घेतलेला आहे.

त्यानंतर हिंदू वारसा कायदा झाला. त्या वेळी त्यात बायकांना मालमत्तेचा हक्क मिळावा यासाठी प्रयत्न करण्यात आले; पण या कायद्यानुसार, जी काही पैतृक मालमत्ता असेल, त्यापैकी मुलाला जन्मत:च समान भाग मिळतो. समजा एका माणसाकडं तीस एकर जमीन आहे. त्याला पहिला मुलगा झाला, की त्या मुलाचा जन्मत:च बापाच्या पंधरा एकर जमिनीवर हक्क पोचतो. दुसरी मुलगी झाली–काही फरक पडत नाही. तिला जन्मत: काहीही हक्क नाही. तिसरा मुलगा झाला, की जमीन बाप आणि दोन मुलं यांच्यात दहा–दहा एकर वाटली जाईल. मुलीला काहीही नाही. समजा त्यानंतर बाप मेला, तर तीस एकर जमिनीपैकी दहा–दहा एकर जमीन दोन मुलांना मिळेल. बापाकडं जी दहा एकर जमीन राहिलेली, तिचे अडीच–अडीच एकरांचे चार वाटे होतील. त्या माणसाची बायको, दोन मुलं आणि मुलगी यांना प्रत्येकी अडीच एकर जमीन मिळेल. मुलींसाठी, फक्त एवढीच तरतूद पैतृक मालमत्तेबाबतच्या कायद्यात करता आली. जर मृत्युपत्र केलेलं नसेल, तर स्वकष्टार्जित मालमत्तेमध्ये मात्र मुलाला आणि मुलीला समान हक्क देणारा कायदा कालांतराने आला. विशेष म्हणजे हा कायदा होताच, ज्यांच्याकडं मालमत्ता आहे, अशा हिंदूंनी मृत्युपत्रं करायला सुरुवात केली. तेव्हा कायदा होऊनसुद्धा काहीही उपयोग झाला नाही. महाराष्ट्रात जो कायदा झाला, तो अगदीच आचरट कायदा आहे. त्यांनी मुलीला माहेरच्या आणि सासरच्या – दोन्हीकडच्या मालमत्तेमध्ये समान हक्क असेल असं जाहीर करून टाकलं! निवडणुकीच्या जाहीरनाम्यासारखा कायदा झाला! मी फक्त राष्ट्रीय पातळीवरच्या कायद्याबद्दल बोलत होतो. त्यात सुधारणा करूनसुद्धा फरक पडला नाही.

हिंदूंमध्ये समान नागरी कायदा करायला इतक्या अडचणी आल्या, तर मुसलमानांमध्ये किती अडचणी येतील. मुसलमानांमध्ये मुलीचे दान होत नाही; त्यांच्यात लग्न हा एक करार आहे. वास्तविक पाहता, हिंदुस्थानात आल्यानंतर इस्लाम धर्म फार बिघडला. नाही तर योनीशुचितेची कल्पना पूर्णपणे नष्ट करणे हा

इस्लाम धर्माने केलेली सर्वांत मोठी क्रांतिकारक गोष्ट आहे. हिंदूंमध्ये एकदा मुलीचं लग्न झालेलं असेल, तर तिच्याशी पुन्हा कुणी लग्न करीत नाही. या उपभोगवादी कल्पनेला मुसलमान समाजात बिलकूल स्थान नाही. एखाद्या मुलीचं लग्न जरी मोडलं, तरी तिचं दुसरं लग्न होण्यास काहीही अडचण येत नाही. त्यांनी योनीशुचितेची कल्पना समूळ नष्ट केली. ही इस्लाम धर्मातील फार मोठी कर्तबगारीची गोष्ट आहे; पण त्याबरोबरच ही गोष्ट मान्य केली पाहिजे, की प्रत्येक धर्माच्या आजपर्यंतच्या चालीरीती स्त्रियांवर अन्याय करणाऱ्याच होत्या आणि आहेत. हिंदूंनी आम्ही फार प्रागतिक आहोत, असं मानायची काही गरज नाही. हिंदूंमध्ये विधवांना जाळायची, त्यांचे केस कापायची, त्यांची विटंबना करायची प्रथा होती. काय वाटेल ते करायच्या प्रथा होत्या. मुसलमान नवऱ्याला तीन वेळा 'तलाक, तलाक, तलाक' म्हटलं, की मोकळं होता येतं, याबद्दल अनेक हिंदू नवऱ्यांच्या मनात असूया असते; पण प्रत्यक्षात, हिंदू नवऱ्याला एकदासुद्धा तलाक म्हणायची गरज पडत नाही. फक्त बायकोला घराबाहेर काढून दरवाजा बंद केला, की झालं! हे प्रत्यक्ष प्रभू रामचंद्रांनी केलेलं आहे. तेव्हा बाकी हिंदू नवऱ्यांच्या बाबतीत काहीच अडचण नाही! थोडक्यात, एका धर्मातील लोकांनी दुसऱ्या धर्मातील चालीरीतींना हसण्यासारखी कुणाचीही परिस्थिती नाही, याबाबतीत खोटा अभिमान बाळगण्याचं काहीही कारण नाही. आगरकर आणि टिळकांच्या काळात सरकारनं संमतिवयाचा कायदा करायचं ठरवलं. त्या काळी बालविवाह मोठ्या प्रमाणावर होत आणि प्लेग, देवी वगैरे साथीच्या रोगांमुळं नऊ–दहा वर्षांच्या मुलीसुद्धा विधवा होत असत. त्यांचे सगळे केस कापायचे. मीठ खायचं नाही, गोड खायचं नाही... अशा परिस्थितीत त्यांना सगळं आयुष्य कंठावं लागायचं. यात कायद्यानं बदल करायचा प्रयत्न झाला, तेव्हा लोकमान्य टिळकांचे त्या वेळचे अग्रलेख पाहा. त्यांनी असं लिहिलेलं आहे, "यात सुधारणा व्हायला पाहिजे हे आम्हाला मान्य आहे; पण ती आमची आम्ही करू. आम्ही सुधारणा करण्याचे अधिकार सरकारच्या हाती देऊ इच्छीत नाहीत." आज जे हिंदू मुसलमान मुल्ला–मौलवींच्या विरुद्ध बोलतात त्यांनी ही गोष्ट लक्षात घेतली पाहिजे, की लोकमान्य टिळकांची भूमिका आणि आजच्या मुसलमान मुल्ला–मौलवींची भूमिका यात काहीही फरक नाही; पण याचा अर्थ असा नाही, की कायद्यात सुधारणाच करायची नाही!

१९८६ मध्ये शेतकरी संघटनेच्या चांदवडच्या महिला अधिवेशात या प्रश्नाचा अभ्यास झाला होता. चांदवडच्या अधिवेशनात जो पर्याय देण्यात आला होता त्यात एका परिच्छेदाचा अपवाद वगळता, स्वतंत्र भारत पक्षाचीही तीच भूमिका आहे,

समान नागरी कायदा नसावा, असं माझं मत आहे. कारण सरकार किमान असावं असं माझं मत आहे. राजकीय सरकारला माझी नैतिक तत्त्वं ठरवण्याचा अधिकार असता कामा नये. माझ्या श्रद्धेच्या भागाला हात लावण्याचा अधिकार सरकारला असता कामा नये. सरकारची भूमिका मर्यादित असली पाहिजे. समाजसुधारणा करायचा प्रयत्नसुद्धा करू नये. धर्मसंस्था असल्या पाहिजेत; कारण धर्म ही माणसाची एक वेगळी श्रद्धेची जागा आहे. माणसाला बुद्धी आहे, माणसाला श्रद्धा आहे, माणसाला सुखानं जगायचं आहे, पोषण करायचं आहे, माणसाच्या ज्या काही वेगवेगळ्या प्रज्ञा आहेत, त्या वेगवेगळ्या प्रज्ञांची वेगवेगळी सरकारं असली पाहिजेत. मुख्यमंत्री आल्यावर कुलगुरुनं उठून उभं राहायचं आणि सलाम करायचा – मग तो कॉपी करून पास झालेला का असेना! हे असलं सरकार आम्हाला मान्य नाही! विद्वानांचं शासन वेगळं असलं पाहिजे. भर्तृहरीच्या वाङ्मयात एक प्रसंग चित्रित केलेला आहे. राजाच्या दरबारात उभं राहून एक पंडित राजाला म्हणतो, "अरे, तू स्वत:ला काय समजतोस? तुझ्याकडं सत्ता-संपत्ती आहे तर माझ्याकडं गुरूची प्रज्ञा, अभ्यास आणि व्यासंग आहे! तुझ्याकडे तुला मान देणारे आहेत, तर माझ्याकडे शिष्य आहेत! तू मला तुच्छ मानत असशील, तर मीसुद्धा तुला तुच्छ मानतो!" आपल्याकडं असं बोलू शकणाऱ्या विद्वानांची एक परंपरा होती. ती समाजवादानं खलास केली आणि कुलगुरूदेखील मुख्यमंत्र्याला सलाम घालू लागले! स्वातंत्र्याचे पोवाडे गाणारे शाहीर जो मुख्यमंत्री असेल, त्याची स्तुतिकवनं रचायला लागले. कलाकार राज्यकर्त्यांपुढे वाकायला लागले. धर्मशाळा न राहिल्यामुळं गरिबांना गरज पडल्यावर सरकारकडे जावं लागू लागलं. ही सगळी परिस्थिती समाजवादामुळं आली.

समजा, मी निधर्मी आहे आणि 'परमेश्वर आहे की नाही,' हा प्रश्न चर्चेला घ्यायच्यासुद्धा लायकीचा नाही, असं माझं मत आहे; तरीही तुमचा जर एखाद्या देवावर विश्वास असला, तर तुमच्या खासगी जीवनात तुमच्या श्रद्धेच्या, तुमच्या प्रिय देवतेची पूजा करण्याचा अधिकार कायम राहावा याकरिता मी जीव टाकायला तयार आहे; पण सार्वजनिक देवासाठी मी काहीही करणार नाही. सार्वजनिक देव हा खोटाच असतो. सार्वजनिक देव ही कल्पनाच मुळात खोटी आहे. मीराबाई जर केवळ कल्पनेनं, प्राण गेला तरी आपल्या गिरिधराला मानत असेल, तर तिच्या भक्तीला आव्हान द्यायचे काही कारण नाही. तुम्ही खासगीमध्ये काय करता, याच्याशी माझा काही संबंध नाही. तुम्हाला तुमचा खासगीपणा जपता यावा; यासाठी मी लढायलाही तयार होईन; पण तुम्ही जर असं म्हणायला लागला, की

माझा हा देव सार्वजनिक आहे; तर मग त्याच्याबद्दल प्रश्न विचारण्याचा मलाही अधिकार प्राप्त होतो. स्वित्झर्लंडमध्ये असताना माझी एक पर्सनल सेक्रेटरी होती. कठोर, कर्मठ कॅथॉलिक ख्रिश्चन. तिनं मला सांगितलं, "माझ्या येशूचा जन्म कुमारी आईच्या पोटी झाला आणि क्रूसावर चढल्यानंतर तो पुन्हा एकदा जिंवत होऊन आला. माझी या गोष्टीवर इतकी अढळ श्रद्धा आहे, की तुम्ही कितीही माझं मन वळवायचा प्रयत्न केला, तरी माझी यावरची श्रद्धा हटत नाही." मी तिला म्हणालो की, "ज्यांची अशी खरी श्रद्धा आहे, त्यांच्याबद्दल माझ्या मनात आदर आहे."

या सर्व गोष्टीचा विचार केल्यानंतर आमचं असं म्हणणं आहे, की सरकारनं कायदा लादू नये. एक असा समान नागरी कायदा करावा, जो कायदा जन्मत: सर्व नागरिकांना आपोआप लागू होईल; पण जर कुणी असं म्हणालं, की हा कायदा मला नको आहे, मला माझ्या शरीयतप्रमाणे किंवा मनुस्मृतीप्रमाणे वागायचं आहे तर त्याला ते स्वातंत्र्य असलं पाहिजे. हा 'फ्रीडम ऑफ फेथ-फ्रीडम ऑफ बिलिफ'चा भाग आहे. यातून थोड्याफार त्रासदायक गोष्टी निर्माण होणार असल्या, तरी त्याला तोंड दिलं पाहिजे. कारण हजारो वर्षांची परंपरा तुम्ही सहजासहजी पुसून टाकू शकत नाही. काही ठिकाणच्या रूढींनाही कोर्टानं मान्यता दिलेली आहे; पण त्यांनी त्यासंबंधी निवेदन केलं पाहिजे, की मी या धर्मशास्त्राप्रमाणे चालणार आहे. पालकाला आपल्या जन्मत: अज्ञान मुलाकरिता असं निवेदन करायची परवानगी आहे. वयात आल्यानंतर पाहिजे असेल, तर त्या मुलानं निवेदन बदलून घ्यावं. एकाच धर्मामधल्या, एकाच धर्मशास्त्राचा नागरी कायदा मानणाऱ्या दोन जणांमध्ये जर काही वाद झाला, तर सरकारी कोर्ट त्यात दखल देणार नाही. तुम्ही, तुमचे काजी-मुल्ला काय करायचं ते करून घ्या. तुम्हाला सरकारी संरक्षण मिळणार नाही.

पुढची तरतूद अशी, की एकच धर्मशास्त्र मान्य केलेल्या दोघांपैकी एकाने जरी असं म्हटलं, की मला धर्मशास्त्राप्रमाणे नाही, राष्ट्रीय कायद्याप्रमाणे वागायचे आहे, तर त्या दोघांनाही राष्ट्रीय कायदा लागू होईल. जिथं 'विवाद' आहे तिथं 'संशयाचा फायदा' हा राष्ट्रीय कायदा जन्मत: किंवा वयात आल्यानंतर जर का कुणी धर्मकायदा मान्य केलेला असेल; पण नंतर कधीतरी असं म्हटलं, की 'नाही, मला आता राष्ट्रीय कायदा पाहिजे,' तरीसुद्धा त्याला ते करता येईल, दोन वेगवेगळ्या धर्मशास्त्रांमधले दोन पक्ष असतील, तर त्यांच्यात नागरी संबंध हे राष्ट्रीय कायद्याने होतील. म्हणजे प्रत्येक वेळी 'संशयाचा फायदा' राष्ट्रीय कायद्याला दिला जाईल. ४४ व्या कलमाची पूर्तता होऊ शकेल. म्हणजे खऱ्या खर्थाने नागरी कायदा सर्व नागरिकांना उपलब्ध व्हावा अशी जी तरतूद आहे, ती पूर्ण करण्याचा हा सगळ्यांत योग्य मार्ग आहे.

मुसलमानांची लोकसंख्या फार झपाट्यानं वाढते, असा एक युक्तिवाद करण्यात येतो. कारण म्हणे त्यांना चार-चार बायका करायची परवानगी असते! आणि अशा प्रकारे त्यांची लोकसंख्या झपाट्यानं वाढत गेली, तर सगळा देशच मुसलमान होऊन जाईल! पण त्यात तथ्य नाही.

पहिली गोष्ट अशी, की शिरगणतीच्या आकडेवारीनुसार बहुपत्नीत्वाची सगळ्यांत जास्त प्रथा ही जैन लोकांत आहे. त्यांनतर आदिवासी लोकांत आहे. त्याच्यानंतर मुसलमानांत आहे. तेव्हा चार बायका करायची परवानगी आहे म्हणजे सगळे मुसलमान चार-चार बायका करतात, ही कल्पना बरोबर नाही. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या हिंदुत्ववादी प्रचारामुळे बऱ्याच हिंदूंची अशी समजूत असते, की मुसलमान परिवारातील बायको ही, नवरा म्हणजे कसाई असल्यासारखी त्याच्यासमोर घाबरत-घाबरत जगणारी असते; पण तसं काही नाही, मुसलमान बायकाही आपल्या नवऱ्याला भांडी फेकून मारतात. प्रत्यक्षात जास्त लग्न करण्याची पद्धत ही मुसलमानांपेक्षाही हिंदू समाजात जास्त आहे. दुसरी गोष्ट अशी, की लोकसंख्यावाढीची गती ही जननक्षम स्त्रियांच्या संख्येवर अवलंबून असते. त्याचा एक माणूस किती स्त्रियांशी लग्न करतो, याच्याशी काहीही संबंध नाही. लोकसंख्यावाढीचा संबंध थेट लोकांच्या दरडोई उत्पन्नाशी आहे. माणूस किती बायका करतो, याच्याशी नाही. समजा एका माणसानं चार बायका केल्या, तर त्याचा अर्थ असा, की काही पुरुषांना बायका मिळणारच नाहीत. थोडक्यात, जननक्षम वयातल्या स्त्रियांच्या संख्येनुसार लोकसंख्या वाढत असते.

राष्ट्रीय नागरी कायदा

घटनेच्या ४४ व्या कलमात शासनाने देशातील सर्व नागरिकांना समान नागरी कायद्याचा लाभ मिळावा; यासाठी प्रयत्न करावेत असे मार्गदर्शक तत्त्व सांगितलेले आहे.

या मार्गदर्शक तत्त्वाचा घटनेत अंतर्भाव झाला, तेव्हा शासन संस्थेविषयीच्या संकल्पना वेगळ्या होत्या. शासन म्हणजे सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, शैक्षणिक इत्यादी सर्वच क्षेत्रांत सर्वोच्च अधिकारी आणि दिशा दाखवणारे असेल अशी त्या वेळी कल्पना होती; याउलट, स्वतंत्र भारत पक्ष सरकार किमान असावे आणि शासन व्यवस्था बहुविध असाव्यात, या तत्त्वावर दृढ विश्वास ठेवतो. त्यामुळे शासनाने नैतिक, सामाजिक प्रश्नात ढवळाढवळ करण्यास आमचा सक्त विरोध आहे.

घटनेप्रमाणे भारतीय गणराज्य निधार्मिक आहे. या शब्दाचा शब्दकोशातील अर्थ

स्पष्ट आहे. 'सर्व धर्मव्यवस्थांविषयी मनात संशय बाळगणारी राज्यव्यवस्था म्हणजे निधार्मिक व्यवस्था. सर्व धर्मांना सारखे महत्त्व देणारी व्यवस्था.' याकरिता शब्द आहे- 'सर्वधर्मसमावेशक.' संविधानातील शब्द 'निधार्मिक' असा आहे. तरीही, एक सार्वत्रिक नागरी कायदा असावा हे उद्दिष्ट म्हणून योग्य आहे आणि त्या दृष्टीने एक नमुनेदार राष्ट्रीय नागरी कायदा झाला पाहिजे.

१) राष्ट्रीय नागरी कायदा तयार करताना वेगवेगळ्या धर्मपद्धर्तीतील रिवाज किंवा रूढी यांच्यात वाद घातला जाऊ नये किंवा एका धर्मांतील रिवाज दुसऱ्यांवर लादले जाऊ नयेत आणि इकडचे थोडे तिकडचे थोडे अशी काही वेगवेगळ्या रिवाजांची खिचडीही पकवली जाऊ नये.

२) राष्ट्रीय नागरी कायद्यात समानता, न्याय आणि तर्क यांवर आधारलेल्या एका सुसंगत पद्धतीचा नमुना पुढे आला पाहिजे.

३) गणराज्यातील प्रत्येक नागरिकास जन्मत:च राष्ट्रीय नागरी कायदा लागू होईल; परंतु कोणीही नागरिक किंवा अज्ञानपालक लेखी निवेदन करून, आपण कोणा एका प्रस्थापित धार्मिक नागरी कायद्याचा अंमल स्वीकारावा ते ठरवू शकेल.

४) एकाच धर्मपद्धतीचे नागरी कायदे मान्य करणाऱ्या दोन पक्षांतील विवादामध्ये सरकारी न्यायव्यवस्थेला हस्तक्षेप करता येणार नाही.

५) अशा एकाच धर्माच्या नागरी कायदा मानणाऱ्या पक्षांपैकी कोणी एकानेही राष्ट्रीय नागरी कायदा मानायचे ठरवले, तर त्याचे प्रकरण शासकीय न्यायव्यस्थेपुढे येऊ शकेल.

६) दोन वेगवेगळ्या धर्मांतील नागरी पद्धती स्वीकारणाऱ्या पक्षांमधील वादविवाद राष्ट्रीय नागरी कायद्याप्रमाणे अधिकृत न्यायव्यवस्थेपुढे निर्णयासाठी येतील.

(६ सप्टेंबर २०००)

◆◆

समाजवादी संरचना

(स्वतंत्र भारत पक्ष जाहीरनामा लेखांक : ६)

समाजवादी व्यवस्था कोसळायला लागली, की त्याचे काही दृश्य परिणाम समोर येऊ लागतात. पुन:पुन्हा वीज जायला लागते; लोकांना एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी माल पाठवायचा असतो; पण रस्ते उपलब्ध नसतात; टपाल लवकर पोचत नाही, टेलिफोन लागत नाही वगैरे वगैरे. या सर्व उणिवांमुळे सार्वजनिक नियोजन करताना या मंडळीचं म्हणणं असं असतं, "एखादी व्यक्ती किंवा कंपनी स्वार्थापोटी गुंतवणूक करते, तेव्हा समाजासाठी आवश्यक असणाऱ्या गोष्टी केल्या जात नाहीत. समाजाला रस्त्यांची गरज असते, पाणी अडवण्याची गरज असते, पाणीपुरवठा योजना करण्याची गरज असते, पेट्रोलच्या पाइपलाइनची गरज असते, तारव्यवस्थेची गरज असते, टपाल व्यवस्थेची गरज असते वगैरे वगैरे. या सर्व व्यवस्था काही टाटा-बिर्ला करणार नाहीत; म्हणूनच या व्यवस्था चांगल्या रीतीनं व्हाव्यात यासाठी सामाजिक व्यवस्था आणि नियोजन करणं आवश्यक असतं." हा समाजवाद्यांचा महत्त्वाचा मुद्दा असतो.

त्यांचा दुसरा मुद्दा असा असतो, "मुक्त व्यवस्थेत गलेलठ्ठ भांडवलदार अधिक गलेलठ्ठ होतात आणि गरीब हे अधिकाधिक गरीब होत जातात." खरं म्हणजे समाजवादी देशांतील संरचना – इन्फ्रास्ट्रक्चर हे मजबूत असलं पाहिजे; पण आश्चर्याची गोष्ट म्हणजे रशियाचं पोस्टमार्टेम झालं तेव्हा याच्या नेमकी उलट परिस्थिती असल्याचं आढळून आले. तिथं झालेलं बांधकाम अत्यंत कमी प्रतीचं आहे, असं आढळून आलं. समाजवादी देशात कशी प्रगती होते, ते दाखविण्यासाठी स्टॅलिनच्या काळात मॉस्कोमधील अंडरग्राउंड रेल्वे उदाहरण म्हणून दाखवण्यात येत असे. "भांडवलशाही व्यवस्थेमध्ये भांडवलदारांची घरं संगमरवरी दगडानं बांधली जातात, आम्ही मात्र रेल्वे स्टेशनं बांधण्यासाठी संगमरवरी दगड वापरतो," अशी शेखी मिरवली जात असे; पण नंतर, अंडरग्राउंड

रेल्वेची भुयारं कोसळू लागली, रूळ सडून जाऊ लागले आणि रेल्वे अपघात नित्याचे झाले; पेट्रोलियमच्या पाइपलाइन्स गंजू लागल्या, फुटू लागल्या, त्यांना आगी लागू लागल्या. एवढंच नाही तर, चेर्नोबिल अणुभट्टीत गोंधळ होऊन तिथून अणुसंसर्ग प्रचंड वेगाने पसरू लागला, तेव्हा तो नियंत्रणात ठेवणं सरकारला शक्य झालं नाही. रशियाचा पाडाव होण्यामागच्या अनेक कारणांपैकी हेही एक कारण आहे, असं सांगितलं जातं.

जर रशियातली संरचना इतकी कच्ची निघाली, तर हिंदुस्थानातील संरचना किती कच्ची असेल? उदाहणार्थ टेलिफोन. इतकी वर्षे टेलिफोन राष्ट्रीय ठेवल्यामुळे टेलिफोनचं कनेक्शन मिळणं ही गोष्ट फार कठीण होती. खासदार ओळखीचा असल्याशिवाय कनेक्शन लवकर मिळत नसे. बाहेरगावी बोलण्यासाठी ट्रंककॉल बुक केला तर तो कधी लागेल, याचा काही भरवसा नसे. खुलीकरणानंतर काय बदल झाला, तो आपण पाहतोच आहोत. जागोजाग एसटीडी बूथस् झाले. आज आपण कुठूनही मुंबईशी, मदुराईशी बोलू शकतो. आता तर तारांचीही गरज राहिलेली नाही. कुणीही हातामध्ये छोटासा मोबाईल घेऊन जगभर संपर्क साधू शकतो. आपल्याकडे राष्ट्रीयीकृत व्यवस्थाच राहिली असती, तर हे तंत्रज्ञान केव्हा आलं असतं, काही सांगता येत नाही.

समाजवादाच्या पाडावाचं आणखी एक महत्त्वाचं कारण असं, की या व्यवस्थेमध्ये संशोधकांना नाउमेद केलं जातं आणि त्यामुळे महत्त्वाचं संशोधन होत नाही. उलट, आपण ज्यांना स्वार्थी म्हणतो, ती मंडळी स्वार्थापोटी का होईना, नवनवीन संशोधन करीत राहतात. आज कॉंप्युटरमध्ये दर तीन महिन्यांनी काहीतरी बदल घडतो आहे, टेलिफोनमध्ये दर दोन महिन्यांनी बदल घडतो आहे. स्वार्थाकरिता काम करणारे लोकच संरचना अधिक मजबूत करतात. आम्ही समाजाची बांधणी करणार आहोत, असं म्हणणाऱ्या देशांमधील संरचना कमजोर राहिलेली आहे.

आपल्याकडे रेल्वेचे जे काही अपघात होत आहेत, ती गोष्ट इतकी साधी नाही. हिंदुस्थानातल्या रेल्वे रुळांची आयुष्यं संपून तीस-तीस वर्षे झालेली आहेत. आईन रॅण्डच्या 'ॲटलास श्रग्ज्'मध्ये समाजवादी व्यवस्था कोसळताना कोणकोणत्या क्रमाने काय काय होतं याचं वर्णन दिलेलं आहे. त्यात असं म्हणलेलं आहे, की पहिल्यांदा रेल्वे अपघात होऊ लागतात. औद्योगिकीकरणासाठी अधिक वीज म्हणजे समाजवाद असं लेनिननं म्हटलं होतं; पण रशियातच विजेचा तुटवडा निर्माण झाला! हिंदुस्थानातही तेच होतंय.

उद्योजकाला वाव मिळाल्याशिवाय देश मोठा होत नाही; पण इथं जर तुम्ही नवीन धंदा काढला आणि दोन-चार लोकांना रोजगार द्यावा, काही उत्पादन करावं, परदेशांत पाठवावं, परकीय चलन मिळवावं, असा जर तुमचा प्रयत्न असेल, तर अनेक अडचणी येतात. लायसन्स-परमिट राज ही पहिली अडचण. दुसरी अडचण म्हणजे प्रशासकीय उधळमाधळ होते आणि बजेटची रक्कम उभारण्यासाठी तुम्हाला कर भरायला सांगितलं जातं आणि तुम्ही कर कशासाठी भरता? तर जणू प्रशासकीय यंत्रणेने येऊन तुमचा छळ करावा यासाठी! म्हणजे तुम्ही तुमचा छळ करणारालाच पैसे देत असता! त्याच्यानंतर उद्योगधंद्यातली बेशिस्त. युनियनचे असे कायदे झालेले आहेत, की तुमच्याकडं कदाचित मजुरी स्वस्त असेल; पण मजुरांची उत्पादकता इतकी कमी असते, की प्रत्यक्षात ती स्वस्त मजुरीसुद्धा महाग पडते. त्यामुळं नीट उत्पादन होऊ शकत नाही. त्यानंतर, राजकीय पुढाऱ्यांचे दांभिक कल्याणकारी कार्यक्रम हीसुद्धा एक अडचण आहे. ते लोकांना सारखे सांगत असतात, की तुम्हाला हे फुकट देतो, तुम्हाला ते फुकट देतो! आणि त्याचा बोजा शेवटी उद्योजकावर पडत असतो.

उद्योजकाला जर बाजारपेठेत स्थान मिळावायचं असेल आणि स्पर्धा करायची असेल, तर त्याच्या डोक्यावरची ही ओझी कमी करणं आवश्यक आहे. रुपयाचं अवमूल्यन, महागाई, दिवाळखोरी, बेकारी आणि सर्वसामान्य जनांचे अपरिमित हाल ही आपल्यापुढची संकटं आहेत. या सर्व संकटांमधून जर बाहेर पडायचं असेल, तर गरिबांचं कल्याण करायची भाषा सोडून देऊन, उत्पादक, शेतकरी, व्यापारी, उद्योजक यांना प्रोत्साहन देण्याची संस्कृती आणली पाहिजे. जे उत्पादन करतात, पुरवठा करतात त्यांच्या दृष्टिकोनातून अर्थशास्त्राकडे बघण्याचं धोरण स्वीकारलं पाहिजे.

(६ ऑक्टोबर २०००)

◆◆

स्वातंत्र्यलढ्याच्या फौजेची पुनर्बांधणी करताना...

'शेतकरी तितुका एक एक' या सूत्रात सर्व शेतकऱ्यांना एकत्र गुंफून देशाच्या गरिबीची समस्या दूर करण्यासाठी गेली २५ वर्षे विविध स्वरूपांत लढा देणाऱ्या शेतकरी संघटनेने सातारा येथे ६ व ७ नोव्हेंबर २००४ रोजी झालेल्या विस्तारित संयुक्त कार्यकारिणीच्या बैठकीत समाजातील वेगवेगळ्या घटकांच्या तसेच वेगवेगळ्या कार्यांविषयांच्या अशा २१ आघाड्या स्थापन करून, त्यांचे अध्यक्ष नियुक्त केले. (ही संख्या नंतर २५ पर्यंत गेली.) समाजातील हे भेदाभेद जाणीवपूर्वक जागते ठेवून, राजकारण्यांनी समाज कधी एकसंध होऊच दिला नाही, असे आग्रहाने मांडणाऱ्या संघटनेनेही अशा आघाड्या बनवताच इतरांच्या मनाचे सोडा, शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांच्या मनांचाही गोंधळ उडाला.

या आघाड्यांपैकी अल्पसंख्याक आघाडी हा तर परम कुतूहलाचा विषय. कारण, अल्पसंख्य म्हटले, की मुसलमान असे ठाम समीकरण आपल्या देशात तयार झाले आहे. अशा या अल्पसंख्याक आघाडीच्या या पहिल्याच शिबिराच्या निमित्ताने कार्यकर्त्यांच्या मनातील गोंधळ पुन्हा प्रकट झाला.

या शिबिरात सहभागी असलेल्या, शेतकरी संघटनेच्या काही ज्येष्ठ कार्यकर्त्यांनीसुद्धा – शेतकरी संघटना अल्पसंख्याकांची आघाडी बांधायचा प्रयत्न का करते आहे? आता हे शिबिर कशासाठी भरवले? अशांसारखे प्रश्न विचारले.

शेतकरी संघटनेने देशाच्या गरिबीची समस्या सोडवण्यासाठी 'शेतीमालाला रास्त भाव' हा एककलमी कार्यक्रम घेऊन, स्वातंत्र्याचा लढा चालवला असला, तरी समाजातील विविध घटकांचे त्याखेरीज काही प्रश्न आहेतच, याबाबत अगदी जुन्या काळापासून जागरुकता दाखविली आहे. हे शेतकरी संघटनेच्या

वेळोवेळीच्या ठरावांतून आणि निवेदनांतून दिसून येईल. मुसलमान समाजाच्या प्रश्नांविषयीची संघटनेची जागरुकता फार जुनी आहे. चांदवडच्या शेतकरी महिला आघाडीच्या ठरावांपैकी समान नागरी कायद्यावरील ठराव, 'जातीय दंग्यांचे रसायनशास्त्र' यासारखे माझे लेख असे कितीतरी पुरावे यासाठी देता येतील. अल्पसंख्याक आघाडीचे अध्यक्ष अमर हबीब यांनी यापूर्वीही अशी शिबिरे संघटनेच्या माध्यमातून घेतली आहेत; पण अशा वास्तविक किंवा भ्रामक प्रश्नांमुळे हे सर्वच समाजघटक, शेतकरी आंदोलनाचे महत्त्व कळले तरी त्यापासून अंतर राखून राहतात. हे अंतर दूर करण्यासाठी, परस्परांना समजावून घेण्यासाठी आणि संघटनेने चालविलेल्या स्वातंत्र्यलढ्यात सहभागी करून घेण्यासाठी या विविध आघाड्यांची रचना करण्यात आली आहे.

भारतातील मुस्लिम समाजाची भारतीय नागरिक म्हणून जगत असताना, जी कोंडी झाली आहे, ती फोडायची आहे. दुसऱ्या बाजूला हिंदू समाजाचीही कोंडी झाली आहे, तीही फोडायची आहे. ही कोंडी हितसंबंधी राजकारण्यांमुळे झाली आहे. काही माणसांना 'कडवे मुसलमान' म्हणून शिक्का मारून टाकला आणि काही माणसांना 'कडवे हिंदू' म्हणून शिक्का मारून टाकला, की मोकळे झाले. मग, त्यांची भांडणे लावून द्यायची आणि आपली पोळी भाजून घ्यायची असं राजकारण चाललं आहे. याला शह देण्यासाठी भारतीय जनता पक्षाच्या एका अध्यक्षांनी (श्री. बंगारू लक्ष्मण) आवाहन केले, 'मुसलमानांनो, भाजपात या. भाजप हा फक्त हिंदूंचा पक्ष आहे, असं सगळे म्हणतात ते खरं नाही.' हे आवाहन जेव्हा मी वर्तमानपत्रांत वाचलं, तेव्हा मलाही शंका होती, की हे बोलणं खरंच कळकळीचं आहे का? पण, मी विचार केला, की ते तोंडाने म्हणताहेत ना, की या म्हणून; मग आपण कसोटी पाहू आणि त्यासाठी मी साध्यासुध्या कार्यकर्त्याला नव्हे तर एके काळी शेतकरी संघटनेचे अध्यक्षपद भूषविलेल्या पाशा पटेलांना भाजपकडे पाठवलं. त्यांनी स्वीकारलं. पाशा पटेलांनी तिकडे जाऊन शेतकरी संघटनेचे नाव उज्ज्वल केलं. स्वत: गोपीनाथ मुंडे यांनी मला सांगितलं की, 'नितीन गडकरी चांगलं बोलतात, मीही चांगलं बोलतो; पण गावोगावी भाषणे करायला कोणाला पाठवावं, असा प्रश्न आला, की तुमच्या पाशाला तोड नाही.' हा पाशाचा आणि संघटनेचाही गौरव आहे.

शेतकरी संघटना हे एक विद्यापीठ आहे, 'मदरसा' आहे. त्यातून तयार झालेली माणसे पळवून न्यायला इतर पक्षसंघटना टपून असतात. पंचायत राज्यात महिलांना ३३ टक्के राखीव जागा झाल्या, तेव्हा शेतकरी महिला आघाडीत

तयार झालेल्या काही कार्यकर्त्या महिलांना वेगवेगळ्या पक्षांनी ओढून घेतले. असेच पुरुष कार्यकर्त्यांच्या बाबतीतही घडले. पण, माझी खात्री आहे, की शेतकरी संघटनेच्या या विद्यापीठात तयार झालेली माणसे कोठेही जावोत – शिवसेनेत जावोत, भाजपात जावोत, मुस्लिम लीगमध्ये जावोत, का अन्य कोठेही जावोत – या 'मदरशा'ने त्यांना दिलेले जे एक चारित्र्य आहे, जी एक स्वच्छ विचार करण्याची पद्धती दिलेली आहे त्यांमध्ये ते कोठेही चुकणार नाहीत.

हिंदू आणि मुसलमान समाजांमध्ये कडवेपणाचे शिक्के मारून, स्वार्थांध राजकारण्यांनी जी दुही खदखदत ठेवली आहे, ती दूर करून, त्यांच्यात सामंजस्य निर्माण करणे व त्यायोगे समाजाच्या आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत त्यांना सहभागी करून घेणे, हे मोठे कठीण काम आहे. सगळ्या धर्मांच्या लोकांनी एकत्र चालावं, याकरिता दिल्लीच्या बादशहा अकबराने 'दीने इलाही' नावाचा वेगळा धर्म काढला. जोतीबा फुल्यांनीही अशाच हेतूने सत्यशोधक समाज तयार करण्याचा प्रयत्न केला. पण, दोन धर्मांच्या लोकांना एकत्र आणण्याकरिता तिसरा धर्म काढून फारसं काही हाती येत नाही असा अनुभव आहे. त्यामुळे, मी काही तिसऱ्या धर्माचा संस्थापक होऊ इच्छीत नाही, काम तेच आहे; पण माझा मार्ग थोडा वेगळा आहे.

याच कामासाठी महात्मा गांधींनी फार मोठं कार्य केलं, त्यांनी आपलं रक्त सांडलं, त्यापायी. ज्या वेळी 'खिलाफत' टिकावी म्हणून कोणी मुसलमान नेतासुद्धा हिंदुस्थानात बोलायला तयार नव्हता, त्या वेळी एकटे महात्मा गांधी खिलाफत चळवळीच्या बाजूने उभे राहिले. मुस्लिम जगतात त्याबद्दल अजूनही कृतज्ञता बाळगली जाते. परवाच मी तुर्कस्थानात गेलो, तेव्हा तेथील लोकांनी म्हटले, की आमच्या खिलाफत चळवळीच्या वेळी जगामध्ये आमच्या बाजूने फक्त हिंदुस्थान आणि महात्मा गांधी उभे राहिले. सगळ्यांना एकत्र आणण्याचा प्रयत्न करणाऱ्या अशा या माणसाला त्याच्या आयुष्यात शेवटी काय पाहायला मिळाले? हिंदू आणि मुसलमानांनी एकमेकांचे कोथळे बाहेर काढले, एकमेकांचं रक्त सांडलं, एकमेकांची घरे पेटवून दिली, एकमेकांच्या स्त्रियांवर आणि मुलाबाळांवर अनन्वित अत्याचार केले... हे पाहण्याचे दुर्दैव त्यांच्या वाट्याला आले.

धर्माधर्मांतील सामंजस्याचे हे काम असं महाभयंकर कठीण आहे; पण तितकंच ऐतिहासिक महत्त्वाचं आहे.

तसं पाहिलं, तर माझी गुणवत्ता काहीच नाही. शेतकरी संघटना काढायला तसा मी ना'लायक'च होतो – धड शेतकरी नाही, धड शेतकऱ्याच्या जातीचा नाही; बरीच वर्षे परदेशात काढल्यामुळे मराठी वाचण्याबोलण्याचा सरावही राहिला नव्हता अशी त्या वेळची माझी स्थिती. पण, ना'लायका'ला शेतकऱ्यांनी आपलंसं केलं. महिला आघाडी बांधतानाही हाच अनुभव. यात यश किती मिळाले, त्याचा हिशेब इतिहास करील; पण जोपर्यंत आपण हरलो असं आपलं मन मानत नाही तोपर्यंत आपला पराजय कधी होत नाही असे धरून सगळीकडे मार खाल्ल्यासारखे दिसत असले; तरी नवनवीन प्रयत्न करीत राहायला हवेत, नवेनवे 'सीड प्लॉट' घ्यायला हवेत. याच विचाराने मी ही अल्पसंख्याक आघाडी बांधायचे ठरवले आहे.

'अल्पसंख्याक आघाडी' असं नाव देताना अल्पसंख्याक म्हणजे शिख, मुसलमान, पारशी, ज्यू असे सर्व समाज मला अभिप्रेत आहेत, केवळ मुसलमान नव्हे. या सर्व धर्मीयांच्या प्रश्नांमध्ये फरक आहेत. मी पहिल्यांदा स्पष्ट करतो, 'सर्व धर्मांच्या लोकांना एकत्र करून, एक धर्म करावा अशी माझी बुद्धी नाही. किंबहुना, कोणी असं करायचा प्रयत्न केला तर त्याला आम्ही ठामपणे विरोध करू.'

खरं तर वेगवेगळ्या संस्था उभ्या राहिल्या पाहिजेत, विविधतेमध्ये काही सत्य सापडण्याची शक्यता आहे. शेतकरी संघटनेने / स्वतंत्र भारत पक्षाने आम्हाला सरकार अजिबात नको असं नाही म्हटलं; आम्हाला एकसत्ताधारी सरकार नको असं म्हटलं आहे. निवडणूक जिंकली, की राजकारणही तुमच्या हाती, परकीय धोरणही तुमच्या हाती, अर्थकारणही तुमच्याच हाती, शाळाकॉलेजं कोणी कोठे काढायची हेही तुमच्याच हाती आणि कोठल्या गरिबांना भाकरी द्यायची हेही तुमच्याच हाती... असे सरकार आम्हाला नको. सगळ्या लोकांनी एक डोक्याला (किंवा दोन पायांना) एक मत गृहीत धरून, तुम्हाला निवडणुकीत निवडून दिलं आहे, तर तुमचा अधिकार कुठवर चालेल? तुमचा अधिकार त्याच क्षेत्रात चालेल, ज्या क्षेत्रात सगळी माणसं सारखीच असतात. सगळी माणसं सारखी कुठे असतात? प्रत्येकाला आपला जीव प्यारा असतो, प्रत्येकाला आपली मालमत्ता सुरक्षित राहावी अशी इच्छा असते. म्हणजे 'कायदा आणि सुव्यवस्था' ही एकच बाब अशी आहे, की जिच्यामध्ये सर्व लोक सारखे आहेत. तेव्हा 'एक डोके, एक मत' या हिशेबाने निवडून आलेल्या सरकारला 'कायदा आणि सुव्यवस्था' राखण्याचे काम सोडल्यास दुसरं कोणतंही काम

देणं योग्य होणार नाही. कारण, त्यांनी तो अधिकार मिळवलेला नाही. फजले मतीन सारखे सबंध कुराण मुखोद्‌गत असलेले आणि ज्यांनी कुराण ग्रंथ कधी पाहिलेलाही नाही; पण उगाचच कुराणाच्या गप्पा मारतात, अशांना मुसलमान धर्मावरील चर्चेसाठी सारखे मानणे योग्य होईल का? मुळीच नाही. विद्वानांचं सरकार विद्वानांचं असलं पाहिजे, विद्वानांनी निवडलेलं असलं पाहिजे. गरिबांसाठी जर काही काम करायचं असेल, तर त्यासाठी, ज्यांच्या मनामध्ये गरिबांविषयी कणव आहे, एखादा उपाशी माणूस पाहिला, तर ज्यांच्या डोळ्यात टचकन पाणी येतं अशा मदर टेरेसांसारख्या व्यक्तींचं सरकार असलं पाहिजे. दारिद्र्यरेषेखालील लोकांची, गरिबांची यादी करण्यामध्ये ज्यांना पैसे कमवायचे असतात, त्या लोकांच्या हाती असं सरकार दिलं, तर गरिबांचं भलं होणं शक्यच नाही. 'गरिबी हटाव'च्या नुसत्या घोषणा देऊन गरिबी हटत नाही. आपल्या देशात 'गरिबी हटाव'चा एकच कार्यक्रम यशस्वी झाला, तो म्हणजे शिख समाजाच्या गुरुद्वारातील 'लंगर'. गरिबातील गरीब माणूससुद्धा या लंगरमध्ये जमेल ते काम करून दहापंधरा दिवस जगू शकतो. या कालावधीत तो बाहेर आपल्या लायक एखादा व्यवसाय शोधू शकतो. त्यामुळे, आपल्या असं लक्षात येईल, की इतर सगळ्या धर्माचे भिकारी दिसतात; पण शिख अल्पसंख्य असले तरी, शीख धर्माचे भिकारी सापडत नाहीत. 'गरिबी हटाव'चा हा कार्यक्रम यशस्वी होण्याचं एकमेव कारण म्हणजे त्यांच्याकडील 'लंगर' ही कनवाळूपणाची, करुणेची संस्था राजकीय पुढाऱ्यांच्या हाती दिलेली नाही, तर ज्यांच्या हाती धर्म आहे त्यांच्या हाती आहे आणि धर्माची प्रेरणा करुणा ही आहे, मग तो धर्म कोणताही असो. 'गरिबी हटाव'सारखं करुणेचं काम, जनकल्याणाचं काम त्यांच्या हाती राहू दिलं म्हणजे ते होतं.

आम्ही सरकार या संस्थेच्या विरुद्ध नाही. तर सरकार वेगवेगळ्या स्वरूपांत, विविध प्रकारचं असलं पाहिजे आणि तरच ते कार्यक्षम होऊ शकतं असा आमचा विश्वास आहे. शेतकरीही जाणतो, की झाडं लावायची झाली, तर एकाच प्रकारची झाडं लावू नयेत, त्यांची लागवड चांगली होत नाही. चांगली लागवड करायची असेल, तर वेगवेगळ्या प्रकारची झाडं लावली पाहिजेत. अशा वेगवेगळ्या झाडांची लागवड केली म्हणजे त्यांची तुलना करता करता आपल्याला काही समजतं, जमिनीचंही भलं होतं आणि त्या वनस्पतींचंही भलं होतं. त्याऐवजी, कोणी जर म्हणालं एकाच प्रकारची झाडं लावा – मोनोकल्चर – जसे निलगिरी, सुबाभूळ वगैरे – तर ती भलेपणाची नसेल. (भलेपणाची नसते याचा कटू

अनुभव अनेक शेतकऱ्यांनी घेतला आहे.) तसंच, जर कोणी सांगू लागला, की सगळ्यांना हिंदू करा किंवा कोणी सांगू लागला, की सगळ्यांना मुसलमान करा तर हे 'मोनाकल्चर' करणारे लोक जनतेचं भलं करू शकत नाहीत. शेतकरी संघटनेची / स्वतंत्र भारत पक्षाची या विषयातील भूमिका किती स्पष्ट आहे, हे दाखविणारी उदाहरणे देणे सयुक्तिक होईल.

देशात समान नागरी कायदा करण्याची चर्चा सुरू झाली, तेव्हाच शेतकरी संघटनेने आपली भूमिका स्पष्ट केली. १९८६ च्या नोव्हेंबरमध्ये चांदवड येथे झालेल्या शेतकरी महिला अधिवेशनात समान नागरी कायद्याबाबत बुद्धिनिष्ठ ठराव करण्यात आला.

धर्म ही व्यक्तीची खासगी बाब आहे. ज्याला त्याला आपल्या बुद्धीला भावेल त्या धर्माचे आचरण करण्याचे स्वातंत्र्य असले पाहिजे, त्यामध्ये कोठे जबरदस्ती असू नये. धर्मग्रंथातही अशी जबरदस्ती असल्याचे सापडत नाही.

शेतकरी संघटनेतून उगम पावलेला स्वतंत्र भारत पक्ष, त्याचा मी राष्ट्रीय अध्यक्ष असून, या पक्षाचा खासदार म्हणूनच मी राज्यसभेत आहे. या पक्षाच्या जाहीरनाम्यात म्हटले आहे, की काश्मीरचा प्रश्न सोडविण्याचा एकच मार्ग आहे तो म्हणजे तेथील लोकांचे या विषयावर मतदान घ्यावे. त्यांची मते कशी नोंदवायची ते तुमचे तुम्ही पाहा. जसं, घरातील एखाद्या व्यक्तीला – ती बाई असो की पुरुष – घरात नांदायचे नसेल तर त्याला वेगळे होण्याची मोकळीक असली पाहिजे, संधी असली पाहिजे, तसंच ज्या राज्यातील लोकांना आमच्याबरोबर राहण्याची इच्छा नाही, त्यांना वेगळं होण्याची मोकळीक असली पाहिजे.

कोणाचंही स्वातंत्र्य आम्ही नाकारत नाही. समान नागरी कायद्यासंबंधी ठराव आणि काश्मीर प्रश्नासंबंधी आम्ही सुचविलेला कार्यक्रम हा त्याचा लेखी पुरावा आहे.

समान नागरी कायदा नको आणि काश्मीरच्या लोकांना सार्वमताची संधी मिळाली पाहिजे असं म्हणण्याची हिंमत आम्ही दाखवू शकतो; कारण आम्ही शास्त्रशुद्ध विचार करणारी माणसं आहोत. आम्ही हिंदू म्हणून विचार करीत नाही आणि मुसलमान म्हणूनही विचार करीत नाही; आम्ही शुद्ध विवेकाने विचार करणारी माणसे आहोत.

मला सर्व धर्म टिकले पाहिजेत. सर्व धर्म टिकले पाहिजेत, एवढ्याकरिता, की मी जर फक्त गीताच शिकलो आणि इतर धर्मग्रंथांची काहीच ओळख झाली नाही, तर त्याला काही महत्त्व राहत नाही. एकच एक पीक घ्यायला शिकलो

तर त्याला कोणी शेतकरी म्हणेल काय? मला वेगवेगळ्या विचारवंतांनी, वेगवेगळ्या थोर माणसांनी, येशू ख्रिस्तासारख्या प्रेषितांनी–माणसांनी करुणा म्हणजे काय म्हटले आहे, हे समजलं पाहिजे; कृष्ण एका वेळी रणांगणातून पळून का आला, हे समजलं पाहिजे आणि तसं दुसऱ्या वेळी, सबंध भारताचा विनाश होणार आहे, हे माहीत असतानासुद्धा तो अर्जुनाला 'युद्ध कर' असं का सांगतो, हेही समजलं पाहिजे. विविधतेतून माणसाची अनुभूती वाढते, ज्ञान वाढते.

जे कोणी सर्व माणसांना एकाच साच्यात बसवून, शिस्त आणण्याचा प्रयत्न करतात, सगळ्या लोकांनी खाकी कपडे घालून 'टॉक टॉक' करीत चालावं म्हणतात, त्यांना मनुष्य जातीचे वैशिष्ट्यच कळलेले नसते. प्रत्येक मनुष्य निसर्गाने तयार करताना वेगळा वेगळा तयार केलेला असतो. एका माणसाच्या अंगठ्याचा ठसा दुसऱ्या माणसाच्या अंगठ्याच्या ठशाशी जुळत नाही. ही केवळ अंगठ्याची गोष्ट, अख्ख्या माणसांत सारखेपणा कसा असणार? महिन्या-दोन महिन्यांचं मूल हातात घेताना मला प्रत्येक वेळी मोठं नवलं वाटतं. मला अजून दोन बाळं अशी भेटलेली नाहीत, की ज्यांच्या चेहऱ्यावरचे भाव सारखे आहेत. त्यांचा काही अनुभव नाही, अजून आईच्या मांडीवरच आहेत; पण प्रत्येक बाळाचा चेहरा वेगळा... अशी अद्‌भुत किमया निसर्गाने केली, ती काही कोणीतरी सगळ्यांना सारखे कपडे घालावे आणि सगळ्यांच्या तोंडून एकसारखं बोलणं काढावं यासाठी खचितच नाही.

प्रत्येक माणसाला विविधतेचा अनुभव घेता आला पाहिजे, हे माझ्या तत्त्वज्ञानाचं महत्त्वाचं सूत्र आहे.

आणि हा अनुभव घेण्यासाठी प्रत्येक माणसाला त्याच्या स्वातंत्र्याच्या कक्षा क्षमतेनुसार रुंदावण्याची मोकळीक असली पाहिजे. ही मोकळीक केवळ भौतिक बाबतीतच नव्हे, तर बौद्धिक बाबतीतही असायला हवी.

मला सर्व धर्म हवेत. पुष्कळसे हिंदुत्ववादी लोक मिशनरी लोकांनी आमच्या लोकांना ख्रिश्चन केले, मुसलमानांनी आमच्या लोकांना मुसलमान केले अशी ओरड करतात; अशा तऱ्हेच्या धर्मांतरावर बंदी घालावी असा आग्रह धरतात. माझं असं म्हणणं आहे, की प्रत्येक माणसाला त्याच्या विचाराने धर्मांतर करण्याचा अधिकार असला पाहिजे. मला पटलं, तर मी धर्मांतर का करू नये? लहानपणी माझ्या मनात विचार होता, की दर दिवसाला, दर महिन्याला न का होईना निदान तर वर्षाला एक धर्म बदलावा, म्हणजे सर्व धर्मांचं आकलन होईल.

मला सगळे धर्म हवेत; कोणी नवीन धर्म काढला तर तोसुद्धा हवाच. पण, धर्माच्या नावाखाली लोकांमध्ये तेढ निर्माण करणारांचा धर्म नको. प्रत्येक धर्माचा संस्थापक जेव्हा होता, तेव्हा त्या महात्म्याने असे काही केले नाही, असे काही मांडले नाही, की ज्यामुळे माणसामाणसांमध्ये तेढ वाढेल. गांधीवाद महात्मा गांधींनंतर तयार झाला. गांधींनी स्वत: म्हटलं होतं, की गांधीवाद असं जर काही असेल, तर मी गांधीवादी नाही.

पण या महात्म्यांचे जे शिष्य तयार होतात, ते आपापला गठ्ठा बांधायचे प्रयत्न सुरू करतात. ज्या भागात मेंढ्यांचे खूप कळप पाळले जातात, तेथील धनगरांना मोठी चिंता असते. खरं तर त्यांना खात्री असते, की मेंढरं जरी इकडची तिकडे गेली, तरी आपापली मेंढरं वेळ होताच आपापल्या घरी येतील; पण चुकून एखादं मेंढरू कमीजास्त झालं आणि शेजारी मेंढपाळाबरोबर वाद झाला, तर आपलं मेंढरू आपलं आहे, हे सिद्ध करायचं कसं? मग ते काय करतात? एखादा धनगर आपल्या मेंढरांच्या शेपट्यांचे थोडे थोडे केस कापून एकसारखी खूण करतो; कोणी आपल्या मेढरांच्या पाठीवर ठराविक रंग लावतो, कोणी काय, कोणी काय... प्रत्येक जण आपल्या कळपातील मेंढरांना एकएक वेगळी खूण तयार करण्याचा प्रयत्न करतो. तसंच धर्माच्या नावाने कळप तयार करणाऱ्या धर्मवाद्यांनी केलं. कोणी म्हणतो डोक्यावर शेंडी ठेवा, तर कोणी म्हणतो डोक्यावर नको हनुवटीवर केस ठेवा; कोणी म्हणतो सगळेच केस वाढवा. कशासाठी? ज्याला त्याला आपली 'मेंढरं' सांभाळायची असतात आणि म्हणून असल्या प्रकारची जी काही रूढी माणसांवर लादली जाते, त्यामध्ये या सगळ्या माणसांना आपले व्यक्तिमत्त्व गमवावे लागते. सगळ्या सरदारजींना सांगितलं, दाढी वाढवायची, सगळे दाढी वाढवून सारखेच दिसायला लागले. जरा वेगळे दिसू द्या की? पण सारखे दिसण्याची गरज सरदारजींची नाही, गरज मूळ मेंढपाळांचीही नाही; गरज मेंढपाळांच्या पोरांची आहे. मला सगळ्या लोकांना ते आहेत त्या वेगवेगळ्या स्वरूपात एकत्र करायचे आहे. मला माझ्या विद्यापीठाचा 'सीड प्लॉट' घ्यायचा आहे. पण, म्हणजे मी मिळेल ते बियाणे आणि मिळेल ती जमीन घेऊन हे करणार नाही. दोन्ही मी पारखून घेणार आहे.

मला एक एक समाज एका कामाकरिता उभा करायचा आहे. माझं जे काम आहे, ते हिंदूंचं काम नाही, ब्राह्मणांचं काम नाही, मुसलमानांचं काम नाही. मी शेतकरी संघटना काढून, या कामात का पडलो, हे अनेकवेळा सांगितलं आहे.

माझ्या वाडवडिलांची एक इंच जमीन नसताना, माझ्या मागील पाच पिढ्यांमध्ये कोणीही शेतकरी नसताना मी शेतकरी झालो आणि शेतकरी संघटनेचं काम चालू केलं; कारण मी स्वातंत्र्याचा सैनिक आहे. माझ्या मनाप्रमाणे, माझ्या स्वभावाप्रमाणे, माझ्या प्रकृतीप्रमाणे मला प्रयोग करण्याची संधी पाहिजे.

मी ईश्वर मानतो का? हो, मी ईश्वर मानतो. पण, मी ईश्वर खासगीचा मानतो. मी माझ्या ईश्वराची साधना माझ्या घरामध्ये करतो. हे माझं खासगी प्रकरण आहे. जसं, वयात आलेल्या दोन व्यक्तींनी एकमेकांत कसा व्यवहार करावा यासंबंधी त्यांना संपूर्ण स्वातंत्र्य आहे, त्यावर दुसऱ्या कोणाचंही बंधन असता कामा नये. माझं आणि ईश्वराचं नातं प्रेमिकाचं आहे, खासगीचं आहे. मी त्याला इतका जवळचा समजतो, की माझ्या ईश्वराची पूजा करण्याच्या किंवा आराधना करण्याच्या माझ्या हक्काच्या आड कोणी आलेलं मला खपणार नाही.

मूर्तिपूजा उचित का अनुचित असाही एक धर्माधर्मांत वाद निर्माण करणारा विषय. ज्याला मूर्तिपूजा सार्थ वाटत असेल, त्याचा त्याच्या खासगी आयुष्यात ती करण्याचा हक्क डावलता येणार नाही. ज्याला ती निरर्थक वाटेल, त्याच्यावर ती करणे लादता येणार नाही. मी सध्या माझ्या घरात मूर्तिपूजेचा एक प्रयोग करीत आहे. या प्रयोगातून मला अशी खात्री वाटू लागली आहे, की आपण निर्जीव मूर्तिमध्येही देवपण घालू शकतो. अर्थात हा माझ्या खासगी प्रयोगाचा निष्कर्ष आहे, तो मी कोणावर आग्रहाने लादणार नाही.

तर, अशी माझी धर्मासंबंधी व्यापक कल्पना आहे. अनेक धर्म पाहिजेत, तसेच असणे साहजिक आहे. संस्कृतमध्ये 'धारयति इति धर्म:' अशी धर्माची व्याख्या केली आहे. म्हणजे ज्याच्यामुळे जीव जगवता येतो तो धर्म. वेगळ्या शब्दांत सांगायचे तर जो दररोजचे व्यवहार चालवू देतो, तो धर्म. आता, प्रत्येक मनुष्य वेगळा आहे, हे मान्य असेल तर हा धर्म सामूहिक कसा असेल? प्रत्येक मनुष्य वेगळा आहे, मी काय बोलतो त्याचा अर्थ तुम्ही तुमच्या प्रकृतीप्रमाणे समजणार, तुम्ही काय बोलता त्याचा अर्थ मी माझ्या प्रकृतीप्रमाणे घेईन. मग, सगळ्यांनी एकच भाषा वापरली, एकच प्रार्थना म्हटली, एकच गीता वाचली किंवा एकच कुराण पढले; तरी प्रत्यक्षामध्ये त्याचा अर्थ वेगवेगळा असणार. कारण तुमची प्रकृती वेगवेगळी असते. हे एकदा मान्य केले, की सामूहिक धर्म ही धर्माधिपतींची किंवा पीठाधिपतींची फक्त सोय आहे असा निष्कर्ष निघतो. या सामूहिक धर्मकल्पनेच्या धोक्यातून मनुष्यजातीला आणि मनुष्यप्राण्याच्या व्यक्तिमत्त्वाला जगवायचं कसं, हा सगळ्यांत महत्त्वाचा प्रश्न आहे.

मी स्वातंत्र्याचा सैनिक म्हणून हिंदुस्थानात आलो. शेतकऱ्यांचा प्रश्न हाती घ्यायच्या आधी शेतकरी बनून, शेतीचा आणि शेतीच्या अर्थकारणाचा अभ्यास केला आणि सगळ्यांत जास्त अन्याय कोणत्या बहुसंख्यांवर होत असेल, तर ते शेतकरी आहेत, असे माझ्या लक्षात आले आणि मी या बहुसंख्याक अन्यायग्रस्तांच्या-शेतकऱ्यांच्या स्वातंत्र्यापासून सुरुवात केली. शेतकरी आंदोलन उभं राहिलं, शेतकरी आंदोलन फोफावलं हे खरं आहे. लोकांनी मला खूप मानलं आणि निवडणुकीत लोकांनी मला खूप पाडलंही. त्याचा राग कोणावर काढायचा? मनुष्याच्या मृत्यूनंतर पापपुण्याचा पाढा वाचण्याबद्दल वेगवेगळ्या धर्मांत वेगवेगळ्या कल्पना आहेत. मुसलमान धर्मात कयामतची कल्पना आहे. त्या दिवशी अल्लासमोर मृताच्या आत्म्याने आपला हिशेब द्यायचा असतो. हिंदू धर्माच्या कल्पनेप्रमाणे माणसाच्या पापपुण्याची दैनंदिन नोंद चित्रगुप्ताने आधीच ठेवलेली असते. त्यामुळे मरताक्षणीच त्याचा हिशेब करून, त्याची स्वर्गात किंवा नरकात रवानगी केली जाते. मला जर का कयामतची संधी मिळाली तर मी काय जबाब देईन? मी म्हणेन, 'माझ्या मनात जे काही मी करायला पाहिजे असे होते, ते मी माझ्या शक्तीनुसार केलं. लोकांनी मला फळ दिलं नाही, तरी माझी खात्री आहे, की अल्ला माझ्यावर रागावणार नाही.' त्यावर अल्ला म्हणेल, 'तुझ्या मनात जेवढं होतं, तेवढं केलंस ना? शाब्बास!'

माझी खात्री आहे, की अंतिम विजय स्वातंत्र्याचाच होणार आहे आणि म्हणून मी हा सगळा प्रयत्न चालवला आहे. यामध्ये माझी एक व्यावहारिक गरज आहे.

जगात एक फार मोठं युद्ध चालू आहे. या युद्धात तोफा नाहीत, सैन्य नाही, आक्रमण नाही; यात आगी लागत नाहीत, अत्याचारही होत नाही, खूनखराबा होत नाही. या युद्धात एका बाजूला माझ्यासारखे 'स्वातंत्र्य हवे' म्हणणारे लोक तर दुसऱ्या बाजूला 'स्वातंत्र्य नको, कोणीतरी मध्यस्थ हवा' म्हणणारे लोक आहेत. माझा ईश्वर-अल्ला आणि मी यांच्यामधील संबंधात मध्यस्थ कोणी नाही असे म्हणणारे सगळे माझ्यासारखे स्वातंत्र्यवादी एका बाजूला आहेत आणि 'मधे सरकार पाहिजे,' आणखी कोणत्या संस्था हव्यात, संघटना हव्यात, कोणीतरी प्रमुख पाहिजे,' असे म्हणत मेंढपाळ होऊ पाहणारे कळपवादी दुसऱ्या बाजूला. अशा स्वातंत्र्यवाद्यांचं आणि कळपवाद्यांचं मोठं युद्ध जगभर चालू आहे. १९८० मध्ये शेतकरी संघटना उभी करून शेतकऱ्यांच्या सैन्याच्या साहाय्याने मी हे युद्ध सुरू केलं. १९९१ मध्ये डॉ. मनमोहन सिंगांनी खुल्या व्यवस्थेकडे

जाणारं पहिलं अंदाजपत्रक जाहीर केलं, तेव्हा मला वाटलं, की आपण हे युद्ध जिंकत आहोत. पण, नंतर माझ्या असं लक्षात यायला लागलं, की माझी फौज मागे हटते आहे. ही स्वातंत्र्याची फौज मागे हटता हटता, आज दिल्लीमध्ये स्वातंत्र्य नको म्हणणाऱ्या, लायसन्स-परमिट-कोटा राजच असावे असा आग्रह धरणाऱ्या डाव्या गटांच्या नादाने, त्यांच्या तालावर चालणारे संयुक्त पुरोगामी आघाडीचे सरकार आले आहे.

आपल्याला एक निर्णय करायचा आहे. काही माणसं हिंदुत्ववादी म्हणून बदनाम झाली आहेत. त्यांचा हिंदुत्ववाद काय आहे, ते मी चांगलं ओळखतो. दुसऱ्या बाजूला माणसांच्या स्वातंत्र्यावर घाला घातला पाहिजे असे म्हणणारी डावी मंडळी आणि त्यांच्या दबावाखालील सरकार. यांतून निवड करायची आहे. डाव्या मंडळींना – कम्युनिस्टांना मवाळ करणं अशक्य आहे; कारण ते कर्मठ लोक आहेत. हिंदुत्ववादी म्हणून बदनाम झालेल्यांना मी बदलीन असा मला आत्मविश्वास वाटतो. म्हणून सध्या मी त्यांचा आधार घेतला आहे.

भिडस्तपणे कोणी विचारणार नाही; पण काही लोकांच्या मनात शंका आली असणार, की 'स्वतंत्र भारत पक्ष राष्ट्रीय लोकशाही आघाडीत आहे म्हणजे तो भारतीय जनता पक्षाचं नेतृत्व मानतो. मग आताच शरद जोशींना मुसलमानांची आठवण कशी काय झाली?'

माझं ध्येय स्वातंत्र्याचा मार्ग खुला करण्याचं आहे – शेतकऱ्यांना स्वातंत्र्य, महिलांना स्वातंत्र्य, दलितांना स्वातंत्र्य, मुसलमानांना स्वातंत्र्य... पण, या फौजेमध्ये मला दोन मोठे धोके दिसतात.

एक दलितांमध्ये. खरे म्हणजे दलित हे शोषित आहेत. त्यांना जितकं स्वातंत्र्य मिळेल तितकं त्यांचं भलं होणार आहे. पण, राखीव जागांच्या मागे लागलेले दलितांचे नेते राखीव जागांमुळे कळपवाद्यांचा फायदा होतो म्हणून सरकारशाही वाढवायला बघतात. सरकारशाही वाढली म्हणजे सरकारी नोकऱ्या वाढल्या, सरकारी नोकऱ्या वाढल्या म्हणजे राखीव जागा वाढल्या आणि राखीव जागा वाढल्या म्हणजे आपला कळप वाढला असे त्यांचे सरळ सरळ गणित. या सरकारच्या नोकरशाहीमुळे कितीक शेतकऱ्यांचे, कितीक उद्योजकांचे वाटोळे झाले तरी हरकत नाही; पण सरकारशाही वाढू द्या अशी या नेत्यांची धारणा आहे.

दुसरा धोका हिंदू आणि मुसलमान यांच्यातील तेढ जागती ठेवणारांचा. खरं तर अरबस्थानसारख्या अत्यंत कठीण परिस्थितीत सगळ्या जगाला लागू होणारा

धर्म मांडला गेला आणि त्या धर्माचा प्रसार होता होता, आज निम्म्याच्या वर जग इस्लामला मानणारे आहे. इस्लामचे एकसंध बंधुत्व मानणारा, इमान मानणारा, इज्जत मानणारा एक सबंध समाज तयार आहे. त्या समाजाचे नेते म्हणवणारे समाजाचे प्रश्न समजून घ्यायला कधी येत नाहीत. मुसलमानांच्या रोजगाराची परिस्थिती काय आहे, त्यांची आर्थिक परिस्थिती काय आहे, त्यांची मिळकत काय आहे याची चर्चा हे नेते कधी करीत नाहीत. ते फक्त आपल्या मुसलमानपणाचे नाव घेत, मुसलमान समाजाला भडकावून, इतर समाजापासून वेगळं करतात. हिंदू समाजाचे नेते म्हणवणारांनीही हिंदू समाजाच्या मनात तसंच भरवलं. या दोन्ही समाजांच्या नेत्यांनी आपापल्या समाजांना वेगवेगळ्या कोंडवाड्यात घातले आहे. आज मुस्लिम समाजाचे नेते मुसलमानांना सांगत आहेत, की सगळं जग खुलं होत आहे, भिंती पडत आहेत, ही फार धोक्याची गोष्ट आहे. वर त्यांनी म्हटलं नाही म्हणजे नशीब, की 'इस्लाम खतरे में है ।'

ज्या इस्लामची सुरुवातच मुळात भिंती पाडण्याच्या कल्पनेने झाली, त्या समाजाच्या आजच्या नेत्यांनी त्यांना सांगावे, की जर भिंती पडत गेल्या, तर 'इस्लाम खतरे में है ।' ही इस्लामच्या दृष्टीने मोठी शोकांतिका आहे.

माझ्या स्वातंत्र्याच्या लढाईसाठी फौजेची पुनर्बांधणी म्हणून मला ज्या नव्या जोमाच्या फलटणी उभ्या करायच्या आहेत, त्यांत मुसलमान समाजाची फलटण असणार आहे. मुसलमान समाजात इमानानं काम करणारी माणसं आहेत, आजचा रोजगार सुटला, तर भिकेचा मार्ग न धरता, दुसऱ्या दिवशी दुसरा रोजगार शोधण्याची हिंमत असणारी माणसे आहेत, हे आपल्याला वेळोवेळी अनुभवायला मिळतं. अशा खऱ्याखुऱ्या उद्योजक माणसांची फलटण मला उभी करायची आहे. हा समाज स्वातंत्र्याच्या लढाईत माझ्या बाजूने असणे मला आवश्यक आहे. आवश्यक तर या समाजाचं उदाहरण मला बहुसंख्याकांसमोरही ठेवायचं आहे. अल्पसंख्याक आघाडीच्या माध्यमातून मी अशा उद्योजक माणसांची एकी साधतो आहे, पोथीनिष्ठ लोकांची नाही. जे केवळ शब्द वाचतात आणि त्या शब्दांच्या आधाराने आपल्या स्वार्थाचे समर्थन करतात, त्यांना येथे स्थान नाही. पैगंबराची प्रेरणा काय होती, हे ज्यांना समजले आहे, त्या काळच्या अत्यंत वेगळ्या परिस्थितीमध्ये कुराणाने जे काही सांगितले, ते समजावून घेऊन, आज पैगंबर असते, तर आजच्या या परिस्थितीत त्यांनी काय आदेश दिला असता, तो जे समजून घेतील, अशा लोकांची मला एकी करायची आहे. हा इस्लामचा खरा विजय असेल; पण जर कोणी असं म्हणायला लागलं, की स्वातंत्र्य

मिळाल्यामुळे इस्लामचा नाश होणार आहे, तर इस्लाम खरंच 'खतरे में' आहे.

थोडक्यात, मला मी सुरू केलेल्या स्वातंत्र्याच्या लढाईत स्वातंत्र्याच्या सैनिकांची पीछेहाट होताना दिसते आहे; म्हणून मी माझ्या फौजेची पुन्हा बांधणी करतो आहे. अल्पसंख्याक आघाडीचे हे पहिले शिबिर म्हणजे या पुनर्बांधणीच्या प्रक्रियेची सुरुवात आहे. स्वातंत्र्याचे हे युद्ध विजय मिळेपर्यंत चालूच राहणार आहे. नवीन बांधणीची फौज उभी राहिल्यानंतर जी लढाई होईल, तीमध्ये नेतृत्व करण्याची ताकद माझ्यामध्ये, कदाचित्, उरणार नाही; पण तुमच्यासारखे जे नवीन पिढीतील सेनापती तयार होत आहेत, त्यांच्यासाठी मी निदान फौजेची जमवाजमव तरी करून ठेवली. एवढी जरी माझ्या नावाने नोंद झाली, तरी कयामतच्या दिवशीसुद्धा अल्लाच्या समोर मी उन्नत माथ्याने उभा राहू शकेन.

(२१ जुलै २००५)

◆◆

खरोखरी स्वातंत्र्याचा जाहीरनामा

स्वतंत्र भारत पक्ष २६ ते २८ मे २००३ या काळात मुंबई येथे आपले पहिले राष्ट्रीय अधिवेशन भरवीत आहे. स्वतंत्र भारत पक्ष हा नोंदणी झालेला पक्ष आहे; पण त्याला अजून राष्ट्रीय पक्ष म्हणून मान्यता मिळालेली नाही. अजूनतरी त्याला अधिकृत निवडणूक चिन्हही मिळालेले नाही. नोंदणी झालेला पक्ष म्हणून त्याला 'विमान' या निवडणूक चिन्हावर अग्रक्रमाने दावा करता येतो. सध्याच्या घडीला त्याचे लोकसभेत किंवा विधानसभेत कोणी प्रतिनिधी नाहीत. पण, महाराष्ट्राच्या पंचायत राज्यामध्ये चंद्रपूर आणि गडचिरोली या दोन जिल्ह्यांमध्ये त्याचा चांगला ताबा असून, राजुरा, कोरपना, वरोरा, कुरखेडा, समुद्रपूर आणि जालना या तालुक्यांच्या पंचायत समित्यांमध्ये त्याचा बऱ्यापैकी प्रभाव आहे. शिवाय, अनेक सोसायट्या, ग्रामपंचायती यांवरही स्वतंत्र भारत पक्षाच्या सदस्यांनी आपले वर्चस्व प्रस्थापित केले आहे.

वेगवेगळ्या संस्थांमधील या प्रतिनिधींची संख्या पाहता, स्वतंत्र भारत पक्ष तसा लहानखुराच पक्ष आहे असे म्हणावे लागेल. पण, हा पक्ष अस्तित्वात आहे याचेच मोठे नवल अनेकांना वाटावे. कोणत्याही राजकीय पक्षाला नोंदणी करून घ्यायची असेल, तर लोकप्रतिनिधित्व कायदा १९८९ च्या कलम २९(अ) अन्वये त्याला, प्रतिज्ञापत्र लिहून देऊन, धर्मनिरपेक्षता, लोकशाही आणि समाजवाद या तत्त्वांशी आपली बांधिलकी असल्याची शपथ घ्यावी लागते. निखळ स्वतंत्रतावादी असलेल्या स्वतंत्र भारत पक्षाला समाजवादाशी बांधिलकी असल्याची शपथ घेणे म्हणजे धर्मसंकटच. व्यक्तिस्वातंत्र्य, विविधतेतील एकमेवता आणि बाजारपेठेवर आधारित अर्थव्यवस्था यांचे कंकण बांधलेल्या स्वतंत्र भारत पक्षाने लोकप्रतिनिधित्व कायदा, १९८९ च्या कलम २९(अ) च्या वैधतेलाच आव्हान देऊन, मुंबईच्या उच्च न्यायालयात याचिका दाखल केली असून, ती

कित्येक वर्षे तिथे पडून आहे. ही याचिका सुनावणीसाठी का घेतली जात नाही, हे समजण्यापलीकडील आहे.

अभ्यासाच्या पातळीवर मात्र स्वतंत्र भारत पक्षाचा मोठा बोलबाला असून, त्याबाबतीत त्याला प्रतिष्ठाही लाभली आहे. शेतकऱ्यांना बाजारपेठेत उतरण्याचे, तसेच तंत्रज्ञान निवडीचे स्वातंत्र्य असावे या उद्देशांसाठी क्रियाशील असलेल्या, देशातील सर्व शेतकरी संघटनांचा या पक्षाला पाठिंबा आहे. स्वतंत्र भारत पक्षाच्या प्रवक्त्यांनी आर्थिक सुधार, जागतिक व्यापार संस्थेच्या करारावर मराकेश येथे शिक्कामोर्तब होण्यापूर्वीचा डंकेल प्रस्ताव, तसेच जैविक तंत्रज्ञानाने विकसित बी-बियाणे व खाद्यान्न यासंबंधीच्या राष्ट्रीय चर्चांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावली आहे. स्वतंत्र भारत पक्षाने १९९८ च्या निवडणुकांच्या आधी प्रसिद्ध केलेल्या निवडणूक जाहीरनाम्याचे एका प्रतिष्ठित 'गुलाबी' वृत्तपत्राने आपल्या संपादकीय पृष्ठावर 'दखलपात्र व्यवहारी जाहीरनामा' म्हणून वर्णन केले होते.

स्वतंत्र भारत पक्षाच्या 'लोकसभा व विधानसभा निवडणूक जाहीरनामा, २००४'चा मसुदा पक्षाच्या मुंबई अधिवेशनाच्या विषयपत्रिकेवरील मुख्य विषय असणार आहे. (शेतकरी संघटकच्या दिनांक २१ जानेवारी व ६ फेब्रुवारी २००३ च्या अंकात हा जाहीरनामा प्रकाशित करण्यात आला आहे. मसुद्याची इंग्रजी प्रत इंटरनेटवरून 'हींीं://ु.ीहशींज्ञरीळ.ींस/ुीरींरींीरम लहरीरींमरींीं/लिक्षशलींळींशी/ारळिषशींीं.हीं' या लिंकने मिळू शकेल)

संपूर्ण देशभरातून दहा लाखांहून अधिक शेतकरी स्त्रीपुरुष या राष्ट्रीय अधिवेशनाच्या खुल्या सत्राला हजर राहून त्याला इतिहासात स्थान मिळवून देतील. त्याचे कारणही तसेच आहे. स्वतंत्र भारत पक्षाने, चक्रवर्ती राजगोपालाचारींनी स्थापन केलेल्या, ज्याच्यावर पंडित नेहरूंनी आणि त्यांच्यानंतर इंदिरा गांधींनी अत्यंत हुशारीने राजेरजवाड्यांचा आणि भांडवलदारांचा पक्ष म्हणून शिक्का मारला होता, त्या स्वतंत्र पक्षाच्या आर्थिक तत्त्वज्ञानाचा वसा वारसा म्हणून स्वीकारला आहे. एके काळी स्वतंत्र पक्ष लोकसभेतील सर्वांत मोठा विरोधी पक्ष होता आणि त्याचे बहुतेक सर्व खासदार ग्रामीण मतदारसंघांतून निवडून आले होते. सहकारी शेतीचा ढाचा भारतीय शेतीवर लादण्याचा नेहरूंचा डाव प्रामुख्याने स्वतंत्र पक्षाच्या विरोधामुळे फसला, हे एक ऐतिहासिक सत्य आहे. १९५९ मध्ये भरलेल्या नागपूर येथील काँग्रेस अधिवेशनात भारतीय शेतीच्या सहकारीकरणाचा नेहरूंचा डाव यशस्वी झाला असता, तर अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण होऊन, जगाच्या कोणत्याही भागात निर्यात करण्याची आज

देशाला जी क्षमता लाभली आहे, त्याऐवजी पूर्वाश्रमीच्या सोव्हिएत रशियाप्रमाणेच भारतालाही अन्नधान्याच्या आघाडीवर मोठ्या कठीण परिस्थितीचा सामना करावा लागला असता.

स्वतंत्रतावादाला सरंजामदारी भांडवलशाहीचे नाव देऊन, जुन्या स्वतंत्र पक्षाच्या विरोधात जो दुष्ट प्रचार केला गेला, त्याचा डाग धुऊन काढण्यात स्वतंत्र भारत पक्ष यशस्वी झाला आहे. या वेळी हा स्वतंत्रतावादी पक्ष प्रामुख्याने, शेतीवर जगणाऱ्या शेतकरी आणि शेतमजुरांच्या भक्कम पाठिंब्यावर उभा राहिला आहे. सहकारी संस्थांचा कंपू, साखर सम्राट आणि त्यांचा गोतावळा, अर्थातच, स्वतंत्र भारत पक्षाच्या जवळ येण्याचे कटाक्षाने टाळतात; कारण त्यांना नेहमी सत्तारूढ पक्षाच्या मागे राहणे अपरिहार्य असते.

स्वतंत्र भारत पक्षाची निवडणुकांमधील कामगिरी काहीही असो, आर्थिक सुधारांसंबंधी चर्चेतील त्याच्या सहभागाला दखलपात्र म्हणून नेहमीच मान्यता राहील. त्याशिवाय, मुंबईत होणाऱ्या अधिवेशनाला त्यासाठी उपस्थित राहणाऱ्या शेतकऱ्यांच्या प्रचंड संख्येमुळे विशेष महत्त्व प्राप्त होणार आहे. देशभरातून लोटणारा हा शेतकऱ्यांचा समाज स्वत:च्या खर्चाने प्रवास करून येणार असून, राहण्याजेवण्याची सोयही स्वत:ची स्वत:च करणार आहे. राहण्याजेवण्याची सोय म्हणजे आकाशाच्या छताखाली झोपणे आणि घरून बांधून आणलेल्या शिदोरीवर भूक भागविणे; अशा प्रसंगी इतर पक्षांकडून पुरविल्या जाणाऱ्या सोयीसुविधांची ते स्वतंत्र भारत पक्षाकडून अपेक्षाही करणार नाहीत.

या सर्वच चमत्कारांच्या तुलनेत मध्य प्रदेशात सध्या जे चालले आहे, त्याच्याकडे दृष्टिक्षेप टाकणे उचित ठरेल. गुजराथमधील निवडणुकीतील इंदिरा काँग्रेसच्या दारुण पराभवानंतर मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री श्री. दिग्विजय सिंग यांनी त्यांच्या राज्यातील येत्या विधानसभा निवडणुकीत त्याचा वचपा काढण्याची प्रतिज्ञा केली आहे. भारतीय जनता पक्ष अशा आव्हानावर गप्प थोडाच बसणार! त्यांनी मध्य प्रदेशातील रस्ते व वीजपुरवठा यांच्या परिस्थितीबाबतीत दिग्विजय सिंग सरकारच्या भिकार कामगिरीविरुद्ध आंदोलन करण्यासाठी शेतकऱ्यांची जमवाजमव सुरू केली आहे. सध्या त्यांची निवडणूकप्रचाराची मोहीम सुरू करण्यासाठी भव्य शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्याची तयारी सुरू आहे. शेतकऱ्यांना मोठ्या संख्येने गोळा करून, त्यांना चांगले खाऊपिऊ घालून आणि 'हिंदुत्व किसान मेळाव्या'ला साजेशा वेशभूषेमध्ये सजवून, वाहतुकीची खास व्यवस्था करून, मेळाव्याला आणावे अशा सूचना त्यांच्या सर्व जिल्हा शाखांना

रवाना झाल्या आहेत.

इंदिरा काँग्रेसच्या अध्यक्षा मॅडम सोनिया गांधी यांना देशात कोठेतरी, जमल्यास दिल्लीतच, आपल्या पक्षाचा खरोखरीच प्रचंड शेतकरी मेळावा व्हावा अशी आतुरता लागली आहे. त्यासाठी त्यांनी काही शेतकरी नेत्यांशीही संपर्क साधण्याचा प्रयत्न केला; पण त्यात फारसे यश आलेले दिसत नाही. मध्य प्रदेशात भारतीय जनता पक्ष किसान मेळावा घेत आहे म्हटल्यावर काँग्रेस पक्षाला आणि त्याच्या अध्यक्षांना मध्य प्रदेशातच त्यांच्या तोडीस तोड किसान मेळावा घेणे भाग आहे; त्यांच्या आधीच जमले तर उत्तमच. दुर्दैवाने, दिग्विजय सिंग मंत्रिमंडळाची कामगिरी, भयाण नसली तरी, इतकी तोटकी आहे, की शेतकऱ्यांना काँग्रेस पक्षाच्या पाठिंब्याचे प्रदर्शन करण्यासाठी गोळा करण्याच्या त्यांच्या पक्षाच्या दलालांच्या प्रयत्नांकडे शेतकरी काणाडोळा करतील.

काही झाले, तरी काँग्रेसला शेतकऱ्यांच्या पाठिंब्याचा देखावा करणे गरजेचेच आहे. त्यामुळे त्यांनी आता मध्य प्रदेशात नव्हे, तर ज्यांना व्यापारी शेतीमध्ये फारसे स्वारस्य नाही अशा, प्रामुख्याने आदिवासींचा भरणा असलेल्या छत्तीसगडमध्ये मेळावा घेण्याचे पक्के केले आहे आणि तोसुद्धा शेतकरी मेळावा म्हणून नव्हे, तर पक्षाध्यक्षा सोनियाजींचा गौरव मेळावा म्हणून आणि हे क्रमप्राप्तच आहे; कारण काँग्रेस पक्षाच्या दृष्टीने, लेचेपेचे असले तरी, त्यांच्या अध्यक्षा हे एकुलते एक हुकुमाचे पान आहे.

सरकार शेतकऱ्यांवर जाणूनबुजून उणे सबसिडी लादीत आहे, हा सिद्धांत स्वतंत्र भारत पक्षाला पाठिंबा देणाऱ्या शेतकरी संघटनांनी १९८० च्या दशकातच पुढे मांडला. काँग्रेस, जनता आणि भारतीय जनता पक्ष या भिन्न भिन्न विचारसरणीच्या पक्षांच्या सरकारांनी शेतीमालाच्या किमती खालच्या पातळीवर ठेवण्याच्या उद्देशाने शेतीक्षेत्रासंबंधी बाजारपेठेत केलेल्या हस्तक्षेपाविरुद्ध या संघटनांनी वेळोवेळी मोठी आंदोलने केली आहेत. आज जिल्हा शेतीमालाच्या रास्त भावाची चळवळ म्हटली जाते, त्या चळवळीचे ते बिनीचे शिलेदार आहेत. भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्वाखालील सध्याची सत्तारूढ राष्ट्रीय लोकशाही आघाडी, काँग्रेस पक्ष, तसेच तिसऱ्या आघाडीतील पक्षांसहित सर्वच पक्षोपपक्ष आपल्या कार्यक्रमात आणि निवडणूक जाहीरनाम्यात शेतीमालाच्या रास्त भावाचे आश्वासन देतात – रास्त भाव न मिळण्यास कारणीभूत असणाऱ्या सध्याच्या किमान आधारभूत किमती, प्रशासित किमती आणि धान्याची सक्तीची खरेदी या व्यवस्था चालूच ठेवण्याऐवजी रास्त भाव मिळण्यासाठी ते काय

उपाययोजना करणार, त्याबद्दल त्यात अवाक्षरही काढलेले नसते.

नेमके याच बाबतीत स्वतंत्र भारत पक्षाच्या निवडणूक जाहीरनामा-२००४ च्या मसुद्याचे खास वेगळेपण आहे. रास्त भावाच्या मागणीचे ज्यांनी सूतोवाच केले, त्या सर्व शेतकरी संघटनांचा पाठिंबा असलेल्या स्वतंत्र भारत पक्षाच्या जाहीरनाम्यात आधारभूत किमती, सरकारी यंत्रणांमार्फत शेतीमालाची खरेदी यांचा संदर्भानेही कोठे उल्लेख केलेला नाही.

वास्तवात, स्वतंत्र भारत पक्षाच्या जाहीरनाम्याच्या या मसुद्यात शेतीमालाच्या व्यापारातील सर्व सरकारी हस्तक्षेप काढून टाकण्याचे आश्वासन दिले आहे. शेतीमालाच्या व्यापारात हस्तक्षेप करण्यासाठी सरकारने निर्माण केलेल्या भारतीय अन्न महामंडळ (ऋउख), जेनेटिक इंजिनिअरिंग ॲप्रुव्हल कमिटी (ऋएअउ), जीवनावश्यक वस्तु कायदा यांसारख्या सर्व यंत्रणा बरखास्त करण्याचे आणि शेतीमालाच्या साठवणुकीसाठी गोदामे उभी करून, गोदामात साठविलेल्या मालापोटी दिलेल्या पावत्या योग्य त्या कायद्यान्वये हुंडीप्रमाणे वापरता येऊ शकतील आणि त्यांच्या तारणावर शेतकऱ्यांच्या मालाच्या चालू बाजारभावाने होणाऱ्या किमतीच्या ७० टक्के रक्कम उचल म्हणून मिळू शकेल अशी, सरकारी बेड्यांपासून मुक्त गोदाम यंत्रणा उभी करण्याचे आश्वासन या जाहीरनाम्यात दिलेले आहे.

त्यापुढे जाऊन, देशात सरकार कोणत्याही पक्षाचे असो, त्याची आर्थिक ओढगस्त लक्षात घेऊन, स्वतंत्र भारत पक्षाने आपल्या जाहीरनाम्यात शेतीक्षेत्रासाठी अंदाजपत्रकी तरतुदीत वाढ करणे किंवा शेतकऱ्यांना अनुदान देणे अशा मुद्द्यांचा उल्लेखसुद्धा केलेला नाही. उलटपक्षी, कर्ज, वीजबिले यांची, तसेच इतर करांची थकबाकी यांच्या सक्तीच्या वसुलीस स्थगिती देण्याचे आश्वासन या जाहीरनाम्यात देण्यात आलेले आहे. आधुनिक बाजारव्यवस्थेचे आणि मालाच्या गुणवत्ता तपासणीसाठी व प्रमाणीकरणासाठी प्रयोगशाळांची साखळी निर्माण करण्याचे, तसेच ग्रमीण व शहरी भागांदरम्यान संगणकीय तंत्रज्ञानावर आधारित सुविधांच्या बाबतीत तयार झालेली 'डिजिटल' दरी बुजविण्याचे कार्यक्रम या जाहीरनाम्यात आवर्जून घालण्यात आले आहेत.

सत्तारूढ आणि विरोधी पक्षांतील पंडितांना छळणाऱ्या व्याजदर, भांडवलाची परिवर्तनशीलता अशा आर्थिक सुधारांसंबंधी बहुतेक समस्यांच्या सोडवणुकीसाठी स्वतंत्र भारत पक्षाचा हा जाहीरनामा चांगला मार्गदर्शक ठरेल. या जाहीरनाम्यात सध्या चर्चा चालू असलेल्या नोकऱ्यांतील राखीव जागा, समान नागरी कायदा,

स्थिर सरकार, कायदेमंडळात महिलांसाठी आरक्षण, घटनेचे कलम ३७० अशा बऱ्याच विषयांच्या बाबतीत उपाययोजना सुचविलेल्या आहेत; त्यांतील नोकऱ्यांतील आरक्षण सरसकट काढून टाकणे, समान नागरी कायद्याला विरोध आदींवर मोठा वादंग माजण्याचीही शक्यता आहे.

स्वतंत्र भारत पक्ष हा प्रामुख्याने प्रमुख उत्पादक असलेल्या शेतकऱ्यांच्या पाठबळावर उभा असल्यामुळे त्याच्या जाहीरनाम्याची भाषा शेतीक्षेत्राशी संबंधित असणे अपरिहार्य आहे; पण या जाहीरनाम्यात दिलेले सुधार कार्यक्रम देशातील सर्वच स्वतंत्रतावादी उत्पादक समाजघटकांना लाभकारक आहेत.

१. कायदा आणि सुव्यवस्था
२. शासनाच्या पसाऱ्याची छाटणी
३. शेती आणि बिगरक्षेत्रांतील आर्थिक सुधार
४. निवडणुकीसंबंधी सुधारणा आणि
५. विशेष भरपाईचे कार्यक्रम या तातडीच्या उपाययोजना

या सर्व तातडीच्या उपाययोजना देशाच्या एकूणच कारभारात आमूलाग्र बदल करून, सरकारी मदतीच्या कुबड्यांची अपेक्षा न करता, स्वत:च्या ताकदीवर देशाच्या उत्पादनात भर टाकण्याची तयारी असलेल्या स्वतंत्रतावादी, स्वाभिमानी आणि सामाजिक स्वास्थ्यासाठी आवश्यक असणाऱ्या विधायक कायद्यांची बूज राखण्याची बांधिलकी मानणाऱ्या नागरिकांना सरकारी हस्तक्षेपाच्या जाचातून मोकळे करणाऱ्या आहेत. गेली पन्नासपंचावन्न वर्षे सरकारशाहीच्या वरवंट्याखाली भरडून निघालेल्या आणि भ्रष्ट नेत्यांच्या मगरमिठीत गुदमरलेल्या भारतीय समाजाला असे काही घडावे असे मनोमन वाटते आहे; पण इंग्रजांनंतर स्वकीयांनीही केलेल्या वसाहती शोषणामुळे मनाची उभारी गमावलेला हा समाज स्वतंत्र भारत पक्षाबरोबर येण्यास कचरतो आहे. देशभरचे शेतकरी कार्यकर्ते बिगरशेतकरी स्वातंत्र्योत्सुक समाजघटकांशी संपर्क साधून, त्यांच्यातील स्वातंत्र्याच्या प्रेरणेला आवाहन करण्याचे प्रयत्न करीत आहेत. त्यांच्या प्रयत्नांत यश येऊन, ते बिगरशेतकरी समाजातील अशा उत्पादक घटकांना या अधिवेशनात बऱ्यापैकी संख्येने येण्यास प्रोत्साहित करू शकले, तर स्वतंत्र भारत पक्षाचे हे अधिवेशन पक्षाच्या वाटचालीला मोठा वेग देऊ शकेल.

स्वतंत्र भारत पक्षाला नजीकच्या भविष्यकाळात सत्तेवर येण्याची संधी फार कमी आहे. आपला जाहीरनामा प्रसृत करण्यामागील त्याचा उद्देश, अर्थातच, प्रशिक्षणात्मक आहे. स्वतंत्र भारत पक्षाच्या मुंबईत होणाऱ्या राष्ट्रीय अधिवेशनाने

जागतिक व्यापार संस्था आणि जैविक तंत्रज्ञान यांच्या युगातील शेतीचे तंत्र तसेच आर्थिक सुधारणांच्या दृष्टीने आवश्यक जबाबदाऱ्या यांसारख्या विषयांवर राष्ट्रव्यापी चर्चा सुरू झाल्या, तरी ते या अधिवेशनाचे मोठे यश ठरेल.

(६ मार्च २००३)

◆◆

बहुजन समाजाला क्रांतीची दुसरी संधी

शेतकरी संघटनेची राजकीय भूमिका जाहीर होणार आहे म्हटल्यावर एवढा अफाट जनसमुदाय जमा होतो, याचा अर्थ काय, जनतेच्या मनात काय चाललं आहे, हे आपल्या अजून नीट लक्षात आलेलं नाही. ही जी गर्दी जमते आहे, केवळ सोनिया गांधी देशी की विदेशी, जन्माने विदेशी व्यक्ती पंतप्रधान व्हावी का न व्हावी? एवढ्या काही किरकोळ विषयासाठी हा जनसमुदाय लोटत नाही. शेतकरी संघटनेची शेतकरी चळवळ एवढ्या किरकोळ विषयासाठी नाही. यामागे काही तरी फार मोठी ताकद लपलेली आहे आणि ती आपण समजावून घेणं आवश्यक आहे. काही लोक या चळवळीला परिवर्तनाची चळवळ म्हणतात; पण परिवर्तन हा शब्द घासून घासून इतका गुळगुळीत झाला आहे, की त्याचा नेमका अर्थ काय, हे कोणालाच सांगता येणार नाही. अनेक महिन्यांच्या चिंतनानंतर या चळवळीची परिवर्तनाची जी काही ताकद दिसते, ती आपल्यापुढे मांडण्याचा प्रयत्न मी करणार आहे.

अकराव्या लोकसभेची निवडणूक झाली, लोकसभा भरली, वाजपेयींच्या नेतृत्वाखाली एक मंत्रिमंडळ तयार झालं, ते तेरा दिवस टिकलं आणि गडगडलं. मग जनता दलाची लागोपाठ वेगवेगळी मंत्रिमंडळं झाली आणि आता मंत्रिमंडळ चालणं शक्य नाही असं दिसल्यानंतर लोकसभा बरखास्त होऊन, बाराव्या लोकसभेची निवडणूक झाली. पुन्हा लोकसभा टांगतीच. वाजपेयींचं दुसरं सरकार आलं, ते तेरा महिने टिकलं आणि आता तेराव्या लोकसभेची निवडणूक राष्ट्रपतींनी जाहीर केल्यानुसार होत आहे. मी संख्याशास्त्राचा विद्यार्थी आहे. गेल्या काही निवडणुकांतील काही प्रवाह दिसतात, त्यांचा मी बारकाईनं अभ्यास केला आहे आणि माझी खात्री आहे, की या निवडणुकीतून तयार होणारी

लोकसभा ही कोण्या एका पक्षाला स्थिर मतदान देण्याची सुतराम शक्यता नाही आणि हे सगळ्यांचंच मत आहे.

याचं कारण मी अमरावतीला शेतकरी संघटनेने भरवलेल्या जनसंसदेत (१०-१२ डिसेंबर ९८) बारकाईनं मांडलं होतं. हिंदुस्थान स्वतंत्र झाला, आपल्याच रंगाची, आपल्यासारखे कपडे घालणारी, आपली भाषां बोलणारी माणसं दिल्लीच्या मंत्रिमंडळात आली, तरी खरं म्हटलं तर ती माणसं विदेशीच होती. स्वातंत्र्यानंतर जे मंत्रिमंडळात आले, त्यांना मी काळे इंग्रज म्हणतो. त्यांनी इंग्लंडची निवडणूक पद्धती जशीच्या तशी 'कॉपी' करून लावली. इंग्लंडमधील पद्धत अशी, की एका मतदारसंघामध्ये उमेदवार उभे राहतात, ज्याला सगळ्यांत जास्त मतं मिळतात, ती किती का असेना – २५ टक्के असोत का २० टक्के – तो निवडून येतो. सगळ्या देशांत अशी पद्धत नाही. फ्रान्समध्ये अशी पद्धत आहे, की प्रत्येक मतदारसंघामध्ये निदान ५१ टक्के मते ज्याला मिळतील तोच निवडून आला, असे जाहीर होते; सगळ्यांत जास्त मते असली; पण ती ५१ टक्क्यांपेक्षा कमी असतील, तर तो निवडून आला असं धरत नाहीत. जर्मनीमध्ये एखाद्या पक्षाला एकूण मते किती मिळाली, त्याच्या टक्केवारीवर त्या पक्षाला लोकसभेमध्ये जागा दिल्या जातात. या सगळ्या निवडणूकपद्धती अभ्यासल्यानंतर हिंदुस्थानच्या घटना समितीने जाणीवपूर्वक असा निर्णय केला, की आपण इंग्लिश पद्धतीच घ्यायची. काय कारण?

इंग्लंडमधील निवडणूकपद्धतीच्या अभ्यासावरून असं दिसून आलं, की या पद्धतीमध्ये एक खुबी आहे. तुमच्या हाती जर का २५ ते ३० टक्के मतदार असतील, तर तुम्हाला ६० ते ६५ टक्के खासदार निवडून आणता येतात. आपण ५१ सालापासून काँग्रेसला किती मतं मिळाली आणि किती टक्के जागा मिळाल्या हे पाहिलं, तर या निर्णयामागची खुबी लक्षात येते. ३३ टक्के मतं, ५२ टक्के जागा; ३५ टक्के मतं, ६५ टक्के जागा. त्या वेळी पंडित नेहरूंना एका अमेरिकन पत्रकाराने प्रश्न विचारला, की 'या पद्धतीमध्ये हा दोष आहे, हे माहीत असताना तुम्ही ही पद्धत का स्वीकारली?' नेहरूंनी त्यांना दिलेलं उत्तर बोलकं आहे. ते म्हणाले, 'या पद्धतीत असा दोष नसता, तर हिंदुस्थानच्या लोकसभेमध्ये कधीही कोणत्याही पक्षाला बहुमत मिळणारच नाही. हिंदुस्थानात स्थिर सरकार राहावं याकरिता ३० टक्के लोकांना ५० टक्के प्रतिनिधित्व मिळावं अशी योजना आम्ही जाणीवपूर्वक स्वीकारतो आहोत.' मग, ३० टक्के मतं कशी मिळवायची? मला जातीयवादाचा

उल्लेख करायचा नाही. पण, प्रत्येक मतदारसंघामध्ये एक बहुजन समाजाची जाती असते; त्यामध्ये कदाचित् थोडे दलित मिसळले, थोडे ब्राह्मण मिसळले, की तेवढी टक्केवारी या पद्धतीत जागा मिळवायला पुरेशी होते. हे सूत्र काँग्रेसवाल्यांनी ओळखलं आणि प्रत्येक मतदारसंघातील दोनतीन जातींना एकत्र आणण्याच्या युक्तीचा वापर करून, काँग्रेसने देशावर गेल्या पन्नासातील त्रेचाळीस वर्षे राज्य केलं. आता मागासवर्गीयांत, दलित वर्गात जागृती तयार झाली आहे, शेतकऱ्यांमध्ये जागृती तयार झाली आहे, मुसलमानांत नवीन विचारांचे वारे वाहू लागले आहेत. त्यामुळे, दोनतीन जातींचं कडबोळं करून, आता जागा जिंकायची शक्यता राहिलेली नाही आणि त्यामुळे, यापुढे हिंदुस्थानची लोकसभा कायम विविधतेने नटलेली असणार आहे. वेगवेगळे खूप पक्ष असणार आहेत. असं असणं साहजिकच आहे. एकसंध लोकसभा असायला आपला देश कुठे एकसंध आहे? किती राज्यं, किती भाषा, किती मतप्रवाह! हे सगळे जर लोकसभेमध्ये प्रतिबिंबित व्हायचे असतील, तर एकाच पक्षाला बहुसंख्येचं मत मिळायला नको होतं. आतापर्यंत ते मिळालं, ते काँग्रेसच्या हातचलाखीनं मिळालं. यापुढे जर का अशी हातचलाखी झाली नाही, तर लोकसभेमध्ये कोणत्याही पक्षाला बहुमत मिळणं अशक्य आहे.

तेव्हा, यापुढचं राजकारण हे आघाड्यांचं आणि युतीचंच राहणार आहे. एकमेकांबरोबर काम करण्याची कला आपल्याला अवगत करून घ्यावी लागेल.

आज, तेराव्या लोकसभेचं चित्र उघड आहे, त्यात कोणालाही बहुमत असणार नाही. बिझिनेस लाइन या वर्तमानपत्राच्या स्तंभात मी म्हटलं आहे, की राष्ट्रपतींनी तेराव्या लोकसभेच्या निवडणुकांबरोबर चौदाव्या लोकसभेची निवडणूकही जाहीर करून टाकावी. म्हणजे एका निवडणुकीच्या खर्चात दोन निवडणुका होऊन जातील आणि मतदानात काही फरक पडणारच नाही.

बऱ्याचदा इतिहासात अशा घडामोडी होतात, की लहानशा घटनेने सुरुवात होते आणि लाटांवर लाटा वाढत जातात. या मंचाकडे पाहिलं, की मला असं दिसतं, की संकुचित राष्ट्रवादाला ज्यांनी विरोध केला अशी माणसं इथं बसली आहेत. जोतीबा फुल्यांनी म्हटलं आहे, की मुसलमानांचे आक्रमण या देशावर झालं आणि त्यांनी हिंदुस्थानातील राजांचं शिरकाण केलं, तेव्हा कोणीही शेतकरी त्यांच्या मदतीला आला नाही. कारण, हिंदू शोषक आणि मुसलमान शोषक यांतूनच जर निवड करायची असेल, तर जुन्या काळच्या शोषकाला पिटलं

जात आहे, याबद्दल त्यांच्या मनात आनंद होता. 'महंमदाच्या जवाँमर्द शिष्यांचं शेतकऱ्यांनी आलिंगन देऊन स्वागत केलं,' असं जोतीबा फुल्यांचं वाक्य आहे. राष्ट्रवादी शब्द त्यात बसत नाही. आगरकर आणि टिळक यांच्या वादामध्ये 'या देशात स्त्रियांना अजून काहीही स्वातंत्र्य नाही, शिक्षण मिळू शकत नाही. तेव्हा इंग्रजांविरुद्ध स्वराज्याचं राष्ट्रीय आंदोलन चालविण्यापेक्षा सामाजिक सुधारणा घडवून आणणं जास्त महत्त्वाचं आहे,' असं मांडणारे आगरकर मागे पडले. महात्मा फुल्यांनी एक प्रश्न विचारला होता, १८८३ मध्ये– "तुम्ही न्याशनल काँग्रेस काढली म्हणता, पण तुमचं नेशन पाहिजे की नाही?' नेशन म्हणजे 'एकमय लोक' – जिथं लोक भावाभावासारखे वागतात. इथं जातीजातींना शिक्षणाची परवानगी नाही, काहींना लोकांना स्पर्श करण्याची परवानगी नाही, घरात पाच पैसे वाचवण्याची परवानगी नाही, देवळात जाण्याची परवानगी नाही आणि आम्ही एक राष्ट्र आहोत म्हणता? आणि इंग्रजांविरुद्ध लढायला जाऊया म्हणता?"

"इंग्रज आल्यामुळे पहिल्यांदा आम्हा शूद्रांच्या मुलांना शिक्षणाची संधी मिळाली आहे. त्यांना शिकू द्या, शहाणं होऊ द्या. इंग्रज काही जन्मभर इथं राहू शकत नाही. त्याला आपण नंतर काढून लावू. पण, आमच्या लोकांना शहाणं होऊ न देता, 'एकमय राष्ट्र' न बनवता, जर का इंग्रजांना काढून लावलं, तर इथं पुन्हा 'पेशवाई' अवतीर्ण होईल." म्हणजे, पुन्हा एकदा आपल्या समाजातल्या जुन्या सवर्ण वर्गाचं वर्चस्व इथं प्रस्थापित होईल असं जोतीबांनी निक्षून सांगितलं. केवढा द्रष्टेपणा! १९४७ मध्ये स्वातंत्र्य मिळाल्यानंतर म्हणजे ६४ वर्षांनी त्यांचं भाकीत खरं ठरलं. नेहरूंच्या नेतृत्वाखाली जे सरकार बनलं, तो 'पेशवाई'चाच अवतार होता. सगळेच काही ब्राह्मण नव्हते, त्यात काही स्वीकारलेले ब्राह्मण होते आणि काही बाटवलेले ब्राह्मण होते; पण जी तयार झाली ती पेशवाई होती, यात काही शंका नाही.

मी 'पेशवाई' शब्द का वापरतो, ते स्पष्ट करतो. पेशव्यांच्या दप्तरात अनेक ठिकाणी म्हटलं आहे, की मुलूखगिरी करून, पैसा लुटून आणला पाहिजे. का? तर, हे ब्राह्मणांचे राज्य आहे आणि त्यांना दक्षिणा वाटण्यासाठी पुरेसा पैसा जमा होणं आवश्यक आहे. म्हणजे त्या पेशवाईचा हेतू काय? हिंदुराज्य संस्थापना नाही, स्वातंत्र्याची संस्थापना नाही. फक्त ब्रह्मवृंदांचं कल्याण हेच त्यांचं एकमेव उद्दिष्ट. पंडित नेहरूंनी काय केलं? पंडित नेहरूंनी गांधींचा विचार मागे टाकला.

गावाला महत्त्व नाही, शहराला महत्त्व आहे; शेतीला महत्त्व नाही, कारखानदारीला महत्त्व आहे असा विचार त्यांनी मांडला आणि त्याला गोंडस नाव दिलं– समाजवाद. कोणी काही प्रश्न विचारला तर म्हणायचे, पाहा तिकडे रशियात कशी भरभराट होते आहे, आपल्यालाही त्याच मार्गाने गेले पाहिजे. महात्मा गांधींच्या विचारांची हत्या करणारा, हा पहिला पंतप्रधान. त्यांनी समाजवादाच्या नावाने देशावर काय लादलं? समाजवादाचं महत्त्वाचं सूत्र म्हणजे राष्ट्रीयीकरण. राष्ट्रीयीकरण म्हणजे खासगी मालकाच्या हातून सत्ता काढून घ्यायची आणि ती लोकसभेच्या हातात द्यायची. पंडित नेहरूंनी जेव्हा ही राष्ट्रीयीकरणाची सुरुवात केली तेव्हा लोकसभेमध्ये ९० टक्के लोक सवर्ण ब्राह्मण होते, हे लक्षात घेतलं तर राष्ट्रीयीकरण याचा अर्थ केवळ ब्राह्मणीकरण असाच होतो. नाव समाजवादाचं आलं; पण प्रत्यक्ष परिणाम काय झाला? कर्नाटकात एका दलित नेत्याने पूर्वी एक चांगला संवाद लिहिला होता. त्यात एक देवरस ब्राह्मण आणि एक नेहरू ब्राह्मण अशी दोन पात्रे होती. नेहरू ब्राह्मण देवरस ब्राह्मणाला म्हणतो, 'तू काय तुमच्या पंथाचं कौतुक सांगतोस? आमचे नेहरू संध्या करीत नाहीत, पूजा करीत नाही, परदेशांत जातात, इतर काहीही करतात; पण त्यांनी ब्राह्मणांची जितकी सोय केली आहे, तितकी तुमच्या देवरसांनी लावून दिली आहे का?' हे विष आपण गिळून टाकलं; कारण समाजवाद या शब्दाची आपल्याला भूल पडली. दुसऱ्यांदा बहुजन समाजाचा पराभव झाला. इंग्रज आल्यानंतर फुले, आगरकर यांनी राष्ट्रवादी चळवळीपेक्षा सामाजिक चळवळ महत्त्वाची आहे असं मांडलं, ते स्वीकारलं गेलं नाही, राष्ट्रवादी चळवळ मोठी झाली तेव्हा बहुजन समाजाचा पहिला पराभव झाला. स्वातंत्र्यानंतर गांधी मागे पडले, नेहरूंनी समाजवादाचा झेंडा लावला आणि बहुजन समाजाचा दुसरा पराभव झाला.

१९८७ सालापासून संपूर्ण जगात समाजवादाचा जागतिक ऐतिहासिक पराभव झाला. रशियामध्येसुद्धा त्यांचं राज्य असं तुटून पडलं, की कोणाला समजलंसुद्धा नाही, काय झालं ते. नियोजनवादी अर्थव्यवस्था ही अजागळ असते, हे सिद्धांत म्हणून ठीक झालं. हे कधीतरी होणारच होतं. कारण, नियोजनाने झालेला विकास अजागळच असतो हे अर्थशास्त्राने सिद्ध झालं आहे. मग आता पर्याय काय? खरं म्हटलं तर १९९१ सालापासून आपल्या सबंध हिंदुस्थानामध्ये या विषयावर मोठी वादळी चर्चा व्हायला हवी होती. नेहरूंनी सांगितलेला समाजवाद आपण घेतला; पण तो फसला. मग आता कोणता मार्ग घ्यावा यावर विचारविमर्श

व्हायला हवा होता. माझा सगळ्या लोकांवर आरोप आहे, की आपण ढोंगी आहोत. छाती पुढे काढून, या प्रश्नाला उत्तर द्यायची आपली तयारी नव्हती, जे उत्तर समोर दिसते आहे, ते आपण टाळतो आहोत आणि त्यामुळे आपल्याला मार्ग दिसत नाही. लोकसभेची तेरावी निवडणूक होवो, चौदावी होवो, पंधरावी होवो, जोपर्यंत हिंदुस्थानातलं सर्व राजकारण आणि व्यवस्था ही शंभर वर्षे मागे टाकलेल्या बहुजन समाजाच्या गतीने चालत नाहीत तोपर्यंत राष्ट्रीय प्रश्न सुटत नाहीत. जोतीबा फुल्यांनी त्यावेळी मांडलेले भाकीत प्रत्यक्षात आलेलं आपण पाहतोच आहोत 'पेशवाई' अवतरल्याचं.

हिंदुस्थानात गेल्या शेकडो वर्षांत वेगवेगळ्या क्रांत्या अपुऱ्या राहिल्या. आगरकरांची क्रांती अपुरी राहिली, फुल्यांची क्रांती अपुरी राहिली, डॉ. आंबेडकरांची क्रांती अपुरी राहिली आणि जुन्या पद्धतीप्रमाणेच केवळ सवर्ण-वर्चस्व साऱ्या देशात राहिलं. नव्या परिस्थितीमध्ये, जसा एखादा ज्वालामुखी आतून खदखदत असतो त्याप्रमाणे बहुजन समाजाची, कष्टकरी समाजाची खदखद अंतर्यामी चालू आहे. जमिनीमध्ये कुठे कच्चा भाग दिसला की तेथून ज्वालामुखीचा उद्रेक होतो तसंच निवडणुकीच्या वेळी राजकीय कच्चा भाग दिसताच बहुजनसमाज आणि दलित समाजाचा हा खदखदणारा ज्वालामुखी उफाळून वर येतो.

खरं म्हणजे देशाला सगळ्यात विनाशकारी घराणं हे नेहरू-गांधी घराणं आहे. या घराण्यानं स्वातंत्र्यापासून देशाचं वाटोळं केलं. इंग्रज जायचे होते त्यावेळी पंतप्रधान कोणी बनावं याविषयी चर्चा चालू झाली. महात्माजींनी सुचवलं की आपण प्रदेश काँग्रेस कमिट्यांच्या अध्यक्षांची मतं घेऊ. मतं घेतली गेली. त्यात सरदार वल्लभभाईंच्या बाजूला मतं पडली सतरा, जवाहरलाल नेहरूंना शून्य. पण गांधीजींना जवाहरलाल नेहरूंच्या बाजूने कोणीतरी सांगितलं की, 'जर नेहरूंना पंतप्रधान केलं नाही तर ते काँग्रेस सोडून जातील, देशात दुफळी माजेल. तेव्हा, तुम्ही काहीही करा आणि सरदार पटेलांची समजूत काढा.' गांधींनी फक्त पटेलांकडे पाहिलं आणि तो थोर मनुष्य समजायचं ते समजला आणि म्हणाला की, 'बापूजी, तुमची इच्छा असेल तर माझं नाव मी मागे घेतो.'

आणि नेहरू पंतप्रधान झाले. नेहरूच अशा रीतीने पंतप्रधान झाले असे नाही, या घराण्याचं वैशिष्ट्यचं असं आहे. आधी 'मला पंतप्रधान व्हायचंच नाही' असं म्हणत रहायचं आणि वेळ आली की पटकन त्या खुर्चीवर उडी

मारून बसायचं. इंदिरा गांधींच्या बाबतीत असंच झालं. राजकारणातील बरेच जाणकार सांगतात की लाल बहादूर शास्त्रींचं निधन झालं तेव्हा त्यांच्या जागी कोणाला पंतप्रधान करायचं याची चर्चा सुरू होती. बऱ्याच जणांनी यशवंतराव चव्हाणांना विनंती केली की आपण अनुभवी आहात, वरिष्ठ आहात तेव्हा आपणच पंतप्रधान होणे योग्य होईल. ते म्हणाले की मलाही तसंच वाटतं, पण माझं आवेदनपत्र भरण्याआधी इंदिरा गांधींना विचारावं की, त्याची इच्छा आहे का पंतप्रधान होण्याची. ते त्यांना भेटायला गेले तेव्हा इंदिराजींनी त्यांना सांगून टाकले की, तुम्हाला काय करायचे ते करा, मी माझा उमेदवारी अर्ज दाखल करणार आहे. या घराण्याची ही उर्मट वागण्याची पद्धत आजचं समजली असं नाही. ती सर्वांना पूर्वीपासूनच माहीत आहे. महाराष्ट्रातले थोर अर्थशास्त्रज्ञ आणि सहकारी चळवळीचे जनक डॉ. धनंजयराव गाडगीळ हे नियोजन मंडळाचे अध्यक्ष होते. एकदा नियोजन मंडळाच्या एका मसुद्यावर चर्चा करण्याकरिता इंदिरा गांधींनी त्यांना बोलावलं आणि त्यांना इतकी अपमानजनक वागणूक दिली की धनंजयराव गाडगीळ राजीनामा देऊन बाहेर पडले, तेथून स्टेशनवर आले, गाडी पकडली, गाडी सुटताना त्यांना हृदयविकाराचा झटका आला आणि ते जागीच गेले. लोकांशी वागण्याची ही या घराण्याची पद्धत जुनी आहे. राजीव गांधी गेल्यानंतर सोनियाजींनी म्हणायला सुरुवात केली की मला राजकारणात अजिबात यायचं नाही, पंतप्रधान मुळीच व्हायचं नाही. आणि आता ते पद मिळण्याची शक्यता दिसू लागताच म्हणू लागल्या, माझ्याशिवाय आहेच कोण? परवा वर्तमानपत्रात एक फोटो पाहिला की विम्बल्डनला टेनीसच्या सामन्यांच्या ठिकाणी आपले 'राजपुत्र' श्री. राहुल हे तिथे एका मुलीबरोबर – त्यांची प्रेयसी म्हणा, मैत्रिण म्हणा – बसलेले आहेत. तिने असे कपडे घातले होते भारतातील सभ्य मुलीला असे कपडे घालण्याचा विचार करण्याचेही धारिष्ट्य होणार नाही. पण, आपण काय बोलणार ? कदाचित् ती आपल्या भावी पंतप्रधानाची आई असण्याचीही शक्यता असेल!

तेव्हा या तऱ्हेने जर का ही वंशपरंपरा चालत असेल तर मला असं म्हणायचं आहे की सर्व परिवर्तनवादी मंडळींनी सोनिया गांधी आल्या तर चालणार नाही, प्रियंका गांधी आल्या तर चालतील. असा गळभट विचार सोडून निर्धारपूर्वक एकांतिक भूमिका घ्यायला हवी. इथं बसून सोनिया गांधींवर टीका करायची आणि व्यासपीठावर फोटो मात्र निवडून पंडित नेहरू, इंदिरा गांधी, राजीव गांधी

हे ढोंग आहे. कारण, देश वाचवायचा असेल, तर देशाला बुडवायचं काम नेहरूंपासून राजीव गांधींपर्यंत या घराण्यातील सर्वांनी केलं हे सर्वप्रथम मान्य करायला हवं.

बाबासाहेब आंबेडकर आयुष्याच्या शेवटी देशाविषयी फार निराश झाले. तेव्हा त्यांनी ठरवलं की आता पूर्वीसारखी 'शेड्युल कास्ट फेडरेशन' अशी जातीय नावाची संघटना न काढता 'रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया' नावाची राजकीय संघटना स्थापन करावी आणि देशातील प्रजासत्ताकवादी सर्व जातिधर्मांच्या नागरिकांना संघटित करावे. आंबेडकरांचा तो प्रयत्न यशस्वी झाला नाही.

(२१ मे २००३)

◆◆

पोशिंद्यांच्या लोकशाहीसाठी स्वतंत्र भारत पक्ष

२८ मेपासून सुरू झालेल्या स्वतंत्र भारत पक्षाच्या पहिल्या राष्ट्रीय अधिवेशनाचं सूप वाजायची वेळ आली आहे आणि हा पक्ष काय आहे, त्याचे विचार काय आहेत, कार्यक्रम काय आहेत, देशामध्ये साडेसहाशेच्या वर पक्ष असताना हा आणखी एक नवा पक्ष का आवश्यक आहे, ते आपल्यासमोर, कोणतीही क्लिष्ट तांत्रिक भाषा न वापरता अगदी साध्या सोप्या भाषेत ठेवण्याचा मी प्रयत्न करणार आहे. गेली २८ वर्षे मी शेतकऱ्यांच्या, विद्वानांच्या, तंत्रज्ञांच्या कित्येक सभा संबोधित केल्या आहेत; पण आजची सभा ही विशेष वेगळी सभा असल्याने माझ्यावर आज मोठी जबाबदारी येऊन पडली आहे. इतकं महत्त्वाचं भाषण करण्याची जबाबदारी माझ्यावर आजपर्यंत कधी पडली नव्हती आणि यापुढे असं भाषण करण्याची वेळ, कदाचित्, मला मिळणारही नाही.

मी कोणापुढे बोलतो आहे ? दिडशे वर्षे गोऱ्या इंग्रजांच्या गुलामगिरीच्या अंधकारामध्येसुद्धा प्रत्येक माणसाच्या हृदयात तेवणारी स्वातंत्र्याची ज्योत ज्यांनी जागती ठेवली अशा शेतकरी, व्यापारी, उद्योजक, कारखानदार नागरिकांच्या समोर मी बोलतो आहे. स्वातंत्र्य मिळाल्यानंतरच्या पन्नास वर्षांमध्ये गोरा इंग्रज गेला असला; तरी त्याच्या जागी काळा इंग्रज आला आणि गोऱ्या इंग्रजांनीसुद्धा स्वातंत्र्याची जेवढी गळचेपी केली नाही तेवढी काळ्या इंग्रजांनी केली. गोऱ्या इंग्रजांनी जितकं शेतकऱ्याला लुटलं नाही, तितकं काळ्या इंग्रजांनी लुटलं. या सगळ्या घनघोर काळ्या अंधाराच्या काळातसुद्धा ज्यांनी स्वातंत्र्याची ज्योत मनात तेवत ठेवली आणि स्वतंत्र भारत पक्षाने पहिली हाक दिल्याबरोबर मुंबईच्या या शिवाजी उद्यानाच्या मैदानावर धाव घेतली, त्यांच्यासमोर मी बोलतो आहे.

सगळ्या महाराष्ट्रात दुष्काळ आहे. माझ्या स्वत:च्या गावामध्ये प्यायच्या

पाण्यासाठी सर्व बायांनी पाचसहा किलोमीटरची पायपीट करावी लागते. नित्यनियमित कामं चालू आहेत, लग्नाचे मुहूर्त साधायचे आहेत हे सगळं बाजूला ठेवून तुम्ही सर्व मंडळी आपल्या खर्चाने, डोक्यावर भाकरीचटणीचं बोचकं बांधून घेऊन, कोणाच्याही वाहनाची वाट न पाहता, गाडीमधून, ट्रकमधून अत्यंत हालअपेष्टा सहन करीत, अडचणीच्या जागी बसून इथपर्यंत – ते गेली दोनशे वर्षे निराशा झाली, कदाचित यावेळी तरी स्वतंत्र भारत पक्ष आपल्या मनामध्ये जोपासलेल्या स्वातंत्र्याच्या स्फुल्लिंगावर फुंकर घालून एक नवीन मशाल तयार करील या आशेनं – आलेल्या तुम्हा जनांसमोर मी बोलतो आहे.

इतिहास फार मोठा आहे. तपशीलवार सांगत बसलो तर दोनतीन दिवससुद्धा पुरणार नाहीत. अशा तऱ्हेची भाषणं पक्षाचे नेते करतात. रशियाच्या कम्युनिस्ट पक्षाचे जनरल सेकेटरी त्यांच्या कॉम्रेडांसमोर भाषणं करताना तीन तीन दिवस भाषणं करीत असत. फक्त तिथं हुकूमशाही असल्यामुळे कोणत्याही कॉम्रेडला उठण्याची तर सोडा, पण चुळबुळ करण्याचीसुद्धा शक्यता नव्हती; एखाद्याने चुळबुळ केलीच तर दोन दिवसांच्या आत त्याच्यावर तुरुंगात जाण्याची वेळ येण्याची शक्यता असे. त्यामुळे सगळे लोक बिचारे निमूट ऐकून घेत असत. स्वतंत्र भारत पक्ष हा काही समाजवादी रशियाचा कम्युनिस्ट पक्ष नाही, हा खऱ्याखुऱ्या स्वातंत्र्याचा पक्ष आहे, आणि म्हणून, माझ्या गेल्या अठ्ठावीस वर्षांच्या परंपरेला अनुसरून, स्वतंत्र भारत पक्षाचा जो काही अर्थ आहे तो थोडक्यात नेमक्या शब्दात मी तुमच्यासमोर मांडण्याचा प्रयत्न करीत आहे. ज्यांना विशेष अभ्यास करावयाचा आहे त्यांच्याकरिता उदंड साहित्य तयार झालेलं आहे, अनेक पुस्तकं आहेत, अनेक चर्चांचे वृत्तांत आहेत ते त्यांच्या उपयोगात येऊ शकेल. आज मी जे बोलणार आहे ते ज्यांनी कधी शाळेचं तोंडसुद्धा पाहिलेलं नाही, गमभन लिहिण्याचीसुद्धा संधी ज्यांना कधी, स्वातंत्र्याच्या गेल्या छपन्न वर्षांत लाभली नाही, त्यांना 'स्वातंत्र्य' ही गोष्ट काय आहे आणि त्याच्याकरिता का आणि कसं लढायचं, हे त्यांना समजावून सांगण्यासाठी.

या सगळ्या इतिहासाची सुरुवात कशी होते? या व्यासपीठावर एक चित्र लावलं आहे. त्यात सर्वांत वर महात्मा गांधींचं चित्र आहे, त्याखालोखाल चक्रवर्ती राजगोपालाचारींचं चित्र आहे. दोन फार महान माणसं आणि त्यांच्यानंतर त्यातल्या त्यात क्षुद्र, ना-लायक असा मी; पण दैवयोग असा, की त्यांना जे काम पुरं करता आलं नाही, ते पुरं करण्याची जबाबदारी आज माझ्या खांद्यावर येऊन पडली आहे. दहा वर्षांपूर्वी मी दांडीला गेलो होतो. दांडीला गांधींनी

मिठाचा सत्याग्रह केला. त्यासाठी साबरमतीहून 'दांडीयात्रा' करीत चालत चालत गेले आणि ज्या ठिकाणी त्यांनी मीठ उचललं, त्या ठिकाणी आज एक ताम्रपट लावलेला आहे. त्यावर महात्माजींचे शब्द लिहिलेले आहेत, 'माझ्या मते, इंग्रज निघून जाणे म्हणजे स्वातंत्र्य नाही; जेव्हा या देशातल्या प्रत्येक नागरिकाला आपल्या भवितव्याला आपल्या इच्छेनुसार, आपल्या क्षमतेनुसार आकार देता येईल, तेव्हा हा देश स्वतंत्र झाला असे मी म्हणेन.' एक अमेरिकन पत्रकार त्यांत होते. त्यांनी गांधीजींची मुलाखत घेताना प्रश्न विचारला, 'फार उघड नाही; पण नेहमी आमच्या कानावर कुणकुण येते, की अध्यात्मवादी महात्मा गांधी आणि आधुनिक विचारांचे समाजवादी पंडित नेहरू यांच्यामध्ये फार मोठे मतभेद आहेत. परदेशांतील लोकांना हे मतभेद काय आहेत, ते समजावून घेण्याची फार इच्छा आहे. मला समजू शकेल अशा तऱ्हेने थोडक्यात सांगा.' गांधीजी हसले. क्लिष्टातले क्लिष्ट अध्यात्मसुद्धा सोप्या शब्दांत समजावून सांगण्याची त्यांची हातोटी मोठी अजब होती. ते म्हणाले, "मी एका वाक्यात पंडित नेहरू आणि माझ्यातील भेद सांगतो: 'मला असं वाटतं, की या हिंदुस्थानातून इंग्रज निघून गेला नाही तरी चालेल; पण अंग्रेजियत म्हणजे इंग्रजांची नीती गेली पाहिजे आणि पंडित नेहरूंना असं वाटतं, की या देशामध्ये अंग्रेजियत राहिली पाहिजे, इंग्रज निघून जायला हवा. हा दोघांमधला मोठा फरक आहे." महात्म्याने फार पुढचं पाहून वापरलेलं हे वाक्य. ही १९३० सालची गोष्ट.

१९४७ मध्ये स्वातंत्र्य मिळालं आणि १९४८ मध्ये गांधीजींचा खून झाला. गांधीजींना ही कल्पना नव्हती, की ज्याला आपण शिष्योत्तम म्हटलं, आपला राजकीय वारस म्हटलं तोच इंग्रज निघून गेल्यानंतर थोड्याच दिवसांमध्ये हिंदुस्थानात 'अंग्रेजियत' कायम ठेवण्यासाठी मोठं कारस्थान रचणार आहे. गांधीजी गेले आणि त्यानंतर चारच वर्षांत समग्र गांधीविचाराला, अर्थवादाला उखडून टाकण्याचं काम त्यांच्या या शिष्योत्तमानं केलं. गांधींच्या मते, अर्थव्यवस्थेचा कणा शेती आहे. नेहरूंनी सांगितलं, सगळ्या अर्थव्यवस्थेचा कणा जड उद्योगधंदे, लोखंडाचे, सिमेंटचे कारखाने आहेत. गांधीजींनी म्हटलं, खेडं हा हिंदुस्थानचा आत्मा आहे; नेहरूंनी सांगितलं, की शहरांचा विकास झाला पाहिजे. गांधींनी सांगितलं होतं, की व्यक्तीनं प्रगती करायची आहे, सरकार नको; एवढंच नव्हे तर ते म्हणाले होते, 'माझा मुळी शासन या संस्थेलाच विरोध आहे. सगळ्या जगामधून सरकार नावाची गोष्ट नष्ट होऊन जावी अशी माझी इच्छा आहे; पण सगळ्या जगात इतकी सरकारं, त्यांना नष्ट करण्याची

सुरुवात करावी कोठून? याचा विचार करून, मी असं ठरवलं, की पहिल्यांदा हिंदुस्थानातील इंग्रज सरकार नष्ट करू आणि त्यानंतर सगळ्या जगातील सरकारं आणि शासनसंस्था ही व्यवस्था खलास करायला लागेल...' आणि त्यांच्या शिष्योत्तमांनी काय भूमिका घेतली? त्यांनी म्हटलं, की सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे सार्वजनिक क्षेत्र, सरकारी नियोजन मंडळ (झश्ररर्ळिसि उीाळीीर्ळी), पंचवार्षिक योजना, वेगवेगळी सरकारी खाती यांच्या हाती सत्ता राहावी. म्हणजे एका अर्थी गांधीजींचा खराखुरा 'हत्यारा' हिंदुस्थानच्या पंतप्रधानपदी बसला. तेव्हापासून हिंदुस्थानात गुलामगिरीचा एक नवा कालखंड सुरू झाला. स्वातंत्र्याच्या आधीच्या काळात गोऱ्या इंग्रजांची गुलामगिरी होती, स्वातंत्र्यानंतर काळ्या इंग्रजांची गुलामगिरी आली.

नेहरू त्या वेळी नुकतेच समाजवादी रशियात जाऊन आले होते. शहरांतील वैभव पाहून, एखादा खेड्यातील पोरगा जसा चकित होऊन जातो तसं रशियातील चकचकाट पाहून, नेहरूंना कुतूहलमिश्रित आश्चर्य वाटलं आणि त्या प्रभावाने 'जगामध्ये समाजवादी रशियासारखा महत्त्वाचा प्रयोग कोणताही नाही,' असं त्यांनी जॉर्ज बर्नाड शॉ आणि बर्ट्रांड रसेल यांच्यासमोर प्रत्यक्षात मांडलं. हिंदुस्थानात त्यांनी सार्वजनिक चर्चा घडवून आणली नाही, समाजवादाच्या प्रश्नावर कधी निवडणूक लढवली नाही, 'समाजवाद आणि समाजवादी धाटणीची समाजरचना हे हिंदुस्थानचं ध्येय आहे,' असं त्यांनी एकदम जाहीर करून टाकलं. गांधीजींचा शिष्योत्तम, प्रभावी व्यक्तिमत्व, उच्च राहणीमान; यामुळे लोकांचं त्यांच्यावर इतकं अपार प्रेम होतं, की त्यापोटी सबंध देशानं समाजवादाचं हलाहलसुद्धा पचवण्याची तयारी दाखवली. हलाहल गिळणारा एक शंकर होऊन गेला, त्याचा फक्त कंठ निळा झाला. हिंदुस्थानला हे समाजवादाचं विष पचलं नाही. समाजवादी रशियाने प्रामाणिकपणे समाजवादाचा प्रयोग केला आणि तो देश शकलं शकलं होऊन मरून गेला. हिंदुस्थान समाजवादाचा प्रयोग काही प्रमाणात करूनसुद्धा संपूर्ण नष्ट झाला नाही, अजून जिवंत आहे, पुन्हा एकदा जागृत होण्याची धडपड करतो आहे. यामागे कारण आहे, हिंदुस्थानात कधी शुद्ध माल काही येत नाही, जो येतो तो भेसळच माल येतो. आपण नेहमी वाचतो, की एखादा शेतकरी कंटाळून जीव द्यायला निघतो आणि एन्ड्रिन पितो; पण ते भेसळीचे, बनावट निघाल्याने त्याला त्रास होतो, तरी तो मरत नाही. रशियाने शुद्ध समाजवादाचा प्रयोग केला आणि तो मेला. आपल्या देशाची अवस्था एन्ड्रिन पिणाऱ्या त्या शेतकऱ्यासारखी झाली. समाजवादाच्या

प्रयोगानंतरसुद्धा आपण वाचलो आहोत; कारण इथं समाजवाद आला नाही, समाजवादाची बेगडी नक्कल आली. या परिस्थितीची जाणीव होताच, त्यातून बाहेर पडण्यासाठी लोकांची धडपड सुरू झाली.

महात्मा गांधींनी पहिल्यांदा स्वातंत्र्याची व्याख्या दिली. स्वातंत्र्य म्हणजे केवळ परकीय लोक निघून जाणे नव्हे, स्वातंत्र्य म्हणजे देशातील प्रत्येक व्यक्तीला आपल्या मनाप्रमाणे आपल्या भवितव्याला आकार देण्याची मुभा मिळणे होय. नेहरूंनी उलटी उडी मारून, नवी गुलामगिरी लादली, गांधीजींच्या विचाराचा उच्छेद करून टाकला आणि तरीदेखील हुशारी अशी, की सगळ्या देशभर चर्चा करताना 'गांधी-नेहरू' हा द्वंद्व समास वापरला. हा समास देवदानव या समासासारखा आहे. याला विरोध करण्याची हिंमत कोणाला झाली नाही. गांधीजींचे उत्तमोत्तम शिष्य नेहरूंच्या मागे शेपट्या हलवीत हलवीत जाऊ लागले. कोणला मंत्रिपदाची आशा, कोणाला गव्हर्नरपदाची आशा, कोणाला कशाकशाची आशा! अगदी गांधीवादाची जोपासना करण्याचा वसा घेतलेले त्यांचे बहुतेक पट्टशिष्यसुद्धा आश्रमाला चांगल्यापैकी काही एकर जागा मिळावी म्हणून नेहरूंचे स्तुतिपाठक भाट झाले आणि अशा या परिस्थितीमध्ये नेहरूंनी चालवलेल्या या समाजवादाविरुद्ध स्पष्टपणे भाषा वापरणारा एक महान वीर पुढे आला. त्याचं नाव चक्रवर्ती राजगोपालाचारी.

समाजवादाचा पुरस्कार हिंदुस्थानातील अनेक मान्यवर करीत होते. नरेंद्र देव, एस. एम. जोशी, ना. ग. गोरे, लोहिया यांच्यासारख्या थोर नेत्यांची समाजवादाला मान्यता होती; पण त्यांचा हा भारतीय समाजवाद आणि नेहरूंचा समाजवाद यांत फरक होता. विषय गहन असला, तरी थोडक्यात स्पष्ट करतो. भारतातला समाजवाद हा सानेगुरुजींच्या भाषेत, 'कसणाऱ्याची धरणी आणि श्रमणाऱ्याची गिरणी' या अर्थाचा होता. नेहरूंचा समाजवाद म्हणजे 'कसणाऱ्याची धरणी' नाही आणि 'श्रमणाऱ्याची गिरणी' नाही; तर 'धरणी आणि गिरणी दोन्ही सरकारचे, सरकार सगळे नेहरू घराण्याच्या वारसांचे,' या अर्थाचा. याला चक्रवर्ती राजगोपालाचारींनी 'लायसन्स-परमिट-इन्स्पेक्टर राज' असा शब्द वापरला. ज्या वेळी सगळ्या जगामध्ये समाजवादाचा बोलबाला होता, त्या वेळी राजगोपालाचारींनी नेहरूंच्या या समाजवादी नियोजनाचा अर्थ अचूकपणे सांगितला, "ही केवळ हुकूमशाही आणण्याची भारतीय पद्धत आहे. यातून पुढे नंतर घराणेशाहीही येणार आहे. नेहरूंच्या मनामध्ये प्रतिअशोक बनण्याची इच्छा आहे आणि आपल्या घराण्याची हुकूमशाही देशात निर्माण करायची

आहे. त्यासाठी 'लायसन्स-परमिट-इन्स्पेक्टर राज' ही पहिली पायरी आहे."

नेहरूंच्या या प्रयत्नांना रोखण्यासाठी राजगोपालाचारींनी 'स्वतंत्र पक्ष' निर्माण केला. पहिल्या निवडणुकीतच 'स्वतंत्र पक्ष' लोकसभेतील सर्वांत मोठा विरोधी पक्ष बनला. स्वतंत्रतेचा झेंडा घेतलेले लोक सहजी मागे राहत नाहीत, त्यांनी स्वतंत्र पक्षामागे आपले बळ लावले. गुजरात राज्यात तर स्वतंत्र पक्षाच्या हाती सत्ता आली. म्हणजे स्वातंत्र्याचा संदेश लोकांपर्यंत नीट पोहोचला, तर असं परिवर्तन होऊ शकतं; पण नेहरू घराण्याची मंडळी मोठी भामटी. अजूनही तशीच आहेत. स्वतंत्र पक्षाच्या पहिल्याच झटक्याने ते सावध झाले. त्यांनी सबंध हिंदुस्थानात प्रचार सुरू केला, की 'स्वतंत्र पक्ष' हा संस्थानिकांचा, राजेरजवाड्यांचा, भांडवलदारांचा, 'टाटा-बिर्ला'चा पक्ष आहे. इंग्रजांच्या गुलामगिरीतून सुटून, समाजवादाच्या प्रभावाखाली आलेल्या समाजात त्या काळी हे शब्द म्हणजे शिव्या होत्या. अगदी भारतीय समाजवाद्यांच्या दृष्टीनेही. जमीनदार, भांडवलदार, उद्योजक, कारखानदार हे शब्द शिवीसारखे वापरले जात. कोणत्यातरी सरकारी नोकरीत असणे, कोणत्यातरी सरकारी कॉर्पोरेशनमध्ये मॅनेजिंग डायरेक्टर असणे – मग तो धंदा बुडवत का असेना – हे गुणवर्णनाचे मापदंड झाले होते; त्यांना देशभक्त मानले जायचे. नेहरूंच्या या शब्दांच्या खेळांनी भारतीय लोक फसले आणि राजगोपालाचारींच्या स्वतंत्र पक्षाचा स्वातंत्र्याचा प्रयोग फसला. केवढी मोठमोठी माणसं त्यांच्याबरोबर होती! स्वत: महात्मा गांधींनी पंतप्रधानपदाकरिता नेहरूंच्या बरोबरीने ज्यांचं नाव घेतलं होतं आणि संपूर्ण जगामध्ये स्वातंत्र्याच्या विचारसरणीवरील अधिकारी माणूस म्हणून ज्यांना मान्यता होती, ते मिनू मसानी राजगोपालाचारींचे सर्वांत निकटचे सहकारी होते. असे असतानासुद्धा नेहरूवाद्यांनी केलेल्या राजकारणातल्या खेळामुळे आणि 'गरिबी हटाव'सारख्या भ्रामक घोषणा देऊन मतदारांना भुलवल्यामुळे स्वतंत्र पक्षाचा प्रयोग अयशस्वी झाला.

त्यानंतर स्वातंत्र्याचा झेंडा उभारण्याचं काम कोणी राजेरजवाड्यांनी केलं नाही, कोणीही कारखानदारांनी केलं नाही. १९८० मध्ये महाराष्ट्रामध्ये शेतकरी संघटना नावाची एक लहानशी संघटना चाकणच्या कांदेबाजारात उभी राहिली. त्यात शेपाचशे शेतकऱ्यांसमोर मी उभं राहून म्हटलं, की आपला हेतू आहे, की शेतकऱ्याला सुखानं आणि सन्मानानं जगता यायला पाहिजे, तसं जगता यायला पाहिजे असेल, तर त्याला मार्ग एकच आणि तो म्हणजे शेतीमालाचा भाव जाणूनबुजून बुडविण्याचं जे कारस्थान सरकारनं रचलं आहे, ते मोडून 'शेतीमालाला

रास्त भाव हा एककलमी कार्यक्रम' हाती घेणं. हा कार्यक्रम यशस्वी केला, तरच शेतकऱ्याला सुखानं आणि सन्मानानं जगता येईल. माझा आणि लोकांचा काही परिचय नाही, प्रस्थापित पुढाऱ्यांच्या तुलनेत मी क:पदार्थ आणि तरीदेखील एक चमत्कार घडला. चाकणच्या कांद्याच्या आंदोलनानंतर केवळ अठरा महिन्यांच्या काळामध्ये 'शेतीमालाला रास्त भाव मिळाला पाहिजे,' ही गर्जना पंजाबपासून ते केरळापर्यंत सबंध हिंदुस्थानभर ऐकू येऊ लागली आणि एका नव्या कालखंडाला सुरुवात झाली.

१९८६ मध्ये चांदवडच्या शेतकरी महिला अधिवेशनात महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातून लाखांनी महिला जमल्या होत्या. त्यांना एकच मंत्र शेतकरी संघटनेने आणि शेतकरी महिला आघाडीने दिला आणि त्या महिलांनी घोषणा दिल्या, की 'चांदवड येथे जमलेल्या आम्ही लाख लाख महिला जाहिर करतो, की आम्ही माणसे आहोत.' यापेक्षा मोठी क्रांतिकारी घोषणा होऊ शकत नाही. त्या दिवसापासून हिंदुस्थानातल्या सगळ्या महिलांचं, विशेषत: ग्रामीण महिलांचं भवितव्य बदललं आणि त्यानंतर शेतकरी महिला आघाडीनं 'दारू दुकान बंदी'चा कार्यक्रम काढला; सरकारनं तो हाती घेतला. या आघाडीनं महिलांना राजकारणामध्ये स्थान पाहिजे आणि ते मिळविण्यासाठी पंचायत राज्याच्या निवडणुका १०० टक्के लढविण्याची घोषणा केली; परिणामी महाराष्ट्र शासनाने महिलांना राखीव जागांची तरतूद केली. इतर राज्यांनीही अनुकरण केले. आज दिल्लीमध्येसुद्धा अशा तऱ्हेच्या राखीव जागा निर्माण करण्याचं, नाटक का होईना, सुरू झालं. स्त्रियांच्या मालमत्तेच्या हक्काची मांडणी केली, 'लक्ष्मी मुक्ती'च्या कार्यक्रमातून तो हक्क मिळवायला सुरुवात केली; आज या प्रश्नाला लोकसभेमध्येसुद्धा मान्यता मिळते आहे. सगळ्या हिंदुस्थानात स्त्रियांच्या प्रश्नावर शास्त्रशुद्ध विचार मांडून स्त्रीशक्तीच्या जागरणाची खरी सुरुवात केली, ती शेतकरी महिला आघाडीने. चांदवड नावाच्या लहानशा गावामध्ये छोटीशी सुरुवात केलेली ही महिला आघाडी सबंध हिंदुस्थानभरच्या प्रत्येक स्त्रीच्या आयुष्यात क्रांती घडवून आणण्यात यशस्वी होत आहे.

१९७८ मध्ये मूठभर शेतकऱ्यांना मी 'सुखाने आणि सन्मानाने जगण्याचा' मंत्र दिला. त्यासाठी 'शेतीमालाला भाव मिळेल, शेती तोट्याची आहे, ती फायद्याची होईल' असा काही पराक्रम करून दाखवा, असे आवाहन केले आणि साऱ्या हिंदुस्थानभर चळवळीचा वणवा पेटला; १९८६ मध्ये स्त्रियांना 'तुम्ही माणूस आहात, माणसासारखं जगा,' असा संदेश दिला आणि हिंदुस्थानातील

सर्व ग्रामीण भागातील स्त्रियांच्या आयुष्यात परिवर्तन घडलं.

या शिवाजी उद्यान मैदानावर शेतकरी संघटनेच्यासुद्धा यापेक्षा मोठ्या सभा भरल्या आहेत. आजची सभा ही गर्दीने छोटी असली, तरी त्या सभेपेक्षा वेगळी आहे. म्हणून भाषणाला सुरुवात करताना मी नेहमीप्रमाणे 'माझ्या शेतकरी भावांनो आणि मायबहिणींनो,' अशी न करता 'स्वातंत्र्याची ज्योत मनामध्ये जपून ठेवून इथपर्यंत आलेल्या' तुम्हा लोकांना प्रणाम करून, मी भाषणाला सुरुवात केली. माझ्यापुढे आज कोण जमले आहेत? केवळ शेतकरी नाहीत, केवळ उद्योजक नाहीत, केवळ व्यापारी नाहीत, केवळ कारखानदार नाहीत, केवळ व्यावसायिक नाहीत, केवळ कर्तबगारीने आपल्या क्षेत्रात यशवंत झालेले नाहीत; या सगळ्या लोकांचं जर एका शब्दात वर्णन करायचं झालं तर तुम्ही 'पोशिंदे' इथे जमा झाला आहात. शेतकऱ्यांच्या चळवळीच्या बीजापासून सुरू झालेलं आंदोलन हे मूलतः स्वतंत्रतेचं आंदोलन आहे. शेतकऱ्याकरिता आम्ही मागणी भिकेची केली नव्हती, मागणी स्वातंत्र्याची केली होती; स्त्रियांकरिताही आम्ही मागणी भिकेची केली नव्हती, मागणी स्वातंत्र्याची केली होती. आज इथं उभा राहून मी तुमच्यासमोर मागणी करतो आहे, ती जगामध्ये सगळ्या 'पोशिंद्यां'ना स्वातंत्र्य मिळावे अशी आहे. शेतकरी जगाला खाऊ घालतो, स्त्री जगाला खाऊ घालते, कारखानदार जगाला उत्पादन करून खाऊ घालतात, रोजगार देतात आणि सर्व जगाला पेलणारे हे सर्व लोक कर्तबगार, कष्टाळू, कल्पक, संशोधक यांनी सगळी पृथ्वी शेषाप्रमाणे आपल्या फण्यावर तोलून धरली आहे. सानेगुरुजींनी 'कोटी किसानांचा फणा करी शेष, येथून तेथून सारा पेटू दे देश,' म्हणताना पृथ्वीचा भार पेलणारा शेष हा किसान आहे असं मानलं असलं; तरी हा भार पेलणारा केवळ शेतकरी आहे असं नाही; पृथ्वीचा भार पेलणाऱ्यांत शेतकरी आहे, व्यापारी आहे, उद्योजक आहे, संशोधक आहे, कारखानदार आहे, प्रतिभावान आहे, बुद्धिवान आहे, कष्टकरी आहे. स्वतःचं भांडवल, कल्पकता, कष्ट, प्रतिभा वापरून, स्वतंत्रपणे सृजन करून, ही सर्व 'पोशिंदे' मंडळी आपलं, आपल्या कुटुंबाचं लालनपालन तर करतातच, शिवाय इतरांसाठी रोजगारही निर्माण करतात. या सर्वांनी पृथ्वीचा भार शेषाप्रमाणे तोलला आहे आणि प्रख्यात तत्त्वज्ञ आयन रँड यांनी म्हटल्याप्रमाणे, 'पृथ्वीवरची गांडुळं – ज्यांच्याकडे काही प्रतिभा नाही, साधनं नाहीत, कर्तबगारी नाही – या शेषाला बेजार करून टाकण्याचं काम करतात. या ऐतखाऊ गांडुळांची झुंडशाही माजली आहे.' या सभेत आपण पहिल्यांदाच 'पोशिंद्यां'च्या स्वातंत्र्याची घोषणा करतो आहोत.

'स्वतंत्र भारत पक्ष' तयार झाला आहे. हा पक्ष आणि इतर पक्ष – ५६५ आहेत का ६६५ गणती नाही – यांच्यात फार महत्त्वाचे फरक आहेत. स्वतंत्र भारत पक्ष हा उत्पादकांचा आहे, उद्योजकांचा आहे, प्रतिभाशाली विद्वानांचा आहे, शास्त्रज्ञांचा आहे. काहीतरी नवनिर्मिती करणारांचा आहे – सर्व सृजनशील व्यक्तींचा आहे; फुकटखाऊंचा नाही. हा शेषांचा पक्ष आहे, गांडुळांचा पक्ष नाही; हा भीक मागणारांचा पक्ष नाही, हक्काचं घेणारांचा पक्ष आहे.

स्वतंत्र भारत पक्ष निवडणुका लढवणार आहे. यात काही चोरून-लपवून ठेवण्याचं कारण नाही. चाकणला शेतकरी चळवळीचा जन्म झाला, तेव्हा मला असं वाटायचं, की चाकण पेटवायला ३ वर्षे लागली, तेव्हा ही चळवळ देशभर पसरायला निदान १०/१५ वर्षे तरी लागतील; पण चाकणच्या आंदोलनानंतर केवळ १८ महिन्यांत मला वाघा सीमेवरील पंजाबमधील शेतकऱ्यांसमोर भाषण करावं लागलं. इतकी स्वातंत्र्याची तहान लोकांना लागली आहे. आज 'स्वतंत्र भारत पक्षा'ची घोषणा आपण करतो आहोत, माझी मनोदेवता असं सांगते, की ज्याला ज्याला प्रतिभा आहे, ज्याला ज्याला बुद्धी आहे, आपल्या प्रतिभेचा, बुद्धीचा अभिमान आहे आणि शिंग मोडून विनाकारण, ज्यांच्याकडे प्रतिभा नाही, ज्यांच्याकडे कर्तृत्व नाही अशा लोकांच्याबरोबर जाण्याची ज्यांची इच्छा नाही त्यांनी जर का आपला स्वाभिमान जपण्याचं ठरवलं आणि पृथ्वीचा भार पेलणाऱ्या 'पोशिंद्या' शेषानं ठरवलं, की यापुढं या ऐतखाऊ गांडुळांचा जाच आम्ही सहन करणार नाही, तर दीड वर्षाच्या आत दिल्लीच्या लाल किल्ल्यावर स्वतंत्र भारत पक्षाचा झेंडा फडकल्याशिवाय राहणार नाही.

घोषणाबाजी करणं हा माझा स्वभाव नाही, हा माझा धर्म नाही. १९९१ सालापासूनचं शेतकरी संघटनेचं साहित्य चाळून पाहिलं, तर या विषयावर किती प्रचंड अभ्यास केलेला आहे ते लक्षात येईल. वैचारिक मांडणीतलं लोकांना विशेष समजत नाही, समजणार नाही. कारण, सरकारशाहीनं त्यांना तेवढी फुरसत आणि बुद्धीची क्षमता ठेवलेलीच नाही. एकेकाळी रोममध्ये सत्ताधारी पोप म्हणायचा, की बायबलमध्ये असं सांगितलं आहे, की पृथ्वी विश्वाच्या केंद्रस्थानी स्थिर आहे आणि सूर्यादी तारे पृथ्वीभोवती फिरत आहेत. तेव्हा जनसामान्यांना असं वाटायचं, की यापलीकडे सत्य काही असू शकत नाही. एक कोपर्निकस निघाला आणि त्यानं सांगितलं, की हे धादांत असत्य आहे, आपल्या ग्रहमालेच्या केंद्रस्थानी सूर्य स्थिर आहे आणि आपण सर्व ग्रह त्याच्याभोवती फिरत आहोत. लोकांना पटलं नाही, कोपर्निकसचा छळ झाला.

पण, आज त्याला नव्या विज्ञानयुगाचा महापिता मानलं जातं.

स्वातंत्र्याचं महत्त्व जाणायचं असेल, तर प्रथम बुद्धीची झेप पाहिजे. आठ वाजता कारखान्यात जायचं, जी काही चाकं, दांडे हलवायचे असतील ते हलवायचे, जो काही पगार मिळेल तो घेऊन घरी यायचं, स्टॅलिनच्या कृपेनं आठवड्यात एक अंडे खायला मिळालं, तर 'स्टॅलिन झिंदाबाद' म्हणायचं आणि जर दोन अंडी मिळाली, तर दोनदा झिंदाबाद म्हणायचं यातच ज्यांनी पुरुषार्थ मानला आणि आपली बुद्धी गंजू दिली अशा माणसांना 'स्वतंत्र भारत पक्षा'चा विचार उमगणार नाही. समाजवादाच्या कालखंडात ज्यांची बुद्धी बुरसटलेली आहे, त्यांना हा स्वातंत्र्याचा विचार आकलन होणार नाही, त्यासाठी एका नव्या शैलीनं, नव्या धाटणीनं विचार करण्याची आवश्यकता आहे.

समाजवादी व्यवस्थेचा जगभर पराभव झाला आहे, तिचा अंत झाला आहे. स्वातंत्र्याचं स्फुल्लिंग जिवंत असलेल्या व्यक्तीला समाजवादी गुलामगिरीच्या पिंजऱ्यातून सुटका करून घेण्याची संधी समोर आली आहे. कितीही काळ पिंजऱ्यात बंदिस्त असलेल्या वाघाला पिंजऱ्याचे दार उघडे दिसले, तर तो बाहेर पडल्यानंतर आपल्याला काही खायला मिळेल की नाही, याचा विचार करीत बसत नाही, उघड्या दारातून छलांग मारून तो मोकळ्या जगात येतो; हिमतीनं शिकार करून, भूक भागवण्यासाठी. साखळीला बांधून ठेवलेल्या कुत्र्याची साखळी मोकळी केली, तरी तो विचार करतो, की बाहेर गेलो तर भाकरी मिळेल का? आणि खरंच बाहेर कुठं भाकरी मिळाली नाही, तर तो कुत्रा पुन्हा पुन्हा साखळीनं बांधलेल्या जागी येऊन भाकरी घातली आहे का, हे आशाळभूतपणे पाहतो. स्वतंत्र भारत पक्षाचा विचार कोपर्निकसचा विचार आहे, फार गहन विषय आहे; तो सहज आकलन होणारा विषय नाही. स्वतंत्र भारत पक्षाचा स्वातंत्र्याचा विचार हा वाघाच्या हिंमतवान मानसिकतेचा विचार आहे, बेगडी वाघांची चित्रं काढून, केकाटणाऱ्यांचा नाही आणि आशाळभूत कुत्र्यांचा तर नाहीच नाही.

स्वतंत्र भारत पक्षाने या अधिवेशनात फार थोडे ठराव केले. या ठरावातील अनेक मुद्द्यांवर वादविवाद होणार आहेत. या ठरावांच्या मागे जे थोडक्यात सूत्र आहे, ते लक्षात घ्यायला हवं. निसर्गाने ज्या ज्या गोष्टी बनवल्या आहेत त्यांच्यापेक्षा चांगल्या गोष्टी बनवणारा मनुष्य अजून निर्माण व्हायचा आहे. जो जो निसर्गाच्या या व्यवस्थेत हात घालायचा प्रयत्न करतो, तो तो चांगल्या सुरळीत चाललेल्या गोष्टींचं वाटोळं करतो. त्याप्रमाणे, सरकारने समाजजीवाच्या

विविध स्वाभाविक, नैसर्गिक अंगांमध्ये हात घातल्यामुळेच त्यात अनेक बिघाड झाले आहेत. ही बाब सहज समजावी म्हणून आपण एक उदाहरण पाहू. आपलं शरीर हा देश आणि आपला मेंदू हे सरकार आहे असं समजा. आपला श्वास, उच्छ्वास कायमचा चालू असतो. आपण पोटामध्ये अन्न घेतो, त्याचं पचन होतं, त्यातला उपयुक्त भाग पोषणासाठी शरीरात वापरला जातो, साठवला जातो, निरुपयोगी भागाचं उत्सर्जन होतं. श्वास घे, उच्छ्वास सोड असं मेंदूनं सांगावं लागत नाही, या क्रिया निसर्गनियमाने चालत राहतात. खा, खाल्ल्यानंतर पोटामध्ये अमुक अमुक रसायने स्रवू दे, पचन होऊ दे असं मेंदू सांगत नाही, त्या क्रिया आपोआप होत असतात. या सर्व प्रक्षिप्त क्रिया असतात; पण जेव्हा मेंदू या प्रक्षिप्त क्रियांमध्ये हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न करतो आणि तोंडाला सांगतो, की अरे पोट भरलं असलं, तरी ही भजी चुरचुरीत चवदार आहेत. थोडी खाऊन घे आणि आवश्यकता नसतानाही शरीराने मेंदूचं म्हणणं ऐकलं, तर पोटाला तडस लागून अपचन, आम्लपित्त यांचा त्रास होणार. म्हणजे निसर्गतः सुरळीत चालणाऱ्या देहक्रियांत सरकार- मेंदूनं हस्तक्षेप केल्यास बिघाड होतो. हे साधंसुधं उदाहरण समाजजीवनातील सरकारचा हस्तक्षेप कसा विनाशकारी आहे, हे समजावून घेण्यास पुरेसं आहे.

काही बाबतींत अभ्यासपूर्वक हस्तक्षेपाने चांगला बदल घडण्याची शक्यता मी नाकारत नाही. स्वतंत्र भारत पक्षानेसुद्धा सरकार ही कल्पना संपूर्ण नाकारलेली नाही. काही देखरेखीची व्यवस्था आवश्यकच आहे, हे आम्हाला मान्य आहे. परंतु 'ङशरीं सींशीशिर्शी ळी लशीं सींशीशिर्शी' म्हणजे 'कमीत कमी शासन हेच सर्वोत्तम शासन.' गुजराथीमध्येसुद्धा सरकारी हस्तक्षेपाचे मूल्यांकन करणारे एक वाक्य आहे – 'जहाँ राजा बेपारी, वहाँ प्रजा भिखारी.' स्वतंत्र भारत पक्षाची ही मार्गदर्शक तत्त्वे आहेत. जी कामे आपली नाहीत, ती सरकारने करायला जाऊ नये. आज मुंबईसारख्या शहरांत गुंड भर दिवसा खून पाडत आहेत, जराही कोणाला सुरक्षितता नाही, प्रवासात सुरक्षितता नाही. नागरिकांना सुरक्षितता देण्याऐवजी पर्यटकांकरिता पंचतारांकित हॉटेलं चालवण्याचा धंदा सरकारनं करण्याचं काही कारण नाही. जे काम सरकारचं आहे, ते सरकारनं करावं. एकदा तुम्ही देशामध्ये कायदा आणि सुव्यवस्था प्रस्थापित करून दाखवा; मग आम्ही तुम्हाला बढती देऊ आणि नवीन कामं तुमच्यावर सोपवू. जोपर्यंत तुमची नेमलेली कामं तुम्ही व्यवस्थित पार पाडीत नाही तोपर्यंत समाजजीवनात निसर्गनियमानं चालणाऱ्या कामात हस्तक्षेप करून, देशाला बुडवायचे उपद्व्याप

करू नका.

आम्हाला शासन कशा प्रकारचे हवे? आम्हाला शासन एकेरी नको, आम्हाला शासन बहुआयामी पाहिजे. आजच्या शासनप्रणालीमध्ये मतदानकेंद्रं लुटली जातात, खोटी मतं टाकली जातात, खून होतात, गुंड निवडून येतात, बिहारच्या पद्धतीच्या निवडणुका होतात आणि त्यातून निवडून आलेले लोक गरिबाचं पोट कसं भरावं या नावानं योजना काढायला जातात आणि जनावरांची पोटं कशी भरावी याच्या योजना काढतात; गरिबांचं रेशन किंवा जनावरांचा चारा स्वत:च खाऊन जातात. स्वतंत्र भारत पक्षाची मांडणी साधी आहे. गरिबांचं कल्याण करायचं काम ज्यांच्या मनामध्ये करुणा जागृत झाली आहे अशा मदर टेरेसांसारख्या लोकांनी केलं पाहिजे, गरिबांचं कल्याण करायचं काम लालूप्रसादांचं नाही, सोनिया गांधींचं नाही आणि शरद पवारांचंही नाही. विद्यापीठ कोठे काढावं, महाविद्यालय कोठे काढावं याचे निर्णय जे, आम्ही म्याट्रिकसुद्धा पास नाही याचा अभिमान बाळगतात, ते घेतात याच्याइतकी चेष्टा दुसरी कोणती असू शकत नाही. ज्यांना विद्याक्षेत्रात काही अधिकार आहे, ज्यांचा काही व्यासंग आहे अशा मंडळींचं सरकार वेगळं असावं आणि त्यांनी ज्ञानदानाच्या संस्था काढाव्यात आणि चालवाव्यात. जे लोक 'एक डोकं, एक मत'च्या माध्यमातून राज्यावर बसतात, त्यांना देशात शांतता आणि सुरक्षितता राखण्यापलीकडे दुसरं कोणतंही काम करण्याचा नैतिक अधिकार नाही हे स्वतंत्र भारत पक्षाचं धोरण आहे.

इतका विणलेला विचार घेऊन आम्ही तुमच्यापुढे, स्वातंत्र्यानंतर ५६ वर्षांनी आलो आहोत. स्वातंत्र्यानंतर ४४ वर्षे समाजवादाचा अंधकार माजला, गांधीजी बाजूला राहिले. आता समाजवादही पडला. आता कोणत्या दिशेनं जायचं हे कोणाला समजत नाही. अशा अवस्थेमध्ये कोणी वाटेल ते उपद्व्याप करून, गुंडगिरी करून, भ्रष्टाचार करून हजारो कोटी रुपये जमा करतात आणि त्यांचा वापर करून निवडणुका जिंकतात. ज्यांना या पद्धतीने पैशावर निवडणुका जिंकणे शक्य नाही त्यांनी दुसराच उद्योग काढला. धर्माच्या नावाने भांडणं लावली, दुसऱ्या धर्मांविषयी द्वेष पसरवला, दुसऱ्या जातींविषयी द्वेष पसरवला किंवा आरक्षणासाठी चळवळ करून आपले बांधीव मतदारसंघ निर्माण केले. अशा तऱ्हेने आपल्या हाती सत्ता यावी, सत्तेचे उपभोग आपणास मिळावे एवढाच हेतू; देशाचे काय व्हायचे ते होवो, त्याबद्दल त्यांना काही सोयरसुतक नाही. त्यामुळे आज आपण अशा परिस्थितीत आहोत, की देशाला काही मार्ग नाही,

दिवा दाखविणारा कोणी नाही आणि सामान्य नागरिक मोठा त्रस्त झाला आहे. कारण सुरक्षा नाही, सर्व वस्तूंच्या किमती प्रचंड वाढत आहेत, नोकऱ्या मिळत नाहीत, रोजगार मिळत नाही. आणि लोकांकडे जे काही थोडकं आहे त्यावरसुद्धा गुंडांची नजर असल्यामुळे त्यांना जगणं कठीण झालं आहे. घरातील मुलीला जर घरी यायला उशीर होऊ लागला तर ती सुखरूप घरी येईल किंवा नाही याबद्दल शंका वाटू लागते अशी परिस्थिती तयार झाली आहे. या परिस्थितीमध्ये काही किचकट सिद्धांत मांडून लोकांना मार्ग दाखविण्यात काही अर्थ नाही. मार्ग एकच आहे –

साऱ्या जगामध्ये श्रेष्ठ कोणी नेता नाही, कोणी धर्मात्मा नाही, कोणी पुढारी नाही. या जगामध्ये व्यक्तीइतकं पवित्र कोणी नाही. श्रीमद् शंकराचार्यांच्या भाषेमध्ये 'मी (=व्यक्ती) आणि ब्रह्मांड' यांच्यामध्ये तिसरं कोणी नाही, ही भावना प्रत्येक व्यक्तीच्या मनामध्ये रुजली पाहिजे. व्यक्तीला जे योग्य वाटतं तेच राष्ट्राला योग्य आहे, व्यक्तीच्या पलीकडे राष्ट्राचं मोठेपण याला काही अर्थ नाही. व्यक्तीला वाव मिळाला तर व्यक्ती वाटेल ती कर्तबगारी करून दाखवते. हिंदुस्थानातील मनुष्य अमेरिकेत गेला, तर कर्तबगारी गाजवून धनाढ्य होतो, नाव कमावतो; पण तोच हिंदुस्थानात राहिला तर त्याचा कचरा होतो. याचा अर्थ असा, की हिंदुस्थानातील कर्तबगार, स्वातंत्र्यप्रिय नागरिक आणि पराक्रम व विकास यांच्यामध्ये एक मोठा अडथळा उभा आहे, तो म्हणजे भारतीय शासन व्यवस्था. या शासनव्यवस्थेचा उच्छेद करण्याची प्रतिज्ञा घेऊन, स्वतंत्र भारत पक्ष तुमच्यापुढे आला आहे. त्याला सक्रिय मदत करणे हे प्रत्येक स्वातंत्र्यप्रेमी नागरिकाचं कर्तव्य आहे.

आणखी एक मुद्दा आहे. हिंदुस्थानातले अनेक सुजाण लोक म्हणतात, की राजकारण म्हणजे घाण, गटार झालं आहे. हे सत्य आहे आणि गेली वीस-पंचवीस वर्षे शेतकरी संघटना आणि शेतकरी महिला आघाडीच्या निमित्ताने आणि त्याआधीही सरकारी नोकरीच्या निमित्ताने समाजात वावरताना माझ्यावर अजून कोणी चिखलाचा एक कणसुद्धा टाकलेला नाही; तरीसुद्धा आपल्या अंगावर डाग पडतील याची भीती न बाळगता, भारतीय राजकारणाचं हे गटार उपसण्याचा मी निर्णय केला आहे आणि माझी तुम्हा सर्वांना आणि देशातील सर्व सुजाण, कर्तबगार, स्वातंत्र्यप्रेमी नागरिकांना विनंती आहे, की तुमच्या अंगावरील हे निष्कलंक पांढरेशुभ्र परीटघडीचे कपडे आहेत, त्यांच्यावर डाग पडतील म्हणून फार काळजी करू नका. कपडे मळले तर धुता येतील, डाग

गेले नाहीत, तर बदलताही येतील; पण या घाणीत देश बुडाला तर तो पुन्हा वाचवता येणार नाही. तेव्हा स्वतंत्र भारत पक्षाला केवळ मतं नकोत; आर्थिक मदत तर लागेलच; पण प्रत्यक्ष पुढे येऊन स्वतंत्र भारत पक्षाचे कार्यकर्ते म्हणून आपली जी काही कर्तबगारी आहे, आपली जी काही आभा आहे तिचा समाजामध्ये उपयोग करून स्वातंत्र्याच्या पक्षाला, व्यक्तीच्या हातापायातील गुलामगिरीच्या बेड्या तोडणाऱ्या पक्षाला हिंदुस्थानाला दोनशे वर्षांच्या अंधकारातून बाहेर काढण्यासाठी विजयी करून दाखवावं.

१९९४ मध्ये मुंबईच्या भारतीय विद्याभवनामध्ये स्वतंत्र भारत पक्षाची स्थापना झाली. त्याचा संस्थापक अध्यक्ष म्हणून माझा उल्लेख केला जातो. खरी गोष्ट आहे. राजकारणामध्ये पडण्याची माझी, शेतकरी नेता म्हणून इच्छा नव्हती. पण, चक्रवर्ती राजगोपालाचारींचे पट्टशिष्य आणि नजीकचे सहकारी श्री. मिनू मसानी यांनी आग्रह धरला, की सगळ्या हिंदुस्थानामध्ये स्वातंत्र्याचा झेंडा घेऊन पुढे जाण्याचा नैतिक अधिकार शेतकरी नेता म्हणून तुम्हालाच आहे, तुम्ही ही जबाबदारी नाकारू नये. मोठ्या नाइलाजाने मी ते पद स्वीकारलं. पक्षाच्या पहिल्याच सभेत कायदातज्ज्ञ राम जेठमलानी यांनी एक अजब गोष्ट लक्षात आणून दिली, की हिंदुस्थानातील कायद्याप्रमाणे कोणताही पक्ष स्थापन करायचा असेल आणि त्याला मान्यता मिळवायची असेल तर त्याला तीन शपथा घ्याव्या लागतात. पहिली, लोकशाहीवर विश्वास आहे, दुसरी, निर्धार्मिकतेवर विश्वास आहे आणि तिसरी, माझा समाजवादावर विश्वास आहे. अशी अट तर स्टॅलिनच्या काळामध्ये स्टॅलिननेसुद्धा घातली नव्हती. लोकशाहीवर माझा विश्वास आहे अशी शिवसेनेच्या बाळासाहेब ठाकऱ्यांनी शपथ घेतली आणि नंतर ते म्हणाले, "हिंदुस्थानात लोकशाही काय घेऊन बसलात, इथे गरज आहे ठोकशाहीची." त्यांनी शपथ घेतली, की आपण निधार्मिक आहोत आणि नंतर त्यांनी सांगितलं, की पक्षाला मान्यता मिळविण्यासाठी मी खोटं बोललो, मी निधार्मिक नाही. मी थोडा कठोर माणूस आहे. मी अशी खोटी शपथ घ्यायला नकार दिला. माझा समाजवादावर विश्वास नाही, समाजवाद हा मनुष्यजातीला लागलेला कलंक आहे, शाप आहे असं मी एक उद्योजकतावादी म्हणून म्हणत असताना 'माझा समाजवादावर विश्वास आहे,' अशी खोटी शपथ घेण्याचे नाकारले. परिणामी, १९९४ मध्ये स्वतंत्र भारत पक्षाचं बीज लावलं गेलं; पण त्याला पक्ष म्हणून मान्यता मिळवता न आल्यानं त्याला खतपाणी घालणं कठीण होऊन गेलं. नंतर अध्यक्षपदाची धुरा मी डॉ. मानवेंद्र काचोळे यांच्या

खांद्यावर दिली. तेव्हा त्यांनी ॲड. वामनराव चटप आणि इतर सहकाऱ्यांच्या मदतीने समाजवादाच्या वेगवेगळ्या शब्दकोशांतील व्याख्यांचा अभ्यास केला आणि थोडक्यात असं दाखवून दिलं, की 'समाजवाद' या शब्दाची नेमकी व्याख्या कोठेच दिलेली नाही. तेव्हा 'समाजवादावर विश्वास असल्याची' शपथ घेण्यात काही फार मोठा गुन्हा ठरणार नाही. त्यांनी तशी शपथ घेतली, हे योग्य केलं का अयोग्य, ते नंतर ठरवू; पण एक गोष्ट खरी, की दहा वर्षांपूर्वी स्थापन झालेल्या 'स्वतंत्र भारत पक्ष' या माझ्या सहकाऱ्यांच्या हुशारीमुळे मान्यताप्राप्त रजिस्टर्ड पक्ष झाला आहे. या पक्षातर्फे आपण अजून खरीखुरी निवडणूक लढविली नाही, समान चिन्ह नसताना निवडणूक लढविल्यामुळे आवश्यक ती मतांची संख्या आपल्याला मिळवता आली नाही आणि ती संख्या जमा करता आली नाही म्हणून चिन्ह मिळत नाही अशा दुष्टचक्रात हा पक्ष सापडला आहे. पण, या पक्षाला एक चिन्ह प्राधान्याने वापरण्याचा अधिकार मिळाला आहे आणि योगायोगाची गोष्ट अशी, की ज्यावेळी या चिन्हावर आपल्याला अधिकार मिळाला त्याच सुमारास ओसामा बिन लादेनचं विमान अमेरिकेच्या जागतिक व्यापार केंद्रावर धडकलं होतं. त्यामुळे 'विमान' हे चित्र एक क्रांतीचं प्रतीक बनलं. स्वतंत्र भारत पक्षाला 'विमान' या चिन्हावर प्राधान्याने अधिकार मिळाला आहे. मला अशी आशा आहे, की पुढच्या निवडणुकीमध्ये जी काही ४ टक्के मते लागतात, त्यापेक्षा अधिक मते मिळवून त्याला अखिल भारतीय पक्ष म्हणून मान्यता मिळून, 'विमान' हे त्याचं अधिकृत चिन्ह म्हणून मान्य होईल, दुसऱ्या टप्प्यात, हिंदुस्थानातील सर्वांत मोठा विरोधी पक्ष आणि तिसऱ्या टप्प्यात भारताच्या उज्ज्वल भवितव्याच्या वाटेवर आणणारा एकमेव पक्ष म्हणून मान्यता मिळवण्यात यशस्वी होईल.

(६ जून २००३)

◆◆

लोकसभा निवडणूक २००४
ग्यानबाचे मतदारांना मार्गदर्शन

लोकसभेच्या निवडणुकीच्या कार्यक्रमाच्या तारखा जाहीर झाल्या आहेत. २० एप्रिल रोजी ज्या प्रदेशात मतदान व्हावयाचे आहे तेथील मतदारसंघात उमेदवारांनी अर्ज भरायला सुरुवात केली आहे. ३ एप्रिलपर्यंत अर्ज भरणे, स्वीकारणे, नाकारणे, माघारी घेणे ही सर्व प्रक्रिया आटोपून निवडणुकीत पात्र असणाऱ्या उमेदवारांची यादी तयार झाली असेल.

प्रत्येक उमेदवाराने आपल्यावरील गुन्हेगारी खटले, आपली शैक्षणिक पात्रता, स्थावर जंगम मालमत्ता यांसंबंधी प्रतिज्ञापत्र सादर करावयाचे आहे. प्रतिज्ञापत्रक सादर न करणाऱ्या उमेदवारांचे अर्ज स्वीकारले जाणार नाहीत असे मुख्य निवडणूक आयुक्तांनी स्पष्ट केले आहे. प्रतिज्ञापत्रांची छाननी, तपासणी झाली तर निवडणूक आयोग काही उमेदवारांना अपात्र ठरवील काय, पात्रअपात्रतेचा निकष काय राहील, या गोष्टी स्पष्ट नाहीत. त्यामुळे, प्रतिज्ञापत्र सादर करण्याच्या प्रयोगातल्या या पहिल्या निवडणुकीत निवडणूक आयोग खळबळजनक हस्तक्षेप करील अशी शक्यता नाही.

तरीही, प्रतिस्पर्धी उमेदवार प्रतिज्ञापत्रांच्या आधाराने परस्परांच्या उमेदवारीबद्दल आक्षेप घेतील, ही शक्यता नाकारता येत नाही. निवडणूक अधिकाऱ्यांना अशा आक्षेपांबद्दल निर्णय घेण्यासाठी फारसा अवधी नाही. उमेदवारांचा गुन्हेगारी, शैक्षणिक आणि व्यावसायिक इतिहास बारकाईने तपासण्यासाठी निवडणूक अधिकाऱ्यांकडे काही साधने किंवा यंत्रणाही नाही. अशा परिस्थितीत निवडणूक अधिकाऱ्यांनी घेतलेल्या निर्णयांबद्दल आव्हाने, प्रतिआव्हाने यांची मालिका सुरू होऊ शकते. ही प्रकरणे न्यायालयातही जातील. कदाचित, त्यांचा अंतिम निर्णय होईपर्यंत १५ व्या लोकसभेची निवडणूकही येऊन ठेपेल. निवडणूक अधिकाऱ्यांनी काही उमेदवारांना अंतिम निर्णय होईपर्यंत निवडणूक लढविण्याची

तात्पुरती परवानगी दिली तर त्यामुळे गुंतागुंत अधिकच वाढेल. तात्पुरती परवानगी मिळालेले उमेदवार निवडणुकीत हरले, तर फारशी गुंतागुंत वाढणार नाही. पण, तसा एखादा उमेदवार खासदार म्हणून निवडून आला, पुढे मंत्री झाला किंवा प्रधानमंत्री झाला तर सर्वोच्च न्यायालयाच्या प्रतिज्ञापत्रांची अट लादण्याच्या निर्णयामुळे मोठा हाहाकार माजू शकतो.

उमेदवारांच्या पात्रता-अपात्रता यासंबंधीचा निर्णय हा विषय उमेदवार, त्यांचे पक्ष, निवडणूक अधिकारी, निवडणूक आयोग आणि न्यायालये यांनी घ्यावयाचा आहे. मतदारांना या विषयात काही करण्यास फारसा वाव नाही. पात्र उमेदवारांची नावे, त्यांचे पक्ष आणि निवडणूक चिन्हे यांची यादी प्रसिद्ध झाली म्हणजे मतदाराचे काम चालू होते.

उमेदवारांच्या याद्या एका काळी मोठ्या लांबलचक असत. त्यांच्या छपाईसाठी कित्येक फूट लांबीची मतदानपत्रिका तयार करण्याचे आवश्यक झाल्याचे प्रसंग घडले आहेत. येत्या निवडणुकीत उमेदवारांची यादी तुलनेने अधिक आटोपशीर असेल. याचे प्रमुख कारण अलीकडच्या काळात तयार झालेल्या पक्षांच्या आघाड्या हे आहे. या आघाड्यांतील विद्यमान संख्याबल लक्षात घेता, सर्वांत मोठी म्हणजे श्री. अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखालील भाजपप्रधान राष्ट्रीय लोकशाही आघाडी. त्यानंतर श्रीमती सोनिया गांधी यांच्या नेतृत्वाखालील काँग्रेसप्रणीत आघाडी. याखेरीज, काही डाव्या पक्षांनी एकत्र येऊन, तिसरी आघाडी उभी करून मोठ्या प्रमाणावर जागा लढविण्याचे ठरविले आहे. या तीन प्रमुख आघाड्यांखेरीज स्थानिक व प्रादेशिक प्रश्नांवर उभ्या झालेल्या, विदर्भ मोर्चासारख्या काही आघाड्याही असतील आणि शेवटी, कोणत्याही पक्षाचा आधार न घेता, आपल्या व्यक्तिगत सामर्थ्यावर निवडणूक लढविणाऱ्या स्वतंत्र, अपक्ष उमेदवारांची गणती केली पाहिजे.

दिवसेंदिवस अपक्ष उमेदवारांची संख्या घटत आहे. निवडून येणाऱ्या अपक्ष उमेदवारांचे घटते प्रमाण हे एक कारण, उमेदवारांनी भरावयाच्या अनामत रकमेतील वाढ हे दुसरे कारण आणि निवडून येण्यासाठी कराव्या लागणाऱ्या किमान खर्चाची भूमितीश्रेणीची वाढती कमान हे आणखी एक महत्त्वाचे कारण. एवढ्या सगळ्या अडचणी असूनही, मतदानपत्रिकेवर तीनचार आघाड्यांचे उमेदवार आणि पाचपंचवीस अपक्ष उमेदवार यांची नावे असतील. सर्वत्र मतदानयंत्रांचा वापर होणार असल्याने मतदानपत्रिका या शब्दाचा वापर लाक्षणिक अर्थानेच घ्यावयास पाहिजे.

मतदानयंत्रांच्या वापरामुळे आता 'अमुक अमुक उमेदवाराच्या नावावर किंवा नावासमोर फुली करा, शिक्का मारा,' ही निवडणूकप्रचारात रुळलेली वाक्ये कालबाह्य ठरणार आहेत. पसंतीच्या उमेदवाराचे बटण दाबा अशी मतदानाची नवीन पद्धती येत आहे. या यंत्रांची प्रात्यक्षिके जागोजागी दाखविण्यात येत आहेत. मतदारांनी ही पद्धत व्यवस्थित समजून घेतली पाहिजे.

त्याही आधी, १८ वर्षांवरील सर्व स्त्री-पुरुष नागरिकांनी मतदारयादीत आपले नाव आहे, याची खात्री करून घेतली पाहिजे. नाव मतदारयादीत नसल्यास किंवा त्यामध्ये काही चुका असल्यास दुरुस्तीसाठी अर्ज करून, आपले नाव व्यवस्थित मतदारयादीत येईल यासाठी प्रयत्न केला पाहिजे.

मतदारयादीत नाव असलेले नागरिकच मतदान करू शकतात. उमेदवारांच्या यादीतील कोणत्याही एका उमेदवाराला बटण दाबून ते मत देऊ शकतात. मतदारयादीतील प्रत्येक नागरिकाने आपल्या पसंतीच्या उमेदवाराची निवड कशी करावी याबद्दल 'ग्यानबा'चा सल्ला असा :

पक्षांचे जंगल विरळ करा

स्वातंत्र्य मिळाले तेव्हा भारतात फारसे पक्ष नव्हते. नंतरच्या काळात नवे पक्ष तयार होत गेले. जुने पक्ष फुटून त्यातून नवनवे पक्ष बनत गेले. काही पक्ष राष्ट्रीय पातळीवर मान्यताप्राप्त आहेत. काही पक्षांना विवक्षित राज्यांपुरतीच मान्यता मिळाली आहे. अनेक पक्षांची पक्ष म्हणून केवळ नोंदणी झाली आहे. मान्यताप्राप्त पक्षांना त्यांच्या मागणीनुसार आणि उपलब्धतेनुसार राखीव चिन्हे देण्यात आली आहेत. पूर्वी मान्यता मिळालेल्या काही पक्षांच्या मान्यता नंतर काढून घेण्यात आल्यामुळे अशा पक्षांची चिन्हे विनाउपयोग पडून राहिली आहेत. जसे, स्वतंत्र पक्षाचा तारा, रिपब्लिकन पक्षाचा हत्ती इत्यादी.

पक्षांच्या या वाढत्या दाटीत तसे चुकीचे काही नाही. आपला देश विविधतेने नटलेला आहे. प्रदेशाप्रदेशाचे प्रश्न वेगवेगळे आहेत. वेगवेगळ्या समाजांचे आर्थिक, सामाजिक, राजकीय प्रश्न भिन्नभिन्न आहेत. आपापले प्रश्न मांडण्यासाठी लोकांनी वेगवेगळे मंच तयार करावेत, हे योग्यच आहे. पण, या पक्षबहुलतेचा एक मोठा गैरफायदा आहे. मतदारांना निवड करणे त्यामुळे कठीण होऊन जाते. वेगवेगळ्या प्रदेशांत मतदारांचा कौल वेगवेगळा असला तर निवडणुकीतून मतदारांचा राष्ट्रीय कौल स्पष्ट होत नाही. वेगवेगळ्या वर्गांचे, जातींचे, धर्मांचे आणि प्रदेशांचे कौल अगदी भिन्न भिन्न असू शकतात. आणीबाणीनंतर उत्तर हिंदुस्थानात काँग्रेसचे पानिपत झाले; पण दक्षिणेतील मतदारांचा कौल वेगळा

निघाला. महाराष्ट्राच्या विधानसभेतील बहुमत १९६१ सालापासून विदर्भ प्रदेशातील मताधिक्क्यावरच ठरत आले आहे. लोकशाही पद्धती ज्या देशात चांगल्या मूळ धरून आहेत तेथे द्विपक्षीय पद्धती रूढ झाली आहे.

अमेरिकेत डेमॉक्रॅटस् आणि रिपब्लिकन्स, इंग्लंडमध्ये काँझर्व्हेटिव्हज आणि लेबर अशा दोन दोन पक्षांखेरीज तिसरे पर्याय मधूनमधून उभे राहतात; पण शेवटी ते दोन पक्षांच्या पद्धतीत सामावून जातात. युरोपातील बहुतेक देशांत द्विपक्षीय पद्धत नाही. त्यामुळे तेथील निवडणुकांची पद्धतही काहीशी वेगळी आहे. उदाहरणार्थ, जर्मनीत मतदार उमेदवारांना मते न देता पक्षाला मते देतो. प्रत्येक पक्षाला कायदेमंडळात मिळणाऱ्या जागांची संख्या त्याला मिळालेल्या मतांच्या प्रमाणात ठरते. पक्षाला जितकी पदे मिळतात, तितके प्रतिनिधी पक्षाच्या उमेदवारांच्या यादीतून क्रमशः कायदेमंडळात पाठवले जातात. फ्रान्ससारख्या देशात मतदानाच्या पहिल्या फेरीत ५० टक्क्यांपेक्षा जास्त मते कोणालाही मिळाली नसल्यास जास्तीत जास्त मते मिळालेल्या दोन उमेदवारांना शेवटच्या फेरीत उतरविले जाते.

आपल्या देशातील निवडणूकपद्धतीत मतदार उमेदवार निवडून पाठवितो. ज्या उमेदवाराला सर्वांत अधिक मते मिळतात, तो विजयी झाल्याचे घोषित करण्यात येते, मग त्याला मिळालेल्या मतांची टक्केवारी कितीही कमी असो. या पद्धतीमुळे पक्षाला मिळणारी मते आणि जागा यांचे प्रमाण व्यस्त असू शकते. अनेक निवडणुकांत काँग्रेस पक्षाला मिळालेली मते ३५ ते ४० टक्के; पण कायदेमंडळात मिळालेल्या जागा ६० ते ७० टक्के असे घडले आहे. या विपरीत पद्धतीमुळेच स्वातंत्र्यानंतर अनेक वर्षे केंद्र शासनात एकाच पक्षाचे बहुमत राहिले आणि एकाच पक्षाची सरकारेही सत्तेत राहिली.

आणीबाणीनंतरच्या काळात ही परिस्थिती झपाट्याने बदलत आहे. गेली पंधरा वर्षेतरी दिल्लीत आघाड्यांचीच सरकारे राहिली आहेत. एकपक्षीय सरकार नजीकच्या भविष्यकाळात येईल अशी शक्यता दिसत नाही. हा बदल योग्य की अयोग्य, कायमस्वरूपी की तात्पुरता याबद्दल विवाद आहेत. २००४ च्या निवडणुका जाहीर होईपर्यंत काँग्रेस पक्षाध्यक्षा श्रीमती सोनिया गांधी यांनी आघाडी शासनांच्या संकल्पनेचा अव्हेर आणि उपहास केला. आघाडी शासने ही अलीकडे घडलेली अस्थायी विपरीतता आहे आणि लवकरच पूर्वीप्रमाणे पुन्हा एकदा एकपक्षीय सरकारे स्थापन होऊ लागतील असा विचार त्यांनी मांडला आणि काँग्रेसच्या नेतृत्वात विविध पक्षांची आघाडी बांधण्याचा विचारही

केला नाही. निवडणुका जाहीर झाल्यानंतर मात्र त्यांनी नको नको तेसुद्धा उंबरठे झिजवून, काँग्रेसप्रणीत आघाडी उभी करण्याचा जबरदस्त प्रयत्न चालविला आहे.

वास्तविक पाहता, आघाडी सरकारे ही अस्थायी विपरीतता नसून, स्वातंत्र्यानंतरच्या काळात एकपक्षीय सरकारे राहिली, ही तत्कालसापेक्ष विपरीतता होती. ही विपरीतता जाणीवपूर्वक योजलेल्या विपरीत निवडणूकपद्धतीमुळेच शक्य झाली. भारताच्या राज्यव्यवस्थेची तुलना इंग्लंड-अमेरिकेशी न करता, युरोपीय देशांशी केली पाहिजे. युरोपातील अनेक देशांत विविध पक्षांच्या आघाड्यांची सरकारे अनेक दशके चालली आहेत आणि त्यांच्या शासनाखाली त्या त्या देशांची विविधांगी प्रगती झाली आहे.

आघाडी सरकारांच्या या नव्या उत्क्रांतीमुळे भारत आता द्विपक्षीय आदर्शाच्या जवळ जाऊन पोहोचला आहे. सद्य:स्थितीत राष्ट्रीय लोकशाही आघाडी आणि काँग्रेसप्रणीत आघाडी हे दोनच प्रमुख पर्याय मतदारांपुढे आहेत. तिसऱ्या आघाडीच्या पर्यायांची पुंगी फार काळ वाजणार नाही आणि या निवडणुकीनंतर मतदारांपुढील विकल्प द्विपक्षीय पद्धतीप्रमाणेच स्पष्ट होऊन जातील.

काँग्रेस पक्षाची एकपक्षीय सरकारे ज्या स्वातंत्र्योत्तर काळात सत्तेवर आली त्या काळात काँग्रेसचे स्वरूप संकुचित अर्थाने पक्षाचे नव्हते. पक्षाचे नाव एक, ध्वज एक, अध्यक्ष एक; पण प्रत्यक्षात मात्र काँग्रेस विविध विचारांची, विविध मतांची आघाडी, अगदी स्वातंत्र्याच्या पूर्वीपासून राहिलेली आहे. काँग्रेसच्या एकाच छताखाली डॉ. हेडगेवार, जयप्रकाश नारायण, शंकरराव देव आणि नंबुद्रिपाद असे अगदी विभिन्न विचारप्रणालींचे नेते स्वातंत्र्याच्या ध्येयप्राप्तीसाठी काँग्रेसच्या झेंड्याखाली एकत्र आले होते. स्वातंत्र्यानंतरच्या पहिल्या नेहरू मंत्रिमंडळातही डॉ. आंबेडकर, जॉन मथाई, षण्मुखम् चेट्टी आणि श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्यासारखे विविध विचारधारांचे दिग्गज नेते नेहरूंनी एकत्र आणले होते. नेहरूंच्या नेतृत्वाखाली ही परंपरा चालू राहिली. पुढच्या काळातही टी. टी. कृष्णम्माचारी, चिंतामणराव द्वारकानाथ देशमुख यांच्यासारख्या तज्ज्ञांची मदत घेण्यात पक्षांच्या कुंपणांचा अडथळा आला नाही. नेहरूंच्या निधनानंतर मात्र काँग्रेसची सूत्रे घसरत्या श्रेणीने आणि वंशपरंपरेने बदलत राहिली. परिणामत:, आजची काँग्रेस आणि स्वातंत्र्यापूर्वीची गांधी-नेहरूंची काँग्रेस यांचा काहीही संबंध राहिला नाही. गांधी-नेहरूंची काँग्रेस, आजच्या शब्दांत, बहुपक्षीय आघाडी होती; आजची काँग्रेस निवडणूक लढविण्याचे आणि सत्ता राबविण्याचे एक

केवळ यंत्र झाले आहे.

दोनच पुरे!

येणारा जमाना आघाड्यांचा आहे हे लक्षात घेऊन मतदारांनी प्रथमत: आघाड्यांचे कुटुंबनियोजन केले पाहिजे व आघाड्यांची संख्या दोनवरच ठेवली पाहिजे. तिसऱ्या डाव्या लोकशाही आघाडीचा पर्याय या वेळी संपुष्टात येणारच आहे, या आघाडीचे कालबाह्य डावे विचारच तिला संपविणार आहेत. **मतदारांनी या डाव्या मंचाच्या मरणयातना कमी करून, त्यांना लवकर संपवून टाकावे.** यातच देशाचे व लोकशाही व्यवस्थेचे भले आहे. बाकीच्या किरकोळ व प्रादेशिक आघाड्यांचा फारसा विचार करण्याचीही गरज नाही. त्या आपोआपच कालाच्या उदरात गडप होणार आहेत.

२००४ च्या लोकसभा निवडणुकांत मतदारांसमोर दोनच प्रमुख पर्याय आहेत - राष्ट्रीय लोकशाही आघाडी आणि काँग्रेसप्रणीत आघाडी.

राष्ट्रीय लोकशाही आघाडी आणि काँग्रेस

या दोन विकल्पांतूनच भारतीय मतदाराला अंतिम निवड करावयाची आहे. २००४ च्या या निवडणुकीत आणि स्वातंत्र्यानंतर झालेल्या पहिल्या, १९५२ सालच्या निवडणुकीत एक साम्य आहे. १९५२ च्या निवडणुकीत देशाच्या कोणत्याही प्रदेशातील कोणत्याही कोपऱ्यातील मतदाराचा कल स्पष्ट होता. निवडणुकीनंतर पंतप्रधान पंडित नेहरूच होणार याबाबतीत एक सार्वत्रिक एकवाक्यता होती. पंडित जवाहरलाल नेहरू त्या वेळी काँग्रेस पक्षाचे अविवाद्य नेते होते. पंतप्रधान म्हणून त्यांच्या निवडीबद्दल १९५२ मध्ये एकवाक्यता असावी हे समजण्यासारखे आहे. पण, आज ५२ वर्षांनंतर कोणाही एका पक्षाला बहुमत मिळणे अशक्य असताना २००४ च्या या निवडणुकीत श्री. अटलबिहारी वाजपेयी हे १४ व्या लोकसभेत पंतप्रधान असतील, याबद्दलची एकवाक्यता मोठी आश्चर्यजनक आहे.

वाजपेयींच्या नेतृत्वाबद्दलचा हा सार्वत्रिक आत्मविश्वास - याला कोणी इंग्रजीत 'Feel Good' म्हटले, कोणी 'Indea Shining' म्हटले; राष्ट्रभाषेत त्याचे रूपांतर 'भारत उदय' झाले. राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे समर्थक 'Feel Good'ची भाषा करतात, तर त्यांचे विरोधक 'Feel Bad' चे रडगाणे लावतात. दोघांचीही बाजू मतदारांनी नीट समजून घेतली पाहिजे. 'भारत उदया'बद्दल वर्तमानपत्रांत, टेलिव्हिजनवर प्रचाराची मोठी आतषबाजी पाहायला मिळाली. देशातील विविध क्षेत्रांत गेल्या ५-६ वर्षांत किती प्रगती झाली याचे विश्वसनीय-

अविश्वसनीय किंवा एकांगी आकडे फिरून फिरून मांडण्यात आले. अन्नधान्याची मुबलकता, टेलिफोन सेवांची वाढती कार्यक्षमता, राष्ट्रीय रस्ते बांधणीचा कार्यक्रम इत्यादींची गणना झाली. विरोधकांनी Shining चा उपहास केला; गरिबी, भूकबळी, बेरोजगारी कसे अव्याहत चालू आहेत हे एकतर्फी आकडेवारीतून सिद्ध करण्याचा प्रयत्न केला. मतदारांनी 'भारत उदय'च्या आकडेवारीच्या जाळ्यात सापडू नये; तसेच Feel Bad वाल्यांच्याही प्रचाराकडे डोळसपणे पहावे.

कोणी म्हणेल गरिबी कमी झाली, कोणी म्हणेल गरिबी वाढली; कोणी म्हणेल लक्षावधी रोजगार वाढले, कोणी आकडेवारीने सिद्ध करील, की बेकारी वाढली. एक सांगेल भारतीय मालाची निर्यात वाढली, विरोधी सांगतील परदेशी स्पर्धेपुढे टिकाव न लागल्यामुळे कारखाने भराभर बंद पडत आहेत. सर्वसाधारण नागरिकाकडे ही आकडेवारी तपासण्याची काही साधने नसतात किंवा समजून घेण्यासाठी लागणारे पांडित्यही नसते. सर्वसाधारण मतदार बहुतेक दिवशी नेहमीचे वर्तमानपत्र वाचतो; काही तुरळक साप्ताहिके चाळतो. अलीकडे अलीकडे टेलिव्हिजनवर दाखविल्या जाणाऱ्या बातम्या पाहतो आणि ऐकतो. दूरदर्शनची मक्तेदारी संपुष्टात आल्यामुळे सरकार आणि सत्ताधारी पक्ष यांच्या विरुद्धच्या बातम्या व टीकाटिप्पण्या घरोघर टेलिव्हिजनच्या मार्गाने पोचतात. सर्वसामान्य मतदाराची प्रतिक्रिया अशी, की फारसे काही बदललेले नाही; पण तरीही कोणत्या का कारणाने होईना, **देशभर एक नवा आत्मविश्वास अनुभवाला येत आहे.**

आत्मविश्वासाची नाळ?

अन्नधान्याचा तुटवडा संपला आहे. डझनभर देशांना भारत आता अन्नधान्याची निर्यात करतो. दुधाचे दुर्भिक्ष्य संपले आहे. दुग्धजन्य पदार्थ ग्रहकांना विकण्यासाठी उत्पादकांची चढाओढ चालली आहे. या मुबलकतेचा आणि या नव्या आत्मविश्वासाचा तसा काही संबंध नाही.

स्वातंत्र्यानंतरच्या समाजवादाच्या काळात परदेशी चलन म्हणजे मोठी दुर्मिळ वस्तू होती. अगदी आवश्यकता असलेल्या लोकांनासुद्धा डॉलरपौंड मिळणे मोठे कठीण होते. आज, रुपया जवळजवळ पूर्णपणे परिवर्तनीय झाला आहे. म्हणजे रुपयाच्या बदली परकीय चलन विनिमयाच्या दराने कोणालाही मिळवता येते. डॉलरच्या तुलनेत रुपया घसरत घसरत जात होता. एका रुपयाची किंमत दोन अमेरिकन सेंट इतकी खाली घसरली होती. आता रुपयाची किंमत वाढत आहे आणि डॉलर घसरत आहे. १५ वर्षांपूर्वी देशातील सोन्याचा साठा गहाण ठेवण्याची पाळी आलेला हा देश आजघडीला अब्जावधी डॉलर्सची गंगाजळी

ठेवून आहे. एवढेच नव्हे तर, इतर गरीबगुरीब राष्ट्रांना वेगवेगळ्या प्रकारांनी मदत करतो आहे. एकेकाळचा, मदतीची याचना करणारा देश आता मदत देणारा झाला आहे. याचाही तसा या नव्या आत्मविश्वासाच्या अनुभवाशी काही संबंध नाही.

भारतीय गणकशास्त्रज्ञ जगभर नाव कमावून आहेत. अमेरिकन कंपन्यांकरिता गणकशास्त्रीय आधार भारतातील कंपन्या देतात. अमेरिकेतील भारतीय आता तेथे सन्मान्य आणि समृद्ध नागरिक समजले जातात, हेही खरे; पण याचाही संबंध या नव्या आत्मविश्वासाच्या जाणिवेशी तसा नाही.

गेली कित्येक वर्षे आतंकवादी देशाच्या कानाकोपऱ्यात आणि मर्मस्थानातसुद्धा धुमाकूळ घालत आहेत. त्यातही काही फारसा फरक पडला आहे असे नाही. १९६५ आणि १९७१ च्या युद्धात पाकिस्तानवर मात करूनही आम भारतीयांच्या मनात पाकिस्तानसारखे भारताच्या एक पंचमांश आकाराचे राष्ट्र तुल्यबळ वाटत असे. आता आतंकवाद्यांच्या कारवायांकडे भारतवासी अधिक आत्मविश्वासाने पाहतात.

अनिवासी भारतीयांना हा एक नवा सुखद अनुभव आहे. वर्षानुवर्षे विदेशांत भारतीय व पाकिस्तानी यांना एकसारखेच मानून दोघांचीही अवहेलना होत असे. आता, भारतीयांना विशेष सन्मानाने आणि प्रतिष्ठेने वागवले जाते, एक प्रज्ञावंत जमात म्हणून त्यांचा आदर होतो.

या नव्या आत्मविश्वासाचा प्रत्यय अलीकडील क्रिकेटच्या एकदिवसीय सामन्यांत आला. आंतरराष्ट्रीय सामन्यांत मर्दुमकी गाजवणारा भारत पाकिस्तानसमोर खेळताना न्यूनगंडाने पछाडला जाई आणि मोक्यावर कच खाई. आता भारतीय संघाच्या मनात असा काही न्यूनगंड नाही. पूर्वी शेवटच्या फेकीवर षट्कार मारून पाकिस्तान संघ जिंके, आता भारतीय संघही शेवटच्या क्षणापर्यंत कसोशीची लढत देऊ शकतो आणि सरशीही मिळवतो.

आंतरराष्ट्रीय खेळांच्या सामन्यांत भारतास क्वचितच कांस्यपदके मिळत. अलीकडे अनेक भारतीय खेळाडू रौप्य आणि सुवर्णपदकेही मिळवतात. या क्षेत्रात भारत काही अग्रणी देश झाला असे नाही; पण अगदीच धूळ खाणारा देशही राहिलेला नाही.

वर्षानुवर्षे आंतरराष्ट्रीय आकडेवारीत दरडोई उत्पन्न, शिक्षणाचा प्रसार, आरोग्य आणि वैद्यकीय सेवा अशा विकासाच्या सर्व मापदंडासंबंधीच्या आकडेवारीत भारताची गणना शेवटच्या पाचदहा देशांत असे. आता क्रमांक काहीसा सुधारला

आहे. पण, त्यापेक्षा महत्त्वाचे म्हणजे ही सुधारणा तात्पुरती नाही, स्थायी आहे.

नियोजनाच्या सर्व काळात भारताच्या राष्ट्रीय उत्पादनाच्या वाढीची गती ३ टक्क्यांच्या आसपास राहिली. या गतीला आंतरराष्ट्रीय ख्यातीचे अर्थशास्त्रज्ञ 'विकासाची हिंदू गती' (Hindu rate of growth) म्हणत. लोकसंख्येची वाढ लक्षात घेता दरडोई उत्पन्नाच्या वाढीची 'हिंदू गती' फक्त दीड टक्क्याची होती. २००३-०४ सालच्या शेवटच्या तिमाहीत राष्ट्रीय उत्पन्नाच्या वाढीची गती १०.४ टक्के होती. मरगळून टुकूटुकू खेळणाऱ्या फलंदाजाने एकाएकी षट्कारचौकारांची आतषबाजी सुरू करावी असा हा प्रकार आहे. नियोजनाच्या पूर्ण काळात देश दारिद्र्याच्या दुष्टचक्रात अडकल्यासारखा झाला होता. आता, तो नव्या उड्डाणास तयार झाला आहे. विकासाच्या गतीतील ही वाढ अस्थायी नाही. स्वातंत्र्याच्या काळापासून चीन विकासाच्या बाबतीत भारताच्या पुढे राहिला; साम्यवादी चीन समाजवादी भारताच्या पुढे राहिला. साम्यवाद्यांनी चीनची कौतुके गाईली. खुल्या व्यवस्थेचा चीनही भारताच्या तुलनेत अधिक गतीने विकास करू लागला. 'चिनी लोक फार कष्टाळू आहेत, त्यांची आपली तुलना कशी व्हायची?' असा एक न्यूनगंड भारतीयांच्या मनात मूळ धरू लागला होता. या तिमाहीत भारताने विकासाच्या गतीत चीनवरही मात केली. एवढेच नव्हे तर यापुढेही हे उड्डाण चालू राहील आणि भारत नजीकच्या भविष्यकाळात जागतिक महासत्ता बनेल, असा विश्वास निदान धडाडीच्या, कर्तबगार व गुणवंत उद्योजकांत तयार झाला आहे. भारत ही एक नवीन आर्थिक ताकद जगात उभी राहत आहे याची जाणीव जगभर झाली आहे. स्वातंत्र्यानंतरच्या ५५ वर्षांत देश घसरणीला लागला. येत्या वीस वर्षात तो एक सामर्थ्यवान महासत्ता बनेल, याबद्दल जगभरच्या देशांत कौतुक आहे आणि भारतीय उद्योजकांच्या मनात आत्मविश्वास.

शेतकऱ्यांत आशांची पहाट

ही नवी 'फील गुड'ची भावना समप्रमाणात शेतकरी वर्गात पोहोचलेली नाही हे 'भारत उदय' यात्रेला निघण्यापूर्वी स्वत: उपपंतप्रधान लालकृष्ण अडवाणी यांनी मान्य केले आहे. आजही काही राज्यांत जुन्या साठलेल्या कर्जापोटी शेतकरी आत्महत्येचा टोकाचा मार्ग अनुसरीत आहेत. पण, तरीही काळोखी मध्यरात्र संपत आली आहे आणि दिशा फुटू लागली आहे असा एक आशावाद शेतकऱ्यांत तयार होतो आहे. सरकार फारशी मदत करीत नसेल, काहीवेळा मोठ्या चुकाही करीत असेल हे खरे; परंतु दशकानुदशके शेतकऱ्यांना उत्पादनखर्चाइतकाही भाव मिळू न देणाऱ्या काँग्रेसी शासनाच्या काळचा

शेतकऱ्यांविषयीचा आकस आता राहिलेला नाही. सरकार मोठे मित्र नसले, तरी शत्रू तरी नाही. इतिहासाचार्य राजवाड्यांनी म्हटले आहे, 'शतकानुशतकांच्या अनुभवाने भारतातील शेतकऱ्यांची अशी खात्री पटली आहे, की सरकार सरकार म्हणून जे काही असते, ते शेतकऱ्यांचे दुश्मनच असते.' याचा अनुभव पिढ्यान् पिढ्या घेतल्यानंतर केंद्र शासनाच्या ठायी शेतकऱ्यांबद्दल सहानुभूती असल्याचा शेतकरी सुखद अनुभव घेत आहेत.

राष्ट्राचा कायाकल्प

अलीकडे डॉ. मनमोहन सिंगांनी देशात हा जो कायाकल्प होतो आहे त्याची वास्तविकता मान्य केली. पण, 'या सगळ्या गोष्टींचे श्रेय राष्ट्रीय लोकशाही आघाडीने लाटण्याचा प्रयत्न करू नये, या सगळ्या यशात पूर्वीच्या काँग्रेस शासनांचाही काही वाटा आहे, हे विसरू नये,' असे बजावले. डॉ. सिंग यांच्या या प्रतिपादनात पुष्कळ तथ्य आहे. समाजवादाच्या काळात कोणालाही काहीही करण्याची परवानगी नसे; ज्यांचे काही 'वरती' संबंध असतील, त्यांना मात्र काहीही करण्याची मुभा मिळू शके. दारिद्र्याच्या दुष्टचक्राच्या समाजवादी व्यवस्थेतून देश हळूहळू मुक्त व्यवस्थेकडे, खुलेपणाकडे जात आहे. त्यातूनच प्रगती होत आहे. 'शासनाने गरिबी टिकविण्याचा व वाढविण्याचा खटाटोप सोडला म्हणजे गरिबी आपोआपच हटते,' हे शेतकरी संघटनेचे सूत्र आता सर्वमान्य झाले आहे आणि देशात जो कायाकल्प आणि नवा आत्मविश्वास दिसत आहे, त्याचे मूळ शेतकरी संघटनेच्या या विचारातच आहे. समाजवादाकडून खुल्या व्यवस्थेच्या या महायात्रेची सुरवात नेमकी केव्हा झाली, हे सांगणे कठीण आहे. काही चिन्हे तर इंदिरा गांधींच्या राजवटीच्या शेवटच्या काळातच दिसून येतात. राजीव गांधींच्या काळात विश्वनाथ प्रताप सिंग अर्थमंत्री असताना स्वतंत्रतेची चाहूल अधिक स्पष्ट होती. पण, खुल्या व्यवस्थेचा उदय नरसिंह राव यांच्या काळात डॉ. मनमोहन सिंग यांच्या नेतृत्वाखाली झाला, हे कोणीच नाकारीत नाही. खरे सांगायचे तर, या आर्थिक परिवर्तनाचे गैरवाजवी अधिक श्रेय डॉ. मनमोहन सिंगांनाच दिले जाते.

मुत्सद्दी नेतृत्व

राष्ट्रीय लोकशाही आघाडीचा या नव्या कायाकल्पाचा आणि नव्या राष्ट्रीय चेतनेचा काय संबंध आहे? श्री. अटलबिहारी वाजपेयी १८ मार्च १९९८ रोजी पहिल्यांदा पंतप्रधान झाले. नुकतेच त्यांच्या कारकिर्दीला ६ वर्षे पुरी झाली आहेत. शपथविधीच्या दिवशीच त्यांची गणना वृद्धांत होत होती, प्रकृतीही फार

भरभक्कम होती असे नाही. ४० वर्षे विरोधात काम करून शेवटी पक्षाला सत्तेकडे नेणारे आणि पंतप्रधान बनणारे नेते म्हणून त्यांचे तेजोवलय होते. वाजपेयींच्या या स्थितीची राजीव गांधी पंतप्रधान बनले त्यावेळच्या परिस्थितीशी तुलना मोठी उद्‌बोधक ठरेल. इंदिरा गांधींच्या अपमृत्युमुळे आलेली सहानुभूतीची लाट, वारसा हक्काने मिळालेले पंतप्रधानपद, निवडणुकीत मिळालेले 'न भूतो न भविष्यति' असे यश, तरुण वय, उत्तम आरोग्य ही सगळी बलस्थाने असूनही, देशाला २१ व्या शतकाकडे नेण्याची 'केनेडी छान' घोषणा करूनही, सॅम पित्रोदा, मणीशंकर अय्यर, यांच्यासारखे सहकारी मिळूनही राजीव गांधींनी पाच वर्षात सत्ता गमावली. याउलट परिस्थितीत वाजपेयींनी कामाला सुरुवात केली. भाजपाला बहुमत नाही, त्यामुळे वेगवेगळ्या पक्षांना एकत्र आणून त्यांची आघाडी बांधावी लागली. ही आघाडी बांधताना पक्षातील कडव्या हिंदुत्ववाद्यांना, स्वदेशीवाल्यांना वेसण घालून राममंदिर, घटनेतील कलम ३७० व समान नागरी कायदा या भाजपाच्या इश्‍वतीच्या मुद्द्यांवरहही तडजोड करावी लागली. वाजपेयींनी एक आघाडी बनवून दुष्कर आर्थिक परिस्थिती, पाकिस्तानचे कारगिलमधील आक्रमण, आघाडीतील बारक्यामोठ्या कुरबुरी या सगळ्यांना तोंड देत कारभार सांभाळला आणि १३ व्या लोकसभेचा कार्यकाळ पूर्ण केला. सहा वर्षांनी आलेल्या या निवडणुकीत 'वाजपेयींना पर्याय नाही' अशी सर्वदूर भावना असावी, यातच वाजपेयी यांचे यश आहे.

आघाड्यांच्या शासनांच्या काळात संकुचित विषयपत्रिकेचे सरकार टिकू शकत नाही हे वाजपेयींनी अचूक हेरले आणि राष्ट्रीय लोकशाही आघाडीला स्वातंत्र्यपूर्व काळातील काँग्रेसप्रमाणे सर्वसमावेशक बनवले. त्यांच्या नेतृत्वाखालील या आघाडीत जॉर्ज फर्नांडिस यांच्यासारखे मजूर नेते, रामविलास पासवानसारखे दलित नेते, बाळासाहेब ठाकऱ्यांसारखे कट्टर हिंदुत्ववादी एकजुटीने काम करत राहिले. जयललिता, ममता यांनी काही थोडा त्रास दिला, नाही असे नाही. पण, येत्या निवडणुकीत या दोघीही आधी विरोधात जाऊन, पुन्हा एकदा राष्ट्रीय लोकशाही आघाडीला साथ देत आहेत. 'येत्या निवडणुकीत भाजपला पूर्ण बहुमत मिळाले, तरीही सरकार राष्ट्रीय लोकशाही आघाडीचेच असेल,' हे आघाडीच्या नेत्यांनी स्पष्ट केले आहे. उलटपक्षी, काँग्रेसप्रणीत आघाडीत आघाडी जिंकली तर – जमले तर सरकार निव्वळ काँग्रेसचेच, नाही जमले तर काँग्रेसप्रणीत आघाडीचे; काँग्रेसची एकपक्षीय सत्ता आली, तर सोनियाजी पंतप्रधान, ते नच झाल्यास आघाडीतील सदस्यांनी नव्या पंतप्रधानाचा निर्णय करायचा अशी

गोंधळाची स्थिती आहे. राष्ट्रीय लोकशाही आघाडीतील मित्रपक्ष निवडणुकीनंतरही एकत्र राहतील, यात काही शंका नाही. काँग्रेसच्या आघाडीत सामील झालेले पक्ष सोयीपुरते मित्र बनले आहेत. निवडणुकीनंतर त्यांचा निर्णय वेगवेगळा असू शकेल, ही गोष्ट बसपच्या नेत्या मायावती यांनी स्पष्ट केली आहे.

रा.लो.आ – जातीयवादी आघाडी?

राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे नेतृत्व भारतीय जनता पार्टीकडे आहे. या पक्षाचे घनिष्ठ संबंध हिंदुत्वनिष्ठ राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी आहेत. विश्व हिंदू परिषद, बजरंग दल, शिवसेना यांसारख्या संघटना आणि पक्ष यांच्याशीही त्यांचे संबंध आहेत. भारतीय जनता पक्षाचा उगम जनसंघातून झाला. राममंदिर, समान नागरी कायदा, ३७० वे कलम इत्यादी प्रश्न त्यांनी पुढे मांडले. त्यामुळे 'राष्ट्रीय लोकशाही आघाडी ही जातीयवादी आघाडी आहे,' असा आरोप करून काँग्रेसप्रणीत आघाडीने आपल्या आघाडीस 'जातीयताविरोधी आघाडी' असे बिरूद लावून घेतले आहे. 'राष्ट्रीय लोकशाही आघाडी ही जातीयवाद्यांची फळी आहे आणि जातीयताविरोधी सर्व नागरिकांनी राष्ट्रीय लोकशाही आघाडीस हाणून पाडावे,' असा आक्रोश तिने चालवला आहे. या परिस्थितीची तुलना पुन्हा एकदा स्वातंत्र्यपूर्व काँग्रेसच्या स्थितीशी करणे उपयोगी ठरेल. म. गांधींची काँग्रेस स्वत:ला अखिल भारतातील सर्व जातिधर्मांच्या लोकांची प्रतिनिधी समजत असे. महंमद अली जीना आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे मात्र काँग्रेस हा हिंदूंचा, त्यातल्या त्यात सवर्ण हिंदूंचा पक्ष आहे असा आरोप करीत.

राष्ट्रीय लोकशाही आघाडीचा प्रतिवाद साधा आणि सरळ आहे. राष्ट्रीय लोकशाही आघाडी सर्वसमावेशक आहे. त्यात समता पक्षही आहे, तृणमूल काँग्रेसही आहे, शिवसेनाही आहे, तेलगू देशम्‌ही आहे आणि आता, स्वतंत्र भारत पक्षही आहे. खुद्द भाजपातसुद्धा कोणाही धर्माजातीच्या लोकांना प्रवेशास बंदी नाही. काही वर्षांपूर्वी भाजपचे तत्कालीन अध्यक्ष बंगारू लक्ष्मण यांनी तर मुस्लिम समाजाच्या लोकांना भाजप प्रवेशाचे जाहीर निमंत्रण दिले. त्या आवाहनाला प्रतिसाद म्हणून शेतकरी संघटनेचे माजी अध्यक्ष पाशा पटेल यांनी भाजपात प्रवेश केला. त्यांचे सन्मानपूर्वक स्वागत झाले. भाजपला जातीयवादी म्हणून हिणवणाऱ्या पक्षांनी जातीयवाद कायमचा संपवण्यासाठी बिगर हिंदूंचा भाजपात मोठ्या प्रमाणावर प्रवेश घडवून आणला असता, तर भाजपला जातीय म्हणण्याचे काही कारणच राहिले नसते. भारतातील अनेक तथाकथित धर्मनिरपेक्षतावादी नेत्यांना आणि विचारवंतांना जातीयता संपवायची नाही, तर जातीयतेवर मोहोर

उठवून स्वत:ची दुकाने थाटायची आहेत.

मुसलमानांच्या बाबतीत काँग्रेसने वर्षानुवर्षे निवडणुकीकरिता गठ्ठा मत संपादन करण्याच्या हेतूने तुष्टीकरणाचे धोरण चालवले. त्यामुळे, मुस्लिम समाजाचे सामाजिक, धार्मिक प्रश्न जळते राहिले; आर्थिक प्रश्नांचा विचार झालाच नाही. या धोरणामुळे मुसलमान समाजात समरसतेची भावना तयार झाली नाही आणि परिणामी, क्रिकेट सामन्यासारख्या क्षुल्लक प्रसंगीही मुसलमान समाजात पाकिस्तानी चाहते असल्याची भावना असे. राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या कारकिर्दीच्या सहा वर्षांनंतर भारतातील बहुसंख्य समाजांत एक आत्मविश्वासाची भावना जागृत झाली, तसेच मुसलमान समाजातही पोकळ तुष्टीकरण आणि मुसलमान मतांच्या गठ्ठ्याचे राजकारण याबद्दल असंतोष पसरला आहे. फार मोठ्या संख्येने मुसलमान खुद्द भाजपात सामील होताहेत. नजमा हेपतुल्ला आणि अरिफ मोहम्मद यांसारखे व्यासंगी मुसलमानही भाजपकडे वळत आहेत. याउलट, मुलायमसिंग आणि त्यांचा पक्ष यांच्याशीही दोस्ती करणे काँग्रेस आघाडीला जमलेले नाही. ही या नव्या काळाची चिन्हे आहेत. काँग्रेसने मुसलमान प्रश्न जोपासला आणि निवडणुकीसाठी त्याचा फायदा घेतला. राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या ६ वर्षांच्या काळात पाकिस्तान आणि इतर मुस्लिम देशांशी संबंध सुधारले आणि देशातील मुसलमानांतही अलगवाद कमी झाला. भारताची क्रिकेटटीमही कैफ, पठाण यांच्या पराक्रमानेच यशस्वी होते. याच जाणिवेने नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखाली गुजराथमध्येही एक नवे सलोख्याचे वातावरण तयार होत आहे.

पक्षाची धोरणे, देशात घडलेल्या जातीय दंगली, पक्षाचे निवडणुकीतील तिकीटवाटप या कसोट्यांवर वेगवेगळ्या पक्षांची जातीयता तपासून पाहिली तर त्यात काही डावे, उजवे करण्यासारखे दिसत नाही.

दोन विकल्प

मतदारांनी निवड करायची आहे, ती दोन विकल्पांतून. राष्ट्रीय लोकशाही आघाडी ६ वर्षे अत्यंत बिकट परिस्थितीत टिकून राहिली आहे. आघाडीचे नेतृत्व काळाच्या कठीण कसोटीस निश्चित उतरलेले आहे. गेल्या ६ वर्षांत समाजवादाच्या काळात चैतन्यहीन झालेल्या देशाच्या अचेतन कुडीत प्राण फुंकून राष्ट्रीय लोकशाही आघाडीने एक नवा आत्मविश्वास आणि आशावाद तयार केला आहे. काँग्रेसप्रणीत आघाडीत घटकपक्षांच्या निष्ठांची काहीही खात्री नाही. शरद पवारांसारखे 'स्वामिद्रोहाचा' जुना इतिहास असलेले या आघाडीच्या प्रमुख आधारस्तंभात आहेत. राष्ट्रीय नेतृत्व केवळ घराणेशाहीने चालत आलेले

एवढेच नव्हे, तर घराणेशाही पुढील पिढ्यांतही चालू ठेवण्याकरिता कृतसंकल्प असलेले. पक्षाच्या जाहीरनाम्यात अंतर्भाव झालेले कार्यक्रम एकेकाळी लोकप्रिय ठरलेल्या इंदिरा गांधींच्या 'गरिबी हटाव' कार्यक्रमांच्या तोंडवळ्यांचे, नव्या जगातील वास्तवाशी संबंध नसलेले, आघाडीतील बहुतेकांचे हात तेलगी प्रकरणासारख्या भ्रष्टाचारात बरबटलेले. भारतीय मतदारांसमोर उभा असलेला दुसरा विकल्प हा असा आहे.

एकच पर्याय

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ५ महिन्यांत गांधीजी गेले. गांधींच्या आध्यात्मिक भूमिकेत आणि ग्रमीण अर्थव्यवस्थेच्या विचारात आणि स्वदेशीतही एक आत्मसन्मानाचा स्रोत होता. गरिबीतही स्वाभिमान आणि बाणेदारपणा जिवंत ठेवायची भूमिका होती. गांधींच्या हत्येनंतर नेहरूंनी गांधीविचार संपवला आणि समाजवाद आणला. या समाजवादात देश दारिद्र्याच्या दुष्टचक्रात अडकला. एवढेच नव्हे, तर न्यूनगंडाने पछाडला गेला. समाजवाद संपला; पण त्याबरोबर देशापुढील आर्थिक विषयपत्रिकेलाच ग्रहण लागले. पी. व्ही. नरसिंह राव यांच्या नेतृत्वाखाली खुल्या व्यवस्थेचे औपचारिक अनावरण झाले; परंतु उद्योजकांना दिलासा वाटेल, प्रोत्साहन मिळेल असे वातावरण तयार झाले नाही. 'हर्षद मेहता'सारख्या प्रकरणांमुळे उद्योजकता हा भामट्यांचाच खेळ आहे अशी भावना तयार झाली. भ्रष्टाचार बोकाळला. खुल्या व्यवस्थेच्या अर्धवट अंमलबजावणीमुळे स्वातंत्र्याचे फायदे सर्वसाधारण लोकांपर्यंत पोहोचणे कठीण झाले. शेतकरी, मजूर वर्गात असंतोष वाढला. वर्तमानकाळात समाधान नाही आणि उज्वल भविष्याची आशा नाही अशा अंधकाराच्या परिस्थितीत वेगवेगळे समाज आपापल्या इतिहासातील तेजस्वी बिंदूंचे आणि जातींच्या अस्मितांचे उदात्तीकरण करून, त्यांच्याच आधारे राजकारण चालवू लागले. परिणामत:, देशापुढील बिकट परिस्थितीत खंबीर नेतृत्व देईल असा पक्ष किंवा नेता राहिला नाही. या परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी आवश्यकता होती ती समजदार मुत्सद्दी नेतृत्वाची, सगळ्यांना सांभाळून कणाकणाने क्षणाक्षणाने देशाला पुढे घेऊन जाणाऱ्या उदारमतवादी कर्णधाराची – एका अब्राहम लिंकनची.

अटलबिहारी वाजपेयी यांनी राष्ट्रीय लोकशाही आघाडी घडवून आणली, तिने देशाला राजकीय स्थैर्य दिले, आर्थिक विकासाची नवी झेप दिली आणि त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे, गांधींच्या अस्तानंतर सन्मानाची भावना गमावलेला हा देश आता विकास आणि वैभव यांच्या मार्गावर नव्या सन्मानाच्या भावनेचा

अनुभव घेत आहे. हे केवळ 'फील गुड' नाही, हे भारताचे पुनरुत्थान (Resurgence) आहे.

भारतीय मतदारासमोरील विकल्प वर स्पष्ट केले आहेत. मतदारराजाने आता आपला निर्णय सदसद्‌विवेकबुद्धीला स्मरून करायचा आहे.

(६ एप्रिल २००४)

◆◆

खुलेपणाचा दरवाजा उघणारे 'अटलजीं'चे बटण

स्वतंत्र भारत पक्ष (स्वभाप) राष्ट्रीय लोकशाही आघाडी (रालोआ)त सामील झाला आहे. परिणामी, आतापर्यंत या आघाडीत २४ पक्ष होते त्याजागी २५ पक्ष झाले आहेत. स्वभाप रालोआत सामील होताना देण्याघेण्याची एकही अट घातलेली नाही. महाराष्ट्रात किंवा संपूर्ण देशात कोठेही लोकसभेची जागा न मागता आणि न घेता रालोआतील इतर पक्षांच्या उमेदवारांना पाठिंबा दिला आणि स्वभापच्या तसेच शेतकरी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसह सर्व कार्यकर्ते त्यांच्या प्रचारात उतरले.

शेतकरी संघटनेकडे एक वैभव आहे. स्वातंत्र्याच्या पूर्वी घरची भाकरी खाऊन, अपार कष्ट करून कोणत्याही फळाची अपेक्षा न बाळगता काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची पलटनच्या पलटन स्वातंत्र्याकरिता काम करीत होती. स्वातंत्र्य आल्यानंतर ती पलटण गेली आणि त्यानंतर डाकबंगल्यांभोवती घोटाळत राहून तेथे जे पाहुणे येतील त्यांच्याशी ओळख करून घेऊन कोणतेतरी तिकीट – जिल्हा परिषदेचे किंवा पंचायत समितीचे – मिळविण्यासाठी कार्यकर्त्यांची मोठी झुंबड उडू लागली. अशा परिस्थितीत, मला सांगायला अभिमान वाटतो की अगदी लहानात लहान तिकीटाचीसुद्धा अपेक्षा न ठेवता आणि उमेदवाराकडून जेवणाची व्यवस्था व्हावी एवढीसुद्धा अपेक्षा न ठेवता काम करणाऱ्या शेतकरी कार्यकर्त्यांची पलटन शेतकरी संघटनेकडे आहे. ही पलटन अटलबिहारी वाजपेयींचे हात मजबूत करण्यासाठी राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या उमेदवारांच्या म्हणजे महाराष्ट्रात भाजपा आणि शिवसेनेच्या उमेदवारांच्या प्रचारात सर्व शक्तीने उतरली आहे.

स्वतंत्र भारत पक्षाने राष्ट्रीय लोकशाही आघाडीत सामील होण्याचा निर्णय घेतल्यावर मला अनेकांनी प्रश्न विचारला की यात शेतकऱ्यांना काय मिळाले?

रालोआचे उमेदवार आपल्या प्रचाराच्या भाषणात आग्रहाने मांडतात, की काँग्रेसच्या काळामध्ये शेतकऱ्यांची लूट झाली. काँग्रेसने शेतकऱ्यांना बरबाद केले.

खरे आहे. काँग्रेसच्या काळामध्ये शेतकऱ्यांची लूट झालीच. १९८० सालापासून मी त्याच्याबद्दल लिहितो आहे, बोलतो आहे, आंदोलन करतो आहे, अनेक सहकाऱ्यांसह लाठ्या खातो आहे, तुरुंगात जातो आहे. माझे अनेक कार्यकर्ते गोळीबारालासुद्धा बळी पडले आहेत. हे आंदोलन काँग्रेसच्या निर्णयांविरुद्ध झालं, तसंच भाजप-शिवसेना युती सरकारच्या वेळीही झालं. सत्य परिस्थिती लपवून ठेवण्याचे काही कारण नाही. युती सरकारच्या काळात अमरावती जिल्ह्यात कापसाची कैफियत मांडताना ३ शेतकरी बळी पडलेले आहेत. दोघांची शेतीविषयक धोरणं जर प्रत्यक्षात तपासली, तर एकाला फार वर चढवावं आणि दुसऱ्याला नीच लेखावं असं डावं-उजवं करण्यासारखं नाही. माझ्या निर्णयाचं समर्थन करण्याकरिता जर मी असं डावं-उजवं करणारं, बोलू लागलो तर ज्या शेतकऱ्यांशी इमान राखून गेली २५ वर्षे मी काम केलं, त्यांच्याशी प्रतारणा केल्यासारखे होईल. ते करण्याचा माझा विचार नाही. तरीदेखील, राष्ट्रीय लोकशाही आघाडीला पाठिंबा द्यायचा निर्णय मी का घेतला? :

पहिला मुद्दा : शेतकरी संघटनेने शेतकऱ्यांना अमुक अमुक द्या असं कधी मागितलं नाही. आम्हाला तुमच्या सबसिडया नकोत, आम्हाला तुमच्या योजना नकोत, प्रकल्प नकोत; जेव्हा जेव्हा सरकार काही प्रकल्प किंवा योजना पुढे ठेवून, कोणत्या ना कोणत्या मार्गाने शेतकऱ्याला काहीतरी देण्याचं नाटक करतं तेव्हा त्यातील जवळजवळ ९०% निधी नोकरदार आणि व्यवस्था खाऊन जाते, शेतकऱ्यांपर्यंत काहीही पोहोचत नाही. मुळामध्ये, सरकार देशाच्या काय किंवा शेतकऱ्यांच्या काय, समस्या सोडवतं याच्यावर आमचा विश्वास नाही. शेतकरी संघटनेच्या ज्या प्रख्यात घोषणा आहेत, त्यांपैकी एक आहे, 'सरकार समस्या क्या सुलझाये, सरकार यही समस्या है ।' तेव्हा, काँग्रेसच्या सरकारने काय आणि रालोआच्या सरकारने काय केले हा वाद महत्त्वाचा नाही. आज मुंबईला काँग्रेस आघाडीचं सरकार आहे. त्याच्या आधी युतीचं सरकार होतं आणि त्याच्या आधी काँग्रेसचं. दिल्लीत आता रालोआचं सरकार आहे आणि त्याच्या आधी काँग्रेसचं. या सर्व काळात शेतकऱ्यांची परिस्थिती सारखीच होती. निवडणुकीच्या काळात प्रचाराच्या सभांत दुसऱ्याची उणी काढायची आणि आपली उणी लपवायची हा मुख्यतः उद्योग असतो. हा प्रकार किती वाह्यात

असतो, ते समजावण्यासाठी एक उदाहरण सांगतो. शाळेतल्या एका वर्गात शिक्षकांनी विद्यार्थ्यांना सांगितलं, की माणसाचं चित्र काढा. सगळी मुलं चित्र काढायला लागली. शिक्षक फिरून मुलं कशी चित्र काढतात, ते बघायला लागले. एका मुलाजवळ थांबून पाहू लागले, तर तो नुसत्याच छोट्या छोट्या रेघा काढीत होता. शिक्षक म्हणाले, 'अरे, मी तुम्हाला माणसाचं चित्र काढायला सांगितलं, तर तू या नुसत्या रेघा रेघा काय काढतोस?' मुलगा म्हणाला, 'मी त्या माणसाच्या नाकातले केस काढतो आहे पहिल्यांदा. मग बाकी चित्र काढीन.' तसंच, निवडणूक दिल्लीच्या लोकसभेची, तिथले प्रश्न, मुद्दे काय आहेत ते सोडून, स्थानिक पातळीवरच्याच प्रश्नांवर – ते कितीही महत्त्वाचे असले तरी – रण माजवत राहणे म्हणजे माणसाचं चित्र काढणाऱ्या मुलानं नाकातले केस काढण्याला महत्त्व दिल्यासारखं होईल. म्हणजे, आपल्याला सोईस्कर असेच मुद्दे घेऊन विरोधी उमेदवारावर, पक्षावर हल्ला केला, तर भाषणं खूप आकर्षक होतील – ऐतिहासिक नाटकातल्या 'कंसात तलवार उपसून' संवादाच्या धर्तीची; करमणूक चांगली होते, त्यामुळे काही मतदार वक्त्याच्या बाजूला वळतीलही. हल्ली तेही सांगता येत नाही, म्हणा. हल्ली लोकही खूप शहाणे झाले आहेत. तेही म्हणू लागलेत, की ज्या अर्थी याने आवाज चढवला, त्या अर्थी हा मनुष्य खरं बोलत नसावा. मला अशा प्रकारचा युक्तिवाद करायचा नाही.

२१ व्या शतकातील ही पहिली निवडणूक आहे. समाजवादी रशियाचा पाडाव झाला आहे. समाजवादाने, नियोजनाने आणि लायसन्स-परमिट-कोटा व्यवस्थेने कोणत्याही देशाचा विकास होत नाही, हे सिद्ध झाले. त्यानंतरच्या काळातली ही पहिली निवडणूक आहे. जैविक तंत्रज्ञान, माहिती तंत्रज्ञान, जनुक तंत्रज्ञान अशी आधुनिक तंत्रज्ञानं सर्वदूर पसरल्यानंतर होणारी ही पहिली निवडणूक आहे. ११ सप्टेंबर २००२ ला आतंकवाद्यांनी न्यूयॉर्क शहरावर हल्ला केल्यानंतर आतंकवाद हा जागतिक धोका आहे, याची जाणीव तयार झाल्यानंतरची ही पहिली निवडणूक आहे. त्या दृष्टीने २१ व्या शतकातील ही पहिली निवडणूक अत्यंत महत्त्वाची आहे.

कोणाला पर्यायी जमीन मिळाली किंवा नाही, धरण झालं का नाही झालं, कोणाला पाणी मिळालं, कोणाला नाही मिळालं... अशी स्थानिक पातळीवरची सगळी दुःखं खरी आहेत. पण, तरी लोकसभेच्या निवडणुकीतील मतदारांसमोर देशाचं चित्र मांडताना, ते फार जबाबदारीनं, केवळ लोकांच्या भावनांना आवाहन न करता, संपूर्ण मांडलं पाहिजे. तसं केलं, तरच समोरच्या श्रोत्यांची खात्री

पटेल आणि त्यांच्यामधून तुम्हाला पाठिंबा देणारा कार्यकर्ता आणि सैनिक मिळेल.

स्वतंत्र भारत पक्षाने राष्ट्रीय लोकशाही आघाडीत सामील होण्याचा निर्णय घेताना शेतकऱ्यांच्या बाजूने काय काय विचार झाला, तो पहा.

५० वर्षे काँग्रेसने शेतकऱ्यांना बनवलं, त्यांनी शेतकऱ्यांना उत्पादनखर्चाइतकासुद्धा भाव मिळू नये, असं धोरण ठरवून राबवलं. गेल्या २५ वर्षांत मी या विषयावर लेख लिहिले, पुस्तकं लिहिली, भाषणं केली, कागदोपत्री पुरावा दाखवून दिला. प्रणव मुखर्जी काँग्रेसचे व्यापारमंत्री असताना त्यांनी जागतिक व्यापार संस्थेला जो अहवाल दिला, त्यातील आकडेवारीचा अर्थ थोडक्यात असा आहे : जपानमध्ये शेतकऱ्याचा उत्पादनखर्च १०० रुपये असेल, तर त्याला १९० रुपये मिळाले पाहिजेत असं सरकारी धोरण आहे आणि हिंदुस्थानातल्या धोरणाप्रमाणे शेतकऱ्याचा उत्पादनखर्च १८७ रुपये असला, तर त्याला १०० रुपयांपेक्षा जास्त भाव मिळता कामा नये. हे व्यापारमंत्र्यांनी जागतिक व्यापार संस्थेकडे लेखी दिलं आहे. निवडणूक प्रचारातच नव्हे, तर इतर वेळीही कोणत्याही पक्षानं, अगदी विरोधी पक्षानंसुद्धा हा अन्याय पुढे मांडला नाही. ते फक्त माणसाचं चित्र काढताना नाकातले केसच ठळक करत बसले. ५० वर्षे काँग्रेसनं अशा तऱ्हेनं शेतकऱ्यांना बुडवलं, हा मुद्दा अभ्यासपूर्वक कोणी मांडत नाही. याबद्दल काँग्रेस आजसुद्धा माफी मागत नाही; आपलं चुकलं असं म्हणत नाही. लोकसभा निवडणुका २००४ चा त्यांचा जो जाहीरनामा आहे, त्यात त्यांनी उलट त्या धोरणाचं समर्थन केलं आहे – १९५० मध्ये आमचं जे धोरण होतं, ते बरोबरच होतं, १९६० मध्ये आमचं जे धोरण होतं, ते बरोबरच होतं – थोडे शब्द बदलले. शेतकरी संघटनेने म्हटलं, की शेतकऱ्याच्या शेतीमालाला रास्त भाव मिळू नये अशी धोरणं काँग्रेसने आखली. त्यांचा जाहीरनामा म्हणतो, की समाजवादी कारखानदारीला भांडवल मिळविण्याकरिता जी धोरणं आखण्यात आली, ती बरोबर होती; म्हणजे शेतीला लुटण्याची धोरणं बरोबर होती. ५० वर्षे शेतकऱ्याला गरिबीत ठेवणारं, ५० वर्षे शेतकऱ्याला कर्जात बुडवणारं, ५० वर्षे शेतकऱ्यांना आत्महत्येच्या मार्गाकडे ढकलणारं आणि 'आपण कर्जात जन्मलो, कर्जात जगलो आणि कर्ज डोक्यावर घेऊन मेलो,' असं हळहळत शेतकऱ्यांना जीवन कंठायला लावणाऱ्या काँग्रेस पक्षाने त्याबद्दल एका शब्दानेसुद्धा कधी दिलगिरी व्यक्त केली नाही.

उलटपक्षी, मला राष्ट्रीय लोकशाही आघाडीमध्ये जे काही आकर्षक वाटतं,

ते म्हणजे त्यांच्या नेतृत्वाचा एक प्रकारचा खुलेपणा. या दृष्टीने, रथयात्रा सुरू करण्याकरिता कन्याकुमारीला जाताना उपपंतप्रधान लालकृष्ण अडवाणींनी केलेली स्पष्टोक्ती ध्यानात घेण्यासारखी आहे. त्या वेळी सर्वत्र चर्चा होती 'फील गुड' या शब्दांची. (हा शब्दप्रयोग वापरण्याची शक्कल काढणाऱ्याचं इंग्रजीचं ज्ञान चांगलं नसावं, नाही तर जे म्हणायचं आहे; त्यासाठी तो त्यानं वापरला नसता) लालकृष्ण अडवाणी म्हणाले, "हा जो काही 'फील गुड, फील गुड' आहे तो शेतकऱ्यांपर्यंत पोहोचलेला नाही, हे मला मान्य आहे." पाहा, एका बाजूला ५० वर्षे शेतकऱ्यांचं रक्त पिणारी काँग्रेस चूकसुद्धा कबूल करीत नाही आणि दुसऱ्या बाजूला, माझ्या अध्यक्षतेखालील कृषिकार्यबलाने केलेल्या शिफारशींप्रमाणे दिवसेंदिवस शेतीमालाची बाजारपेठ खुली करणारं, जागतिक व्यापार संस्थेमध्ये राहणारं जे सरकार आहे, ते मात्र प्रामाणिकपणे म्हणतं आहे, 'आम्ही केला प्रयत्न; पण तुमच्यापर्यंत त्याचे परिणाम पोहोचले नसतील, तर माफ करा; आमचा पुढचा कार्यक्रम त्या दिशेने असा असा आहे.'

आणि राष्ट्रीय लोकशाही आघाडीने पन्नासेक पानांची 'कार्यक्रमपत्रिका' लोकांसमोर ठेवली आहे. हा काही त्यांचा किमान कार्यक्रम नाही; किमान कार्यक्रम राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे या निवडणुकीत निवडून गेलेले खासदार मिळून निश्चित करणार आहोत. या पन्नास पानांच्या कार्यक्रमपत्रिकेमध्ये अकरा पाने केवळ शेतीवर आहेत. पण, वर्तमानपत्रांत चर्चा मात्र 'रालोआ'च्या जाहीरनाम्यात राममंदिराचा प्रश्न आहे' या विषयावर सुरू झाली, त्यावर सगळीकडे कल्लोळ उठला. त्या कार्यक्रमपत्रिकेमध्ये मंदिराविषयी नाही 'अयोध्या प्रश्ना'विषयी फक्त एक वाक्य आहे, 'अयोध्या प्रश्न न्यायालयाच्या निर्णयाचा मान राखून किंवा सर्वसंमतीने सोडविण्यात येईल.' यावर वर्तमानपत्रांनी ठळक मथळे दिले; पण ११ पानं शेतीक्षेत्राबद्दल या कार्यक्रमपत्रिकेत आहेत, त्याबद्दल मात्र व्यापक चर्चा कोणी केली नाही, काही जणांनी केवळ उडता उल्लेख केला.

स्वतंत्र भारत पक्षासमोर दोन पर्याय होते. ५० वर्षे शेतकऱ्यांचं शोषण करणारं धोरण राबवल्याबद्दल दिलगिरीसुद्धा व्यक्त करण्याची तयारी नसलेली काँग्रेस एका बाजूला आणि 'आमचं चुकलं असेल, आमचे प्रयत्न तुमच्यापर्यंत पोहोचले नसतील,' असा मोकळेपणा दाखविणारी, शेतीक्षेत्रात खुलेपणा आणण्याची पावले उचलणारी राष्ट्रीय लोकशाही आघाडी दुसऱ्या बाजूला. अर्थातच शेतकरी म्हणून राष्ट्रीय लोकशाही आघाडी आणि अटलबिहारी वाजपेयी यांचा पर्याय निवडणे हेच शहाणपणाचे, यात काही वाद असू नये.

इतरही क्षेत्रांचा विचार करायला पाहिजे. कारण शेतकरी हा केवळ शेतकरीच नाही, तर तो देशाचा महत्त्वाचा नागरिक आहे. त्याने फक्त शेतीचा विचार करायचा, हे युक्त नाही.

प्रचारसभांमध्ये प्रचाराच्या आवेशात, तारतम्य न बाळगता कोणाचीही कोणाशीही तुलना करतात. ५० वर्षे ज्यांनी देशाच्या सेवेत घालवली, अत्यंत प्रतिभासंपन्न, कविमनाचा, कर्तबगार प्रशासक, उत्कृष्ट वक्ते असे अटलबिहारी वाजपेयी आणि नव्याने राजकारणात उतरलेलं कोणीही यांची तुलना करणं ही काही शहाणपणाची गोष्ट नाही, न्याय्यही नाही. त्यांच्याबरोबर काँग्रेसमधील कोणाची तुलनाच करायची झाली तर त्यातल्या त्यात मजबूत पंतप्रधान म्हणून राजीव गांधींचं नाव घेता येईल. ते सगळ्यांत मजबूत पंतप्रधान होते; कारण त्यांना जे २/३ बहुमत होतं तितकं बहुमत पंडित जवाहरलाल नेहरूंनाही कधी मिळालं नव्हतं.

दोघांची तुलना आपण करून पाहू.

१९८४ मध्ये इंदिरा गांधींची हत्या झाली तेव्हा राजीव गांधी कोलकत्त्याहून निघाले, तेव्हा विमानातच त्यांना कळविण्यात आलं की, 'तुम्ही पंतप्रधान व्हावं असं काँग्रेस पक्षानं ठरवलं आहे, दिल्लीत उतरल्याबरोबर तुमचा शपथविधी व्हायचा आहे.' त्यांना कल्पनाही नव्हती, त्यांनी कधी तसं स्वप्नही पाहिलं नव्हतं, तसे प्रयत्नही केले नव्हते, त्यासाठी आवश्यक तपस्याही केली नव्हती; पण राजीव गांधी पंतप्रधान झाले. पूर्वायुष्यात त्यांनी काही चमक दाखविली होती किंवा काही कर्तबगारी दाखविली होती असे नाही, तरी ते पंतप्रधान झाले. ते पंतप्रधान झाले तेव्हा त्यांचं वय चाळिशीच्या आसपास होतं. वय तरुण, तब्येत ठणठणीत आणि लोकसभा निवडणुकीनंतर लोकसभेतील २/३ खासदार हे त्यांच्या पक्षाचे. म्हणजे त्यांनी म्हणावं आणि देश चालावा अशी परिस्थिती होती; पण त्यांच्या कारभाराचा परिणाम काय झाला? त्यांचं सरकार कसंबसं पाच वर्षे टिकलं आणि त्यानंतर जी पहिली निवडणूक झाली, त्यात काँग्रेसही हरली आणि त्यांचं पंतप्रधानपदही गेलं. म्हणजे ज्यांच्या सगळ्या बाजू मजबूत होत्या त्या राजीव गांधींनी पक्षाचं आणि स्वत:चं किती वाटोळं केलं!

आता दुसरी बाजू अटलबिहारी वाजपेयींची बघू.

पन्नास वर्षे देशसेवेची तपस्या केलेला माणूस. पंतप्रधान होऊन, त्यांना ६ वर्षे आणि काही दिवस झाले. १८ मार्च १९९८ ला राष्ट्रपतींनी बोलावून त्यांच्यावर पंतप्रधानपदाची जबाबदारी सोपवली. त्या वेळी ते म्हणाले, "मी २४ पक्षांचा पाठिंबा घेऊन, आज पंतप्रधान आहे आणि उद्या सकाळी पंतप्रधानपदाच्या खुर्चीवर

असेन का कोणी ममता, का कोणी समता, का कोणी जयललिता माझी खुर्ची उडवून टाकील हे मला सांगता येत नाही. त्यामुळे मी तुम्हाला असं आश्वासन देऊ इच्छित नाही, की जे पुरं करू शकेन किंवा नाही याबद्दल माझ्याच मनात शंका आहे.' इतकं असतानासुद्धा त्यांनी ही २४ पक्षांची आघाडी टिकवून, ६ वर्षे राज्यकारभार केला. ही किमया त्यांना साधली यामागचं रहस्य म्हणजे त्यांचा प्रामाणिकपणा, विनम्रता आणि सगळ्यांना सामावून, सांभाळून चालण्याची प्रवृत्ती यांत आहे. भाजप या त्यांच्याच पक्षामध्ये स्वदेशी जागरण मंच, किसान संघाचे ठेंगडी यांच्यासारखी माणसं स्वदेशीच्या घोषणा करीत होती आणि अटलजींनी त्यांना इतक्या साध्या शब्दांमध्ये समजावलं, की जो धडा मी शेतकऱ्यांना गेली पंचवीस वर्षे शिकविण्याचा प्रयत्न करतो आहे, तो त्यांनी दोन दिवसांत त्यांच्या गळी उतरवला : 'तुम्हाला राष्ट्राभिमान आहे, तर राष्ट्र सशक्त व्हायला पाहिजे हे तुम्ही मानलं पाहिजे आणि राष्ट्र सशक्त व्हायचं असेल, तर ते लायसन्स-परमिट-कोटा आणि नियंत्रण यांच्या व्यवस्थेने कधी होत नाही. या व्यवस्थेचा अट्टहास धरणाऱ्या रशियाचा पाडाव झाला. तुम्हाला जर देश समर्थ करायचा असेल, तर बाजारपेठ खुली करावी लागेल, प्रत्येक व्यक्तीच्या कर्तृत्वाला वाव द्यायला लागेल. तेव्हाच देश मोठा होईल.' अशा शब्दांत त्यांनी आपल्या लोकांना समजावलं आणि त्यांनी प्रत्यक्षामध्ये, त्यांच्या पक्षामध्ये इतका विरोध असताना, गेल्या सहा वर्षांमध्ये खंबीरपणे सबंध देश बाजारपेठेवर आधारित खुल्या व्यवस्थेच्या मार्गावर असा आणून ठेवला आहे, की आता तो माघारी वळवणे सोनिया गांधींनासुद्धा शक्य होणार नाही. आणखी एक मुद्दा : त्यांच्या नेतृत्वाखालील आघाडीमध्ये जाणूनबुजून, त्यांच्यावर पूर्वी जातीयवादी, हिंदुत्ववादी, अल्पसंख्याकांना त्रास देणारे असे आरोप करीत अशा पक्षांनाही सामावून घेतलं आहे. त्यांच्या पक्षापेक्षाही भडक रीतीने हिंदुत्वाची मांडणी करणारांनाही सामावून घेतलं; पण त्यातही अटलबिहारी वाजपेयींची खासियत अशी, की ज्या विषयांबद्दल वाद होण्याची शक्यता आहे असे राममंदिर, समान नागरी कायदा, कलम ३७० यांसारखे प्रश्न राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या कार्यक्रमपत्रिकेपासून बाजूला ठेवले. भाजपच्या जाहीरनाम्यात असले तर असेनात का, त्यांच्यावर नंतर सवडीने विचार करता येईल; पण आघाडीत वाद नकोत. ज्या मुद्द्यावर स्वत:च्या पक्षाने आग्रह धरला होता, ते मुद्दे बाजूला ठेवणं, याला मुत्सद्दीपणा म्हणतात. त्यांनी याविषयी आपलं मत बदललं असं नाही; पण जर २४ पक्षांना सांभाळून, देशाला पुढे नेणारा कारभार करायचा असेल, तर कोते

स्वाभिमान आणि कोते अहंकार बाळगणं चुकीचं आहे असं ते मानतात आणि त्याप्रमाणे वागतात, ही अटलबिहारी वाजपेयींची जादू आहे. त्यांचं नेतृत्व हे सर्वसमावेशक आणि सहिष्णू आहे. विरोध करणारांना समजावून सांगणे आणि त्यांच्याबद्दल मनात आकस न बाळगणे, हे त्या नेतृत्वाचे विशेष गुण आहेत. हिंदुत्वाची मुळामध्ये व्याख्याच अशी आहे, की हिंदुत्व हे कधी कोतं नसतं, हिंदुत्व हे सर्वसमावेशक आणि सहिष्णू असतं. जे लोक हिंदू म्हणून जन्माला आल्याबद्दल अभिमान बाळगतात आणि दुसऱ्या धर्मात जन्मलेल्या लोकांचा रागद्वेष करतात, त्यांना सांगायला पाहिजे, 'तुम्ही हिंदू म्हणून जन्माला आलात, भाग्यवान आहात, अभिनंदन. तुम्ही काही कोणाकडे अर्ज करून, हिंदू जन्म मिळवलेला नाही. तुमची आई हिंदू, वडील हिंदू म्हणून तुम्ही आपसूकच हिंदू झालात. त्यात तुमचं कर्तृत्व काय? तेव्हा त्याचा काही अभिमान बाळगू नका आणि तुमच्यासारखं भाग्य न लाभल्यामुळे अन्य धर्मांत जन्मलेल्यांचा राग करू नका.' जे लोक हिंदुत्व अतिरेकी करायचा प्रयत्न करतात, ते खऱ्या अर्थाने, हिंदूच नव्हेत; संपूर्ण देशात खरा हिंदू असेल, तर ते सर्वसमावेशकता आणि सहिष्णुता बाळगणारे अटलबिहारी वाजपेयी हे एकमेव आहेत.

आणि म्हणून ते सर्व २४ पक्षांना बरोबर घेऊन चालू शकले, ६ वर्षे सत्ता टिकवली, देश संपन्नतेच्या मार्गावर आणून ठेवला आहे. एवढंच नव्हे तर त्यांनी सगळ्या पक्षांमध्ये सेतू बांधले, रस्ते बांधून सगळ्या प्रदेशांमध्ये सेतू बांधले, नद्या एकमेकांना जोडण्याची योजना काढून, त्यांच्या दरम्यान सेतू बांधण्याचे प्रयत्न चालवले, टेलिफोनचे सेतू बांधले आणि त्यापेक्षा महत्त्वाची गोष्ट म्हणजे 'आपण हिंदुस्थानसारख्या गरीब देशात जन्माला आलो, ही मोठी दुर्भाग्याची गोष्ट आहे,' अशी तरुण पिढीमध्ये तयार झालेली नैराश्याची भावना पुसून काढून, हिंदुस्थानातील माणसे बुद्धिमान आहेत, प्रज्ञावान आहेत, प्रतिभावान, वैज्ञानिक आहेत... त्यांच्या कर्तृत्वाला देशातल्या देशात वाव मिळण्यास अनुकूल वातावरण तयार केलं. आतापर्यंत ही सर्व चांगली माणसं अमेरिकेत गेली म्हणजे यशस्वी होतात, हिंदुस्थानात मात्र कुजत पडतात, गरीब राहतात असं होतं. याचं कारण अमेरिकेत त्यांना आपलं कर्तृत्व फुलवायचं जे स्वातंत्र्य आहे ते इथं मिळत नव्हतं. अटलबिहारी वाजपेयींच्या सरकारनं या देशातील या प्रज्ञावंतांच्या कर्तृत्वाला वाव मिळेल असं धोरण स्वीकारल्याबरोबर एक चमत्कार घडला आणि हिंदुस्थानातल्या प्रत्येक व्यक्तीला वाटायला लागलं, की रालोआ सरकारने खुल्या केलेल्या रस्त्याने जर आपण चालत राहिलो, तर हिंदुस्थानसुद्धा

एक महासत्ता होईल. एवढंच नव्हे, तर हिंदुस्थानातील प्रत्येक माणसाकडे जगामध्ये मोठ्या आदराने पाहिलं जाईल. आकडेवारी बाजूला ठेवा, उत्पन्नाचे आकडे नकोत, रोजगारीचे आकडे नकोत, बेरोजगारीचेही आकडे नकोत; अर्थशास्त्रात सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे माणसाच्या मनातील पुढे जाण्याची भावना. ही भावना अटलबिहारी वाजपेयींनी देशात जागवली. त्याचं रहस्य – सगळ्यांना बरोबर घेऊन चाला, सगळ्यांना समजून घ्या, उगाच खोटेपणाचा दंभ ठेवू नका असा खुलेपणा. या वृत्तीचा नेता इतिहासात शोधायचा ठरवले, तर मला फक्त अमेरिकेतील अब्राहम लिंकनच सापडतात.

अटलजींचं इतकं परीक्षण केल्यानंतर माझी खात्री झाली, की तेच जर पंतप्रधान राहिले तर शेतकऱ्यांचं आणि शेतकरी संघटनेचं भाग्य सुरक्षित राहील. सूर्याच्या रथाला सात घोडे आहेत आणि त्यांना सापांचे लगाम आहेत, त्याच्या सारथ्याला पाय नाही असा संस्कृतात श्लोक आहे; पण त्याच्याही पेक्षा कठीण परिस्थिती वाजपेयींच्या रथाची होती. त्यांच्या रथाला सात नव्हे २४ घोडे होते, वेगवेगळ्या दिशांनी रथ ओढण्याचा प्रयत्न करणारे, लगाम नाहीतच; पण सारथ्याने आपल्या अंगी असलेल्या सर्वसमावेशकता आणि सहिष्णुता यांच्या साहाय्याने तसेच जे जे नवे समोर येईल – तंत्रज्ञान, राजकीय विचार – त्या सगळ्यांबद्दल एक सैद्धांतिक स्वच्छता बाळगून, त्यांचा स्वीकार-अस्वीकार करीत, हा रथ ६ वर्षे यशस्वीपणे आणि प्रगतीच्या दिशेने चालविण्यात यश प्राप्त केले. अटलजींच्या नेतृत्वाखाली हिंदुस्थान आज खरोखरच महासत्ता बनण्याच्या मार्गावर आहे.

या परिस्थितीमध्ये आता मतदारांनी/शेतकऱ्यांनी निर्णय घ्यायचा आहे. मी प्रचाराकरिता आलो आहे, हे खरे आहे; पण मी सांगतो म्हणून अमक्याला मते द्याच, असे मी सांगणार नाही.

कुरुक्षेत्रावर युद्ध सुरू व्हायच्या ऐन वेळी अर्जुनाने धनुष्य खाली ठेवले तेव्हा कृष्णाने त्याला म्हटले, की काहीतरी मूर्खासारखे करू नकोस, तुला युद्ध करावे लागणारच आहे. पण, त्यानंतर गीतेचे १८ अध्याय सांगून झाल्यानंतर कृष्ण अर्जुनाला म्हणाला, "मला जे काही तत्त्वज्ञान अवगत होतं, ते तुला सांगितलं. आता, यथेच्छसि तथा कुरू ।" तसं, राष्ट्रीय लोकशाही आघाडीत सामील होण्याच्या स्वतंत्र भारत पक्षाच्या निर्णयाची पार्श्वभूमी, यथायोग्यता आणि परिणाम याबाबतची सविस्तर मांडणी मी तुमच्यासमोर केली आहे. आता तुम्ही तुमच्या मनातल्या देवाला विचारा, तुमच्या मनातल्या राष्ट्रभक्तीला विचारा,

जी जी काही सद्‌भावना तुमच्या मनात असेल तिला विचारा, की या परिस्थितीत माझं मत कोणाला गेलं पाहिजे? त्याचं उत्तर स्वच्छ मिळालं, की त्याप्रमाणे तुमचं मत नोंदविणारं बटण दाबा.

(६ मे २००४)

◆◆

२००४ निवडणुकीने काय शिकविले?

स्वतंत्रतावाद्यांपुढे नवे आव्हान

१४ व्या लोकसभेच्या निवडणुका पार पडल्या. सर्व निकालही जाहीर झाले आहेत. हा लेख प्रकाशित होईपर्यंत, देशाच्या नव्या पंतप्रधान सोनिया गांधी, झालेल्या असतील.

२००४ च्या या निवडणुकांत १९५२ सालच्या निवडणुकांनंतर पहिल्यांदाच 'निवडणुकीनंतर पंतप्रधान कोण होणार,' याची सर्वमुखी मान्यता या वेळी होती असा प्रचार राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे कार्यकर्ते प्रचारक – त्यात स्वतंत्र भारत पक्षाचे नेतेही आले – करीत होते. लोकांच्या अनुमानाप्रमाणे १९५२ च्या निवडणुकीत जवाहरलाल नेहरू पंतप्रधान झाले; २००४ सालच्या निवडणुकीत मात्र अटलबिहारी वाजपेयी पंतप्रधान झाले नाहीत. उलट, त्यांच्या पक्षाने ज्यांची विविध तऱ्हांनी अवहेलना आणि उपहास केला त्या सोनिया गांधी पंतप्रधान होत आहेत.

या निकालांनी सर्वांनाच धक्का बसला आहे. विजयी झालेल्या काँग्रेस उमेदवारांनाही सुखद धक्का बसला आहे. राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या पाठीराख्यांना वज्राघात झाल्यासारखी तिरीमिरी आली आहे.

आणीबाणीनंतर झालेल्या निवडणुकांत काँग्रेसचा सफाया झाला. दस्तुदखुद्द इंदिरा गांधीही हरल्या. त्या वेळी अशा सुखद धक्क्याचा अनुभव काँग्रेस विरोधकांना मिळाला होता. त्या वेळी निवडणुकीसाठी इलेक्ट्रॉनिक यंत्रे नव्हती. त्यामुळे निकाल संध्याकाळी यायला सुरुवात झाली, ते दुसरे दिवशी सकाळपर्यंत निकाल येत राहिले. त्या वेळी दूरदर्शनचाही फारसा प्रसार नव्हता. सर्वसाधारण लोक रेडिओवरच बातम्या ऐकत. दर पाच-दहा मिनिटांनी काँग्रेसचा कोणता ना कोणता मोहरा पडल्याची बातमी येई आणि एकाच रेडिओभोवती जमलेल्या

गर्दीत आनंदउल्हास उसळे, टाळ्यांचा कडकडाट होई.

२००४ च्या निवडणुकीत इलेक्ट्रॉनिक यंत्रे आली. सकाळी ८ वाजता मतमोजणी चालू झाली. ९ वाजता निर्णय येऊ लागले. निकालाच्या बातम्यांचा असा धबधबा वाहू लागला, की सगळ्यांची दाद घेणे टेलिव्हिजनच्या वाहिन्यांच्या निवेदकांनाही शक्य होईना. प्रेक्षकांचीदेखील राज्यातला निर्णय पाहावा का एकूण गोळाबेरीज आकडे पाहावे अशी धांदल होऊन गेली. सुरुवाती सुरुवातीलाच काँग्रेसने आघाडी घेतली. मग, राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या परिस्थितीत सुधारणा होत, काही काळ ती काँग्रेस आघाडीच्या पुढेही गेली. पण शेवटी, काँग्रेसने सरशी केली. निव्वळ भाजपने १२९ जागा जिंकल्या, रालोआने १६७; काँग्रेसला १३९ जागा मिळाल्या, काँग्रेस आघाडीला १८८.

या दोघा प्रमुख आघाड्यांखेरीज एक तिसरी आघाडी होती, ती नामशेष झाली. याउलट, स्वातंत्र्यानंतर कधी नव्हे इतके यश मार्क्सवादी आणि कम्युनिस्ट पक्षांना मिळाले. त्यांना ४३ जागा मिळाल्या. मार्क्सवादाचे नाव असणाऱ्या इतर प्रादेशिक डाव्या पक्षांचे खासदार धरले, तर हा आकडा ६० च्या वर जातो. याखेरीज, पक्षाच्या नावातच समाजवादाची आण घेणाऱ्या समाजवादी पक्षास ४० आणि बहुजन समाज पक्षाला १९ जागा मिळाल्या, म्हणजे त्यांची कामगिरी उल्लेखनीय राहिली.

मार्क्सवादी कम्युनिस्ट इंदिरा गांधींच्या काळापासून काँग्रेसशी जुळून आहेत. 'दिल्लीत येणारे नवे सरकार प्रामुख्याने काँग्रेस आणि कम्युनिस्टांचे राहणार आहे. हे सरकार प्रामुख्याने निधार्मिक ताकदींचे असेल.' अशा ललकाऱ्या मारल्या जात आहेत. काँग्रेस पक्षाची अयोध्या विषयावरची धोरणे आणि शहाबानो प्रकरणातील मुस्लिम अनुनयाकरिता घटनादुरुस्ती करून, मुसलमान स्त्रियांवर अन्याय करणारे धोरण पाहिले आणि मुलायमसिंगांची मुस्लिम प्रश्नावरची भूमिका पाहिली म्हणजे काँग्रेस आणि समाजवादी यांना निधार्मिक म्हणण्यापेक्षा 'अनुनयी निधार्मिक' असे म्हणणे अधिक योग्य होईल. यालट, राष्ट्रीय लोकशाही आघाडी टिकवून धरण्यासाठी का होईना, राममंदिर, ३७० वे कलम आणि समान नागरी कायदा हे मुद्दे संघ परिवार, विश्व हिंदू परिषद, बजरंग दल, शिवसेना आदी अतिरेकी हिंदुत्ववाद्यांचा रोष पत्करूनही, मागे सारून सर्व धार्मिक तणाव तयार करणारे मुद्दे राष्ट्रीय लोकशाही आघाडीत अंतर्गत विवादाचे मुद्दे न बनवणाऱ्या अटलबिहारी वाजपेयी यांना खरे तर निधार्मिक म्हटले जायचे. दुर्दैवाने, नरेंद्र मोदी, विनय कटियार, स्वामी सच्चिदानंद यांची विक्राळ प्रतिमाच जनमानसावर

टिकून राहिली. वाजपेयींच्या दूरदर्शी मुत्सद्दीपणाचा लाभ राष्ट्रीय लोकशाही आघाडीला घेता आला नाही.

राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या परिवारातील पक्षांना 'हिंदू निधार्मिक' आणि काँग्रेस, समाजवादी पक्ष यांना 'अनुनयी निधार्मिक' अशी नामाभिधाने देणे योग्य ठरेल.

हिंदू-मुसलमान प्रश्न देशात अनेक वर्षे पेटत आहे. तो सोडविण्याचा अटलबिहारी वाजपेयी यांचा प्रयत्न तात्पुरता तरी मतदारमान्य झाला नाही. आणखी काही काळ हिंदू निधार्मिकांना जातीयवादी, जातीयवादी म्हणून बडविण्याचा राजकीय फायद्याचा धंदा चालू राहील.

२००४ च्या निवडणुकांनंतर येणाऱ्या नव्या सरकारचे आर्थिक धोरण काय असेल, यासंबंधी मोठा विवाद उभा राहणार आहे. १९९१ सालापासून समाजवादापासून दूर जाऊन खुलीकरण आणि जागतिकीकरण यांचे एक युग सुरू झाले होते. खुल्या व्यवस्थेचे आणि खुल्या तंत्रज्ञानाचे काही फायदे शेतकऱ्यांनाही मिळण्याची आशा तयार झाली होती. 'आता यापुढे खुलीकरणाचा मार्ग निर्वेध झाला आहे. खुलीकरण काही वेळा वेगाने पुढे जाईल, काही वेळा त्याला आवर घालावा लागेल, एवढेच काय ते. पण, सिद्धांत म्हणून बंदिस्त व्यवस्थेचे समर्थन आता गंभीरपणे कोणी करणार नाही,' अशी एक भाबडी समजूत स्वतंत्रतावाद्यांनी करून घेतली होती.

ही समजूत चुकीची आहे. संघटित कामगार, नोकरदार समाजवादाच्या काळात मिळवलेली फायद्याची कलमे सोडून देण्यास एवढ्या सहजतेने तयार होणार नाहीत असे स्पष्ट भाकीत मी अनेकदा वर्तवले आहे. आपल्या स्वार्थाकरिता नेता, तस्कर, गुंडा, अफसर - संप, हरताळ, आंदोलने - अगदी नक्षलवादी आतंकवाद या साधनांचा वापर करतील अशी माझी धारणा होती; पण आता स्वातंत्र्यानंतर सर्वांत जास्त जागा कम्युनिस्टांनी मिळवल्या, एवढेच नव्हे तर त्यांच्या तालावरच काँग्रेस सरकारला नाचावे लागणार आहे, हे पाहता आर्थिक सुधारांच्या धोरणाचे भवितव्य काय? असे मोठे प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. या प्रश्नाने व्याकूळ झालेला शेअरबाजार, २५ वर्षांत कधी नव्हे इतका, गडगडला आहे. डॉ. मनमोहन सिंग काँग्रेस पक्षामध्ये निर्णायक स्थानी नसते, तर देशभर एक मंदीची लाट पसरली असती. स्वतंत्रतावाद्यांपुढे एक मोठे आव्हान उभे राहणार आहे. निखळ बंदिस्त व्यवस्था रेटणे सोनिया गांधींच्या सरकारलाही शक्य होणार नाही. तोंडदेखलेतरी आर्थिक सुधारांचा पाठपुरावा करावाच लागेल.

पण, त्याबरोबर आंध्र प्रदेशात जाहीर केल्याप्रमाणे शेतकऱ्यांना मोफत वीज देण्याचे कार्यक्रमही जाहीर करावे लागतील. आर्थिक धोरणांतील या विसंगतींचा फायदा स्वतंत्रतावाद्यांना उठवावा लागेल. सैद्धांतिक स्वतंत्रतावादाऐवजी स्वतंत्रतावादाची रणनीती तयार करावी लागेल.

नवी समीकरणे

समाजवादाचा पाडाव झाल्यानंतर भारतीय जनता पक्ष, संघ परिवार, शिवसेना आदी हिंदुत्ववादी पक्षांना बरे दिवस यावेत यात आश्चर्यकारक काहीच नव्हते. समाजवादाच्या काळात नियोजनाच्या अर्थव्यवस्थेने देश गरिबीच्या पंजातून सुटेल आणि पुढेमागे कधीतरी विकासाच्या रस्त्याने झेप घेईल अशी आम नागरिकांची धारणा झाली होती. समाजवादाच्या पाडावानंतर वर्तमानकाळ आणि भविष्यकाळ यांबद्दल निराशेचे सावट आल्यामुळे इतिहासातील मानबिंदूंची जपणूक आणि 'उदे उदे' करणारी विचारधारा पुढे येईल हे अपेक्षितच होते. बेकारीच्या खाईत सापडलेल्या तरुणांना भूतकाळाततरी आपण कोणी होतो, ही जाणीव सुखकारक वाटली. आम्ही सर्व जगाकडून हार खाल्ली असेल; पण आम्ही छत्रपती शिवरायांचे वंशज आहोत, जगातील सर्वश्रेष्ठ तत्त्वज्ञान मांडणाऱ्या हिंदू धर्मात आमचा जन्म झाला, पुरुषोत्तम प्रभुरामचंद्रांचा आम्ही आदर्श मानतो अशी अभिमानस्थळे फडकावणाऱ्यांचा तोटा कधीच नव्हता. समाजवादाबरोबर आर्थिक विषयपत्रिका संपुष्टात आली आणि युद्ध हरलेल्या सैन्याप्रमाणे जनता सैरावैरा धावू लागली आणि त्यांनी अशी पुरातन अभिमानस्थळे फडकावणाऱ्यांचा आश्रय घेतला. १९८५ च्या सुमारास मला प्रमोद महाजन भेटले होते. त्यांच्याशी बोलताना 'भारतात हिंदुत्वाची लाट येऊ लागली आहे,' असे भाकीत मी सांगितले होते. त्यांच्या एका लेखात महाजनांनी ही आठवण नोंदवली आहे. त्यापुढे जाऊन, मी आणखी एक भाकीत सांगितले, 'या हिंदुत्वाच्या लाटेचा फायदा तुम्ही हिंदुत्ववादी उठवू शकणार नाही,' या दुसऱ्या भाकीताचीही नोंद त्यांच्या लेखात आहे.

आणीबाणीनंतर हिंदुस्थानातील राजकारणाची सारी घडीच विस्कटून गेली. विश्वनाथ प्रताप सिंह दुसऱ्या स्वातंत्र्याची भाषा करीत होते, शेतकऱ्यांना कर्जमुक्त करण्याचे आश्वासन देत होते. प्रत्यक्षात पंतप्रधान झाल्यानंतर आघाडी शासनांच्या कसोट्यांना ते उतरू शकले नाहीत आणि ऐतिहासिक अभिमानस्थळांचे भांडवल भारतीय जनता पक्ष यांसारखे पक्ष करीत असताना, त्याला छेद देण्यासाठी त्यांनी ऐतिहासिक दु:खांचे, अपराधांचे आणि अन्यायांचे भांडवल करून

'मंडल'मार्ग स्वीकारला. तेव्हापासून भारतात इतिहासातील गौरवस्थळांचा भांडवल करणारे आणि इतिहासातील अन्यायांचे भांडवल करणारे असे दोन प्रवाह तयार झाले. मुलायमसिंह, लालूप्रसाद यादव, कांशीराम, मायावती, एन. टी. रामाराव, चंद्राबाबू, करुणानिधी, जयललिता, पासवान हे सगळे जातीच्या व प्रदेशांच्या आधारांनी ऐतिहासिक जखमांचे भांडवल करणारे. याउलट, भाजप, शिवसेना, अकाली दल, संघ परिवार, विहिंप, बजरंग दल असे सगळे इतिहास व पुराणकालीन अभिमानस्थळांच्या आधारांनी आर्थिक विषयपत्रिका हाताळू पाहणारे.

सांगलीच्या शेतकरी मेळाव्यात (१९८७) विश्वनाथ प्रताप सिंहांच्या हजेरीत 'शेतकऱ्यांच्या उगवत्या स्वातंत्र्याभोवती भगवी, हिरवी, पिवळी, निळी गिधाडे घिरट्या घालीत आहेत, त्यांच्यापासून सावध राहा,' अशी धोक्याची सूचना मी दिली होती. या गिधाडांचा एक अग्रदूत सभेच्या मंचावरच बसला होता, हा मोठा विचित्र योगायोग आहे! काँग्रेस पक्षाने यांतील फक्त भगव्या गिधाडांनाच जातीयवादी मानले, बाकीच्या जातीयवादी गिधाडांना मात्र काँग्रेस पक्ष सोयीप्रमाणे दूर-जवळ करीत असतो.

१३ दिवसांचे अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखालील सरकार पडले आणि काँग्रेसने पर्यायी सरकार देण्याचा प्रयत्नसुद्धा केला नाही. तेव्हापासून स्वतंत्र भारत पक्ष भाजपबद्दलची आपली भूमिका तपासून घेऊ लागला. (शेतकरी संघटक : ६ जून १९९६) राजकारणात काही पक्षांना अस्पृश्य मानल्याने नुकसान देशाचे होते. अशा पक्षांना मध्यप्रवाहात आणण्याची आवश्यकता असते. या आडाख्याने पुढे स्वतंत्र भारत पक्षाने दोन पावले उचलली. भाजपचे अध्यक्ष बंगारु लक्ष्मण यांनी मुसलमानांनी भाजपात प्रवेश करावा असे आवाहन केल्यानंतर शेतकरी संघटनेचे माजी अध्यक्ष पाशा पटेल यांनी त्या आवाहनाच्या गांभीर्याची तपासणी केली. त्या पक्षात इतर कोणत्याही पक्षांच्या तुलनेने मुसलमानांना कमी सन्मानाची वागणूक दिली जात नाही, हे स्पष्ट झाले.

कृषी कार्यबलाच्या अध्यक्षपदाचे निमंत्रण मी स्वीकारले आणि आपल्या पक्षातील स्वदेशीवादी अतिरेक्यांना आटोक्यात ठेवण्याच्या अटलबिहारी वाजपेयींच्या क्षमतेचीही परीक्षा केली.

अभिमानस्थळे गौरवणारे अतिरेकी आणि राष्ट्राभिमानाच्या वल्गना करीत बंदिस्त अर्थव्यवस्था पुरस्कारणारे 'स्वदेशी' अतिरेकी, या दोघांनाही काबूत ठेवून, आघाडीचे शासन पूर्ण काळ टिकविणाऱ्या, त्याबरोबर देशाला राजकीय स्थैर्य आणि आर्थिक महासत्ता बनण्याचीही आकांक्षा देणाऱ्या राष्ट्रीय लोकशाही

आघाडीत स्वतंत्र भारत पक्ष सामील झाला (५ मार्च २००४). त्या दिवसापासून राष्ट्रीय लोकशाही आघाडी पुन्हा सत्तेत येईल, अटलबिहारी वाजपेयी पुन्हा पंतप्रधान बनतील याबद्दल सर्व राजकीय जाणकार, चाचणी मतदानाचे निष्कर्ष, भविष्यवेत्ते, एवढेच नव्हे तर अगदी नेहमी अचूक ठरणारे सट्टावालेसुद्धा १२ मे २००४ च्या मध्यरात्रीपर्यंत या विषयावर एकमत होते. १३ मेचा दिवस उजाडला आणि एका राजकीय भूकंपाने देश हादरला. आता सोनिया गांधी पंतप्रधान बनतील. हे सगळे कसे झाले याचे विश्लेषण आकडेवारीच्या आधाराने करणे आज कठीण आहे. काही ढोबळ निष्कर्ष आजही काढता येतील.

१) पंतप्रधानपदासाठी स्वदेशी जन्म असलेला नागरिकच पाहिजे, ही कल्पना मतदारांनी झुगारून दिली आहे.

२) मतदारांचा कौल सर्व राज्यांत सारखा नाही. आंध्र प्रदेशात तो राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या विरुद्ध गेला, तर पंजाबात, कर्नाटकात आणि ओरिसात तो काँग्रेसच्या विरोधात गेला. हरियानात चौतालांचे पानिपत झाले. दिल्ली, मुंबईसारख्या महानगरांत काँग्रेस पुढे आली. महाराष्ट्रात मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर अशा शहरांत काँग्रेसला विजय मिळाला. दक्षिण महाराष्ट्राच्या साखरपट्ट्यातही उसाच्या भावासंबंधीचे आंदोलन दोन वर्षे उग्रपणे चालूनही काँग्रेसची सहाही मतदारसंघांत सरशी झाली. याउलट, विदर्भातील ११ पैकी १० आणि मराठवाड्यातील ८ पैकी ६ जागा राष्ट्रीय लोकशाही आघाडीस मिळाल्या. विदर्भ आणि मराठवाड्यातील राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे यश हे स्वतंत्र भारत पक्षाच्या पाठिंब्यामुळेच मिळाले आहे, हे सर्वजण मान्य करतात. काँग्रेसच्या नेत्यांनी वेगळ्या तेलंगणाला मान्यता दिली, तशी वेगळ्या विदर्भालाही दिली असती, तर परंपरेने काँग्रेसनिष्ठ विदर्भ काँग्रेसवर उलटला नसता असे भाष्य काँग्रेसचे महाराष्ट्राचे अध्यक्ष रणजित देशमुख यांनी केले आहे. या भाष्यात काही तथ्य असेल, तर मराठवाड्यात काँग्रेस भुईसपाट का झाली याचेही उत्तर द्यावे लागेल. मराठवाड्यात तर काही वेगळ्या मराठवाड्याचा प्रश्न अजून उठवण्यात आलेला नाही?

सारांश, मतदानाच्या आकडेवारीची विधानसभा मतदारसंघवार, लोकसभा मतदारसंघवार, राज्यवार, प्रदेशवार तपासणी केल्यानंतरच या निवडणुकीच्या कौलाचा व्यावहारिक अर्थ स्पष्ट होईल. त्यासंबंधी अभ्यास यथावकाश होतीलच.

गेल्या दोन महिन्यांत मी स्वत: आणि शेतकरी संघटनेचे, स्वतंत्र भारत पक्षाचे कार्यकर्ते राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या उमेदवारांच्या प्रचाराकरिता जिवाचे

रान करून तापत्या उन्हाळ्यात दिवसरात्र फिरलो. भारतीय जनता पक्ष व शिवसेना यांच्या कार्यकर्त्यांचा संपर्क झाला. अनेक गोष्टी शिकायला मिळाल्या. काही किरकोळ अपवाद सोडल्यास शेतकरी संघटनेचे सारे कार्यकर्ते एकजुटीने आणि एकदिलाने राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या प्रचाराकरिता राबले. त्यांच्या निष्ठेची आणि प्रामाणिकपणाची वाखाणणी सर्व उमेदवारांनी केली आहे.

मतदाराचा निर्णय हा लोकशाहीत शिरसावंद्य मानावाच लागतो. 'ही कसली लोकशाही?' असा प्रश्न विचारणे हे निव्वळ कोतेपणाचे लक्षण आहे. या प्रचाराच्या काळात काही गोष्टी घडल्या त्या त्याही वेळी मला खटकल्या होत्या. त्यासंबंधी नापसंती मी वरिष्ठ पातळीवरील नेत्यांनाही सांगितली होती. आता त्यांची मांडणी अशाकरिता करतो, की ज्या गोष्टी मला खटकल्या त्यांनी मतदार चांगलाच दुरावला असणार. राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या पाडावाची काही चिन्हे ही निवडणुकीच्या प्रचाराच्या काळातही दिसू लागली होती. किंबहुना, अशा घटनांनीच अटलबिहारी वाजपेयी यांच्या प्रतिमेला तडा गेला. माणसाच्या मनातील आदर्श मूर्तीला लहानसा जरी टवका गेला, तरी ती मूर्ती पूजेची राहत नाही, भावनेला तडा जातो. असे काहीसे वाजपेयींच्या बाबतीत घडले आहे. त्यातले काही अनवधानाने घडले असेल, काही जाणूनबुजून स्वार्थापोटी किंवा खोडसाळपणे केले असेल. अशा कारणांनी राष्ट्रीय लोकशाही आघाडीला हार घ्यावी लागली असे म्हणणे कदाचित तर्कशुद्ध असणार नाही. पण, अशा गोष्टी भविष्यात टाळल्यास राष्ट्रीय लोकशाही आघाडीस पुन्हा एकदा काँग्रेसवर मात करून सत्तेवर येता येईल. लोकसभेतील दोन जागांवरून २०० च्या वर जागांपर्यंत जाणाऱ्या पक्षाला १२९ पासून सुरुवात करणे फारसे जड जाऊ नये.

पहिली सलामी महाराष्ट्र विधानसभा निवडणुकींच्या वेळी येत्या सहा महिन्यांतच होणार आहे.

काय चुकले, कसे सुधारायचे?

राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या निवडणूक प्रचाराची रणनीती इतकी भुईसपाट का झाली? मतदारांसमोर जाताना राष्ट्रीय लोकशाही आघाडीकडे काही सज्जड भांडवल होते.

१) 'दहा वर्षांत ६ पंतप्रधान' अशा राजकीय अस्थिरतेच्या परिस्थितीतून राष्ट्रीय लोकशाही आघाडीने राजकीय स्थैर्याची पुरी ६ वर्षे देशाला दिली.

२) भाजपकडे किमान बहुमतही नव्हते. अटलबिहारी वाजपेयींच्या नेतृत्वाखाली एकेक पक्षाची जुळवणी करीत करीत, अखेरीस समान कार्यक्रमाच्या आधारावर

२४ राजकीय पक्षांची आघाडी तयार झाली. या पक्षांच्या भूमिकांत समानता फार थोडी होती. भाजपचे प्रतिष्ठेचे राममंदिर, समान नागरी कायदा, ३७० वे कलम रद्द करणे हे कार्यक्रम त्यांच्यापैकी कोणालाच मान्य नव्हते. अशा परिस्थितीत आघाडी सरकारचे नीतीनियम प्रत्यक्षात राबवून, भारतीय राजकारणात 'आघाडी युगा'चा सफल प्रारंभ राष्ट्रीय लोकशाही आघाडीने करून दाखविला होता.

३) पोखरण अणुस्फोटाच्या चाचणीमुळे भारताची प्रतिष्ठा वाढली. आण्विक महासत्तांनी भारतावर लादलेल्या आर्थिक बहिष्कारास या आघाडी सरकारने यशस्वीरीत्या तोंड दिले.

४) कारगिलमधील पाकिस्तानचे आक्रमण परतवून लावले आणि पाकिस्तानशी सलोख्याचे संबंध प्रस्थापित केले आणि या प्रयत्नांबद्दल जागतिक मान्यता मिळविली.

५) समाजवादी नियोजनाच्या व्यवस्थेकडून खुल्या व्यवस्थेकडे जाण्यासाठी परिवर्तनाच्या काळात अनेक कठीण समस्या उभ्या राहतात. उदा. बेरोजगारी, चलनवाढ, वित्तीय तूट, सार्वजनिक कल्याणाच्या योजनांना कात्री लावणे इत्यादी. भाजपमधीलच 'स्वदेशी' गटाला काबूत ठेवून, वाजपेयी सरकारने खुलीकरणाच्या वाटेवरील प्रगती चालू ठेवली. एवढेच नव्हे, तर आर्थिक विकासाची 'हिंदुगती' बाजूस टाकून, राष्ट्रीय उत्पादनाच्या वार्षिक वाढीची गती पहिल्यांदा दोन आकड्यांत नेली. 'गरिबी हटाव', 'रोटी-कपडा-मकान' अशा नकारात्मक संकल्पनांऐवजी देशाला महासत्ता बनवण्याच्या स्वप्नांची बीजे लावली.

६) संघ परिवाराच्या काही गटांचे ख्रिस्ती मिशनऱ्यांवरील हल्ले, गुजराथमधील दंगे आणि राममंदिराचा प्रश्न पेटत ठेवण्याचे उपद्व्याप चालू असताना सर्वसाधारणपणे जातीय सलोख्याची भावना टिकवून धरली. मुसलमानांच्या सामाजिक प्रश्नांपेक्षा त्यांचे आर्थिक-सामाजिक प्रश्न अधिक महत्त्वाचे आहेत, याची जाणीव जोपासली.

राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या जमेच्या बाजूंची यादी आणखी पुष्कळ लांबवता येईल. टेलिफोन व्यवस्थेतील सुधारणा, रस्ते बांधणी, परकीय चलनाच्या गंगाजळीची उच्चांकी वाढ, माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात भारताने मिळविलेली जागतिक मान्यता इ. इ. शेतीच्या क्षेत्रातही आधारभूत किमती सतत चढत्या ठेवणे, किसान क्रेडिट कार्डची आणि मिळकत विम्याची योजना यांचाही उल्लेख करावयास हवा. दुर्दैवाने, निवडणुकीच्या आधीची तीन वर्षे अनेक प्रदेशांत दुष्काळाची स्थिती झाल्यामुळे शेतकऱ्यांना या कार्यक्रमांपासून पाहिजे तितका फायदा उठवता

आला नाही.

एवढी लांबलचक यादी निवडणुकीच्या काळात मतदारांसमोर मांडणे शक्य नसते; सर्व निवेदन मोठे रटाळ आणि कंटाळवाणे होते. राष्ट्रीय लोकशाही आघाडीने त्यांच्या विविध प्रचारपुस्तिकांत ही मांडणी तपशीलवार केली; पण मतदारांपुढे अगदी थोडक्यात सुटसुटीतपणे राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या कारकिर्दीची कामगिरी यापेक्षा अधिक चांगल्या रीतीने मांडता आली असती. अस्थैर्याच्या काळात आघाडीचे नीतिनियम अनुसरून स्थैर्य, आर्थिक सुधार आणि गतिमान विकास साधण्याची वाजपेयींच्या नेतृत्वाची करामत हा राष्ट्रीय लोकशाही आघाडीचा सगळ्यांत मोठा जमेचा मुद्दा होता. एवढाच मुद्दा घासून आणि ठासून निवडणूक प्रचारात मांडला गेला असता, तरी वाजपेयींचे कर्तृत्व मतदारांना स्पष्टपणे कळले असते. प्रचारातील भाजपच्या प्रस्थापित नेत्यांची भाषणे मी ऐकली. या विषयावर त्यांचेच प्रशिक्षण होणे आवश्यक होते. राष्ट्रीय लोकशाही आघाडीची जमेची बाजू मांडण्यात प्रचारयंत्रणा कमी पडली, एवढेच नाही, तर प्रचारकांनी काही गोष्टी अशा केल्या, की ज्यामुळे प्रभावी प्रचाराला छेद बसला.

१. अगदी पहिली चूक म्हणजे मुदतपूर्व निवडणुका घेण्याची. राजस्थान, मध्य प्रदेश आणि छत्तीसगड या तीन राज्यांतील निवडणुका होण्यापूर्वी इंदिरा काँग्रेसप्रणीत सरकारे १४ राज्यांत सत्तेवर होती. अनेक क्षेत्रांत सोनिया गांधी पंतप्रधानपदाची खुर्ची नसलेल्या पंतप्रधान आधीच झालेल्या होत्या. १४ राज्यांतील मुख्यमंत्री आणि त्यांची सरकारे '१० जनपथ' कडूनच आदेश आणि मार्गदर्शन घेत होती. पाचपैकी तीन राज्यांतल्या विधानसभा निवडणुकांत भाजपला घवघवीत यश मिळाले. पाच राज्यांतल्या निवडणुकांत तीन तरी राज्यांत जर भाजपला यश मिळाले, तर मध्यावधी निवडणुका घेतल्या जाणार अशा गोष्टी भाजपचे जाणकार नेते फार आधीपासून करीत होते. मिळालेल्या यशाच्या प्रभेने सर्वांचीच नजर फाकली आणि घिसाडघाईत मध्यावधी निवडणुका घेण्याचा निर्णय करण्यात आला. हा निर्णय घेतला जावा यासाठी दडपण आणणाऱ्यांची बुद्धी निवडणुकीतील यशातील आपले श्रेय फुगवून दाखविण्याच्या आणि 'काहीतरी जगावेगळे', 'धाडसी' निर्णय घेण्याच्या हव्यासापोटी झाली. वास्तविक पाहता, काँग्रेसेतर पक्षांचे सरकार पूर्ण मुदतीपर्यंत कधी टिकले नव्हते. मुदत पूर्ण करण्याचे उदाहरण घालून देण्याची ही चांगली संधी होती. अनेक राज्यांत काँग्रेसची सत्ता, तीन वर्षांचा विक्राळ दुष्काळ, मोठ्या संख्येने शेतकऱ्यांच्या आत्महत्या

आणि जागतिक व्यापार संस्थेच्या वाटाघाटीत दोहा परिषदेनंतर आलेली अनिश्चितता इत्यादी घटक लक्षात घेतले, तर वाजपेयी सरकारला त्याची मुदत पुरी करून देणे आणि निवडणुका संविधानाप्रमाणे ठरलेल्या वेळीच घेणे अधिक शहाणपणाचे झाले असते.

मुदतपूर्व निवडणुका जाहीर झाल्यानंतर, साहजिकच, तीन राज्यांतील यशाचा दिमाख, मोठा ताठा, अनाठायी आत्मविश्वास आणि निर्माण होणारी मस्ती भाजपच्या आणि सहकारी पक्षांच्या कार्यकर्त्यांत उफाळून आली.

'फील गुड' किंवा 'इंडिया शायनिंग' या घोषणांच्या शब्दसंहिता अशाच मानसिकतेतून आणि इंग्रजी भाषेच्या अपुऱ्या ज्ञानातून प्रसवल्या. त्याऐवजी पुढे निवडणूक जाहीरनाम्यात वापरण्यात आलेली 'Resurgent India' यासारखी शब्दसंहिता वापरली गेली असती तर निवडणुकीच्या काळात ज्या उपहास आणि कुचेष्टा यांना तोंड द्यावे लागले ते सारे टळले असते.

२. निवडणुका जाहीर झाल्यानंतर राष्ट्रीय लोकशाही आघाडीतील काही मित्रपक्ष भरकटतील, काही नवे पक्ष आघाडीत सामील होतील हे उघड होते. निवडणुकीच्या उंबरठ्यावर चौताला, करुणानिधी यांसारखे मित्र 'आता आम्हाला कोणाचीच गरज नाही' अशा गुर्मीत गमावणे ही मोठी महाग पडलेली चूक होती. सद्भावनेने आघाडीत सामील झालेल्या नव्या पक्षांनाही 'आपण सामील करून घेतो हीच मेहेरबानी समजावी' अशा थाटात वागवले गेले; मतदारसंघातील त्यांची ताकद हिशेबात न घेता तिकिटांच्या वाटपांचे जुने निकषच दटावून चालवले गेले, नवनवीन नटनट्या मोठा गाजावाजा करून पक्षात सामील करून घेतल्या गेल्या. अशा तारेतारकांच्या प्रचारयात्रांसाठी सर्वात तत्पर साधनसामुग्री उपलब्ध करून देण्यात आली. त्यांच्या सभेला झालेली गर्दी निवडणुकीच्या कामाची नाही, जमलेल्या गर्दीला निवडणुकीचे मुद्दे त्यांनी कलापथके, चित्रपट अशा मनोरंजनाच्या कार्यक्रमातून समजावून सांगितले असते तर काही फायदा होता. तसाही कोठे प्रयत्न झाला नाही. काही ठिकाणी तर तारकांना पाहण्यास जमलेली गर्दी हटविण्याकरिता पोलिसांना लाठीहल्ला करावा लागला.

३. वाजपेयीच पुढचे पंतप्रधान असणार याची आघाडीच्या काही नेत्यांच्या डोक्यात इतकी मस्ती चढली, की त्यांनी राष्ट्रीय लोकशाही आघाडीची 'कार्यक्रम पत्रिका २००४' तयार करताना सर्व मित्रपक्षांशी सल्लामसलतही केली नाही. 'हीच वेळ आहे संधी साधण्याची' अशा भावनेने 'अयोध्या समस्ये'चा उल्लेखही

त्यात करण्यात आला. वाजपेयींनी हा प्रश्न कुशलतेने बाजूस ठेवला आहे असे प्रचारक जीव तोडून सांगत असताना कार्यक्रमपत्रिकेत या मुद्द्याचा उल्लेख आला ही निवडणुकीच्या यशाच्या दृष्टीने मोठी दुर्दैवी गोष्ट झाली.

४. वाजपेयीअडवानींची वाखाणणी करताना त्यांच्या ४० वर्षांच्या तपस्येचा उल्लेख वारंवार झाला. त्याच मुद्द्याची दुसरी बाजू म्हणजे भाजपचे आणि सहकारी पक्षांचे बहुतेक नेते निवृत्तीच्या वयापलीकडे कधीच गेले आहेत. त्याउलट, सोनिया गांधी, राहुल, प्रियांका ही तरणीबांड पिढी काँग्रेसने रणधुमाळीत उतरवली. मतदारांच्या लक्षात वाजपेयींचे वृद्धत्व, कदाचित आले नसेल की काय, या शंकेने मतदानाच्या थोडेच दिवस अलीकडे बाळासाहेब ठाकरे यांनी राजकीय नेत्यांना ६५ वर्षांच्या वयानंतर सक्तीची निवृत्ती देण्याचा प्रस्ताव मांडला. शिवसेनेचे मनोहर जोशी आणि भाजपचे राम नाईक यांच्या निवडणुकीवर त्याचा परिणाम झाला असणारच. सर्व देशातील मतदारांना काँग्रेसचे तारुण्य आणि राष्ट्रीय लोकशाही आघाडीची जराजर्जरता राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या पुरस्कर्त्यांनीच उघड करून दाखविली.

या निवडणुकीत अनेक तरुण नव्या दमाचे उमेदवार खासदार म्हणून निवडून आले आणि अनेक वृद्ध आणि वृद्धा घरी बसल्या. जुन्या नेतृत्वाचा मतदारांना आलेला वीट ही वास्तविकता आहे. पण, डॉ. मनमोहन सिंह, ज्योती बसू, अडवानी यांच्या वृद्धावस्थेतील तल्लखतेशी तुलना करतील अशी माणसे नव्या पिढीत अजूनही दिसत नाहीत. वय कमी म्हणजे तडफ अधिक असा काही नियम नाही. राष्ट्रीय लोकशाही आघाडीतील कोणी हा मुद्दा उठवणे आत्मघातीच होते.

५. रालोआच्या महाराष्ट्रातील बहुतेक नेत्यांना लोकसभेच्या निवडणूक प्रचारात काय बोलावे हाच मोठा प्रश्न पडला होता. त्यांच्या भाषणात त्यांनी महाराष्ट्र शासनाच्या कारभारातील त्रुटी, भ्रष्टाचार, तेलगी प्रकरण, लेन आणि सेन प्रकरण यांच्यावरच वक्तृत्व गाजवले. सगळ्या वक्त्यांनी तेच ते कोटिक्रम आणि विनोद ऐकवल्याने मतदारांना जांभया देण्यापलीकडे गत्यंतरच नव्हते.

६. निवडणूक आपण जिंकल्यातच जमा आहे अशा गुर्मीत महाराष्ट्रातील अनेक प्रचारकांनी ताल सोडून भाषणे केली. भाषणाच्या सुरुवातीला शिवरायांना वंदन केले, शिवसेनाप्रमुखांना वंदन केले म्हणजे नंतर काहीही शिवराळ बोलले तरी चालते अशी त्यांच्यातील अनेकांची समजूत दिसली. अनेक ठिकाणी अशी भाषा वापरली गेली, की ज्यामुळे श्रोतृवर्गातील महिलांना अवघडल्यासारखे

व्हावे. सोनिया गांधी, त्यांचे विदेशीपण, त्यांचे चालणे-बोलणे यांबद्दलची कुचेष्टा मर्यादा सोडून केली गेली, हे सद्‌भिरुचीच्या मतदारांना मानवले नाही. महाराष्ट्रातील एका मतदारसंघात एका प्रतिस्पर्धी स्त्री उमेदवाराविषयी इतकी अश्लाघ्य भाषा वापरण्यात आली, की एका जाणकार श्रोत्याने 'या एकाच भाषणामुळे बाई निवडून येणार,' असे भाकीत वर्तवले.

७. ग्रामीण भागात प्रचार करताना शेती आणि ग्रामीण जीवन यांच्याबद्दल काही किमान जाणकारी प्रचारकांना हवी. मराठवाड्यात आणि विदर्भात शेतकरी 'कापूस एकाधिकार' बुडाल्याबद्दल आनंद मानताहेत, ही जाणीव नसलेल्या एका नरनारायणाने 'महाराष्ट्रात युतीचे शासन आल्यास कापूस एकाधिकार योजनेचे पुनरुज्जीवन केले जाईल,' असे जाहीर करून टाकले.

८. गुजरातेतील दंग्यांबद्दल अडवानी आणि वाजपेयी या दोघांनीही यथायोग्य खेद व्यक्त केला; पण ते प्रकरण एवढ्यावर संपले नाही. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे प्रत्यही नरेंद्र मोदी सरकारची लक्तरे चव्हाट्यावर येत होती. मोदींच्या अनुयायांना मात्र प्रचारासाठी त्यांना फिरविण्याची मोठी घाई होती. शेवटी, उमेदवारांनीच मोदी आणि तत्सम इतर प्रचारक आमच्याकडे न आल्यास अधिक बरे, असे सांगून भडक प्रचाराचा अतिरेक आटोक्यात आणला.

९. अलाहाबादचे साडीवाटप प्रकरण आणि तेथील चेंगराचेंगरीत २० हून अधिक बायांचे झालेले मृत्यू हा अपघात तर होताच; पण त्याबरोबरच वाजपेयींच्या अत्यंत निकटच्या सहकाऱ्यांच्या मनातील बेदरकारी आणि बेपर्वाई वाजपेयींच्या प्रतिमेला उजाळा देणारी नक्कीच नव्हती.

१०. निवडणूक प्रचार ऐन भरात असताना वाजपेयींनी 'निवडणुका, राज्यकारभार इत्यादी दमदगीची आपल्याला हौस नाही,' हा मुद्दा मांडण्यासाठी स्वत:च्या निवृत्तीची आणि संभाव्य वारसदाराची गोष्ट काढली. त्यावर 'अडवाणींना उपपंतप्रधान नेमले, यातच वारसदार कोण हे स्पष्ट झाले', 'वारसदार कोण हे अजून ठरायचे आहे', 'वारसदार कोण हे गुपित मी आजच सांगणार नाही', 'या निवडणुकीत आमचा ब्रँड वाजपेयी आहे, पुढच्या निवडणुकीत ब्रँड कोणता असेल हे सांगता येत नाही' इत्यादी मुक्ताफळे उधळली गेली. सर्व प्रचाराची फळी वाजपेयींच्या शिडाच्या आधाराने गलबत हाकू पाहत असता त्या शिडालाच छेद पाडण्याचे काम निदान दुष्टबुद्धीने झाले नसावे एवढीच आशा.

११. राष्ट्रीय लोकशाही आघाडीतील काही घटक पक्षांनी योजनापूर्वक एक रणनीती आखली. रालोआच्या प्रचारसभांना आपली माणसे वाहून न्यायची,

त्यांची सरबराई करायची, त्यांनी आपल्या पक्षांच्याच घोषणा करायच्या, आपल्याच नेत्यांचाच जयजयकार करायचा; प्रसंगी दुसऱ्या मित्रपक्षांच्या नेत्यांच्या भाषणात अडथळे आणायचे, घोषणा द्यायच्या असेही उद्योग केले. तारवटलेले डोळे, गुर्मीची भाषा, बेताल चालणे आणि तोंडामध्ये वाजपेयींच्या विजयाच्या घोषणा हे काही निवडणूक मोहिमेस उपयोगी पडणारे प्रतीक नाही.

थोडक्यात, राष्ट्रीय लोकशाही आघाडीकडे मतदारांपुढे ठेवण्यासाठी वाजपेयींच्या रूपाने उत्कृष्ट माल होता. त्याची गुणवत्ता लोकांना पटविण्यात सार्वत्रिक अपयश आले. शहरात तर सर्वदूर राष्ट्रीय लोकशाही आघाडीला सज्जड मार बसला. एका बाजूला उच्च मध्यमवर्गीयांचेच भले करणारे सरकार अशी विरोधकांची टीका सहन करायची आणि शेवटी त्याच वर्गाकडून मार खायचा, हा मोठा विरोधाभास आहे. ग्रमीण भागात काँग्रेसच्या पारंपरिक गटांना थोडाही धक्का लागलेला नाही. दक्षिण महाराष्ट्रातील सर्व जागा काँग्रेस आघाडीने जिंकल्या. प्रतिपक्षातूनच काही मोहऱ्यांना फोडून, अशा फितुरांनाच उमेदवारी देण्याचे धोरण काही उपयोगी पडले नाही. याउलट, कापूस एकाधिकाराचा अंत, वेगळ्या विदर्भाची मागणी आणि शेतकरी संघटनेच्या जिद्दीच्या कार्यकर्त्यांची प्रचंड फळी यामुळे विदर्भ, मराठवाडा, जळगाव, सोलापूर, मालेगाव या भागांत स्वतंत्र भारत पक्षाने राष्ट्रीय लोकशाही आघाडीस मोठे यश मिळवून दिले.

निवडणुका संपल्या. पराभव आत्मसमीक्षेची संधी देतो. कोणत्या घटक पक्षाची काय कामगिरी आहे आणि राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या समावेशक सहिष्णू नव्या प्रतिमेस साधक कोण आणि बाधक कोण, याचा विचार करून आतापासून मोर्चेबंदी झाली, तर महाराष्ट्रात युतीचे सरकार येऊ शकेल. पुढील लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुका दोनतीन वर्षांतच होऊ शकतात. त्याची तयारी करून सर्व काँग्रेसविरोधी आणि घराणेशाहीविरोधी ताकदींनी तातडीने मोर्चेबांधणी सुरू केली पाहिजे.

(२१ मे २००४)

◆◆

देशाच्या स्वातंत्र्यास कोयता-पंजाचा धोका

देशाच्या राजकारणात ५२-५३ वर्षांनंतर पुन्हा एकदा तोच प्रश्न उभा राहत आहे. लोकशाहीवर ज्यांचा विश्वास नाही, त्यांना लोकशाही व्यवस्थेत स्थान आहे काय?

१९५१ मध्ये केरळ राज्यात कम्युनिस्ट पक्ष निवडणुकांत यश मिळवून सत्तेवर आला. देशातील सर्वांत सुशिक्षित आणि प्रगत राज्यात साम्यवाद्यांचे सरकार यावे, हे तसे अनपेक्षितच होते. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ४ वर्षांत आणि भारतीय राज्यघटना तयार झाल्यानंतर एका वर्षाच्या आत हे घडावे, हे त्याहूनही विशेष.

केरळचे तत्कालीन मुख्यमंत्री ई.एम.एस. नंबुद्रिपाद म्हणजे काही ऐरागैरा माणूस नाही. कम्युनिस्ट पक्षातही व्युत्पन्न साम्यवादी म्हणून त्यांचा मोठा दबदबा होता. फर्डा इंग्रजी बोलणारा. साहजिकच, त्यांच्याभोवती एक तेजोवलय तयार झाले. लगेचच, 'नेहरू के बाद, नंबुद्रिपाद' अशा घोषणा साम्यवाद्यांतील एका गटाने द्यायला सुरुवात केली.

त्या वेळी सारा कम्युनिस्ट पक्ष एकच होता; मार्क्सिस्ट, लेफ्टिस्ट वगैरे शकले अजून पडायची होती. त्या फाळणीच्या आधीची गुरगुर सुरू झालेली होती. कॉम्रेड रणदिव्यांनी भारतीय स्वातंत्र्य हे कितपत खरे आहे, याबद्दल शंका व्यक्त करून मार्क्सवाद्यांनी सशस्त्र संघर्ष करण्याची आवश्यकता मांडायला सुरुवात केली होती.

तेलंगणात कम्युनिस्टांनी उघडउघड उठाव केला होता. पश्चिम बंगालमधल्या नक्सलवाद्यांनी असाच उठाव त्यानंतर बऱ्याच काळाने केला. तेलंगणातील लढा अलीकडच्या पंजाबमधील लढ्याइतकाच तीव्र झाला होता आणि पंजाबमधील आतंकवाद्यांना आटोक्यात आणण्यासाठी ज्या प्रकारची कठोर कारवाई करावी

लागली, त्यासारखीच उपाययोजना केंद्रीय गृहखात्याला, कॅप्टन नंजाप्पा यांना तेथे पाठवून, करावी लागली.

दुसऱ्या एका देशाशी निष्ठा बाळगणाऱ्या आणि उघडउघड सशस्त्र उठावाचा पुरस्कार करणाऱ्या पक्षाला भारतीय घटनेतील तरतुदींचा आधार घेऊन, भारताची राज्यव्यवस्था आतून उधळण्याची संधी देणे कितपत योग्य ठरेल?

नंबुद्रिपादांचे साम्यवादी राज्य फार काळ टिकले नाही. इंदिरा गांधी काँग्रेसच्या अध्यक्षा झाल्यानंतर त्यांनी आग्रह धरून, काही एक निमित्त काढून, केरळातील साम्यवादी सरकार बरखास्त करून, तेथे राष्ट्रपती राजवट लादली.

त्यानंतर, केरळ आणि बंगाल या दोन राज्यांत कम्युनिस्ट सातत्याने विधानसभेच्या आणि लोकसभेच्या सज्जड जागा जिंकत गेले. बंगालमध्ये कम्युनिस्टांचे सरकार पंचविसावर वर्षे अबाधित चालले आहे. केरळात मात्र आघाडीच्या सरकारात मिळणाऱ्या सहभागावरच त्यांना संतुष्ट राहावे लागले आहे. त्यानंतरच्या काळात बंगालमध्ये नक्सलवाद्यांचे तुफान उसळले. सोईस्कर भूप्रदेश असलेल्या मध्य प्रदेश, महाराष्ट्र भागातही 'पीपल्स वॉर ग्रुप'च्या (पी.डब्ल्यू.जी.) च्या झेंड्याखाली त्यांनी पाय रोवले. या काळात त्यातील एका गटाने 'चेअरमन माओ, अमार चेअरमन' अशी घोषणा दिली. साध्यसाधनांच्या प्रश्नावर वादंग माजून, एकसंध कम्युनिस्ट पक्ष फुटला; त्याची निदान तीन मोठी शकले झाली. त्यंतील प्रमुख भारतीय कम्युनिस्ट पक्ष नेते श्रीपाद अमृत डांगे यांच्याशी सलोखा करून, केरळावर राष्ट्रपती राजवट लादण्यात पुढाकार घेणाऱ्या इंदिरा गांधी यांनीच कम्युनिस्टांतील या गटाला भारतीय राजकारणात एक प्रतिष्ठा मिळवून दिली.

२००४ च्या लोकसभा निवडणुकांपर्यंत, साम्यवाद्यांच्या राजकारणातील स्थानाबद्दल कधी प्रश्नचिन्ह उभे राहील, असे वाटले नव्हते. सोव्हिएट युनियनला अफगाणिस्थानातून नामुष्कीने काढता पाय घ्यावा लागला. त्याचा आर्थिक डोलारा कोसळून पडला. राजकीय साम्राज्याची शकले झाली. साऱ्या जगभर समाजवादी नियोजन व्यवस्थेचा खेळखंडोबा झाला. कम्युनिस्टांचे स्फूर्तिस्थान सोव्हिएट युनियन कोसळून पडले, त्याची शकले झाली. कम्युनिस्टांचे दुसरे स्फूर्तिस्थान असलेला चीन बाजारपेठेत उतरून, जगातील महासत्तांशी स्पर्धा करण्यासाठी आखाड्यात उतरला. समाजवाद्यांना काही राजकीय भवितव्य राहिले असे भारतीय उपखंडाबाहेरतरी कोठे दिसत नाही.

पण, भारतीय उपखंडातमात्र साम्यवाद्यांनी पुन्हा एकदा डोके वर काढायला

सुरुवात केली आहे.

हिमालयाच्या पायथ्याशी नेपाळच्या घनदाट जंगलात स्वत:ला माओवादी म्हणणाऱ्या सशस्त्र टोळयांनी चांगले बस्तान बसवले आहे. नेपाळच्या राजघराण्यातील अनेकांचे शिरकाण करण्यातही त्यांचा हात असावा असे म्हटले जाते. नेपाळनरेशांच्या फौजांना त्रस्त करून टाकण्याइतके त्यांचे उपद्व्याप चालू आहेत. अलीकडेच त्यांनी भारतीय नागरिक आणि विमानसेवा यांच्या प्रवेशाबद्दलही फर्माने काढली आहेत.

नक्सलवादी 'पीडब्ल्यूजी' टोळयांनी आंध्र प्रदेश, महाराष्ट्र, झारखंड, छत्तीसगढ, बिहार अशा अनेक राज्यांत सशस्त्र कारवाया सुरू केल्या आहेत. त्यांच्या त्यांच्या प्रदेशात केवळ नक्सवालद्यांचीच हुकूमत चालते, इतर कोणालाही त्या प्रदेशात पुरेसे पोलिस संरक्षण घेतल्याखेरीज प्रवेश करणेही शक्य राहिलेले नाही. आंध्र प्रदेशात तर माजी मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू मुख्यमंत्रिपदावर असताना प्राणघातक हल्ल्यातून वाचले. त्यांच्या मंत्रिमंडळातील एका महिला मंत्र्याच्या पतीची हत्या नक्सलवाद्यांनी केली. या साऱ्या घातपाती कृत्यांचा निवडणुकांच्या निकालावर काहीच परिणाम झाला नसेल असे मानायला काही आधार नाही.

२००४ च्या लोकसभा निवडणुकीत डाव्या पक्षांच्या आघाडीला, स्वातंत्र्यानंतर कधी नव्हे इतक्या म्हणजे ६३ जागा मिळाल्या. काँग्रेसने त्यांच्याशी युती करून संयुक्त पुरोगामी आघाडी (संपुआ) स्थापन केली. डॉ. मनमोहन सिंह यांच्या नेतृत्वाखाली त्या आघाडीचे सरकारही स्थापन झाले. डाव्या गटांनी सरकारात सामील न होता, बाहेरून पाठिंबा देण्याचा पवित्रा घेतला. लोकसभेचे अध्यक्ष म्हणून डाव्या आघाडीचे सोमनाथ चटर्जी यांना बसवण्यास त्यांनी मान्यता दिली.

काँग्रेसची डाव्या गटांशी युती होताच शेअरबाजार ढासळला. डाव्या गटाच्या काही नेत्यांनी बेताल भाषणे करायला सुरुवात केली. विशेषत: मजूर कायदे, निर्गुंतवणूक, खुलीकरण आणि जागतिकीकरण या धोरणात महत्त्वाचे परिवर्तन घडवून आणण्याच्या वल्गना ते करू लागले. स्वत: प्रधानमंत्री व वित्तमंत्री यांना शेअर बाजाराला चुचकारून घ्यावे लागले. संपुआचा सकिका (समान किमान कार्यक्रम) तयार झाला, त्यावर डाव्या विचारांची छाप स्पष्ट दिसून येते. डाव्या गटांनी त्यांच्या निष्ठांप्रमाणे आर्थिक धोरणावर प्रभाव पाडण्याचा आणि आवश्यकतेनुसार ते बदलण्याचाही प्रयत्न करावा हे, कोणाला आवडो, न

आवडो, वावगे म्हणता येणार नाही. कम्युनिस्ट राजवटींत बिगरकम्युनिस्टांना जगणे अशक्य करून टाकले होते. लोकशाही व्यवस्थेचे वैशिष्ट्य हे, की कम्युनिस्टांनाही राज्यघटनेच्या चौकटीत त्यांचे विचार मांडता येतात, त्यांचा प्रचार करता येतो व प्रसंगी व्यवस्थाही बदलता येते.

परंतु, अर्थ, व्यापार, उद्योग, शेती या क्षेत्रांबाहेर राजकीय क्षेत्रात १९५१ सालचीच परिस्थिती पुन्हा निर्माण होते आहे. डॉ. मनमोहन सिंह यांचे सरकार लोकसभेत पुरेसे बहुमत मिळवून आहे. पण, सरकारचे सुकाणू पंतप्रधानांच्या हाती नाही. शासनाच्या बाहेर निदान दोन सत्ताकेंद्रे तयार झाली आहेत. एक सत्ताकेंद्र '१० जनपथ' येथे आणि दुसरे प. बंगालातील डाव्या आघाडीच्या केंद्रीय समितीत.

आंध्र प्रदेशातील पी.डब्ल्यू.जी. गटाने शस्त्रबंदी मान्य केली आहे. या समझोत्याला 'शस्त्रबंदी' असे नाव ते आग्रहाने देतात. उलट, काँग्रेसचे राज्यसरकार याला 'शांती समझोता' म्हणते. चंद्राबाबू नायडूंच्या काळात जी शांतता प्रस्थापित होऊ शकली नाही, ती काँग्रेसचे राज्य येताच इतक्या सुलभतेने कशी शक्य झाली?

संपुआच्या समान किमान कार्यक्रमात नक्सलवाद्यांसारख्या अतिरेकी हिंसाचाराबद्दल एक वेगळा परिच्छेद आहे.

१९८० च्या दशकात 'हे उद्रेक म्हणजे केवळ कायदा आणि सुव्यवस्थेचे प्रश्न नसून, खोलवर गेलेल्या आर्थिक-सामाजिक समस्यांचे परिणाम आहेत. त्यांची उत्तरे अधिक अर्थपूर्ण रीतीने शोधली पाहिजेत.'

केंद्रात काँग्रेस पक्षाचे शासन असताना, महाराष्ट्र, कर्नाटकातही त्याच पक्षाचे राज्य असताना शेतकऱ्यांनी शेतीमालाच्या भावाच्या मागणीसाठी शांततापूर्ण आंदोलने केली. ती आंदोलने चिरडण्याकरिता हेलिकॉप्टरचा वापर करणाऱ्या आणि आंदोलनकर्त्यांवर बेछूट गोळीबार करून, सुरुवातीच्या वर्षभरातच ३० शेतकऱ्यांचा बळी घेणाऱ्या काँग्रेस पक्षाला शस्त्रधारी नक्सलवादी अतिरेक्यांबद्दल उमाळा एकदम का फुटला?

केंद्रातील शासन डाव्या गटाच्या ६३ खासदारांच्या पाठिंब्यावरच कसेबसे उभे आहे. म्हणून आंध्र प्रदेशातील काँग्रेस शासन देशातील कायदा व सुव्यवस्थेच्या प्रश्नातही देशाच्या सार्वभौमत्वाला छेद देणारी भूमिका मजबुरीने घेत आहे काय?

नेपाळच्या सरहद्दीवरील प्रश्न तर त्याहूनही बिकट आहे. माओवाद्यांच्या

कारवायांमुळे नेपाळातील सारे आर्थिक स्थैर्यच धोक्यात येत आहे. उत्तरेकडे हिमालयाच्या रांगा आणि दक्षिणेकडे भारताची सरहद्द अशा परिस्थितीत भारताची लष्करी मदत मागण्यापलीकडे नेपाळला गत्यंतर नाही. नेपाळनरेशांनी ही मदत मागितलीही आहे. या प्रश्नावर निर्णय करताना नक्सलवादी व माओवादी यांच्याशी निकटचे संबंध असलेले संपुआमधील डावे गट शुद्ध देशहिताच्या बुद्धीनेच भूमिका घेऊ शकतील काय? भारताला चीनशी जोडण्याचा १९६१ मध्ये फसलेला डाव आता व्याजासकट, म्हणजे नेपाळच्या घासासकट जिंकण्याचा मनसुबा त्यांच्या मनात राहील काय?

अर्थकारणातील डाव्या पक्षांचा प्रभाव राज्यघटनेच्या चौकटीत कोणी नाकारू शकणार नाही. पण, देशाच्या सार्वभौमत्वाबाबत आणि प्रादेशिक एकात्मतेबद्दल कमजोर निष्ठा असलेल्यांच्या प्रभावाखाली काम करणारे सरकार देशाला मोठ्या संकटात आणू शकते.

२००४ च्या निवडणुकीच्या आधीपर्यंत सत्तेवर असलेल्या राष्ट्रीय लोकशाही आघाडीबद्दल त्यावेळच्या काँग्रेस आघाडीने मोठे रान उठवले होते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही निमलष्करी संघटना आहे, राष्ट्रीय लोकशाही आघाडीशी संबंधित काही पक्ष हिंसाचाराचा खुलेआम उपयोग करतात अशी त्यांची आरडाओरड होती. पण, येंपैकी कोणत्याही दलाने, परिषदेने किंवा सेनेने सशस्त्र उठाव केलेला नाही आणि देशाच्या सार्वभौमत्वाला, प्रादेशिक अखंडतेला आणि राष्ट्रहिताला बाधा आणल्याचा आरोपही कोणी केलेला नाही.

संपुआ सरकारला पाठिंबा देणाऱ्या एका प्रभावी गटासंबंधी दोन प्रश्न उभे राहतात. एक, देशहितकारी आर्थिक धोरणांना ते मोडता घालणार काय? आणि दोन, देशातील कायदा व सुव्यवस्था, देशाचे सार्वभौमत्व आणि प्रादेशिक अखंडता यांना त्यांच्यामुळे धोका संभवतो काय?

विळा-हातोड्याच्या लाल बावट्याचे युग संपले. कणीस-कोयत्याचाही काही धोका राहिला नाही. पण, 'कोयता-पंजा' देशाला मोठा घातक ठरू शकतो.

(२१ जून २००४)

◆◆

निवडणूक धोरणाचा निर्णय लॉटरी तिकीट घेण्यासारखा होत नाही

वर्धा कार्यकारिणी - प्रास्ताविक

शेतकरी संघटना ज्या दिवशी सुरू झाली त्या दिवशी माझा खरा जन्म झाला असे म्हटले तर आतापर्यंतची पहिली पंचवीससव्वीस वर्षे शेतकरी आंदोलनामध्ये शेतकऱ्यांना शेतीचे अर्थशास्त्र शिकविणे आणि त्यांना सन्मान मिळवून देण्याकरिता लढाईसाठी तयार करण्यात गेली. आजपासून माझ्या आयुष्यातील एक नवा कालखंड, एक नवे युग चालू होत आहे.

आजच्या या कार्यकारिणीमध्ये देशातील आजच्या सगळ्या परिस्थितीचा आढावा घेऊन, अवलोकन करून शेतकरी संघटना आणि शेतकरी आंदोलन यांच्या पलीकडे जाऊन राजकीय सत्तेच्या दृष्टीने वाटचाल करून राज्यशकट शेतकऱ्यांच्या हाती कसा येईल यावर विचार होणार आहे.

हा विचार आपण कोणत्या परिस्थितीत करीत आहोत?

मी ७ जुलै २००४ रोजी राज्यसभेचा सदस्य झालो, या घटनेने शेतकरी संघटनेच्या सर्व पाईकांना आनंद झाला असेल, की आपल्याबरोबर रस्त्यावर बसलेला, तुरुंगात गेलेला, शेतकऱ्यांची दु:खे अचूकपणे जाणणारा, त्यांचे विश्लेषणपूर्वक निदान करणारा एक डॉक्टर शेवटी राज्यसभेत पोहोचला. मलाही असाच आनंद झाला. मलाही असे वाटले, की नाशिकच्या रस्त्यावर बसून, निपाणीच्या रस्त्यावर बसून उसाला भाव मागितला, तंबाखूला भाव मागितला. त्यावेळी वाटायचे की कोण आपला आवाज ऐकेल, हा आवाज दिल्लीपर्यंत कधी जाईल, पंतप्रधान आपल्याला कधी चर्चावाटाघाटींकरिता बोलावतील? अशी वाट पहात आपण दिवसच्या दिवस काढले; कपाशीच्या आंदोलनात वर्ध्याहून नागपूरला जाताना मुख्यमंत्री आपले म्हणणे ऐकतील का, त्यासाठी ते विमानाने तरी येतील का याची वाट पहात राहिलो. आता राज्यसभेमध्ये

पंतप्रधानांचे लक्ष वेधण्याकरिता त्यांच्याकडून चिठ्ठी किंवा निरोप येण्याची आवश्यकता नाही, शेतकऱ्यांच्या गाऱ्हाण्याचा कागद घेऊन आपण पंतप्रधानांच्या खोलीत केव्हाही जाऊ शकतो, नाही तर निदान संसदेमध्ये शेतकऱ्यांचे दु:ख मांडू शकतो, एवढी तरी प्रगती या पंचवीस वर्षांत झाली याचा मला राज्यसभेवरील निवडीमुळे आनंद वाटला.

प्रत्यक्षामध्ये परिस्थिती फार वेगळी निघाली. एवढ्या सगळ्या पंचवीस-तीस दिवसांच्या राज्यसभेच्या अधिवेशनामध्ये मला आतापर्यंत फक्त तीन वेळा बोलायला मिळाले. मी जे बोललो त्या भाषणांच्या सी.डी. पाहून, शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते खुश आहेत. पण, माझ्या मनात वेदना आहे, की राज्यसभा सुरू झाली, की प्रत्येक दिवशी देशामध्ये खळबळ माजवणारा काही ना काही प्रसंग उभा केला जातो. सुरुवातीला, गुन्हेगार मंत्री मंत्रिमंडळात आहेत, त्यांना काढून टाका हा वादाचा मुद्दा निघाला. त्यानंतर शिबू सोरेन फरारी झाले म्हणून वाद झाला. नंतर उमा भारतींचा विषय निघाला; काही नाही तर सावरकरांबद्दल कोणी अवमानास्पद टीका केली म्हणून तो एक विषय निघाला. प्रत्येक दिवशी काही ना काही विषय निघून, त्या विषयावर, विरोधी पक्षांचीच मंडळी नव्हे तर राज्यकर्त्या पक्षाची मंडळीसुद्धा सभागृहामध्ये उठून दंगा करतात आणि संसदेचे कामकाज होऊ देत नाहीत. 'संसद' याचा अर्थ जेथे लोक एकत्र जमतात, एकमेकांशी चर्चा करतात, बोलणी करतात, विचार करतात. संसद हा काही आखाडा नाही, की जेथे दोन्ही बाजूंच्या पहिलवानांची कुस्ती व्हावी! आज प्रत्यक्षामध्ये राज्यसभा आणि लोकसभा म्हणजे जबरदस्त नरड्यांच्या पहिलवानांच्या कुस्त्यांचे आखाडे बनले आहेत. ही माणसे फार ताकदीचीही नाहीत, अगदी किरकोळ आहेत; फक्त जबरदस्त नरड्यांची आहेत. तिथे माझ्यासारख्या, काही वैचारिक मांडणी करणाऱ्या लोकांचा आवाज फार तोकडा पडतो.

संसदेत भरणा झालेली ही मंडळी कोण आहेत? एका बाजूला राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे खासदार म्हणजे ज्यांच्याकरिता आपण गेल्या लोकसभा निवडणुकीत शेतकरी संघटना आणि स्वतंत्र भारत पक्ष यांच्या माध्यमातून प्रचंड काम केले. राष्ट्रीय लोकशाही आघाडीत आता २४ पक्ष राहिले नाहीत, पंधरासोळाच शिल्लक आहेत. पण, या पक्षांचे लोक संसदेत आहेत. दुसऱ्या बाजूला काँग्रेस, त्यांना पाठिंबा देणारे त्यांचे कम्युनिस्ट मित्र – जे नक्षलवाद्यांनाही पाठिंबा देतात – आणि त्यांच्याबरोबरीने लालुप्रसाद यादवांसारखे जातीय आरक्षणाच्या मुद्द्यावर

निवडणुका जिंकणारे. त्यांच्यात शेतकरी संघटनेच्या खुल्या व्यवस्थेच्या विचाराला पाठिंबा देणारे, पंतप्रधान मनमोहन सिंह वगळता, कोणी नाही.

अशा परिस्थितीमध्ये देशामध्ये आजची जी परिस्थिती आहे तिचा अभ्यास करणे अत्यंत आवश्यक आहे.

स्वराज्य मिळाले. म. गांधींना बाजूला टाकून नेहरूंनी समाजवाद आणला आणि लायसन्स-परमिट-कोटा राज तयार केले. कोणाला काहीही करायची परवानगी नाही, पण, ज्याच्याकडे वशिला आहे आणि ज्याच्याकडे, हात ओले करायला, पैसा आहे त्याला कशाचीही बंदी नाही. अशा तऱ्हेच्या व्यवस्थेला समाजवाद नाव दिले. अशी व्यवस्था कार्यक्षमतेने चालू शकत नाही, स्पर्धेच्या वातावरणात ती टिकू शकत नाही, ती पडणार हे निश्चित होते. त्यानुसार हिंदुस्थानातील नेहरुप्रणीत समाजवादी व्यवस्था पडली आणि रशियातील समाजवादाचेही पतन झाले.

नेहरूंनी गांधीवादाऐवजी समाजवाद आणला. तो समाजवाद पडला तेव्हा, पुढे काय यावर विचार करण्याची किंवा चर्चा करण्याची बौद्धिक कुवत देशातील राजकीय नेत्यांमध्ये नव्हती. त्यांना असे वाटायला लागले, की शेतकरी, उद्योजक, व्यापारी स्वत:च्या कष्टाने, स्वत:च्या हिमतीवर प्रगती करण्यास समर्थ नाहीत. लोकांची प्रगती व्हायची असेल, तर ती सरकारी कार्यक्रमातूनच होऊ शकते असा, शेतकरी संघटनेच्या नेमका उलटा, विचार सगळीकडे पसरू लागला. खरोखरीच जर लोकांचीही भावना असेल, की समाजवाद पडला असला, तरी जी काही प्रगती व्हायची ती सरकारी कार्यक्रमांनीच शक्य होईल, तर त्याचा अर्थ हिंदुस्थानला भविष्य नाही असाच होईल.

वर्तमानकाळात आनंद नाही आणि भविष्यात आशा नाही अशा अवस्थेत लोक काय करतात? उदाहरणार्थ, गावचा पाटील घ्या. आता घरामध्ये खायला भाकरी नाही अशी अवस्था; पण गावाततर मान सांगायचा आहे. मग तो 'आमचं खानदान केवढं मोठं, पाटील घराणं केवढं मोठं' असं आपल्या पूर्वजांचे कौतुक सांगत मिशीला तूप लावून मिरवतो.

ज्यांना वर्तमानकाळ नाही आणि भविष्यकाळाबद्दल आशा नाही, ती माणसं नेहमी भूतकाळात रमतात, त्या वेळी आम्ही कसे सुखी होतो, कसे मोठे होतो ते सांगत फिरतात.

त्याचप्रमाणे हिंदुस्थानची ही परिस्थिती झाली आहे. वर्तमानकाळ नाही आणि भविष्यकाळ नाही म्हटल्यावर लोकांना इतिहासाच्या गप्पा आठवू लागल्या.

त्यातही पुन्हा दोन भाग. काही मंडळी इतिहासात आम्ही किती थोर होतो, प्रभुरामचंद्र केवढा मोठा पुरुषोत्तम आमच्यात होता, आमचे छत्रपती शिवाजी महाराज केवढे मोठे अशा तऱ्हेच्या इतिहासातल्या कथा पुन्हा पुन्हा उगाळून आपला आत्मविश्वास आणि अभिमान जागृत असल्याचा आव आणण्याच्या प्रयत्नात राहतात. त्याच्या उलट, आमचा इतिहास किती वाईट, हिंदुस्थानचा इतिहास म्हणजे उच्चवर्णीयांनी खालच्या वर्णाच्या जातींचे केलेले शोषण, त्यांच्यावरील अन्याय यांचे पाढे वाचून, त्यांचा बदला घेणे, अन्यायाचे परिमार्जन करणे असे कार्यक्रम घेणारी दुसरी मंडळी. सोप्या शब्दांत – इतिहासाविषयी गर्व बाळगणारे, रामाविषयी अभिमान बाळगणारे, शिवाजीविषयी अभिमान बाळगणारे आणि त्याच्यातूनच पुढचा कार्यक्रम घेऊ पाहणारे, ज्यांना आपण 'मंदिर'वादी म्हटले, ते एका गटात. त्यात भाजप, शिवसेना आणि तत्सम सर्व मंडळी आली आणि जी मंडळी इतिहासातील केवळ अन्याय सांगून, त्यांची भरपाई करण्याकरिता राखीव जागांचा कार्यक्रम मांडू लागली, ज्यांना आपण 'मंडल'वादी म्हटले, हा दुसरा गट.

सगळ्या हिंदुस्थानामध्ये आज खऱ्या अर्थाने चलती आहे ती, अर्थकारण सांगणाऱ्यांची नाही. जे लोक अर्थकारण सांगतात ते राजकारणात फारसे पुढे येत नाहीत; पण जे लोक जातीचे किंवा धर्माचे नाव सांगतात आणि त्याबरोबर राखीव जागांचे कार्यक्रम मांडतात त्यांची आज राजकारणामध्ये चलती आहे.

महाराष्ट्रापुरते बोलायचे झाले तर काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस हे, आपण म्हणत होतो, की चुकीचा का होईना, आर्थिक कार्यक्रम मांडणारे पक्ष आहेत. इतिहासाच्या आधाराने समाजात द्वेष पसरविणारांपेक्षा, चुकीचा का होईना आर्थिक कार्यक्रम मांडणारे बरे असे आपण पूर्वी म्हटले आहे. आज काँग्रेसची परिस्थिती काय आहे? काँग्रेसला मदत करणारे लालुप्रसाद यादव यांनी तर उघड उघड यादव-मुसलमान अशी एकी करण्याची घोषणा केली आहे आणि अशा प्रकारची एकी करण्याची भाषा करीत, सत्ता हस्तगत करण्याची त्यांची युक्ती पुष्कळशी सफल होते आहे असे दिसते आहे. त्याखेरीज, काँग्रेसच्याबरोबर डाव्या आघाडीचे कम्युनिस्ट लोक आहेत, ज्यांचा नियोजन व्यवस्थेवर विश्वास आहे, लायसन्स-परमिट-कोटा राजवर विश्वास आहे.

अशी सगळी मंडळी एका बाजूला आणि दुसऱ्या बाजूला प्रामुख्याने इतिहासाचा गौरव सांगणारी; परंतु त्याबरोबरच भविष्यकाळसुद्धा चांगला आहे अशी एक आशा देणारी, अटलबिहारी वाजपेयींच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडी

असे आज राज्यसभेतील चित्र आहे.

राष्ट्रीय लोकशाही आघाडीमध्ये स्वतंत्र भारत पक्षाने प्रवेश केला आहे; पण मी राज्यसभेवर निवडून येईपर्यंत या आघाडीच्या एकाही बैठकीचे निमंत्रण मला आले नव्हते; मी दिल्लीत संसद सदस्य म्हणून काम सुरू केल्यानंतरही निमंत्रण येईना. शेवटी, पंतप्रधानांनी रालोआच्या लालकृष्ण अडवाणी आदी नेत्यांना ते भेटायला गेले असता चांगली वर्तणूक दिली नाही, या कारणास्तव लोकसभेवर बहिष्कार टाकण्याच्या निर्णयात मी सामील झालो नाही, एवढेच नव्हे तर काँग्रेसने त्या वेळी प्रश्नाचा तास बंद करून, अंदाजपत्रकाविषयी चर्चा करावी असा आग्रह धरला, त्याला विरोध करणारी भाषणे पॉली नरीमन, अलेक्झांडर, मी अशा काही चारपाच जणांनी केली. ते भाषण केल्याबरोबर राष्ट्रीय लोकशाही आघाडीला जाग आली आणि दुसऱ्या दिवशी जी बैठक झाली त्या बैठकीचे मला निमंत्रण आले आणि त्या बैठकीमध्ये स्वत: लालकृष्ण अडवाणी आणि इतर मंडळींनी मला निमंत्रण न दिल्याबद्दल दिलगिरी व्यक्त केली आणि यापुढे नियमित निमंत्रण येत राहील असे आश्वासन दिले. त्यामुळे, रालोआच्या चर्चेमध्ये आपला प्रवेश झाला आहे. त्या दिवशी मीही रालोआला आश्वासन दिले आहे, की स्वतंत्र भारत पक्ष या आघाडीबरोबरच राहून, आपल्या उद्दिष्टांनुसार इतरांमध्ये वैचारिक परिवर्तन घडवून, आपले राजकारण करणार आहे. लोकसभा निवडणुकांच्या वेळी आपण जो काही करार केला आहे, त्यामध्ये काहीही बदल करावयाचा प्रस्ताव या कार्यकारिणीसमोर नाही.

याउलट, दिल्लीला असताना वर्तमानपत्रात अनेक उलटसुलट बातम्या येत होत्या. महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीसाठी शेतकरी संघटनेच्या स्वतंत्र भारत पक्षाला सात जागा सोडल्या असे कोणी म्हणत, कोणी म्हणत आठ जागा सोडल्या आहेत. मध्ये एका वेळी निवडणूक जाहीरनामा तयार करण्याकरिता महाराष्ट्रातील युतीच्या म्हणजे शिवसेना आणि भारतीय जनता पक्ष यांच्या बैठका झाल्या, श्री. बाळासाहेब ठाकरे यांना जाहीरनामा समितीचे अध्यक्ष नेमण्यात आले. या बैठकांचे साधे निमंत्रणसुद्धा रालोआचा सदस्य असलेल्या स्वतंत्र भारत पक्षाला किंवा शेतकरी संघटनेला आले नाही. महाराष्ट्रातील युती ही केवळ शिवसेना आणि भाजपचीच आहे, नंतर स्वतंत्र भारत पक्षाची त्यात काय भूमिका आहे त्याचा विचार करूया, असे म्हणत त्याची तारीख अजून काही पक्की ठरली नाही. निवडणुकीची अधिसूचना १३ सप्टेंबरला होणार आहे आणि आजही स्वतंत्र भारत पक्ष रालोआमध्ये असला, तरी महाराष्ट्रातील युतीमध्ये

असल्याची घोषणा औपचारिकरीत्या आणि अधिकृतपणे झालेली नाही.

अशा परिस्थितीमध्ये येत्या विधानसभा निवडणुकीतील भूमिकेसंदर्भात निर्णय घेणे, ही अत्यंत कठीण गोष्ट आहे. माझ्या मनात काही एक निर्णय झाला आहे असे काही नाही. आजपर्यंतच्या शेतकरी संघटनेच्या कार्यकारिणीमध्ये ज्या प्रकारे चर्चा, विचार विनिमय झाले आणि त्यावर आपले निर्णय ठरले, तसेच आजही होणार आहे.

शेतकरी संघटना आणि स्वतंत्र भारत पक्ष यांची राजकीय भूमिका ठरविण्यासाठी आपण आज काही प्रथमच एकत्र जमलो आहोत असे नाही. गेल्या डिसेंबरमध्ये 'विदर्भ राज्य मुक्ती पदयात्रे'च्या समारोप समारंभानंतर नागपूर येथे विस्तारित कार्यकारिणीची बैठक झाली. या बैठकीत सांगोपांग चर्चा झाल्यानंतर निर्णय घेण्यासाठी आपण ॲड. वामनराव चटप, श्री. लक्ष्मण वडले, डॉ. सौ. शोभा वाघमारे, श्री. रघुनाथदादा पाटील आणि सौ. सरोज काशीकर यांची 'राजकीय निर्णय समिती' स्थापन केली. २००४ च्या लोकसभा निवडणुकीच्या वेळी या समितीच्या निर्णयानुसार स्वतंत्र भारत पक्षाने राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे सदस्यत्व स्वीकारले. या निवडणुकीनंतर परभणी जिल्ह्यातील सेलू येथे २ मे २००४ रोजी कार्यकारिणीची बैठक झाली. त्यात लोकसभा निवडणुकीतील प्रचार सहभागाच्या यशापयशाचा आढावा घेऊन स्वतंत्र भारत पक्षाची बांधणी विधानसभा निवडणुकीच्या दृष्टीने अधिक मजबूत करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्याचबरोबर महाराष्ट्रातील शिवसेना–भाजप युतीच्या नेत्यांशी संपर्क करून, त्यांना स्वभापच्या महाराष्ट्रातील बलशाली जागांची माहिती देण्याची जबाबदारी राजकीय निर्णय समितीवर सोपविण्यात आली. आता निवडणुका जाहीर झाल्या आहेत, त्यामुळे ~~आपली भूमिका पक्की करणे आवश्यक~~ झाले आहे.

वर्धा कार्यकारिणी : समारोप

शेतकरी संघटनेच्या इतिहासामध्ये कोणत्याही कार्यकारिणीच्या बैठकीमध्ये झालेली चर्चा आजच्याइतकी टोकाची आणि रंगलेली नव्हती आणि इतका कठीण निर्णय करण्याची वेळ माझ्यावर कधी आली नव्हती. सर्वप्रथम तुम्हा सर्वांचे आणि माझेही मी अभिनंदन करतो, की २००४ मध्ये, ज्याचे लाखालाखांनी शेतकरी पाईक आहेत अशा संघटनेची आणि त्याच्या राजकीय पक्षाची एवढ्या नाजूक प्रश्नावर निर्णय करण्याकरिता बैठक होते आणि त्या बैठकीमध्ये अत्यंत खुलेपणाने, पहिल्यांदा जे क्षुब्ध जिल्हाप्रमुख होते ते बोलले, त्यानंतर मंचावरील उच्चाधिकार समितीतील पदाधिकारी बोलले, त्यानंतर आम्हाला संधी मिळाली

नाही अशी तक्रार करणारे काही कार्यकर्ते बोलले. अजूनही काही कार्यकर्त्यांची बोलण्याची इच्छा बाकी आहे; पण वेळेअभावी आता या भाषणांना आवर घालावा लागत आहे.

प्रत्येक बैठकीत शेवटी मला उठावं लागतं, त्याप्रमाणे आताही उठलो आहे. बैठकीच्या विषयावर निर्णय घेणे कठीण का आहे, ते प्रथम सांगतो. इकडे आड आणि तिकडे विहीर अशी परिस्थिती समोर आहे. पूर्वीच्याच पद्धतीने जर मला निर्णय घ्यायचा असता, तर मी असे म्हटले असते, की दुसऱ्या कोणत्यातरी पक्षाचा बडेजाव स्वीकारण्यापेक्षा आपण आपल्या पायावर चालण्याचा निर्णय घ्यावा. आपल्या पायावर चालताना, जो काही जयपराजय असेल, तो आपला स्वत:चा असेल, दुसऱ्याचा पट्टा आपल्या गळ्यात अडकवून घेऊ नये; पण आता २० वर्षांपूर्वीचा बेदरकारपणा दाखवता येत नाही. गेली दोनतीन वर्षे या राजकीय प्रक्रियेमध्ये वामनराव आणि इतर कार्यकर्त्यांशी मी रस्सीखेच खेळतो आहे. शेतकरी संघटनेने आंदोलने करीत राहावे; निवडणुका, राजकीय सत्ता यांमध्ये फारसे जाऊ नये; राजकीय सत्ता ज्याच्याकडे येते तो खुर्चीवर बसला, की शेतकऱ्याकडे पाहत नाही आणि जर का आपण निवडणुकीच्या राजकारणात गेलो, तर निवडणुका आल्या, ढोल वाजू लागले, की सगळ्यांची डोकी फिरतील आणि जो तो अहमहमिकेने आपापली बाजू मांडू लागतो; त्यामुळे शेतकरी संघटनेची आंदोलन करण्याची ताकद कमी होईल अशी माझी भीती होती. आणि वामनराव व त्यांचे सहकारी यांचे म्हणणे होते, की असे काही घडणार नाही; आपल्याला जर काही पदांच्या जागा मिळाल्या, पाचसहा आमदार झाले तर त्यांच्या ताकदीमुळे विधानसभेमध्ये आपण शेतकऱ्यांची बाजू चांगली मांडू शकू, एवढेच नव्हे तर त्यांच्या आधारावर आपली आंदोलन करण्याची शक्तीसुद्धा वाढेल. त्यामुळे, सटाण्याला झालेल्या शेतकरी संघटनेच्या पहिल्या अधिवेशनाच्या ठरावाप्रमाणे राजकीय निवडणुका लढवायच्या आहेत, त्या पदे मिळविण्याकरिता नाहीत, तर शेतकरी संघटनेचे आंदोलन प्रभावी करण्याकरिता हत्यार म्हणून लढवायच्या आहेत. वामनरावांनी सांगितले, की आपण हा एक प्रयोग करू; लोकांना निवडणुका लढवायला हळूहळू तयार करू.

मागे वळून थोडे आत्मपरीक्षण करायला हरकत नसावी.

गेल्या २५ वर्षांमध्ये माझा सगळ्यांत मोठा पराभव जर कोणी केला असेल तर तो शेतकरी समाजाने केला आहे. लाखालाखांनी शेतकरी माझ्या सभेला जमतात; माझ्या शब्दाखातर हजारोंनी शेतकरी तुरुंगात गेले; पण, लोक माझे

म्हणणे ऐकतात, समजावून घेतात, या भावनेपोटी तुमच्यासारख्याच उमेदीने जेव्हा मी शेतकऱ्यांच्या प्रेमाचे मतांमध्ये परिवर्तन करण्याचा प्रयत्न केला, तेव्हा प्रत्येक वेळी मला हार पत्करावी लागली. सत्य परिस्थिती समोर असलीच पाहिजे. हिंगणघाट मतदारसंघातून 'जगप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ, शेतकऱ्यांचे मान्यवर नेते शरद जोशी' यांना हरवणारा होता आपल्या स्वत:च्याच कार्यकर्त्याच्या बायकोला पळवून नेऊन विकणारा गुंड! काय केले त्या वेळी शेतकऱ्यांनी?

आठ वर्षांपूर्वी नांदेड मतदारसंघातून मी लोकसभेसाठी उभा राहिलो. कोणाही कार्यकर्त्याने कसूर केली नाही, जास्तीत जास्त प्रयत्न केले. मला माझी अनामत रक्कमही वाचवता आली नाही. त्या वेळी शेतकऱ्यांनी जर मला लोकसभेत पाठवले असते, तर आज हिंदुस्थानचा इतिहास वेगळा असता.

शेतकऱ्यांच्या संख्येच्या ताकदीचे मतांमध्ये परिवर्तन करायला आपल्याला जमले नाही. शेतकऱ्यांचे प्रश्न असले, दु:ख असले, की शरद जोशी म्हणजे तारणहार; पण निवडणूक आली म्हणजे 'शरद' नाव चालते; पण 'जोशी' आपल्या जातीचा नाही याचा प्रभाव परिणामकारक ठरतो. शेतकरी समाजाच्या मानसिकतेचे हे निदान मी काही पहिल्यांदाच करीत नाही. मार्क्सने म्हटले आहे, की शेतकऱ्यांची संघटना ही बटाट्याच्या पोत्यासारखी आहे, एका पोत्यात कितीही बटाटे घातले; तरी ते कधी एकजीव होत नाहीत, पोतं म्हणून ते कधी लढत नाही, बटाटे म्हणून वेगळे वेगळेच राहतात. त्यामुळेच प्रत्येक निवडणुकीत आपण मार खाल्ला. एका निवडणुकीत आपण असे म्हटले, की या निवडणुकीत एकच उमेदवार आहे तो म्हणजे कर्जमुक्ती. तेव्हाही कर्जमुक्ती या उमेदवाराला मते मिळाली नाहीत.

हा सगळा अनुभव लक्षात घेतला, तर गेल्या २५ वर्षांत जी काही शेतकरी संघटना उभी राहिली, ती भुईसपाट होण्याचा धोका निर्माण करणारा निर्णय मी या वयात घेऊ शकत नाही. राणा प्रताप आपल्या चेतक घोड्यावरून भरधाव वेगाने दरीवरून उडी मारताना आपली घोडी इतकी लांब उडी मारू शकेल याची खात्री असेल, तरच तसे करीत असे. या वेळी तशी उडी मारण्याचा निर्णय घ्यायच्या वेळी माझ्या आजपर्यंतच्या अनुभवावरून तुमची घोडी ही दरी उडी मारून पार करेल असा काही मला विश्वास वाटत नाही.

तीन वर्षांपूर्वी वामनराव आणि मी अशी चर्चा झाली, तेव्हा मी म्हटले, की तुम्हाला वाटते ना, की राजकारणात पुढे जायला पाहिजे; तर मग आपण परीक्षा पाहूया. ज्या ज्या मतदारसंघामध्ये स्वतंत्र भारत पक्षाचे दहा हजार सदस्य

होतील, त्या मतदारसंघामध्ये जाऊन, मी स्वत: त्यांचे कौतुक करीन. लक्ष्मीमुक्ती केली, तर तुमच्या गावात येईन म्हटले तर दोन हजार गावांमध्ये लक्ष्मीमुक्ती झाली; पण, दहा हजार सदस्य नोंदवा म्हटले तर फक्त तीन मतदारसंघांत ते उद्दिष्ट पूर्ण झाले.

मला प्रामाणिकपणे असे म्हणायचे आहे, की कोणाला फुटून जायचे असेल तर फुटून जाऊ द्या; पण एकदा का एक निर्णय चर्चाविनिमयानंतर झाला, की तो सगळ्यांनी अमलात आणला पाहिजे. दर निवडणुकीच्या वेळी आपण जो निर्णय घेतला, त्याबद्दल शिव्या देणारे कोणी ना कोणी तरी निघालेच. मागच्या लोकसभा निवडणुकीच्या वेळी घ्यावयाच्या भूमिकेसंबंधी नागपूरला जी बैठक झाली, तीत, काही झाले तरी काँग्रेसबरोबर युती होत कामा नये असे ठासून सांगणारांपैकी एक जण शिव्या देणारा निघालाच. का तर म्हणे राष्ट्रीय लोकशाही आघाडीत सामील झालेच कसे? निवडणुका आल्या म्हणजे काय होईल ते होवो, लढवून तर पाहू असे म्हणायला निवडणूक म्हणजे काही लॉटरी नाही.

या निवडणुकीत आपण युतीपासून वेगळे झालो, तर काय होईल सांगता येत नाही. बहुतेक काँग्रेस निवडून येईल किंवा कदाचित्, काँग्रेस नाही, युतीही नाही, तिसरीच एखादी फळी निवडून येण्याची शक्यता आहे आणि अशाही परिस्थितीचा फायदा घेण्याकरिता स्वबळावर निदान १५ आमदार निवडून आणण्याची आपली ताकद आहे काय? पन्नास काय शंभर उमेदवार उभे केले; तरी हे जमेल असे वाटत नाही; विश्वनाथ प्रताप सिंहांची मदत असताना आपल्याला हे जमले नाही.

मग, कोणत्या आधाराने आपण वीरश्रीच्या गर्जना करतो आहोत? आपले उमेदवार जिंकून आणू असे म्हणणाऱ्यांचा मी काही राग करीत नाही, मी फक्त एवढेच म्हणतो, की आमचा पहिलवान अजून जरा कच्चा आहे; एवढी मोठी कुस्ती त्याला झेपायची नाही. स्वतंत्र भारत पक्षाचे शंभरावर आमदार निवडून यावेत, असे मलाही वाटते; पण ते या निवडणुकीत जमणार नाही, कदाचित् पुढच्या, पाच वर्षांनंतरच्या निवडणुकीत आपण ते करून दाखवू शकू; पण त्यासाठी डोंगर चढताना जसे एकएक पाऊल अभ्यासपूर्वक टाकायचे असते तसे टप्प्याटप्प्याने पुढे जायला हवे. तेव्हा आता पहिले पाऊल कोणते उचलायचे यासंबंधी आपल्याला इथे निर्णय करायचा आहे.

काँग्रेस निवडून आली, तर काय करायचे? सरळ आहे – आपण जे करीत आलो तेच करायचे; पुन्हा आंदोलने. तेव्हा युतीपासून आपण वेगळे झालो

आणि त्यामुळे काँग्रेस सत्तेवर आली, तर फारशी चिंता करण्याची गरज नाही.

युतीचा निर्णय झाल्यानंतर राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या समर्थनासाठी मी जी भाषणे केली, ती अत्यंत तर्कशुद्ध होती. भाजपातील नेतेसुद्धा म्हणाले, की तुम्ही अटलजींच्या नेतृत्वाबद्दल जी मांडणी केली, तितकी तर्कशुद्ध मांडणी आमच्यातील लोकांनाही करणे जमले नाही.

महाराष्ट्रातील शिवसेना-भाजप युतीबरोबरच राहण्याच्या पर्यायावर बोलायचे म्हणजे माझ्यापुढे गंभीर प्रश्न पडला आहे. युतीच्या नेत्यांनी बोलणी करण्यात दिरंगाई केल्याबद्दल आजच्या बैठकीत तुम्ही कार्यकर्त्यांनी आपल्या ज्या भावना व्यक्त केल्या, त्यांवरून या मुद्द्याचे गांभीर्य अधिक खोल झाले आहे; पण या लोकांबरोबर संपर्क टिकवून ठेवण्यात आपल्या राजकीय निर्णय समितीचे निमंत्रक म्हणून वामनरावांनी जे हलाहल पचवले, ते मलासुद्धा पचवणे भाग आहे. जर त्यांच्याशी पटत नसेल तर त्यांना दुरुस्त करण्याचा आपला कार्यक्रम चालू झालेला आहे. लोकसभा निवडणुकीच्या प्रचाराच्या काळातसुद्धा युतीतील पक्षांच्या कार्यकर्त्यांच्या कानात शरद जोशींचे, शेतकरी संघटनेचे विचार गेले आहेत. या कर्जमुक्तीबद्दल ते हयगय करू लागले, तर त्यांच्यात सुधारणा घडवून आणण्यात, आपला एकही आमदार नसताना, निवडणूक लढविण्याची आपली तयारी अगदी कमकुवत असताना आपल्याला फारसे यश मिळवता येईल अशी शक्यता नाही. तेव्हा विधानसभेमध्ये आपले निदान पाचदहा सदस्य गेले, तर त्यांच्यामध्ये आपण मतपरिवर्तन घडवून आणण्याची शक्यता वाढेल.

चर्चांच्या या प्रक्रियेत सोसलेली सगळी दु:खे काही वामनरावांनी आपल्यासमोर उघड केली नाहीत. एकदा युतीच्या नेत्यांनी दिलेल्या निरोपाप्रमाणे वामनराव आपल्या समितीसदस्यांसह मुंबईला जाऊन थांबले. ज्यांच्याशी बोलणी करायची ते आधीच कोल्हापूरला निघून गेले होते, तिथे करवीरच्या त्यांच्या उमेदवाराची घोषणा करून आले. मग, मी वामनरावांना सांगितले, की तुम्ही ताबडतोब मुंबई सोडा, आपली माणसे कोणासाठीतरी ताटकळत राहिलेली आपण सहन करू शकत नाही. ते मुंबई सोडून आंबेठाणला येऊन थांबले. या सगळ्या प्रक्रियेत लक्षात आले, की गेले काही दिवस शिवसेना बोलण्याची चालढकल करीत आहे आणि ही बोलणी न होण्याची शक्यताही आहे. तेव्हा युती ठेवायची का मोडायची, हा विचार करण्यापूर्वी युती टिकून राहण्याची शक्यता आहे का ते पाहायला हवे. अजून त्यांचे निमंत्रण आपल्याला आलेले नाही. वर्तमानपत्रांवरून कळते, की ते आपल्याबद्दलचा निर्णय १७ सप्टेंबरला करू म्हणतात. म्हणजे

त्यांचे सगळे हिशेब पुरे झाल्यावर ते आपल्याला बोलावणार.

वाटाघाटी होणार किंवा नाही हे अजून अनिश्चित आहे. जागा आठ मागायच्या, का दहा, का बारा; जागा कोणत्या मागायच्या ? हे काम आपले राजकीय तज्ज्ञ वामनराव उत्तम प्रकारे करतील याबद्दल मला विश्वास आहे. शेतकऱ्यांची आंदोलनाची ताकद किती आहे, हे लक्षात घेऊन आपण आंदोलन चालू ठेवतो किंवा थांबवतो त्याप्रमाणे आपली राजकीय ताकद किती, कुठे, कशी आहे हे लक्षात घेऊन, वामनराव या जागा निश्चित करतील, याबद्दलही मला विश्वास वाटतो; पण चर्चेमध्ये जर असे दिसले, की ही मैत्री काही फारशी सुखकर होण्याची शक्यता नाही, सन्मानपूर्वक होण्याची शक्यता नाही, तर आपल्याला जास्तीत जास्त जागा स्वबळावर लढण्याची तयारी ठेवावी लागेल.

बैठकीच्या शेवटी आपला निष्कर्ष असा निघतो :

स्वतंत्र भारत पक्षाने लोकसभा निवडणुकीच्या वेळी राष्ट्रीय लोकशाही आघाडीत सामील होण्याचा घेतलेला निर्णय या घडीला उलटविण्याची आवश्यकता नाही. युती टिकविण्याची आमची इच्छा आहे. त्यासंबंधी जी बोलणी चालू आहेत आणि चालणार आहेत, त्याचे संपूर्ण अधिकार आताच्याच राजकीय निर्णय समितीला देण्यात यावे आणि जर का सन्मानपूर्वक बोलणी होणार नसतील, तर आपण स्वतंत्रपणे निवडणुका लढण्याची तयारी ठेवावी. बोलणी करण्याचे काम असो का वेगळ्या पद्धतीने स्वतंत्रपणे निवडणुका लढण्याचे काम असो, या दोन्ही कामांची संपूर्ण जबाबदारी मी ॲड. वामनराव चटपांवर सोपवीत आहे. त्यांनी त्यांना आवश्यकता वाटल्यास राजकीय निर्णय समितीच्या इतर सदस्यांचा सल्ला घ्यावा. १५ सप्टेंबरपासून उमेदवारी अर्ज भरायची सुरुवात होणार आहे, हे लक्षात घेता युतीबरोबरच्या बोलण्यांसाठी साधारणपणे १३ सप्टेंबर हा दिवस अखेरचा धरावा. इंग्रजीत एक म्हण आहे की, 'परमेश्वरावर विश्वास जरूर असू दे; पण बंदुकीतली दारूही भिजू देऊ नकोस,' त्याप्रमाणे आपण ज्या काही पन्नासेक मतदारसंघांत निवडणुका लढवू शकू, तेथील तयारीला अंतिम स्वरूप देण्याच्या कामाला लागावे.

(१३ सप्टेंबर २००४)

◆◆

होतकरू नव्हे, खचलेल्या मनांचा कौल

(म. रा. विधानसभा २००४ निकाल)

महाराष्ट्र विधानसभा २००४ च्या निवडणुकांचे निकाल जाहीर झालेले आहेत. या निकालांचा नेमका अर्थ काय काढायचा, ते ठरवण्यासाठी सखोल विश्लेषण आणि व्यापक चर्चा यांची गरज आहे; ते यथावकाश होईल. निकाल जाहीर होत असताना माझ्या स्वत:च्या मनात ज्या प्रतिक्रिया प्रामुख्याने उमटल्या तेवढ्याच फक्त ताबडतोब नोंदवत आहे.

या निवडणुकीच्या प्रचारात मी स्वतंत्र भारत पक्षाच्या सातही उमेदवारांसाठी दहा सभा घेतल्या. त्याखेरीज, भाजपच्या उमेदवारांसाठी एक आणि शिवसेनेच्या उमेदवारांसाठी दोन सभा घेतल्या. या सर्व सभांमध्ये मी, प्रामुख्याने तीन मुद्दे मांडले, ते असे :

१) मतदानाच्या हक्काचा वापर गांभीर्याने आणि सद्‌सद्‌विवेकबुद्धीला स्मरून झाला पाहिजे. घटनेतील तरतुदींप्रमाणे लहानथोर, अमीरगरीब सर्वांना सारखाच म्हणजे एकाच मताचा अधिकार आहे आणि तो गुप्तपणे बजावू शकण्याचीही खात्री आहे.

२) लोकसभा २००४ च्या निवडणुकीत, हिंदुत्व आणि स्वदेशीवाद कह्यात ठेवून, खुल्या व्यवस्थेचा धीरगतीने पाठपुरावा करणाऱ्या अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडीचा पराभव झाला. त्या जागी

- घराणेशाही शिरोधार्य मानणारी, देशावर समाजवाद लादणारी आणि ५० वर्षे सतत शेतकरीविरोधी धोरणे राबविणारी काँग्रेस आणि-
- खुल्या व्यवस्थेला विरोध करणारी, नक्सलवाद्यांच्या घातपाती कृत्यांना पाठीशी घालणारी आणि नोकरदारांच्या हिताच्या कार्यक्रमांचा पुरस्कार करणारी डावी आघाडी, तसेच,
- भ्रष्टाचार, गुंडगिरी आणि यादव-मुस्लिम जातीयवादाच्या आधारावर

राजकारण खेळणारी लालूप्रसाद, पास्वान इत्यादींची टोळी यांचे संपुआ (संयुक्त पुरोगामी आघाडी) सरकार स्थापन झाले. संपुआच्या चारपाच महिन्यांच्या कारकिर्दीत सरकार संपूर्णपणे ठप्प झाले आहे. संसदेत काहीच काम होत नाही. आर्थिक सुधारांच्या सर्वच कार्यक्रमांत डाव्यांनी खोडा घातला आहे. तेवढ्याही काळात हज यात्रेकरूंना विशेष सवलती, मुसलमानांना राखीव जागा अशा तऱ्हेने अनुनयाचे कार्यक्रम राबवून, भगवीकरणाला विरोध करण्याच्या नावाखाली अल्पसंख्याकांच्या तुष्टीकरणाचे कार्यक्रम बेबंद चालू आहेत. हिंदुत्वाचा उद्‌घोष करणाऱ्यांना राष्ट्रीय लोकशाही आघाडीने गेल्या पाच वर्षांत आटोक्यात ठेवले होते, तर संपुआने अतिरेकी हिंदुद्वेषाचे वातावरण विनाकारण तयार केले. त्यामुळे, देशात रालोआ सरकारच्या कारकिर्दीत तयार झालेली आत्मसन्मानाची आणि आत्मविश्वासाची भावना झपाट्याने खचत आहे. संपुआचे सरकार संपवणे ही देशाची गरज आहे. त्यासाठी महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत काँग्रेसचा पराभव करणे आवश्यक आहे.

३) १९८४ सालापासून शेतकरी संघटनेने शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीचा पुरस्कार केला आहे. शेतीवरील कर्जे बेकायदेशीर आहेत आणि अनैतिकही आहेत; शेतकऱ्यांच्या देण्याघेण्याचा लेखाजोखा मांडला तर शेतकरी ना कर्ज, ना कर, ना विजेचे बिल देणे लागतो. शेतकरी संघटनेने चालवलेल्या आंदोलनामुळे शेतकऱ्यांना काही आधार मिळाला, अन्यथा शेतकऱ्यांच्या आत्महत्यांची संख्या महाराष्ट्रातच हजारोच्या वर गेली असती. महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीत युतीच्या पक्षांनी शेतकऱ्यांची कर्जमुक्ती आणि विनामूल्य वीज यांचे स्पष्ट आश्वासन दिले आहे. त्यामुळे १९८४ नंतर प्रथमच कर्जमुक्ती हा निवडणुकीतील प्रमुख मुद्दा झाला आहे. हजारो वर्षांच्या कर्जबाजारीपणानंतर शेतकऱ्यांना कर्जमुक्त होण्याची संधी मिळाली आहे. कर्जमुक्ती हा एकच उमेदवार समजून, सर्वांनी कर्जमुक्तीस विजयी करावे आणि सर्वपित्री अमावास्येच्या दिवशी आपल्या पितरांना कर्जमुक्तीचे तर्पण करून, शांती मिळवून द्यावी.

या निवडणुकीच्या निकालावरून हे स्पष्ट आहे, की शेतकऱ्यांनी कर्जमुक्तीला जसा भरघोस पाठिंबा द्यायला पाहिजे होता तसा दिलेला नाही. वीजबिल न देण्याचे आंदोलन वर्षानुवर्षे चालल्यानंतर वीज मोफत देण्याची काही आवश्यकता नाही, असे खुलेआम सांगणाऱ्या आणि उसाची वैधानिक किमान किंमत देता येणे शक्य नाही असे उघडपणे सांगणाऱ्या शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला सर्वांत अधिक जागा मिळाल्या आहेत. महाराष्ट्राचा नवा मुख्यमंत्री त्यांच्याच

पक्षाचा असण्याची शक्यता दिसते.

पाचशेवर शेतकऱ्यांनी महाराष्ट्रात आत्महत्या केल्या. या आत्महत्यांचे सर्वांत निर्णायक आणि प्रबळ कारण कर्जबाजारीपण आहे. विशेषत:, सहकारी बँकांच्या वसुली अधिकाऱ्यांनी कर्जवसुलीकरिता वापरलेले कडक धोरण आणि त्यामुळे शेतकऱ्यांच्या प्रतिष्ठेला आणि आत्मसन्मानाला लागणारा धक्का हे आत्महत्यांचे खरे कारण आहे; याबद्दल काहीही वाद नाही आणि तरीही, कर्जबाजारीपणा संपवण्याच्या कार्यक्रमाला शेतकऱ्यांनी मतदान केले नाही.

मतदारांच्या या कौलाचा काय अर्थ आहे?

१) शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या घोषणेवर शेतकऱ्यांचा विश्वास बसला नाही. यापूर्वीही शिवसेनेने वचननाम्यात कर्जमुक्तीचे आश्वासन दिले होते, लोकांनी युतीला निवडूनही दिले होते. पण, युतीच्या सरकारने कर्जमुक्ती तर केली नाहीच उलट, जीवनावश्यक वस्तूंच्या किमती स्थिर करण्याच्या नावाखाली महत्त्वाच्या पाच शेतीमालांचे भाव पाडण्याचे धोरण अवलंबले. २४ लाख नोकऱ्या, ४० लाख घरे अशा निवडणुकीतील घोषणाही प्रत्यक्ष कारकिर्दीत वावदूक ठरल्या. शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी २००४ पूर्वी असल्या आश्वासनांची रेवडी उडवली होती. २००४ सालच्या या घोषणेत काही अधिक अर्थ आहे असे शेतकऱ्यांना वाटले नसावे. औरंगाबादला बाळासाहेब ठाकरे यांनी शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीची घोषणा करताना शेतकरी संघटनेचा उल्लेख केला, पण शब्द मात्र 'कर्जमाफी' असा वापरला. 'कर्जमुक्ती' या विषयावर शेतकरी संघटनेने उदंड साहित्य प्रकाशित केले आहे. त्यासंबंधी शिवसेनेतील नेत्यांना काही जाण दिसली नाही. एकूण निवडणुकीच्या जागावाटपात २८८ जागांपैकी शेतकरी संघटनेच्या वाट्याला केवळ सात जागा आल्या. एवढ्याशा ताकदीने स्वतंत्र भारत पक्षाचे आमदार युतीला कर्जमुक्ती करण्यास भाग पाडू शकणार नाहीत असेही शेतकऱ्यांना वाटले नसावे. त्या मानाने फुकट वीज आणि व्याजमाफी हा आघाडीचा कार्यक्रम त्यांना अधिक प्रामाणिक म्हणून भावला असावा.

२) वर्षानुवर्षे अन्याय आणि विषमता सोसत राहणाऱ्या समाजाची अस्मिता मरून जाते; आपण कधी काळी इतर समाजांप्रमाणे सन्मानाने आणि सुखाने जगू शकू ही भावना नष्ट होते. शेकडो वर्षांच्या गरिबीच्या आणि कर्जबाजारीपणाच्या जिंदगानीतून आपण मोकळे होऊ हे त्यांना स्वप्नवत् वाटते. त्यापेक्षा, वर्तमानात समोर उभ्या ठाकलेल्या मालकापुढेच नतमस्तक व्हावे आणि आजचा दिवस

भागवून घ्यावा अशी या समाजातील लोकांची प्रवृत्ती होते. त्यातून जुलमी मालक जर मधूनमधून मेहेरबानीचे काही तुकडे टाकणारा असला तर त्या तुकड्यातच धन्यता मानण्याचीही एक मानसिकता तयार होते.

३) शेतकरी समाजातही प्रत्यक्ष आत्महत्येच्या दरीवर जगणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण तसे लहान आहे. ही शोकांतिका शेजारी घडली, त्याचे आपल्याला काय अशी उदासीनता, फ्लॅटसंस्कृतीप्रमाणे, ग्रामीण समाजातही असते. आत्महत्या झाली म्हणजे आक्रोश मोठा होतो; पण त्यात परस्पर सरकारकडून काही मिळवण्याचा हेतू जास्त असतो. शोकग्रस्त कुटुंबातील इतर काही पार्श्वभूमीतील घटक गावात माहीत असले, तर त्यामुळेच आत्महत्या झाली, 'आपल्यासारख्यांच्या घरात असे होणार नाही,' अशीही एक भावना अनेकांच्या मनात घर करते.

महाराष्ट्राच्या विधानसभेच्या या निवडणुकांत शेतकऱ्यांनी दिलेला कौल हा सन्मानाने आणि सुखाने जगू पाहणाऱ्या शेतकऱ्यांचा नाही; तो कौल मनाने खचलेल्या आणि मेलेल्या बहुसंख्य शेतकऱ्यांचा आहे.

४) शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी भगव्या, हिरव्या, निळ्या, पिवळ्या – सर्व प्रकारच्या जातीयवादी गिधाडांचा सातत्याने आणि प्रखरपणे विरोध केला आहे. महाराष्ट्रातील युतीत शेतकरी संघटनेने सहभाग स्वीकारला तो वाजपेयी यांच्या प्रतिमेमुळे. पण, २००४ पूर्वीच्या प्रखर जातीयवादविरोधी कडकडाटापुढे हे नवे समर्थन लोकांच्या पचनी पडले नसावे. ''शुद्ध जातीयवादविरोधाची भूमिका बरोबर; पण असा शुद्ध कोणताच पक्ष किंवा व्यक्ती राहिलेली नाही. निवड फक्त बहुसंख्यांचा मवाळ जातीयवाद आटोक्यात ठेवणारी आघाडी आणि अल्पसंख्याकांना खुलेआम गोंजारणारी आघाडी यातील व्यावहारिक निवड आहे.'' हा मुद्दा स्वतंत्र भारत पक्षाचे व शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते लोकांपर्यंत नीट पोहोचवू शकले नाहीत. या विषयावर कार्यकर्त्यांचे प्रशिक्षणही अपुरे पडले. साहजिकच, एका समुदायाचा जातीयवाद गर्वाने मांडणाऱ्या मंडळींकडून कर्जमुक्तीची घोषणा झाली, तर त्यासंबंधी जबरदस्त शंका लोकांच्या मनात राहून गेली असणार.

५) प्रमोद महाजन आणि तत्सम नेत्यांनी 'दसऱ्याला शपथविधी तर दिवाळीला कर्जमुक्ती' असा 'चट मंगनी, पट ब्याह' कर्जमुक्तीचा आराखडा मांडल्यामुळे शेतकऱ्यांच्या मनातील ती शंका दृढ झाली. कर्जमुक्तीचा व्यावहारिक कार्यक्रम कसा आखावा लागेल याचा तपशील स्वतंत्र भारत पक्षाच्या जाहीरनाम्यात विस्ताराने दिलेला आहे. युतीचे शासन आले, तरी कर्जमुक्तीसाठी आंदोलन

करावेच लागेल अशी भावना सर्वदूर युतीच्या कार्यकर्त्यांतही होती. मग, शेतकऱ्यांचे व्यापक आंदोलन उभे करायचे असेल, तर ते काँग्रेस शासनाच्या काळात त्यांच्या विरुद्धच केलेले बरे अशी, अगदी प्रामाणिक कार्यकर्त्यांचीही, भावना झाली असणार.

येत्या काही दिवसांत काँग्रेस आघाडीचे शासन मुंबईत सत्तारूढ होईल. त्यानंतर लवकरच, निवडणुकीच्या निकालांची अधिक व्यापक पाहणी करून निष्कर्ष काढावे लागतील आणि कर्जमुक्तीसाठी आंदोलन उभे करावे लागेल. त्याची घोषणा होण्यापूर्वी कर्जमुक्ती ही शेतकऱ्यांची गरज आहे का शेतकरी कार्यकर्त्यांची गरज आहे, याचा स्पष्ट निर्णय होणे आवश्यक आहे.

(२१ ऑक्टोबर २००४)

◆◆

राजकीय भूमिकेचे चक्रव्यूह

मी हे जे निवेदन करतो आहे, ते स्वतंत्र भारत पक्षाचा राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून नव्हे किंवा शेतकरी संघटनेचा संस्थापक म्हणून नव्हे तर इतर सर्व पाइकांप्रमाणेच शेतकरी संघटनेचा एक प्रामाणिक पाईक म्हणून करीत आहे.

महाराष्ट्र राज्य विधानसभेच्या २००४ च्या निवडणुकीत शेतकरी संघटनेचे राजकीय धोरण ठरवताना माझ्यासमोर काय समस्या होती ते मी स्पष्ट करण्याचा प्रयत्न करणार आहे.

शेतकरी संघटनेची सुरुवात झाली तेव्हा गावोगावी जाऊन मी मांडणी करू लागलो की, 'शेतीमालाचा भाव हा भारतीय अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने महत्त्वाचा विषय आहे; शेतीमालाला भाव नाही म्हणून शेतकरी गरीब आहे, शेतकरी कर्जबाजारी आहे आणि, शेतीमालाला भाव नाही; कारण शेतीमालाला भाव मिळू नये असे सरकारचे जाणीवपूर्वक राबवलेले धोरण आहे' या आशयाची माझी सुरुवातीच्या काळातील भाषणे ऐकलेले बरेचसे कार्यकर्ते आजही कार्यकारिणीत आहेत. लोकांमध्ये त्या वेळी अशी भावना होती, की हा मनुष्य बाहेरून येतो काय आणि हे काय जगविपरीत सांगतो आहे? त्या वेळी, ग्रामीण दारिद्र्याच्या समस्येचे गाढे अभ्यासक असलेल्या वि. म. दांडेकरांसह बहुतेक अर्थशास्त्रज्ञ माझ्या विरोधात होते. शेतकऱ्यांचे नेते म्हणून मानले जाणारे वसंतदादा पाटील, शरद पवार यांच्यासारखी राजकारणधुरंधर माणसेही माझ्या विरोधात होती. पण, माझी मांडणी चालूच होती. माझी मांडणी समजावून देण्यासाठी मी गावागणिक अधिकाधिक पुरावे लोकांसमोर ठेवत होतो, त्यामुळे कालच्यापेक्षा आजचे भाषण वेगळे ठरत होते. शेतकरी वस्तुस्थितीदर्शनाने अचंबित होत होते. मी जे म्हणतो आहे त्याचा काँग्रेसच्या लोकांना प्रचंड राग येईल असा

विचारसुद्धा माझ्या मनात कधी आला नाही. माझी मांडणी कामगार चळवळीला पटणार नाही याची मला खात्री होतीच; पण ही मांडणी काँग्रेसला पटेल का, जनता पक्षाला पटेल का, असा विचारही मी केला नाही. सर्व प्रस्थापितांना नाराज करणारी, दु:खी करणारी शेतकरी चळवळ बांधताना मी कधीही घाबरलो नाही, थकलो नाही. कारण माझ्या अभ्यासाच्या आधाराने मला जे खरे दिसत होते तेच मी शेतकऱ्यांना, लोकांना सांगत होतो – ते त्यांना पटो, ना पटो. या मांडणीतील सार लोकांच्या ध्यानात यावे म्हणून दक्षिण महाराष्ट्रात बोलताना मान्यवर नेत्यांची नावे घ्यावी लागत, नगर-नाशिकमध्ये बोलताना साखर कारखानदारांची नावे घ्यावी लागत. त्यातल्या काही कारखानदारांनी 'काय बामण सांगतोय?' म्हणून कुचेष्टा केली. काहींनी तर धमक्यासुद्धा दिल्या. पण, मी माझ्या कामातून मागे हटलो नाही. त्याचे कारण असे, की ज्याचे मन शुद्ध असते, विचार शुद्ध असतात त्या माणसाला, साहजिकच, एक नैष्ठिकता प्राप्त होते.

बरेचदा असे म्हटले जाते, की शरद जोशींना वीसपंचवीस वर्षे पुढचे दिसते. काही काही बाबतीत, अपघाताने का होईना, हे खरे ठरले आहे, हे मला मान्य आहे. पण, याचा अर्थ माझ्यात काही अतींद्रिय शक्ती आहे असा नाही. आपल्या चष्म्याच्या काचा स्वच्छ असल्या म्हणजे बरेच दूरचे आणि स्पष्ट दिसते; काचांवर जर डाग असले तर जवळचेही धूसर दिसते किंवा काचांवर जर एखादा रंग दिला तर समोरच्या परिस्थितीचे खरे चित्र समजत नाही. शेतीमालाच्या भावाच्या प्रश्नाच्या अभ्यासाने माझ्या काचा साफ केल्याने मला महाराष्ट्रातील साखर कारखानदारी कोसळणार आहे, हे १९८२ मध्येच दिसले, महिला प्रश्न महत्त्वाचा असणार आहे हे १९८६ मध्ये दिसले आणि त्याच स्वच्छ काचांतून पाहत असल्यामुळे, सगळ्या देशातील लोक जागतिक व्यापारासंबंधीच्या डंकेल प्रस्तावाविरुद्ध बोलत असतानाही त्याच्या बाजूने मी एकटा उभा राहिलो. शेतकरी संघटनेचा एकही कार्यकर्ता सुरुवातीला माझ्या बाजूने उभा नव्हता. तरीसुद्धा, सत्य आणि विचारशक्तीच्या आधाराने मी ते मांडले.

राजकारण हा काही तर्काचा खेळ नसतो. राजकारण हा संभाव्य काय आहे आणि असंभाव्य काय याचा विचार करून, खेळावयाचा (ऊँस द्ीप ईर्दैत) खेळ असतो. केवळ तर्कशास्त्राने किंवा केवळ बुद्धीने चालणारा हा खेळ नाही. आणि तरीसुद्धा मला असे वाटते, की राजकारणात पडून, निवडणुका लढवून

सत्तेत गेलेल्या एकाही माणसाने, एकाही पक्षाने शेतकऱ्यांचे भले केलेले नाही. त्यामुळे, राजकारण हा सिंहाच्या किंवा वाघाच्या गुहेत जाणारा रस्ता आहे – गुहेत जाणारी पावले फक्त दिसतात, बाहेर येणारी पावले दिसत नाहीत. तेव्हा सत्तेवर कोणताही पक्ष गेला, तरी तो शेतकऱ्याला बुडवतोच. तेव्हा, त्यातल्या त्यात जो छोटा चोर असेल, त्याला पाठिंबा द्यावा ही भूमिका मी शेतकरी संघटनेच्या सटाणा येथे झालेल्या पहिल्या अधिवेशनात (१९८२) मांडली. समाजवादाचा पाडाव होईपर्यंत, आणि समाजवादाचा पाडाव झाल्यानंतर जातीयवादी आणि मंडलवादी यांनी डोके वर काढेपर्यंत ही भूमिका सातत्याने चालू राहिली. समाजवादाचा पाडाव करण्यात शेतकरी संघटनेचा फार मोठा हात होता असे नाही, समाजवाद ही आंतरराष्ट्रीय ताकद होती, शेतकरी संघटनेची ताकद महाराष्ट्रापुरती मर्यादित. पण, महाराष्ट्राततरी 'सरकार नावाची गोष्ट ही हितकारी नसते, सरकार हे नेहमी अपायकारकच असते' अशी भावना लोकांच्या मनात निर्माण करण्यात शेतकरी संघटनेचा मोठा हात आहे आणि त्यामागे 'शरद जोशींचा विचार आहे,' हे लोक मानतात. शेतकरी संघटनेचे कार्यकर्तेच नव्हे तर इतरही अनेकजण शेतकरी संघटनेबद्दल बोलताना 'शरद जोशींचा विचार' हा शब्द हटकून वापरतात.

गेल्या विधानसभा निवडणुकीत स्वतंत्र भारत पक्षाने महाराष्ट्रातील शिवसेना-भाजप युतीबरोबर जाण्याचा – रालोआचा एक घटकपक्ष म्हणून – निर्णय कायम ठेवला; पण त्यांच्याशी चर्चा चालू असताना ते नेहमी म्हणायचे, की स्वतंत्र भारत पक्ष बाजूला राहू द्या, आम्हाला शेतकरी संघटना आणि त्यातल्या त्यात शरद जोशी हवे आहेत. म्हणजे युतीचे लोक इतक्या टोकाला जाऊन स्वतंत्र भारत पक्षाला नगण्य मानीत होते. हे आपल्या सर्वांसाठी दु:खदायक आहे, यात काही शंका नाही.

पण प्रत्येक निवडणुकीच्या वेळी मी अभ्यास करून राजकीय परिस्थितीचे विश्लेषण करतो, त्यावर चर्चा करतो आणि शेतकरी संघटनेची त्या निवडणुकीतील भूमिका निश्चित करतो. गेल्या लोकसभा निवडणुकीच्या वेळीही जेव्हा मी अशा तऱ्हेने अभ्यास केला तेव्हा राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे नेतृत्व करताना अटलबिहारी वाजपेयींनी दाखवलेली सर्वसमावेशकता व सहिष्णुता आणि आघाडी एकसंध ठेवण्याच्या दृष्टीने आणि खुल्या व्यवस्थेला पुढे चालू ठेवण्याच्या दृष्टीने स्वपक्षाच्या स्वदेशी, समान नागरी कायदा, ३७० वे कलम असे मुद्दे

बाजूला ठेवण्याची निर्धारी कठोरता या बाबी ठळकपणे लक्षात आल्या. रालोआच्या नेतृत्वाच्या या वैशिष्ट्यामुळेच स्वतंत्रतेच्या संकल्पनेला या नेतृत्वाखालीच काही आशा असू शकते, या विचारानेच लोकसभा निवडणुकीच्या वेळी स्वतंत्र भारत पक्षाने रालोआचा घटक पक्ष होण्याचा निर्णय घेतला. वाजपेयींच्या नेतृत्वगुणाचे हे विश्लेषण मी लोकसभा निवडणुकीच्या प्रचारसभांमध्ये मांडले तेव्हा खुद्द भारतीय जनता पक्षाच्या नेत्यांनीसुद्धा आश्चर्यचकित होऊन मोठ्या प्रांजळपणे कबूल केले, की आपल्या नेत्याची ही थोरवी माझ्या भाषणांमुळे प्रथमच लक्षात आली.

महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीत हीच भूमिका कायम ठेवताना गाठ पडली महाराष्ट्रातील शिवसेना-भाजपा युतीशी. ही भूमिका निभावून नेताना माझी मोठी कुचंबणा होते आहे, ती मी प्रामाणिकपणे पुढे ठेवू इच्छितो. महाराष्ट्रातील शिवसेना-भाजप युतीने या विधानसभा निवडणुकीच्या काळात स्वतंत्र भारत पक्षाला आणि शेतकरी संघटनेला जी वागणूक दिली, ती पाहता यापुढे रालोआच्या सदस्यत्वामुळे स्वीकारावी लागलेली ही युती चालू ठेवावी का, या प्रश्नावर चर्चा करताना काही कार्यकर्त्यांनी म्हटले, 'आता लगेच काही निवडणुका नाहीत, मग युती ठेवली काय किंवा तोडली काय, काय फरक पडणार? भाजपचे धोरण काय आहे त्याच्याशी आपल्याला काय करायचे आहे, शिवसेनेची धोरणे काय आहेत आणि त्यांच्या रीती काय आहेत, याच्याशी आपल्याला काय करायचे आहे? आपण आपल्याला काय करायचे आहे त्यावर चर्चा करावी, त्यानुसार कार्यक्रम करावे; पण युतीतील इतरांबद्दल काही बोलू नये.' अशा तऱ्हेने भूमिका घ्यायची म्हणजे माझी मोठी अडचण होते. कारण, अशा तऱ्हेने मी कधी जगलो नाही, अशा तऱ्हेने मी कधी बोललो नाही आणि अशा तऱ्हेने मी कधी काम केले नाही. कोणाला मान्य नसले तरी चालेल; पण मला जे योग्य वाटते ते सांगणे हे माझे काम आहे.

मला असे वाटते, की शेतकरी संघटनेचे आणि स्वतंत्र भारत पक्षाचे बुद्धिवैभव ही फार महत्त्वाची गोष्ट आहे. डंकेल प्रस्तावाच्या वेळी त्याच्या बाजूने मी उभा राहिलो आणि म्हटले, की आम्हा शेतकऱ्यांना स्वातंत्र्य हवे आहे, आम्ही बरबाद झालो तरी चालेल, आम्हाला मरण यायचेच असेल तर ते स्वातंत्र्यात येऊ द्या. त्या वेळी ही भूमिका जर मी मांडली नसती तर, माझी खात्री आहे, की शेतकरी संघटनासुद्धा स्वदेशी जागरण मंच, कम्युनिस्ट आणि जागतिकीकरणाला

विरोध करणाऱ्यांच्या पंक्तीत सामील झाली असती.

आजही माझ्यापुढे तसाच प्रश्न उभा आहे. अलीकडेच अमेरिकेच्या निवडणुका झाल्या, राष्ट्राध्यक्ष म्हणून बुश पुन्हा निवडून आले. बुश यांचा निवडणूक जाहीरनामा पाहिला तर जागतिक व्यापार संघटनेच्या पुढील वर्षी होणाऱ्या वाटाघाटींवर त्याचे परिणाम काय होणार आहेत व त्याबद्दल आपल्या देशाने काय भूमिका घेतली पाहिजे, याबद्दल शेतकरी संघटना आणि स्वतंत्र भारत पक्षाच्या कार्यकर्त्यांच्या विचारांत स्पष्टता असणे आवश्यक आहे आणि तसे सरकारला सांगायला पाहिजे. तसे न करता केवळ प्रचलित पठडीतल्या वर्तमानपत्रांतील व नियतकालिकांतील संपादकीयांवरून फुटकळ मते बनवून जर काही घोषणा आपण करू लागलो तर आपले आजपर्यंत कमावलेले अर्थशास्त्रातले प्रथम स्थान टिकून राहणार नाही. ही धोक्याची सूचना मी शेतकरी संघटना आणि स्वतंत्र भारत पक्षाच्या कार्यकर्त्यांना देऊ इच्छितो.

गेल्या विधानसभा निवडणुकीत आपद्धर्म म्हणून स्वीकारलेल्या युतीच्या उमेदवारांच्या प्रचारसभांमध्ये मी भाषणे केली; पण, ही भाषणे करताना मला गुदमरल्यासारखे होत होते. त्याचे कारण शिवसेना वाईट आहे किंवा नाही, भाजप वाईट आहे किंवा नाही हा मुद्दा नाही; पण आपल्याला जर एखाद्या माणसाबद्दल प्रेम वाटले, तर आपण त्याच्यासाठी जीव टाकायला तयार होतो. कसलाच तर्कसंगत विचार नसलेल्या लोकांबरोबर, आपद्धर्म म्हणूनसुद्धा, काम करताना मला घृणा वाटते; त्यांच्याबरोबर राहू नये असे वाटते. खरे तर मी, अपघाताने का होईना, हिंदू घरात आणि त्यातल्या त्यात ब्राह्मण घरात जन्मलो आहे; पण मला स्वत:ला, कपाळावर हेऽ एवढे गंध लावलेले आणि दाढ्या वाढवलेले लोक समोर आले, की ही आपल्यातली माणसे नाहीत, ही कोणीतरी नरमांसभक्षक टोळीतील माणसे आहेत अशी भावना होते.

माझ्या या स्वभावामुळे काही लोक आपल्यापासून दूर राहतात का? लोकसभा निवडणुकीतील आपली भूमिका अमान्य झाल्याने शेतकरी संघटनेपासून दूर गेलेले राजू शेट्टी गेल्या विधानसभा निवडणुकीत अपक्ष म्हणून उभे राहून निवडून आले. या विजयाचे विश्लेषण करताना काहीजण म्हणाले, की तिथे शरद जोशी नव्हते हे एक कारण या विजयामागे आहे. खरेही असेल ते. कारण, शरद जोशींना शिव्या देणे हा राजकारण्यांचा खेळ आहे आणि तो खेळून निवडून येताही येत असेल, कदाचित. तेव्हा मी संघटनेला आवश्यक आहे

असा आग्रह धरत नाही. माझी चिंता एकच आहे, की अशा विजयासाठी मला वजा करण्याचा विचार करताना, कोणत्याही पुढच्या निवडणुकांच्या वेळी म्हणा, प्रशिक्षण शिबिरात म्हणा किंवा सभांत म्हणा आतापर्यंतची 'शरद जोशी' या विचाराची जी परंपरा महाराष्ट्रासह देशातील विद्वत्जनांना मान्य आ, ती डागाळली जाऊ नये, तिला काळिमा लागू नये, ती टिकून राहावी याचीही काळजी घेतली जाईल का? शरद जोशी या व्यक्तीवाचून तुमचे जर चालत असेल तर आनंदच आहे. पण, शरद जोशींचा चष्मा डागाळू नये असे वाटत असेल, आपण 'संघटनेचा विचार' म्हणून जे आतापर्यंत म्हणत आलो त्या विचाराची ताकद जर टिकवायची असेल तर चष्म्याचे भिंग स्वच्छच ठेवायला हवे आणि भिंग स्वच्छ ठेवायला हवे असेल तर 'कोणी म्हटले, आम्हाला मशीद पाडायची आहे, मंदिर बांधायचे आहे तरी आपले काय बिघडले?' अशा तऱ्हेने विचार करून चालायचे नाही. तुम्हाला इतपत तरी ताठ राहता आले पाहिजे आणि म्हणता आले पाहिजे, 'अमुक अमुक एक गोष्ट आम्हाला मान्य नाही; पण राजकारणातील आपद्धर्म म्हणून तात्पुरते आम्ही या बाबतीत काही बोलणार नाही.'

तसाच, एक प्रश्न आहे राखीव जागांचा. मला राखीव जागा मान्य नाहीत – कोणाकरिताही मान्य नाहीत – दलितांकरिता मान्य नाहीत, आदिवासींकरिता मान्य नाहीत, महिलांकरिताही मान्य नाहीत. या विषयावर माझा माझ्या कार्यकर्त्यांशी मोठा वाद होण्याची शक्यता आहे. माझ्या खुल्या स्वतंत्रतावादी विचाराच्या तत्त्वामध्ये राखीव जागा ही संकल्पना बसतच नाही. याही बाबतीत ठरवता येईल, की तात्पुरती तडजोड म्हणून या प्रश्नावर सध्या काही बोलायचे नाही; पण कुणी जर असे म्हणू लागले, की जातिधर्माचा वापर करून, राखीव जागांचा वापर करून राजकारणामध्ये पुढे येणारे लोक हे शेतकरी संघटनेच्या स्वतंत्रतावादी विचाराची मांडणी करणाऱ्या संस्थापकांपेक्षा जास्त बुद्धिमान, जास्त चतुर आणि जास्त राजकारणकुशल आहेत तर त्यामुळे मला दु:ख झाल्याशिवाय राहणार नाही, हे उघड आहे.

निवडणुकोच्या प्रचारासाठी तुम्ही मला प्रेमाने बोलावता. पण, ज्यांनी माझी पूर्वीची शेतकरी संघटनेच्या व्यासपीठावरील भाषणे ऐकली आहेत, त्यांच्या लक्षात आले असेल, की माझी ती भाषणे आणि या निवडणूक प्रचारातील भाषणे यांत जमीनअस्मानाचे अंतर होते. मी पूर्वी काय भाषणे करत होतो आणि

आता निवडणुकीत मला काय भाषणे करावी लागत आहेत, याची मला त्याक्षणी लाज वाटत असे. हा सरळसरळ वैचारिक वेठबिगाराचा किंवा वैचारिक व्यभिचाराचाच प्रकार झाला. ही वेठबिगारी अशीच राहणार असेल, तर शेतकरी चळवळीला माझा जो उपयोग आहे तोच संपून जाईल. माझ्या चष्म्याची काच तडकून जाईल. त्यामुळे, 'सध्या चालवून घ्यावे' या विचारामागे राजकीय संधिसाधूपणा आहे. ज्यांच्या महत्त्वाकांक्षा राजकीय आहेत, ते आपल्याला फरफटत नेतात अशी माझी भावना होत आहे.

विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर वर्ध्याला झालेल्या कार्यकारिणीचा स्पष्ट निर्णय असा होता, की लोकसभेच्या निवडणुकीच्या अनुभवाने सन्माननीय तडजोड होत असेल, तर महाराष्ट्रातील युतीच्या बरोबर जावे, अन्यथा स्वतंत्रपणे जास्तीत जास्त जागी स्वतंत्र भारत पक्षाने उमेदवार उभे करावे; भले मग साधनांचा, निधीचा तुटवडा असो. आपण स्वतंत्र भारत पक्षाला सातच जागा सोडवून घेऊन, युती टिकवण्याची तडतोड केली ही तडजोड सन्माननीय होती का? सन्माननीय नसेल तर विकल्प शोधण्याकरिता आपण काय प्रयत्न केला? आंबेठाणला या सर्व धुमश्चक्रीत कार्यकर्त्यांची एक तातडीची बैठक विकल्प शोधण्यासाठी बोलावली. तेव्हा पन्नासेक कार्यकर्त्यांनी स्वतंत्रपणे निवडणूक लढविण्याच्या विकल्पाखाली उमेदवारी करण्याची तयारी दाखवली. शेतकरी संघटनेच्या बाहेरील विसेक उमेदवारांची स्वतंत्र भारत पक्षाच्या तिकिटावर निवडणूक लढविण्याची तयारी होती. थोडाफार निधी जमवण्याच्याही हालचाली सुरू होत्या. कारण, आपल्या पन्नास उमेदवार कार्यकर्त्यांपैकी बहुतेकांची आर्थिक परिस्थिती अशी आहे, की अर्ज भरताना करावा लागणारा सुरुवातीच्या खर्चाच्या किमान दहा हजार रुपयांची जमवाजमव करणेसुद्धा अवघड. इतके करूनही 'निवडून किती येणार?' हा प्रश्न निघाला आणि स्वतंत्र भारत पक्षाने स्वतंत्रपणे निवडणुका लढविण्याचा विचार बाजूला पडला. सात जागा घेऊन युतीबरोबर जाण्याचा जो निर्णय झाला त्यावर माझा सहीशिक्का आहे, हे मी स्पष्ट करू इच्छितो; त्याची जबाबदारी मी दुसऱ्या कोणावर टाकणार नाही. याच्यापेक्षा जास्त चांगला निर्णय घेता आला असता असेही मला वाटत नाही. पण, जे घडले ते इच्छेविरुद्ध झाले यात काही शंका नाही. मी लोकांना विचारले, की काही आपले, काही बाहेरचे असे ऐंशीनव्वद उमेदवार आपण उभे केले तर चारपाच तरी उमेदवार निवडून येतील का? मला निवडणुकीची गणिते जमत

नाहीत, ज्यांना जमतात त्यांनी सांगितले, की आपण ऐंशीनव्वद जागी उमेदवार उभे केले तर त्यातील एकसुद्धा निवडून येण्याची शक्यता नाही. मागे बघून मते बदलणे चुकीचे आहे. पण, शिरोळमध्ये राजू शेट्टी निवडून येतात, मोर्शीत दिलीप भोयरना चांगली मते पडतात, हे पाहिले तर आपल्या पायावर उभे राहून स्वतंत्र भारत पक्षाची फार वाईट अवस्था झाली असती असे काही मला वाटत नाही. वामनराव चटप तर निवडून येणारच होते. त्यांच्या यशाचा संबंध भाजपशी नाही आणि स्वतंत्र भारत पक्षाशीही नाही; निवडून येतात ते वामनराव चटप निवडून येतात. मागील निवडणुकीत हरल्यापासून त्यांनी पुन्हा एकदा जिल्हा परिषदेपासून गावपातळीपर्यंत राजकीय बांधणी करण्यासाठी सातत्याने प्रचंड परिश्रम घेतले, म्हणून ते निवडून आले. ते आपल्यात आहेत हे आपले भाग्य आहे, आपल्यामुळे त्यांचे भाग्य उजळले असे नाही.

जर का आपण आपले मतदारसंघ अशा तऱ्हेने उभे केले असते, तर ही वेळ आपल्यावर आली नसती. तीन वर्षांपूर्वी आपण पक्षबांधणीचा कार्यक्रम हाती घेतला होता. तेव्हा मी सांगितले होते, की ज्या मतदारसंघामध्ये स्वतंत्र भारत पक्षाचे किमान दहा हजार सदस्य तयार होतील त्या मतदारसंघात मी स्वत: येऊन तेथील कार्यकर्त्यांचे कौतुक करीन. सगळे मिळून फक्त तीन मतदारसंघ – राजुरा, शिरोळ आणि बदनापूर – की ज्यांनी दहा हजार सदस्य तयार केले. या तीन जागांपैकी आपल्याला फक्त एक जागा मिळाली तिथे वामनराव चटप निवडून आले; शिरोळला आपल्यापासून दूर झालेले राजू शेट्टी निवडून आले आणि माझी खात्री आहे, की आपल्याला युतीत न सुटलेल्या बदनापूरमधून डॉ. अप्पासाहेब कदमांनी बंडखोरी केली असती तर तेही निवडून आले असते. आपण मुळामध्ये जे काम करायला पाहिजे ते काम पुरेसे नाही. ते केले असते तर त्याचा उपयोग निवडणुकीसंबंधी युतीची बोलणी करताना झाला असता. ते काम न झाल्यामुळे जागावाटपाच्या वाटाघाटींच्या प्रक्रियेत, जसजशी निवडणुकीची तारीख जवळ येऊ लागली तसतशी माझीसुद्धा फरफट होऊ लागली. १९८० मध्ये माझे जे वय होते, माझी जी प्रकृती होती तशीच जर आज असती तर मी निर्णय घेतला असता, की आपल्याला स्वत:च्या ताकदीवर लढता येत नाही ना, मग बाळासाहेब ठाकऱ्यांबरोबर युती करण्यापेक्षा आपण ही निवडणूक जाऊ देऊ; एकही उमेदवार उभा करता आला नाही तरी चालेल; पण हा डाग नको. मी म्हणून पाहिले; पण काही जणांनी म्हटले, की युतीत ज्या काही आठदहा

जागा मिळतील त्या लढवून, त्यापैकी चारपाच आमदार जरी आपले झाले, तरी तेवढ्या पायावर आपल्याला भविष्यात आपले बळ वाढवता येईल. आता माझे वय जसजसे वाढत चालले आहे तसतसे कमी वयाच्या, जास्त उमेदीच्या माणसांचा सल्ला ऐकणे, त्यांच्या मताने चालणे आणि त्यांना मदत करणे दिवसेंदिवस अधिक आवश्यक होत चाले आहे. त्यामुळे या वेळी, या क्षेत्रातले जाणकार आणि प्रचंड उत्साही, प्रचंड कष्ट करणारे असे जे माझ्याभोवती कार्यकर्ते होते, त्यांचा सल्ला मी ऐकला.

इतके सगळे घडल्यानंतर विधानसभेत कोण कोण जातील, ते पुढे पाच वर्षे काय काम करतील, त्याच्यापुढे शेतकरी संघटना किती मजबूत होईल हा माझ्या आयुष्यात घडणारा इतिहास कदाचित नसेल, तेव्हा आपल्यानंतर जी माणसे शेतकरी संघटनेची धुरा घेणार असतील त्यांचे ऐकणे योग्यच आहे. तेव्हा आजपर्यंत शेतकरी संघटनेच्या नेतृत्वाची जी जबाबदारी मी सांभाळली ती हळूहळू अशा माणसांच्या हाती सोपवणे आवश्यक आहे, या हेतूने मला न पटणाऱ्या गोष्टी मी मान्य करीत आलो. त्याही वेळी मी सांगितले, की तुमच्या या प्रचारामध्ये मला गोवू नका, बोलताना मला ओकारी येते. ते म्हणाले, 'मग तुम्ही प्रचाराला येऊ नका, चालेल. तशी मला सुटी दिली, तर माझी काही तक्रार नव्हती. आतासुद्धा आधी जो निर्णय झाला, त्यावर बोलतो आहे असे नाही. याच्यापेक्षा जास्त चांगला निर्णय झाला असता, असेही मी म्हणत नाही; पण तो निर्णय करायला लागल्यानंतर ज्यांनी निर्णय घेतला, त्यांनी प्रामुख्याने प्रचाराची धुरा सांभाळली पाहिजे; आता निर्णय झालाच आहे तर पुन्हा शरद जोशींनीच फिरायला पाहिजे असे म्हणता कामा नये.

मला असे वाटते, की शेतकरी संघटनेच्या गेल्या पंचवीस वर्षांच्या इतिहासामध्ये आपल्याला सगळ्यांत मोठी उपयोगी अशी जी गोष्ट ठरली ती म्हणजे ज्याला 'शरद जोशींचा विचार,' असे सर्वसाधारणपणे म्हटले जाते ती होय. राजकीय तडजोड म्हणून आज या पक्षाशी युती, उद्या त्या पक्षाशी युती आपल्याला करावी लागते याचे मलाही दु:ख होते. मागे आपण विश्वनाथ प्रताप सिंहांबरोबर गेलो. त्या वेळी त्यांनी पंतप्रधानपद स्वीकारल्यानंतर जेव्हा ते कोल्हापूरला आपल्या मेळाव्याकरिता आले, तेव्हा त्यांना मी स्पष्टपणे सांगितले होते, की तुम्ही मंडल आयोगाचा कार्यक्रम घेता हे चूक आहे, याच्यापुढे आम्ही तुमच्याबरोबर राहू शकणार नाही. युती केली म्हणजे काही आपण आपली तत्त्वे सोडून दिली असे

नाही. आता जर का मंदिरवाद पुढे येत असेल, तर त्याही बाबतीत आपल्याला तसेच सडेतोडपणे वागावे लागेल. पत्रकार मला विचारतात, की तुम्ही तर स्वत:ला विचारवादी आणि तर्कशुद्ध मांडणी करणारे म्हणवता, मग बाळासाहेब ठाकरे जे बोलतात ते तुम्हाला पटते का? यावरून मला असे वाटते, की अशा प्रकारच्या युतीत आपलेही भले नाही आणि त्या जातीयवाद्यांचेही नुकसान आहे. शिवसेनेच्या कार्यकर्त्यांत अशी बीजे रोवली गेली आहेत, की युतीच्या निमित्ताने आपण त्यांच्याबरोबर गेल्याने त्यांचा गावागावातील कार्यकर्ता असा विचार करू लागला आहे, की शेतकरी संघटनेच्या विचारातील स्वातंत्र्याचे बी पेरले गेल्यानंतर शिवसेनेला त्याचे अस्तित्व टिकवून ठेवणे कठीण होईल. मला भेटायला कोणीही कार्यकर्ता सहज येऊ शकतो हे पाहिल्यानंतर विदर्भातले शिवसेनेचे कार्यकर्ते मला म्हणाले, की आम्हाला बाळासाहेबांचे नखसुद्धा पाहायला मिळत नाही, त्यांच्याकडे जायचे म्हटले तरी त्यांच्याभोवती सुरक्षा सैनिकांचा गराडा असतो. तेव्हा स्वतंत्रता ही एक अशी आस आहे, अशी भूक आहे, की तिची एकदा एखाद्याला जाणीव झाली, की तो पारतंत्र्याला कधी टिकू देत नाही. आपण पार परतंत्र आहोत याची एकदा जाणीव झाली, की स्वातंत्र्य मिळायला फारसा वेळ लागत नाही. 'स्वातंत्र्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे,' असे टिळकांनी म्हटल्यानंतर देश स्वतंत्र व्हायला काही फार वेळ लागला नाही. तसाच परिणाम गावागावातल्या शिवसेनेच्या अनुयायांवरही होणार आहे. त्यामुळे आपण अशा युतीमध्ये राहणे आता शिवसेनेलाही अवघड वाटत असावे.

भाजपच्याही काही लोकांची इच्छा असावी, असा माझा अंदाज आहे, की अटलबिहारी वाजपेयींच्या काळामध्ये अर्थकारणाचा विचार मांडण्यासाठी शरद जोशी, जॉर्ज फर्नांडिस यांच्यासारखे जे ओझे त्यांनी घेतले होते, ते आपल्या खांद्यावरून उतरले तर बरे होईल; म्हणजे आपण आपल्या पद्धतीने तोगडियांसारख्यांचे तत्त्वज्ञान बिनबोभाट पुढे मांडत जाऊ शकू. त्यामुळे त्यांचीही बरोबर राहण्याची काही फारशी इच्छा नसावी. फारकतीचा विचार आपणच करतो आहोत असे नाही, दुसऱ्या बाजूलाही एकत्र राहण्याची फारशी इच्छा राहिली आहे, असे दिसत नाही.

भाजप हा एक ठोकळा आहे, शिवसेना हा एक ठोकळा आहे, स्वतंत्र भारत पक्ष हा एक ठोकळा आहे असे समजा. या ठोकळ्यांना सुतळीने एकत्र बांधले तर खरी एकी होत नाही. सुतळी जरा सैल झाली, की खटाखटी सुरू होते. खरी

एकी व्हायची असेल तर ती काही तत्त्वे, काही सिद्धांत यांच्या आधाराने झाली पाहिजे. सर्व ठोकळ्यांचा भुसा केला आणि सरस मिसळून, त्याचा दाबून एक ठोकळा केला तरच खरी एकी होऊन निवडणूक जिंकता येऊ शकेल आणि हा प्रचंड यज्ञ करताना जे नवे नेतृत्व पुढे येईल ते नेतृत्व जर प्रतिभावान असेल, धाडसी असेल, कर्तबगार असेल, तरच देशाला वाचवण्याची भाषा करणे उचित होईल.

पण एखाद्या निर्णयाच्या वेळी नेतृत्वामध्ये जरा कुठे कमकुवत धागा सापडला, की त्याला जर आपण व्यावहारिकतेचे धडे देऊन, त्याच्यावर शेण आणि धोंडे मारायला लागत असू, तर स्वतंत्रताविरोधी आणि विकासविरोधी ताकदींच्या हातून देशाची सुटका होणे शक्य नाही. निर्णयामध्ये जरी काही त्रुटी आहेत, असे वाटले तरी तो घेणारे नेतृत्व लोकांपुढे जाते, आपली भूमिका मांडते आणि त्यावरच आजपर्यंत संघटना चालली आहे, हे लक्षात घेऊन, ऐन लढाईच्या काळात विसंवाद तयार करून नेतृत्वाचा आणि पर्यायाने संघटनेचा घात करणे कोणाच्याच फायद्याचे असत नाही.

निवडणुका वेगवेगळ्या मुद्द्यांच्या आधारे आणि नेतृत्वाच्या आधाराने होत असतात. आपल्या देशात विरोधी पक्षांत जयप्रकाश नारायणांनंतर असे समर्थ नेतृत्व पुढे आले नाही. जे पुढे आले ते लालुप्रसादांसारखे. ते कितीही निवडून येवोत; पण त्यांच्याबद्दल आदर वाटण्याचे काहीच कारण नाही. अशा परिस्थितीमध्ये चारित्र्यसंपन्न, प्रतिभावान, बुद्धिमान, कर्तृत्ववान अशा तऱ्हेचे नेतृत्व आपल्याला हवे असेल, तर अशा रूपात पुढे येणाऱ्या व्यक्तीला नाउमेद करणारी आणि सगळेच उत्तरदायित्व त्याच्या एकट्याच्या माथी मारणारी प्रवृत्ती टाकून द्यायला हवी. स्वतंत्र भारत पक्षाचा एक आमदार असो की दहा, ते जोपर्यंत शेतकरी संघटनेच्या विचाराने चालणार असतील, तोपर्यंत त्यांना महत्त्व राहील. भाजपप्रमाणे दोनाचे दिडशे काय अगदी दोनशे तीन आमदार जरी स्वतंत्र भारत पक्षाचे झाले आणि ते जर चुकीच्या – शेतकरी संघटनाविपरीत विचाराच्या– आधाराने जाणारे असतील तर इतिहासात शेतकरी संघटनेची नोंद 'अशीही एक संघटना होऊन गेली, काही काळ तिचा प्रभाव होता,' इतपतच होईल.

शेतकरी संघटनेचे नाव इतिहासात ठळकपणे नोंदले गेले पाहिजे अशी अपेक्षा बाळगण्याइतकी आपली ताकद आहे काय? निश्चितच आहे. शेतकरी

संघटनेच्या आंबेठाण येथील शिबिरात मी वारंवार सांगितले आहे, की समाजवादी राजवटीने गुलामगिरीच्या खाईत लोटलेल्या समाजमनात शेतकरी संघटनेने स्वातंत्र्याच्या बीजाचे पुनरारोपण केले. 'सगळ्या इतिहासाची दिशा आणि गती स्वातंत्र्य आहे. प्रत्येक व्यक्ती, प्रत्येक संघटना स्वातंत्र्याच्या कक्षा वाढवत जाते; जो जो स्वातंत्र्याला बंधन घालू पाहतो त्याला त्याला समाज व इतिहास सोडून देतो' हा मूलभूत विचार शेतकरी संघटनेने समाजात पुनर्प्रस्थापित केला. शेतकरी संघटनेच्या पाइकांना लाभलेला हा स्वातंत्र्याचा वसा टाकून जर आपण 'गुजराथ्यांना हटवा, बिहाऱ्यांना हटवा' अशासारख्या गर्जना करणाऱ्यांच्या झुंडगिरीपुढे नमलो, तर आपण कमावलेले सर्व काही क्षणार्धात निसटून जाईल. निवडणुकीसाठी एकत्र आलो म्हणजे काही आपण आपला स्वातंत्र्याचा विचार सोडून दिला असे नाही. लग्नानंतर मुले झाली, की नवराबायको मुलांच्या जबाबदारीच्या नावाने, एकमेकांचे आचारविचार जुळत नसताना संसार रेटतच राहतात. तसे काही आपल्याला करण्याची गरज नाही. आपण भाजप-शिवसेनेबरोबर युती केल्यानंतर प्रश्नांना उत्तरे देताना पंचाईत होते असे कितीतरी प्रसंग गेल्या चार वर्षांत आपल्यावर आले, इतकी त्यांच्या आणि आपल्या विचारांत तफावत आहे. गेली पंचवीस वर्षे आपण आपला विचार किती मस्तीत मांडत होतो आणि या युतीमुळे आपल्याला किती नरमाईने वागावे लागते, याच्या असह्य वेदना होतात. तेव्हा ही 'कुसंगत' चालूच ठेवायची का सोडायची याचा निर्णय घ्यायला हवा. शेतकरी संघटनेचे 'संन्याशाचे वैभव' दोनपाच आमदारांच्या लालसेमुळे नष्ट होणार असेल तर फेरविचार करणे आवश्यक आहे. हे वैभव जर टिकवून ठेवता आले नाही, तर शेतकरी संघटनेला भविष्य नाही हे निश्चित.

निवडणुकीच्या राजकारणात जात आणि पैसा यांची समीकरणे सर्वच पक्ष वापरतात आणि कमीअधिक प्रमाणात यशस्वी झाल्याचे दिसतात. ही समीकरणे वापरून एका निवडणुकीत यशस्वी झालेले उमेदवार आणि पक्ष, तीच समीकरणे वापरणारे विरोधी उमेदवार आणि पक्ष यांच्याकडून पुढील निवडणुकीत पराभूत होताना दिसतात. जात आणि पैसा यांच्या समीकरणाच्या आधाराने मिळणारे यश चिरस्थायी नसते. तेव्हा अशा परिस्थितीतही जात आणि पैसा यांची समीकरणे वापरण्याऐवजी केवळ आपला विचार मांडून, कर्जमुक्तीच्या आधाराने निवडणुका जिंकणे आपल्याला शक्य होईल का? मला असे वाटते, की हे अशक्य नाही. तुम्हाला उमेद द्यावी किंवा स्फूर्ती यावी यासाठी केवळ मी हे बोलत नाही.

आपण शेतकरी संघटनेच्या वैभवाच्या काळाबद्दल बोलतो. त्या काळात शेतकरी संघटनेने जो विचार मांडला, त्याची एक प्रतिष्ठा होती, त्याने समाजात संघटनेची एक प्रतिमा तयार झाली. भूतकाळात कमावलेली ही प्रतिष्ठा जर आपण गमावली तर निवडणुकीत कितीही यश मिळाले, तरी ते चिरस्थायी असणार नाही. तेव्हा 'सध्या आहे ते तसेच चालू द्या, काय भूमिका घ्यायची ते पुढे ठरवू,' असा काही टांगता निर्णय घेऊ नका की ज्यामुळे मला आणि तुम्हालाही पत्रकारांच्या आणि ज्या समाजाला आपल्यामध्ये काही वेगळ्या आणि सकारात्मक भूमिकेची प्रतिमा दिसली, त्यांच्या प्रश्नांना उत्तरे देताना पंचाईत झाल्यासारखे वाटेल.

याबाबतीत ठोस निर्णय या कार्यकारिणीत आणि इतक्या कमी वेळात होणे शक्य नाही आणि उचितही होणार नाही. त्यासाठी शेतकरी संघटना कुटुंबाचे अधिवेशन बोलावूया. या अधिवेशनात दोनचार दिवस व्यापक विचारविनिमय करूनच निर्णय घेऊया, अशी विनंती करून शेतकरी संघटनेचा पाईक म्हणून केलेले माझे हे निवेदन थांबवतो.

(६-२१ डिसेंबर २००४)

◆◆

राष्ट्रीय 'रालोआ' आणि राष्ट्र संपवणारी 'संपुआ'

केंद्र शासनात २००४ निवडणुकीत सत्तेवर आलेली संयुक्त पुरोगामी आघाडी (संपुआ) ही राष्ट्रीय लोकशाही आघाडी (रालोआ) प्रमाणेच वेगवेगळ्या पक्षांचे गठबंधन आहे. रालोआतील बहुतेक पक्षांचा समझोता निवडणुकीआधीच झाला होता. त्या आधी जवळजवळ ५ वर्षे त्यांनी एकत्र कामही केले होते; त्यामुळे त्यांचा 'समान कार्यक्रम' आपोआपच स्पष्ट झाला होता. वेगवेगळ्या पक्षांना बरोबर घेऊन चालायचे म्हणजे प्रत्येक पक्षाने आपल्या ध्येयधोरणांतील आणि कार्यक्रमांतील, सहयोगी पक्षाला बोचणारी टोके बोथट केली पाहिजेत, याला सर्वच पक्षांची मान्यता होती. रालोआचे खुद्द निमंत्रक असलेले जॉर्ज फर्नांडिस हे समाजवादी चळवळींच्या अध्वर्यूंपैकी एक; पण त्यांनी कामगार चळवळीच्या अव्यावहारिक कलमांना मुरड घातली. भारतीय जनता पक्षाने अयोद्धेचे राममंदिर, समान नागरी कायदा आणि कलम ३७० चा आग्रह या बाबी गुलदस्त्यात ठेवण्याचे ठरवले आणि भारतवर्षास जागतिक महासत्ता बनवण्याच्या कामास प्राधान्य देण्याचे ठरवले. रालोआच्या काळात देश खंबीरपणे अणुसत्ता बनला. कारगिल प्रदेशावर पाकिस्तानने केलेले आक्रमण पुरेपणे निपटून काढले; त्याबरोबरच, पाकिस्तानपुढे दोस्तीचा हात करून उभय देशांतील नागरिकांना परस्पर-देशांत येणेजाणे सुकर व्हावे याकरिता बससेवाही चालू केली. गणकयंत्राचा उपयोग भरारीने वाढवला आणि संचाराचे नवे तंत्रज्ञानसुद्धा देशभर सर्वदूर पोहोचवले. भारतात येणारी परदेशी गुंतवणूक वाढली आणि देशी उद्योजकांना जग पादाक्रांत करण्यासाठी वाट मोकळी करून दिली. शेतीवर पडलेला कृषी उत्पन्न बाजार समित्यांचा अजगरी विळखा दूर करण्यासाठी त्यांचा एकाधिकार संपवण्यास सुरुवात केली. एवढेच नव्हे तर, तीन दशके बंद पडलेला वायदा बाजार मुक्त केला. जागतिक व्यापार संस्थेत श्रीमंत

राष्ट्रांना त्यांची शेतीवरील अनुदाने कमी करण्यास भाग पाडण्यासाठी गरीब आणि विकसनशील राष्ट्रांनी एक आघाडी बनवली आणि 'विकासाचा कार्यक्रम स्पष्ट केल्याखेरीज जागतिक व्यापार संस्थेला परिपूर्ण मूर्त स्वरूप येऊ शकणार नाही,' ही गोष्ट स्पष्ट केली. गोध्रा रेल्वे स्थानकावर अयोध्या कारसेवकांच्या आगगाडीचा डबा काही समाजघातकी लोकांनी जाळला. त्यानंतर, साहजिकच, गुजराथ राज्यभर जातीय दंगली उसळल्या. मृत्युमुखी पडलेल्या लोकांच्या संख्येचे प्रमाण गुजराथेतील या दंगलीत इतरत्रच्या दंगलीपेक्षा उलटे होते. याचा फायदा घेऊन, भाजपला तो जातीयवादी पक्ष असल्याचा गडद बाट लागला. अटल बिहारी वाजपेयी यांच्या पंतप्रधानकीच्या कारकिर्दीच्या शेवटाशेवटास राष्ट्रीय उत्पादनवाढीचा दर १०.३% या उच्चांकावर गेला. रालोआच्या कालावधीतच उत्पादनाच्या वाढीचा ३% हा पंडिती दर इतिहासजमा झाला आणि ८% च्या आसपास वार्षिक उत्पादनाच्या दराचे युग साकारले.

दुर्दैवाने, रालोआला गुजरातच्या दंग्यांचा कलंक लागला, त्याबरोबरच 'उत्पादनवाढीची गती वाढली तरी गोरगरिबांना त्याचा काही फायदा झाला नाही,' असा प्रचार करण्यात रालोआविरोधी शक्तींना यश आले. चंद्राबाबू नायडू यांना, आपण जणू आंध्र प्रदेशाचे महानिदेशक आहोत असे दाखवण्याची, मोठमोठे समारंभ घडवून आणण्याची आणि केवळ कॉम्प्युटरचाच उदेउदे करण्याची शैली भोवली. तामिळनाडूत जयललितांनाही आपली प्रतिमा सांभाळता आली नाही. उत्तर प्रदेशातही आरक्षणवाद्यांनी डोके वर काढले. या तीन राज्यांत पीछेहाट झाल्यामुळे २००४ च्या निवडणुकीत रालोआला लोकसभेत मिळालेल्या जागा काहीशा कमी झाल्या. काँग्रेस पक्ष हा सर्वांत अधिक जागा मिळालेला पक्ष म्हणून पुढे आला.

काँग्रेस कोणत्याही पक्षाबरोबर आघाडी करणार नाही असा फणकारा दाखवणाऱ्या सोनियाबाईंनी आघाडीच्या धर्मापुढे लोटांगण घातले. या वेळी पुनश्च रालोआचीच सत्ता आली तर काँग्रेस पक्षाचे अखिल भारतवर्षातून उच्चाटन होईल हे उघड दिसत होते. त्यामुळे, 'येन केन प्रकारेण' त्यांनी एक आघाडी बनवण्यास सुरुवात केली. लालुप्रसाद यादव, अनेक लफड्यांत आणि खटल्यांत अडकलेले, बिहारमधील सत्ता कशीबशी सांभाळून होते. केंद्रात सत्तास्थानी असणे त्यांना आवश्यक होते; अन्यथा, त्यांची ससेहोलपट झाली असती. लालू सोनियाजींपुढे नतमस्तक झाले. पूर्वेकडे बांगलादेशातून आलेल्या निर्वासितांचे आगतस्वागत करून, त्यांच्या ताकदीतून ३० ते ४० मतदारसंघ कम्युनिस्ट

पक्षांनी ताब्यात घेतले होते. अर्थकारणात आणि शिक्षणक्षेत्रात मुसलमान दलितांपेक्षा दलित आहेत. त्यातील बहुतेकांच्या मनात हिंदू समाजाविषयी विखार आहे. त्याचा उपयोग करून कम्युनिस्टांनी पश्चिम बंगाल ताब्यात ठेवला होता. रालोआतील बहुतेक पक्षांना बांगलादेशीयांची ही घुसखोरी, त्यांचा पाकिस्तानकडील कल आणि त्यामुळे राष्ट्राच्या सुरक्षेला निर्माण होणारा धोका मान्य नव्हता. चंद्राबाबूंची शासनशैली आणि प्रमोद महाजन यांची 'इंडिया शायनिंग' ही घोषणा यांमुळे रालोआ फक्त 'आहे रे'ची पक्षपाती आहे, त्यात गरिबांसाठी ओलावा नाही असा कम्युनिस्टांनी कांगावा केला. तसे इंदिरा गांधींच्या काळापासूनच कम्युनिस्ट व काँग्रेस यांचे 'लफडे' चालूच होते. परंपरागत काँग्रेसविरोधी भूमिका सोडून, कशाचीही तमा न बाळगता, ते उत्साहाने सोनियाबाईंना सामील झाले; ते झाले म्हणून केरळातील कम्युनिस्टही झाले आणि, मौलाना मुलायमसिंग यांच्या समाजवादी पक्षाने संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारला कम्युनिस्टांप्रमाणेच बाहेरून पाठिंबा देत राहण्याचा निर्णय केला. एवढी जमवाजमव होते आहे असे दिसल्यावर राष्ट्रवादीच्या शरद पवारांना, बारा घोडे दूर जोडूनसुद्धा, संपुआपासून दूर खेचता आले नसते. सोनिया परदेशी मुळाच्या असल्यामुळे त्यांनी पंतप्रधान होऊ नये या मुद्द्यावर शरद पवारांनी काँग्रेसशी फारकत घेतली आणि आपण राष्ट्रवादी आहोत असा गहजब केला. २००४ च्या निवडणुकीत प्रचारामध्ये राष्ट्रवादीच्या सर्व कार्यकर्त्यांनी आणि नेत्यांनी सोनिया गांधींवर अर्वाच्य टीका केली होती. पण, सत्तेच्या जवळ राहण्यासाठी आदिलशहाच्या किंवा दिल्लीश्वरांच्या दरबारात कुर्निसात घालण्याची मराठा सरदारांची परंपरा शरद पवारांनी राखली आणि राष्ट्रवादी काँग्रेस 'संपुआ'वासी झाली.

सर्वांत विलक्षण प्रकार द्रमुक पक्षाचा. करुणानिधी आणि त्यांचे अनेक सहकारी तामीळ वाघांशी संबंध ठेवून आहेत, ते त्यांना आश्रयही देतात, मदतही करतात हे सर्वज्ञात आहे. राजीव गांधींच्या हत्येत तामीळ वाघांबरोबरच द्रमुकची मंडळीही होती. प्रत्यक्ष खुन्यांनाही त्यातील काहींनी आपल्या घरी आसरा दिला होता. हा सगळा इतिहास बाजूला ठेवून सोनियाजींनी आर्जवे करून, द्रमुकला संपुआत ओढून घेतले. कारण, सोनिया आणि जयललिता समान प्रकृतीच्या असल्यामुळे त्यांचे जमण्यासारखे नव्हते ही एक शक्यता किंवा रालोआने जयललिताबरोबर जाण्याची घोडचूक केली ही दुसरी गोष्ट. संपुआ सरकारच्या काळात राजीव गांधी हत्याप्रकरणात फाशी सुनावलेल्या अपराध्यांची शिक्षा सतत पुढे ढकलण्यात येत आहे हेही मोठे सूचक आहे. खुन्यांना घरी आसरा

देणाऱ्या एक संपुआ सरकारात मंत्रिस्थान भूषवून आहेत, हेही तितकेच बोलके आहे. कोणत्याही कारणाने का होईना, राजीव गांधींचे वारसदार आणि राजीव गांधींचे खुनी यांची हातमिळवणी झाली.

अशा तऱ्हेने संपुआ दोन स्तरांची झाली. संपुआ शासनात प्रत्यक्ष सामील झालेल्या आणि अधिकारपदे स्वीकारलेल्या पक्षांचा पहिला स्तर व सरकारात सामील न होता बाहेरून पाठिंबा देणाऱ्या डाव्या व समाजवादी पक्षांचा दुसरा स्तर. संख्येची जमवाजमव तर झाली. नेतृत्व साहजिकच सोनिया गांधींकडे जाणे आवश्यक होते. पण, कितीही नाकारले. तरी विदेशी मुळाच्या व्यक्तीकडे पंतप्रधानपद जाण्यातून काही नाजूक, गुंतागुंतीचे व कठीण प्रश्न उभे राहिले. सरकार स्थापन करण्याचा आपल्या पक्षाचा दावा राष्ट्रपतींपुढे सादर करण्यासाठी मनमोहन सिंहांना बरोबर घेऊन गेलेल्या सोनिया गांधी तेथून बाहेर पडल्यानंतर आपणास पंतप्रधानपदात स्वारस्य नसल्याचे बोलत्या झाल्या. एवढेच नव्हे तर पंतप्रधानपदासाठी काँग्रेसच्या संसदीय पक्षाच्या बैठकीत निवडणूक न घेताच डॉ. मनमोहन सिंह यांचे नाव घोषित करून टाकले. ४८ तासांच्या आत संपुआचा 'संयुक्त किमान समान कार्यक्रम' (संकिसका) कागदावर उतरवण्यात आला. त्यावेळी डाव्या पक्षाचे ३३ खासदार मिळवणे हा जीवनमरणाचा प्रश्न होता. त्यांच्या पाठिंब्याखेरीज रालोआकडून सत्ता काढून घेणे शक्यच नव्हते.

जगभरच्या इतिहासाचा अनुभव असा आहे, की कम्युनिस्ट आघाडी करतात ते शेवटी आघाडीतील इतरांना गिळून टाकण्याच्या निर्धारानेच. जागतिकीकरणाच्या आणि खुल्या बाजारपेठेवर आधारलेल्या व्यवस्थेच्या काळात खुद्द कामगार पुढारीसुद्धा, 'स्पर्धेच्या युगात मालक आणि कामगार यांचे हितसंबंध पूर्णत: परस्परविरोधी नाहीत,' हे मान्य करत असताना संपुआच्या 'संकिसका'मध्ये कामगार वर्गाच्या नोकरीची सुरक्षितता, त्यांचा भविष्य निर्वाह निधी यांच्याबद्दल अशक्य अशा तरतुदी डाव्या पक्षांनी घुसवल्या. त्यांना विरोध करणे संपुआला परवडणारे नव्हते. त्याबरोबरच, परदेशी गुंतवणूक, किरकोळ व्यापारव्यवस्था यासंबंधीच्या कलमांतही डाव्या पक्षांनी पाचरी मारून ठेवल्या.

कशाही तऱ्हेने का होईना, रालोआला सत्तेबाहेर ठेवण्यात काँग्रेसला यश आले. अगदी किरकोळ मताधिक्याने सत्तेवर आलेल्या संपुआच्या सदस्यपक्षांतील खासदारांनी आणि कार्यकर्त्यांनी, 'जितं मया' अशी आरोळी ठोकली आणि ध्रुवबाळाप्रमाणे आपणास हे स्थान कायमपट्ट्याने मिळाले आहे असे वागायला सुरुवात केली.

सोनिया गांधींनी पंतप्रधानपद स्वीकारले नाही हे त्यांच्या पथ्यावर पडले. कम्युनिस्टांची अरेरावी, लालुप्रसाद, शिबू सोरेन यांचा भ्रष्टाचार आणि गुन्हेगारी एका बाजूस आणि दुसऱ्या बाजूस रालोआची आर्थिक धोरणे पुढे चालवण्याची अपरिहार्यता हे सांभाळणे त्यांच्या अरेरावी स्वभावात जुळणारे नव्हते. सोनियाजींनी अत्यंत सोईस्कर अशी भूमिका स्वीकारली. डॉ. मनमोहन सिंह व पी. चिदंबरम यांनी शक्य तितक्या वेगाने रालोआची आर्थिक धोरणे पुढे चालवायची, त्यासंबंधी बोलताना, 'रालोआची धोरणे एका विशिष्ट वर्गाच्या भल्याची होती, देशातील सर्व लोकांचा अंतर्भाव करणारी नव्हती, आमची धोरणे सर्वसमावेशक आहेत,' असा कांगावा करायचा आणि जेथे जेथे संपुआ शासनाचे कार्यक्रम जनसामान्यांचा प्रक्षोभ घडवतील, तेथे बाईंनी फक्त पंतप्रधानांना पत्रे पाठवायची; विशेष आर्थिक क्षेत्र, किरकोळ व्यापार व्यवस्था यांबाबतीत आपण जणू जनसामान्यांच्या नेत्या आहोत, अशा आविर्भावात लिहिलेल्या या पत्रांना भरपूर प्रसिद्धी द्यायची. असा हा संपुआचा विचित्र संसार गेली तीन वर्षे चालू आहे.

'रालोआने संपुआच्या हाती कारभार सुपूर्द केला, त्या वेळी उत्पादनाची गती उच्चांकाला पोहोचली होती, अंदाजपत्रकी तूट आणि महसुली तूट – दोन्हीही आटोक्यात होत्या, महागाई वाढण्याची गतीही आटोक्याबाहेर गेली नव्हती,' हे सर्व पी. चिदंबरम यांनी संसदेला सादर केलेल्या पहिल्या आर्थिक सर्वेक्षणात मान्य केले आहे. त्यानंतरच्या प्रत्येक अंदाजपत्रकी भाषणात त्यांचा सूर बदलत गेला आहे आणि 'उत्पादनवाढीची गती ८ टक्क्यांवर स्थिरावली आहे, ती ९ किंवा १० टक्क्यांवर झेप घेण्याची शक्यता आहे, ही सर्व करामत संपुआ शासनाच्या धोरणांची म्हणजे आपलीच (मनमोहन सिंह आणि सोनियाजींच्या नेतृत्वाखाली) आहे', असे ते भासवीत आहेत. आता विरोधी बाकांवर बसलेले रालोआचे माजी अर्थमंत्री यशवंत सिन्हा आणि जसवंत सिंग हे प्रत्येक वेळी हा सगळा रालोआचा पराक्रम आहे असे आवर्जून सांगत असतात.

वस्तुस्थिती अशी आहे, की याचे श्रेय संपुआलाही नाही आणि रालोआलाही नाही. याचे श्रेय काही अंशी डॉ. मनमोहन सिंग यांना जाते; पण ते संपुआचे पंतप्रधान म्हणून नव्हे तर पी. व्ही. नरसिंह राव यांचे अर्थमंत्री म्हणून. १९९० च्या दशकात दिवाळखोरीवर आलेली अर्थव्यवस्था सावरण्याचे काम डॉ. मनमोहन सिंह यांनी (नरसिंह राव यांच्या नेतृत्वाखाली) केले. परिणामतः, गहाण ठेवलेले गंगाजळीतील सोने परत आले, लायसन्स्-परमिट-कंट्रोल राज काहीसे शिथिल

झाले, भारतीय उद्योजकांचे श्वास थोडे मोकळे झाले. परदेशांतून येऊ लागलेल्या गुंतवणुकीचा उपयोग करून, त्यांनी औद्योगिक विकासाची घोडदौड चालू केली. दहा वर्षांत भारतीय बहुराष्ट्रीय कंपन्या उभ्या राहिल्या. परदेशांतील मोठे उद्योगधंदे त्यांनी ताब्यात घेतले. जगातील पहिल्या ५०० उद्योजकांत १० टक्के भारतीय चेहरे दिसू लागले. ही सारी कर्तबगारी, पंडित नेहरूंच्या समाजवादी व्यवस्थेत साखळदंडांनी जखडून ठेवलेल्या उद्योजकांना ९० च्या दशकात थोडी ढील मिळाली; त्यामुळे साकार झाली. नेहरूवादाची निष्फलता डॉ. मनमोहन सिंह यांनी (नरसिंह राव यांच्या नेतृत्वाखाली) उघडी पाडली, अर्थव्यवस्थेने घूम जाव केले म्हणून हे साधले.

सवर्ण भारतीयांचा देशात रागराग चालू आहे. या समाजातील बहुसंख्य मंडळी विशेष प्रतिभासंपन्न व बुद्धिमान आहेत, हे आज जगन्मान्य झाले आहे. गणकशास्त्राच्या आघाडीच्या क्षेत्रात त्यांनी आपली कर्तबगारी सिद्ध करून दाखवली. अमेरिकेसारखे सुधारलेले जग जेव्हा झोपी गेलेले असते तेव्हा आपल्याकडे दिवस असतो, या परिस्थितीचा फायदा घेऊन माहितीक्षेत्रात प्रचंड क्रांती झाली. या क्षेत्रातील प्रगतीचे श्रेय रालोआ, अटल बिहारी वाजपेयी आणि प्रमोद महाजन यांच्याकडे जाते. भारतीय उद्योजक आणि बुद्धिजीवी वर्गांनी घेतलेली ही छलांग दीर्घ पल्ल्याची आहे. ही छलांग आता भारताला एक अग्रेसर देश बनवल्याखेरीज थांबणार नाही.

याचे श्रेय कोणत्याही पक्षाने किंवा आघाडीने का घ्यावे? शासनातील सत्तेने काही चांगला कार्यक्रम राबवला म्हणून ही प्रगती झाली असे कोणालाच म्हणता येणार नाही. शासनाने ज्या प्रमाणात उत्पादकवर्गाला – उद्योजकांना, कारखानदारांना आणि शेतकऱ्यांना – जाच करायचे टाळले, तितक्या प्रमाणात विकासाची गती वाढत आहे आणि वाढत राहील. या विकासाला खीळ बसण्यासाठी काही उपद्व्याप शासन करील, तर तेवढ्या प्रमाणात विकासाची गती कमी होईल. शासनाला प्रशासकीय खर्च ताब्यात ठेवता आला नाही, अंदाजपत्रकी तूट सांभाळता आली नाही किंवा महागाईचा दर कह्यात ठेवता आला नाही, तर बंधनातून अंशतः सुटलेल्या एका वर्गाने प्रगतीची ही जी छलांग मारली आहे तिचा दम तुटेल.

"रालोआचे अर्थकारण हे एकांगी होते, सर्वसमावेशक नव्हते; याउलट, संपुआचे अर्थकारण सवेसमावेशक आहे, 'आम आदमी'चे भले करण्यासाठी आहे; दलित, आदिवासी, अल्पसंख्याक (मुसलमान) यांच्या हिताचे आहे एवढेच

नव्हे तर, पिछाडीस राहिलेल्या वर्गांचा राष्ट्राच्या संपत्तीसाधनांवर अग्रहक्क आहे,'' असे संपुआचे धुरीण शक्य होईल तितक्या वेळा आवर्जून मांडतात. ३० वर्षांपूर्वी जेव्हा शेतकरी आंदोलन उभे राहिले त्या वेळी म्हणजे अगदी समाजवादाच्या नियोजनकालखंडातही 'देशातील गरीब हा शेतीशी जोडलेला आहे, शेतकरी आहे, शेतमजूर आहे' या गोष्टीस विद्वानांची आणि शासनाचीही मान्यता होती. त्यानंतर, शेतकऱ्यांच्या आर्थिक हालाखीत काही फरक पडला आहे असे लक्षण नाही. याउलट, संपुआ शासनाच्या गेल्या तीन वर्षांत पूर्वी कधी नव्हे इतक्या प्रमाणात शेतकरी आत्महत्या करीत आहेत. तरीही, 'शेतीव्यवसाय हा गरिबीचे मूळ आहे,' हे संपुआला मान्य नाही. पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी आर्थिक सुधारांचा कार्यक्रम १९९० च्या दशकात राबवला, त्याही वेळी शेतीला निर्बंधमुक्त करण्याकडे त्यांनी संपूर्ण दुर्लक्ष केले आणि, प्रामुख्याने, गुंतवणूक, तसेच उद्योगधंदे एवढ्याच क्षेत्रांत धुगधुगी आणणारे आर्थिक सुधारांचे कार्यक्रम राबवले. शेतीच्या आजच्या दु:स्थितीचे प्रमुख कारण आर्थिक सुधारांच्या पहिल्या टप्प्यात डॉ. मनमोहन सिंग यांनी (नरसिंह राव यांच्या नेतृत्वाखाली) शेतीकडे दुर्लक्ष केले हे आहे. आजही आत्महत्याग्रस्त विदर्भाच्या भेटीस गेल्यानंतर ते शेतकऱ्यांची गरिबी व कर्जबाजारीपणा यांची कारणे शोधण्याकरिता 'सत्यशोधन समिती' नेमतात आणि केवळ मध्यस्थांनाच लाभ पोहोचवणारी 'पॅकेजेस्' जाहीर करतात. अर्थमंत्री पी. चिदंबरम आपल्या अंदाजपत्रकी भाषणात 'शेतीला सर्वोच्च प्राधान्य देण्याची' घोषणा करतात; पण शेतीसाठी काहीही तरतूद करत नाहीत. या सगळ्यांमागे काँग्रेस, डावे पक्ष इत्यादींचा शेतकरीद्वेषच दिसून येतो. संपुआच्या काळातच विशेष आर्थिक क्षेत्राबाबत (ऐं) शेतकऱ्यांच्या जमिनी लुबाडण्याचे धोरण कर्झनशाही पद्धतीने राबवण्यात येते हेही संपुआ संस्कृतीतील शेतकऱ्याबद्दलच्या विद्वेषाचे लक्षण आहे. संपुआच्या व्याख्येत गरिबी आणि मागासलेपण हे जन्माच्या अपघाताने ठरते, आर्थिक व्यवसायाने नाही. संपुआचे तथाकथित सर्वसमावेशक आर्थिक धोरण हे विकासकार्यक्रमाची दिशा शेतीपासून दलित, आदिवासी आणि मुसलमान यांच्याकडे वळवण्याचे कारस्थान आहे.

हे समजण्यासारखे आहे. शेतकऱ्याला कितीही नागवले; तरी तो पारंपरिक पुढाऱ्यांना आणि स्वजातीच्या उमेदवारांना मते देतो. याउलट, दलित, आदिवासी आणि मुसलमान यांतील प्रत्येकाने आपली मतदाताशक्ती तयार केली आहे व ते जथेबंदीने मते देतात, याचा धसका संपुआने घेतला आहे.

शेतकऱ्यांनी धर्म, जातपात सोडून, 'शेतकरी' ही अस्मिता जोपासली नाही.

दलितांवर होणाऱ्या अत्याचाराचा प्रश्न असो, दलित ज्यांना पूज्य मानतात अशा विभूतींच्या पुतळ्यांची-प्रतिमांची विटंबना असो किंवा आरक्षणासारखा मुद्दा असो विरोधकांवर दालितमात्र फुत्कार करून चालून जातात. अलीकडे इतर मागासवर्गीयां(ओबीसी)च्या आरक्षणाचा प्रश्न उभा राहिला, तेव्हा देशभर सर्वदूर निषेध झाला; दक्षिणेतील काही राज्यांततर कडकडीत बंदही पाळण्यात आला. इतर मागासवर्गीयांना उच्च शिक्षणसंस्थांमध्ये २७ टक्के आरक्षण देण्याचे ठरले त्या वेळी केवळ एका मुसलमान खासदाराने, 'इस्लामी शिक्षणसंस्थांवर हा नियम लागू करू नये, केल्यास गंभीर परिणाम होतील,' असा धमकीवजा इशारा देताच संपुआ सरकारने ओबीसी-आरक्षणव्यवस्थेतून सर्व अल्पसंख्याक शिक्षणसंस्थांना वगळण्याचे मान्य केले. दलित, आदिवासी, मुसलमान यांनी आपापली संघशक्ती उभी केली आहे. त्या संघशक्तीची ताकद ते निवडणुकीत दाखवून देऊ शकतात या कारणाने त्यांच्यापुढे झुकूनझुकून मुजरा करणे सत्ताधीश आणि सत्ताभिलाषी दोघांनाही अपरिहार्य झाले आहे.

शेतकरी आंदोलन सर्वांत जुने. जोपर्यंत ते सावकारविरोधी आणि जमीनदारविरोधी होते तोपर्यंत, प्रस्थापित वरिष्ठ जातींविरुद्धच्या भावनेने, शेतकरी चळवळीत निदान जातीच्या आधाराने एकता तयार झाली होती. पण, धर्म, पंथ, जात, भाषा इत्यादी भेदाभेदांना दूर करून, 'शेतकऱ्यांना सन्मानाने आणि सुखाने जगता यावे' या एककलमी कार्यक्रमासाठी लढणारे आंदोलन शेतकऱ्यांत सांघिक किंवा सामुदायिक अस्मिता तयार करण्यात यशस्वी झाले नाही. परिणाम असा की, हजारो शेतकऱ्यांना आत्महत्या करावी लागली, तरी शेतकऱ्यांच्या आक्रोशाकडे शासन फारसे लक्ष देत नाही; उलट, शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे भांडवल करून आपल्या पुठ्ठ्यातील सहकारी व इतर यंत्रणांना प्रचंड लाभ मिळवून देणाऱ्या योजनांची 'पॅकेजेस्' जाहीर करते. शेतीवर पोट असणाऱ्या लोकांची संख्या ६० टक्क्यांवर, तर दलित, आदिवासी, इतर मागासवर्गीय व मुसलमान यांची बेरीज ६५ टक्क्यांवर जाते. दलित, आदिवासी, इतर मागासवर्गीय व मुसलमान हे चारही समाजघटक त्यांच्या त्यांच्या नेत्यांनी सशक्त एकजुटीचे बनवले. या चारही घटकांतील एकसमान प्रकृती ती तुलनेने संपन्न असलेल्या बहुसंख्याक समाजघटकांची. दलितांना हजारो वर्षे त्यांच्या पूर्वजांवर झालेल्या अन्यायाची चीड, आदिवासींना जंगलसंपत्तीवरील त्यांचे हक्क हिरावले जात असल्याची भीती, या चारही वर्गांत संख्याबळाने वरचढ असलेल्या इतर मागासवर्गीयांना आपल्या राजकीय ताकदीची असलेली जाणीव व फारसा मोठा ऐतिहासिक

अन्याय न सोसताही मागासलेपणाचा फायदा मिळवण्याची हाव आणि, सर्वांत शेवटी, एक ग्रंथ, एक प्रेषित व एका अपरिचित लिपीचा भुईकोट किल्ला बांधून, त्यात स्वत:ला कोंडून घेतलेल्या मुसलमान समाजाचा मागासलेपणाचा आक्रोश या समान प्रकृतीमुळे या चार समाजांचेही एक गठबंधन होऊ लागले आहे. या गठबंधनाच्या नजरेत समान शत्रू जास्तीत जास्त सवर्ण हिंदूच असायला पाहिजे. पण, अल्पसंख्याक सोडल्यास बाकी सारे हिंदू अशा हिंदुत्ववादी आग्रहामुळे आणि संपुआच्या राजकीय दबावामुळे त्या सर्वांना सर्व हिंदूच आपले समान शत्रू वाटतात.

दलित समाजाला नेतृत्व दिले ते बहुजन समाजातील अनेक लोकोत्तर नेत्यांनी. महाराष्ट्रात ही परंपरा जोतीबा फुले, शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची आहे. मुसलमान समाजातील अलगवादाचे उत्तरदायित्व महात्मा गांधी आणि बॅ. जीना यांना जाते. त्यानंतरच्या काळात मुसलमानांच्या आर्थिक पीछेहाटीच्या प्रश्नाला बगल देऊन, सामाजिक प्रश्नाला प्राधान्य देण्याचे कौशल्य अनेकांनी दाखवले. मशिदीवर ध्वनिवर्धक लावणे, त्यांना पैसा पुरवणे हे काम करणाऱ्यांचा त्यात वाटा आहे. मुसलमान समाजाच्या बकालीकरणामुळे त्यातील तरुण पिढी गुन्हेगारीकडे वळू लागली; त्यामुळे, दाऊद इब्राहिम इत्यादी माफियांचाही त्यात मोठा हिस्सा आहे.

आदिवासी समाजात लोकधुरीण नेते होऊन गेले. त्यांनी केलेली बंडे कंपनी राज्याच्या आणि इंग्रजी अमलाच्या सुरुवातीच्या काळातच कठोरपणे मोडून काढण्यात आली. त्यानंतर त्यांचे असे नेतृत्व उभे राहिलेच नाही. शहरातील पांढरपेशा वर्गातील डाव्या चळवळीतील काही कार्यकर्त्यांनी आपले आयुष्य आदिवासी कार्याला दिले. त्यांनी जंगलभागातील आदिवासीचे शोषण करणाऱ्यांविरुद्ध लढेही उभे केले. पण, ती पिढी संपली तसे बहुतेक ठिकाणी काँग्रेसी नेत्यांनी आदिवासी समाजावर प्रभुत्व स्थापित केले. शाहू समाजाच्या आसपासच्या काही आदिवासी प्रदेशात या काँग्रेसी नेत्यांनी सरकारी खर्चाने काही चांगल्या योजना राबवल्याही. परिणामत:, त्यांचे या समाजावरील वर्चस्व आजही राजकीय निवडणुकांत दिसून येते. शाहू वस्तीपासून दूरवर असलेल्या आदिवासी प्रदेशांकडे कोणीच फारसे लक्ष दिले नाही. आज त्या प्रदेशात नक्षलवाद्यांनी आपले वर्चस्व जमवले आहे. या नक्षलवाद्यांचा आणि बंगालमधील जुन्या नक्षलवाद्यांचा तसा काहीच संबंध नाही. त्यांच्यात कोणीही अभ्यासक नाहीत आणि ध्येयवेडेही नाहीत. शाहू समाजात प्रवेश मिळविण्यात असफल

झालेली काही तरुण मंडळी हाती शस्त्रे घेऊन, सर्रास खंडणीवसुलीचा व्यवसाय करतात आणि त्यालाच 'नक्षलवादी' असे नाव देऊन काहीसा उदात्त मुखवटा चढवण्याचा प्रयत्न करतात.

केवळ नामसाधर्म्यामुळे नक्षलवादी चळवळीचे श्रेय आणि कलंक – दोन्हीही कम्युनिस्ट पक्षाला मिळाले आहेत. चळवळीचा फायदा सोडण्याइतके कम्युनिस्ट पक्षाचे नेते काही दुधखुळे नाहीत. संपुआ सरकारातील आपले वजनदार स्थान वापरून ते, संपुआ शासन नक्षलवाद्यांना संपूर्ण निपटून काढण्याइतकी कठोर कारवाई करणार नाही, याची काळजी घेतात. या नक्षलवाद्यांना होणारा शस्त्रास्त्रांचा पुरवठा प्रामुख्याने नेपाळातील माओवाद्यांमार्फत, पार दक्षिणेत आंध्र प्रदेशापर्यंत होत जातो. देशातील १४० जिल्ह्यांत नक्षलवाद्यांनी आज 'हवे तेथे आणि हवे तेव्हा' गनिमी काव्याचे हल्ले करण्याची शक्ती जमवली आहे.

नक्षलवाद्यांच्या बाबतीत संपुआ शासनाची स्थिती 'अवघड जागी दुखणे आणि वैद्य जावई' अशी झाली आहे. नक्षलवाद्यांविरुद्ध परिणामकारक उपाययोजना होत नाही, त्यांच्याबरोबर संपुआची राज्यशासने वाटाघाटींची गुऱ्हाळे घालतात, नक्षलवादी आगगाड्या पाडतात, पोलीसतळांवर हल्ले करून पन्नासपंचावन्न पोलिसांना ठार करतात तरीही केंद्रीय गृहमंत्री मख्खपणे, 'नक्षलवादी काही निव्वळ आतंकवादी नाहीत; त्यांचे काही तत्त्वज्ञान आणि आर्थिक विचार आहे; ते लोकांच्या आर्थिक समस्या घेऊन उठतात त्यामुळे त्यांच्याशी सामोपचाराने वागले पाहिजे', अशी मखलाशी करतात.

मुसलमान समाजाचा फायदा करून देण्यासाठी दलित, आदिवासी व इतर मागासवर्गीय यांच्याप्रमाणे त्यांनाही आरक्षण मिळावे असे प्रयत्न केंद्रातील आणि इतर राज्यांतील संपुआ शासने सातत्याने करत असतात. आतंकवादी विस्फोटातील प्रत्येक आतंकवादी आजपर्यंत मुसलमान समाजातीलच निघाला आहे. मुसलमान वस्तीत जागोजागी हत्यारे लपवली जातात आणि अनेक मदरशांमध्ये 'आतंकवादी मंत्र आणि तंत्र' यांचे पद्धतशीर प्रशिक्षण दिले जाते हे सर्वविदित असतानाही संपुआचे प्रवक्ते, 'प्रत्येक आतंकवादी मुसलमान असला तरी प्रत्येक मुसलमान आतंकवादी नाही', असा युक्तिवाद करतात. प्रत्येक आतंकवादग्रस्त देशात आतंकवाद निपटण्यासाठी विशेष कायदे करण्यात आले आहेत. पण, त्या कायद्यांचा उपयोग करून काही मुसलमानांना त्रास देण्यात आला अशा युक्तिवादाने रालोआने अमलात आणलेला 'पोटा' कायदा संपुआने रद्द केला.

आसामात बांगलादेशीयांनी प्रचंड प्रमाणात घुसखोरी करून, तेथील राजकारणावर

आपला रंग जमवला आहे. घुसखोरांची चौकशी करून, त्यांना मायदेशी परत पाठवण्यासाठी रालोआच्या काळात एक वेगळे न्यायालय स्थापण्यात आले होते. 'त्यामुळेही काही निरपराध मुसलमानांना हैराण केले जाते,' अश्या मखलाशीने संपुआने एक नवी व्यवस्था उभी केली. खुद्द सर्वोच्च न्यायालयाने, 'या संपुआप्रणीत नव्या व्यवस्थेत कोणाही घुसखोरावर कारवाई झाली नाही,' अशी टिप्पणी केली आहे. पण, तरीही आपली 'बांगलादेशी घुसखोर' धार्जिणी व्यवस्था बदलण्यास हे शासन तयार नाही.

रालोआला हटवून डावे, दलित, आदिवासी आणि मुसलमान यांची ही संयुक्त पुरोगामी आघाडी 'हिंदुद्वेष म्हणजे पुरोगामित्व' असे वातावरण तयार करत आहे. त्यांच्या हिंदुत्वविरोधाचे समर्थन समजणे कठीण आहे. दस्तुरखुद्द, दिल्लीतील जामा मस्जिदीचे इमाम यांनीच निर्वाळा दिला आहे, की 'देशात जी निधार्मिकता आहे त्याचे श्रेय कोणा गांधी-नेहरूंना नाही आणि नेहरू-गांधींनाही नाही. ही निधार्मिकता हिंदूंच्या सहिष्णु प्रकृतीमुळे आहे.'

समाजवादी रशियाच्या चढत्या काळात भारतात कम्युनिस्टांचे राज्य आले असते, तर आज बाजारपेठवाद मांडणाऱ्या सर्वांचे त्यांनी शिरकाण केले असते हे कम्युनिझमच्या प्रसाराच्या इतिहासावरून स्पष्ट आहे. एक पश्चिम बंगाल हाती लागला, तर मार्क्सवाद्यांनी तेथे पोलिस व होमगार्ड दलांत लालभाईंची भरती करून, दडपशाहीचे काय तांडव केले ते नुकतेच नंदीग्राममध्ये जगाने पाहिले आहे.

मुसलमान अमदनीत काय होते, या अनुभवाचे चटके लोक अजून विसरलेले नाहीत. ख्रिश्चन धर्मोपदेशकांनी धर्मपरिवर्तनासाठी गोव्यात काय थैमान घातले याचीही नोंद इतिहासात आहे. अशा सगळ्या अनुभवांच्या पार्श्वभूमीवर या हिंदुबाहुल्य देशात मुसलमान राष्ट्रपती, शीख पंतप्रधान, सत्तारूढ संपुआच्या अध्यक्ष कॅथॉलिक ख्रिश्चन आणि सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश दलित समाजातील हे सहिष्णुतेचे आणि निधार्मिकतेचे जगभरातील अनन्यसाधारण ज्वलंत उदाहरण आहे.

देशांतर्गत राजकारणाच्या सोयीने भाजपचा काटा काढण्यासाठी गुजराथमधील दंग्यांचा वापर, १९८४ मध्ये दिल्लीत शिखांचे शिरकाण घडवून आणणाऱ्या काँग्रेसपक्षीयांनी प्रचारासाठी करावा हा विनोद आहे; पण समजण्यासारखा विनोद आहे; पण, या हिंदुद्वेषाचा उपयोग राष्ट्रहिताला बाधा आणण्यापर्यंत करावा, यामागील मनोवृत्ती समजणे दुरापास्त आहे.

जगातील एकमेव हिंदुराष्ट्र म्हणजे नेपाळचे राज्य होते. तेथे माओवाद्यांनी बंडाळी उभारली. भूतान नरेशांच्या फौजांनी माओवाद्यांचा जसा फडशा पाडला तसे करणे नेपाळनरेशांच्या फौजेला अशक्य होते असे नाही; पण भारताच्या संपुआ सरकारने जाणीवपूर्वक नेपाळची कोंडी केली; नरेशांच्या मदतीला भारतीय फौजा पाठवण्याऐवजी नेपाळचा शस्त्रपुरवठा तोडला. अखेरीस, नेपाळी फौजेस शस्त्रास्त्रांसाठी पाकिस्तानपुढे हात पसरावे लागले. हिंदुस्थानात अनभिषिक्त घराणेशाही चालविणाऱ्या संपुआला नेपाळनरेश केवळ अभिषेकाने सत्तारूढ होतात म्हणजे तेथे लोकशाही नाही असा कांगावा करण्याचा काय अधिकार? नेपाळनरेश सत्ताभ्रष्ट झाले, संपुआतील पक्षांना आनंदी आनंद झाला.

अलीकडे, चीनचे पंतप्रधान भारतास भेट देण्यास आले होते. या भेटीच्या काळात दलाई लामांनी कोणतीही वक्तव्ये करू नयेत, असे बजावण्यासाठी परराष्ट्र सचिव खास धर्मशाळेत जाऊन आले. भारतात प्रवेश करण्यापूर्वी ईशान्येकडील अरुणांचल राज्य आणि नागालँड ही चीनची भूमी असल्याचे चीनच्या पंतप्रधानांनी जाहीर केले. भारताच्या राज्यघटनेप्रमाणे संघराज्याच्या अविभाज्य प्रदेशावर चीनने हक्क सांगितला आणि भारतीय कम्युनिस्टांनी त्याची तरफदारी केली. तिबेटवर चिन्यांची सर्वंकष सत्ता नेहरूंनीच करून दिली होती. आता त्यांच्या वारसदारांनी नेपाळ माओवाद्यांच्या हवाली केला. अरुणांचल आणि नागालँड चीनला गिळंकृत करू दिला म्हणजे सारा भारत ईशान्य दिशेस उघडा पडणार आहे.

नेपाळनरेशांना कोंडीत पकडण्यामागे संपुआ सत्ताधाऱ्यांचे लोकशाहीप्रेम होते असे कसे म्हणावे ? शेजारच्याच ब्रह्मदेशात गांधी शांती पुरस्कार- आणि नोबेल पुरस्कारविजेती आँग सॅन स्यू क्यी तुरुंगात आहे. ब्रह्मदेशात शेवटी झालेल्या निवडणुकीत स्यू क्यीच्या पक्षाला प्रचंड बहुमत मिळाले होते. तेथील लष्करी अधिकाऱ्यांनी बंड करून तिला वर्षानुवर्षे तुरुंगात ठेवले आहे. ब्रह्मदेशातील पेट्रोल आणि मादक द्रव्ये यांच्या व्यापारावर लष्करी हुकूमशहा सत्ता टिकवून आहेत. ब्रह्मदेशातील आदिवासींवर लष्करी सत्ताधीश हिटलरी वंशोच्छेदाचे आक्रमण करत असताना, भारतातील आदिवासींचा पुळका दाखवणारे संपुआ सरकारचे राष्ट्रपती आणि परराष्ट्रमंत्री ब्रह्मदेशाला भेटी देतात, तेथील लष्करशहांशी करारमदार करतात, त्यांच्याशी हस्तांदोलने करतात; पण लोकशाहीची मशाल तेवत ठेवणाऱ्या स्यू क्यीला साधी भेट देण्याचा शिष्टाचारसुद्धा दाखवत नाहीत. ही असली संपुआची दांभिक लोकशाहीभक्ती!

नक्षलवादी आता झारखंड, छत्तीसगड, बिहार, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, महाराष्ट्र आणि आंध्र प्रदेश एवढ्या उत्तर ते दक्षिण सलग प्रदेशात मोर्चेबांधणी करून आहेत. कम्युनिस्टांचा डाव उघड आहे. १९४२ च्या स्वातंत्र्यलढ्यापासून दूर राहून, इंग्रजांना पाठिंबा देणारे साम्यवादी, १९६१ मध्ये चीनचे आक्रमण होत असताना, 'आमार चेअरमन, चेअरमन माओ' अशा उघड घोषणा देणारे कम्युनिस्ट यांच्या लेखी 'राष्ट्र' या संकल्पनेचे काहीच पावित्र्य नाही. स्वातंत्र्यानंतर इंग्रजांनी दिलेले स्वातंत्र्य स्वातंत्र्यच नव्हे; खरे स्वातंत्र्य 'नाही रें'च्या सशस्त्र उठावानेच येईल असा कॉम्रेड रणदिवे यांचा सिद्धांत होता. इंदिरा गांधींच्या काळात हा रणदिवे सिद्धांत कम्युनिस्टांनी बाजूला ठेवून, काँग्रेसशी सोयरिक केली होती; पण इंदिरा गांधींच्या संख्याबळामुळे ते काँग्रेसला नमवू शकत नव्हते. इंदिराजींच्या सूनबाई सोनियाजी यांच्याकडे असे लोकसभेतील मतबाहुल्य नाही. कम्युनिस्ट त्यांना, पंतप्रधान मनमोहन सिंग यांना आणि अर्थमंत्री पी. चिदंबरम यांनाही आपल्या तालावर नाचवीत आहेत. भविष्य निर्वाह निधीचा व्याजदर, कामगार कायदे, परदेशी गुंतवणूक, किरकोळ विक्रीची व्यवस्था आणि महागाई अशा प्रश्नांवर काँग्रेसवर टिकेचे आसूड ओढायला कम्युनिस्ट नेते कमी करत नाहीत. त्यांच्यातील एका नेत्याला, 'संपुआ कामगारविरोधी धोरणे आखते तर तुम्ही त्यांचा पाठिंबा काढून का घेत नाहीत ?' असे विचारले असता, 'आम्ही काय करतो आहोत ते आम्ही चांगले समजून आहोत', असे त्यांनी उत्तर दिले. याचा अर्थ उघड आहे. समाजसत्तावादी कम्युनिस्ट 'आम आदमी'वादी काँग्रेसचा उपयोग करून भारताला पुन्हा कम्युनिस्ट बनवू पाहत आहेत; एवढेच नव्हे तर, शिल्लक कम्युनिस्ट देश – क्यूबा, व्हेनेझुएला – यांच्या तुलनेत भारतात साम्यवादाचे केंद्रस्थान उभारू पाहत आहेत. सध्याच्या नक्षलवाद्यांनाच गणवेश दिले, की कायदा आणि सुव्यवस्था त्यांच्याकडेच सोपवून अगदी स्टॅलिनवादी कम्युनिस्ट व्यवस्थासुद्धा राबवता येईल अशी त्यांची व्यूहरचना आहे.

जम्मू-काश्मिरबद्दलचे संपुआचे धोरणसुद्धा असेच बोटचेपे आहे. तेथील आतंकवादी मुसलमान नेते मन चाहेल तेव्हा पाकिस्तानात जातात, त्यांच्या राष्ट्रध्यक्षांशीही बोलणी करून येतात; नियंत्रणरेखा पार करून किंवा एरवी खुले आम अनेक पाकिस्तानी हिंदुस्थानात येतात आणि नाहीसे होतात. येथून अनेक मुसलमान तरुण लष्कर-ए-तोयबाच्या प्रशिक्षणासाठी पाकिस्तानात सर्रास जातात व परत येतात. काश्मिरमध्ये हर दिन विस्फोट होत आहेत आणि तरीही, तेथून भारतीय फौजा काढून घेण्यास संपुआ सरकार संमती देते. खुद्द संसद भवनावर

हल्ला करणाऱ्या आणि सर्वोच्च न्यायालयापर्यंत सर्व न्यायालयांत दोषी सिद्ध होऊन फाशीची शिक्षा झालेल्या अफजल गुरु याला फाशी दिली तर भयंकर गंभीर परिणाम होतील असा इशारावजा सल्ला काँग्रेसचे मुख्यमंत्री गुलाम नबी आझाद देतात. केरळ राज्यातील विधानसभेच्या निवडणुकीत काँग्रेस आणि कम्युनिस्ट पक्ष अफजल गुरु आणि ओसामा बिन लादेन यांची चित्रे उघडपणे मिरवतात. ही काही धर्मसहिष्णुतेची लक्षणे नाहीत, अनुरंजनाचीही नाहीत; हिंदुत्वाला विरोध करण्याच्या भरात जातीयवादी मुसलमानांना प्रोत्साहन देऊन भडकवण्याचे हे काम आहे.

संपुआची अशी धोरणे चालली, तर ईशान्य ते अग्नेय असा उभा पट्टा चीनच्या वर्चस्वाखाली येईल आणि वायव्येकडील भाग पाकिस्तानला सहज गिळंकृत करता यावा अशी भूमी तयार होऊन जाईल. उत्तरेतील मध्यभाग हा आरक्षणवादी ताकदींच्या हाती जाईल. उरलासुरला दक्षिणेतील आणि पश्चिमेतील भाग एवढाच काय तो भारत या नावाने शिल्लक राहील.

१९४७ सालच्या फाळणीपेक्षा ही संपुआपुरस्कृत फाळणी, हजारो वर्षांच्या परकीय आक्रमणाला तोंड देऊन तग धरून राहिलेल्या भारतवर्षाला पृथ्वीच्या नकाशातून खोडून टाकील.

एका बाजूस भारताला महासत्ता बनवून देदीप्यमान बनवण्याचा कार्यक्रम आखणारी राष्ट्रीय लोकशाही आघाडी आणि दुसऱ्या बाजूला देशाची सर्व ऐतिहासिक अभिमानस्थळे नष्ट करून देशाचे तुकडेतुकडे करण्यास सज्ज झालेली संयुक्त पुरोगामी आघाडी असे चित्र आहे.

हे असे का घडले ? याला जबाबदार कोण ? घराणेशाही चालवण्याच्या राक्षसी महत्त्वाकांक्षेने प्रेरित झालेल्या सोनिया गांधींचा हा दोष मानता येणार नाही. त्यांच्या परिस्थितीत, पतीची हत्या झाल्यानंतर, त्यांचे खानदान ज्या पक्षाबरोबर शंभराहून अधिक वर्षे जोडले गेले आहे त्या पक्षाला पुन्हा वैभवाचे दिवस दाखवावे अशी महत्त्वाकांक्षा त्यांनी जोपासावी यात अनैसर्गिक काहीच नाही. खरी जबाबदारी दोन गोष्टींवर ठेवता येईल.

पहिली म्हणजे, भारतीयांची राजवंशांवर निष्ठा ठेवण्याची प्रवृत्ती. देशात अनेक कर्तबगार नायक होऊन गेले. सरदार पटेल, सुभाषचंद्र बोस, डॉ. राममनोहर लोहिया, लाल बहादूर शास्त्री, चक्रवर्ती राजगोपालाचारी यांच्यासारख्यांना जनतेने अव्हेरले आणि काही व्यासंग नाही, तपस्या नाही, राष्ट्रसेवेचा अनुभव नाही अशा लोकांना एकामागोमाग एक, ते केवळ नेहरू-गांधी खानदानातील किंवा त्या

खानदानाशी निष्ठावंत आहेत याकरिता मोठेपण दिले. जन्माच्या अपघाताने निवडलेल्या लोकांच्या हाती सत्ता गेली तर देशाचे वाटोळे व्हावे हे साहजिकच आहे. सोनियाजी स्वत: ख्रिश्चन धर्माच्या, हिंदु संस्कृती ही मागासलेल्या अडाणी लोकांची आहे असे शिकवणाऱ्या समाजाच्या.

देशाच्या या अध:पाताची मुख्य जबाबदारी गावातील शेतकरी समाजाची आहे. ६० टक्क्यांच्या वर असलेला समाज एकसंघ राहिला असता, जो पक्ष शेतकऱ्यांचे भले करील त्याच्या हातीच राजमुकुट सोपवणारा झाला असता, जातीपातीच्या, नात्यागोत्याच्या आधाराने आणि प्रलोभनाला बळी पडून मत देणारा झाला नसता तर राज्यसत्ता मिळवण्यासाठी कोणत्याही पक्षाला दलित, आदिवासी, मुसलमान यांच्यापुढे नाकदुऱ्या काढाव्या लागल्या नसत्या. केवळ राष्ट्रप्रेमी शेतकऱ्यांच्या ताकदीवर कोणताही पक्ष सत्तेवर येऊ शकला असता. पण, असे झाले नाही.

महाराष्ट्रातीलच स्थिती पाहा. आघाडीतील काँग्रेस पक्षाने २००४ सालच्या विधानसभा निवडणुकीच्या जाहीरनाम्यात शेतकऱ्यांना मोफत वीज देण्याचे आश्वासन दिले होते, कापसाला प्रती क्विंटल २७०० रुपयांचा भाव देण्याचे जाहीर केले होते. आश्वासन पुरे करता आले नाही तर समजू शकेल; पण, 'मते मिळवण्यासाठी निवडणुकीच्या आधी अशी खोटी आश्वासने द्यायचीच असतात' असे सांगून आपला हेतूच अप्रामाणिक असल्याची ग्वाही देणाऱ्या पक्षाबद्दल शेतकऱ्यांच्या मनात राग नाही. गेल्या निवडणुकीत काँग्रेसविरुद्ध प्रचार करून विरोधी पक्षांच्या तिकिटावर निवडून आलेले आमदार, खासदार त्या पक्षांशी बेइमानी करून काँग्रेसमध्ये जातात, ज्यांच्यावर कठोर टिकेचे आघात केले त्यांचेच पाय चाटतात आणि तरीही, मागील निवडणुकीतील आपल्या अप्रामाणिकपणाची उघडउघड ग्वाही देणाऱ्या काँग्रेस पक्षाच्या तिकिटावर प्रचंड मताधिक्याने पुन्हा निवडून येतात. ते कसे निवडून येतात हे सर्वश्रुत आहे. सर्व दलित, आदिवासी, मुसलमान वस्त्यांत आणि कामगारांच्या झोपडपट्ट्यांत आता गुंडांचे राज्य प्रस्थापित झाले आहे. निवडणूक जिंकण्यासाठी त्या त्या वस्त्यांतील गुंडांच्या टोळीप्रमुखांना विकत घ्यावे लागते. हे एकदा केले की संपुआप्रणीत जन्माधिष्ठित मागासवर्गीय हिरीरीने जाऊन मतदान करतात. याउलट, शेतकऱ्यांना आपल्या अपमानास्पद जिण्याचे दु:ख नाही, आपले भाऊबंद हजारोंनी आत्महत्या करतात याची खंत नाही; जातीपाती, नातीगोती, प्रलोभने आणि जुन्या निष्ठा यांच्या आधाराने ते मतदान करतात आणि शेतकऱ्यांच्या शत्रूंनाच निवडून आणतात; एवढेच नव्हे

तर राष्ट्र मोडीत काढण्यासाठी सज्ज झालेल्यांना आपले मत देतात.

सोनिया गांधींची राक्षसी महत्त्वाकांक्षा समजण्यासारखी आहे; मागासवर्गीय आणि मुसलमान आपली परिस्थिती सुधारण्यासाठी संपुआला पाठिंबा देतात हे समजण्यासारखे आहे; कामगारवर्ग खुलीकरण झाले, स्पर्धेचे युग आले तर आपली धडगत नाही हे समजून संपुआला पाठिंबा देतात हेही समजण्यासारखे आहे. पण, प्रत्येक शेतकरी संपुआला मत देतांना आपण स्वत:च्या पायावर धोंडा पाडून घेत आहोत आणि राष्ट्रद्रोह करत आहोत असे समजत नाही यातच देशाच्या विनाशाची बीजे आहेत.

(६-२१ एप्रिल २००७)

◆◆

आता देश वाचविणे फक्त मतदारांच्या हाती

एप्रिल मे २००९ मध्ये लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुका होतील अशी चिन्हे दिसत आहेत. फेब्रुवारीच्या मध्यास संसदेचे या वर्षीचे शेवटचे सत्र बोलावले जाईल. नव्या वर्षाच्या शासकीय खर्चांच्या तरतुदीसाठी जुजबी अंदाजपत्रकाला लोकसभेने मान्यता दिल्यानंतर लोकसभा भंग करण्यात येईल आणि १५व्या लोकसभेच्या निवडणुकांची घोषणा करण्यात येईल असे अनुमान करावयास हरकत नाही.

पहिल्या गणतंत्राची पडझड

२०१० मध्ये देशाच्या राज्य घटनेला ६० वर्षे पुरी होतील. लोकशाही, समाजवाद आणि सर्वधर्मसमभाव या स्तंभांवर आधारलेले भारताचे संविधान आणि पहिले गणराज्य कोलमडून पडत आहे हे उघड आहे. भारतीय मतदारांच्या सुजाण कर्तव्यदक्षतेवर साऱ्या देशाचे भवितव्य अवलंबून आहे. या निवडणुकीच्या निकालांमुळे भारत संपन्न महासत्ता होणार, की भारताचे तुकडे तुकडे होऊन विनाश होणार याचा निर्णय मतदारांनी करावयाचा आहे.

गणतंत्राचा पहिला स्तंभ लोकशाही. देशात नियमितपणे निवडणुका घेतल्या जातात, त्यात फारसा हिंसाचार वगैरे होत नाही याचे सर्व श्रेय निवडणूक आयोग आणि सुरक्षा दलांना आहे. अन्यथा, देशातील लोकशाही कधीच अस्त पावली आहे.

लोकसभा, विधानसभा या परस्परसंवादाने निर्णय करण्याच्या संस्था राहिल्या नाहीत. पक्षबदलविरोधी कायद्यामुळे सर्वच पक्षांत श्रेष्ठींची हुकूमशाही चालू झाली आहे. संसदेत किंवा विधीमंडळात कोणी महान अभ्यासक विद्वान, वाक्‌पटू सदस्य चर्चेत भाग घेण्यास उभा राहिला, विषयाची मांडणी करताना व्यापक आकडेवारी आणि माहिती यांच्या आधाराने आणि अमोघ तर्काने बिनतोड असा

युक्तिवाद केला तरी त्याकडे कोणी लक्ष देत नाही आणि संसदेच्या निर्णयांमध्ये अशा दोनचार वक्त्यांमुळे काहीही फरक पडत नाही. संसदेचे निर्णय संसदगृहाच्या बाहेर घेतले जातात त्याप्रमाणे पक्षाच्या सदस्यांना आदेश दिले जातात.

निवडणुकांचे निकाल आल्यानंतर पहिल्या बैठकीत संख्याबळ जास्त कोणत्या पक्षाकडे आहे, हे स्पष्ट झाले की त्यानंतर ५ वर्षांपर्यंत त्या पक्षाची अंदाधुंद हुकूमशाही चालत राहते. सर्वसामान्य सदस्यांना आपला विचार ऐकवण्याची आणि तो थोडाफार तरी प्रसारमाध्यमांत दिसावा याकरिता एकच मार्ग उरतो. कोणत्याही विषयावरील चर्चेच्या वेळी सभापतींच्या समोरील प्रांगणात उतरणे, आरडाओरडा करणे, संसदेचे काम तहकूब करून घेणे. संसद ही आता बाहुबली पहिलवानांचा आणि मोठे नरडे काढून ओरडणाऱ्या मल्लांचा आखाडा झाला आहे.

स्वतंत्र भारतातील लोकशाहीला घराणेशाहीचा प्रादुर्भाव होईल अशी कल्पना स्वातंत्र्यआंदोलनाच्या काळी कोणी केली नसेल. त्या काळापासूनच एका घराण्यातील व्यक्तींनीच काँग्रेस पक्ष ताब्यात घेऊन, सत्तेची प्रमुख पदे वंशपरंपरेने स्वत:च्याच हातात राहतील, यासाठी भलेबुरे सर्व मार्ग वापरून, एक घराणेशाही प्रस्थापित केली आहे.

निवडणुकांचा उपचार प्रशासकीय दृष्टीने ठाकठीक पार पडतो, एवढेच. भारतासारख्या विविध जाती, वंश, धर्म, भाषा आणि परंपरा असलेल्या देशात स्वीकारली गेलेली निवडणूक पद्धत अत्यंत घातक ठरली आहे. भारतासारख्या विविधतेने नटलेल्या देशात प्रमाणशीर प्रतिनिधित्वाची पद्धत योग्य ठरली असती. प्रत्येक पक्षाला देशभरात ज्या प्रमाणात मते मिळतील, त्या प्रमाणात त्याला विधिमंडळात त्याच्या पूर्वप्रकाशित यादीतून सदस्य पाठवता येतील. अशा या पद्धतीत गुंड, खुनी, दरोडेखोर आणि भ्रष्टाचारी यांना विधिमंडळात प्रवेश मिळणे दुरापास्त झाले असते.

प्रमाणशीर प्रतिनिधित्वाच्या पद्धतीस पर्याय म्हणून प्रत्येक मतदारसंघामध्ये किमान निम्म्याच्या वर मते मिळविणारा उमेदवारच विजयी घोषित होईल अशीही व्यवस्था योग्य ठरली असती. दुर्दैवाने, स्वातंत्र्यानंतरच्या काळात फाळणी, निर्वासितांचे लोंढे, वेगवेगळ्या प्रांतांत झालेले उठाव यांचा बंदोबस्त करण्यासाठी मजबूत बहुमत असलेल्या एका पक्षाच्या हाती सत्ता असणे आवश्यक आहे असा सोईस्कर गैरसमज काँग्रेस पक्षाच्या धुरीणांनी आपमतलबीपणाने करून घेतला. काँग्रेस या एकाच पक्षाचे सज्जड बहुमत स्वातंत्र्यानंतर पंचवीस

ते तीस वर्षे राहिले; पण, ज्या संकटांच्या भीतीपोटी निवडणुकीची ही व्यवस्था स्वीकारण्यात आली, त्यांचा सामना स्वातंत्र्यप्राप्तीचे श्रेय निव्वळ गाजावाजा करून लाटलेल्या काँग्रेस पक्षाला करता आला नाही.

या उलट, साध्या मताधिक्याच्या (First Past the Post) निवडणुकीच्या या पद्धतीने भारतीय गणतंत्राचा सर्वधर्मसमभावाचा दुसरा स्तंभही डळमळीत होऊन गेला.

स्वातंत्र्यानंतरच्या काही काळात मतदारांनी 'स्वातंत्र्य आम्हीच मिळवले,' असा कांगावा करणाऱ्या काँग्रेस धुरीणांना निवडून द्यावे हे साहजिकच होते. स्वातंत्र्याच्या आंदोलनात दुसरे पर्यायी नेतृत्व उभे राहणे शक्यच नव्हते. जे पर्यायी त्यागी, विवेकी आणि धाडसी नेतृत्व रुजू लागले, ते ते गांधीवाद्यांनी कधी जातिऐक्याचा, कधी अहिंसावादाचा तर कधी उच्चवर्णीय स्वार्थाचा विचार मांडून उखडून टाकले होते. देशप्रेमापोटी अनंत यातना सोसणारे आणि पराकोटीचे प्रतिभाशाली नेते निष्प्रभ ठरवण्याचे कौशल्य गांधींकडे भरपूर होते. स्वातंत्र्यवीर सावरकर, नेताजी सुभाषचंद्र बोस, सरदार वल्लभभाई पटेल यांच्यासारखे नेते निष्प्रभ झाले. घराणेशाहीचे रान वाढवण्यासाठी आधीच अनुकूल असलेल्या भारताच्या भूमीत प्रयत्नांनी मशागत केली गेली.

नेहरूंचा समाजवाद, इंदिरा गांधींची 'गरिबी हटाव' या कार्यक्रमांचा बोलबाला होता, तोपर्यंत मतदारांपुढेही 'कोणाला मत द्यावे?' हा निर्णय फारसा कठीण नव्हता. नंतरच्या काळात मात्र धर्मवाद व जातिवाद फोफावू लागले. समाजवादाबरोबरच सर्व अर्थवादाचाच पाडाव झाला. कोणीही सगळ्या देशाचे काही भले घडवून आणील, ही मतदारांची आशाच मालवली. युद्धात हरलेल्या सैन्याप्रमाणे जो तो आपला जीव वाचवण्यामागे लागला. 'देशाचे भले कोण करील?' यापेक्षा 'माझे प्रश्न सोडवण्यात कोण मदत करील?' हा विचार प्रबळ झाला. मते मिळवण्यासाठी पैसा, दारू, भांडीकुंडी आणि आश्वासनांची खैरात यांचा सर्रास वापर होऊ लागला.

परिणामत:, निवडणूक जिंकण्यासाठी बहुसंख्य असलेल्या शेतकऱ्यांचे हित वा हिंदू समाजाच्या भावनांची कदर करण्याची आवश्यकता उरली नाही. निवडणुकांची रणनीती ठरवणारे धुरंधर कोणकोणत्या मतदारसंघांत, कोणकोणत्या जातींचे काय प्रमाण आहे याचा हिशेब घेऊन, कोणत्या जातिधर्माच्या लोकांचे गाठोडे बांधावे आणि विरोधी पक्षाची मते फोडण्याकरिता कोणते नाममात्र उमेदवार उभे करावेत, याची गणिते मांडू लागले. निवडणुकीच्या या व्यवस्थेतूनच

अल्पसंख्याकवाद जन्माला आला. दोनतीन अल्पसंख्याक जमातींना आंजारलेगोंजारले, त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायांची रडगाणी गायिली म्हणजे निवडणुकीची पूर्वतयारी होऊन जाते.

बहुतेक अल्पसंख्याक समाज आपापल्या वेगळ्या वस्तीत किंवा मोहल्ल्यात राहतात. या वस्त्यामोहल्ल्यांत समाजवादाच्या लायसन्स-परमिट-कोटा राजमुळे उदयास आणि भरभराटीस आलेले काळाबाजारवाले, तस्कर, गुंड आणि अधिकारी यांचेच राज्य चालते. निवडणुकीच्या दिवशी या माफिया नेत्यांना मतदारांना विकत घेण्यासाठी पैसा देण्याचीही गरज राहत नाही. 'जगायचे असेल आणि जिवंत राहायचे असेल अमक्या पक्षाला मते द्या' असे ही मंडळी दरडावून सांगतात. याउलट, बहुजन समाजातील धुरीण मंडळी मतदानाच्या कर्तव्याबद्दल उदासीनता दाखवतात. अल्पसंख्याकवाद हा गठ्ठामते मिळवण्याचा आणि त्याबरोबर महात्मेपण मिळवण्याचाही प्रशस्त राजमार्ग झाला आहे.

सारांश, लोकशाही, समाजवाद आणि सर्वधर्मसमभाव हे भारतीय संविधानाचे तीनही स्तंभ खिळखिळे झाले आहेत. घराणेशाही, अशास्त्रीय निवडणूकपद्धती आणि नेहरूप्रणीत समाजवाद यांमुळे पहिले भारतीय गणतंत्र कोसळत आहे. पर्यायी सशक्त गणतंत्र उभे राहावे अशी भावना असलेल्या राष्ट्रप्रेमी मतदारांनी २००९च्या सार्वत्रिक निवडणुकात गंभीर विचार करून, आपल्या मतदानाचा पवित्र हक्क बजावला पाहिजे.

शासनाचा शेतकरीद्वेष

भारतीय गणतंत्राच्या भवितव्यापलीकडे तीन अत्यंत तातडीचे आणि गंभीर प्रश्न देशापुढे उभे आहेत. भारतीय संविधानाचे तीन स्तंभ कसे कोसळत आहेत हे आपण पाहिले. पण, हे तीन स्तंभ डळमळीत होण्याआधीच देशाची 'भारत' आणि 'इंडिया' अशी आर्थिक फाळणी सर्व स्वातंत्र्योत्तर काळात राबवली गेली आणि 'भारता'विषयीचा सावत्रभाव आजही तितक्याच क्रूरतेने राबवला जात आहे. तीस वर्षे सातत्याने शेतकऱ्यांनी आंदोलन चालवले. भारत सरकार शेती जाणीवपूर्वक तोट्यात ठेवते हे जागतिक व्यापार संस्थेच्या दस्तावेजानेही मान्य केले. १९९५ ते २००५ या दहा वर्षांत दीड लाखांवर शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. एवढे होऊनही शेतीविरोधी कारवाया करण्याचे शासनाचे धोरण बदलत नाही. अलीकडे खाद्यतेल व तेलबियांची मुक्त आयात, परदेशांतून महागड्या गव्हाची आयात, तांदूळ, मका, दूधभुकटी यांच्या निर्यातीवर बंदी; तसेच शेतीमालाच्या वायदेबाजारावरील सर्वंकष बंधने हे शेतकरीविरोधी धोरणाचे

ताजे पुरावेच आहेत. शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीपणाची नैतिक जबाबदारी स्वीकारल्याचे नाटक करीत शासनाने एक फुटकीतुटकी कर्जमाफी योजना जाहीर केली. तिचा हेतू राजकीय पुढाऱ्यांच्या लुटीने वासे पोकळ झालेल्या सहकारी संस्थांना टेकू देऊन संजीवनी देणे हाच होता. या योजनेतून शेतकऱ्यांना काही लाभ होण्याची शक्यताच नव्हती, तो झालाही नाही. अलीकडे वित्तीय मंदीच्या लाटेला तोंड देण्यासाठी किंवा भामटेगिरीमुळे बुडणाऱ्या कंपन्यांना वाचवण्यासाठी सरकार किती उदारतेने पैशांचा पाऊस पाडते हे पाहिले म्हणजे शेतकऱ्यांना फसवी कर्जमाफी देणाऱ्या शासनकर्त्यांच्या आत्यंतिक शेतकरीद्वेषाची प्रचीती येते.

आतंकवाद

शेतकरी आणि बिगरशेतकरी या दोघांनाही भेडसावणारा एक भयानक प्रश्न आतंकवाद होय. ईशान्येकडील राज्यांत ख्रिस्ती धर्माच्या प्रभावाखाली फुटीरवादी आतंकवादी सक्रिय आहेत. देशभरातील दिडशेच्या वर जिल्ह्यांत गरिबांच्या कळवळ्याचा कांगावा करणारे नक्षलवादी अक्षरश: हुकूमत गाजवत आहेत. याखेरीज, मुसलमान समजातील काही आतंकवादी अलीकडे घडलेल्या मुंबईवरील हल्ल्यांप्रमाणे जागोजाग उद्रेक घडवून आणीत आहेत. या आतंकवादाचे स्वरूप सुजाण मतदारांनी समजून घेणे आवश्यक आहे.

कायदा व सुव्यवस्था

ईस्ट इंडिया कंपनीचे राज्य हिंदुस्थानात चालू झाले, त्या वेळी हिंदुस्थानभर अंमल चालू होता, तो ठगांचा आणि पेंढाऱ्यांचा. त्याखेरीज, जागोजाग आपापल्या जमिनींचे आणि जंगलावरील हक्कांचे रक्षण करण्यासाठी अनेक आदिवासी स्वतंत्रता नायक इंग्रजांशी टक्कर देत होते. ठग, पेंढारी आणि आदिवासी नायक यांच्या तुलनेने दिल्लीची बादशाही, मराठेशाही आणि संस्थानिक यांचा बंदोबस्त करण्यात इंग्रजांना फारशी तोशीस पडली नाही; पण ठग, पेंढारी आणि आदिवासी नायक यांना जनाधार फार किरकोळ होता. याचा फायदा इंग्रजांनी उठवला आणि त्यांना लुटारू, दरोडेखोर जाहीर करून, त्यांचा बीमोड करून टाकला. त्यांतील अनेक जमातींना गुन्हेगार किंवा भटक्या जमाती ठरवून टाकले. या जमातींच्या तांड्यांवर पोलिसांची कडक देखरेख राही आणि अनेकवेळा, अमानुष पद्धतींचा वापर करून त्यांच्यातील नेतृत्वाचा बीमोड केला जाई.

इंग्रजांची ही कारवाई मोठी प्रशंसनीय होती असे कोणीच म्हणणार नाही. पण, त्यामुळे देशात कायदा आणि सुव्यवस्था यांचे राज्य प्रस्थापित होऊन

आर्थिक आणि सामाजिक विकासाची वाट सुलभ झाली, यात काही शंका नाही. ठगीचा बंदोबस्त झाला नसता तर टपाल, तार, रेल्वे, शिक्षण आणि वैद्यकीय संस्था यांचा प्रसार करणे अशक्य झाले असते; समाजसुधारणेच्या कायद्यांचाही परिणाम होऊ शकला नसता.

इंग्रजी अमलाच्या या काळातच 'शासनाने कायदा केला म्हणजे सर्व शासनयंत्रणा त्या कायद्यामागे उभी राहते आणि थोडेफार का होईना, प्रगती होते,' असा समज दृढ झाला. इंग्रजी अमलाच्या या शक्तिस्थानाचा अंदाज महात्मा गांधींनी घेतला आणि कायदा झुगारण्याचे सत्याग्रहाचे हत्यार तयार केले.

त्या काळाचे शेतकरी आंदोलनाचे पंजाब प्रांतातील थोर नेते सर छोटूराम यांनी अत्यंत कळकळीने महात्मा गांधींना विनंती केली होती, 'इंग्रजी अंमलामुळे देशात पहिल्यांदा कायद्याचे राज्य आले आहे. लोक आता कोठे कायदा मानू लागले आहेत. त्यांना कायद्याची अवमानना करण्याची शिकवण देऊ नका. ऐहिक आणि शासकीय कायद्यांखेरीज काही अधिक उच्चतर आध्यात्मिक धर्म आणि कायदे असतात असा युक्तिवादसुद्धा त्यासाठी करू नका.' गांधींनी सर छोटूरामना उत्तर दिल्याचे कागदोपत्री दिसत नाही. परंतु, सरोजिनी नायडू यांनी सर छोटूराम यांच्या नेतृत्वाखालील युनियनिस्ट पक्षाचे पंजाबमधील सरकार मोडून काढण्यासाठी काँग्रेसवाल्यांनी जे शर्थीचे प्रयत्न केले त्याचे वर्णन केले आहे, त्यावरून काँग्रेसवाल्यांना सर छोटूरामांचा आग्रह फारसा भावला नसावा असे अनुमान निघू शकते.

स्वातंत्र्य मिळण्याच्या वेळी सारी कायदाव्यवस्था उखडली गेली होती. दंगे, धोपे, जाळपोळ, बलात्कार आणि निर्वासितांचे लोंढे यांमुळे सगळेच प्रशासन विस्कळित झाले होते. वल्लभभाईंसारखा लोहपुरुष गृहमंत्री असताना कायदा आणि सुव्यवस्था यांचे राज्य प्रस्थापित करणे फार कठीण काम नव्हते; पण पटेलांचा सर्व वेळ संस्थानांचे विसर्जन आणि कम्युनिस्टांची बंडाळी थोपवणे यांतच गेला. नंतरच्या काळात समाजवादाच्या नावाखाली जी एक सरकारशाही प्रस्थापित झाली; त्यामुळे प्रशासकीय व्यवस्था मजबूत होण्याऐवजी खिळखिळी झाली. देशात सर्वदूर नेता, तस्कर, गुंड, अफसर आणि काळाबाजारवाले यांचे राज्य तयार झाले. या गुंडांचा प्रभाव वाढतच गेला. प्रथम ते आपल्या पसंतीचे नेते सत्तास्थानांवर निवडून आणू लागले, नंतर लवकरच त्यांनी पुढाऱ्यांना बाजूला करून, स्वत:च्याच नावाने खुर्च्या बळकावल्या. सर्व विधिमंडळांतील

गुंडांचे प्रमाण अभ्यासले तर या प्रश्नाची भयानकता लक्षात येते.

जागतिक पातळीवर मादक पदार्थांची तस्करी हा दारिद्र्यनिर्मूलनाच्या खालोखाल किफायतशीर व्यवसाय झाला आहे. अफगाणिस्तान, ब्रह्मदेश व नेपाळ यांतील मादक द्रव्यांची वाहतूक करणाऱ्या तस्करांच्या प्रमुख मार्गावर भारत आहे. या तस्करांना शासकीय व्यवस्था निष्प्रभ करून स्वत:ची अनिर्बंध यंत्रणा उभी करणे आवश्यक असते. या तस्करांनी यासाठी अनेक संस्था उभ्या केल्या आहेत. देशविदेशांचे बहुतेक महाराज, महंत आणि बाबा यांचे मठ हे यांचेच अड्डे आहेत. खलिस्तानची चळवळ, ईशान्य भारतातील आतंकवादी हेही मादक द्रव्यांच्या तस्करांचेच हस्तक आहेत.

सर्व आतंकवादामागील खरी शक्ती मादक द्रव्यांचा चोरटा व्यापार हीच आहे. असल्या कामात प्रतिष्ठित सुशिक्षित भद्र लोक फारसे सामील होत नाहीत. याउलट, आर्थिकदृष्ट्या मागासलेले आणि जुनाट सनातनी आत्यंतिक धर्मकल्पना बाळगणाऱ्या समाजातील तरुणांना अशा कारवायांचे मोठे आकर्षण असते.

पकडल्या गेलेल्या आतंकवाद्यांपैकी मोठे प्रमाण कोण्या एका विशेष धर्माच्या अनुयायांचे सापडले तर त्यावरून आतंकवादाला धार्मिकतेचे लेबल चिकटवणे चुकीचे होईल. आर्थिक मागसलेपण, आत्यंतिक श्रद्धेमुळे आलेले कडवेपण आणि लोकशाही व सभ्य समाज यांचा तिरस्कार हे सर्व आतंकवाद्यांचे समान गुण आहेत. राजकीय सत्ताच आता गुंडांच्या हाती गेल्यामुळे गुंडांचे पारिपत्य होण्याची काही शक्यताच उरलेली नाही. सर्वच शासनकर्ते आतंकवाद्यांपुढे कच खातात आणि आपल्या भेकडपणाचे समर्थन करण्यासाठी मानवतेचा किंवा भाई-भाईवादाचा उपयोग करतात.

आतंकवादी प्रस्थापित शासनाविरुद्ध हत्यार घेऊन उठतात, त्या क्षणी ते आपल्या मानवी हक्काच्या अधिकारावर पाणी सोडतात. आतंकवाद्यांना फार फार तर आंतरराष्ट्रीय जिनिव्हा कराराप्रमाणे युद्धकैदी म्हणून वागणूक मिळावी यापलीकडे कोणत्याही मागणीचा हक्क उरत नाही.

२६/११ च्या मुंबईवरील हल्ल्यानंतर माझ्याकडे हजारो पत्रे आली त्या सर्वांचा धोशा एकच – 'पाकिस्तानला मूँहतोड जवाब द्या, पाकिस्तानशी युद्ध पुकारा.' पाकिस्तानशी युद्ध जिंकण्यास भारतीय लष्कर समर्थ आहे, हे गेल्या साठ वर्षांत अनेकदा सिद्ध झाले आहे. पण, पोखरणोत्तर काळात हा निर्णय इतका सोपा नाही. त्याहीपेक्षा, जागतिक दबाव आणून, पाकिस्तानला भारताशी मुक्त व्यापाराचा करार करायला भाग पाडणे हे अधिक प्रभावी साधन आहे.

इस्राईलच्या पद्धतीचा मूँहतोड जवाब देण्याची ज्यांची खुमखुमी असेल, त्यांना त्यासाठी देशाबाहेर काही करण्याची गरज नाही. देशाच्या आत अशी शक्तिकेंद्रे आणि मर्मबिंदू आहेत, की ज्यांना हात लावला तरी आतंकवादी पंगुवत लुळे पडतील. या मर्मबिंदूंकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

शासनाची जबाबदारी

कोणत्याही परिस्थितीत कायदा आणि सुव्यवस्था ही 'एक डोके, एक मत' या पद्धतीने निवडून आलेल्या शासनाची सर्वप्रथम जबाबदारी आहे. निरपराध नागरिकांच्या संरक्षणासाठी काय वाटेल ते उपाय योजून, आतंकवाद्यांचे निर्दालन करणे ही जबाबदारी कोणाचे शासन निभावू शकेल, त्याला आपली मते गेली पाहिजेत.

कायदा आणि सुव्यवस्था प्रस्थापित करणे हे कोणत्याही शासनाचे आद्यकर्तव्य होय. नागरिकांची मालमत्ता आणि जीवित यांचे संरक्षण करणे, नागरिकांतील दिवाणी वा फौजदारी वादावादींच्या निर्णयासाठी सक्षम न्यायव्यवस्था उभी करणे हेही काम फक्त शासनच करू शकते. ढासळलेल्या कायदा आणि सुव्यवस्थेत आर्थिक व्यवहार, व्यापार आणि उद्योग या क्षेत्रांतही कोणताही विकास किंवा प्रगती होऊ शकत नाही. तीन उदाहरणे आपल्यासमोर आहेत.

इंग्रजांनी कायद्याचे राज्य प्रस्थापित केले आणि थोड्याफार का होईना, नागरी व्यवस्था आणि पायाभूत संरचना तयार केल्या.

समाजवादी क्रांतीनंतर रशियात अनिर्बंध हुकूमशाही तयार झाली. त्या व्यवस्थेत व्यक्तिस्वातंत्र्याचा संकोच झाल्यामुळे क्षोभ निर्माण झाला आणि सर्वदूर पसरलेल्या असंतोषामुळे समाजवादी साम्राज्य कोसळले. या होष्यमानाचा अंदाज घेऊन चीन रशियापासून दूर सरकत होता आणि जे रशियाला जमले नाही, ते समाजवादी स्वप्न चीनमध्ये साकार करू अशा घमेंडीत त्यांनी रशियाच्या पाडावानंतरही थोडा काळ समाजवादी अंमल चालवला. समाजवादी अर्थव्यवस्था व्यवहारात अशक्य आहे हे स्पष्ट झाल्यानंतर चीनने अलगद समाजवादातून अंग काढून घेतले आणि खुली अर्थव्यवस्था व जागतिकीकरण यांचा तो पुरस्कर्ता बनला; पण हे करताना रशियाप्रमाणे त्यांनी पूर्वसुरींच्या नेत्यांचे उच्चाटन केले नाही. स्टॅलिनवादाचा कडक अंमल संपल्यावर रशिया कोसळला. याउलट, माओवाद आणि कम्युनिझम (साम्यवाद) ही आजही चीनची अधिकृत आर्थिक तत्त्वज्ञाने आहेत. खुलीकरणाला सुरुवात झाल्यानंतर त्याला सरकारी आखणीपेक्षा अधिक गती मिळावी अशी मागणी करणाऱ्या विद्यार्थ्यांची निदर्शने तिएनमान चौकात

परकोटीच्या क्रौर्याने चिरडून टाकण्यात आली. समाजवादाने चीनचा आर्थिक बट्ट्याबोळ केला; परंतु चिनी जनतेच्या अंगी शिस्तपालनाची क्षमता मुरवली आणि घट्ट केली. चीनच्या उदारीकरणाच्या धोरणाला उदंड यश मिळत आहे त्याचे कारण चीनमधील घट्ट कायदाव्यवस्था हे नाकारता येणार नाही. यामुळेच, एक चिनी कामगार पाच भारतीय मजुरांइतके काम करतो आणि चीनमध्ये उदारीकरणाचा फायदा घेणारा कोणी हर्षद मेहताही निघू शकत नाही, निघाला तर त्याची झटकन वासलात लावली जाते.

भारतातील परिस्थिती याच्या नेमकी उलटी आहे. इंग्रजांनी आणलेली कायदाव्यवस्था महात्मा गांधीप्रणीत कायदेभंगाच्या उदात्तीकरणाने विस्कळित झाली. स्वातंत्र्याच्या चळवळीत केवळ गांधींच्या आदेशानुसार महिना दोन महिने तुरुंगात काढल्यावर बाहेर जनतेचे हारतुरे स्वीकारणाऱ्या देशभक्तांचाच बोलबाला झाला.

पुन्हा ठग, पेंढारी

इंग्रजी शिस्तपालनाची जबाबदारी असलेली प्रशासन व्यवस्था स्वातंत्र्यानंतर फारच थोडा काळ पुरली, नंतरच्या काळात कुशल प्रशासनासाठी आवश्यक ती कठोर मानसिकता धारण करू शकणारे नेतृत्व, गांधीवादी चळवळीमुळे, विजनवासात फेकले गेले. आपण जणू गांधींच्या सत्य, अहिंसा आणि सहिष्णुता यांचा वारसा चालवणारे नवे संप्रती अवतार आहोत अशा थाटात टिनपाट नेते बोलू लागले. कठोर निर्णय घेण्याच्या असमर्थतेचे उदात्तीकरण गांधींचे नाव घेऊन ही मंडळी करू लागली. नौखालीच्या दंगलीच्या काळात काहीही संरक्षण न घेता पायी फिरणाऱ्या महात्म्याचे नाव जे राज्यकर्ते 'झेड' सिक्युरिटीखेरीज घराच्या बाहेर पडू शकत नाहीत, ते सकाळ संध्याकाळ घेऊ लागले आहेत. चर्चिलची भविष्यवाणी खरी ठरली आणि स्वातंत्र्यानंतर शासनव्यवस्था कडबा भरलेल्या बुजगावण्यांच्या हाती गेली. या बुजगावण्यांना माजी पंतप्रधान राजीव गांधी यांची हत्या करणाऱ्या खुन्यांनाही फासावर लटकवण्याची हिंमत झालेली नाही आणि संसदेवर हल्ला करणाऱ्या अफजल गुरूचे फोटो काही राज्यांत उघड उघड निवडणूकप्रचारासाठी वापरले जातात.

स्वातंत्र्यचळवळीच्या तत्त्वज्ञानामुळे आणि नेहरूंच्या समाजवादी धांदलीमुळे इंग्रजांची देन कायदाव्यवस्था कोसळली आणि लायसन्स्-परमिट-कोटा प्रणालीतून नवे पेंढारी आणि ठग यांची जमात उभी राहून, तिनेच शासन ताब्यात घेतले आहे आणि देशभरात सर्वदूर हलकल्लोळ माजवला आहे.

खुल्या व्यवस्थेतील हौसे-गवसे...

शेतकरी प्रश्न आणि आतंकवाद याखेरीज एक तिसरा विक्राळ प्रश्न देशापुढे आवासून उभा आहे. नेहरूप्रणीत समाजवादाला १९९१ मध्ये डॉ. मनमोहन सिंह यांनीच अर्धचंद्र दिला. त्या काळी सुरू केलेल्या आर्थिक सुधारांमुळे देशातील सोन्याची गंगाजळी मोकळी झाली. वित्तीय संस्था आणि कारखानदारी या क्षेत्रात काही प्रमाणात श्वास मोकळे झाले. शहरी क्षेत्रांची तहान भागल्यानंतर का होईना, शेतकऱ्यांच्या वाट्याला काही मोकळी हवा येईल अशी आशा वाटत होती. पण, हे सर्व असताना समाजवादाच्या काळात उभ्या करण्यात आलेल्या शासकीय संरचना शाबूत ठेवण्यात आल्या. त्यामुळे, केव्हा कधी कोणी 'इंदिरा गांधी' पुन्हा एकदा काही नवी घोषणा देऊन, समाजवादी लायसन्स-परमिट-कोटा व्यवस्थेकडे देशाला वळवील, याचा भरवसा देशातील उद्योजकांना वाटत नव्हता.

१९९८ मध्ये काँग्रेसचा विटाळही नसलेले पहिले शासन दिल्लीत अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखाली स्थिरावले आणि भारतीय उद्योजकांना पंख उभारून भरारी घेण्याची उमेद आली. 'इंडिया शायनिंग'चा २००४ च्या निवडणुकीत फज्जा झाला; पण याच काळात समाजवादी कालखंडातील आर्थिक विकासाची ३ टक्क्यांची तथाकथित 'हिंदुगती' सोडून विकासाचा दर १० टक्क्यांवर गेला. संयुक्त पुरोगामी आघाडी सरकार आल्यानंतरही ही गती ९ टक्क्यांच्या आसपास स्थिरावली आहे. याचे खरे श्रेय भारतीय उद्योजकांना आणि भारतीय तंत्रज्ञांच्या बुद्धिमत्तेला जाते.

जागतिकीकरणाचे विरोधक

या सर्व घडामोडींबद्दल देशातील नेता, तस्कर, गुंडा, अफसर आणि संघटित कामगार मंडळींना अतोनात दुःख होते. रशियन समाजवादाच्या 'विधवा' नेत्यांना समाजवादाच्या जागतिक ऐतिहासिक पाडावाचे शल्य सलत होते. देशातील आर्थिक प्रगतीला खीळ घालण्याचे आणि गरिबी वाढवण्याचे वेगवेगळे कार्यक्रम ही मंडळी राबवीत होती. पण, जागतिक अर्थव्यवस्थेतील प्रवाहच इतका जबरदस्त होता, की त्यापुढे हे डावे नेतृत्व निष्प्रभ झाले. त्यांना एकच आशा राहिली – भांडवली अर्थव्यवस्थेत चढउतार अपरिहार्य असतात, या ऐतिहासिक अनुभवाला अनुसरून रशियाच्या पाडावानंतर जगभर पसरलेली उदारीकरणाची प्रक्रिया रोखणारी काही घटना घडेल अशा आशेत ते होते. आर्थिक आणि तंत्रज्ञानाचे जागतिकीकरण जमेल त्या मार्गाने रोखण्यासाठी एक मोठी जागतिक

आघाडी तयार झाली. त्यात डावे पक्ष, अमेरिकाद्वेष्टे मुसलमानी जग, सर्वदूर पसरलेल्या एनजीओ या सर्वांनी उघड घातपात, निदर्शने आणि प्रचार यांचा धोशा लावला होता. आम जनतेच्या आणि ग्राहकांच्या दुर्भाग्याने, या कावळ्यांची शापवाणी खरी ठरत असल्याची लक्षणे दिसत आहेत. समाजवाद साठसत्तर वर्षेतरी रशियात चालला; पण त्यानंतरची उद्योजकवादी व्यवस्था विसेक वर्षांतच संकटांनी घेरली गेली. या जागतिक संकटाची थाप भारताच्या दरवाजावरही पडत आहे; यामुळे सर्वसाधारण मतदार गोंधळून गेला आहे.

गेल्या दोन दशकांत सहजतेने नोकऱ्या मिळत होत्या, पगार आणि रोजही वाढत होते. त्यांची सवय झालेला नागरिक आता नोकरकपात आणि वेतनकपात यांमुळे बावरून गेला आहे. समाजवादाच्या काळात सर्वदूर बेकारी माजलेली होती याचा त्याला विसर पडतो आहे आणि काही कंपन्यांच्या संचालकांच्या गुन्हेगारी कारवायांमुळे मतदार बावरून पुन्हा एकदा समाजवादाला बिलगू पाहत आहे.

तेजीच्या काळात अर्थव्यवस्थेमध्ये फक्त उद्योजकच पुढे सरसावतात असे नाही. त्या हौसे, नवसे आणि गवसे यांचीही गर्दी सरसावते. यातूनच हर्षद मेहतासारखी मंडळी खुल्या व्यवस्थेतील नाजूक जागांचा फायदा उठवायचा प्रयत्न करतात. अशा लफडेबाजांच्या कारवायांमुळे लोकांच्या मनात खुल्या बाजारव्यवस्थेविषयी संभ्रम निर्माण होतो.

खुली बाजार व्यवस्था रुळेपर्यंत काही प्रमाणात देखरेखीची व्यवस्था आवश्यक असते हे तत्त्व अगदी कट्टर स्वतंत्रतावादीही मान्य करतात. दुर्दैवाने, देखरेखीच्या व्यवस्थेतसुद्धा काम करणारी सारी माणसेच असतात. सगळ्या समाजातच कायदा आणि न्यायव्यवस्था ढासळली असेल आणि कष्ट व फळ यांचे संबंध तुटले असतील तर अशी देखरेख व्यवस्थासुद्धा फारशी कार्यक्षम राहत नाही. अमेरिकेत वित्तीय देखरेखीची व्यवस्था कोसळली आणि वित्तीय संकट ओढवले. भारतातील परिस्थिती त्याहूनही वाईट. येथील सर्व देखरेखीच्या संस्थांत (ुर्ल्दे) शासकीय सेवेतून निवृत्त झालेल्यांचीच वर्णी लागते. ज्यांना आयुष्यभरच्या सेवेत काही कामगिरी दाखवता आली नाही, ते वृद्धापकाळी काय मोठे दिवे लावणार? नेहरूकालीन मुंदडा प्रकरणापासून भारतात प्रत्येक घोटाळाप्रकरणी देखरेख व्यवस्था दोषी असल्याचे सिद्ध झाले. परंतु, शिक्षा ना गुन्हेगारांना झाली, ना देखरेख व्यवस्थेतील जबाबदारांना. भारतातील अलीकडच्या तेजीच्या काळात माहिती तंत्रज्ञान आणि संपर्क तंत्रज्ञान यांच्या गरुडझेपेमुळे अर्थव्यवस्थेस

मोठी चालना मिळाली. गणकयंत्रातील हार्डवेअरच्या क्षेत्रात आम्ही साऱ्या जगाच्या पाठीमागे; पण सॉफ्टवेअरमध्ये आमची कारकुनी बुद्धी थोडी चालली आणि तेवढ्याच बळावर आमच्या चार-पाच कंपन्या जगभर नाव मिळवून गेल्या. 'मोबाइल'च्या क्षेत्रातही हीच परिस्थिती आहे. त्यातीलही इलेक्ट्रॉनिक शास्त्राबद्दल या उद्योगातील लोकांना जाण कमी. मोबाईल बाळगणाऱ्या सर्वांनाच कधी ना कधी याचा अत्यंत कडू अनुभव आलेलाच असतो आणि तरीही भारत मोबाइल सेवांच्या बाबतीत अनेक विकसित देशांच्याही पुढे आहे.

अलीकडचा 'सत्यम्' घोटाळा मोठा बोलका आहे. कंपनीच्या ताळेबंदात आकड्यांशी खेळ करून सगळे काही आलबेल आहे असा आभास निर्माण करण्यात आला; पण एक दिवस फुगा फुटला आणि अर्थव्यवस्था शेअरबाजार दोन्ही हादरले. ताळेबंदातील लपवाछपवी शेकडो कोटी रुपयांची होती. मोबाइल सेवा देणारे प्रत्येक ग्राहकाला प्रत्येक कॉलमागे किती फसवतात, हे अजून प्रकाशात आलेले नाही. सत्यम्चा स्फोट होऊन गेला, मोबाईलचा विस्फोट होईल तेव्हा सर्वच लोकांचा बाजारव्यवस्थेवरील विश्वास मूठभर भामट्यांच्या उद्योगांमुळे डळमळेल. खुल्या व्यवस्थेकरिता मजबूत कायदा आणि सुरक्षाव्यवस्था आवश्यक आहे. पहिल्या भारतीय गणतंत्राची प्रकृती अशी व्यवस्था देण्याची नाही.

जागतिक मंदीचे विश्लेषण

शेतकरी आणि बिगरशेतकरी मतदारांनी, केवळ घबराटीमुळे, बाजारस्वातंत्र्याला विरोध करणारांना थारा देणे मोठी घोडचूक होईल.

सध्याच्या जागतिक मंदीचे विश्लेषण अनेकांनी अनेक परींनी केले आहे. या मंदीची प्रमुख कारणे थोडक्यात अशी सांगता येतील :

१) १९३० सालची जागतिक मंदी बाजारातील मागणीच्या अभावाने आलेली होती. त्यावर उपाययोजना म्हणून अर्थव्यवस्थेत 'येन केन प्रकारेण' पैसा सोडण्याचे हत्यार वापरले गेले. 'काटकसर हा वैयक्तिक गुण असेल; पण ती सामाजिक गुन्हा ठरू शकते,' ही विचारसरणी जनमनात रुजली. भांडवलशाहीच्या उद्गात्यांना ही कल्पना कधीही मान्य झाली नसती. भांडवलनिर्मिती ही उपभोगाच्या त्यागाने काटकसरीने केलेल्या बचतीने होते, हा भांडवलशाहीचा मूळ सिद्धांत अडगळीत गेला.

२) दुसऱ्या महायुद्धानंतर उभ्या केलेल्या जागतिक अर्थ आणि नाणे व्यवस्थेमध्ये दोन प्रमुख संस्था तयार केल्या गेल्या. जागतिक बँक आणि

आंतरराष्ट्रीय नाणेनिधी यांच्या कारभारावर आंतरराष्ट्रीय देखरेखीची व्यवस्था होती. या व्यवस्थेत आंतरराष्ट्रीय चलन म्हणून सोन्याबरोबरच अमेरिकन डॉलरलाही मान्यता मिळाली. जगभरच्या देशांच्या डॉलरभुकेला काही अंतच नव्हता. ज्याला त्याला डॉलर हवे होते. जगभरात डॉलर किती असावेत याचे नियंत्रण अमेरिकेतील 'फेडरल रिझर्व्ह' या संस्थेकडे होते. या संस्थेवर कोणत्याही प्रकारचे जागतिक नियंत्रण नव्हते. अमर्याद प्रमाणात डॉलर छापून, स्वस्त मनुष्यबळाच्या देशातून सर्व तऱ्हांचा माल स्वस्तात मिळवता येतो हे लक्षात घेऊन डॉलरछपाई यंत्रणा काम करू लागली. भारतासारख्या देशातील गरिबी कमी जाचक झाली, उद्योजकता वाढली याचे पुष्कळसे श्रेय या डॉलरछपाईला आहे.

३) या व्यवस्थेचा श्रीमंत देशांवरही काही विपरीत परिणाम घडून आला. नोकऱ्या मिळतात, पगार सतत वाढत असतात अशी भावना झाल्यामुळे काटकसर संपुष्टात आली. भविष्यात येणाऱ्या मिळकतीच्या अपेक्षेने आणि हिशेबाने जनसामान्य गुंतवणुकीचे निर्णय करू लागले. याचा मुख्य परिणाम मोटारगाड्या आणि गृहबांधणी या क्षेत्रात दिसून आला. ज्यांच्याकडे काहीच शिल्लक नाही अशा लोकांनी भविष्यातील मिळकतीच्या अपेक्षेने कर्जे काढून, गुंतवणूक करायला सुरुवात केली म्हणजे मोठी स्फोटक परिस्थिती तयार होते. एखाददुसऱ्या वित्तीय संस्थेने थोडीशी गोलमाल केली तरी घबराट सुरू होते. घबराटीमध्ये बिनआधाराच्या कर्जांची खुले-आम बाजारपेठ उघडते आणि थोड्याच काळात मोठमोठ्या वित्तीय संस्था दिवाळखोर बनतात.

भारतीय अर्थव्यवस्थेचे खंबीरपण

भारतात त्या मानाने अजून परिस्थिती बरी आहे. डावे पक्ष याचे श्रेय स्वत:कडे लाटून घेऊ पाहत आहेत. आपल्या आग्रहावरून परदेशी गुंतवणूक आणि निधी यांवर मर्यादा घालणे संपुआ शासनाला भाग पडले; यामुळेच भारत अद्यापतरी तुलनेने सुरक्षित आहे अशी त्यांची कुर्रेबाजी आहे.

भारताच्या प्रगतीचे श्रेय जसे कोणत्याही राजकीय प्रणालीला नाही; उद्योजकांच्या धडाडीला आणि तंत्रज्ञांच्या बुद्धिमत्तेला आहे, तसेच जागतिक मंदीच्या तडाख्यात देश अजून डोके वर काढून आहे याचे श्रेय भारतीयांच्या परंपरागत नैतिकतेला आणि काटकरीच्या सवयींना आहे. जेथे राष्ट्रीय सकल उत्पादनाच्या २० टक्क्यांवर बचत होते त्या देशाची मूलभूत अर्थव्यवस्था खंबीर राहील.

पण, एवढे सांगितल्याने मतदारांचे समाधान होणार नाही. त्यांना कोणा

खंबीर अधिकारी व्यक्तीने 'नेहरूप्रणीत समाजवादातून सुटका योग्यच होती, उदारीकरण आणि जागतिकीकरण हे इतिहासलब्ध प्रकाशात उचित आणि अपरिहार्य होते,' असे निक्षून सांगण्याची आवश्यकता आहे.

मंदी : एक संधी

प्रत्येक संकट ही एक संधीही असते. सध्याची मंदी गेल्या दोन दशकांत जी वारेमाप उधळपट्टीची वाढ झाली, त्या बाबतीत शिस्त आणण्यासाठी मिळालेली एक संधी आहे. या दृष्टीने या मंदीकडे पाहिले पाहिजे.

समाजवादाच्या काळात कोळपून गेलेल्या अर्थव्यवस्थेला नव्याने पालवी फुटली, वृक्ष वाढू लागला आणि पहिल्या पानगळीची वेळ आली आहे. पानगळ हे वाढीचे लक्षण आहे हे शेतकऱ्यांना समजते, इतर मतदारांनाही हे समजावून सांगावे लागणार आहे.

समाजवादाच्या काळात देश अळीप्रमाणे सरपटत चालला होता. खुलीकरणानंतर तो कोशातून पंख घेऊन बाहेर पडला आहे. उडण्यासाठी पंख वरखाली करणे आवश्यक आहे. खुल्या अर्थव्यवस्थेतील तेजीमंदी पक्ष्याच्या पंख वरखाली हलवण्याप्रमाणे असते.

अगदी गरुड पक्ष्याची झेप घेतली, तरी त्यालादेखील मधूनमधून खाली उतरून झाडाच्या फांदीवर विश्रांतीसाठी थांबावे लागते. 'गरुडालाही खाली यावेच लागते. मग अळीसारखे जगण्यात दोष तो काय?' अशा तऱ्हेचा युक्तिवाद या निवडणुकीत डावे करणार आहेत. त्याला मतदारांनीच सडेतोड उत्तर द्यायचे आहे.

खुल्या बाजाराच्या आकाशात पहिली झेप घेण्यास तयार झालेले पक्ष्याचे पिलू सुरुवातीस, साहजिकच, लवकरच दमले. याच पिलाच्या पंखांत आणि छातीत यथाकाल ताकद येईल. कोणत्याही परिस्थितीत पिलाला घाबरून उबदार घरट्यात बसू देणे निसर्गक्रमाच्या विरुद्ध होईल. मतदार पक्षिणींनी सुस्तावणाऱ्या राजकीय नेत्यांना घरट्याबाहेर ढकलून देऊन, त्यांना पुरुषार्थाचे धडे देणे आवश्यक आहे.

मतदारांची जबाबदारी

जमिनीवर सरपटणारा देश पहिल्यांदा पाण्यात उतरला आहे. नाकातोंडात थोडसे पाणी गेल्यामुळे घबराट झाली आहे. त्याला धीर देण्याची जबाबदारी मतदारांनी पार पाडायची आहे.

२००९ च्या लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीत आणि त्यानंतर येणाऱ्या

महाराष्ट्र राज्य विधानसभेच्या निवडणुकीत देशप्रेमी मतदारांनी

१. कोणत्याही परिस्थितीत मतदान केले पाहिजे.

२. आपल्या मतदानाच्या हक्कावर कोणत्याही प्रलोभनाची किंवा धाकदपटशाची सावली पडू देऊ नये.

३. उमेदवार निर्मळ चारित्र्याचा असावा; निदान तो गुंड, दरोडेखोर, भ्रष्टाचारी नाही याची खात्री करून घ्यावी.

४. भारतीय शेतीची आजची गंभीर अवस्था समजण्याइतका अनुभव आणि बौद्धिक क्षमता उमेदवाराकडे आहे अथवा नाही, याची खात्री करून घ्यावी.

५. नागरिकांच्या जीविताचे आणि मालमत्तेचे संरक्षण करून पुन्हा एकदा 'कायदा सुव्यवस्था स्थापनाय' पराकाष्ठा करण्याची त्याच्यात क्षमता आहे किंवा नाही हेही अजमावावे.

६. जागतिक मंदी आणि देशातील आर्थिक स्थिती याबद्दल उमेदवाराकडे किंवा निदान त्याच्या पक्षनेत्यांकडे पुरेशी जाण आणि उपाययोजना आहे किंवा नाही याची खात्री करून घ्यावी.

इशारा

पहिल्या भारतीय गणतंत्राला ६० वर्षे होत आहेत. एका नव्या गणतंत्राची उभारणी करून, भारताला विश्वविजयाचा मार्ग खुला करून देण्याची जबाबदारी देशातील मतदारांवर आहे. ही संधी गमावल्यास पहिले गणतंत्र बुडेल, अर्थव्यवस्था कोलमडेल आणि देशाचे मोठे प्रदेश पाकिस्तान आणि चीन गिळंकृत करतील अशी साधार भीती आहे.

(२१ जानेवारी २००९)

◆◆

गरिबांच्या खच्चीकरणाविरुद्ध आचारसंहिता कोणती?

भारतातील राजकीय निवडणुकांची व्यवस्था तशी शास्त्रशुद्ध नाही. कोणत्याही मतदारसंघात सर्वांत जास्त मते मिळालेला उमेदवार निवडून आला असे मानले जाते. निवडून आलेल्या उमेदवाराला काही क्षेत्रात १०% सुद्धा मते मिळालेली नसतात; तरी तो निवडून आला असे मानण्यात येते. इंग्लंडकडून घेतलेल्या या पद्धतीला 'First-Past-the Post' म्हटले जाते.

दुसऱ्या काही देशांत निवडणुकीची पद्धत अगदी वेगळी आहे. फ्रान्ससारख्या देशात निवडून येण्यासाठी उमेदवाराला किमान निम्म्यावर मते मिळालेली असावीत असा नियम आहे. कोणाही उमेदवाराला निम्म्यावर मते मिळाली नसतील, तर सर्वांत जास्त मते मिळवणाऱ्या पहिल्या दोन उमेदवारांमध्येच मतदानाची आणखी एक फेरी होते. त्याखालचे उमेदवार पहिल्या फेरीतच हरले असे जाहीर करण्यात येते.

जगातील अनेक देशांत प्रमाणशीर प्रतिनिधित्वाची पद्धतही अमलात आहे. सर्वसाधारणपणे या पद्धतीत उमेदवार निवडणूक लढवत नाहीत. वेगवेगळे पक्ष आपल्या जाहीरनाम्याच्या, पूर्वीच्या कामगिरीच्या आणि यादीतील उमेदवारांच्या गुणवत्तेच्या आधाराने मते मागतात. कोणत्या एका पक्षाला ज्या प्रमाणात मते मिळतात, त्या प्रमाणात त्यांचे उमेदवार निवडून आले असे जाहीर होते. प्रत्येक पक्षाने निवडणुकीच्या आधी आपल्या उमेदवारांची यादी जाहीर केलेली असते. मतांच्या प्रमाणाच्या आधाराने समजा एका पक्षाचे ८० प्रतिनिधी निवडून आले, तर त्या पक्षाने जाहीर केलेल्या यादीतील पहिल्या ८० जणांची निवडणूक झाली असे मानले जाते. या पद्धतीत कोणत्याही तऱ्हेच्या आरक्षण व्यवस्थेची गरज नसते. समजा महिलांकरिता १/३ जागा राखून ठेवायच्या आहेत, तर प्रत्येक पक्ष आपल्या यादीतील प्रत्येक तिसरे नाव महिला उमेदवाराचे घालेल. याच

पद्धतीने अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती यांच्या आरक्षणासंबंधी सध्या प्रचलित असलेली गबाळग्रंथी व्यवस्था अनावश्यक ठरेल.

स्वातंत्र्यानंतर भारताने इंग्लंडमधील पद्धत स्वीकारली, हे समजण्यासारखे आहे. या पद्धतीत संख्याशास्त्रीय दृष्टीने दोष आहे, हे घटनेच्या शिल्पकारांनाही पक्के माहीत होते. ४०% मते मिळवणारा पक्ष ८०% खासदारांच्या जागा घेऊन जातो, हे भारतीय मतदारांनी प्रत्यक्ष अनुभवले आहे. सर्वांत मोठा पक्ष काँग्रेस. त्याला कधीही निम्म्यापेक्षा जास्त मते मिळाली नाहीत; पण स्वातंत्र्यानंतरच्या अनेक निवडणुकांत या पक्षाला दोन तृतीयांशाच्या आसपास जागा मिळाल्या आहेत.

घटनेच्या शिल्पकारांनी अशी विक्षिप्त पद्धत निवडली, याची कारणे शासकीय दस्तावेजात नमूद आहेत. स्वातंत्र्य मिळाले तेव्हा फाळणी, निर्वासितांचे लोंढे अशा समस्या साऱ्या देशाला भेडसावीत होत्या. अशा काळात निदान केंद्रात तरी निश्चित बहुमत एका पक्षाकडे असणे आवश्यक आहे. या विश्वासापोटी जाणीवपूर्वक आजची विक्षिप्त पद्धत स्वीकारली गेली. स्वातंत्र्यानंतरच्या २० वर्षांनंतर थोडी शांतता प्रस्थापित झाली; तरीही ही विक्षिप्त पद्धत बदलावी असा विचारही कोणाच्या मनात आला नाही आणि ती पद्धत आज पक्की रुजली आहे.

सुरुवातीच्या निवडणुकांत मतदानपत्रिका होत्या. प्रत्येक उमेदवाराच्या नावे एक वेगळी पेटी असे. मतदार आपल्या पसंतीच्या उमेदवाराच्या विवक्षित पेटीमध्ये मतपत्रिका टाकत असे. नंतर उमेदवारांची यादी या स्वरूपात मतपत्रिका आली. मतदार आपल्या नावापुढे शिक्का मारून ती मतपेटीमध्ये टाकीत असे. या पद्धतीमध्ये अर्ज भरणे, अर्ज मागे घेणे आणि निवडणूक चिन्हांचे वाटप करणे हे सगळे कार्यक्रम आटोपल्यानंतर प्रत्येक मतदारसंघात लक्षावधी मतपत्रिका छापून तयार कराव्या लागत. त्या काळची छपाई यंत्रणा जुनीपुराणी होती. एवढ्या मोठ्या छपाईच्या कामास दोन-तीन आठवडे सहज लागत. त्यामुळे चिन्हांच्या वितरणानंतर प्रचारासाठी तीन आठवडे मोकळे ठेवावे लागत. आजही छपाई यंत्रणेत आमूलाग्र क्रांती झाली; तरीसुद्धा प्रचाराचा अवधी जवळजवळ तेवढाच राहिला आहे.

वस्तुतः, आजच्या काळात चिन्हांचे वाटप झाल्यानंतर उमेदवारांची यादी प्रसार माध्यमातून प्रसिद्ध केल्यानंतर ३ दिवसांत निवडणुका घेणे सहजशक्य होईल.

निवडणुकीची पद्धत भली विक्षिप्त असो, देशातील निवडणूक आयोगाने निवडणुका घडवून आणण्याची यंत्रणा इतकी चांगली ठेवली आहे, की जगातील अनेक सुधारलेले देशसुद्धा हिंदुस्थानातील निवडणुका ज्या शिस्तीने आणि सर्वसाधारण शांततेने पार पडतात, तो एक चमत्कारच मानतात.

भारतातील निवडणुका या भारतातील शिरगणतीप्रमाणे एक अतिप्रचंड अभियान असते. शेषन साहेब निवडणूक आयोगाचे आयुक्त झाले आणि त्यांनी आपल्या व्यक्तिमत्त्वास अनुसरून इतिहासात आपले एक स्थान बनवले. मतदारांना छायाचित्रांसहित ओळखपत्र देणे, निवडणूक खर्चावर बारकाईने देखरेख ठेवणे, त्यासाठी व्यापक प्रमाणावर सर्व निवडणूक कार्यवाहीचे दृक्‌श्राव्य चित्रण करणे... या सुधारणा यशस्वीपणे अमलात आल्या. त्यानंतर मतदान पेट्या काढून टाकून, त्या जागी आधुनिक मतदान यंत्रे भारतासारख्या बहुतांश अशिक्षित नागरिकांच्या देशातही सहज रुजली. इलेक्ट्रॉनिक यंत्राची व्यवस्था अनेक विकसनशील देशांतही नाही याचा भारतीयांना अभिमान वाटणे साहजिक आहे.

एवढ्या सगळ्या सुधारणा करूनही, निवडणूक यंत्रणा ही काही भ्रष्टाचाराने बरबटलेल्या देशात स्वच्छतेचे चिमुकले बेट राहू शकत नाही, हे उघड आहे.

नेहरूप्रणीत समाजवादामुळे लायसन्स परमिट-कोटा राज्य आले. त्यातून नेता, तस्कर, गुंडा, अफसर यांच्या हाती मोठ्या वेगाने सत्ता येऊ लागली. काही काळ गुंडांनी नेत्यांची बाहुली नाचवली आणि थोड्याच काळात ते स्वतःच नेत्याच्या रूपात राजकारणाच्या रंगभूमीवर अवतरले.

निवडणूक प्रचारासाठी तिनेक आठवडे मिळत असल्यामुळे झेंडे, पताका, जाहिराती, मिरवणुका यांचा एकच जल्लोष करून, निवडणुकीच्या निर्णयावर प्रभाव पाडणे गुंड मंडळींना सहज जमू लागले. वर्षानुवर्षे जनसेवेची तपस्या केलेल्या उमेदवाराला धनदांडगे उमेदवार, आवश्यक तेथे हिंसाचार आणि गुंडागर्दीचा वापर करून, मागे टाकू लागले. विधानसभा आणि लोकसभा या दोन्ही प्रतिनिधिगृहांत गुंड, दादा, दरोडेखोर, बलात्कारी आणि भ्रष्टाचारी यांचे प्रमाण वाढत चालले. संसद हे चर्चेचे व्यासपीठ न राहता, कुस्तीचा आराखडा बनू लागले. यावर उपाययोजना काय करावी ? गुंड उमेदवाराचा बंदोबस्त करणे हा काही केवळ कायदा आणि सुव्यवस्था राखण्याचा प्रश्न नाही. लायसन्स-परमिट-कोटा व्यवस्थेमुळे, दीडशे वर्षांपूर्वी इंग्रजांनी बंदोबस्त केलेल्या ठग, पेंढारी यांची सद्दी सर्वत्र चालू झाली. त्यात निवडणुका जिंकण्यासाठी मतदारांना लालूच दाखवण्याच्या अनेक पद्धती रूढ होऊ लागल्या. पक्षाचा विचार काय,

ध्येय-धोरणे काय, यापेक्षा कोणता पक्ष काय आश्वासने देतो याचा निवडणुकीवर अधिक प्रभाव पडू लागला. स्वातंत्र्यानंतरच्या पहिल्या ४० वर्षांतच सर्व देशाचे समग्र भले करणारा कोणी पक्ष किंवा नेता पुढे येईल, ही लोकांची अपेक्षाच संपुष्टात येऊन गेली. युद्धात हरलेल्या सैन्याप्रमाणे जो तो मतदार आपला जीव कसा वाचवता येईल, याचाच हिशेब करू लागला. मतांची खुलेआम विक्री सुरू झाली. मतदानाच्या आदल्या रात्री होणाऱ्या पैशाच्या वाटपावर, दारू, भांडीकुंडी, लुगडी यांच्या वाटपावर निकाल ठरू लागले. एवढे पुरेसे नाही म्हणून की काय, मतदारांना लुभावण्यासाठी २ रुपये किलो तांदूळ यांसारख्या वेगवेगळ्या योजना यांचा मतदारपेढ्या (Votebanks) विकत घेण्यासाठी खुलेआम वापर होऊ लागला. हा प्रकार आजही चालू आहे. अगदी अलीकडेच सोनिया गांधी यांनी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचे रोजगाराचे दिवस आणि रोजगाराचा दर वाढवून दिला जाईल अशी खुलेआम घोषणा केली. ज्या राजकीय पदांसाठी निवडणुका घ्यायच्या, त्या पदांचाच वापर करून, मतदारांना विकत घेण्याचा हा कार्यक्रम किती रुळला आहे, हे पाहिले म्हणजे समाजवाद आणि लोकशाही एकत्र नांदू शकत नाही हा सिद्धांत स्पष्ट होतो.

समाजवादाचा भारतीय लोकशाहीवर याहूनही मोठा दुष्परिणाम झाला, तो म्हणजे शेतीचे शोषण, त्या आधारे होणारी शहरांची बेसुमार वाढ आणि बकाली वस्त्यांचा सर्वदूर प्रादुर्भाव. शहरातील बकाली वस्त्यांमध्ये ज्या समाजांना समाजाच्या मध्य प्रवाहात स्थान मिळत नाही, अशांचीच दाटी होते. बहुतेक शहरांत अशा वस्त्यांत दलित, आदिवासी, मुसलमान आदी अल्पसंख्य समाजांचाच जास्तीत जास्त भरणा असतो. या वस्त्या बहुधा बेकायदेशीरच असतात. तेथील झोपडीवाल्यांना केव्हा उठवून दिले जाईल, याचा काहीच भरवसा नसतो. तुमची झोपडपट्टी आम्ही उठवू देणार नाही, एवढ्या आश्वासनावरच या वस्त्यांतील एकगठ्ठा मते मिळवता येतात. अलीकडच्या निवडणुकीत प्रलोभनांपेक्षा झोपडपट्ट्या आणि गलीच्छ वस्त्या यांतील मतदारांच्या झुंडीच्या झुंडी मतदानकेंद्राकडे कोण घेऊन जाऊ शकतो, यावरच निवडणुकांचे निकाल अवलंबून असतात.

या परिस्थितीवर तोडगा काढण्याचा निवडणूक आयोगाने प्रयत्न केला नाही असे नाही. उमेदवारीचे अर्ज भरतानाच प्रत्येक उमेदवाराने आपली मालमत्ता, शिक्षण आणि गुन्हेगारी यांबद्दल शपथपत्र दाखल करावे अशी व्यवस्था करण्यात आली. देशभर माजलेले गुंड शपथपत्रात आपली खरीखुरी माहिती देतील, ही

अपेक्षाच मुळात भाबडेपणाची. शस्त्रक्रिया आवश्यक असलेल्या आजाराला थातुरमातुर मलमपट्टीचा इलाज करावा असा हा प्रकार होता. त्याचा काहीही परिणाम होण्याची शक्यता नव्हती आणि काही झालाही नाही. या अशा अडाणी उपाययोजनेचा उपयोग तर होतच नाही, अपाय मात्र होतो. हेही अलीकडेच स्पष्ट होऊ लागले आहे. निवडणुकांसंबंधीच्या आचारसंहितेचा भंग केल्याचा आरोप करून, विरोधी पक्षाच्या नेत्यांवर गुप्तहेरांची पाळत ठेवून, त्यांच्या आचारसंहितेच्या बारक्यासारक्या उल्लंघनाबद्दल त्यांच्यावर कारवाया कराव्या असे सर्रास घडताना दिसत आहे. भारतीय जनता पक्षाचे नेते जसवंत सिंह, वरुण गांधी आदींवर केलेली कार्यवाही ही भारतातील लोकशाहीस अत्यंत धोकादायक ठरू शकते.

खरे म्हणजे निवडणूक आयोगाने सर्व पक्षांच्या जाहीरनाम्यांचीही कसोशीने तपासणी करणे आवश्यक आहे. कोणत्याही एका समाजाला फायदा मिळेल अशा तऱ्हेचे कार्यक्रम जाहीर करण्यास बंदी आहे; पण आम आदमीला फायदा देणाऱ्या काहीही घोषणा केल्या, तर त्याबद्दल मात्र काही आडकाठी नाही. सोनिया गांधींनी त्यांच्या पक्षाच्या जाहीरनाम्यात रोजगार हमी योजनेचे फायदे वाढवण्याचे आश्वासन दिले, एवढेच नव्हे तर गरिबी रेषेखालील नागरिकांना ३ रुपये किलोप्रमाणे अन्नधान्य पुरवण्याचेही आश्वासन दिले. हा उघड उघड लाचलुचपतीचा प्रकार आहे; एवढेच नव्हे तर, ज्या समाजातील लक्षावधी लोकांनी अलीकडे आत्महत्या केल्या, त्या शेतकरी समाजावर उघडउघड अत्याचार करणारा आहे.

वरुण गांधींनी हात कापण्याची भाषा केली, ती सद्‌भिरुचीस धरून नाही, हे उघड आहे. त्याबद्दल त्यांना आवश्यक त्या कारवाईस तोंड द्यावे लागेल; पण शेतकऱ्यांचा वंशविच्छेद करणाऱ्या सोनिया गांधींच्या या घोषणेबद्दल काय उपाययोजना होणार आहे ? दोनच दिवसांपूर्वी वर्धा येथे भारताचे राजपुत्र राहुल गांधी यांची सभा झाली. या जाहीर सभेत त्यांनी आपण व काँग्रेस हेच काय ते गरिबांचे कैवारी आहोत, हे दाखवण्याकरिता म्हटले, की देशात जोपर्यंत एक जरी मनुष्य गरीब आहे, तोपर्यंत त्याची विचारपूस मी, सोनिया गांधी आणि मनमोहन सिंग करत राहतील.

राहुल गांधी यांच्या वक्तव्यात सहसा लक्षात न येणारी एक खुबी आहे. आम आदमीच्या नावाखाली धोरणे राबवली, तर त्यातून गरिबी हटत नाही, गरिबी वाढते आणि नेतेच फक्त धनदांडगे बनतात, हा गेल्या ६० वर्षांचा प्रत्यक्ष

अनुभव आहे. नाव गरिबाचे घ्या आणि नेता, तस्कर, गुंडा, अफसर यांच्या द्वारे लयलूट करा असा हा काँग्रेसी कार्यक्रम आहे. हा करुणावादी कार्यक्रम कानाला मोठा गोड लागतो; पण या कार्यक्रमात एक भीषण दुष्टचक्र दडलेले आहे. सार्वजनिक क्षेत्राचा जितका दबदबा मोठा, तितका भ्रष्टाचार अधिक, तितकी गरिबी अधिक आणि गरिबी अधिक तितकी काँग्रेस आणि डाव्यांची चलती अधिक असा हा दुष्ट कार्यक्रम आहे.

हात तोडण्याची भाषा करणारा वरुण गांधी राष्ट्रीय सुरक्षा कायद्याखाली अटकेत जातो. याउलट, वर्षानुवर्षे सरकारी मदत आणि आश्रय यांच्या प्रलोभनाने लक्षावधी गरिबांना त्यांच्यातील पुरुषार्थ खच्ची करून, त्यांना जन्माने लुळे, पांगळे, अपंग बनवणाऱ्यांना मात्र राजकीय सत्ता आणि महात्मेपण दोन्हीही मिळते.

निवडणुकीच्या आदर्श आचारसंहितेचा फार बोलबाला आहे. 'इश्ऊँ' चा वापर एका विशिष्ट समाजाविरुद्ध झाला असा आकांत काँग्रेसी हरघडी करतात. आचारसंहितेचाही उपयोग अशाच पद्धतीने विरोधकांना खच्ची करण्याकरिता होत आहे.

रोजगार हमी योजनेखाली रोजी वाढवून देऊ, रोजगाराचे दिवस वाढवून देऊ, असे सांगून निखळ भ्रष्टाचाराकरिता राष्ट्रीय रोजगार हमी योजनेचा पुरस्कार आणि पाठपुरावा म्हणजे काय आहे ? चांगल्या धडधाकट स्त्री-पुरुषांना स्वयंरोजगारी किंवा उद्योजक बनण्याचे प्रोत्साहन आणि त्यासाठी लागणारी साधनसंपत्ती देण्याचा कार्यक्रम सोडून, त्यांना जन्मभर माती-दगडाचे खोदकाम करण्यास भाग पाडणे, हा गरिबांचा शुद्ध वंशविच्छेद आहे. यातून गरिबी कधी संपणार नाही आणि गरिबांची कणव दाखवणाऱ्या लोकांची चलती राहील याबद्दल सोनिया गांधी, राहुल गांधी आणि डॉ. मनमोहन सिंह यांना कोणत्या कायद्याखाली अटक होणार आहे?

गरिबांकरिता आमचे सरकार कार्यक्रम चालवते, या फुशारक्यांमागे आणखी एक गुपित लपलेले आहे. गरिबांकरिता चाललेले हे कार्यक्रम, हे काही काँग्रेस नेत्यांच्या स्वित्झर्लंडमधील बँक खात्यातील रकमेतून चालवले जात नाहीत; प्रामाणिक करदात्यांनी सरकारी तिजोरीत भरलेल्या करांच्या रकमेतूनच हे तथाकथित गरिबांच्या मदतीचे कार्यक्रम चालवले जातात.

गंमत अशी, की योजना आयोगाच्या अलीकडील एका अहवालानुसार केंद्र शासनाने खर्च केलेल्या १०० रुपयांपैकी ३५ रुपयेसुद्धा गरीबगुरिबांपर्यंत पोहोचत

नाहीत. त्यांतील ६५ रुपये नेते आणि अधिकारी यांची सरकारी यंत्रणाच खाऊन जाते.

गरिबांच्या कणवेचा हा धंदा असा आहे. 'गरिबी दूर करतो' असे म्हणायचे, त्या आधारे मते मिळवायची, त्या आधारे सत्तेत आल्यानंतर वसूल होणाऱ्या करांपैकी नावापुरता एक तुकडा गरिबांच्या तोंडावर फेकायचा आणि आपण मोठे कनवाळू महात्मे आहोत अशी 'नौटंकी' करायची. पोटासाठी भीक मागणाऱ्याला भाकरी देऊ नये, कष्टाची भाकरी कमावण्यासाठी कुऱ्हाड द्यावी, हे जुने लोककथेतील शहाणपण आहे. कुऱ्हाड दिली तर भिकारी सन्मानाने जगू शकतो. भीक घातली, तर तो जन्माचा पुरुषार्थहीन, अपंग बनतो.

आम आदमीचे नाव घ्यायचे आणि त्याला अपंग बनवण्याचे कारखाने काढायचे असा हा काँग्रेसी भीकवादाचा कार्यक्रम आहे. त्याबद्दल जाब विचारणारी कोणतीही आचारसंहिता नाही, कोणतेही शपथपत्र नाही आणि देखरेखही नाही; तोपर्यंत गरिबी वाढतच राहणारच आहे. गरिबांच्या कनवाळू महात्म्यांचीही पैदास होणार आणि त्यांचा धंदा फळफळणार, यात काही शंका नाही.

(६ एप्रिल २००९)

◆◆

लोकसभा निवडणूक २००९
देशपातळीवरील निकालाचा अर्थ

२००९ च्या लोकसभा निवडणुकांच्या निकालाचे विश्लेषण कसे करता येईल आणि अन्वयार्थ कसा लावता येईल ?

या निवडणुकीतील मतदान होईपर्यंत सगळ्या लोकांची, सगळ्या कार्यकर्त्यांची, सगळ्या पत्रकारांची, प्रसारमाध्यमांची या निवडणुकीच्या निकालांबद्दल अगदी वेगळी कल्पना होती. संपूर्ण देशामध्ये राजकीय पक्षांची संख्या कधी नव्हे इतकी भरमसाट झाली आहे. त्यात पुष्कळ पक्ष प्रादेशिक आहेत, ज्यांना काही तत्त्वज्ञान नाही असेही पक्ष खूप आहेत आणि अनेक पक्ष असे आहेत, की ज्यांना अमुक एका व्यक्तीला पंतप्रधानपदाच्या खुर्चीवर बसवायचे आहे. अशा परिस्थितीमध्ये कोणत्याही एका पक्षाला किंवा कोणत्याही एका आघाडीला, सरकार बनविण्यास आवश्यक ते बहुमत मिळणे शक्य नाही आणि निवडणुकीच्या निकालानंतर बहुमताची जुळवाजुळव करून, जे काही सरकार तयार होईल ते आघाडीचेच सरकार असेल असे सगळ्या लोकांना वाटत होते. पक्ष खूप होते, आघ्याड्याही खूप होत्या आणि गंमत म्हणजे या आघाड्याही दिवसादिवसाला बदलत होत्या. कोणी काल तिसऱ्या आघाडीत होते, ते आज चौथ्या आघाडीत जात होते; काही म्हणत, की आता आम्ही काही सांगत नाही, निवडणुकीचे निकाल लागले, की ठरवू कोणत्या आघाडीत जायचे ते! अशा तऱ्हेची विस्कळित परिस्थिती असताना आणि कोणत्याही पक्षाला किंवा आघाडीला बहुमत मिळणार नाही अशी कल्पना असताना निवडणुकीचे निकाल फारच वेगळे लागले.

आजपर्यंतच्या निवडणुकांत जिंकलेल्या पक्षांना आनंद होई आणि ते म्हणत, की इतकी मते मिळतील अशी आमची अपेक्षा होतीच. बाकीचे पक्ष आपण का हरलो याचे विवेचन करण्याचा प्रयत्न करीत. या वेळची निवडणूक अशी विशेष झाली, की यात जिंकणाऱ्यालाही मोठा आश्चर्याचा धक्का बसला. २०६

जागा काँग्रेसला मिळतील अशी काँग्रेसचीही अपेक्षा नव्हती, त्यांचे नेतेसुद्धा तसे म्हणत नव्हते.

या सर्व पार्श्वभूमीवर माझ्या मनात समाजकारणातील एक सैद्धांतिक प्रश्न उभा राहतो. या निवडणुकीत इतके पक्ष आहेत, इतक्या आघाड्या आहेत; उन्हाळ्याचे दिवस आहेत; पण या पक्षांकडे किंवा आघाड्यांकडे त्यांचे म्हणणे काय आहे, ते लोकांपर्यंत पोहोचवण्याकरिता कार्यकर्त्यांची जी फळी उभी राहायला पाहिजे, ती उभीसुद्धा राहत नाही. अशा काळामध्ये उन्हाळ्याच्या कारणाने शहरातील विशेषत: तरुण मंडळी मतदानाला जाण्याऐवजी कुठेतरी सहलीला गेली, वनभोजनाला गेली; त्यामुळे मतदानाचे प्रमाण अपेक्षेपेक्षा कमी झाले.

इतका सगळा अपूर्व प्रकार असताना, जे निवडणुकांचे निकाल लागले, त्यांचा अर्थ कसा काढायचा ? लोकांना आता वेगवेगळे पक्ष आणि वेगवेगळ्या आघाड्या यांचा कंटाळा आला आहे आणि त्यांनी सर्वांनी एका पक्षाला – त्यातल्या त्यात ज्याला काही इतिहास आहे, ज्याला काही मान्यता प्राप्त आहे अशा पक्षाला निदान आघाडी करून, मजबूत सरकार बनवता यावे आणि ज्यांच्याकडे सौजन्यशील असे नेतृत्व आहे, फार उर्मटपणे बोलण्याची भाषा नाही अशा लोकांवर हिंदुस्थानातील लोकांनी विश्वास दाखवला. अशी एक मांडणी केली जाते.

या मांडणीमुळे एक प्रश्न तयार होतो. स्वतंत्र भारत पक्षाच्या विचारसरणीमध्ये 'बाजारपेठ का काम करते?' याचे जे विश्लेषण केले आहे, त्यात विचार करण्याची शक्ती व्यक्तीला दिलेली असते, गटाला नव्हे, असा एक महत्त्वाचा सिद्धांत मांडला आहे. त्यामुळे सर्व मतदारांनी एकदम सामुदायिकरीत्या शहाणपणाचा निर्णय घेतला, हे संख्याशास्त्रीयदृष्ट्या शक्य झालेले दिसते आहे. पण, सगळ्यांनी ठरवून, असा निर्णय घेतला असे म्हणण्यापेक्षा हा निकाल लागल्यानंतर त्यातून जो काही सोईस्कर अर्थ दिसतो आहे, तोच फक्त पुढे मांडून, 'मतदारांनी फार चांगला निर्णय घेतला,' असे म्हणण्याची प्रवृत्ती यातून दिसते आहे.

आपल्याकडेच मतदान झाल्यानंतर, मी काही दिवस 'जागतिक कृषी मंच'च्या (World Agriculture Forum) काँग्रेसच्या निमित्ताने अमेरिकेत दहा-पंधरा दिवस राहून आलो. तिथेही नुकतेच एक निवडणूक होऊन गेली होती आणि ओबामा तिथे राष्ट्राध्यक्ष म्हणून निवडून आले आहेत. निवडून आल्यावर त्यांनी

जे काही निर्णय घ्यायला सुरवात केली आहे आणि त्यावर अमेरिकन लोकांची जी काही प्रतिक्रिया येते आहे, ती पाहण्याची थोडी संधी त्या दहापंधरा दिवसांत मला मिळाली. त्या प्रतिक्रियेचा अभ्यास करता, माझे असे मत झाले आहे, की आपल्याकडील मतदारांनी स्थिर आणि बळकट सरकार बनविण्यासाठी ठरवून मतदान केले असे म्हणण्यापेक्षा, अलीकडे मानसशास्त्रात नव्याने जी 'स्टॉकहोम सायकोलॉजी'ची संकल्पना मांडली जाते, त्या मानसिकतेने मतदान केले असे म्हणणे अधिक सयुक्तिक ठरेल.

'स्टॉकहोम सायकॉलॉजी'चा अर्थ काय ? विमानांची अपहरणे ज्या काळात खूप होत होती, त्या काळामध्ये अपहरणकर्त्यांनी काही विमाने उडवून दिली, काही विमाने सोडून दिली, त्यांतील प्रवासीसुद्धा सुखरूप बाहेर पडले. जिवंत बाहेर पडलेल्या प्रवाशांना पत्रकारांनी विचारले, "या आतंकवाद्यांची अपहरण-काळातील वागणूक कशी होती ?" अपहरणाच्या सर्व काळामध्ये हातामध्ये एके-४७ घेऊन फिरणाऱ्या, कोणी जरा जरी हालचाल केली, तर त्यांना गोळ्या घालून मारणाऱ्या आंतकवाद्यांविषयीसुद्धा, सर्वकाळ मृत्यूच्या सावटाखाली राहिलेले ते ओलीस ठेवलेले प्रवासीसुद्धा वाईट बोलले नाहीत. "नाही, नाही. ते चांगले वागायचे हो ! माझ्या लहान बाळाचा एकाने तर गालगुच्चा घेतला की हो !" अशासारखी उत्तरे ते जिवानिशी सुटलेले प्रवासी अपहरणकर्त्यांच्या वागणुकीविषयी प्रश्नाला देत. ही जी भयगंडापोटी कौतुक करण्याची मनोवृत्ती तयार झाली, त्याला मानसशास्त्रात 'स्टॉकहोम सायकॉलॉजी' असे म्हटले जाऊ लागले.

अमेरिकेतील त्या वास्तव्यात माझ्या असे लक्षात आले, की तेथे राष्ट्राध्यक्षपदी ओबामा निवडून येण्याचे प्रमुख कारण अमेरिकेतील मतदारांची 'स्टॉकहोम सायकॉलॉजी' आहे. सगळ्या जगामध्ये आतंकवाद माजतो आहे; ९/११ च्या हल्ल्यानंतर सगळीकडे आतंकवाद पसरतो आहे, हे पाहिल्यानंतर अमेरिकेच्या पूर्वीच्या अध्यक्षांनी आतंकवाद जेथे आहे, तेथे ठेचून काढला पाहिजे अशी भूमिका घेतली - मग तो अफगाणिस्तानात असो की पाकिस्तानात. पूर्वीच्या अध्यक्षांनी घेतलेली ही आक्रमक भूमिका 'स्टॉकहोम सायकॉलॉजी'त बसत नाही. त्यामुळे, आतंकवाद्यांना शरण गेलो असे न दाखवता काहीतरी समझोत्याचे एखादे पांढरे निशाण दाखवावे, या दृष्टीने अमेरिकेत मतदान झाले. अफगाणिस्तानामध्ये जे युद्धकैदी पकडले गेले किंवा 'अल् कायदा'चे अतिरेकी पकडले गेले, त्यांना जेलमध्ये ठेवण्यात आले. युद्धकैद्यांशी कोणी मानवतेची

भूमिका घेऊन वागत नाही हे उघड आहे; पण त्यांना हळूहळू सोडून द्यावे अशी भूमिका नवीन अध्यक्षांनी मांडल्यानंतर टेलिव्हिजनवर या विषयावर उघड चर्चा झाली. पूर्वीचे उपाध्यक्ष चैनी आणि नवीन अध्यक्ष ओबामा यांनी त्यात भाग घेतला. नवीन अध्यक्षांनी म्हटले, "युद्धकैद्यांचा छळ करणे हे अमेरिकेच्या इतिहासात बसत नाही, तत्त्वज्ञानात बसत नाही." तत्त्वज्ञानात बसत नाही, हे कदाचित खरे असेल; पण दुसऱ्या महायुद्धातील जर्मनांशी संबंध असलेल्या नागरिकांना छावण्यात ठेवून, त्यांना किंवा व्हिएतनाममधील युद्धकैद्यांना कसे वागवण्यात आले, ते साऱ्या जगाला ठाऊक आहे. तेव्हा अमेरिकेचा इतिहास युद्धकैद्यांना मानवतेने वागवण्याचा नाही हे उघड आहे. ओबामांनी आणखी एक युक्तिवाद मांडला, "जर, आपण 'अल् कायदा'च्या कैद्यांना त्यांच्याकडून कबुलीजबाब किंवा माहिती काढण्याकरिता दुष्टपणे वागवले, त्यांचा छळ केला, तर आपले जे कैदी त्यांच्याकडे असतील, त्यांचासुद्धा अशाच तऱ्हेने तेथे छळ होईल." माझ्या असे लक्षात आले, की या एका कल्पनेने अमेरिकन नागरिकांमध्ये थरकाप झाला आहे, की आपल्यापैकी जे 'अल् कायदा'च्या हाती सापडतील त्यांचा असाच छळ झाला, तर काय करावे ? प्रत्यक्षात स्थिती अशी आहे, की 'अल् कायदा'च्या हाती जे कोणी सापडले, ते काही लढणारे जवान होते असे नाही, त्यात काही पत्रकारही सापडले. ज्यांचा अमेरिकेच्या अफगाणिस्तानवरील किंवा इराकवरील हल्ल्याशी काहीही संबंध नव्हता. अशा लोकांनासुद्धा 'अलकायदा'च्या लोकांनी टेलिव्हिजनच्या कॅमेऱ्यासमोर तलवारीने मुंडकी छाटून खलास केले. हे असे असतानासुद्धा अमेरिकेचा राष्ट्राध्यक्ष लोकांना सांगतो, की आपल्या लोकांचा छळ होऊ नये म्हणून आपण त्यांच्याबरोबर चांगले वागावे. याचा अर्थ असा, की अमेरिकेच्या अध्यक्षांनासुद्धा 'स्टॉकहोम सायकॉलॉजी'ने ग्रासले आहे - ते कोणत्या धर्मामध्ये, कोणत्या वंशामध्ये जन्मले याची चर्चा आवश्यक नाही.

आणि मग, सगळ्या जगातील आतंकवादाचा सामना आक्रमकपणे न करता, शांतपणे करावा आणि त्याकरिता जास्तीत जास्त शांतपणे वागण्याची शक्यता कोणात आहे, हे पाहून अमेरिकेतील लोकांनी मतदान केले.

त्याचप्रमाणे, हिंदुस्थानातील लोकसभा निवडणुकीतही लोकांनी घाबरून जाऊन मतदान केले आहे. पंतप्रधानपदाची हाव लागलेल्या लोकांचे काय सांगावे ? ते कशा पद्धतीने निर्णय घेतील ते, त्याच्यापेक्षा ज्यांचा काही इतिहास आहे - अभ्यासूपणाबद्दल, सौजन्याबद्दल इतिहास आहे, अशा माणसांना मत

दिले, तर हिंदुस्थानला कोणत्यातरी ॲडव्हेंचरमध्ये – धाडसी कारवाईमध्ये ते ढकलणार नाहीत. याचा अर्थ काय ? दुसऱ्या महायुद्धात हिटलरची आक्रमकता वाढत असताना इंग्लंडचे पंतप्रधान चेंबर्लेन यांनी हिटलरशी सामोपचाराने वागावे अशी भूमिका घेतली आणि म्युनिचला जाऊन, त्याच्याशी करार करायचे ठरवले. त्या वेळी विन्स्टन चर्चिल हे एकमेव राजकारणी असे होते, की ज्यांनी सांगितले, की हिटलरशी तडजोड होऊ शकत नाही. आज आपण पुन्हा चेंबरर्लेनच्या मार्गाने जाऊन, आतंकवाद्यांशी तडजोड करून, त्यांच्याशी जुळवून घेता येते का, हे पाहतो आहोत.

लोकसभा निवडणुकीच्या प्रचारसभांमध्ये भाषण करताना, मी देशापुढील दोन मोठ्या समस्या मांडल्या.

एक समस्या– आतंकवाद्यांच्या संकटाची. हिंदुस्थानातील लोकांची लढण्याची प्रवृत्ती नाही. हिंदुस्थानला अहिंसेच्या मार्गाने आणि सत्याग्रहाच्या मार्गाने स्वातंत्र्य मिळाले, याचा आपल्याला फार आनंद वाटत होता. त्या स्वस्त स्वातंत्र्याची आता आपल्याला किंमत मोजावी लागते आहे. कारण त्या स्वस्त स्वातंत्र्यामुळे आपल्या माथी कचकड्याचे नेतृत्व बसले आणि इस्त्रायल, चीन ज्या तऱ्हेने धाडसाने साऱ्या जगामध्ये आपले स्थान निर्माण करीत आहेत, तसे न होता बुळकुंड्या लोकांचे राज्य आपल्याकडे तयार झाले.

त्याशिवाय, कम्युनिस्ट व आतंकवादी यांची एक सत्ता तयार झाली आहे आणि ती सगळे जग काबीज करायला निघाली आहे.

दुसरे संकट असे, की सगळ्या जगामध्ये आर्थिक मंदी आली आहे. या मंदीमुळे बँका बंद पडत आहेत, आपल्या ठेवी परत मिळतील की नाही, याची लोकांना चिंता पडली आहे; नोकऱ्या जात आहेत, बेकारी वाढते आहे. अशा परिस्थितीत बेकारी वाढायची नसेल, तर काय करायला पाहिजे?

बेकारी वाढायची नसेल, तर जे लोक रोजगार देतात, त्यांना प्रोत्साहन देणे आवश्यक आहे, ही स्वतंत्र भारत पक्षाची भूमिका आहे, त्यांना प्रोत्साहन देण्याच्या व्यवस्थेला स्वभापने 'पोशिंद्यांची लोकशाही' म्हटले आहे. पण, संपुआच्या म्हणजे काँग्रेसच्या नेतृत्वाखालील संयुक्त पुरोगामी आघाडीच्या सरकारने त्याच्या उलट भूमिका मांडली, "जे लोक बेकारीमुळे संकटात सापडत आहेत, त्यांना सावरून घ्यायला पाहिजे, 'आम आदमीला' चांगले वाटावे अशा तऱ्हेची भूमिका घेतली, तर या आर्थिक संकटातून आपण पार पडू शकू."

मी निवडणुकीच्या प्रचारात मांडले, की तुम्ही जर का 'आम आदमी'करिता

ग्रामीण रोजगार हमी योजना, आरोग्य योजना, सर्व शिक्षा अभियान यांसारख्या योजना राबवायच्या, तर त्याच्या खर्चासाठी पैसे काही काँग्रेसच्या नेत्यांनी स्वित्झर्लंडमधील बँकांत ठेवलेल्या पैशातून येणार नाहीत, या सगळ्या कार्यक्रमांसाठी दिल्लीच्या सरकारी खजिन्यातूनच खर्च होणार आहे. आता हा खर्च होतो म्हणजे तरी नेमके काय होते ? नियोजन मंडळाच्या एका समितीने दिलेल्या अहवालात म्हटले आहे, की गरिबांच्या नावाने या तिजोरीतून ६५ रुपये बाहेर काढले, तर त्यातील फक्त १ रुपया गरिबांपर्यंत पोहोचतो. म्हणजे, 'आम आदमी'चे भले करतो म्हणत, त्यांच्याकडून मते घ्यायची, सत्ता मिळवायची आणि त्या सत्तेचा वापर करून, सरकारी तिजोरीतून ६५ रुपये काढून, त्यांतले ६४ रुपये स्वत:च्या खिशात घालायचे असा हा भामटेपणाचा कारभार 'आम आदमी' अर्थशास्त्राचा; मग त्यातून मंदीची लाट थोपवणे कसे शक्य होणार ?

त्याच्या ऐवजी 'पोशिंद्यांची लोकशाही' आली, तर मंदीची लाट थोपू शकते, बेरोजगारी संपू शकते असा मोठा धाडसी विचार स्वतंत्र भारत पक्षाने मांडला आहे. लोकांच्या मनामध्ये हे धाडस नाही, कारण त्याचीही किंमत द्यावी लागते ना ! गांधीजींच्या मार्गाने मिळालेल्या स्वातंत्र्याची किंमत आपण दिलीच आहे – आपण सगळे नेभळट बनलो आहोत. आपण इतके नेभळट झालो आहोत, की आपल्याला आर्थिक संकटालाही तोंड देण्याची ताकद नाही आणि आंतकवाद्यांच्या संकटालाही तोंड देण्याची ताकद नाही.

आणि त्यामुळे गेल्या लोकसभा निवडणुकीत लोकांनी, जसे इंग्लंडमध्ये चेंबरर्लेनला पंतप्रधानपदी निवडून दिले, तसे फारसे आक्रमक नसलेले मनमोहन सिंह सज्जन गृहस्थ आहेत, शांत गृहस्थ आहेत, अभ्यासू गृहस्थ आहेत, असे म्हणून त्यांना पंतप्रधानपदी निवडून दिले; पण त्यामुळे जगाचा किंवा हिंदुस्थानचा इतिहास बदलला अशी कल्पना कोणी करून घेऊ नये.

लोकसभेच्या या निवडणुकीत काँग्रेसला २०६ जागा मिळाल्या आणि त्यांना काही पक्षांच्या मदतीने साधारणपणे पाच वर्षे चालेल अशा तऱ्हेचे सरकार तयार करायची शक्यता तयार झाली; पण तुम्ही इतिहास विसरू नये. सगळ्यांच्या लक्षात आहे, की १९८४ मध्ये, जेव्हा शेतकरी संघटनेची महाराष्ट्र प्रचार यात्रा झाली, त्या वर्षी काँग्रेसला ४१२ म्हणजे या वेळेच्या दुप्पट जागा मिळाल्या होत्या. या वेळी काँग्रेसला फक्त २९ टक्के मते मिळाली, १९८४ मध्ये ४९ टक्के मते मिळाली होती. इंदिरा गांधींच्या हत्येनंतर तयार झालेल्या सहानुभूतीच्या लाटेत १९८४ मध्ये राजीव गांधींना ४९ टक्के मते आणि ४१२ जागा लोकसभेत

मिळाल्या. सहानुभूतीवर मिळालेली मते कायमची असतात असे गृहीत धरू नये.

मला काही देशाचा पंतप्रधान व्हायचे नाही किंवा एखाद्या राज्याचा मुख्यमंत्री व्हायचे नाही. मला देशाचे हित चिंतायचे आहे. त्यामुळे यापुढील काही महिन्यांमध्ये परिस्थिती काय असेल, ते देशाचा हितचिंतक म्हणून पुढे ठेवतो आहे.

कायदेमंडळातील महिलांच्या आरक्षणाचे विधेयक संमत होईल, न होईल हे बाजूलाच राहू द्या. पण, आज पाकिस्तानात आतंकवादी आणि तालीबानी ज्या वेगात हातपाय पसरत आहेत आणि हिंदुस्थानच्या सरहद्दीकडे सरकत आहेत, हे पाहिले तर काँग्रसेची, नवीन संपुआची आणि मनमोहन सिंगांची जी 'भाई भाई' वादाची कल्पना आहे, ती टिकू शकेल आणि टिकली तर देशाचे भले होईल असे मला काही दिसत नाही. या 'भाई भाई' वादाच्या पाठपुराव्यामुळे १९६२ मध्ये हिंदुस्थानवर चीनचे आक्रमण झाले. कोणाशी भांडण काढू नये असे म्हणत आपण नेपाळ चीनला जवळजवळ देऊन टाकला, आता चीनने अरुणाचल प्रदेशासंबंधी राष्ट्रसंघातील सुरक्षा समिती (Security Council) कडे तक्रार केली आहे. तेव्हा आता देश 'भाई भाई' वादाने चालवायचा की पुरुषार्थाच्या मार्गाने याचा निर्णय घ्यायची वेळ आली आहे. पुरुषार्थाच्या आवाहनाने मते मिळणे कठीण आहे, हे मला माहीत आहे. (तिकडे शेतकरी मरे ना का!) आम्ही तुम्हाला ३ रुपये किलोने धान्य देतो म्हटल्यावर काँग्रेसला भरभरून मते देणारे 'भेकडपणा सोडा आणि पोशिंद्यांची लोकशाही स्थापन करून, पुरुषार्थाच्या मार्गाने राष्ट्र मोठे करूया,' असे आवाहन करणाऱ्या स्वभापला मते देणार नाहीत हे ~~खरे आहे; पण केवळ मते मिळविण्याकरिता तुमच्या~~ मनाला न पटणारी, तुमच्या विचारांशी न जुळणारी तडजोड तुम्ही जर केली तर इतिहास तुम्हाला माफ करणार नाही.

गेल्या निवडणुकीच्या निकालाचा थोडा अर्थ सांगायचा तर आधीचीच भेकड जनता ही आता अधिकच घाबरून गेली आहे आणि म्हणून अडवाणी पंतप्रधान झाले तर काय सांगावे ? ते एकदम पाकिस्तानवर हल्ला करतील, दुसऱ्या कोणाच्या हाती राज्य गेले, तर ते चीनवर हल्ला करतील, तिबेटला चीनच्या मगरमिठीतून सोडवायचा प्रयत्न करतील – तसे नको बाबा. आता आमचे जे काही शांतपणे चालले आहे, ते तसेच चालू द्या असे म्हणणाऱ्या नेभळटांची संख्या वाढल्यामुळे काँग्रेस निवडून आली; पण त्यांचे राज्य फार काळ टिकणार

आहे, असे काही मला वाटत नाही. १९८४ मध्ये ४९ टक्के मतांवर ४१२ जागा मिळाल्या, तरी पाच वर्षांच्या आत काँग्रेसला सत्ता सोडावी लागली, राजीव गांधी हरले, काँग्रेस पक्ष हरला आणि व्ही. पी. सिंगांचे सरकार आले. त्याला दोन महत्त्वाच्या गोष्टी कारण ठरल्या. एक म्हणजे ज्याचा खूप गाजावाजा झाला ते 'बोफोर्स' प्रकरण. राजीव गांधी हे व्यक्तिमत्त्व वेगळे होते, मनमोहन सिंह हे व्यक्तिमत्त्व वेगळे आहे. त्यामुळे मनमोहन सिंहांच्या कारकिर्दीत 'बोफोर्ससारखी काही लबाडीची प्रकरणे होतील असे मला वाटत नाही.

राजीव गांधींच्या पराभवाला कारण ठरलेली आणखी एक भयानक चूक म्हणजे 'शाह बानो' प्रकरणामध्ये एका घटस्फोटित मुस्लिम महिलेला कायदेशीरपणे जे मिळायला पाहिजे, ते मिळावे असा सर्वोच्च न्यायालयाने निकाल दिल्यानंतर घटनेत दुरुस्ती करण्याची राजीव गांधींनीही चूक केली, तेथूनच काँग्रेसच्या पराभवाला सुरवात झाली आणि मला आता असे दिसते आहे, की येत्या काही महिन्यांतच आंतकवादामुळे अशी काही परिस्थिती निर्माण होईल, की या काँग्रेसला त्यांचा 'भाई भाई' वाद पुढे चालवता येणार नाही आणि ४१२ वाले पाच वर्षांत पडले, आजचे २०६ वाले पाच महिने तरी टिकतात का नाही, याबद्दल शंका आहे.

(२१ जून २००९)

◆◆◆

शेतकरी संघटनाविषयक इतर प्रकाशने

विजय परुळेकर
योद्धा शेतकरी

विनय हर्डीकर
जग बदल घालुनी घाव

अनंत उमरीकर
आंदोलन
बँकेने लुटलं शेतकऱ्याला
वेडेपीर

शेषराव मोहिते
शेती व्यवसायावरील अरिष्ट

इंद्रजित भालेराव
मळ्यातील अंगार

अजित नरदे
राजकीय भूमिका– शेतकरी संघटना

शेतकरी प्रकाशन
जागतिक व्यापार संघटनेचा ओनामा

लोकशाही ही सर्वांत श्रेष्ठ राज्यपद्धती आहे, असं समजलं जातं. तशी ती फारशी चांगली नाही. लोकशाहीमध्ये गोंधळ होतो, भ्रष्टाचार होतो, गुंड माजतात - सगळं काही खरं आहे; पण लोकशाहीपेक्षा जास्त चांगली पद्धत अजून तरी कुणी शोधून काढलेली नाही. कारण लोकशाहीत मोकळेपणा आहे. फुकुयामा नावाचा एक जपानी तत्त्वज्ञ आहे. त्याचं एक पुस्तक दहा वर्षांपूर्वी प्रसिद्ध झालं. त्या पुस्तकाचा विषय असा आहे, की जेव्हा लोकशाही-स्वातंत्र्य ही कल्पना मान्य झाली तेव्हाच मनुष्य जातीचा इतिहास थांबला. आता यापुढं काही प्रगती होणार नाही. लोकशाही-स्वातंत्र्य ही मनुष्याच्या सामाजिक संस्थातली शेवटची पायरी आहे.

- शरद जोशी

जनशक्ती वाचक चळवळ
₹ ३००